सत्यमेव जयते

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३




अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३

अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

# प्रस्तावना

महाराष्ट्र अर्थसंकल्प नियमपुस्तिका, खंड १ ला, परिच्छेद क्र.१३९ नुसार अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' हे प्रकाशन राज्य विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये सादर करण्यासाठी दरवर्षी तयार करते. सदर प्रकाशन २०२२-२३ या वर्षासाठी तयार करण्यात आले असून मालिकेतील हा ६२ वा अंक आहे.

२. या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची माहिती व संदर्भासाठी शक्य त्या ठिकाणी निर्देशांक व स्थितीदर्शक कल देण्यात आले आहेत. हे प्रकाशन राज्याच्या महत्त्वाच्या सांख्यिकीची समयमालिकानिहाय अद्ययावत माहिती आणि भारतातील सर्व राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक उपलब्ध करुन देते. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नामुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी / अंदाज अस्थायी स्वरुपातील आहेत.

३. राज्य व केंद्र शासनाचे संबंधित विभाग, कार्यालये व उपक्रम यांनी उपयुक्त माहिती या संचालनालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याबद्दल हे संचालनालय त्यांचे आभारी आहे.

४. सदर प्रकाशन तयार करण्यात संचालनालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या संपादकीय समितीच्या मार्गदर्शनाखाली प्रकरण लेखक अधिकारी तसेच प्रकाशन शाखेतील अधिकारी/कर्मचारी यांचा सहभाग आहे.

विजय आहेर
संचालक,
अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महाराष्ट्र शासन

मुंबई

दिनांक : ८ मार्च, २०२३

# महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०२२-२३

## अनुक्रमणिका


| | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **राज्याचा संक्षिप्त आढावा** | १ |
| अ. | **दृष्टीक्षेपात महाराष्ट्र** | ३ |
| ब. | **महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती** | ६ |
| १. | **राज्य अर्थव्यवस्था** | ९ |
| २. | **लोकसंख्या** | १७ |
| ३. | **राज्य उत्पन्न** | २७ |
| ४. | **किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था**<br>किंमती<br>सार्वजनिक वितरण व्यवस्था | ४३ |
| ५. | **लोकवित्त** | ७५ |
| ६. | **संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार** | ८९ |
| ७. | **कृषि व संलग्न कार्ये**<br>कृषि<br>सिंचन<br>फलोत्पादन<br>पशुसंवर्धन<br>दुग्ध विकास<br>मत्स्यव्यवसाय<br>वने व सामाजिक वनीकरण | १०१ |
| ८. | **उद्योग आणि सहकार**<br>उद्योग<br>सहकार | १४५ |
| ९. | **पायाभूत सुविधा**<br>ऊर्जा<br>वाहतूक व दळणवळण | १६९ |
| १०. | **सामाजिक क्षेत्र**<br>शिक्षण<br>सार्वजनिक आरोग्य<br>महिला व बाल विकास<br>रोजगार व दारिद्र्य<br>गृहनिर्माण<br>पाणी पुरवठा आणि स्वच्छता<br>पर्यावरण संवर्धन<br>सामाजिक न्याय<br>मानव विकास आणि शाश्वत विकास ध्येये | १९५ |
| | **व्याख्या सूची** | २७५ |
| क. | **भारतातील राज्यांचे निवडक सामाजिक व आर्थिक निर्देशक** | २८२ |

# परिशिष्टे



| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. २.१** | महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या | २४ |
| **परि. २.२** | जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या | २४ |
| **परि. २.३** | जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक | २५ |
| **परि. ३.१** | मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३४ |
| **परि. ३.२** | मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ३५ |
| **परि. ३.३** | मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३६ |
| **परि. ३.४** | मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक निव्वळ राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार वास्तविक निव्वळ राज्य उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ३७ |
| **परि. ३.५** | मूळ किंमतीनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि, बाजार किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न व स्थुल राष्ट्रीय उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ३८ |
| **परि. ३.६** | मूळ किंमतीनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि, बाजार किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न व स्थुल राष्ट्रीय उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ३९ |
| **परि. ३.७** | मूळ किंमतीनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक देशांतर्गत निव्वळ मूल्यवृद्धि, बाजार किंमतीनुसार सांकेतिक देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (चालू किंमतींनुसार) | ४० |
| **परि. ३.८** | मूळ किंमतीनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक देशांतर्गत निव्वळ मूल्यवृद्धि, बाजार किंमतीनुसार वास्तविक देशांतर्गत निव्वळ उत्पन्न व निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) | ४१ |
| **परि. ३.९** | सांकेतिक स्थूल जिल्हा उत्पन्न (चालू किंमतींनुसार), वास्तविक स्थूल जिल्हा उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार) दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न - चालू किंमतींनुसार (दरडोई जिल्हा उत्पन्न) | ४२ |
| **परि. ४.१** | महाराष्ट्रातील ग्रामीण भागाकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ५५ |
| **परि. ४.२** | महाराष्ट्रातील नागरी भागाकरिता गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ५६ |
| **परि. ४.३** | राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन यांचेकडून ग्रामीण, नागरी व एकत्रित भागासाठी राज्याकरीता परिगणित केलेले गटनिहाय ग्राहक किंमती निर्देशांक | ५७ |
| **परि. ४.४** | महाराष्ट्र व अखिल भारताकरिता शेत मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक व ग्रामीण मजुरांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५८ |
| **परि. ४.५** | अखिल भारतीय औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ५९ |
| **परि. ४.६** | महाराष्ट्रातील केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ६० |
| **परि. ४.७** | महाराष्ट्रातील केंद्रांसाठी औद्योगिक कामगारांकरिता ग्राहक किंमती निर्देशांक | ६१ |
| **परि. ४.८** | अखिल भारतीय स्तरावरील निरनिराळ्या महत्त्वाच्या ग्राहक किंमती निर्देशांकांवर आधारित चलनवाढ | ६२ |
| **परि. ४.९** | अखिल भारतीय घाऊक किंमती निर्देशांक | ६३ |
| **परि. ४.१०** | जिल्हानिहाय शिधापत्रिकांची संख्या (३१ डिसेंबर, २०२२ रोजी) | ६४ |
| **परि. ४.११** | भारत सरकारकडून राज्याला मिळालेले नियतन | ६५ |
| **परि. ४.१२** | अधिकृत शिधावाटप / रास्त भाव दुकानांना तांदूळ व गहू यांचे वितरण | ६५ |
| **परि. ४.१३** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०२१-२२ करीता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ६६ |
| **परि. ४.१४** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०२१-२२ करिता अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ६८ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. ४.१५** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजना कुटुंबांना सन २०२२-२३ करीता डिसेंबर पर्यंत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ७० |
| **परि. ४.१६** | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गत प्राधान्य कुटुंबांना सन २०२२-२३ करिता डिसेंबर पर्यंत अन्नधान्याचे नियतन, उचल व रास्त भाव दुकानांना वितरण | ७२ |
| **परि. ४.१७** | जिल्हानिहाय गोदामांची आणि रास्त भाव दुकानांची संख्या | ७४ |
| **परि. ५.१** | दृष्टिक्षेपात अर्थसंकल्प | ८४ |
| **परि. ५.२** | महसुली व भांडवली लेख्यांवरील जमेचा तपशील | ८५ |
| **परि. ५.३** | महसुली व भांडवली लेख्यांवरील विकास व विकासेतर खर्चाचा तपशील | ८६ |
| **परि. ५.४** | वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे | ८७ |
| **परि. ५.५** | शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च | ८८ |
| **परि. ६.१** | सर्व अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या ठेवी व कर्ज | ९७ |
| **परि. ६.२** | जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०२२-२३) | ९८ |
| **परि. ६.३** | जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजनेचा तपशील | ९९ |
| **परि. ७.१** | कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, एकूण वहितीचे क्षेत्र व सरासरी वहिती क्षेत्र | १३५ |
| **परि. ७.२** | राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी | १३६ |
| **परि. ७.३** | राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता | १३७ |
| **परि. ७.४** | राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक | १४० |
| **परि. ७.५** | राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र | १४१ |
| **परि. ७.६** | सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी | १४२ |
| **परि. ७.७** | राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी | १४३ |
| **परि. ८.१** | राज्यातील खनिजांचे उत्पादन | १६२ |
| **परि. ८.२** | राज्यातील उद्योगांच्या निवडक बाबी (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) | १६३ |
| **परि. ८.३** | भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक | १६५ |
| **परि. ८.४** | राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील | १६६ |
| **परि. ९.१** | राज्यातील विजेचा पुरवठा व वापर | १९० |
| **परि. ९.२** | राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १९१ |
| **परि. ९.३** | जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) | १९२ |
| **परि. ९.४** | राज्यातील मोटार वाहनांची संख्या | १९३ |
| **परि. १०.१** | विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या | २५९ |
| **परि. १०.२** | सन २०२२-२३ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (दि.३१/१२/२०२२ अखेर) | २६० |
| **परि. १०.३** | सन २०२२-२३ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (दि.३१/०१/२०२३ अखेर) | २६१ |
| **परि. १०.४** | सन २०२१-२२ मधील कला, विज्ञान, वाणिज्य, इतर बिगर- कृषि अभ्यासक्रम, विधी, शिक्षणशास्त्र व ललित कला अभ्यासक्रमांकरीता एकूण संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (अस्थायी दि.३१/१२/२०२२ पर्यंत) | २६२ |

| | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **परि. १०.५** | सन २०२२-२३ मध्ये कृषि, पशु व मत्स्य विज्ञान अभ्यासक्रमांकरीता संस्था, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (दि.३१/१२/२०२२ पर्यंत) | २६३ |
| **परि. १०.६** | राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्वस्त संस्था रुग्णालये) | २६४ |
| **परि. १०.७** | राज्यातील जिल्हानिहाय वैद्यकीय सुविधा (डिसेंबर, २०२२ अखेर) | २६५ |
| **परि. १०.८** | राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्युदर, अर्भकमृत्युदर व एकूण जननदर | २६६ |
| **परि. १०.९** | जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण | २६७ |
| **परि. १०.१०** | राज्यातील विविध उद्योगांतील सरासरी दैनिक रोजगार | २६८ |
| **परि. १०.११** | राज्यातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार | २६९ |
| **परि. १०.१२** | राज्यातील कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांमध्ये नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या, अधिसूचित केलेली रिक्त पदे व भरलेली पदे | २७० |
| **परि. १०.१३** | कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रांच्या चालू नोंदवहीत ऑक्टोबर, २०२२ अखेर असलेल्या व्यक्तींची शैक्षणिक पात्रतेनुसार संख्या | २७१ |
| **परि. १०.१४** | महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेल्या राज्यातील विविध कामांच्या वर्गीकरणानुसार पूर्ण झालेल्या कामांची संख्या व त्यावरील खर्च | २७२ |
| **परि. १०.१५** | राज्यातील औद्योगिक विवाद ** | २७३ |
| **परि. १०.१६** | जिल्हानिहाय मानव विकास निर्देशांक २०११ | २७४ |

# राज्याचा संक्षिप्त आढावा

देशाच्या पश्चिम व मध्य भागात वसलेल्या महाराष्ट्राला अरबी समुद्राचा ७२० किमी लांबीचा विस्तीर्ण समुद्रकिनारा लाभला असून सह्याद्री व सातपुडा या पर्वतरांगांची नैसर्गिक तटबंदी लाभली आहे. राज्याच्या वायव्येस गुजरात, उत्तरेस मध्य प्रदेश, पूर्वेस छत्तीसगड, आग्नेयेस तेलंगणा, दक्षिणेस कर्नाटक व नैऋत्येस गोवा आहे. प्रशासकीय सोयीसाठी राज्याची विभागणी ३६ जिल्हे व ६ महसूल विभागांमध्ये करण्यात आली आहे.

राज्याचे हवामान उष्ण कटिबंधीय मोसमी आहे. मार्चपासून सुरु होणाऱ्या व अंगाची काहिली करणाऱ्या उन्हाळ्या पाठोपाठ जूनच्या सुरुवातीला पावसाळा येतो. पावसाळ्यातील हरित व आल्हाददायी वातावरण, ऑक्टोबरच्या असुखद वातावरणानंतर येणाऱ्या सौम्य हिवाळ्यात टिकून राहते.

महाराष्ट्र राज्य लोकसंख्येनुसार देशात दुसऱ्या क्रमांकाचे तर क्षेत्रफळानुसार देशात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्र राज्य रेल्वे, रस्ते, हवाई व जल मार्गाने जोडले गेले असून देशातील मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेल्या राज्यांपैकी एक आहे.

उत्तम पायाभूत सुविधा, मुबलक नैसर्गिक साधनसंपत्ती, प्रमुख भागांशी संपर्क, कुशल मनुष्यबळाची उपलब्धता आणि दर्जेदार शिक्षण यामुळे महाराष्ट्र हे नवीन उद्योग स्थापित करण्यासाठी आदर्श ठिकाण झाले आहे. पायाभूत सुविधा व स्मार्ट शहरे विकसित करण्यावर राज्याने भर दिला आहे.

राज्याची राजधानी मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई केवळ अग्रेसर कार्पोरेट संस्थांच्या व कंपन्यांच्या मुख्य कार्यालयांचे माहेरघर नसून आशिया खंडातील सर्वात जुना शेअर बाजार, मुंबई शेअर बाजार, हा देखील याच शहरात दिमाखात उभा आहे.

महाराष्ट्र ही फक्त एक भौगोलिक संज्ञा नसून लोकांच्या एकत्रित प्रयत्नांनी उभे राहिलेले राज्य आहे. राज्यात विविध चालीरीती व परंपरा असलेले लोक गुण्यागोविंदाने राहतात. आपल्या समृद्ध संगीत व नृत्य परंपरेसाठी राज्य देशात प्रसिद्ध आहे. पोवाडा, भारुड, गोंधळ आणि लावणीच्या माध्यमातून लोककलेमध्ये केलेल्या भरीव योगदानासाठी राज्य ओळखले जाते. महाराष्ट्राला उच्च दर्जाची नाट्य परंपरा आहे. राज्य विविध पाककृतींसाठी देखील प्रसिद्ध आहे. सर्व प्रमुख धार्मिक सण राज्यात शांततेने व सौहार्दतेने साजरे केले जातात. देशाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रगतीमध्ये राज्याचा बहुमोल वाटा आहे.

अजंठा, वेरूळ व घारापुरी लेणी, १९ व्या शतकातील नव-गॉथिक शैलीतील सार्वजनिक इमारती व २० व्या शतकातील आर्ट डेको इमारती, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ही जागतिक वारसा स्थळे राज्यात आहेत. नाशिक जिल्ह्यातील नांदूर मधमेश्वर, बुलडाणा जिल्ह्यातील लोणार सरोवर आणि ठाणे खाडी या नैसर्गिक पाणथळ क्षेत्रांना रामसर स्थळांचा दर्जा प्राप्त झाला आहे. ही जागतिक वारसा स्थळे, वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले गेट वे ऑफ इंडिया आणि चैत्य व विहार, वन्यजीव अभयारण्ये, पक्षी अभयारण्ये, समुद्र किनारे, गडकिल्ले कायमच जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात.

राज्याने क्रीडा, कला, साहित्य व सामाजिक सेवा यांमध्ये आपला स्वतःचा ठसा उमटवला आहे. मनोरंजन क्षेत्रात जागतिक स्तरावर नावाजलेले बॉलीवूड हे देखील राज्याचा हिस्सा आहे.

काळाच्या प्रत्येक टप्प्यावर प्रगतिशील राहून आपले पुरोगामित्व सिद्ध करणाऱ्या महाराष्ट्र राज्याने शाश्वत विकासाच्या दिशेने आपली वाटचाल सुरू ठेवली आहे.

* * * * *

## महत्त्वाचे

१) सामान्य प्रशासन विभागाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग, असाधारण क्रमांक २५, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ अधिसूचना क्र.गानाब-२७१५/मंत्री १८/प्र.क्र.२१८/२९ अन्वये महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार 'औरंगाबाद' शहराचे नाव बदलून ते 'छत्रपती संभाजीनगर' करण्यात आले आहे.

२) सामान्य प्रशासन विभागाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-मध्य उप-विभाग, असाधारण क्रमांक २४, दि.२४ फेब्रुवारी, २०२३ अधिसूचना क्र.गानाब-४७२१/प्र.क्र.७३/अ/२९, अन्वये महाराष्ट्र शासनाने दिलेल्या आदेशानुसार 'उस्मानाबाद' शहराचे नाव बदलून ते 'धाराशिव' करण्यात आले आहे.

3) महसूल व वन विभागाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ४५, दि. २६ फेब्रुवारी, २०२३ अधिसूचनेचा मसुदा क्र.प्राफेब २०२३/ प्र. क्र. ३६/ म-१० प्रसिद्ध झाला आहे.

अनुसूची

| जुने नाव | नवे नाव |
|---|---|
| औरंगाबाद विभाग | छत्रपती संभाजीनगर विभाग |
| औरंगाबाद जिल्हा | छत्रपती संभाजीनगर जिल्हा |
| औरंगाबाद उप विभाग | छत्रपती संभाजीनगर उप विभाग |
| औरंगाबाद तालुका | छत्रपती संभाजीनगर तालुका |
| औरंगाबाद गाव | छत्रपती संभाजीनगर गाव |

४) महसूल व वन विभागाचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार-ब, असाधारण क्रमांक ४६, दि. २६ फेब्रुवारी, २०२३ अधिसूचनेचा मसुदा क्र.प्राफेब २०२३/ प्र क्र ३७/म-१० प्रसिद्ध झाला आहे.

अनुसूची

| जुने नाव | नवे नाव |
|---|---|
| उस्मानाबाद जिल्हा | धाराशिव जिल्हा |
| उस्मानाबाद उप विभाग | धाराशिव उप विभाग |
| उस्मानाबाद तालुका | धाराशिव तालुका |
| उस्मानाबाद गाव | धाराशिव गाव |

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०२१-२२ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **भौगोलिक रचना** - | ३०६ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ | ३०८ |
| | क्षेत्र (हजार चौ. किमी) | | | | | | | |
| | समुद्र किना-याची लांबी (किमी) | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० | ७२० |
| २. | **प्रशासकीय रचना** - | | | | | | | |
| | महसूली विभाग | ४ | ४ | ६ | ६ | ६ | ६ | ६ |
| | जिल्हे | २६ | २६ | २८ | ३१ | ३५ | ३५ | ३६ |
| | तालुके | २२९ | २३५ | ३०१ | ३०३ | ३५३ | ३५५[@@] | ३५५[@@] |
| | वस्ती असलेली गावे | ३५,८५१ | ३५,७७८ | ३९,३५४ | ४०,४१२ | ४१,०९५ | ४०,९५९ | ४०,९५९ |
| | वस्ती नसलेली गावे | ३,०१६ | २,८८३ | २,४७९ | २,६१३ | २,६१६ | २,७०६ | २,७०६ |
| | शहरे [#] | २६६ | २८९ | ३०७ | ३३६ | ३७८ | ५३४ | ५३४ |
| ३. | **जनगणनेनुसार लोकसंख्या** -(हजारात) | (१९६१) | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | (२०११) |
| | एकूण | ३९,५५४ | ५०,४१२ | ६२,७८४ | ७८,९३७ | ९६,८७९ | १,१२,३७४ | १,१२,३७४ |
| | पुरुष | २०,४२९ | २६,११६ | ३२,४१५ | ४०,८२६ | ५०,४०१ | ५८,२४३ | ५८,२४३ |
| | स्त्रिया | १९,१२५ | २४,२९६ | ३०,३६९ | ३८,१११ | ४६,४७८ | ५४,१३१ | ५४,१३१ |
| | ग्रामीण | २८,३९१ | ३४,७०१ | ४०,७९१ | ४८,३९५ | ५५,७७८ | ६१,५५६ | ६१,५५६ |
| | नागरी | ११,१६३ | १५,७११ | २१,९९३ | ३०,५४२ | ४१,१०१ | ५०,८१८ | ५०,८१८ |
| | अनुसूचित जाती | २,२२७ | ३,०२५ | ४,४८० | ८,७५८ | ९,८८२ | १३,२७६ | १३,२७६ |
| | अनुसूचित जमाती | २,३९७ | २,९५४ | ५,७७२ | ७,३१८ | ८,५७७ | १०,५१० | १०,५१० |
| | लोकसंख्येची घनता (प्रती चौ.किमी) | १२९ | १६४ | २०४ | २५७ | ३१५ | ३६५ | ३६५ |
| | साक्षरतेचे प्रमाण (टक्के) | ३५.१ | ४५.८ | ५५.८ | ६४.९ | ७६.९ | ८२.३ | ८२.३ |
| | स्त्री-पुरुष प्रमाण | ९३६ | ९३० | ९३७ | ९३४ | ९२२ | ९२९ | ९२९ |
| | (स्त्रिया प्रति हजार पुरुष) | | | | | | | |
| | नागरी लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | २८.२ | ३१.२ | ३५.० | ३८.७ | ४२.४ | ४५.२ | ४५.२ |
| ४. | **सांकेतिक राज्य उत्पन्न** - | | | | | | | |
| | राज्य उत्पन्न (₹ कोटी) | २,२४९ | ५,७८० | १९,३७७ | ६८,८६१ | २,४३,५८४ | ९,५०,७७१ | २६,९०,५२५[+†] |
| | कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र (₹ कोटी) | ५८५ | १,०७८ | ३,७५६ | १२,३२६ | ३२,७११ | १,२२,९३२ | ३,५६,६५५[+††] |
| | उद्योग क्षेत्र (₹ कोटी) | ५५३ | १,७३२ | ६,२२४ | २२,५५४ | ६४,९४२ | २,६३,५१२ | ६,३८,३०८[+††] |
| | सेवा क्षेत्र (₹ कोटी) | १,१११ | २,९६९ | ९,३९७ | ३३,९८१ | १,४५,९३१ | ५,६४,३२६ | १३,५६,९७५[+††] |
| | दरडोई राज्य उत्पन्न (₹) | ५७६ | १,१६८ | ३,११२ | ८,८११ | २८,५४० | ८४,८५८ | २,१५,२३३[+] |
| ५. | **पर्जन्य** - सरासरीशी तुलना (टक्के) | | | | | | १०२.३ | ११८.२ |
| ६. | **कृषि** - (क्षेत्र हजार हेक्टर) | | | | | | | |
| | निव्वळ पेरणी क्षेत्र | १७,८७८ | १७,६६८ | १८,२९९ | १८,५६५ | १७,८४४ | १७,४०६ | १६,५९० |
| | पिकांखालील स्थूल क्षेत्र | १८,८२३ | १८,७३७ | १९,६४२ | २१,८५९ | २१,६१९ | २३,१७५ | २४,१४९ |
| | स्थूल सिंचित क्षेत्र | १,२२० | १,५७० | २,४१५ | ३,३१९ | ३,८५२ | @ | @ |
| | *त्यापैकी* लाभ क्षेत्र ^ | २२६[$] | ४२२ | ७१८ | १,०७६[$$] | १,७६४[##] | २,९५५[##] | ४,३३८[##++!] |
| | स्थूल सिंचित क्षेत्राचे पिकांखालील एकूण स्थूल क्षेत्राशी प्रमाण (टक्के) | ६.५ | ८.४ | १२.३ | १५.२ | १७.८ | उ ना | उ ना |
| ७. | **प्रमुख पिकांखालील क्षेत्र** - (हजार हेक्टर) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३०० | १,३५२ | १,४५९ | १,५९७ | १,५१२ | १,५१६ | १,५७५ |
| | गहू | ९०७ | ८१२ | १,०६३ | ८६७ | ७५४ | १,३०७ | १,१३२ |
| | ज्वारी | ६,२८४ | ५,७०३ | ६,४६९ | ६,३०० | ५,०९४ | ४,०६० | २,२८५ |
| | बाजरी | १,६३५ | २,०३९ | १,५३४ | १,९४० | १,८०० | १,०३५ | ६६७ |
| | सर्व तृणधान्ये | १०,६०६ | १०,३२० | १०,९७६ | ११,१३६ | ९,८२४ | ८,९८५ | ७,०५२ |
| | सर्व कडधान्ये | २,३४९ | २,५६६ | २,७१५ | ३,२५७ | ३,५५७ | ४,०३८ | ४,८२१ |
| | सर्व अन्नधान्ये | १२,९५५ | १२,८८६ | १३,६९१ | १४,३९३ | १३,३८२ | १३,०२३ | ११,८७३ |

उ ना उपलब्ध नाही    @@ मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील तीन तालुके वगळून    # गणना शहरांसह    + पहिले सुधारित अंदाज (पायाभूत वर्ष २०११-१२)

† बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न    †† मूळ किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धी    ! अंदाजित    ^ जलसंपदा विभागाकडून निर्मित लाभक्षेत्र

@ जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या दि. २६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शासन निर्णया अन्वये माहिती संकलनाच्या पद्धतीबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

$ १९६१-६२    $$ १९९१-९२    ## प्रकल्प कालव्यांवरील उपसा व धरणातून नदी नाल्यांमध्ये सोडलेल्या पाण्यामुळे प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र समाविष्ट

टीप : राज्य उत्पन्नाचे १९६०-६१ ते २०१०-११ चे अंदाज घटक खर्चावर आधारित आहेत.

++ *आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०२१-२२ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ऊस क्षेत्र | १५५ | २०४ | ३१९ | ५३६ | ६८७ | १,०४१ | उ ना |
| | ऊस तोडणी क्षेत्र | १५५ | १६७ | २५८ | ४४२ | ५९५ | ९६५ | १,४८९ |
| | कापूस | २,५०० | २,७५० | २,५५० | २,७२१ | ३,०७७ | ३,९४२ | ४,४१० |
| | भूईमूग | १,०८३ | ९०४ | ६९५ | ८६४ | ४९० | ३९५ | ३२० |
| **८.** | **प्रमुख पिकांचे उत्पादन -** | | | | | | | |
| | (हजार टन) | | | | | | | |
| | तांदूळ | १,३६९ | १,६६२ | २,३१५ | २,३४४ | १,९३० | २,६९१ | ३,४३५ |
| | गहू | ४०१ | ४४० | ८८६ | ९०९ | ९४८ | २,३०१ | २,१४४ |
| | ज्वारी | ४,२२४ | १,५५७ | ४,४०९ | ५,९२९ | ३,९८८ | ३,४५२ | २,१५० |
| | बाजरी | ४८९ | ८२४ | ६९७ | १,११५ | १,०८७ | १,१२३ | ६१९ |
| | सर्व तृणधान्ये | ६,७५५ | ४,७३७ | ८,६४७ | १०,७४० | ८,४९७ | १२,३१७ | १२,०६२ |
| | सर्व कडधान्ये | ९८९ | ६७७ | ८२५ | १,४४१ | १,६३७ | ३,०९६ | ४,८८७ |
| | सर्व अन्नधान्ये | ७,७४४ | ५,४१४ | ९,४७२ | १२,१८१ | १०,१३४ | १५,४१३ | १६,९४९ |
| | ऊस | १०,४०४ | १४,४३३ | २३,७०६ | ३८,१५४ | ४९,५६९ | ८५,६९१ | १,३९,१५९ |
| | कापूस (रुई)# | १,६७३ | ४८४ | १,२२४ | १,८७५ | १,८०३ | ७,४७३ | ७,७९१ |
| | भुईमूग | ८०० | ५८६ | ४५१ | ९७९ | ४७० | ४७० | ४०१ |
| **९.** | **कृषि उत्पादनाचा निर्देशांक@-** | -- | -- | -- | १३६.५ | १२७.४ | २२३.८ | ३१०.७ |
| **१०.** | **कृषि गणना -** | | (१९७०-७१) | (१९८०-८१) | (१९९०-९१) | (२०००-०१) | (२०१०-११) | (२०१५-१६) |
| | वहिती खातेदारांची संख्या (हजार) | -- | ४,९५१ | ६,८६३ | ९,४७० | १२,१३८ | १३,६९९ | १५,२८५ |
| | वहिती क्षेत्र (हजार हेक्टर) | -- | २१,१७९ | २१,३६२ | २०,९२५ | २०,१०३ | १९,७६७ | २०,५०६ |
| | वहितीचे सरासरी क्षेत्र (हेक्टर) | -- | ४.२८ | ३.११ | २.२१ | १.६६ | १.४४ | १.३४ |
| **११.** | **पशुधन गणना -** | (१९६६) | (१९७८) | (१९८७) | (१९९७) | (२००७) | (२०१२) | (२०१९) |
| | एकूण पशुधन (हजार) | २५,४४९ | २९,६४२ | ३४,२५५ | ३९,६३८ | ३५,९५५ | ३२,४८९ | ३३,०८० |
| | एकूण कुक्कुटादी पक्षी+ (हजार) | ९,९०२ | १८,७५१ | २४,८३० | ३५,३९२ | ६४,७५६@@ | ७७,७९५@@ | ७४,२९८@@ |
| | | | | | | | (२००३) | (२००३) |
| | ट्रॅक्टर | १,४२७ | ३,२७४ | १२,९१७ | ३४,५२९ | ७९,८९३ | १,०५,६११ | १,०५,६११ |
| **१२.** | **वन क्षेत्र** (चौ. किमी) | | | | | | | (२०२२) |
| | | ६३,५४४ | ६२,३११ | ६४,२२२ | ६३,७९८ | ६१,९३५ | ६१,९३९ | ६१,९०७* |
| **१३.** | **औद्योगिक गुंतवणूक -** | | | | | | | (२०२२)$$ |
| | मंजूर प्रकल्प (संख्या) | -- | -- | -- | -- | -- | १६,६८६ | २१,४४२ |
| | प्रस्तावित गुंतवणूक (₹ कोटी) | -- | -- | -- | -- | -- | ८,१०,८६४ | १७,४८,६४८ |
| **१४.** | **वीज** - (दशलक्ष कि.वॅ.तास) | | | | | | | |
| | एकूण निर्मिती | ३,२६८ | ७,९२५ | १७,८६४ | ३६,४३० | ६१,२०९ | ८३,०१७ | १,३१,६८२ |
| | एकूण वापर | २,७२० | ७,६५० | १४,०३४ | २९,९७१ | ४७,२८९ | ८७,३९६ | १,३८,७७९ |
| | औद्योगिक वापर | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ५३,३७३ |
| | कृषि वापर | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | ३६,२४२ |
| | घरगुती वापर | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | ३०,६९९ |

* अस्थायी # कापसाचे उत्पादन १७० किलोची एक गासडी याप्रमाणे हजार गासड्यांमध्ये @ पाया - त्रैवार्षिक सरासरी १९७९-८२ = १००

$$ ऑगस्ट, १९९१ ते नोव्हेंबर @@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये कुक्कुटपालन केंद्रामधील पक्षी समाविष्ट

\+ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी समाविष्ट उ ना उपलब्ध नाही

# अ. दृष्टिक्षेपात महाराष्ट्र

| बाब (१) | १९६०-६१ (२) | १९७०-७१ (३) | १९८०-८१ (४) | १९९०-९१ (५) | २०००-०१ (६) | २०१०-११ (७) | २०२१-२२ (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१५. बँका-(अनुसूचित वाणिज्यिक)** | | (जून, १९७१) | (जून, १९८१) | (जून, १९९१) | (जून, २००१) | (जून, २०१०) | (३१ मार्च, २०२२) |
| बँक कार्यालये | उ ना | १,४७१ | ३,६२७ | ५,५९१ | ६,२९४ | ८,०३७ | १३,२२० |
| | | | | (मार्च, १९९१) | (मार्च, २००१) | | |
| ग्रामीण लोकसंख्येसाठी बँक कार्यालये | उ ना | ४५० | १,३५५ | २,७४९ | २,२९४ | २,१७० | ३,१९९ |
| **१६. शिक्षण**+ - | | | | | | | |
| प्राथमिक शाळा | ३४,५९४ | ४४,५३५ | ५१,०४५ | ५७,७४४ | ६५,९६० | ७५,६९५ | १,०५,८४८ |
| विद्यार्थी (हजार) | ४,१७८ | ६,५३९ | ८,३९२ | १०,४२४ | ११,८५७ | १०,६२६ | १५,४२१ |
| माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) | २,४६८ | ५,३१३ | ६,११९ | १०,५१९ | १५,३८९ | २१,३५७ | २८,६१२ |
| विद्यार्थी (हजारात) | ८५८ | १,९८५ | ३,३०९ | ६,२६० | ९,२६७ | १०,७११ | ६,६४० |
| **१७. आरोग्य** - | | (१९७१) | (१९८१) | (१९९१) | (२००१) | (२०११) | ( २०२१) |
| रुग्णालये# | उ ना | २९९ | ५३० | ७६८ | ९८१ | १,३६८ | ५८६ |
| दवाखाने# | उ ना | १,३७२ | १,७७६ | १,८९६ | १,६२९ | ३,०१२ | १,०२४ |
| दर लाख लोकसंख्येमागे खाटा# | उ ना | ८८ | ११४ | १४४ | १०५ | १०३ | ५९.०५ |
| | | | | | | | (२०२०) |
| जन्मदर@ | ३४.७ | ३२.२ | २८.५ | २६.२ | २०.७ | १६.७ | १५.० |
| मृत्यूदर@ | १३.८ | १२.३ | ९.६ | ८.२ | ७.५ | ६.३ | ५.५ |
| अर्भक मृत्यूदर@ | ८६ | १०५ | ७९ | ६० | ४५ | २५ | १६ |
| **१८. वाहतूक** - | | | | | | | |
| रेल्वे मार्गाची लांबी (किमी) | ५,०५६ | ५,२२६ | ५,२३३ | ५,४३४ | ५,४५९ | ५,९८४ | ६,२४२ |
| एकूण रस्त्यांची लांबी (किमी) † | ३९,२४१ | ६५,३६४ | १,४१,१३१ | १,७२,९६५ | २,१६,९६८ | २,४१,७१२ | ३,२३,८७३* |
| *त्यापैकी* पृष्ठांकित | २४,८५२ | ३५,८५३ | ६६,६१६ | १,३२,०४८ | १,७८,९९९ | २,२१,१८२ | २,६३,०४९* |
| मोटार वाहने (हजार) | १०० | ३१२ | ८०५ | २,६४१ | ६,६०७ | १६,९९० | ३४,३७०* |
| **१९. सहकार** - | | | | | | | |
| प्राथमिक कृषि पतसंस्था | २१,४०० | २०,४२० | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २१,०९७* |
| सभासद (लाख) | २२ | ३८ | ५४ | ७९ | १०१ | १५० | १५५* |
| सहकारी संस्थांची संख्या | ३१,५६५ | ४२,५९७ | ६०,७४७ | १,०४,६२० | १,५८,०१६ | २,२४,३०६ | २,२२,७३८* |
| सभासद (लाख) | ४२ | ८६ | १४८ | २६९ | ४३० | ५३० | ५९०* |
| सहकारी संस्थांचे खेळते भांडवल (₹ कोटी) | २९१ | १,४८९ | ५,२१० | २४,२८४ | १,३४,४४० | २,४८,४३४ | ४,६९,०१०* |
| **२०. स्थानिक स्वराज्य संस्था** - | | | | | | | (२०२१-२२)$ |
| जिल्हा परिषदा | २५ | २५ | २५ | २९ | ३३ | ३३ | ३४ |
| ग्रामपंचायती | २१,६३६ | २२,३०० | २४,२८१ | २५,८२७ | २७,७३५ | २७,९१३ | २७,८३२ |
| पंचायत समित्या | २९५ | २९६ | २९६ | २९८ | ३२१ | ३५१ | ३५१ |
| नगर परिषदा | २१९ | २२१ | २२० | २२८ | २२८ | २२२ | २४४ |
| महानगरपालिका | ३ | ४ | ५ | ११ | १५ | २३ | २७ |
| नगर पंचायत | -- | -- | -- | -- | ३ | ४ | १३९ |
| कटक मंडळे | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ | ७ |

* अस्थायी   @ नमुना नोंदणी पाहणी प्रमाणे   उ ना  उपलब्ध नाही   † सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्ते

$ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार (दि. ३१.१२.२०२१ रोजीची)   # माहितीमध्ये फक्त शासकीय आरोग्य संस्थांचा समावेश आहे.

\+ वर्ष २०११-१२ पासून सदर माहितीचा आधार बदलला असल्यामुळे सदर माहिती प्राथमिक शाळा (इयत्ता १ ते ८) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ९ ते १२) या स्वरुपात प्राप्त झाली असून पूर्वीची माहिती प्राथमिक शाळा (१ ते ७) व माध्यमिक शाळा (उच्च माध्यमिकसह) (इयत्ता ८ ते १२) या स्वरुपात आहे. तसेच सदर माहितीचा आधार महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद आहे.

## ब. महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **१. लोकसंख्या (२०११)** | | | | |
| १.१ एकूण लोकसंख्या | हजार | १,१२,३७४ | १२,१०,८५५ | ९.३ |
| (अ) पुरुष | -”- | ५८,२४३ | ६,२३,२७० | ९.३ |
| (ब) स्त्रिया | -”- | ५४,१३१ | ५,८७,५८५ | ९.२ |
| १.२ (अ) ग्रामीण लोकसंख्या | हजार | ६१,५५६ | ८,३३,७४९ | ७.४ |
| (ब) ग्रामीण लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ५४.८ | ६८.९ | -- |
| १.३ (अ) नागरी लोकसंख्या | हजार | ५०,८१८ | ३,७७,१०६ | १३.५ |
| (ब) नागरी लोकसंख्येचे एकूण लोकसंख्येशी प्रमाण | टक्के | ४५.२ | ३१.१ | -- |
| १.४ स्त्री-पुरुष प्रमाण | दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या | ९२९ | ९४३ | -- |
| १.५ लोकसंख्येचा दशवार्षिक वृद्धिदर (२००१-२०११) | टक्के | १६.० | १७.७ | -- |
| १.६ साक्षरता दर | -”- | ८२.३ | ७३.० | -- |
| १.७ अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील लोकसंख्या | हजार | २३,७८६ | ३,०५,९२४ | ७.८ |
| १.८ एकूण काम करणारे | -”- | ४९,४२८ | ४,८१,८८९ | १०.३ |
| १.९ भौगोलिक क्षेत्र | लाख चौ. किमी | ३.०८ | ३२.९ | ९.४ |
| **२. कृषि (२०१९-२०)** | | | | |
| २.१ निव्वळ पेरणी क्षेत्र | हजार हेक्टर | १६,७२२ | १,३९,९०२ | १२.० |
| २.२ पिकांखालील स्थूल क्षेत्र | -”- | २३,५७० | २,११,३५९ | ११.२ |
| २.३ स्थूल सिंचित क्षेत्र | -”- | उ ना | १,१२,२२९ | -- |
| २.४ स्थूल सिंचित क्षेत्राची एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी | टक्के | उ ना | ५३.१ | -- |
| २.५ प्रमुख पिकांखालील क्षेत्र (२०१८-१९ ते २०२०-२१ या वर्षांची सरासरी) | | | | |
| (१) तांदूळ | हजार हेक्टर | १,५२६ | ४४,५२९ | ३.४ |
| (२) गहू | -”- | १,००६ | ३०,६०० | ३.३ |
| (३) ज्वारी | -”- | २,००० | ४,४३२ | ४५.१ |
| (४) बाजरी | -”- | ६५७ | ७,४३३ | ८.८ |
| (५) एकूण तृणधान्ये | -”- | ६,४२३ | ९८,५४७ | ६.५ |
| (६) एकूण अन्नधान्ये (तृणधान्ये व कडधान्ये) | -”- | १०,६६५ | १,२७,१८९ | ८.४ |
| (७) ऊस क्षेत्र | -”- | उ ना | ४,८३८ | -- |
| ऊस तोडणी क्षेत्र | -”- | १,०४३ | उ ना | -- |
| (८) कापूस | -”- | ४,४१८ | १३,१२६ | ३३.७ |
| (९) भूईमूग | -”- | २८१ | ५,१९० | ५.४ |

उ ना उपलब्ध नाही

## महाराष्ट्र आणि भारताची तुलनात्मक माहिती (पुढे चालू...)

| बाब<br>(१) | परिमाण<br>(२) | महाराष्ट्र<br>(३) | भारत<br>(४) | भारताशी तुलना (टक्केवारी)<br>(५) |
|---|---|---|---|---|
| **३. पशुधन गणना** | | | | |
| ३.१ एकूण पशुधन *(२०१९) | हजार | ३३,०८० | ५,३६,७६१ | ६.२ |
| ३.२ व्हील ट्रॅक्टर्स (२००३) | -"- | १०६ | २,३६१ | ४.५ |
| ३.३ सिंचनाकरिता वापरलेली डिझेल इंजिने व विद्युत पंप (२००३) | -"- | १,१७४ | १५,६८४ | ७.५ |
| **४. वने** | | | | |
| ४.१ एकूण वन क्षेत्र (२०२१) | चौ. किमी | ६१,९९२ | ७,७५,२८८ | ८.० |
| **५. उद्योग** | | | | |
| ५.१ औद्योगिक गुंतवणूक$$ | | | | |
| (अ) मंजूर प्रकल्प | संख्या | २१,४४२ | १,१९,०५५ | १८.० |
| (ब) प्रस्तावित गुंतवणूक | ₹ कोटी | १७,४८,६४८ | १,४५,६१,२९० | १२.० |
| **६. वीज (२०२१-२२)** | | | | |
| ६.१ एकूण निर्मिती | दशलक्ष कि. वॅ. तास | १,३१,६८२ | १४,८४,३६६ | ८.९ |
| ६.२ एकूण वापर# | -"- | १,३८,७७९ | ११,२८,५५९ | १२.३ |
| ६.३ (अ) औद्योगिक वापर | -"- | ५३,३७३ | ३,७३,५५२ | १४.३ |
| (ब) औद्योगिक वापराची एकूण वापराशी टक्केवारी | टक्के | ३८.५ | ३३.१ | -- |
| **७. बँका** (अनुसूचित वाणिज्यिक) (मार्च, २०२२) | | | | |
| ७.१ बँक कार्यालये | संख्या | १३,२२० | १,५१,३२० | ८.७ |
| ७.२ ग्रामीण बँक कार्यालये (मार्च, २०२२) | -"- | ३,१९९ | ५३,०६९ | ६.० |
| **८. राज्य / राष्ट्रीय उत्पन्न (२०२१-२२)** | | | | |
| ८.१ सांकेतिक (नॉमिनल) स्थूल राज्य उत्पन्न / सांकेतिक (नॉमिनल) देशांतर्गत स्थूल उत्पन्न† | ₹ कोटी | ३१,०८,०२२+ | २,३६,६४,६३७* | १३.१ |
| ८.२ सांकेतिक (नॉमिनल) उत्पन्न | ₹ कोटी | २६,९०,५२५+ | २,०५,२९,७२७* | १३.१ |
| ८.३ चालू किंमतीनुसार दरडोई उत्पन्न | ₹ | २,१५,२३३+ | १,५०,००७* | -- |

$$ ऑगस्ट, १९९१ ते नोव्हेंबर, २०२२ + पहिले सुधारित अंदाज # वितरण परवानाधारकांमार्फत ग्राहकांना केलेली वीज विक्री * अस्थायी

† स्थूल राज्य उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्न बाजार किंमतीनुसार

# १
# राज्य अर्थव्यवस्था



# १. राज्य अर्थव्यवस्था

## राज्य उत्पन्न

१.१ सन २०२२-२३ च्या पुर्वानुमानानुसार राज्य अर्थव्यवस्थेत ६.८ टक्के वाढ तर देशाच्या अर्थव्यवस्थेत ७.० टक्के वाढ अपेक्षित आहे. सन २०२२-२३ मध्ये राज्याच्या 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्रात १०.२ टक्के वाढ, 'उद्योग' क्षेत्रात ६.१ टक्के वाढ आणि 'सेवा' क्षेत्रात ६.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ मध्ये सांकेतिक (नॉमिनल) (चालू किंमतींनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३५,२७,०८४ कोटी अपेक्षित आहे आणि वास्तविक (रिअल) (सन २०११-१२ च्या स्थिर किंमतींनुसार) स्थूल राज्य उत्पन्न ₹ २१,६५,५५८ कोटी अपेक्षित आहे.

१.२ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार सन २०२१-२२ चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३१,०८,०२२ कोटी होते, तर सन २०२०-२१ मध्ये ते ₹ २६,२७,५४२ कोटी होते. सन २०२१-२२ चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न ₹ २०,२७,९७१ कोटी होते, तर सन २०२०-२१ मध्ये ते ₹ १८,५८,३७० कोटी होते. सन २०२१-२२ मध्ये दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,१५,२३३ होते, तर सन २०२०-२१ मध्ये ते ₹ १,८३,७०४ होते.

- सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात राज्याचा सरासरी हिस्सा सर्वाधिक (१४.० टक्के) आहे
- सन २०२२-२३ च्या पुर्वानुमानानुसार दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,४२,२४७ अपेक्षित आहे तर सन २०२१-२२ मध्ये ते ₹ २,१५,२३३ होते

सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न आणि दरडोई राज्य उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०+++ | २०२०-२१++ | २०२१-२२+ | २०२२-२३$ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (₹ कोटी) | १९,६६,२२५ | २१,९८,१८५ | २३,५२,७८२ | २५,२८,८५४ | २६,५७,३७१ | २६,२७,५४२ | ३१,०८,०२२ | ३५,२७,०८४ |
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | १,४६,८१५ | १,६३,७२६ | १,७२,६६३ | १,८२,८६५ | १,८९,८८९ | १,८३,७०४ | २,१५,२३३ | २,४२,२४७ |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज $ पूर्वानुमान

सन २०२१-२२ करिता निवडक राज्यांचे दरडोई उत्पन्न

(पायाभूत वर्ष २०११-१२)

| तपशील | कर्नाटक | तेलंगणा | हरियाणा | तामीळनाडू | महाराष्ट्र | आंध्र प्रदेश | मध्य प्रदेश | उत्तर प्रदेश |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| दरडोई राज्य उत्पन्न (₹) | २,७८,७८६ | २,७५,४४३ | २,७४,६३५ | २,४१,१३१ | २,१५,२३३ | २,०७,७७१ | १,२४,६८५ | ६८,८१० |

सन २०२२ करिता जागतिक स्थूल उत्पादन व देशांतर्गत उत्पन्नातील वाढ

| तपशील | जागतिक | विकसित अर्थव्यवस्था | विकसनशील अर्थव्यवस्था | अल्प विकसित अर्थव्यवस्था | अमेरीका | जपान | चीन | भारत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| स्थूल उत्पादनाचे वृद्धिदर (टक्के) | ३.० | २.६ | ३.९ | ४.३ | १.८ | १.६ | ३.० | ६.४ |

संयुक्त राष्ट्रसंघाचा वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट २०२३ अहवालानुसार

## किंमती

१.३ माहे एप्रिल ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत ग्रामीण व नागरी भागाकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ३४९.० व ३३३.३ होता.

१.४ कोविड-१९ महामारीच्या निर्बंधांमुळे माहे एप्रिल, २०२१ करिता जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती संकलनात अडचणी आल्या आणि खाद्यपदार्थ गटाव्यतिरिक्त इतर गटातील वस्तुंच्या किंमती उपलब्ध झाल्या नाहीत. त्यामुळे, सन २०२१-२२ करिता माहे मे, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीकरिता ग्राहक किंमती निर्देशांक परिगणित करण्यात आला. माहे मे ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत ग्रामीण व नागरी भागाकरिता सरासरी ग्राहक किंमती निर्देशांक अनुक्रमे ३५०.८ व ३३४.९ होता आणि माहे मे ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत सरासरी ग्राहक किंमती निर्देशांकावर आधारित वर्ष-ते-वर्ष चलनवाढ ग्रामीण भागाकरिता ८.१ टक्के व नागरी भागाकरिता ७.३ टक्के होती.

१.५ दि.३१ डिसेंबर, २०२२ रोजी राज्यात एकूण २५६.५५ लाख (६२.६० लाख पिवळी, १७१.६७ लाख केशरी व २२.२१ लाख शुभ्र) शिधापत्रिकाधारक आहेत. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमा अंतर्गत समाविष्ट एकूण १५४.३१ लाख पात्र शिधापत्रिकाधारकांपैकी ९९.९ टक्के शिधापत्रिकांची आधार जोडणी करण्यात आली. अवर्षणप्रवण १४ जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील एकूण ८.६६ लाख शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांपैकी ९९.९ टक्के शेतकऱ्यांच्या शिधापत्रिकांची आधार जोडणी करण्यात आली.

> ➢ सन २०२२-२३ मध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब शिधापत्रिकाधारकांना तसेच अवर्षणप्रवण १४ जिल्ह्यांतील दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिकाधारक शेतकऱ्यांना दिवाळी निमित्त एक किलो रवा, एक किलो चणाडाळ, एक किलो साखर व एक लिटर पामतेल या चार शिधा वस्तुंचा समावेश असलेल्या ₹ १०० प्रति संच मूल्याचे शिधा संचांचे वितरण करण्यात आले आहे

१.६ राज्यातील ५२,५३२ रास्त भाव दुकानांमध्ये अन्नधान्याच्या वितरणाकरिता इ पॉईंट ऑफ सेल उपकरणे बसविण्यात आली. माहे डिसेंबर, २०२२ मध्ये सुमारे १.६२ कोटी कुटुंबांनी आधार बेस्ड बायोमेट्रिक अधिप्रमाणनाद्वारे शिधावस्तूंचा लाभ घेतला.

१.७ राज्यात माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर, एकूण १,५४३ शिवभोजन केंद्रे कार्यरत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत, राज्यातील गरीब व गरजू व्यक्तींना एकूण १२.२२ कोटी शिवभोजन थाळींचे वितरण करण्यात आले.

१.८ 'वन नेशन, वन रेशन कार्ड' योजना सुरू झाल्यापासून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत महाराष्ट्रातील ०.३९ लाख शिधापत्रिकाधारकांनी इतर राज्यातून आणि इतर राज्यातील २.१३ लाख शिधापत्रिकाधारकांनी महाराष्ट्रातून अन्नधान्याची उचल केली.

## लोकवित्त

> ➢ अर्थसंकल्पीय अंदाज २०२२-२३ नुसार राजकोषीय तुटीचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण २.५ टक्के आणि ऋणभाराचे स्थूल राज्य उत्पन्नाशी प्रमाण १८.४ टक्के आहे
>
> ➢ वार्षिक कार्यक्रम २०२२-२३ करिता एकूण ₹ १,५०,००० कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला असून त्यापैकी ₹ १८,१७५ कोटी जिल्हा योजनांकरिता आहे

१.९ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२२-२३ करिता राज्याची महसुली जमा ₹ ४,०३,४२७ कोटी, तर सुधारित अंदाजानुसार सन २०२१-२२ करिता ₹ ३,६२,१३३ कोटी आहे. अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२२-२३ करिता कर महसूल आणि करेतर महसूल (केंद्रीय अनुदानासह) अनुक्रमे ₹ ३,०८,११३ कोटी आणि ₹ ९५,३१४ कोटी आहे. माहे एप्रिल ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत प्रत्यक्ष महसुली जमा ₹ २,५१,९२४ कोटी (अर्थसंकल्पीय अंदाजाच्या ६२.४ टक्के) आहे.

१.१० अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२२-२३ करिता राज्याचा महसुली खर्च ₹ ४,२७,७८० कोटी अपेक्षित असून सुधारित अंदाजानुसार सन २०२१-२२ करिता ₹ ३,९२,८५७ कोटी आहे.

१.११ अर्थसंकल्पीय अंदाजानुसार सन २०२२-२३ करिता एकूण जमेतील भांडवली जमेचा हिस्सा २६.५ टक्के अपेक्षित असून एकूण खर्चातील भांडवली खर्चाचा हिस्सा २२.० टक्के अपेक्षित आहे.

१.१२ सुधारित अंदाजानुसार सन २०२१-२२ करिता एकूण महसुली खर्चातील विकासावरील खर्चाचा हिस्सा ६७.८ टक्के आहे.

## संस्थांद्वारे वित्तपुरवठा

- दि. ३१ मार्च, २०२२ रोजी अखिल भारत स्तरावर अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी (२१.० टक्के) व स्थूल कर्जे (२६.० टक्के) यामध्ये राज्याचा सर्वाधिक हिस्सा आहे
- राज्यात दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी प्रति लाख लोकसंख्येमागे एटीएम संख्या २३ होती
- प्रधानमंत्री जन धन योजनेअंतर्गत दि. १८ जानेवारी, २०२३ पर्यंत, राज्यात एकूण ३.२५ कोटी बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी ५६.० टक्के ग्रामीण/ निम-नागरी क्षेत्रातील होती

१.१३ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या एकूण ठेवी आणि स्थूल कर्जे अनुक्रमे ₹ ३५.०१ लाख कोटी आणि ₹ ३१.८३ लाख कोटी होती. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्याचे कर्ज-ठेवी प्रमाण ९०.९ टक्के होते.

१.१४ सन २०२२-२३ करिता राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज आराखडा ₹ ५.२२ लाख कोटी असून त्यामध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा हिस्सा २४.१ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग आणि खादी व ग्रामोद्योग' क्षेत्राचा हिस्सा ५४.५ टक्के आहे.

## कृषि व संलग्न कार्ये

१.१५ राज्यात मान्सून २०२२ मध्ये सरासरी पावसाच्या ११९.८ टक्के पाऊस पडला. राज्यातील २०४ तालुक्यांमध्ये अतिरिक्त, १४५ तालुक्यांमध्ये सरासरी आणि सहा तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला.

१.१६ राज्यातील सरासरी वहिती क्षेत्र कृषि गणना १९७०-७१ नुसार ४.२८ हेक्टर होते तर कृषि गणना २०१५-१६ नुसार ते १.३४ हेक्टर आहे. कृषि गणना २०१५-१६ नुसार अल्प व अत्यल्प (२.० हेक्टर पर्यंत) वहिती खातेदारांच्या वहिती क्षेत्राचे प्रमाण एकूण वहिती क्षेत्राच्या ४५ टक्के होते, तर अल्प व अत्यल्प वहिती खातेदारांची संख्या एकूण वहिती खातेदारांच्या ७९.५ टक्के होती.

- केंद्र शासनाच्या विनंतीस अनुसरून संयुक्त राष्ट्रांद्वारे सन २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय भरडधान्ये वर्ष' म्हणून घोषित करण्यात आले आहे; राज्यात 'महाराष्ट्र भरडधान्ये अभियान' राबविण्यात येत आहे
- हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण २०२२-२०२७ माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये राज्याकरिता जाहिर करण्यात आले आहे. या धोरणाअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले

१.१७ सन २०२२-२३ च्या खरीप हंगामामध्ये १५७.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत तृणधान्ये, तेलबिया, कापूस व ऊस यांच्या उत्पादनात अनुक्रमे १० टक्के, १९ टक्के, पाच टक्के व चार टक्के वाढ अपेक्षित असून कडधान्याच्या उत्पादनात ३७ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१८ सन २०२२-२३ च्या रब्बी हंगामामध्ये ५७.७४ लाख हेक्टर क्षेत्रांवर पेरणी पूर्ण करण्यात आली. मागील वर्षाच्या तुलनेत कडधान्याच्या उत्पादनात ३४ टक्के वाढ अपेक्षित असून तृणधान्ये व तेलबियांच्या उत्पादनात प्रत्येकी १३ टक्के घट अपेक्षित आहे.

१.१९ सन २०२१-२२ मध्ये फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र २३.९२ लाख हेक्टर असून ३२७.८४ लाख मे. टन उत्पादन अपेक्षित आहे.

राज्यातील पाऊस व पीक उत्पादन

| तपशील | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पावसाची सरासरीच्या तुलनेत टक्केवारी | ७०.२ | ५९.४ | ९४.९ | ८४.३ | ७३.६ | ११२.६ | ११३.४ | ११८.२ |
| पीक | | | | उत्पादन ('००० मे.टन)$ | | | | |
| तृणधान्ये | ९,२५९ | ७,२१० | १२,६४६ | १०,९४४ | ७,९४७ | ९,२१८ | १२,२०१ | १२,०६२ |
| कडधान्य | २,०१९ | १,५४५ | ४,५८४ | ३,६८४ | २,६८३ | ३,८४९ | ४,४४४ | ४,८८७ |
| एकूण अन्नधान्ये | ११,२७८ | ८,७५५ | १७,२३० | १४,६२८ | १०,६३० | १३,०६७ | १६,६४६ | १६,९४९ |
| तेलबिया | २,८५० | २,४३६ | ५,११३ | ४,२०८ | ४,८८५ | ५,१७८ | ६,७१९ | ५,९५४ |
| ऊस | ८४,६९९ | ७३,६८० | ५४,२३७ | ८३,१३८ | ८९,७७१ | ६९,३१३ | १,११,६४२ | १,३९,१५९ |
| कापूस (रुई)@ | ७,००० | ७,५०० | १०,७५५ | ६,०९४ | ६,५९३ | ६,६३९ | १०,११० | ७,७९१ |
| फळे | ११,०९० | ९,७५० | १०,६३० | ११,७२९ | १०,७७८ | १२,६२४ | १२,२३० | १२,७०७ |
| भाजीपाला | ८,७८३ | ९,४५२ | १०,५२० | १२,३०७ | ११,४७२ | १३,०४३ | १५,१०६ | १७,४२१ |

$ खरीप, रब्बी आणि उन्हाळी अंतर्भूत

@ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये

१.२० सेंद्रीय शेती उत्पादनात अखिल भारतात मध्यप्रदेश नंतर राज्य २० टक्के हिश्श्यासह दुसऱ्या क्रमांकावर आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्यातून ०.८५ लाख मे.टन सेंद्रीय शेती उत्पादनाची निर्यात झाली.

१.२१ मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) प्रकल्पांद्वारे माहे जून, २०२१ अखेर ५५.२४ लाख हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यात आली असून सन २०२१-२२ मध्ये प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र ४३.३८ लाख हेक्टर (७८.५ टक्के) होते.

१.२२ दि. १५ ऑक्टोबर, २०२१ रोजी मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्य क्षेत्र) जलाशयांमध्ये एकत्रितपणे एकूण उपयुक्त जलसाठा ३४,४३८ दशलक्ष घनमीटर होता व तो एकूण जलसाठा क्षमतेच्या ७९.० टक्के होता.

- राज्यात माहे जानेवारी, २०२३ पासून जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे
- महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना, २०१९ च्या सुरुवातीपासून दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत ३२.०३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ २०,४२५ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला
- पीक कर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात जुलै, २०२२ पासून महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना, २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत सन २०१७-१८ ते २०१९-२० या कालावधीतील कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन विहीत मुदतीत कर्जाची पुर्णतः परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या मुद्दल रकमेवर जास्तीत जास्त ₹ ५०,००० पर्यंत रकमेचा लाभ देण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ८.१३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ २,९८२ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला

१.२३ प्रधान मंत्री कृषि सिंचयी योजना- प्रति थेंब अधिक पीक अंतर्गत सन २०२१-२२ पर्यंत सुमारे ८.८६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले. सन २०२१-२२ मध्ये या योजनेअंतर्गत २,१२,९६४ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ₹ ५३२.८८ कोटी अनुदान जमा करण्यात आले.

१.२४ मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेतून, 'प्रति थेंब अधिक पीक' योजने अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाव्यतिरिक्त, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येते. सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर अखेर एकूण १,७४,२२२ शेतकऱ्यांना ₹ २५०.९० कोटी अनुदान वितरीत करण्यात आले.

१.२५ सन २०२२-२३ मध्ये माहे सप्टेंबरपर्यंत, अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि जिल्हा मध्यवर्ती बँका यांच्याद्वारे ₹ ३८,०८३ कोटी पीक कर्ज अणि ₹ ३३,९०५ कोटी कृषि मुदत कर्ज वितरित करण्यात आले.

१.२६ प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने अंतर्गत दि. २ फेब्रुवारी, २०२३ अखेर, राज्यातील ११०.३१ लाख अल्प व अत्यल्प भूधारक लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ₹ २१,९९१.८६ कोटी रक्कम जमा करण्यात आली.

- माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत अतिवृष्टी/पूर/संततधार पाऊस व शंखी गोगलगायीच्या प्रादुर्भावामूळे झालेल्या शेतपिकांच्या व इतर नुकसानीसाठी बाधित क्षेत्राकरिता माहे ऑगस्ट, २०२२ ते फेब्रुवारी, २०२३ पर्यंत ₹ ७,१३३.१९ कोटी मदत शासनाने मंजूर केली

१.२७ डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ९.०८ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ ११९.४८ कोटी व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले आणि सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत, ६.५२ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ ८८.४४ कोटी व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले.

१.२८ माहे नोव्हेंबर, २०२१ ते मे, २०२२ या कालावधीत राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे सुमारे २.७१ लाख हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे १.३३ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ₹ १३०.८८ कोटी रकमेची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली.

१.२९ पशुगणना २०१९ नुसार सुमारे ३.३१ कोटी पशुधनासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर आहे. सुमारे ७.४३ कोटी कुक्कुटादी पक्ष्यांसह राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे.

१.३० राज्यात सन २०२०-२१ पासून गोवर्गीय पशुंना लम्पी स्कीन रोगाचा प्रादुर्भाव झाला असून हा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्याने वेळोवेळी उपाययोजना केल्या आहेत. सन २०२०-२१ मध्ये २०.१४ लाख गोवर्गीय पशुंचे, सन २०२१-२२ मध्ये १२.७३ लाख गोवर्गीय पशुंचे आणि सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर १३८.९ लाख गोवर्गीय पशुंचे लसीकरण करण्यात आले. राज्यात उद्भवलेल्या लम्पी रोगाच्या पहिल्या प्रादुर्भावा पासून माहे डिसेंबर, २०२२ अखेर २८,४३७ गोवर्गीय पशू दगावले. दगावलेल्या पशुधनासाठी १६,५३९ पशुपालकांना ₹ ४१.८८ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली.

१.३१ सन २०२१-२२ मध्ये शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे सरासरी दैनिक दूध संकलन अनुक्रमे ०.३९ लाख लिटर व ४०.२५ लाख लिटर होते, तर सन २०२०-२१ मध्ये ते अनुक्रमे ०.५० लाख लिटर व ४०.४३ लाख लिटर होते.

१.३२ सन २०२१-२२ मध्ये सागरी व गोड्या पाण्यातील मत्स्य उत्पादन अनुक्रमे ४.३३ लाख मे. टन व १.५७ लाख मे. टन होते, तर सन २०२०-२१ मध्ये ते अनुक्रमे ३.९९ लाख मे. टन व १.२५ लाख मे. टन होते.

१.३३ माहे मार्च, २०२२ अखेर राज्याचे वनक्षेत्र भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के होते.

## उद्योग व सहकार

- ‘मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०’ अंतर्गत माहे जून, २०२० ते डिसेंबर, २०२२ या कालावधीमध्ये राज्यात ₹ २.७४ लाख कोटी गुंतवणूक व ४.२७ लाख अपेक्षित रोजगार असलेले प्रस्ताव प्राप्त झाले
- राज्य शासनाने माहे जुलै, २०२१ मध्ये ‘सुधारित महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१’ जाहीर केले आहे. या धोरणाअंतर्गत ६४,३३७ इलेक्ट्रीक वाहनांकरिता ₹ २९,०३३ लाख प्रोत्साहन निधी मंजूर केला असून त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यंत १६,८२४ इलेक्ट्रीक वाहनांकरिता ₹ ११,८२७ लाख निधी वितरित केला आहे
- उद्योग व शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने राज्यात १८ स्टार्टअप इनक्युबेटरची स्थापना करण्यात आली आहे. माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात एकूण १.६८ लाख रोजगार असलेले १६,०१४ स्टार्टअप होते

१.३४ माहे ऑगस्ट, १९९१ मध्ये उदारीकरणाचे धोरण अंगिकारल्यापासून माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत राज्यात ₹ १७,४८,६४८ कोटी गुंतवणुकीसह २१,४४२ औद्योगिक प्रकल्प मंजूर करण्यात आले.

१.३५ माहे एप्रिल, २००० ते सप्टेंबर, २०२२ पर्यंत राज्यातील थेट परदेशी गुंतवणूक ₹ १०,८८,५०२ कोटी असून ती अखिल भारताच्या एकूण थेट परदेशी गुंतवणुकीच्या २८.५ टक्के होती.

१.३६ माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत, १०८.६७ लाख रोजगारासह राज्यात एकूण २०.४३ लाख (१९.८० लाख सूक्ष्म, ०.५७ लाख लघु व ०.०६ लाख मध्यम) उपक्रम उद्यम नोंदणी अंतर्गत नोंदणीकृत होते.

१.३७ दिल्ली-मुंबई औद्योगिक मार्गिकेचा एक भाग म्हणून वॉक-टू-वर्क या संकल्पनेवर आधारीत सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून राज्यातील ४,००० हेक्टर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) विकास केला जात आहे. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत, ऑरिकमध्ये सुमारे ३०३ हेक्टर क्षेत्रावरील १९१ भूखंडांचे गुंतवणूकदारांना वाटप करण्यात आले आहे. ऑरिकमध्ये ₹ ६,००० कोटी पेक्षा जास्त गुंतवणूक झाली असून सुमारे १०,५०० रोजगार निर्मिती झाली आहे.

१.३८ ‘भारत पर्यटन सांख्यिकी-२०२२’ अहवालानुसार सन २०२१ मध्ये राज्यात देशांतर्गत पर्यटकांच्या भेटींची संख्या ४३५.७ लाख आणि विदेशी पर्यटकांच्या भेटींची संख्या १.९ लाख होती, तर सन २०२० मध्ये देशांतर्गत पर्यटकांच्या भेटींची संख्या ३९२.३ लाख आणि विदेशी पर्यटकांच्या भेटींची संख्या १२.६ लाख होती.

१.३९ राज्यात दि. ३१ मार्च, २०२२ रोजी सुमारे ५.९० कोटी सभासद असलेल्या २.२३ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी ९.५ टक्के प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्था, १३.९ टक्के बिगर-कृषि पतपुरवठा संस्था, ५४.० टक्के गृहनिर्माण संस्था, ११.६ टक्के कृषि प्रक्रिया संस्था, ५.२ टक्के मजूर कंत्राटी संस्था आणि ५.८ टक्के इतर कार्यात गुंतलेल्या संस्था होत्या.

## पायाभूत सुविधा

१.४० सन २०२१-२२ मध्ये राज्यात एकूण १,७१,२६३ दशलक्ष युनिट (केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त विजेसह) वीज उपलब्ध झाली असून राज्यातील एकूण विजेचा वापर १,३८,७७९ दशलक्ष युनिट होता.

- दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यातील वीज निर्मितीची स्थापित क्षमता (१०.९ टक्के) देशात सर्वाधिक होती
- राज्यासाठी विजेचा दरडोई अंतिम वापर १,११०.२ युनिट असून अखिल भारतासाठी तो ८२४.६ युनिट आहे

१.४१ सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत, विजेची सरासरी कमाल मागणी २२,३३९ मेगावॅट होती तर पुरवठा २२,४४१ मेगावॅट होता. सन २०२१-२२ मध्ये विजेची सरासरी कमाल मागणी २१,२२१ मेगावॅट होती तर पुरवठा २१,७५० मेगावॅट होता.

१.४२ सन २०२१-२२ मध्ये महापारेषणची पारेषण हानी ३.१९ टक्के तर महावितरणची वितरण हानी आणि ‘एकत्रित तांत्रिक व व्यावसायिक’ हानी अनुक्रमे १४.७४ टक्के व १५.४९ टक्के होती.

१.४३ राज्यात नवीकरणीय उर्जेची संभाव्य क्षमता १,६१,४३५ मेगावॅट असून दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी स्थापित क्षमता ११,४०० मेगावॅट होती.

- मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाअंतर्गत
  - कार्यान्वित
    - मेट्रो लाईन २A: दहिसर ते डी. एन. नगर
    - मेट्रो लाईन ७: अंधेरी (पू.) ते दहिसर (पू.)
  - प्रगतीपथावर
    - मेट्रो लाईन ३: कुलाबा ते वांद्रे ते सीप्झ
    - मेट्रो लाईन ४: वडाळा ते घाटकोपर ते ठाणे ते कासारवडवली
    - मेट्रो लाईन ४A: कासारवडवली ते गायमुख
    - मेट्रो लाईन ५: ठाणे ते भिवंडी ते कल्याण
    - मेट्रो लाईन ६: स्वामी समर्थ नगर ते विक्रोळी
    - मेट्रो लाईन ९: दहिसर (पू.) ते मिरा भाईंदर ते अंधेरी
    - मेट्रो लाईन १०: गायमुख ते शिवाजी चौक (मीरा रोड)
    - मेट्रो लाईन ११: वडाळा ते सीएसएमटी
    - मेट्रो लाईन १२: कल्याण ते तळोजा
- पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाअंतर्गत कॉरिडॉर I मधील पिंपरी-चिंचवड महानगर पालिका ते फुगेवाडी आणि कॉरिडॉर II मधील वनाज ते गरवारे महाविद्यालय कार्यान्वित झाले
- नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्पाअंतर्गत खापरी ते ऑटोमोटिव्ह चौक (उत्तर- दक्षिण कॉरिडॉर) आणि लोकमान्य नगर ते प्रजापती नगर ( पूर्व-पश्चिम कॉरिडॉर) कार्यान्वित झाले
- नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे

१.४४ माहे मार्च, २०२२ अखेर सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी सुमारे ३.२४ लाख किमी होती.

- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (अंदाजित किंमत ₹ १४,१७९ कोटी) विकसनाचे काम सुरू

- हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचा नागपूर ते शिर्डी मार्ग (सुमारे ५२० किमी लांब) पूर्ण झाला असून माहे डिसेंबर, २०२२ पासून रहदारीसाठी खुला करण्यात आला आहे
- मुंबई ट्रान्स हार्बर लिंक प्रकल्प (अंदाजित किंमत ₹ १७,८४३ कोटी) प्रगतीपथावर आहे
- मुंबई किनारा रस्ता प्रकल्प (दक्षिण) (अंदाजित किंमत ₹ १२,७२१ कोटी) प्रकल्पाचे माहे जानेवारी, २०२३ अखेर सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले

१.४५ हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा मुंबई व नागपूर शहरांना जोडणारा आठ पदरी (७०१ किमी लांब व १२० मीटर रुंद) द्रुतगती महामार्ग आहे. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत या महामार्गाचे सुमारे ९० टक्के काम पूर्ण झाले.

१.४६ राज्यातील रस्त्यावरील वाहनांची संख्या दि. १ जानेवारी, २०२३ रोजी ४३३ लाख (१३४ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती, तर दि. १ जानेवारी, २०२२ रोजी ४०९ लाख (१२८ वाहने प्रति किमी रस्ता लांबी) होती.

१.४७ माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात १,९२,९९७ बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांची नोंदणी झाली.

१.४८ सन २०२२-२३ मध्ये सप्टेंबर पर्यंत, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या प्रति दिन सरासरी १२,९०४ बस गाड्यांनी ४३.८१ लाख किमी प्रवास करून ३६.०३ लाख प्रवासी वाहतूक केली.

१.४९ सन २०२१-२२ मध्ये, राज्यातील मोठ्या व लहान बंदरांमधून झालेली एकत्रित मालवाहतूक १,८८३.५९ लाख मे. टन होती तर ती मागील वर्षी १,५७९.११ लाख मे. टन होती.

१.५० सन २०२१-२२ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय प्रवासी वाहतूक अनुक्रमे २४५.६५ लाख व ३२.१२ लाख होती तर सन २०२०-२१ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे १३३.९६ लाख व १२.२३ लाख होती.

१.५१ सन २०२१-२२ मध्ये राज्यातील विमानतळांवरून झालेली देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय मालवाहतूक अनुक्रमे २.५१ लाख मे. टन व ५.५७ लाख मे. टन होती तर सन २०२०-२१ मध्ये तत्सम आकडेवारी अनुक्रमे १.८७ लाख मे. टन व ४.४१ लाख मे. टन होती.

१.५२ राज्यात माहे सप्टेंबर, २०२२ अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या १०.०६ कोटी तर भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या १२.५६ कोटी होती.

## सामाजिक क्षेत्र

१.५३ दि.३० सप्टेंबर, २०२१ रोजी एकूण १,०५,८४८ प्राथमिक (इयत्ता १ ली ते ८ वी) शाळा होत्या व त्यातील पटसंख्या १५४.२ लाख होती तर २८,६१२ माध्यमिक व उच्च माध्यमिक (इयत्ता ९ वी ते १२ वी) शाळा होत्या व त्यातील पटसंख्या ६६.४ लाख होती.

- सन २०२० मध्ये,
  - अर्भक मृत्यूदर १६ होता
  - नवजात शिशु मृत्यूदर ११ होता
  - पाच वर्षाखालील बालकांचा मृत्यूदर १८ होता
  - एकूण जननदर १.५ होता
- सन २०१८ ते सन २०२० करिता माता मृत्यूप्रमाण ३३ होते

१.५४ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी २०२०-२१ अहवालानुसार राज्यात ७१ विद्यापीठे, ४,५३२ महाविद्यालये आणि २,१५३ स्वायत्त संस्था होत्या व त्यातील पटसंख्या ४९.९४ लाख होती.

१.५५ एकात्मिक महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत, सुमारे ६.२५ लाख शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले असून त्यावर ₹ १,३८७.१९ कोटी खर्च झाला.

१.५६ कोविड-१९ लसीकरणाच्या सुरूवातीपासून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत राज्यात एकूण ९१६.५१ लाख व्यक्तींना लसीकरणाचा पहिला डोस, ७६५.६५ लाख व्यक्तींना लसीकरणाचा दुसरा डोस आणि ९४.९३ लाख व्यक्तींना प्रिकॉशन डोस देण्यात आला आहे.

१.५७ सन २०२१-२२ मध्ये, ० ते ५ वर्षे वयोगटातील ९१.६ टक्के बालके सर्वसाधारण वजनाची, ७.१ टक्के बालके मध्यम कमी वजनाची आणि १.२ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती. सन २०२०-२१ मध्ये, तत्सम आकडेवारी अनुक्रमे ९०.० टक्के, ८.५ टक्के आणि १.४ टक्के होती.

- दि.३० सप्टेंबर, २०२१ रोजी मुली-मुले असमानता निर्देशक
  - प्राथमिककरिता १.०५
  - उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिककरिता प्रत्येकी ०.९८

१.५८ सन २०२१-२२ मध्ये, आदिवासी क्षेत्रात ० ते ५ वर्षे वयोगटातील ८१.६ टक्के बालके सर्वसाधारण वजनाची, १४.९ टक्के बालके मध्यम कमी वजनाची आणि ३.५ टक्के बालके तीव्र कमी वजनाची होती. सन २०२०-२१ मध्ये, तत्सम आकडेवारी अनुक्रमे ८०.२ टक्के, १६.० टक्के आणि ३.८ टक्के होती.

१.५९ स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा एक भाग म्हणून केंद्र शासनामार्फत अमृत सरोवर अभियान दि.२४ एप्रिल, २०२२ रोजी सुरू करण्यात आले. या अभियानाद्वारे देशातील प्रत्येक जिल्ह्यामधील किमान ७५ जलस्रोतांचा विकास व पुनरूज्जीवन करण्याचे उद्दीष्ट आहे. या अभियाना अंतर्गत राज्यातील ३,१२३ जलस्रोत निर्धारित करण्यात आले असून दि. २२ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत त्यापैकी ९२९ जलस्रोताचे काम पूर्ण झाले.

१.६० जल जीवन अभियाना अंतर्गत दि. २१ फेब्रुवारी, २०२३ रोजी, राज्यातील एकूण १.४६ कोटी कुटुंबे, ८५,३१७ शाळा, ९१,२६७ आंगणवाडी यांना अनुक्रमे १.०७ कोटी, ७९,२७४ आणि ८६,२३८ नळ जोडणी पुरविण्यात आली.

१.६१ स्वच्छ भारत अभियानाच्या (ग्रामीण) अंतर्गत राज्याने ३४ जिल्ह्यांमधील ३५१ पंचायत समिती आणि २७,६६८ ग्रामपंचायतींमध्ये १०० टक्के स्वच्छतेचे लक्ष्य साध्य केले व दि. १८ एप्रिल, २०१८ रोजी राज्यातील ग्रामीण महाराष्ट्रास खुली हागणदारी मुक्त (ओडीएफ) म्हणून घोषित करण्यात आले. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)-२ राज्यात सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात येत असून गावांची खुली हागणदारी मुक्तता स्थिती सातत्याने राखणे तसेच घन कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांद्वारे ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर सुधारणे व गावांना ओडीएफ+ बनविणे हे या अभियानाचा उद्देश आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत १०७ शहरे ओडीएफ, ८६ शहरे ओडीएफ+, १९९ शहरे ओडीएफ++ आणि चार शहरे वॉटर+ म्हणून घोषित करण्यात आली.

१.६२ राज्यातील नागरी भागात दररोज सरासरी २४,०२३ मे. टन कचरा निर्माण होतो, त्यापैकी ९९.९ टक्के कचरा दारोदारी जाऊन गोळा केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ९९.६ टक्के कचरा ओल्या व सुक्या स्वरूपात विलगीकृत केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ८७.२ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.

* * * * *

# २
# लोकसंख्या



# २.   लोकसंख्या

२.१   भारताचे महानिबंधक यांचे कार्यालयामार्फत दर दहा वर्षांनी जनगणना घेण्यात येते. जनगणना हा लोकसंख्येच्या वैशिष्ट्यांबाबत व्यापक माहिती देणारा एकमेव स्रोत आहे.  जनगणना २०११ ही १८७२ पासूनच्या अखंडित मालिकेतील पंधरावी जनगणना असून स्वातंत्र्योत्तर सातवी आहे. सामाजिक व आर्थिक विकासासाठी धोरण आखणी आणि विविध योजनांचे नियोजन व अंमलबजावणी याकरिता शासनास जनगणनेची आकडेवारी उपयुक्त ठरते.

२.२   राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, केंद्र शासन यांनी प्रकाशित केलेल्या प्रक्षेपित लोकसंख्येनुसार राज्याची दि. १ मार्च, २०२१ रोजीची प्रक्षेपित लोकसंख्या १२.४४ कोटी आहे. प्रक्षेपित नागरी लोकसंख्येचे राज्य आणि अखिल भारतासाठी प्रमाण अनुक्रमे ४८.० टक्के आणि ३४.४ टक्के आहे. निवडक राज्यांची प्रक्षेपित  लोकसंख्या तक्ता २.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता २.१  निवडक राज्यांची प्रक्षेपित लोकसंख्या**

(कोटी)

| राज्य | २०२१ करिता प्रक्षेपित |
|---|---|
| आंध्र प्रदेश | ५.२८ |
| गुजरात | ६.९८ |
| कर्नाटक | ६.६८ |
| केरळ | ३.५५ |
| मध्य प्रदेश | ८.४५ |
| **महाराष्ट्र** | **१२.४४** |
| राजस्थान | ७.९३ |
| तामिळनाडू | ७.६४ |
| तेलंगणा | ३.७७ |
| उत्तर प्रदेश | २३.०९ |
| **अखिल भारत** | **१३६.३०** |

*आधार* : राष्ट्रीय लोकसंख्या आयोग, केंद्र शासन

## जनगणना २०११

२.३   जनगणना २०११ नुसार राज्याची लोकसंख्या ११.२४ कोटी होती व  ती अखिल भारताच्या लोकसंख्येच्या ९.३ टक्के होती. महाराष्ट्र हे देशामध्ये उत्तरप्रदेश नंतर सर्वाधिक लोकसंख्या असलेले दुसऱ्या क्रमांकाचे राज्य होते. निवडक राज्यांकरिता जनगणना २०११ नुसार लोकसंख्या तक्ता २.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता २.२  निवडक राज्यांकरिता जनगणना २०११ नुसार लोकसंख्या**

| राज्य | एकूण लोकसंख्या (कोटी) | लोकसंख्येचे प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|
| | | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती |
| आंध्र प्रदेश | ४.९६ | १७.०८ | ५.५३ |
| गुजरात | ६.०४ | ६.७४ | १४.७५ |
| कर्नाटक | ६.११ | १७.१५ | ६.९५ |
| केरळ | ३.३४ | ९.१० | १.४५ |
| मध्य प्रदेश | ७.२६ | १५.६२ | २१.०९ |
| **महाराष्ट्र** | **११.२४** | **११.८१** | **९.३५** |
| राजस्थान | ६.८५ | १७.८३ | १३.४८ |
| तामिळनाडू | ७.२१ | २०.०१ | १.१० |
| तेलंगणा | ३.५० | १५.४५ | ९.०८ |
| उत्तर प्रदेश | १९.९८ | २०.७० | ०.५७ |
| **अखिल भारत** | **१२१.०९** | **१६.६३** | **८.६३** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

२.३.१   राज्याची लोकसंख्येची घनता ३६५ होती तर अखिल भारताची लोकसंख्येची घनता ३८२ होती.  निवडक राज्यांसाठी लोकसंख्येविषयक काही निर्देशक तक्ता २.३ मध्ये दिले आहेत.

**आलेख २.१ : महाराष्ट्र व अखिल भारतातील लोकसंख्येचा वृद्धीदर**




**आलेख २.२ : महाराष्ट्र व अखिल भारतातील नागरीकरण**




**तक्ता २.३ निवडक राज्यांसाठी लोकसंख्येविषयक काही निर्देशक**

| राज्य | दशवार्षिक वृद्धीदर (टक्के) | | लोकसंख्येची घनता (लोकसंख्या प्रती चौ.किमी) | | झोपडपट्ट्यांतील लोकसंख्येची नागरी लोकसंख्येशी टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २००१ | २०११ | २००१ | २०११ | २००१ | २०११ |
| आंध्र प्रदेश | १४.६@ | ९.२ | २७७@ | ३०४ | २४.९@ | ३८.३ |
| गुजरात | २२.७ | १९.३ | २५८ | ३०८ | ९.९ | ६.५ |
| कर्नाटक | १७.५ | १५.६ | २७६ | ३१९ | ७.८ | १३.९ |
| केरळ | ९.४ | ४.९ | ८१९ | ८६० | ०.८ | १.३ |
| मध्य प्रदेश | २४.३ | २०.४ | १९६ | २३६ | १५.१ | २८.३ |
| **महाराष्ट्र** | **२२.७** | **१६.०** | **३१५** | **३६५** | **२७.३** | **२३.३** |
| राजस्थान | २८.४ | २१.३ | १६५ | २०० | ९.८ | १२.१ |
| तामिळनाडू | ११.७ | १५.६ | ४८० | ५५५ | १०.४ | १६.६ |
| तेलंगणा | - | १३.६ | - | ३१२ | - | ३३.७ |
| उत्तर प्रदेश | २५.९ | २०.२ | ६९० | ८२९ | १२.७ | १४.० |
| **अखिल भारत** | **२१.५** | **१७.७** | **३२५** | **३८२** | **१५.०** | **१७.४** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

२.३.२ जनगणना २०११ नुसार राज्यातील झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या १.१८ कोटी होती आणि ती अखिल भारत स्तरावर ६.५५ कोटी होती. निवडक राज्यांकरिता झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या तक्ता २.४ मध्ये दिली आहे.

२.३.३ महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या परिशिष्ट २.१ मध्ये दिली आहे. जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या परिशिष्ट २.२ मध्ये दिली आहे आणि जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक परिशिष्ट २.३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.४ निवडक राज्यांकरिता झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या**

(लाख)

| राज्य | एकूण झोपडपट्ट्यांमधील लोकसंख्या | |
|---|---|---|
| | २००१ | २०११ |
| आंध्रप्रदेश@ | ५१.८७ | १०१.८७ |
| गुजरात | १८.६७ | १६.८० |
| कर्नाटक | १४.०३ | ३२.९१ |
| केरळ | ०.६५ | २.०२ |
| मध्य प्रदेश | २४.१७ | ५६.८९ |
| **महाराष्ट्र** | **११२.०३** | **११८.४८** |
| राजस्थान | १२.९४ | २०.६८ |
| तामिळनाडू | २८.६७ | ५७.९८ |
| उत्तर प्रदेश | ४३.९५ | ६२.४० |
| **अखिल भारत** | **४२५.७८** | **६५४.९५** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @तेलंगणासह

## स्त्री-पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण

२.४ जनगणना २०११ नुसार, राज्यातील स्त्री-पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण अनुक्रमे ९२९ आणि ८९४ होते. स्त्री-पुरुष प्रमाण केरळ राज्यात सर्वाधिक (१,०८४) तर दिल्ली मध्ये सर्वात कमी (८६८) होते. बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण अरुणाचल प्रदेश राज्यात सर्वाधिक (९७२) तर हरियाणा राज्यात सर्वात कमी (८३४) होते. निवडक राज्यांसाठी स्त्री-पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण तक्ता २.५ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.५ निवडक राज्यांसाठी स्त्री-पुरुष प्रमाण आणि बालकांमधील मुलामुलींचे प्रमाण**

| राज्य | जनगणना २०११ | |
|---|---|---|
| | स्त्री पुरुष प्रमाण | बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण |
| आंध्र प्रदेश | ९९७ | ९४४ |
| गुजरात | ९१९ | ८९० |
| कर्नाटक | ९७३ | ९४८ |
| केरळ | १,०८४ | ९६४ |
| मध्य प्रदेश | ९३१ | ९१८ |
| **महाराष्ट्र** | **९२९** | **८९४** |
| राजस्थान | ९२८ | ८८८ |
| तामिळनाडू | ९९६ | ९४३ |
| तेलंगणा | ९८८ | ९३२ |
| उत्तर प्रदेश | ९१२ | ९०२ |
| **अखिल भारत** | **९४३** | **९१८** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## साक्षरता दर

२.५ जनगणना २०११ नुसार, राज्यासाठी पुरुष आणि स्त्री साक्षरता दर अनुक्रमे ८८.४ टक्के आणि ७५.९ टक्के होते. जनगणना २००१ नुसार स्त्री-पुरुष साक्षरता दरामधील तफावत १९.० टक्केवारी अंकांवरून जनगणना २०११ मध्ये १२.५ टक्केवारी अंकांपर्यंत कमी झाली. निवडक राज्यांकरिता साक्षरता दर तक्ता २.६ मध्ये दिले आहेत.

**तक्ता २.६ निवडक राज्यांसाठी साक्षरता दर (७ वर्षे व अधिक वयोगट)**

(टक्के)

| राज्य | जनगणना २००१ | | | जनगणना २०११ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | व्यक्ती | पुरुष | स्त्री | व्यक्ती |
| आंध्र प्रदेश@ | ७०.३@ | ५०.४@ | ६०.५@ | ७४.८ | ६०.० | ६७.४ |
| गुजरात | ७९.७ | ५७.८ | ६९.१ | ८५.८ | ६९.७ | ७८.० |
| कर्नाटक | ७६.१ | ५६.९ | ६६.७ | ८२.५ | ६८.१ | ७५.४ |
| केरळ | ९४.३ | ८७.७ | ९०.९ | ९६.१ | ९२.१ | ९४.० |
| मध्य प्रदेश | ७६.१ | ५०.३ | ६३.७ | ७८.७ | ५९.२ | ६९.३ |
| **महाराष्ट्र** | **८६.०** | **६७.०** | **७६.९** | **८८.४** | **७५.९** | **८२.३** |
| राजस्थान | ७५.७ | ४३.९ | ६०.४ | ७९.२ | ५२.१ | ६६.१ |
| तामिळनाडू | ८२.५ | ६४.४ | ७३.५ | ८६.८ | ७३.४ | ८०.१ |
| तेलंगणा | - | - | - | ७५.० | ५८.० | ६६.५ |
| उत्तर प्रद्रेश | ६८.८ | ४२.२ | ५६.३ | ७७.३ | ५७.२ | ६७.७ |
| **अखिल भारत** | **७५.३** | **५३.७** | **६४.८** | **८०.९** | **६४.६** | **७३.०** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

२.५.१ जनगणना २०११ नुसार, राज्यासाठी प्रौढ साक्षरता दर (१५ वर्षे व अधिक वयोगट) ८०.३ टक्के होता. पुरुष आणि स्त्री यांच्यासाठी प्रौढ साक्षरता दर अनुक्रमे ८७.४ टक्के आणि ७२.६ टक्के होता.

## शैक्षणिक स्तर

२.६ जनगणना २०११ नुसार, साक्षर लोकसंख्येपैकी, ग्रामीण भागाकरिता माध्यमिक/दहावी शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी राज्य आणि अखिल भारत स्तरावर अनुक्रमे १५.४ आणि १२.७ होती. नागरी भागाकरिता माध्यमिक/दहावी शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी राज्य आणि अखिल भारत स्तरावर अनुक्रमे १७.९ आणि १६.० होती. ग्रामीण भागाकरिता पदवी व त्यावरील शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी राज्य आणि अखिल भारत स्तरावर अनुक्रमे ४.८ आणि ४.६ होती. नागरी भागाकरिता पदवी व त्यावरील शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकसंख्येची टक्केवारी राज्य आणि अखिल भारत स्तरावर अनुक्रमे १६.६ आणि

१६.४ होती. निवडक राज्यांकरिता शैक्षणिक स्तरानुसार लोकसंख्येची टक्केवारी (७ वर्षे व अधिक वयोगट) तक्ता २.७ मध्ये दिलेली आहे.

**तक्ता २.७ निवडक राज्यांकरिता शैक्षणिक स्तरानुसार लोकसंख्येची टक्केवारी (७ वर्षे व अधिक वयोगट)**

(टक्के)

| राज्य | माध्यमिक/ दहावी | | | पदवीधर व त्यावरील | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | व्यक्ती | पुरुष | स्त्री | व्यक्ती |
| आंध्र प्रदेश@ | १७.१ | १६.८ | १७.० | १२.९ | ८.७ | ११.० |
| गुजरात | १६.१ | १३.३ | १४.९ | ८.१ | ७.३ | ७.७ |
| कर्नाटक | १२.४ | १२.७ | १२.५ | ११.१ | ८.६ | ९.९ |
| केरळ | १३.९ | १३.५ | १३.७ | ८.३ | ९.७ | ९.० |
| मध्य प्रदेश | ११.२ | ९.२ | १०.४ | ८.१ | ६.६ | ७.५ |
| **महाराष्ट्र** | **१७.५** | **१५.६** | **१६.६** | **११.४** | **९.६** | **१०.६** |
| राजस्थान | १३.४ | ९.९ | १२.० | ८.८ | ६.७ | ८.० |
| तामिळनाडू | १६.२ | १५.३ | १५.८ | ११.१ | ९.८ | १०.५ |
| उत्तर प्रदेश | १४.३ | ११.७ | १३.२ | ९.३ | ७.७ | ८.७ |
| **अखिल भारत** | **१४.७** | **१२.८** | **१३.९** | **९.७** | **८.०** | **८.९** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

## कामगार लोकसंख्या प्रमाण

२.७ जनगणना २०११ नुसार, राज्यासाठी कामगार लोकसंख्या प्रमाण ४४.० टक्के होता. ग्रामीण भागासाठी कामगार लोकसंख्या प्रमाण ४९.८ टक्के होती तर नागरी भागामध्ये ३६.९ टक्के होते. निवडक राज्यांकरिता उद्योगाच्या प्रकारानुसार कामगार लोकसंख्या प्रमाण तक्ता २.८ मध्ये दिले आहे. निवडक राज्यांकरिता वयविनिर्दिष्ट कामगार लोकसंख्या प्रमाण तक्ता २.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता २.८ निवडक राज्यांकरिता उद्योगाच्या प्रकारानुसार कामगार लोकसंख्या प्रमाण**

(टक्के)

| राज्य | उद्योगाचे प्रकार | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कृषि व संलग्न कार्ये | खाणकाम व दगडकाम | वस्तूनिर्माण | वीज, वायू आणि पाणी पुरवठा | बांधकाम | व्यापार, दुरुस्ती, वाहतूक व साठवण, दळणवळण | वित्तीय सेवा आणि स्थावर मालमत्ता | लोक प्रशासन आणि संरक्षण | इतर |
| आंध्र प्रदेश@ | २८.२ | ०.३ | ४.० | ०.२ | २.४ | ४.९ | ०.५ | १.३ | ४.७ |
| गुजरात | २२.० | ०.१ | ६.३ | ०.४ | १.९ | ५.० | ०.५ | ०.७ | ४.१ |
| कर्नाटक | २४.५ | ०.२ | ५.४ | ०.२ | २.५ | ६.४ | ०.८ | १.२ | ४.५ |
| केरळ | ९.६ | ०.२ | ४.७ | ०.२ | ५.४ | ७.८ | १.० | १.४ | ४.६ |
| मध्य प्रदेश | ३०.९ | ०.२ | २.७ | ०.१ | १.९ | ३.२ | ०.३ | १.० | ३.१ |
| **महाराष्ट्र** | **२३.५** | **०.१** | **५.०** | **०.१** | **२.१** | **५.६** | **०.८** | **२.१** | **४.६** |
| राजस्थान | २८.४ | ०.३ | ३.१ | ०.२ | ३.१ | ३.९ | ०.४ | १.१ | ३.२ |
| तामिळनाडू | २०.५ | ०.२ | ७.२ | ०.२ | ३.३ | ६.७ | ०.७ | १.६ | ५.२ |
| उत्तर प्रदेश | २०.० | ०.० | ३.१ | ०.१ | १.५ | २.८ | ०.३ | ०.८ | ४.४ |
| **अखिल भारत** | **२२.७** | **०.२** | **४.०** | **०.२** | **२.२** | **४.५** | **०.५** | **१.४** | **४.२** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

**तक्ता २.९ निवडक राज्यांकरिता वयविनिर्दिष्ट कामगार लोकसंख्या प्रमाण**

(टक्के)

| राज्य | २००१ | | २०११ | |
|---|---|---|---|---|
| | वयोगट | | वयोगट | |
| | १५ ते २९ वर्षे | १५ ते ५९ वर्षे | १५ ते २९ वर्षे | १५ ते ५९ वर्षे |
| आंध्र प्रदेश@ | ५७.४ | ६७.९ | ५०.० | ६४.९ |
| गुजरात | ५४.८ | ६४.३ | ४९.२ | ५९.३ |
| कर्नाटक | ५५.३ | ६६.२ | ५१.४ | ६३.९ |
| केरळ | ३१.८ | ४७.० | ३०.७ | ४९.४ |
| मध्य प्रदेश | ५८.६ | ६९.६ | ५२.९ | ६६.१ |
| **महाराष्ट्र** | **५१.२** | **६४.६** | **४७.५** | **६१.८** |
| राजस्थान | ६०.९ | ७०.० | ५५.१ | ६७.६ |
| तामिळनाडू | ४९.२ | ६२.७ | ४४.८ | ६१.६ |
| उत्तर प्रदेश | ४२.१ | ५४.१ | ३७.३ | ५०.१ |
| **अखिल भारत** | **४९.३** | **६१.१** | **४५.०** | **५८.५** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

## स्त्री प्रमुख असलेली कुटुंबे

२.८ जनगणना २०११ नुसार, राज्यातील कुटुंबांची एकूण संख्या २.४४ कोटी होती. निवडक राज्यांकरिता स्त्री कुटुंबप्रमुख असलेल्या कुटुंबांचे प्रमाण तक्ता २.१० मध्ये दिले आहे.

## कुटुंबांसाठी सुविधा

२.९ जनगणना २०११ नुसार राज्यामध्ये कुटुंबांची (संस्थात्मक कुटुंबे वगळून) संख्या २.३८ कोटी होती. निवडक राज्यांकरिता पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व स्वच्छता सुविधा यानुसार कुटुंबांची टक्केवारी तक्ता २.११ मध्ये दिली आहे. निवडक राज्यांकरिता प्रकाशाच्या स्त्रोतानुसार कुटुंबांची टक्केवारी तक्ता २.१२ मध्ये दिली आहे. निवडक राज्यांकरिता स्वयंपाकासाठी वापरण्यात आलेल्या इंधनाच्या स्त्रोतानुसार कुटुंबांची टक्केवारी तक्ता २.१३ मध्ये दिली आहे. निवडक राज्याकरिता बँकिंग सेवांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी तक्ता २.१४ मध्ये दिली आहे.

**आलेख २.३ : वयोगटनिहाय राज्यातील लोकसंख्येची टक्केवारी**




**तक्ता २.१० निवडक राज्यांकरिता स्त्री कुटुंबप्रमुख असलेल्या कुटुंबांचे प्रमाण**

(टक्के)

| राज्य | जनगणना | |
|---|---|---|
| | २००१ | २०११ |
| आंध्र प्रदेश@ | ११.३ | १४.९ |
| गुजरात | ८.० | १०.१ |
| कर्नाटक | १३.९ | १७.० |
| केरळ | २२.५ | २५.२ |
| मध्य प्रदेश | ७.५ | १०.० |
| **महाराष्ट्र** | **१०.१** | **१२.८** |
| राजस्थान | ६.९ | ९.३ |
| तामिळनाडू | १३.९ | १६.० |
| उत्तर प्रदेश | ७.९ | १२.० |
| **अखिल भारत** | **१०.३** | **१३.१** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

## तक्ता २.११ निवडक राज्यांकरिता पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व स्वच्छता सुविधा यानुसार कुटुंबांची टक्केवारी

(टक्के)

| राज्य | सुविधा उपलब्ध असलेली कुटुंबे | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पिण्याच्या पाण्याची उपलब्धता | | शौचालय सुविधा | | | सांडपाणी व्यवस्थापनाचा प्रकार | | |
| | परिसरात | परिसराबाहेर | परिसरात | परिसराबाहेर | | बंद गटार | उघडे गटार | गटार नाही |
| | | | | सार्वजनिक शौचालय | खुल्यावरील शौचालय | | | |
| आंध्र प्रदेश@ | ४३.२ | ५६.८ | ४९.६ | २.५ | ४८.० | २१.६ | ३५.४ | ४३.१ |
| गुजरात | ६४.० | ३६.० | ५७.३ | २.२ | ४०.४ | ३७.३ | ९.४ | ५३.३ |
| कर्नाटक | ४४.५ | ५५.५ | ५१.२ | ३.८ | ४५.० | २६.१ | ३४.६ | ३९.३ |
| केरळ | ७७.७ | २२.३ | ९५.२ | १.० | ३.८ | २५.२ | २१.२ | ५३.६ |
| मध्य प्रदेश | २३.९ | ७६.१ | २८.८ | १.२ | ७०.० | ९.८ | ३०.१ | ६०.१ |
| **महाराष्ट्र** | **५९.४** | **४०.६** | **५३.१** | **१२.९** | **३४.०** | **३३.२** | **३४.२** | **३२.५** |
| राजस्थान | ३५.० | ६५.० | ३५.० | ०.७ | ६४.३ | १०.७ | ३०.८ | ५८.५ |
| तामिळनाडू | ३४.९ | ६५.१ | ४८.३ | ६.० | ४५.७ | २५.४ | २४.९ | ४९.७ |
| उत्तर प्रदेश | ५१.९ | ४८.१ | ३५.६ | १.३ | ६३.० | १२.९ | ५६.१ | ३१.१ |
| **अखिल भारत** | **४६.६** | **५३.४** | **४६.९** | **३.२** | **४९.८** | **१८.१** | **३३.०** | **४८.९** |

*आधार*: भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय @ तेलंगणासह

## तक्ता २.१२ निवडक राज्यांकरिता प्रकाशाच्या स्त्रोतानुसार कुटुंबांची टक्केवारी

(टक्के)

| राज्य | प्रकाशाचा स्त्रोत | | | प्रकाश योजना नसलेली |
|---|---|---|---|---|
| | वीज | केरोसीन | इतर$ | |
| आंध्र प्रदेश@ | ९२.२ | ६.९ | ०.६ | ०.४ |
| गुजरात | ९०.४ | ८.१ | ०.६ | १.० |
| कर्नाटक | ९०.६ | ८.६ | ०.४ | ०.४ |
| केरळ | ९४.४ | ५.२ | ०.३ | ०.० |
| मध्य प्रदेश | ६७.१ | ३२.१ | ०.६ | ०.२ |
| **महाराष्ट्र** | **८३.९** | **१४.५** | **०.७** | **०.९** |
| राजस्थान | ६७.० | ३०.९ | १.२ | ०.८ |
| तामिळनाडू | ९३.४ | ५.९ | ०.३ | ०.४ |
| उत्तर प्रदेश | ३६.८ | ६१.९ | १.० | ०.२ |
| **अखिल भारत** | **६७.३** | **३१.४** | **०.८** | **०.५** |

आधार : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय $ सौर उर्जा, इतर तेल आणि इतर @ तेलंगणासह

## तक्ता २.१३ निवडक राज्यांकरिता स्वयंपाकासाठी वापरण्यात आलेल्या इंधनाच्या स्त्रोतानुसार कुटुंबांची टक्केवारी

(टक्के)

| राज्य | इंधन स्त्रोत | | | | स्वयंपाक न करणारे |
|---|---|---|---|---|---|
| | एल पी जी | जळाऊ लाकूड | केरोसीन | इतर$ | |
| आंध्र प्रदेश@ | ३५.८ | ५६.८ | ३.८ | ३.२ | ०.३ |
| गुजरात | ३८.३ | ४४.० | ७.६ | ९.७ | ०.४ |
| कर्नाटक | ३२.५ | ५७.५ | ५.४ | ४.३ | ०.३ |
| केरळ | ३५.८ | ६१.९ | ०.४ | १.६ | ०.३ |
| मध्य प्रदेश | १८.२ | ६६.४ | १.३ | १४.० | ०.२ |
| **महाराष्ट्र** | **४३.४** | **४२.६** | **६.५** | **६.८** | **०.८** |
| राजस्थान | २२.८ | ६१.८ | ०.९ | १४.२ | ०.२ |
| तामिळनाडू | ४७.९ | ४३.५ | ६.९ | १.३ | ०.४ |
| उत्तर प्रदेश | १८.९ | ४७.७ | ०.७ | ३२.४ | ०.२ |
| **अखिल भारत** | **२८.५** | **४९.०** | **२.९** | **१९.२** | **०.३** |

*आधार :* भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय $ इतर मध्ये पीक अवशेष, शेणाच्या गोवऱ्या, कोळसा, वीज, बायोगॅस आणि इतर @ तेलंगणासह

**तक्ता २.१४ निवडक राज्यांकरिता बँकिंग सेवांचा लाभ घेणाऱ्या कुटुंबांची टक्केवारी**

(टक्के)

| राज्य | २००१ | २०११ |
|---|---|---|
| आंध्रप्रदेश@ | ३१.० | ५३.१ |
| गुजरात | ३७.८ | ५७.९ |
| कर्नाटक | ४०.० | ६१.१ |
| केरळ | ५१.१ | ७४.२ |
| मध्य प्रदेश | २७.९ | ४६.६ |
| **महाराष्ट्र** | **४८.१** | **६८.९** |
| राजस्थान | २८.९ | ६८.० |
| तामिळनाडू | २२.८ | ५२.५ |
| उत्तर प्रदेश | ४४.१ | ७२.० |
| **अखिल भारत** | **३५.५** | **५८.७** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

@ तेलंगणासह

* * * * *

## परिशिष्ट २.१

## महाराष्ट्राची व भारताची जनगणनांवर आधारीत लोकसंख्या

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | दशवार्षिक वृध्दीदर (टक्के) | | साक्षरतेची टक्केवारी ££ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| १९६१ | ३.९६ | ४३.९२ | २३.६ | २१.६ | ३५.१ | २८.३ |
| १९७१ | ५.०४ | ५४.८२ | २७.५ | २४.८ | ४५.८ | ३४.५ |
| १९८१ | ६.२८ | ६८.५२@ | २४.५ | २५.० | ५५.८ | ४३.६§ |
| १९९१ | ७.८९ | ८४.६४£ | २५.७ | २३.९£ | ६४.९ | ५२.२@@ |
| २००१ | ९.६९ | १०२.८७ | २२.७ | २१.५ | ७६.९ | ६४.८ |
| २०११ | ११.२४ | १२१.०९ | १६.० | १७.७ | ८२.३ | ७३.० |

*आधार* - भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

@ आसामची प्रक्षेपित लोकसंख्या धरुन

£ जम्मू व काश्मीरची प्रक्षेपित लोकसंख्या धरुन

££ १९६१ व १९७१ ची साक्षरतेची टक्केवारी ५ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्येसाठी आहे. १९८१, १९९१, २००१ व २०११ ची साक्षरतेची टक्केवारी ७ वर्षे व अधिक वयोगटातील लोकसंख्येसाठी आहे.

§ साक्षरतेची टक्केवारी आसाम वगळून

@@ साक्षरतेची टक्केवारी जम्मू व काश्मीर वगळून

## परिशिष्ट २.२

## जनगणनांवर आधारीत राज्यातील ग्रामीण व नागरी लोकसंख्या

| जनगणना वर्ष | लोकसंख्या (कोटी) | | | | | नागरी लोकसंख्येची एकूण लोकसंख्येशी टक्केवारी | स्त्री-पुरुष प्रमाण | | | लोकसंख्येची घनता (प्रति चौ.किमी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | एकूण | पुरुष | स्त्रिया | | ग्रामीण | नागरी | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १९६१ | २.८४ | १.१२ | ३.९६ | २.०४ | १.९१ | २८.२ | ९९५ | ८०१ | ९३६ | १२९ |
| १९७१ | ३.४७ | १.५७ | ५.०४ | २.६१ | २.४३ | ३१.२ | ९८५ | ८२० | ९३० | १६४ |
| १९८१ | ४.०८ | २.२० | ६.२८ | ३.२४ | ३.०४ | ३५.० | ९८७ | ८५० | ९३७ | २०४ |
| १९९१ | ४.८४ | ३.०५ | ७.८९ | ४.०८ | ३.८१ | ३८.७ | ९७२ | ८७५ | ९३४ | २५७ |
| २००१ | ५.५८ | ४.११ | ९.६९ | ५.०४ | ४.६५ | ४२.४ | ९६० | ८७३ | ९२२ | ३१५ |
| २०११ | ६.१६ | ५.०८ | ११.२४ | ५.८२ | ५.४१ | ४५.२ | ९५२ | ९०३ | ९२९ | ३६५ |

*आधार* - भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट २.३

## जनगणना २०११ नुसार जिल्हानिहाय लोकसंख्येचे निर्देशक

| अनु. क्र. | जिल्हा | लोकसंख्या ('०००') | | | दशवार्षिक वृध्दी दर (टक्के) (२००१-२०११) | साक्षरता दर (टक्के) | | | स्त्री - पुरुष प्रमाण | बालकांमधील मुला-मुलींचे प्रमाण (० -६ वर्षे वयोगट) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | स्त्री | एकूण | | पुरुष | स्त्री | एकूण | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मुंबई शहर | १,६८५ | १,४०१ | ३,०८५ | (-) ७.६ | ९१.५ | ८६.५ | ८९.२ | ८३२ | ९१४ |
| २ | मुंबई उपनगर | ५,०३१ | ४,३२६ | ९,३५७ | ८.३ | ९२.९ | ८६.४ | ८९.९ | ८६० | ९१३ |
| ३ | ठाणे # | ५,८६५ | ५,१९५ | ११,०६० | ३६.० | ८८.७ | ७९.८ | ८४.५ | ८८६ | ९२४ |
| ४ | रायगड | १,३४४ | १,२९० | २,६३४ | १९.३ | ८९.१ | ७६.९ | ८३.१ | ९५९ | ९३५ |
| ५ | रत्नागिरी | ७६१ | ८५४ | १,६१५ | (-) ४.८ | ९०.९ | ७४.५ | ८२.२ | १,१२२ | ९३६ |
| ६ | सिंधुदुर्ग | ४१७ | ४३२ | ८५० | (-) २.२ | ९१.६ | ७९.८ | ८५.६ | १,०३६ | ९२२ |
| **कोकण विभाग** | | **१५,१०४** | **१३,४९८** | **२८,६०१** | **१४.९** | **९०.७** | **८२.०** | **८६.६** | **८९४** | **९२१** |
| ७ | नाशिक | ३,१५७ | २,९५० | ६,१०७ | २२.३ | ८८.२ | ७६.१ | ८२.३ | ९३४ | ८९० |
| ८ | धुळे | १,०५४ | ९९७ | २,०५१ | २०.१ | ७९.५ | ६५.८ | ७२.८ | ९४६ | ८९८ |
| ९ | नंदुरबार | ८३३ | ८१५ | १,६४८ | २५.७ | ७२.२ | ५६.५ | ६४.४ | ९७८ | ९४४ |
| १० | जळगाव | २,१९७ | २,०३३ | ४,२३० | १४.९ | ८५.४ | ७०.६ | ७८.२ | ९२५ | ८४२ |
| ११ | अहमदनगर | २,३४३ | २,२०० | ४,५४३ | १२.४ | ८६.८ | ७०.९ | ७९.१ | ९३९ | ८५२ |
| **नाशिक विभाग** | | **९,५८५** | **८,९९५** | **१८,५७९** | **१८.१** | **८४.९** | **७०.७** | **७८.०** | **९३८** | **८७६** |
| १२ | पुणे | ४,९२४ | ४,५०५ | ९,४२९ | ३०.४ | ९०.८ | ८१.१ | ८६.२ | ९१५ | ८८३ |
| १३ | सातारा | १,५११ | १,४९३ | ३,००४ | ६.९ | ८९.४ | ७६.३ | ८२.९ | ९८८ | ८९५ |
| १४ | सांगली | १,४३६ | १,३८६ | २,८२२ | ९.२ | ८८.२ | ७४.६ | ८१.५ | ९६६ | ८६७ |
| १५ | सोलापूर | २,२२८ | २,०९० | ४,३१८ | १२.२ | ८५.० | ६८.६ | ७७.० | ९३८ | ८८३ |
| १६ | कोल्हापूर | १,९८१ | १,८९५ | ३,८७६ | १०.० | ८८.६ | ७४.२ | ८१.५ | ९५७ | ८६३ |
| **पुणे विभाग** | | **१२,०७९** | **११,३७०** | **२३,४४९** | **१७.३** | **८८.९** | **७६.२** | **८२.७** | **९४१** | **८८०** |
| १७ | औरंगाबाद | १,९२४ | १,७७७ | ३,७०१ | २७.८ | ८७.४ | ७०.१ | ७९.० | ९२३ | ८५८ |
| १८ | जालना | १,०११ | ९४८ | १,९५९ | २१.५ | ८१.५ | ६१.० | ७१.५ | ९३७ | ८७० |
| १९ | परभणी | ९४३ | ८९३ | १,८३६ | २०.२ | ८२.६ | ६३.६ | ७३.३ | ९४७ | ८८४ |
| २० | हिंगोली | ६०६ | ५७१ | १,१७७ | १९.३ | ८६.९ | ६९.० | ७८.२ | ९४२ | ८८२ |
| २१ | बीड | १,३४९ | १,२३६ | २,५८५ | १९.६ | ८५.६ | ६७.८ | ७७.० | ९१६ | ८०७ |
| २२ | नांदेड | १,७३० | १,६३१ | ३,३६१ | १६.९ | ८४.३ | ६६.२ | ७५.५ | ९४३ | ९१० |
| २३ | उस्मानाबाद | ८६२ | ७९६ | १,६५८ | ११.५ | ८५.८ | ७०.५ | ७८.४ | ९२४ | ८६७ |
| २४ | लातूर | १,२७३ | १,१८१ | २,४५४ | १८.० | ८४.४ | ६९.६ | ७७.३ | ९२८ | ८८९ |
| **औरंगाबाद विभाग** | | **९,६९९** | **९,०३३** | **१८,७३२** | **१९.९** | **८४.९** | **६७.४** | **७६.४** | **९३१** | **८७०** |
| २५ | बुलढाणा | १,३३८ | १,२४९ | २,५८६ | १५.९ | ९०.५ | ७५.८ | ८३.४ | ९३४ | ८५५ |
| २६ | अकोला | ९३२ | ८८२ | १,८१४ | ११.३ | ९२.३ | ८३.५ | ८८.१ | ९४६ | ९१२ |
| २७ | वाशिम | ६२० | ५७७ | १,१९७ | १७.३ | ९०.६ | ७५.५ | ८३.२ | ९३० | ८६३ |
| २८ | अमरावती | १,४८१ | १,४०८ | २,८८८ | १०.८ | ९१.५ | ८३.१ | ८७.४ | ९५१ | ९३५ |
| २९ | यवतमाळ | १,४२० | १,३५२ | २,७७२ | १२.८ | ८९.४ | ७५.९ | ८२.८ | ९५२ | ९२२ |
| **अमरावती विभाग** | | **५,७९१** | **५,४६७** | **११,२५८** | **१३.२** | **९०.८** | **७९.०** | **८५.०** | **९४४** | **९००** |
| ३० | वर्धा | ६६८ | ६३२ | १,३०१ | ५.२ | ९१.९ | ८१.८ | ८७.० | ९४६ | ९१९ |
| ३१ | नागपूर | २,३८५ | २,२६९ | ४,६५४ | १४.४ | ९२.१ | ८४.५ | ८८.४ | ९५१ | ९३१ |
| ३२ | भंडारा | ६०६ | ५९५ | १,२०० | ५.६ | ९०.४ | ७७.१ | ८३.८ | ९८२ | ९५० |
| ३३ | गोंदिया | ६६२ | ६६१ | १,३२३ | १०.१ | ९२.० | ७७.९ | ८५.० | ९९९ | ९५६ |
| ३४ | चंद्रपूर | १,१२४ | १,०८० | २,२०४ | ६.४ | ८६.८ | ७३.० | ८०.० | ९६१ | ९५३ |
| ३५ | गडचिरोली | ५४१ | ५३२ | १,०७३ | १०.६ | ८२.३ | ६६.३ | ७४.४ | ९८२ | ९६१ |
| **नागपूर विभाग** | | **५,९८६** | **५,७६९** | **११,७५४** | **१०.०** | **९०.०** | **७८.९** | **८४.५** | **९६४** | **९४१** |
| **महाराष्ट्र राज्य** | | **५८,२४३** | **५४,१३१** | **१,१२,३७४** | **१६.०** | **८८.४** | **७५.९** | **८२.३** | **९२९** | **८९४** |

*आधार* - भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

\# अविभाजित ठाणे जिल्हा

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# ३
# राज्य उत्पन्न



# ३. राज्य उत्पन्न

३.१ देशांतर्गत स्थूल उत्पन्न अर्थव्यवस्थेचे आकारमान दर्शविते. देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वृद्धिदर अर्थव्यवस्थेच्या प्रगतीचे मापन करण्यासाठी वापरला जातो. विशिष्ट कालावधीतील क्षेत्रनिहाय स्थूल मूल्यवृद्धिवरुन अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांच्या तुलनात्मक स्थितीचे आकलन होते.

३.२ चालू मालिकेतील (पायाभूत वर्ष २०११-१२) कार्यपद्धतीनुसार राष्ट्रीय स्तरावरील क्षेत्रनिहाय अंदाज मूळ किंमतींवर आधारित स्थूल मूल्यवृद्धिच्या स्वरुपात तर देशांतर्गत स्थूल उत्पन्न हे बाजार किंमतींवर आधारित आहे. राज्यासाठी/जिल्ह्यासाठी क्षेत्रनिहाय अंदाज मूळ किंमतींवर आधारित स्थूल राज्य/जिल्हा मूल्यवृद्धिच्या स्वरुपात व स्थूल राज्य/जिल्हा उत्पन्नाचे अंदाज बाजार किंमतींवर आधारित आहेत. चालू किंमतींवर आधारित अंदाजांना सांकेतिक तर स्थिर किंमतींवर आधारित अंदाजांना वास्तविक असे संबोधण्यात येते.

## राज्य अर्थव्यवस्था

### स्थूल राज्य उत्पन्न पूर्वानुमान (सन २०२२-२३)

३.३ पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ च्या वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नात सन २०२१-२२ च्या तुलनेत ६.८ टक्के वाढ अपेक्षित असून ₹ २१,६५,५५८ कोटी अंदाजित आहे. सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३५,२७,०८४ कोटी अंदाजित आहे.

३.३.१ पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ करीता वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि, वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.१ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ३.१ पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ करीता वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि, वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न व दरडोई वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

(टक्के)

| क्षेत्र | वृद्धिदर |
|---|---|
| i) कृषि व संलग्न कार्ये (कृषि#, वने व मत्स्यव्यवसाय) | १०.२ |
| ii) खाण व दगड खाणकाम | ४.४ |
| iii) वस्तुनिर्माण | ६.९ |
| iv) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | ७.० |
| v) बांधकाम | ४.४ |
| vi) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | ४.६ |
| vii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ६.३ |
| viii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ८.८ |
| **स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **६.८** |
| **स्थूल राज्य उत्पन्न** | **६.८** |
| **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न** | **६.०** |

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन # पीक व पशुसंवर्धन समाविष्ट

३.३.२ 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित १०.२ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'उद्योग' क्षेत्रात ६.१ टक्के वाढ आणि 'सेवा' क्षेत्रात ६.४ टक्के वाढ अपेक्षित आहे.

### स्थूल राज्य उत्पन्न (सन २०२१-२२)

३.४ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार सन २०२१-२२ चे वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न सन २०२०-२१ च्या तुलनेत ९.१ टक्के अपेक्षित वाढीसह ₹ २०,२७,९७१ कोटी अंदाजित आहे. सन २०२१-२२ चे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न ₹ ३१,०८,०२२ कोटी अंदाजित आहे.

३.४.१ क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.२ मध्ये दिले आहेत. स्थूल राज्य उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.१ व परिशिष्ट ३.२ मध्ये दिला आहे.

**तक्ता ३.२ क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व वास्तविक स्थूल राज्य उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

(टक्के)

| तपशील | वृद्धिदर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०+++ | २०२०-२१++ | २०२१-२२+ |
| **स्थूल राज्य उत्पन्न** | **६.१** | **६.९** | **६.३** | **७.२** | **९.२** | **४.५** | **३.६** | **२.४** | **(-)७.३** | **९.१** |
| **स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **६.०** | **६.८** | **६.२** | **६.७** | **८.९** | **४.३** | **३.४** | **२.९** | **(-)५.८** | **८.५** |
| **कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र** | **(-)०.४** | **१२.३** | **(-)१०.७** | **(-)३.७** | **२१.०** | **(-)०.७** | **(-)२.१** | **८.०** | **१३.०** | **११.४** |
| i) पीक | (-)१.८ | १८.६ | (-)१६.७ | (-)७.५ | २५.० | (-)५.१ | (-)७.६ | ७.६ | १७.२ | १५.८ |
| ii) पशुसंवर्धन | ३.८ | १.१ | ४.० | ४.८ | ११.५ | ८.५ | ७.८ | ४.४ | १०.५ | ४.१ |
| iii) वने व लाकूड तोडणी | ०.८ | (-)३.३ | २.८ | ३.४ | १८.० | ९.३ | ८.६ | १६.४ | ३.३ | ४.३ |
| iv) मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ०.९ | २.० | ७.० | (-)४.२ | २१.२ | (-)११.५ | (-)१०.६ | ७.८ | (-)६.४ | १३.२ |
| **उद्योग क्षेत्र** | **५.१** | **३.१** | **८.०** | **८.८** | **५.९** | **३.५** | **१.४** | **(-)५.३** | **(-)४.२** | **३.८** |
| i) खाण व दगड खाणकाम | ४.२ | (-)२५.४ | २३.६ | १०.८ | ३.१ | ७.१ | ३.८ | (-)३.० | ०.८ | ०.९ |
| ii) वस्तुनिर्माण | ८.२ | १०.० | ५.१ | १०.८ | ६.८ | २.६ | ०.५ | (-)७.५ | (-)५.७ | ४.२ |
| iii) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | ५.१ | (-)४.४ | १४.७ | ४.८ | ३.१ | १०.७ | १.१ | (-)२.१ | (-)३.६ | १२.५ |
| iv) बांधकाम | (-)३.८ | ३.८ | ७.९ | १.९ | ५.४ | २.० | ३.८ | ०.४ | (-)२.५ | १.३ |
| **सेवा क्षेत्र** | **८.३** | **८.१** | **९.१** | **७.४** | **८.७** | **५.८** | **५.७** | **६.८** | **(-)१०.०** | **१०.६** |
| i) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | ९.६ | १.३ | ६.१ | ५.५ | ९.५ | ७.१ | १०.६ | ५.२ | (-)२६.१ | १८.९ |
| ii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ८.३ | १२.२ | १०.८ | ८.१ | ८.० | ४.५ | ३.७ | ५.५ | (-)०.६ | ६.९ |
| iii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ६.३ | ७.३ | ८.६ | ८.२ | १०.० | ७.८ | ४.४ | १३.२ | (-)१२.९ | १२.० |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज

टीप : क्षेत्रनिहाय वृद्धिदर स्थूल राज्य मूल्यवृद्धिवर आधारित असून राज्याच्या अर्थव्यवस्थेचा वृद्धिदर स्थूल राज्य उत्पन्नावर आधारित आहे

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

३.४.२ सन २०२१-२२ मध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ११.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'पीक' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित मागील वर्षाच्या तुलनेत १५.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. अन्नधान्याच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत १.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. उसाच्या उत्पादनात देखील मागील वर्षाच्या तुलनेत २४.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. तसेच भाजीपाल्याच्या उत्पादनात मागील वर्षाच्या तुलनेत १५.३ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'पशुसंवर्धन' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित मागील वर्षाच्या तुलनेत ४.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वने व लाकूड तोडणी' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित मागील वर्षाच्या तुलनेत ४.३ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित १३.२ टक्के वाढ अपेक्षित आहे.

३.४.३ 'उद्योग' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित सन २०२१-२२ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ३.८ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वस्तुनिर्माण' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित ४.२ टक्के वाढ अपेक्षित आहे तर 'बांधकाम' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित १.३ टक्के वाढ अपेक्षित आहे.

३.४.४ 'सेवा' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित मागील वर्षाच्या तुलनेत १०.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित २५.२ टक्के तर 'वाहतूक, साठवण, दळणवळण व

प्रसारणासंबंधित सेवा' क्षेत्राच्या वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धित १०.६ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा' आणि 'सार्वजनिक प्रशासन व संरक्षण' क्षेत्रात अनुक्रमे ६.९ टक्के आणि १२.० टक्के वाढ अपेक्षित आहे.

आलेख ३.१ : स्थूल राज्य मूल्यवृद्धितील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा (२०११-१२ ते २०२१-२२)




## चालू मालिकेतील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा

३.५ सन २०११-१२ ते २०२१-२२ मध्ये अखिल भारताच्या सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात (पायाभूत वर्ष २०११-१२) राज्याचा सरासरी हिस्सा १४.० टक्के असून देशात सर्वाधिक आहे. तत्सम कालावधीत राज्याच्या सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धिमध्ये 'सेवा' क्षेत्राचा (५६.७ टक्के) सर्वाधिक सरासरी हिस्सा असून त्याखालोखाल 'उद्योग' (३१.२ टक्के) आणि 'कृषि व संलग्न कार्ये' (१२.१ टक्के) या क्षेत्रांचा हिस्सा आहे.

## राज्य उत्पन्न (सन २०२१-२२)

३.६ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार सन २०२१-२२ मधील सांकेतिक राज्य उत्पन्न म्हणजे 'चालू किंमतीनुसार निव्वळ राज्य उत्पन्न' ₹ २६,९०,५२५ कोटी अपेक्षित आहे तर दुसऱ्या सुधारित अंदाजांनुसार सन २०२०-२१ मधील सांकेतिक राज्य उत्पन्न ₹ २२,७७,२०८ कोटी अपेक्षित आहे.

३.६.१ पहिल्या सुधारित अंदाजांनुसार वास्तविक राज्य उत्पन्न म्हणजे 'स्थिर (२०११-१२) किंमतीनुसार निव्वळ राज्य उत्पन्न' सन २०२१-२२ मध्ये ₹ १७,३१,१८९ कोटी अपेक्षित असून ते मागील वर्षाच्या तुलनेत ९.१ टक्क्यांनी जास्त आहे. निव्वळ राज्य उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.३ व परिशिष्ट ३.४ मध्ये दिला आहे.

३.६.२ सन २०२१-२२ चे अंदाजित दरडोई राज्य उत्पन्न ₹ २,१५,२३३ असून सन २०२०-२१ मध्ये ते ₹ १,८३,७०४ होते.

आलेख ३.२ : राज्याचे व भारताचे दरडोई उत्पन्न




+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज
\+ पहिले सुधारित अंदाज * अस्थायी अंदाज

आलेख ३.३ : निवडक राज्यांचे व भारताचे दरडोई उत्पन्न (२०२१-२२)




## जिल्हा उत्पन्न (सन २०११-१२ ते २०२१-२२)

३.७ पायाभूत वर्ष (२००४-०५ वरुन २०११-१२) सुधारित झाल्याने कार्यपद्धती व परिभाषा यामध्ये बदल झाले. स्थूल जिल्हा मूल्यवृद्धिचे अंदाज तयार करण्यासाठी 'उत्पन्न स्रोत पद्धती' चा अवलंब करण्यात येत असून त्यास अंगभूत मर्यादा आहेत. वस्तू उत्पादन क्षेत्रांसाठी जिल्हास्तरीय माहिती उपलब्ध होते. परंतु इतर क्षेत्रांकरीता अनुरूप निर्देशकांचा वापर करुन जिल्ह्यांकरीता स्थूल राज्य मूल्यवृद्धिचे अंदाज विभागण्यात येतात. हे जिल्हास्तरीय अंदाज जिल्हा स्तरावरील अर्थव्यवस्थेची केवळ ढोबळमानाने कल्पना यावी यासाठी वापरले जाऊ शकतात. सांकेतिक व वास्तविक स्थूल जिल्हा उत्पन्न अंदाज व दरडोई जिल्हा उत्पन्न अंदाज (दरडोई सांकेतिक निव्वळ जिल्हा उत्पन्न) परिशिष्ट ३.९ मध्ये देण्यात आले आहेत.

# भारतीय अर्थव्यवस्था

## देशांतर्गत स्थूल उत्पन्न (सन २०२२-२३)

३.८ राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन यांनी प्रसिद्ध केलेल्या सन २०२२-२३ च्या पहिल्या पुर्वानुमानानुसार सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ २,७३,०७,७५१ कोटी अपेक्षित असून वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ १,५७,६०,३६३ कोटी अपेक्षित आहे. सन २०२२-२३ करीता वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वृद्धिदर ७.० टक्के अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' या क्षेत्रांच्या वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धित अनुक्रमे ३.५ टक्के, ४.१ टक्के व ९.१ टक्के वाढ अपेक्षित आहे. पहिल्या पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ करीता वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि, वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न व वास्तविक दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.३ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ३.३ पहिल्या पुर्वानुमानानुसार सन २०२२-२३ करीता वास्तविक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि, वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न व वास्तविक दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

| क्षेत्र | वृद्धिदर$ |
|---|---|
| (i) कृषि व संलग्न कार्ये (कृषि#, वने व मत्स्यव्यवसाय) | ३.५ |
| (ii) खाण व दगड खाणकाम | २.४ |
| (iii) वस्तुनिर्माण | १.६ |
| (iv) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | ९.० |
| (v) बांधकाम | ९.१ |
| (vi) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १३.७ |
| (vii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ६.४ |
| (viii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ७.९ |
| **देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि** | **६.७** |
| **देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **७.०** |
| **दरडोई देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **५.८** |

$ मागील वर्षाच्या अस्थायी अंदाजाच्या तुलनेत टक्केवारीतील बदल # पीक व पशुसंवर्धन समाविष्ट

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन यांची दि. ०६ जानेवारी, २०२३ रोजीची प्रेसनोट

## देशांतर्गत स्थूल उत्पन्न (सन २०२१-२२)

३.९ अस्थायी अंदाजांनुसार, सन २०२१-२२ मध्ये सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ २,३६,६४,६३७ कोटी अपेक्षित असून वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्न ₹ १,४७,३५,५१५ कोटी अपेक्षित आहे. वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नात सन २०२१-२२ मध्ये ८.७ टक्के वाढ अपेक्षित आहे. 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' क्षेत्रांच्या वास्तविक स्थूल मूल्यवृद्धित अनुक्रमे ३.० टक्के, १०.३ टक्के आणि ८.४ टक्के वाढ अपेक्षित आहे. क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल मूल्यवृद्धि व वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर तक्ता ३.४ मध्ये दिले आहेत. देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.५ व परिशिष्ट ३.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ३.४ क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल मूल्यवृद्धि व वास्तविक देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचे वार्षिक वृद्धिदर**

(टक्के)

| तपशील | वृद्धिदर | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९+++ | २०१९-२०++ | २०२०-२१+ | २०२१-२२* |
| **देशांतर्गत स्थूल उत्पन्न** | **५.५** | **६.४** | **७.४** | **८.०** | **८.३** | **६.८** | **६.५** | **३.७** | **(-)६.६** | **८.७** |
| **देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धि** | **५.४** | **६.१** | **७.२** | **८.०** | **८.०** | **६.२** | **५.८** | **३.८** | **(-)४.८** | **८.१** |
| **कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र** | **१.५** | **५.६** | **(-)०.२** | **०.६** | **६.८** | **६.६** | **२.१** | **५.५** | **३.३** | **३.०** |
| i) पीक | ०.२ | ५.४ | (-)३.७ | (-)२.९ | ५.३ | ५.४ | (-)२.४ | ५.५ | १.९ | उ.ना. |
| ii) पशुसंवर्धन | ५.२ | ५.६ | ७.४ | ७.५ | १०.० | ७.९ | ८.७ | ७.५ | ६.१ | उ.ना. |
| iii) वने व लाकूड तोडणी | ०.२ | ५.९ | १.९ | १.७ | ५.५ | ५.४ | ७.६ | ०.३ | ०.७ | उ.ना. |
| iv) मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | ४.९ | ७.२ | ७.५ | ९.७ | १०.४ | १५.२ | ८.५ | ४.४ | ६.० | उ.ना. |
| **उद्योग क्षेत्र** | **३.३** | **३.८** | **७.०** | **९.६** | **७.७** | **५.९** | **५.३** | **(-)१.४** | **(-)३.३** | **१०.३** |
| i) खाण व दगड खाणकाम | ०.६ | ०.२ | ९.७ | १०.१ | ९.८ | (-)५.६ | (-)०.८ | (-)१.५ | (-)८.६ | ११.५ |
| ii) वस्तुनिर्माण | ५.५ | ५.० | ७.९ | १३.१ | ७.९ | ७.५ | ५.४ | (-)२.९ | (-)०.६ | ९.९ |
| iii) वीज, वायू, पाणी पुरवठा व इतर उपयोगिता सेवा | २.७ | ४.२ | ७.२ | ४.७ | १०.० | १०.६ | ७.९ | २.२ | (-)३.६ | ७.५ |
| iv) बांधकाम | ०.३ | २.७ | ४.३ | ३.६ | ५.९ | ५.२ | ६.५ | १.२ | (-)७.३ | ११.५ |
| **सेवा क्षेत्र** | **८.३** | **७.७** | **९.८** | **९.४** | **८.५** | **६.३** | **७.२** | **६.३** | **(-)७.८** | **८.४** |
| i) व्यापार, दुरूस्ती, हॉटेल व उपाहारगृहे, वाहतूक, साठवण आणि दळणवळण व प्रसारणा संबंधित सेवा | ९.८ | ६.५ | ९.४ | १०.२ | ७.७ | १०.३ | ७.२ | ५.९ | (-)२०.२ | ११.१ |
| ii) वित्तीय, स्थावर मालमत्ता व व्यावसायिक सेवा | ९.७ | ११.२ | ११.० | १०.७ | ८.६ | १.८ | ७.० | ६.७ | २.२ | ४.२ |
| iii) सार्वजनिक प्रशासन, संरक्षण व इतर सेवा | ४.३ | ३.८ | ८.३ | ६.१ | ९.३ | ८.३ | ७.५ | ६.३ | (-)५.५ | १२.६ |

+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज * अस्थायी अंदाज उ.ना. उपलब्ध नाही

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

## चालू मालिकेतील क्षेत्रनिहाय सरासरी हिस्सा

३.१० चालू मालिकेत (पायाभूत वर्ष २०११-१२) सन २०११-१२ ते २०२१-२२ साठी 'कृषि व संलग्न कार्ये', 'उद्योग' व 'सेवा' या क्षेत्रांचा सांकेतिक देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धिमध्ये अनुक्रमे १८.४ टक्के, २९.६ टक्के व ५२.० टक्के सरासरी हिस्सा आहे.

**आलेख ३.४ : स्थूल राज्य उत्पन्न व देशांतर्गत स्थूल उत्पन्नातील वाढ**




+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज *अस्थायी अंदाज $ पूर्वानुमान

आलेख ३.५ : स्थूल राज्य मूल्यवृद्धि व देशांतर्गत स्थूल मूल्यवृद्धितील वाढ




+++ तिसरे सुधारित अंदाज ++ दुसरे सुधारित अंदाज + पहिले सुधारित अंदाज *अस्थायी अंदाज $ पूर्वानुमान

## राष्ट्रीय उत्पन्न (सन २०२१-२२)

३.११ सन २०२१-२२ मध्ये सांकेतिक स्थूल राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत १९.३ टक्के वाढीसह ₹ २,३२,९६,३४५ कोटी अंदाजित आहे. सांकेतिक निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत १९.४ टक्के वाढीसह सन २०२१-२२ मध्ये ₹ २,०५,२९,७२७ कोटी अपेक्षित आहे. वास्तविक स्थूल राष्ट्रीय उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ८.५ टक्के वाढीसह सन २०२१-२२ मध्ये ₹ १,४५,००,८१२ कोटी अंदाजित आहे. वास्तविक निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न सन २०२१-२२ मध्ये ₹ १,२५,१९,९७६ कोटी अंदाजित असून मागील वर्षाच्या तुलनेत ८.५ टक्क्यांनी जास्त आहे. देशांतर्गत निव्वळ उत्पन्नाचा तपशील परिशिष्ट ३.७ व परिशिष्ट ३.८ मध्ये दिला आहे.

३.११.१ दरडोई राष्ट्रीय उत्पन्न सन २०२१-२२ मध्ये ₹ १,५०,००७ अपेक्षित असून ते सन २०२०-२१ मध्ये ₹ १,२६,८५५ होते.

## जागतिक अर्थव्यवस्था

३.१२ संयुक्त राष्ट्रसंघाच्या 'वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट्स २०२३' या अहवालानुसार जागतिक स्थूल उत्पादनात सन २०२२ मधील ३.० टक्क्यांच्या तुलनेत सन २०२३ मध्ये १.९ टक्के वाढ अपेक्षित आहे. जागतिक स्थूल उत्पादन व स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील वाढ तक्ता ३.५ मध्ये दिली आहे.

**आलेख ३.६ : जागतिक स्थूल उत्पादनातील वाढ**




**तक्ता ३.५ जागतिक स्थूल उत्पादन व स्थूल देशांतर्गत उत्पन्नातील वाढ**

| तपशील | वार्षिक टक्केवारीतील बदल | | |
|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२^ | २०२३^^ |
| जग | ५.८ | ३.० | १.९ |
| विकसित अर्थव्यवस्था | ५.२ | २.६ | ०.४ |
| अमेरिकेची संयुक्त राज्ये | ५.७ | १.८ | ०.४ |
| जपान | १.७ | १.६ | १.५ |
| युरोपियन युनियन | ५.३ | ३.३ | ०.२ |
| संक्रमणशील अर्थव्यवस्था | ४.९ | (-)३.० | (-)०.८ |
| विकसनशील अर्थव्यवस्था | ६.७ | ३.९ | ३.९ |
| दक्षिण आशिया | ७.२ | ५.६ | ४.८ |
| भारत | ८.९ | ६.४ | ५.८ |
| पूर्व आशिया | ७.० | ३.२ | ४.४ |
| चीन | ८.१ | ३.० | ४.८ |
| अल्प विकसित देश | २.४ | ४.३ | ४.४ |

*आधार*: संयुक्त राष्ट्रसंघाचा 'वर्ल्ड इकॉनॉमिक सिच्युएशन ॲन्ड प्रॉस्पेक्ट्स २०२३' अहवाल ^ अंदाजित ^^ पूर्वानुमान

* * * * *

## परिशिष्ट ३.१
## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार)

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०+++ | २०२०-२१++ | २०२१-२२+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पीक | १,०१,९३० | १,१४,८०३ | १,५३,८२४ | १,४१,२३१ | १,३०,९११ | १,६३,९६० | १,८३,३१३ | २,३७,६२४ |
| २ | पशुसंवर्धन | २८,५५७ | ४४,१२० | ५१,३८३ | ५७,७४४ | ६०,२५१ | ६५,४५८ | ७६,८५६ | ८२,८६६ |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १६,६०१ | १७,२०१ | २४,२७९ | २८,२६४ | ३३,४४८ | ४०,०५२ | ४१,६७३ | ४८,६३३ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | २,९३९ | ४,७२९ | ६,२७४ | ६,२७८ | ५,४२९ | ५,९६४ | ६,३०० | ६,९७४ |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये (उप-बेरीज-१+२+३+४)** | **१,५०,०२७** *(१३.१)* | **१,८०,८५३** *(१०.५)* | **२,३५,७६०** *(१२.४)* | **२,३३,५१८** *(११.३)* | **२,३०,०४०** *(१०.४)* | **२,७५,४३३** *(११.७)* | **३,०८,१४२** *(१३.२)* | **३,७६,०९७** *(१३.६)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | ५६,४९३ | ५९,६१५ | ६०,२४७ | ६१,७६३ | ६५,३४४ | ६२,४५४ | ५८,६५७ | ६१,५१७ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **२,०६,५२०** | **२,४०,४६८** | **२,९६,००७** | **२,९५,२८१** | **२,९५,३८३** | **३,३७,८८७** | **३,६६,७९८** | **४,३७,६१४** |
| ८ | वस्तुनिर्माण | २,४६,०३२ | ३,७२,९१७ | ३,७७,०६९ | ४,०३,७२४ | ४,००,६८६ | ३,५२,१३५ | ३,५९,६५२ | ४,४७,३४१ |
| ९ | वीज, वायू, पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | २६,८०५ | ४१,३६० | ३९,६३७ | ५३,२०३ | ५६,०९० | ५४,९७४ | ५४,८६५ | ७३,२१३ |
| १० | बांधकाम | ८०,५५२ | १,००,४१० | १,०८,९८२ | १,१८,०९९ | १,३४,६७९ | १,३७,३६९ | १,३५,०२० | १,७६,८३१ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **३,५३,३८९** | **५,१४,६८७** | **५,२५,६८८** | **५,७५,०२६** | **५,९१,४५५** | **५,४४,४७८** | **५,४९,५३७** | **६,९७,३८५** |
| **१२** | **उद्योग (उप-बेरीज - ६+११)** | **४,०९,८८२** *(३५.८)* | **५,७४,३०२** *(३३.४)* | **५,८५,९३५** *(३०.७)* | **६,३६,७८९** *(३०.८)* | **६,५६,७९९** *(२९.६)* | **६,०६,९३२** *(२५.८)* | **६,०८,१९४** *(२६.१)* | **७,५८,९०२** *(२७.४)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | १,०५,६०९ | १,५६,१९३ | १,८३,२७५ | २,०६,०८३ | २,४०,१०७ | २,५८,७२७ | १,९९,७१८ | २,६३,०५३ |
| १४ | रेल्वे | ५,९८७ | ९,१५७ | ११,५१२ | १३,४५६ | १३,५१६ | १३,४७८ | १३,६३३ | १४,८३१ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | ४१,६९६ | ६१,४९० | ६५,४२२ | ७१,५२७ | ७४,८८२ | ७४,९८८ | ५८,७५३ | ६४,८७६ |
| १६ | साठवण | ९२५ | १,३०८ | १,३६४ | १,५१४ | ४,२५० | ४,४१२ | ४,४१६ | ५,४५९ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १५,८९२ | २९,०४१ | २८,९३२ | २८,३८७ | ३०,००४ | ३३,४८८ | ३६,३४५ | ४३,६८८ |
| १८ | वित्तीय सेवा | १,१७,८३६ | १,७८,२३९ | १,८७,७८२ | १,९७,७२१ | २,२७,०९५ | २,४७,६८८ | २,५७,४४३ | २,८०,९७४ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १,९०,८७० | ३,५१,६११ | ४,०४,०४१ | ४,४५,३१३ | ४,८८,६३६ | ५,३८,५९४ | ५,६२,७६७ | ६,३८,५४३ |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ३९,०७० | ५६,७८९ | ६३,५८५ | ७०,४७३ | ७६,६५५ | ९३,६८८ | ९६,५२८ | १,११,५७८ |
| २१ | इतर सेवा | ६६,६२५ | १,२१,५०४ | १,४०,८७८ | १,५९,६५१ | १,७४,७८४ | २,०३,७०७ | १,७९,८९९ | २,११,४३४ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र (उप-बेरीज - १३ ते २१)** | **५,८४,५०९** *(५१.१)* | **९,६५,३३३** *(५६.१)* | **१०,८६,७९०** *(५६.९)* | **११,९४,१२५** *(५७.८)* | **१३,२९,९२९** *(६०.०)* | **१४,६८,७७०** *(६२.५)* | **१४,०९,५०२** *(६०.६)* | **१६,३४,४३६** *(५९.०)* |
| **२३** | **एकूण स्थूल राज्य मूल्यवृद्धि (५+१२+२२)** | **११,४४,४१८** *(१००.०)* | **१७,२०,४८८** *(१००.०)* | **१९,०८,४८५** *(१००.०)* | **२०,६४,४३२** *(१००.०)* | **२२,१६,७६८** *(१००.०)* | **२३,५१,१३५** *(१००.०)* | **२३,२५,८३८** *(१००.०)* | **२७,६९,४३५** *(१००.०)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | १,६२,०८५ | २,७६,६८० | ३,१७,६७५ | ३,१५,२०० | ३,४१,६४२ | ३,३८,६८७ | ३,४६,१७५ | ३,८६,२८२ |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २६,१३४ | ३०,९४३ | २७,९७५ | २६,८५१ | २९,५५६ | ३२,४५१ | ४४,४७१ | ४७,६९५ |
| **२६** | **स्थूल राज्य उत्पन्न (२३+२४-२५)** | **१२,८०,३६९** | **१९,६६,२२५** | **२१,९८,१८५** | **२३,५२,७८२** | **२५,२८,८५४** | **२६,५७,३७१** | **२६,२७,५४२** | **३१,०८,०२२** |
| **२७** | **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न (₹)** | **१,१३,१९२** | **१,६६,३५१** | **१,८४,११३** | **१,९५,१९५** | **२,०७,८३३** | **२,१६,३६५** | **२,११,९६५** | **२,४८,६३२** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन    +++ तिसरे सुधारित अंदाज    ++ दुसरे सुधारित अंदाज    + पहिले सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे स्थूल मूल्यवृद्धिशी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

# परिशिष्ट ३.२

## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय वास्तविक स्थूल राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार वास्तविक स्थूल राज्य उत्पन्न (स्थिर (२०११-१२) किंमतींनुसार)

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०+++ | २०२०-२१++ | २०२१-२२+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पीक | १,०१,९३० | ९१,४२६ | १,१४,३१४ | १,०८,५०७ | १,००,२४७ | १,०७,८२९ | १,२६,३४७ | १,४६,२८२ |
| २ | पशुसंवर्धन | २८,५५७ | ३२,६४२ | ३६,३८८ | ३९,४७८ | ४२,५६७ | ४४,४६० | ४९,१२४ | ५१,१४४ |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १६,६०१ | १७,१८५ | २०,२७२ | २२,१६५ | २४,०६७ | २८,०१२ | २८,९४५ | ३०,१८४ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | २,९३९ | ३,१०३ | ३,७६२ | ३,३३० | २,९७८ | ३,२०९ | ३,००४ | ३,४०१ |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये** | **१,५०,०२७** | **१,४४,३५६** | **१,७४,७३५** | **१,७३,४८१** | **१,६९,८५९** | **१,८३,५१०** | **२,०७,४२०** | **२,३१,०११** |
| | **(उप-बेरीज-१+२+३+४)** | *(१००.०)* | *(९६.२)* | *(११६.५)* | *(११५.६)* | *(११३.२)* | *(१२२.३)* | *(१३८.३)* | *(१५४.०)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | ५६,४९३ | ६०,२०३ | ६२,०५३ | ६६,४४६ | ६८,९५० | ६६,९०७ | ६७,४५० | ६८,०५९ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **२,०६,५२०** | **२,०४,५५९** | **२,३६,७८८** | **२,३९,९२७** | **२,३८,८०९** | **२,५०,४१७** | **२,७४,८७०** | **२,९९,०७०** |
| ८ | वस्तुनिर्माण | २,४६,०३२ | ३,४०,८८२ | ३,६४,१६४ | ३,७३,६०२ | ३,७५,३८३ | ३,४७,२७७ | ३,२७,४२६ | ३,४१,१५५ |
| ९ | वीज, वायू , पाणीपुरवठा व इतर उपयोगिता सेवा | २६,८०५ | ३२,३६२ | ३३,३७२ | ३६,९३१ | ३७,३१९ | ३६,५१९ | ३५,१९६ | ३९,६०१ |
| १० | बांधकाम | ८०,५५२ | ८८,४७३ | ९३,२६१ | ९५,१३२ | ९८,७३१ | ९९,१५७ | ९६,६४६ | ९७,९४७ |
| **११** | **द्वितीय क्षेत्र (उप-बेरीज - ८+९+१०)** | **३,५३,३८९** | **४,६१,७१८** | **४,९०,७९७** | **५,०५,६६४** | **५,११,४३२** | **४,८२,९५४** | **४,५९,२६८** | **४,७८,७०४** |
| **१२** | **उद्योग** | **४,०९,८८२** | **५,२१,९२१** | **५,५२,८५०** | **५,७२,११०** | **५,८०,३८२** | **५,४९,८६१** | **५,२६,७१७** | **५,४६,७६३** |
| | **(उप-बेरीज - ६+११)** | *(१००.०)* | *(१२७.३)* | *(१३४.९)* | *(१३९.६)* | *(१४१.६)* | *(१३४.२)* | *(१२८.५)* | *(१३३.४)* |
| १३ | व्यापार, दुरूस्ती, हॉटेल्स व उपाहारगृहे | १,०५,६०९ | १,१९,४०६ | १,३४,०९९ | १,४५,०४७ | १,६४,१०७ | १,६९,३७२ | १,२१,८२८ | १,५२,५५६ |
| १४ | रेल्वे | ५,९८७ | ७,७९० | ८,८५७ | १०,१४४ | ९,९८९ | ८,१८८ | ६,६९२ | ७,७५२ |
| १५ | परिवहन (रेल्वे व्यतिरिक्त) | ४१,६९६ | ५८,५८१ | ६३,६७७ | ६९,१४९ | ७४,१०६ | ८२,३४६ | ५७,४४३ | ६२,२९३ |
| १६ | साठवण | ९२५ | १,०६१ | १,०६३ | १,१२६ | ३,००७ | ३,०२० | २,७९७ | ३,२७३ |
| १७ | दळणवळण व प्रसारणासंबंधित सेवा | १५,८९२ | २४,५९१ | २३,८०१ | २२,४८७ | २२,९०२ | २५,४४८ | २४,४६४ | २७,७२५ |
| १८ | वित्तीय सेवा | १,१७,८३६ | १,६५,११० | १,७४,२११ | १,७८,९७९ | १,८२,८२१ | १,८९,१७८ | १,९५,११० | २,०६,४५५ |
| १९ | स्थावर मालमत्ता, राहत्या घरांची मालकी व व्यावसायिक सेवा | १,९०,८७० | २,८४,००० | ३,१०,६२४ | ३,२७,६७३ | ३,४२,४१९ | ३,६४,९४८ | ३,५५,८४१ | ३,८२,४४२ |
| २० | सार्वजनिक प्रशासन व संरक्षण | ३९,०७० | ४३,९१८ | ४७,१८७ | ५०,२५८ | ५२,९७६ | ६१,९८९ | ५९,८६० | ६५,७६८ |
| २१ | इतर सेवा | ६६,६२५ | ९७,७५० | १,०८,७१४ | १,१७,७५१ | १,२२,४४२ | १,३६,५१७ | १,१३,०४४ | १,२७,९१५ |
| **२२** | **तृतीय / सेवा क्षेत्र** | **५,८४,५०९** | **८,०२,२०८** | **८,७२,२३४** | **९,२२,६१४** | **९,७४,७६९** | **१०,४१,००६** | **९,३७,०७९** | **१०,३६,१७९** |
| | **(उप-बेरीज - १३ ते २१)** | *(१००.०)* | *(१३७.२)* | *(१४९.२)* | *(१५७.८)* | *(१६६.८)* | *(१७८.१)* | *(१६०.३)* | *(१७७.३)* |
| **२३** | **एकूण स्थूल राज्य मूल्यवृद्धि** | **११,४४,४१८** | **१४,६८,४८५** | **१५,९९,८१९** | **१६,६८,२०५** | **१७,२५,०११** | **१७,७४,३७७** | **१६,७१,२१६** | **१८,१३,९५२** |
| | **(५+१२+२२)** | *(१००.०)* | *(१२८.३)* | *(१३९.८)* | *(१४५.८)* | *(१५०.७)* | *(१५५.०)* | *(१४६.०)* | *(१५८.५)* |
| २४ | उत्पादित वस्तू व सेवांवरील कर | १,६२,०८५ | २,१२,२१० | २,३०,६७८ | २,४२,१९८ | २,५५,३७० | २,५४,७७६ | २,१९,१०८ | २,४५,२५९ |
| २५ | वजा उत्पादित वस्तू व सेवांवरील अनुदान | २६,१३४ | २६,४११ | २३,४५१ | २१,६९७ | २३,००० | २४,४९१ | ३१,९५४ | ३१,२४० |
| **२६** | **स्थूल राज्य उत्पन्न (२३+२४-२५)** | **१२,८०,३६९** | **१६,५४,२८४** | **१८,०७,०४६** | **१८,८८,७०६** | **१९,५७,३८१** | **२०,०४,६६३** | **१८,५८,३७०** | **२०,२७,९७१** |
| **२७** | **दरडोई स्थूल राज्य उत्पन्न (₹)** | **१,१३,१९२** | **१,३९,९६०** | **१,५१,३५३** | **१,५६,६९४** | **१,६०,८६७** | **१,६३,२२१** | **१,४९,९१६** | **१,६२,२३१** |

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन  +++ तिसरे सुधारित अंदाज  ++ दुसरे सुधारित अंदाज  + पहिले सुधारित अंदाज

टीप - कंसातील आकडे स्तंभ (३) शी टक्केवारी दर्शवितात. आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत.

## परिशिष्ट ३.३

## मूळ किंमतींनुसार क्षेत्रनिहाय सांकेतिक निव्वळ राज्य मूल्यवृद्धि व बाजार किंमतींनुसार सांकेतिक निव्वळ राज्य उत्पन्न (चालू किंमतींनुसार)

(₹ कोटी)

| अ.क्र. | उद्योग | २०११-१२ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२०+++ | २०२०-२१++ | २०२१-२२+ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | पीक | ९६,१५३ | १,०५,६२० | १,४३,८९६ | १,३०,६१० | १,१९,४९८ | १,५१,५५८ | १,६९,६८३ | २,१९,९५६ |
| २ | पशुसंवर्धन | २८,१५३ | ४३,५९३ | ५०,८१३ | ५७,१२४ | ५९,५९२ | ६४,७८३ | ७६,०९९ | ८२,०५० |
| ३ | वने व लाकूड तोडणी | १६,४३५ | १७,०३९ | २४,०५४ | २७,९९६ | ३३,१४४ | ३९,६९९ | ४१,२९२ | ४८,१८८ |
| ४ | मत्स्यव्यवसाय व मत्स्यशेती | २,५९१ | ४,३०५ | ५,७५७ | ५,८२० | ५,०४४ | ५,५३९ | ५,८३६ | ६,४६० |
| **५** | **कृषि व संलग्न कार्ये (उप-बेरीज-१+२+३+४)** | **१,४३,३३१** *(१४.५)* | **१,७०,५५७** *(११.५)* | **२,२४,५२०** *(१३.५)* | **२,२१,५५०** *(१२.४)* | **२,१७,२७८** *(११.४)* | **२,६१,५७९** *(१२.९)* | **२,९२,९१०** *(१४.८)* | **३,५६,६५५** *(१५.२)* |
| ६ | खाण व दगड खाणकाम | ४९,६७४ | ५६,१९७ | ५७,७१९ | ५९,५१३ | ६२,७८८ | ५९,६०४ | ५५,४३१ | ५८,१३५ |
| **७** | **प्राथमिक क्षेत्र (उप-बेरीज - ५+६)** | **१,९३,००५** | **२,२६,७५५** | **२,८२,२३९** | **२,८१,०६३** | **२,८०,०६५** | **३,२१,१८३** | **३,४८,३४१** | **४,१४,७८९** |
| **(१) राज्याचा स्वत:चा कर महसूल (१ ते ११)** | **१,३६,६१६** | **१,६७,९४८** | **१,८७,५३८** | **१,८८,९७१** | **१,६४,२८०** | **२,२७,२३७** | **२,५६,५२६** |
| (१) राज्य वस्तू व सेवा कर | -- | ५०,०६३ | ८२,३५२ | ८२,६०२ | ६९,९४९ | १,०७,८०७ | १,१९,९०० |
| (२) विक्री, व्यापार इत्यादींवरील कर | ८१,१७४ | ५४,८९४ | ३५,७२५ | ३७,७८६ | ३३,१६० | ४५,००० | ५०,२०० |
| (३) मुद्रांक व नोंदणी शुल्क | २१,०१२ | २६,४४२ | २८,५४५ | २८,७०७ | २५,४२८ | २९,५०० | ३२,००० |
| (४) राज्य उत्पादन शुल्क | १२,२८८ | १३,४५० | १५,३२१ | १५,४२८ | १५,०८९ | १८,००० | २२,००० |
| (५) विजेवरील कर व शुल्क | ६,६७० | ७,३४५ | १०,०८५ | ९,६१९ | ८,३५४ | १०,४०४ | ११,४४४ |
| (६) वाहनांवरील कर | ६,७४१ | ८,६६५ | ८,६१३ | ८,४६७ | ६,६५५ | ९,१५० | १०,५०० |
| (७) जमीन महसूल | १,७९९ | २,३१० | २,०८८ | २,१५५ | २,०६३ | २,२०० | ४,००० |
| (८) उत्पन्न व खर्च यावरील इतर कर | २,३१२ | २,२०५ | २,५८३ | २,५०२ | २,४७४ | २,५०० | ३,०५० |
| (९) माल व प्रवासी कर | १,८७७ | ९८४ | ८३७ | ७७३ | १३ | १,६०० | १,७६० |
| (१०) विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क | २,७४३ | १,५९० | १,३८९ | ९३२ | १,०९५ | १,०७६ | १,६७१ |
| (११) कृषि उत्पन्नावरील कर | ० | नगण्य | नगण्य | ० | २ | ० | ० |
| **(२) करेतर महसूल (१ + २)** | **१२,७०९** | **१६,६८०** | **१५,८४४** | **१४,२९७** | **१५,९७५** | **१७,३०७** | **२७,१२८** |
| (१) व्याजाच्या जमा रकमा | ३,२५९ | ४,१६३ | ४,१९१ | ३,२७१ | २,२८६ | १,४५७ | २,८४३ |
| (२) इतर करेतर महसूल | ९,४५० | १२,५१७ | ११,६५२ | ११,०२६ | १३,६८९ | १५,८५० | २४,२८५ |
| **(३) केंद्रीय करांतील हिस्सा (१ ते ८)** | **३३,७१५** | **३७,२०३** | **४१,९५३** | **३६,१९७** | **३६,४७९** | **४८,२६१** | **५१,५८८** |
| (१) निगम कर | १०,७९० | ११,३८८ | १४,६२२ | १२,३५० | १०,९८० | १४,६०५ | १६,१०८ |
| (२) केंद्रीय वस्तू व सेवा कर | -- | ५२२ | १०,३७८ | १०,२७८ | १०,८९४ | १५,३२२ | १६,९३९ |
| (३) निगम करांव्यतिरिक्त इतर उत्पन्नावरील कर | ७,४९९ | ९,६१६ | १०,७६८ | ९,६७७ | ११,२५२ | १४,०६६ | १५,५५७ |
| (४) जकात | ४,६४२ | ३,७५३ | २,९८० | २,२९६ | १,९७० | २,३२५ | २,२३७ |
| (५) केंद्रीय उत्पादन शुल्क | ५,३०० | ३,९२३ | १,९८१ | १,५९६ | १,२३१ | ६७७ | ६९७ |
| (६) सेवा कर | ५,४५९ | ४,२४७ | ३९० | ० | १५२ | २६ | ५२ |
| (७) संपत्ती कर | २५ | नगण्य | ५ | १ | ० | १,२४१ | (-) १ |
| (८) एकात्मिक वस्तू व सेवा कर | -- | ३,७५४ | ८२८ | ० | ० | ० | ० |
| **(४) केंद्र शासनाकडून सहायक अनुदाने** | **२१,६५३** | **२१,८२३** | **३३,६६२** | **४३,७२५** | **५२,७३३** | **६९,३२७** | **६८,१८६** |
| **(ब) एकूण भांडवली जमा (१ + २ + ३ + ४)** | **५२,३००** | **४२,४५८** | **५०,६७८** | **८२,७१९** | **१,२३,७५४** | **१,३४,५२१** | **१,४५,१५०** |
| **(१) सरकारी ऋण लेख्यांकडून जमा (अ+ब)** | **४८,३३६** | **४९,६७०** | **२६,०२५** | **५७,१५३** | **१,१८,५१६** | **१,०४,३४५** | **१,२७,९३८** |
| (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | ४७,७१० | ४९,५०२ | २५,६८६ | ५६,२१७ | १,०३,५२० | ८७,७१८ | १,२२,४६८ |
| (ब) केंद्र सरकारकडून कर्जे व आगाऊ रकमा | ६२७ | १६८ | ३३९ | ९३७ | १४,९९६ | १६,६२७ | ५,४७० |
| ***(२) राज्य शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (वसुली)*** | **१,७४६** | **१,७७८** | **१,६०४** | **१,६१५** | **१,६१२** | **२,३३२** | **२,३७९** |
| ***(३) इतर भांडवली जमा (निव्वळ)*** ‡ | **०** | **०** | **०** | **(-) ९,०००** | **९,०००** | **०** | **०** |
| **(४) लोक लेखा (निव्वळ) (अ + ब + क + ड)** | **२,२१८** | **(-) ८,९९०** | **२३,०४९** | **३२,९५१** | **(-) ५,३७४** | **२७,८४४** | **१४,८३३** |
| (अ) अल्पबचत, भविष्य निर्वाह निधी इ. (निव्वळ) | १,१२४ | ५४७ | ४९२ | १,७६७ | ७४० | २,०६५ | २,०२७ |
| (ब) राखीव निधी (निव्वळ) (१ + २) | १०२ | (-) १९४ | (-) १,३५६ | ३,६१९ | ६०१ | (-) ७९४ | (-) ५७७ |
| (१) व्याजी | ३०२ | ४५ | (-) २८२ | ३,७८२ | ६५८ | (-) ५४४ | (-) १४७ |
| (२) बिनव्याजी | (-) २०० | (-) २३९ | (-) १,०७४ | (-) १६३ | (-) ५७ | (-) २५१ | (-) ४३० |
| (क) नागरी ठेवी (निव्वळ) (१ + २) | ६,८४० | ३,९३० | ४,३२३ | ५,२०४ | ६,००६ | (-) ७,९३४ | २,३२३ |
| (१) व्याजी | ३,२४० | ४,७१७ | ३,६३१ | ५,८८७ | ५,६७४ | (-) ९,४८३ | ५२४ |
| (२) बिनव्याजी | ३,६०० | (-) ७८७ | ६९२ | (-) ६८३ | ३३२ | १,५४९ | १,७९९ |
| (ड) इतर | (-) ५,८४९ | (-) १३,२७२ | १९,५९० | २२,३६२ | (-) १२,७२१ | ३४,५०७ | ११,०६० |
| **एकूण जमा (अ + ब)** | **२,५६,९९३** | **२,८६,१११** | **३,२९,६७४** | **३,६५,९०९** | **३,९३,२२२** | **४,९६,६५४** | **५,४८,५७८** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

‡ यात आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ५.३

## महसुली व भांडवली लेख्यावरील विकास व विकासेतर खर्चाचा तपशील

(₹ कोटी)

| | बाब (१) | २०१६-१७ (२) | २०१७-१८ (३) | २०१८-१९ (४) | २०१९-२० (५) | २०२०-२१ (६) | २०२१-२२# (७) | २०२२-२३## (८) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **(अ)** | **महसुली खर्च (१ + २)** | **२,१३,२२९** | **२,४१,५७१** | **२,६७,०२२** | **३,००,३०५** | **३,१०,६१०** | **३,९२,८५७** | **४,२७,७८०** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब + क)** | **१,४१,६१९** | **१,६३,०३६** | **१,८२,२५७** | **२,००,२५५** | **२,०६,७५६** | **२,६६,५०१** | **२,८३,५३३** |
| | **(अ) सामाजिक सेवा (१ ते ८)** | **९०,२८२** | **९३,०५४** | **१,०९,३९१** | **१,२२,९४७** | **१,२२,०२३** | **१,६७,५९३** | **१,८२,८२४** |
| | (१) शिक्षण, क्रिडा, कला व संस्कृती | ४५,३५८ | ४८,४७६ | ५०,९२२ | ६२,३५७ | ६२,२०९ | ७१,३३२ | ७९,९१३ |
| | (२) आरोग्य व कुटुंब कल्याण | १०,१२१ | ११,६०५ | ११,९६९ | १३,५७६ | १६,१०२ | २२,७३४ | १९,९२१ |
| | (३) पाणीपुरवठा व स्वच्छता, गृहनिर्माण आणि नगरविकास | १४,८६८ | १२,२१४ | १४,३७८ | १२,२०५ | १२,८९९ | २७,७८३ | ४२,०७० |
| | (४) माहिती व प्रसारण | ९४ | ७२ | १४२ | १३० | ८६ | २३६ | ३५३ |
| | (५) अ.जा., अ.ज. व इ.मा.व. यांचे कल्याण | ९,१८७ | १२,४३९ | १४,२३४ | १३,६५५ | १०,७३९ | २०,१९२ | २१,५१८ |
| | (६) कामगार व कामगार कल्याण | ८४५ | ८३४ | ८८३ | ९१४ | १,०७६ | १,७८२ | २,२७२ |
| | (७) समाज कल्याण व पोषण | ९,७०७ | ७,२९१ | १६,७२४ | १९,९९७ | १८,८६१ | २३,३१० | १६,४६३ |
| | (८) इतर | १०२ | १२३ | १४० | ११४ | ५२ | २२५ | ३१४ |
| | **(ब) आर्थिक सेवा (१ ते ९)** | **४३,८४३** | **५४,१८९** | **५२,७५९** | **५६,०४३** | **६४,३३६** | **७२,८७९** | **७२,५२२** |
| | (१) कृषि व संलग्न सेवा | १३,२४५ | २६,१३० | २०,०२० | २०,६६६ | ३१,८८८ | २१,४३१ | २१,८४० |
| | (२) ग्राम विकास | ७,०१८ | ६,५८९ | ६,९९७ | ८,२४० | ९,८४७ | १७,३५६ | १७,०२९ |
| | (३) विशेष क्षेत्र कार्यक्रम | (-) १ | १ | १ | १ | १ | १ | १ |
| | (४) पाटबंधारे व पूर नियंत्रण | २,५४४ | २,१५९ | १,८९८ | २,१७० | २,०४३ | २,४७५ | २,७४७ |
| | (५) ऊर्जा | ९,६११ | ८,९४६ | ११,१३५ | ११,२२१ | ९,८६५ | १२,३२२ | ९,११५ |
| | (६) उद्योग व खनिजे | ३,१०२ | २,४३९ | ३,५८० | ३,६७३ | २,६९७ | ५,९६४ | ४,४२१ |
| | (७) वाहतूक आणि दळणवळण | ६,१०६ | ५,४६१ | ६,३३८ | ७,१८५ | ५,१६० | ९,३५९ | ११,४९९ |
| | (८) विज्ञान, तंत्रज्ञान व पर्यावरण | २३७ | २२५ | २९७ | १८६ | २१५ | ५४५ | ९८२ |
| | (९) सर्वसाधारण आर्थिक सेवा | १,९८० | २,२४१ | २,४९४ | २,७०२ | २,६२१ | ३,४२५ | ४,८८८ |
| | **(क) स्थानिक स्वराज्य संस्था आणि पंचायत राज संस्था यांना सहायक अनुदाने व अंशदाने** | **७,४९५** | **१५,७९३** | **२०,१०७** | **२१,२६४** | **२०,३९६** | **२६,०२९** | **२८,१८७** |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब)** | **७१,६०९** | **७८,५३५** | **८४,७६५** | **१,००,०५०** | **१,०३,८५४** | **१,२६,३५६** | **१,४४,२४७** |
| | **(अ) सर्वसाधारण सेवा (१ ते ५)** | **४०,४७८** | **४२,४१६** | **४६,९४३** | **६२,४९०** | **६५,८८४** | **८०,०६९** | **९५,९८४** |
| | (१) राज्याची अंगे | १,८६५ | १,९९४ | २,२७२ | ४,३२२ | ३,३६० | ३,६८८ | ४,२४७ |
| | (२) आर्थिक सेवा | ३,०७० | २,७८४ | ३,०७० | ३,३६७ | ४,२७० | ५,१३३ | ४,२१४ |
| | (३) प्रशासकीय सेवा | १८,५४४ | १८,९२२ | २०,७६० | २६,८३१ | २५,७०५ | ३२,९२४ | ४१,६८१ |
| | (४) निवृत्ती वेतन आणि संकीर्ण सर्वसाधारण सेवा | १६,९९९ | १८,७१६ | २०,८४१ | २७,९७० | ३२,५५० | ३८,३२३ | ४५,८४२ |
| | (५) राखीव निधीकडे हस्तांतरण | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **(ब) व्याज प्रदाने व ऋण सेवा** | **३१,१३२** | **३६,११८** | **३७,८२१** | **३७,५६१** | **३७,९७०** | **४६,२८७** | **४८,२६३** |
| **(ब)** | **भांडवली खर्च (१ + २)** | **४३,६९३** | **४५,१९८** | **६५,२३९** | **७८,३६१** | **९१,११५** | **१,०३,७८१** | **१,२०,६२७** |
| **(१)** | **विकास खर्च (अ + ब)** | **३१,८०६** | **२७,८२१** | **३६,५९४** | **३८,३८५** | **३२,०२९** | **६०,६९०** | **६७,६२४** |
| | (अ) महसुली लेख्याबाहेरील भांडवली खर्च | २५,५२९ | २६,८४२ | ३५,०४९ | ३६,४१६ | २९,६८७ | ५७,७६१ | ६५,२१० |
| | (ब) राज्य शासनाने दिलेली कर्जे व आगाऊ रकमा | ६,२७७ | ९७९ | १,५४५ | १,९७० | २,३४२ | २,९२८ | २,४१४ |
| **(२)** | **विकासेतर खर्च (अ + ब + क)** | **११,८८७** | **१७,३७६** | **२८,६४५** | **३९,९७६** | **५९,०८७** | **४३,०९१** | **५३,००३** |
| | (अ) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण | १०,९१७ | १६,४२८ | २४,१९० | २३,६०७ | ५६,६१६ | ४१,८७६ | ५१,७०० |
| | (ब) केंद्र शासनाकडून घेतलेली कर्जे व आगाऊ रकमा | ९७० | ९४९ | ९२६ | १,०१९ | ९७१ | १,२१५ | १,३०३ |
| | (क) आकस्मिकता निधीकडे विनियोजन | ० | ० | ३,५२८ | १५,३५० | १,५०० | ० | ० |
| | **एकूण खर्च (अ + ब)** | **२,५६,९२२** | **२,८६,७६९** | **३,३२,२६०** | **३,७८,६६७** | **४,०१,७२५** | **४,९६,६३८** | **५,४८,४०८** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ५.४

## वर्षभरातील कर्जे व इतर दायित्वे

(₹ कोटी)

| | बाब | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२# | २०२२-२३## |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **(एक)** | **ऋण प्राप्ती (१ + २ + ३) (व्याजी)** | **४१,११६** | **३७,६०२** | **४,७४९** | **४३,९६३** | **६८,००१** | **५३,२९२** | **७७,३३९** |
| | १) राज्य शासनाचे देशांतर्गत ऋण (निव्वळ) | ३६,७९२ | ३३,०७४ | १,४९६ | ३२,६१० | ४६,९०४ | ४५,८४२ | ७०,७६८ |
| | २) केंद्र शासनाकडून कर्जे व आगाऊ रकमा (निव्वळ) | (-) ३४३ | (-) ७८१ | (-) ५८७ | (-) ८२ | १४,०२५ | १५,४११ | ४,१६८ |
| | ३) व्याजी बंधने (अ + ब + क) | ४,६६६ | ५,३०९ | ३,८४१ | ११,४३५ | ७,०७२ | (-) ७,९६१ | २,४०४ |
| | अ) भविष्य निर्वाह निधी (निव्वळ) | १,१२४ | ५४७ | ४९२ | १,७६६ | ७४० | २,०६५ | २,०२७ |
| | ब) राखीव निधी (निव्वळ) | ३०२ | ४५ | (-) २८२ | ३,७८२ | ६५८ | (-) ५४४ | (-) १४७ |
| | क) नागरी ठेवी (निव्वळ) | ३,२४० | ४,७१७ | ३,६३१ | ५,८८७ | ५,६७४ | (-) ९,४८३ | ५२४ |
| **(दोन)** | **ऋण प्राप्ती (१ + २) (बिनव्याजी)** | **(-) २,४४८** | **(-) १४,२९८** | **१९,२०८** | **१२,५१६** | **(-) ३,४४६** | **३५,८०६** | **१२,४२९** |
| | १) लोकलेख्यातील निव्वळ जमा @ | (-) २,४४८ | (-) १४,२९८ | १९,२०८ | २१,५१६ | (-) १२,४४६ | ३५,८०६ | १२,४२९ |
| | २) इतर भांडवली जमा (निव्वळ)$ | ० | ० | ० | (-) ९,००० | ९,००० | ० | ० |
| | **एकूण कर्जे व इतर दायित्वे (एक + दोन)** | **३८,६६७** | **२३,३०४** | **२३,९५७** | **५६,४७९** | **६४,५५५** | **८९,०९८** | **८९,७६८** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

@ लोकलेख्यातील निव्वळ जमेमध्ये राखीव निधी, ठेवी, निलंबन व संकीर्ण आणि वित्त प्रेषणे इ. बिनव्याजी बंधने यांचा समावेश आहे.

$ यामध्ये आंतरराज्यीय तडजोड (निव्वळ), आकस्मिकता निधीमध्ये केलेले विनियोजन (निव्वळ) आणि आकस्मिकता निधी (निव्वळ) यांचा समावेश आहे.

*आधार* - वित्त विभाग, महाराष्ट्र शासन

## परिशिष्ट ५.५

## शासनाच्या उपभोग्य बाबींवरील अंतिम खर्च व भांडवल निर्मितीवरील खर्च

(₹ कोटी)

| विवरण | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२# | २०२२-२३## |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. उपभोग्य बाबींवरील खर्च** | | | | | | | |
| १ कर्मचाऱ्यांची भरपाई (१.१ +१.२) | ४०,४४१ | ४५,६५६ | ४७,०९५ | ६३,१५३ | ६५,९३४ | ७८,४३१ | ९४,४२३ |
| १.१ वेतन आणि मजूरी | २४,७५१ | २६,७३३ | २८,१७५ | ३७,४२१ | ३५,९१२ | ४२,९५५ | ५१,८४० |
| १.२ निवृत्तीवेतन | १५,६९० | १८,९२३ | १८,९२० | २५,७३२ | ३०,०२२ | ३५,४७६ | ४२,५८३ |
| **२ वस्तू आणि सेवांची निव्वळ खरेदी (२.१ + २.२ - २.३)** | **१५,३८२** | **१४,३५३** | **१३,५९०** | **१८,४१७** | **१३,५०६** | **२५,३६४** | **१७,९२३** |
| २.१ खरेदी | १२,३८७ | १०,६६४ | १२,३८४ | १५,७७७ | १७,०५२ | २६,७४३ | २३,५५१ |
| २.२ देखभाल | ५,११२ | ५,८९६ | ६,३०६ | ७,२६४ | ३,५१५ | ६,२३० | ६,३१३ |
| २.३ विक्री | २,११७ | २,२०७ | ५,०९९ | ४,६२५ | ७,०६१ | ७,६१० | ११,९४२ |
| **एकूण उपभोग्य बाबींवरील खर्च** | **५५,८२४** | **६०,००९** | **६०,६८५** | **८१,५७०** | **७९,४४०** | **१,०३,७९५** | **१,१२,३४६** |
| **ब. भांडवल निर्मितीवरील खर्च** | | | | | | | |
| १. इमारती | १,९१८ | २,०४३ | ३,२१० | २,६२९ | २,७९७ | ७,८२४ | ८,८७१ |
| २. रस्ते व पूल | ४,९७९ | ६,११३ | ९,५१२ | ११,५६६ | ९,३९२ | १९,२३८ | १८,५४० |
| ३. इतर भांडवली खर्च@ | ७,९७५ | १०,२३३ | १०,२१९ | ७,१९४ | १२,३१२ | १७,४७९ | २०,५७८ |
| ४. दळणवळणाची साधनसामग्री | २५६ | १५१ | ९६ | ११२ | १०० | १८२ | २४३ |
| ५. यंत्रसामग्री आणि साधनसामग्री | १,१०५ | ९९८ | १,१७१ | १,३१९ | १,००३ | २,५०४ | २,५९५ |
| ६. लागवडीखालील मत्ता$ | ० | ४ | ४ | ५ | ६ | ९ | ६ |
| **७. एकूण नवीन भांडवल निर्मितीवरील खर्च (१ ते ६)** | **१६,२३४** | **१९,५४२** | **२४,२१३** | **२२,८२५** | **२५,६०९** | **४७,२३६** | **५०,८३५** |
| ८. साठ्यातील बदल | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **९. स्थूल भांडवल निर्मिती (७+८)** | **१६,२३७** | **१९,५४२** | **२४,२१३** | **२२,८२५** | **२५,६०९** | **४७,२३६** | **५०,८३५** |

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही. # सुधारित अंदाज ## अर्थसंकल्पीय अंदाज

@ सन २०१९-२० पासून यामध्ये संशोधन व विकास यावरील खर्च समाविष्ट आहे.

$ यामध्ये पशुधन समाविष्ट आहे.

*आधार* - अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

# ६
# संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार



# ६. संस्थांद्वारे वित्त पुरवठा व भांडवली बाजार

६.१ आर्थिक विकास हा मुख्यत्वे करून वित्तीय संस्था, वित्तीय बाजार आणि वित्तीय सेवा यांचा समावेश असलेल्या सुबध्द वित्तीय प्रणालीवर अवलंबून असतो. वित्तीय प्रणाली, उत्पादक हेतूने निधीची उलाढाल व प्रभावी वापर याद्वारे भांडवल निर्मितीस सहाय्य करून चांगल्या परताव्याचे आश्वासन देत असते. बँका, नॉन-बँकिंग वित्तीय कंपन्या, म्युच्युअल फंड, विमा कंपन्या, इत्यादी वित्तीय संस्था या वित्तीय संसाधनांची उलाढाल आणि मध्यम व दिर्घकालीन गुंतवणुकीत वित्तीय सेवा प्रदान करण्याचे प्रमुख स्त्रोत आहेत.

## बँकींग संस्था

६.२ बँकींग संस्थांमध्ये अनुसूचित वाणिज्यिक बँकांचे मोठ्या प्रमाणावर योगदान असून त्यांच्या कामाच्या स्वरूपावरून त्यांचे वर्गीकरण सार्वजनिक क्षेत्रातील बँका (स्टेट बँक ऑफ इंडिया व इतर राष्ट्रीयकृत बँका), प्रादेशिक ग्रामीण बँका, खाजगी बँका, विदेशी बँका, इत्यादी असे करण्यात आले आहे. राज्यात दि. ३१ मार्च, २०२२ रोजी एकूण १३,२२० अनुसूचित वाणिज्यिक बँकांची कार्यालये कार्यरत असून त्यापैकी २४ टक्के ग्रामीण भागात आणि २४ टक्के निम-नागरी भागातील आहेत. दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी राज्यात प्रति लाख लोकसंख्येमागे बँक कार्यालयांची संख्या १०.६६ होती तर आखिल भारत स्तरावर ती ११.०८ होती.

६.३ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी देशातील एकूण ठेवी आणि स्थूल कर्ज यामधे राज्याचा हिस्सा सर्वाधिक असून तो अनुक्रमे २१.० टक्के व २६.० टक्के आहे. दि. ३१ मार्च २०२२ पर्यंत, एकूण ठेवीत गतवर्षीच्या तुलनेत १४.६ टक्के वाढ झाली आहे. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांच्या दरडोई एकूण ठेवी व दरडोई स्थूल कर्ज दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी अनुक्रमे ₹ २,८३,३१३ व ₹ २,८०,९७९ होती तर अखिल भारतासाठी तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ १,२६,७१२ व ₹ ९४,७४७ होती. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.१ मध्ये दिले आहे, तर मालिका परिशिष्ट ६.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | ग्रामीण | | निम-नागरी | | नागरी | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| बँक कार्यालये (संख्या) | ३,१८६ | ३,१९९ | ३,१४६ | ३,१४२ | ६,८२८ | ६,८७९ | १३,१६० | १३,२२० |
| ठेवी (₹ '००० कोटी) | ९९.०६ | १०३.६८ | १९६.५५ | २०८.४० | २,७५७.८४ | ३,१८८.९० | ३,०५३.४५ | ३,५००.९८ |
| कर्जे (₹ '००० कोटी) | ६२.२९ | ६६.५६ | १११.४१ | १२५.३९ | २,७२२.०४ | २,९९०.९६ | २,८९५.७४ | ३,१८२.९१ |
| कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) | ६२.९ | ६४.२ | ५६.७ | ६०.२ | ९८.७ | ९३.८ | ९४.८ | ९०.९ |

*आधार* : भारतीय रिझर्व्ह बँक

६.४ दि. ३० सप्टेंबर, २०२२ रोजी प्रति लाख लोकसंख्येमागे एटीएम संख्या २३.२३ होती तर अखिल भारत स्तरावर ती १८.४४ होती. राज्यातील एकूण २९,२६९ एटीएमपैकी ६३.९ टक्के नागरी भागातील आहेत.

६.५ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्याचे कर्ज-ठेवी प्रमाण ९०.९ टक्के तर अखिल भारत स्तरावर ७१.९ टक्के होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील एकूण ठेवी व स्थूल कर्जांमध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा हिस्सा अनुक्रमे ५०.४ टक्के व ४३.९ टक्के आणि खाजगी बँकांचा हिस्सा अनुक्रमे ३७.८ टक्के व ४८.७ टक्के होता. बँक गट निहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे तक्ता ६.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.२ बँक गट निहाय राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्जे**

(दि. ३१ मार्च रोजी)

| बँक गट | बँक कार्यालये (संख्या) | | ठेवी (₹'००० कोटी) | | कर्जे (₹ '००० कोटी) | | कर्ज-ठेवी प्रमाण (टक्के) | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | ७,७६० | ७,५६४ | १,५४५.९९ | १,७६४.९२ | १,३७२.२७ | १,३९८.२१ | ८८.८ | ७९.२ |
| विदेशी बँका | ११७ | ११९ | ३३४.८५ | ३७४.३१ | १८०.६६ | २०४.८२ | ५४.० | ५४.७ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | ७३९ | ७४२ | १८.१६ | १९.७८ | १०.१२ | ११.७२ | ५५.७ | ५९.३ |
| खाजगी बँका | ३,९२६ | ४,०७० | १,१४०.४५ | १,३२४.१२ | १,३२०.४२ | १,५५१.९५ | ११५.८ | ११७.२ |
| लघु वित्त बँका | ६१८ | ६७१ | १३.९९ | १६.८९ | १२.२७ | १६.२१ | ८७.७ | ९६.० |
| **सर्व** | **१३,१६०** | **१३,२२०$** | **३,०५३.४४** | **३,५००.९८$** | **२,८९५.७४** | **३,१८२.९१** | **९४.८** | **९०.९** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक $ पेमेंट बँकेसह

**आलेख ६.१ : निवडक राज्यांकरिता अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील कर्ज ठेवी प्रमाण (दि. ३१ मार्च रोजी)**




६.६ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यातील एकूण ठेवींमध्ये चालू, बचत व मुदत ठेवींचा हिस्सा अनुक्रमे १५.० टक्के, २२.४ टक्के व ६२.६ टक्के होता. खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी तक्ता ६.३ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ६.३ खाते प्रकारानुसार राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी**

(दि. ३१ मार्च रोजी)

| खाते प्रकार | ठेवी (₹'००० कोटी) २०२१ | | | | २०२२ | | | | मागील वर्षाच्या तुलनेत एकूण ठेवींशी शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | ग्रामीण | निम-नागरी | नागरी | एकूण | |
| चालू | ५.१३ | १८.७१ | ४३५.१३ | ४५८.९७ | ५.७३ | २१.८० | ४९७.२४ | ५२४.७७ | १४.३ |
| बचत | ५१.९७ | ९२.४५ | ५४१.२७ | ६८५.६९ | ५५.८५ | ९९.११ | ६२९.०६ | ७८४.०१ | १४.३ |
| मुदत ठेवी | ४१.९६ | ८५.३९ | १,७८१.४५ | १,९०८.७८ | ४२.१० | ८७.५० | २,०६२.६० | २,१९२.१९ | १४.८ |
| **सर्व** | **९९.०६** | **१९६.५५** | **२,७५७.८४** | **३,०५३.४५** | **१०३.६८** | **२०८.४०** | **३,१८८.९०** | **३,५००.९७** | **१४.७** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

६.७ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी एकूण येणे एकूण येणे कर्जापैकी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडील येणे कर्ज ५१.८ टक्के तर त्या खालोखाल खाजगी बँकांकडील येणे कर्ज ३९.९ टक्के होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील एकूण येणे कर्जापैकी २२.६ टक्के येणे कर्ज वैयक्तिक कर्ज प्रकारातील होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्जे तक्ता ६.४ मध्ये दिले आहे. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील व्यवसाय गट निहाय येणे कर्ज तक्ता ६.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.४ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील येणे कर्ज**

(दि. ३१ मार्च रोजी)

| बँक गट | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | | मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | |
| सार्वजनिक क्षेत्रातील बँका | १,३७८.१५ | १,४०८.४१ | २.२ |
| विदेशी बँका | १६८.०० | १९५.२९ | १६.२ |
| प्रादेशिक ग्रामीण बँका | १०.१२ | ११.८३ | १६.९ |
| खाजगी बँका | ९३६.१३ | १,०८५.६० | १६.० |
| लघु वित्त बँका | १२.४० | १६.२८ | ३१.३ |
| **सर्व** | **२,५०४.८०** | **२,७१७.४१** | **८.५** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

**तक्ता ६.५ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांकडील व्यवसाय गट निहाय येणे कर्ज**

(दि. ३१ मार्च रोजी)

| व्यवसाय गट / कर्जाचा प्रकार | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | | मागील वर्षाच्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | |
| कृषि व संलग्न कार्ये | १०२.९० | १११.५५ | ८.४ |
| खाण व दगड खाणकाम | ३०.२९ | ३१.६२ | ४.४ |
| वस्तुनिर्माण | ४५४.३० | ४५१.०२ | (-)०.७ |
| वीज, वायू व पाणीपुरवठा | १२१.५७ | १२४.६१ | २.५ |
| बांधकाम | १९६.९१ | २०५.१५ | ४.२ |
| वाहतूक | ६३.४४ | ६३.८४ | ०.६ |
| व्यावसायिक व इतर सेवा | १८३.९१ | १९८.८० | ८.१ |
| व्यापार | २५२.५६ | २२७.४८ | (-)९.९ |
| वित्त पुरवठा | ५०६.२३ | ५८०.१५ | १४.६ |
| वैयक्तिक कर्जे | ५२५.३७ | ६१४.१७ | १६.९ |
| इतर | ६७.३२ | १०९.०२ | ६१.९ |
| **सर्व** | **२,५०४.८०** | **२,७१७.४१** | **८.५** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

६.८ भारतीय रिझर्व्ह बँकेने अनुसूचित वाणिज्यिक बँकांना त्यांच्या कर्जापैकी विनिर्दिष्ट हिस्सा प्राधान्य क्षेत्रासाठी देण्याचे निर्देश दिले आहेत. समाजातील वंचित घटकांना कर्ज उपलब्धतेची सुनिश्चिती करणे, अर्थव्यवस्थेतील रोजगार निर्मितीची उच्च क्षमता असलेल्या घटकांना पुरेशा प्रमाणात पतपुरवठा करणे आणि त्याद्वारे दारिद्र्य निर्मूलनास सहाय्य करणे, ही प्राधान्य क्षेत्राकरिता कर्ज देण्याची उद्दीष्टे आहेत. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी येणे कर्ज 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राकडून ४६.९ टक्के होते तर त्या खालोखाल 'सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम' क्षेत्राकडे (३७.९ टक्के) होते. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या अग्रिमांपैकी येणे कर्ज तक्ता ६.६ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता ६.६ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी प्राधान्य क्षेत्रास दिलेल्या अग्रिमांपैकी येणे कर्ज**

(दि. ३१ मार्च रोजी)

| प्राधान्य क्षेत्र | खाते संख्या ('०००) | | येणे कर्ज (₹ '००० कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२* | २०२१ | २०२२* |
| कृषि व संलग्न कार्ये | ७,५४२ | ८,०५७ | ५४८.७४ | ५८७.७६ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ३,९९४ | २,६८० | ४७१.५८ | ४७५.०३ |
| शिक्षण | १७३ | १६८ | ५.६१ | ५.५० |
| गृहनिर्माण | १,०२६ | १,०८५ | १५७.१२ | १५८.७० |
| निर्यात | ३ | २ | १६.७३ | १७.५३ |
| इतर | १,५६१ | १,७८५ | ३.६१ | ८.५४ |
| **सर्व** | **१४,२९९** | **१३,७७७** | **१,२०३.३९** | **१,२५३.०६** |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक

* अस्थायी

## वार्षिक कर्ज योजना

६.९ ग्रामीण भागाच्या आर्थिक विकासासाठी ग्राम स्तरापर्यंत बँकाकडून कर्ज उपलब्धता महत्वाची आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रत्येक गावात कर्ज सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी 'सेवा क्षेत्र पद्धत' तयार केली असून जिल्हा हा घटक निश्चित केला आहे. वार्षिक कर्ज आराखडा प्राधान्य व दुर्लक्षित क्षेत्रांना पुरेसा आणि वेळेत कर्जपुरवठा होत असल्याची सुनिश्चिती करतो. राज्यस्तरीय बँकर्स समितीची निमंत्रक बँक राज्याचा वार्षिक कर्ज योजना तयार करून संनियंत्रित करते. बँक ऑफ महाराष्ट्र या बँकेस राज्याची निमंत्रक बँक म्हणून घोषित केले आहे. सन २०२२-२३ साठी राज्याचा प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज योजना ₹ ५.२२ लाख कोटीची आहे. या कर्ज योजनेमध्ये 'कृषि व संलग्न कार्ये' क्षेत्राचा हिस्सा २४.१ टक्के आणि 'सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, खादी व ग्रामोद्योग' क्षेत्राचा हिस्सा ५४.५ टक्के आहे. वार्षिक कर्ज योजनाअंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरित केलेले कर्ज तक्ता ६.७ मध्ये तर जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना परिशिष्ट ६.२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.७ वार्षिक कर्ज आराखड्याअंतर्गत प्राधान्य क्षेत्रासाठी राज्यात वितरित केलेले कर्ज**

(₹'००० कोटी)

| प्राधान्य क्षेत्र | २०२१-२२ | | | २०२२-२३+ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाख) | लक्ष्य | साध्य | लाभधारक (लाख) |
| कृषि व संलग्न कार्ये | ११८.९२ | १०९.६८ | ७४.१३ | १२६.०६ | १०७.०८ | ६९.९६ |
| सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग, खादी व ग्रामोद्योग | २४९.१३ | २३७.०८ | ११.३० | २८४.५५ | २६७.०४ | ९.२६ |
| इतर | ९३.०२ | ७६.६१ | १८.६२ | १११.४६ | ४२.९४ | १३.८१ |
| **सर्व** | **४६१.०७** | **४२३.३७** | **१०४.०५** | **५२२.०७** | **४१७.०६** | **९३.०३** |

*आधार*: राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य + डिसेंबरपर्यंत

## सूक्ष्म वित्त पुरवठा

६.१० राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) यांचेमार्फत बेरोजगार किंवा अल्प उत्पन्न असलेल्या व्यक्तींना/गटांना सुक्ष्म वित्त पुरवठ्याद्वारे आर्थिक सेवा प्रदान केल्या जातात. यात कर्ज पुरवठ्यासह बचत, विमा, रक्कम हस्तांतरण, समुपदेशन, इत्यादी अशा विविध अन्य सेवांचा समावेश आहे. 'स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रम' हा नाबार्डचा सर्वात मोठा समुदाय आधारित सूक्ष्म वित्त पुरवठा उपक्रम आहे. 'स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रम' अंतर्गत राज्यातील स्वयंसहाय्य गटांच्या बचती, कर्जवाटप व थकीत कर्जे तक्ता ६.८ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ६.८ 'स्वयंसहाय्य गट बँक जोडणी कार्यक्रम' अंतर्गत राज्यातील स्वयंसहाय्य गटांच्या बचती, कर्ज वाटप व थकीत कर्जे**

(दि.३१ मार्च, २०२२ रोजी)

| बँक प्रकार | तपशील | एकूण स्वयंसहाय्य गट | | केवळ महिलांचे स्वयंसहाय्य गट | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | रक्कम (₹ कोटी) | संख्या | रक्कम (₹ कोटी) |
| सहकारी | बचत | ४,०४,१३९ | ४३०.११ | ३,६७,७५४ | ३७३.६३ |
| | कर्जवाटप | ४०,१७५ | २७८.७३ | ३२,५८५ | २७५.५८ |
| | थकीत कर्जे | २८,५६७ | २६९.५० | २७,८६५ | २६४.७४ |
| प्रादेशिक ग्रामीण | बचत | १,३०,५३४ | २३१.८० | १,१३,८७८ | १९०.१७ |
| | कर्जवाटप | २१,७४४ | ३७७.३३ | २१,७४४ | ३७७.३३ |
| | थकीत कर्जे | ४१,०१९ | ४४४.९७ | ४१,०१९ | ४४४.९७ |
| सार्वजनिक क्षेत्रातील वाणिज्यिक | बचत | ५,६७,४४५ | १,०२७.९७ | ४,२३,४२१ | ६४७.४१ |
| | कर्जवाटप | ६६,९१४ | ८८४.७६ | ५२,७९४ | ६९६.२९ |
| | थकीत कर्जे | १,४२,४७२ | १,४३५.०८ | १,१३,०२७ | १,१२५.८१ |
| खाजगी क्षेत्रातील वाणिज्यिक | बचत | २,३१,७२७ | १,०५२.८९ | २,२६,७६७ | १,०४४.६७ |
| | कर्जवाटप | ७६,३९६ | १,८८२.६४ | ७६,३४१ | १,८८१.४१ |
| | थकीत कर्जे | १,२५,३५५ | १,९०१.६१ | १,२३,९१६ | १,८९५.४८ |

*आधार* : नाबार्ड

## वित्तीय समावेश

६.११ दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटास वित्तीय सेवा उपलब्ध होणे आणि वेळेवर व पुरेशा प्रमाणात किफायतशीर वित्त पुरवठा मिळण्याची प्रक्रिया म्हणजे वित्तीय समावेश होय. प्रधानमंत्री जन-धन योजना हा वित्तीय समावेशाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. राज्यात, दि. १८ जानेवारी, २०२३ पर्यंत प्रधानमंत्री जन-धन योजनेअंतर्गत एकूण ३.२५ कोटी बँक खाती उघडण्यात आली असून त्यापैकी १.८२ कोटी (५६.० टक्के) खाती ग्रामीण / निम-नागरी भागातील होती व या सर्व खात्यांमध्ये एकूण ₹ ११,२४८.३४ कोटी रक्कम शिल्लक होती आणि सुमारे २.२२ कोटी 'रुपे कार्ड' चे वाटप झाले. राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशाअंतर्गत पुरविलेल्या बँकिंग सुविधा तपशील तक्ता ६.९ मध्ये दिला आहे व जिल्हा निहाय प्रधानमंत्री जन-धन योजनेचा तपशील परिशिष्ट ६.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.९ राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांनी वित्तीय समावेशाअंतर्गत पुरविलेल्या बँकिंग सुविधा**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२* |
|---|---|---|---|
| गावात असलेली बँकींग केंद्रे (संख्या) | ४१,७५४ | ६४,९६७ | १,०७,७१८ |
| किमान ठेव बचत बँक खाते | | | |
| संख्या ('०००) | ४१,५१६ | ४४,६५९ | ४५,१०४ |
| रक्कम (₹ कोटी) | ११,०१५.२० | १३,८०८.९० | १४,५८७.५० |
| ओव्हर ड्राफ्ट उचललेली रक्कम (₹ कोटी) | २६.६० | ५३.१० | ५१.६० |
| किसान क्रेडिट कार्ड | | | |
| संख्या ('०००) | ३,७२५ | ३,७३८ | ३,९१६ |
| येणे रक्कम (₹ कोटी) | ४०,८७४.१० | ४३,५२१.३० | ४८,६६८.१० |

*आधार :* भारतीय रिझर्व्ह बँक * अस्थायी

६.१२ प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा मुळ उद्देश पुनर्वित्त पुरवठयाच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य उपलब्ध करून लघु उद्योग क्षेत्र विकसित करणे आहे. या योजनेअंतर्गत बिगर शेती कार्य उत्पन्न निर्मितीत गुंतलेल्या सर्व सूक्ष्म व लघु उद्योगांना ₹ १० लाखापर्यंत सुलभ कर्ज देण्यात येते. या योजनेअंतर्गत लाभार्थी घटकांची विकास स्थिती/कर्ज निकड यानुसार कर्जाचे 'शिशु' (₹ ५०,००० पर्यंत), 'किशोर' (₹ ५०,००० ते ₹ ५ लाख) आणि 'तरुण' (₹ ५ लाख ते ₹ १० लाख) असे वर्गीकरण केले आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत प्रगती तक्ता ६.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१० प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत प्रगती**

(₹ कोटी)

| प्रकार | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| **शिशु** | | | |
| खाते संख्या | २६,३६,००१ | ३१,६९,२९८ | १४,५३,०२१ |
| मंजूर कर्जे | ६,८४६.४३ | ८,९०६.१८ | ४,२०२.५२ |
| वितरीत कर्जे | ६,८०३.५८ | ८,८८५.०१ | ४,१८२.९२ |
| **किशोर** | | | |
| खाते संख्या | ६,२७,१६९ | ६,८६,९५५ | ३,८१,८८५ |
| मंजूर कर्जे | ८,७११.१५ | ८,४७२.०० | ४,७०१.३२ |
| वितरीत कर्जे | ८,४४०.०१ | ८,३१२.७९ | ४,५२३.०२ |
| **तरुण** | | | |
| खाते संख्या | १,०२,०५५ | ८२,८५१ | ४८,६३४ |
| मंजूर कर्जे | ७,४७६.१० | ६,३५१.५५ | ४,००२.२२ |
| वितरीत कर्जे | ७,२०५.५५ | ६,१५४.५६ | ३,७७८.२४ |
| **सर्व** | | | |
| खाते संख्या | ३३,६५,२२५ | ३९,३९,१०४ | १८,८३,५४० |
| मंजूर कर्जे | २३,०३३.६८ | २३,७२९.७३ | १२,९०६.०६ |
| वितरीत कर्जे | २२,४४९.१४ | २३,३५२.३५ | १२,४८४.१८ |

*आधार* : राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य + सप्टेंबरपर्यंत

## ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी

६.१३ भारत सरकारने ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण करणाऱ्या, सुरू असलेल्या प्रकल्पांना वित्तीय सहाय्य पुरविण्यासाठी ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीची (ग्रापाविनि) स्थापना केली आहे. हा निधी राखण्याचे काम नाबार्डकडे आहे. या ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीचा मुख्य हेतू पायाभूत सुविधांबाबतचे सुरू असलेले प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी राज्य शासन तसेच राज्य शासनाची अंगीकृत महामंडळे यांना कर्ज उपलब्ध करून देणे हा आहे. या कार्यक्रमामध्ये ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, मृद संधारण, ग्रामीण बाजार पेठा, ग्रामीण आराग्य केंद्रे, प्राथमिक शाळा, अंगणवाडी व उर्जा संबंधीच्या कार्यक्रमांचा नव्याने समावेश करण्यात आला आहे. सद्यस्थितीत या निधीअंतर्गत कृषी व संलग्न कार्ये, सामाजिक आणि ग्रामीण क्षेत्र जोडणी यातील विस्तृत श्रेणीतील ३९ कार्यांचा समावेश करण्यात आला आहे. ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत मंजूर प्रकल्प व वितरित झालेले कर्ज तपशील तक्ता ६.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.११ ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधीअंतर्गत मंजूर प्रकल्प व वितरित झालेले कर्जे**

| टप्पे | वर्ष | सद्यस्थिती | मंजूर कर्ज (₹ कोटी) | वितरित कर्जे (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|
| I - XX | १९९५-२०१५ | पूर्ण | १०,६३०.६७ | ९,८८८.३३ |
| XXI - XXVI | २०१६-२०२१ | चालू | ८,४५७.६० | ५,८३६.१० |
| XXVII | २०२१-२०२२ | चालू | १,५१३.३० | ४५७.५४ |

*आधार* : नाबार्ड

## संयुक्त भांडवली संस्था

६.१४ संयुक्त भांडवली संस्था विविध पूरक उद्योग, व्यापार व व्यापार पूरक उद्योग यांना चालना देतात तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून देतात. राज्यात सन २०२१-२२ मध्ये ३१,१०७ नवीन संयुक्त भांडवली संस्थांची नोंदणी करण्यात आली असून त्यांचे एकूण भरणा केलेले अधिकृत भाग भांडवल ₹ १,१८,०९०.९६ कोटी होते. याच कालावधीत २७ संयुक्त भांडवली संस्था अवसानयात असून त्यांचे भरणा केलेले भाग भांडवल ₹ २८६.९३ कोटी होते. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी देशाअंतर्गत एकूण संयुक्त भांडवली संस्थांपैकी १९.६ टक्के संस्था राज्यात कार्यरत होत्या. तर एकूण भरणा केलेले भाग भांडवलामध्ये राज्यातील संस्थांचा हिस्सा २३.८ टक्के होता. संयुक्त भांडवली संस्था व त्यांचे भरणा केलेले भाग भांडवल तक्ता ६.१२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१२ संयुक्त भांडवली संस्था व त्यांचे भरणा केलेले भाग भांडवल**

(दि. ३१ डिसेंबर रोजी)

| बाब | महाराष्ट्र | | | | अखिल भारत | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था (संख्या) | | भरणा केलेले भाग भांडवल (₹ '००० कोटी) | | संस्था (संख्या) | | भरणा केलेले भाग भांडवल (₹ '००० कोटी) | |
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| खाजगी | २,६३,६२९ | २,७७,७०७ | ४१०.८७ | ४६९.६० | १३,७४,६२८ | १४,३५,०४१ | १,८२०.५३ | १,८९३.८७ |
| सार्वजनिक | १५,५९४ | १६,३८५ | ७३०.५४ | ८१७.९७ | ६९,९४४ | ७१,३०० | २,९९८.६६ | ३,२९६.४७ |
| **सर्व** | **२,७९,२२३** | **२,९४,०९२** | **१,१४१.४१** | **१,२८७.५७** | **१४,४४,५७२** | **१५,०६,३४१** | **४,८१९.१९** | **५,१९०.३४** |

*आधार* : मिनिस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स, केंद्र शासन

## भांडवली बाजार

६.१५ भांडवली बाजार ही बचतींना परिणामकारक दीर्घकालीन गुंतवणुकीकडे वळविणारी यंत्रणा आहे. राज्यात मुंबई शेअर बाजार मर्यादित व राष्ट्रीय शेअर बाजार मर्यादित हे प्रमुख शेअर बाजार कार्यरत आहेत. मुंबई शेअर बाजार मर्यादित हा जगातील सर्वात जुन्या शेअर बाजारांपैकी एक आहे तर राष्ट्रीय शेअर बाजार मर्यादित हा आधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञानात अव्वल असणाऱ्यांपैकी एक आहे.

६.१५.१ **प्राथमिक बाजार :** सन २०२१-२२ मध्ये राज्यात ५६ समभागांद्वारे (४१ सार्वजनिक, १५ हक्क) ₹ ३६,६४२ कोटी तर मागील वर्षी ३९ समभागांद्वारे (२८ सार्वजनिक, नऊ हक्क व दोन ऋण) ₹ ८६,४०६ कोटी रक्कम उभारण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर अखेर राज्यात ४४ समभागांद्वारे (२८ सार्वजनिक, १६ हक्क) ₹ २८,३८३ कोटी रक्कम उभारण्यात आली.

६.१५.२ **दुय्यम बाजार :** राष्ट्रीय शेअर बाजार व मुंबई शेअर बाजारात सन २०२१-२२ मध्ये उलाढालीसाठी उपलब्ध असलेल्या एकूण समभागांचे भांडवली मूल्य अनुक्रमे ₹ २६२.१९ लाख कोटी व ₹ २६४.०६ लाख कोटी होते. सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर अखेर तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ २८६.४३ लाख कोटी व ₹ २८८.५१ लाख कोटी होती. राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजार मर्यादित यांची उलाढाल तक्ता ६.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१३ राष्ट्रीय व मुंबई शेअर बाजार मर्यादित यांची उलाढाल**

(₹'००० कोटी)

| शेअर बाजार | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| राष्ट्रीय | १५,३९८ | १६,५६६ | ९,०९० |
| मुंबई | १,०४५ | १,३३८ | ७२५ |

*आधार* : सेबी + नोव्हेंबरपर्यंत

## विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र

६.१६ किरकोळ गुंतवणूकदारांच्या सहाय्यासाठी मल्टी कमोडिटी एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एमसीएक्स) व नॅशनल कमोडिटी अँड डेरिव्हेटिव्हज एक्स्चेंज लिमिटेड (एनसीडीईएक्स) ही मुख्य विक्रेय वस्तू विनिमय व्यापार केंद्रे राज्यात कार्यरत आहेत. एमसीएक्स व एनसीडीईएक्स यांची उलाढाल तक्ता ६.१४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१४ एमसीएक्स व एनसीडीईएक्स यांची उलाढाल**

| विक्रेय वस्तू व्यापार विनिमय केंद्र | समाविष्ट विक्रेय वस्तू (संख्या) | | | उलाढाल (₹ '००० कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| एमसीएक्स | २० | २६ | १८ | ८,२६५ | ८,७८२ | ९,१०७ |
| एनसीडीईएक्स | २६ | २५ | २४ | ३१९ | ४५७ | १३४ |

*आधार* : सेबी + नोव्हेंबरपर्यंत

## म्युच्युअल फंड

६.१७ म्युच्युअल फंड हे गुंतवणूकदारांची रक्कम एकत्रित करून समभाग, रोखे व इतर प्रतिभूतीमध्ये गुंतवणूक करणारे माध्यम आहे. सन २०२१-२२ मध्ये म्युच्युअल फंडा द्वारे देशात झालेल्या ₹ २,४६,७३० कोटी निव्वळ उलाढालीच्या तुलनेत राज्यात ₹ १३,७७२ कोटी उलाढाल झाली. सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर अखेर तत्सम आकडेवारी अनुक्रमे ₹ ७०,०५०.३० कोटी व ₹ (-) १४०.६० कोटी होती. म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल तक्ता ६.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ६.१५ म्युच्युअल फंडाद्वारे झालेली उलाढाल**

(₹ '००० कोटी)

| वर्ष | नवीन म्युच्युअल फंड | अस्तित्वातील म्युच्युअल फंड |
|---|---|---|
| २०२०-२१ | ४२.०४ | ८,५९७.१३ |
| २०२१-२२ | १०७.९० | ९,२०९.६१ |
| २०२२-२३+ | २६.४८ | ६,०४३.५६ |

*आधार :* असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंडस इन इंडिया + ऑक्टोबरपर्यंत

## विमा

६.१८.१ विविध आपत्कालीन परिस्थितीमुळे उद्भवणाऱ्या आर्थिक जोखमीपासून व्यक्तींचे संरक्षण करणारे विमा हे सर्वात प्रभावी जोखीम व्यवस्थापन साधन आहे. व्यक्ती व संस्थांना दुर्घटनांमुळे होणाऱ्या मालमत्ता व जीवित हानीच्या जोखमी पासून आर्थिक सुरक्षा देण्याव्यतिरिक्त, हे क्षेत्र बचत आणि गुंतवणुकीस प्रोत्साहित करते. त्यामुळे विकास कामासाठी लागणारा दीर्घकालीन निधी निर्माण होतो. राज्यात आयुर्विमा क्षेत्रात २४ कंपन्या कार्यरत आहेत. सन २०२१-२२ मध्ये राज्यातील एकूण आयुर्विमा व्यवसायामध्ये भारतीय आयुर्विमा महामंडळाचा हिस्सा ६४.२ टक्के होता तर तो मागीलवर्षी ६२.२ टक्के होता. नव्याने उतरवण्यात आलेल्या वैयक्तिक आयुर्विमा पॉलिसींचा तपशील तक्ता ६.१६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ६.१६ नव्याने उतरवण्यात आलेल्या वैयक्तिक आयुर्विमा पॉलिसींचा तपशील**

| तपशील | | संख्या ('०००) | | | विमा हप्ता (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
| **महाराष्ट्र** | खाजगी | १,२५९ | १,२०६ | १,१३३ | २५,०८७ | २७,०८१ | ३०,८२९ |
| | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २,३८० | १,९६१ | २,२४२ | ३८,५१३ | ४४,६०० | ५५,३०६ |
| | **एकूण** | **३,६३९** | **३,१६७** | **३,३७५** | **६३,६००** | **७१,६८१** | **८६,१३५** |
| **अखिल भारत** | खाजगी | ६,९५८ | ७,१५९ | ७,३९९ | ८०,८५१ | ९४,०४८ | १,१५,४२१ |
| | भारतीय आयुर्विमा महामंडळ | २१,९२५ | २१,००७ | २१,७५५ | १,७८,१५२ | १,८४,२९६ | १,९८,७८६ |
| | **एकूण** | **२८,८८३** | **२८,१६६** | **२९,१५४** | **२,५९,००३** | **२,७८,३४४** | **३,१४,२०७** |

*आधार :* विमा नियामक व विकास प्राधिकरण — टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

६.१८.२ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी बिगर-आयुर्विमा क्षेत्रामध्ये ३१ संस्था अखिल भारत स्तरावर कार्यरत होत्या. राज्यात मागील वर्षाच्या तुलनेत बिगर-आयुर्विमा क्षेत्रात १५.९ टक्के वाढ नोंदविण्यात आली. एकूण बिगर-आयुर्विमा क्षेत्राअंतर्गत आरोग्य विम्यापोटी सर्वाधिक (४५.० टक्के) व त्या खालोखाल मोटार विम्यापोटी (१८.० टक्के) विमा हप्ता जमा झाला. क्षेत्रनिहाय बिगर-आयुर्विम्याच्या विमा हप्त्याद्वारे प्राप्त झालेले एकूण उत्पन्न तक्ता ६.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ६.१७ क्षेत्रनिहाय बिगर-आयुर्विम्याच्या विमा हप्त्याद्वारे प्राप्त झालेले एकूण उत्पन्न**

(₹ कोटी)

| वर्ष | विमा | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | आग | मोटार | | वैयक्तिक अपघात | आरोग्य | पीक | संकीर्ण# | |
| | | स्वहानी | तृतीय पक्ष | | | | | |
| **महाराष्ट्र** | | | | | | | | |
| २०१९-२० | ३,७४२ | ३,९३१ | ६,१८९ | १,४०६ | १४,७८१ | ५,१५१ | ५,३११ | ४०,५११ |
| २०२०-२१ | ४,६६७ | ३,५३० | ५,३९५ | १,३६१ | १८,३५४ | ६,६३२ | ४,८६४ | ४४,८०३ |
| २०२१-२२ | ५,०४५ | ३,७८१ | ५,५७६ | २,१९५ | २३,३०१ | ५,५६१ | ६,५०० | ५१,९५९ |
| **अखिल भारत** | | | | | | | | |
| २०१९-२० | १५,७२८ | २६,५२४ | ४२,४२७ | ५,२०५ | ५०,७५८ | ३२,२७३ | १५,८५६ | १,८८,७७१ |
| २०२०-२१ | २०,११३ | २६,०६० | ४१,७३२ | ५,०८५ | ५८,२३८ | ३१,१२० | १६,२३० | १,९८,५७८ |
| २०२१-२२ | २१,५४८ | २७,१७३ | ४३,२६१ | ६,९०४ | ७३,०५२ | २९,४६५ | १९,२८१ | २,२०,६८४ |

*आधार :* विमा नियामक व विकास प्राधिकरण — # कर्ज,विदेशी वैद्यकीय, प्रवास, सागरी मालवाहतूक, एव्हिएशन, अभियांत्रिकी, इत्यादी समाविष्ट

* * * * *

## परिशिष्ट ६.१

## राज्यातील अनुसूचित वाणिज्यिक बँकांमधील ठेवी व कर्ज

(₹ कोटी)

| वर्ष | वर्षाच्या जून महिन्यातील अखेरच्या शुक्रवारची स्थिती | | | | | | एकूण ठेवी | एकूण कर्ज |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | | निमनागरी | | नागरी / महानगर | | | |
| | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | ठेवी | कर्ज | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १९७१ | उ ना. | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १,४६० | १,२९१† |
| १९८१ | ३०९ | २२६ | ७१४ | ३८४ | ६,५६८ | ५,३२१ | ७,५९० | ५,९३१ |
| १९९१ | १,७०१ | १,३५७ | २,३४७ | १,३५४ | ३६,१८१ | २६,९३६ | ४०,२३० | २९,६४७ |
| २००१ | ६,७६९ | ५,०२९ | १०,०३४ | ४,१३८ | १,५९,१९९ | १,३४,३४० | १,७६,००१ | १,४३,५०७ |
| २०११ | २९,२३१ | २२,७०३ | ४९,१७४ | २७,६०४ | १३,२५,५५० | ११,२५,७८० | १४,०३,९५५ | ११,७६,०८७ |
| २०१४# | ४८,११५ | ३९,००९ | ८५,३२२ | ५१,५१० | १९,१९,०९० | १७,२२,६०४ | २०,५२,५२७ | १८,१३,१२३ |
| २०१५# | ५६,२१४ | ४४,५७८ | ९५,६८८ | ६०,४७९ | १९,८१,८१५ | १८,७१,००० | २१,३३,७१८ | १९,७६,०५७ |
| २०१६# | ६१,८२४ | ५२,८१७ | १,०२,०२६ | ६७,६६० | २०,१३,७४६ | २१,१४,८२७ | २१,७७,५९६ | २२,३५,३०४ |
| २०१७# | ६३,५९७ | ४६,७४० | १,२८,१२३ | ७७,९२० | १९,७१,९३५ | २१,७४,९१९ | २१,६३,६५४ | २२,९९,५८० |
| २०१८# | ७०,१०४ | ४९,३८४ | १,३९,३१२ | ८४,८७५ | १९,५५,३२५ | २१,९६,३२२ | २२,८९,३०१ | २४,०४,७६६ |
| २०१९# | ७७,२७६ | ५२,२४२ | १,५६,९०० | ९२,२०५ | २३,१५,७६७ | २५,७०,३६२ | २५,४९,९४३ | २७,१४,८०९ |
| २०२०# | ९१,७०९ | ५३,९२९ | १,८३,७८० | ९६,४५९ | २४,७९,४७९ | २६,७५,८३३ | २७,५४,९६८ | २८,२६,२२० |
| २०२१# | ९९,०६२ | ६२,२९३ | १,९६,५५१ | १,११,४०८ | २७,५७,८४१ | २७,२२,०४१ | ३०,५३,४५४ | २८,९५,७४२ |
| २०२२# | १,०३,६८० | ६६,५५९ | २,०८,३९७ | १,२५,३८५ | ३१,८८,९०२ | २९,९०,९६२ | ३५,००,९७९ | ३१,८२,९०६ |

| वर्ष | दरडोई ठेवी (₹) | दरडोई कर्ज (₹) | एकूण बँक कार्यालयांची संख्या | | | दर लाख लोकसंख्येमागे बँकींग कार्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | ग्रामीण व निमनागरी | नागरी / महानगर क्षेत्रातील | एकूण | |
| (१) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) |
| १९७१ | २९० | २५६ | उ ना | उ ना | १,४७१ | २.९ |
| १९८१ | १,२०४ | ९४० | उ ना | उ ना | ३,६२७ | ५.८ |
| १९९१ | ५,३४४ | ३,५८० | ३,३५३ | २,२३८ | ५,५९१ | ७.४ |
| २००१ | १८,१०६ | १४,७६३ | ३,३८० | २,९१४ | ६,२९४ | ६.५ |
| २०११ | १,२४,०४८ | १,०३,९११ | ३,९०२ | ४,६१३ | ८,५१५ | ७.५ |
| २०१४# | १,७५,१४७ | १,५४,७१८ | ५,१६२ | ५,४७८ | १०,६४० | ९.१ |
| २०१५# | १,८१,९८८ | १,६८,५४१ | ५,५५५ | ५,७२९ | ११,२८४ | ९.६ |
| २०१६# | १,८१,३८३ | १,८६,१९० | ५,७५३ | ६,०३६ | ११,७८९ | ९.८ |
| २०१७# | १,७८,१०१ | १,८९,२८९ | ५,८२२ | ६,३६९ | १२,१९१ | १०.० |
| २०१८# | १,८६,२२३ | १,९५,६१९ | ५,९०८ | ६,४०९ | १२,३१७ | १०.० |
| २०१९# | २,०७,४२५ | २,२०,८३६ | ५,९९५ | ६,५०६ | १२,५०१ | १०.२ |
| २०२०# | २,२३,४३९ | २,२९,२१३ | ६,२६४ | ६,८५० | १३,११४ | १०.६ |
| २०२१# | २,४५,३८१ | २,३२,७०७ | ६,३३२ | ६,८२८ | १३,१६० | १०.६ |
| २०२२# | २,७८,९८० | २,५३,६३४ | ६,३४१ | ६,८७९ | १३,२२० | १०.५ |

*आधार* - भारतीय रिझर्व्ह बँक     # ३१ मार्च रोजी     उ ना   उपलब्ध नाही

† आकडे जून १९७१ च्या दुसऱ्या शुक्रवारचे आहेत.

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

# परिशिष्ट ६.२

## जिल्हानिहाय वार्षिक कर्ज योजना (२०२२-२३)

(₹ कोटी)

| अ. क्र. | जिल्हा | प्राधान्य क्षेत्र: कृषि व संलग्न कार्ये - एकूण कर्ज | प्राधान्य क्षेत्र: कृषि व संलग्न कार्ये - त्यापैकी, पीक कर्ज | प्राधान्य क्षेत्र: बिगर शेती क्षेत्र | प्राधान्य क्षेत्र: इतर प्राधान्य क्षेत्र | प्राधान्य क्षेत्र: एकूण | बिगर प्राधान्य क्षेत्र | एकूण योजना |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | मुंबई शहर | २०,२४० | ८८ | १,२५,३३५ | ३७,९३६ | १,८३,५१२ | १५,८७,७६७ | १७,७१,२७९ |
| २ | मुंबई उपनगर | ८,४९३ | ७ | ६६,९७२ | ३२,१३० | १,०७,५९५ | ३,५५,६६४ | ४,६३,२५९ |
| ३ | ठाणे | १,१६७ | २६७ | १५,४९९ | ३,६०० | २०,२६६ | ४०,७२७ | ६०,९९३ |
| ४ | पालघर | ७८४ | ३५९ | १,३९८ | १,१४९ | ३,३३१ | ३,५२४ | ६,८५५ |
| ५ | रायगड | ७७० | ३५० | २,११४ | १,७४२ | ४,६२६ | २,५८६ | ७,२१२ |
| ६ | रत्नागिरी | १,४७० | ८०१ | ६५० | १,३५० | ३,४७० | २८० | ३,७५० |
| ७ | सिंधुदुर्ग | ८०२ | ४०२ | ८२४ | २८० | १,९०६ | ९५ | २,००१ |
| ८ | नाशिक | ६,५९७ | ४,०१६ | ६,५२३ | ४,३२५ | १७,४४५ | ८,७५७ | २६,२०२ |
| ९ | धुळे | १,३९० | ८९१ | ५०० | ५०० | २,३९० | ३६१ | २,७५१ |
| १० | नंदुरबार | १,२६९ | ७५४ | २२३ | ३२० | १,८११ | ९२ | १,९०३ |
| ११ | जळगाव | ४,४५० | २,४४९ | २,८०० | ५०० | ७,७५० | १,२०० | ८,९५० |
| १२ | अहमदनगर | ९,०४९ | ६,८९० | २,२५१ | २,०४४ | १३,३४४ | १,८६६ | १५,२१० |
| १३ | पुणे | ८,९६५ | ४,००० | २८,५१३ | ७,२१५ | ४४,६९३ | ७३,०२३ | १,१७,७१६ |
| १४ | सातारा | ४,६०० | २,८०० | १,३५० | २,८०० | ८,७५० | १,२०० | ९,९५० |
| १५ | सांगली | ४,७९६ | २,८५० | १,४७९ | ५९० | ६,८६५ | २,२५५ | ९,१२० |
| १६ | सोलापूर | ५,२८० | ३,७७९ | २,१०० | ७०० | ८,०८० | १०० | ८,१८० |
| १७ | कोल्हापूर | ४,८८० | ३,००० | ४,३०० | १,६०० | १०,७८० | ७,२०० | १७,९८० |
| १८ | औरंगाबाद | ३,०८० | २,१०० | ३,१७५ | २,५५० | ८,८०५ | ६,५३३ | १५,३३८ |
| १९ | जालना | २,१०० | १,७०० | ७५० | ३०० | ३,१५० | २५० | ३,४०० |
| २० | परभणी | ३,०५५ | १,८२९ | १,४०९ | ३६२ | ४,८२६ | २०९ | ५,०३५ |
| २१ | हिंगोली | १,४६२ | १,२१२ | ४३८ | ३१५ | २,२१५ | ३४० | २,५५५ |
| २२ | बीड | २,८९१ | २,२०० | १,५२९ | ६५७ | ५,०७७ | १,००० | ६,०७७ |
| २३ | नांदेड | २,७८६ | २,१४५ | १,५६८ | ८९० | ५,२४४ | २,२०० | ७,४४४ |
| २४ | उस्मानाबाद | २,४५६ | १,९०० | ३०८ | ३६९ | ३,१३३ | ५१२ | ३,६४५ |
| २५ | लातूर | ३,४१४ | २,२११ | २,३२९ | ५९८ | ६,३४१ | ७१० | ७,०५१ |
| २६ | बुलढाणा | २,७०० | २,००० | ६०० | ७९५ | ४,०९५ | २९३ | ४,३८८ |
| २७ | अकोला | १,८०० | १,४०० | १,००० | ८५० | ३,६५० | ६३६ | ४,२८६ |
| २८ | वाशिम | १,५६६ | १,४०६ | १३० | २१० | १,९०६ | १०० | २,००६ |
| २९ | अमरावती | २,३५० | १,८५० | १,२५० | १,२०० | ४,८०० | ७०७ | ५,५०७ |
| ३० | यवतमाळ | २,५८२ | २,१३२ | ६०० | ७२० | ३,९०२ | ४५५ | ४,३५८ |
| ३१ | वर्धा | १,४५० | १,१७० | ५५० | ३४५ | २,३४५ | ५२५ | २,८७० |
| ३२ | नागपूर | ३,३०६ | २,०५६ | ३,८०० | १,१४५ | ८,२५१ | ८,४८५ | १६,७३६ |
| ३३ | भंडारा | ९९७ | ८०२ | ४१५ | ४५० | १,८६२ | २८५ | २,१४७ |
| ३४ | गोंदिया | ८५१ | ५२१ | ७१५ | २५० | १,८१६ | ३२० | २,१३६ |
| ३५ | चंद्रपूर | १,६९० | १,२९० | ८०० | ५७५ | ३,०६५ | ३२५ | ३,३९० |
| ३६ | गडचिरोली | ५२३ | ३७३ | ३५० | १०० | ९७३ | ३५० | १,३२३ |
| | **महाराष्ट्र राज्य** | **१,२६,०६१** | **६४,०००** | **२,८४,५४७** | **१,११,४६२** | **५,२२,०७०** | **२१,१०,९३२** | **२६,३३,००३** |

*आधार* - राज्यस्तरीय बँकर्स समिती, बँक ऑफ महाराष्ट्र

टीप - आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.

## परिशिष्ट ६.३
## जिल्हानिहाय प्रधान मंत्री जन-धन योजनेचा तपशील

(३० सप्टें.,२०२२ पर्यंत)

| अ. क्र. | जिल्हा | उघडण्यात आलेली एकूण खाती | देण्यात आलेली एकूण रुपे कार्ड | किमान शिलकीची मर्यादा नसलेली खाती | एकूण ठेवी (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | मुंबई शहर | ६,८९,३४९ | ५,४३,५१६ | १,१२,७२१ | २७९ |
| २ | मुंबई उपनगर | ७,०६,६८५ | ५,७८,११३ | ६९,०३४ | २८७ |
| ३ | ठाणे / पालघर | २१,३८,८३७ | १४,६६,९०९ | २,८८,२२२ | ७४८ |
| ४ | रायगड | ५,१७,६२३ | ३,५३,७०७ | ७७,५४७ | २४० |
| ५ | रत्नागिरी | ३,९६,७४९ | २,१०,२४९ | ३८,९०७ | २४० |
| ६ | सिंधुदुर्ग | २,१७,४४६ | १,२९,२५७ | १८,६५८ | १४१ |
| ७ | नाशिक | २०,९१,८९३ | १२,५७,०४२ | २,२०,४७० | ७८६ |
| ८ | धुळे | ७,२१,७६० | ५,०९,४३४ | ९४,२२२ | १५८ |
| ९ | नंदुरबार | ६,७३,८१७ | ४,९३,४०९ | ७९,३७५ | १२७ |
| १० | जळगाव | १३,५२,९५२ | ९,६९,८३५ | १,१५,४९९ | ३६६ |
| ११ | अहमदनगर | १४,८५,७५८ | १०,५१,२६३ | १,३७,७४८ | ५३९ |
| १२ | पुणे | १७,०६,३३७ | १०,९९,००० | २,६५,७५२ | ८५६ |
| १३ | सातारा | ७,९८,३४१ | ४,९४,१०२ | १,२०,४०७ | २४९ |
| १४ | सांगली | ७,८२,९४४ | ५,५९,९८२ | १,५७,८७२ | २१७ |
| १५ | सोलापूर | १५,६०,२७७ | ११,३६,७६१ | १,९६,३६० | ५२३ |
| १६ | कोल्हापूर | १२,३१,७८३ | ८,८५,९२८ | १,७०,५२० | ३९८ |
| १७ | औरंगाबाद | १३,५६,७८२ | ८,४३,७६८ | १,८१,४०१ | ३८९ |
| १८ | जालना | ८,०९,४६७ | ४,७२,२९३ | ८७,८६३ | १८३ |
| १९ | परभणी | ७,७३,६८३ | ५,०९,४९५ | १,०९,१२४ | २१४ |
| २० | हिंगोली | ५,९२,१४३ | ३,८४,१४२ | ८१,५६५ | १४४ |
| २१ | बीड | ११,९३,८९१ | ८,१३,२३७ | १,३०,५७५ | ४८० |
| २२ | नांदेड | १४,११,२९१ | ९,९३,१०१ | १,७४,५७३ | ३७४ |
| २३ | उस्मानाबाद | ६,९४,११३ | ४५८,६८४ | ९०,१३६ | ३२९ |
| २४ | लातूर | ८,९३,१७५ | ६,२७,००९ | १,२३,४२३ | २८५ |
| २५ | बुलढाणा | ८,५८,९१४ | ६,४७,४२५ | ६७,१९२ | १६८ |
| २६ | अकोला | ५,३७,९६७ | ३,६१,२४२ | ४७,६९५ | १२५ |
| २७ | वाशिम | ३,८६,८०८ | २,७१,३१३ | ३१,३९६ | ७२ |
| २८ | अमरावती | ८,०९,९२९ | ५,४०,३३० | ८७,७०६ | २२९ |
| २९ | यवतमाळ | १०,७९,२३० | ७,६७,०५३ | ९९,४५१ | २०१ |
| ३० | वर्धा | ३,४६,१२५ | २,४५,७६५ | ३३,३०३ | १४४ |
| ३१ | नागपूर | १२,०७,९१९ | ९,१९,३९४ | ८६,०१५ | ५१२ |
| ३२ | भंडारा | ४,४५,८३७ | ३,४०,२९८ | २३,९५७ | २०० |
| ३३ | गोंदिया | ६,००,०८१ | ४,००,८१० | ४१,१३४ | २२३ |
| ३४ | चंद्रपूर | ६,५०,३३८ | ४,५१,३२३ | ५६,६८१ | २४१ |
| ३५ | गडचिरोली | ३,०२,८३५ | २,१८,७१७ | २०,४१२ | १२७ |
| | **महाराष्ट्र राज्य** | **३,२०,२३,०७९** | **२,२०,०३,९०६** | **३७,३६,९१६** | **१०,७९४** |

*आधार* - बँक ऑफ महाराष्ट्र, राज्यस्तरीय बँकर्स समितीचे निमंत्रक

# ७
# कृषि व संलग्न कार्ये



# ७. कृषि व संलग्न कार्ये

७.१ कृषि व संलग्न कार्ये क्षेत्र अर्थव्यवस्थेतील प्रमुख क्षेत्रांपैकी एक असून त्याचा एकूण राज्य मूल्य वृद्धीत सरासरी १२.१ टक्के हिस्सा आहे. राज्यातील निम्म्यापेक्षा जास्त ग्रामीण लोकसंख्या त्यांच्या उपजीविकेसाठी शेती व संलग्न कार्यांवर अवलंबून आहे. या क्षेत्राला मदत करण्यासाठी शासन विविध योजना आणि कार्यक्रम राबवत आहे तसेच नैसर्गिक आपत्तींचा या क्षेत्रावर होणाऱ्या परिणामांचा सामना करण्यासाठी विविध उपाययोजना करीत आहे.

## कृषि

७.२ राज्याचा एक तृतीयांश भाग कमी आणि अनियमित पावसाच्या पर्जन्यछायेच्या क्षेत्रात येतो. राज्यातील निव्वळ पेरणी क्षेत्र एकूण भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे ५४ टक्के आहे. उपलब्ध संसाधनांचा इष्टतम उपयोग होण्याच्या दृष्टीने पीकांमध्ये विविधता आणणे व पीक पद्धतीमध्ये बदल करणे महत्वाचे आहे. संसाधनांचा शाश्वत वापर, पीक विविधतेला चालना देणे आणि बाजार, हवामान, क्रेडिट सुविधा आणि ई-कॉमर्सची माहिती शेतकऱ्यांना देणे यासाठी शासन प्रोत्साहन देत आहे.

७.३ भरडधान्ये (पौष्टिक तृणधान्ये) ही हवामान व दुष्काळ प्रतिकारक्षम पिके असल्याने कमी निविष्ठांसह प्रतिकुल हवामानात सहज वाढू शकतात. भरडधान्यांचा वापर वाढून मागणीत अधिक वाढ होण्यासाठी व्यापक प्रमाणात भरडधान्यांच्या वापराचा प्रचार केंद्रशासनाकडून विविध व्यासपीठांवरुन करण्यात येत आहे. याबाबत जनजागृती निर्माण व्हावी व भरडधान्यांचे उत्पादन आणि वापरात वाढ व्हावी या उद्देशाने केंद्र शासनाच्या प्रस्तावानुसार २०२३ हे वर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने 'आंतरराष्ट्रीय भरडधान्ये वर्ष' म्हणून घोषित केले आहे.

## मान्सून २०२२

७.४ राज्यात मान्सून पावसाचे आगमन दि. १० जून, २०२२ रोजी झाले. राज्यात सरासरीच्या तुलनेत माहे जूनमध्ये ७१.४ टक्के, जुलैत १४६.० टक्के, ऑगस्टमध्ये ९१.० टक्के, सप्टेंबरमध्ये १४१.६ टक्के आणि ऑक्टोबर मध्ये १९९.२ टक्के पाऊस पडला. मान्सून २०२२ मध्ये सरासरीच्या तुलनेत एकूण ११९.८ टक्के पाऊस पडला. राज्यातील मुंबई शहर आणि मुंबई उपनगर हे जिल्हे वगळता उर्वरित जिल्ह्यांतील एकूण ३५५ तालुक्यांपैकी २०४ तालुक्यांत अतिरिक्त पाऊस, १४५ तालुक्यांत सरासरी पाऊस आणि सहा तालुक्यांत अपुरा पाऊस पडला. पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण तक्ता ७.१ मध्ये दिले आहे. विभागनिहाय प्रत्यक्ष पडलेला पाऊस तक्ता ७.२ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.१ पडलेल्या पावसाच्या प्रमाणानुसार तालुक्यांचे वर्गीकरण**

| पावसाची वर्गवारी (सरासरीशी टक्केवारी) | तालुक्यांची संख्या# | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | जून | | जुलै | | ऑगस्ट | | सप्टेंबर | | ऑक्टोबर | |
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| १२० व अधिक | २३१ | ४२ | १७७ | २७९ | ३५ | ९९ | २९८ | २५० | १५० | ३०१ |
| १०० - १२० | ५८ | ४४ | ६४ | ४३ | २२ | ५२ | १३ | ५१ | ४६ | २७ |
| ८० - १०० | ३२ | ७० | ५७ | २५ | ४८ | ६१ | १३ | ३७ | ५४ | १३ |
| ६० - ८० | १७ | ७५ | ३९ | ६ | १०७ | ५२ | १९ | १४ | ४४ | ७ |
| ४० - ६० | १२ | ७६ | १५ | २ | ९१ | ५६ | ९ | ३ | ३१ | ४ |
| २० - ४० | ५ | ४४ | ३ | ० | ४६ | ३२ | ३ | ० | २३ | ३ |
| ० - २० | ० | ४ | ० | ० | ६ | ३ | ० | ० | ७ | ० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील तालुके वगळून

## तक्ता ७.२ विभागनिहाय प्रत्यक्ष पडलेला पाऊस

(मिमी)

| कालावधीतील पाऊस | | | विभाग | | | | | | महाराष्ट्र | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | कोकण# | नाशिक | पुणे | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | | |
| जून | | **सरासरी** | **६६२.५** | **१३९.७** | **१९८.६** | **१३४.०** | **१४७.६** | **१८७.१** | **२०७.६** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | ९५२.४ | १२६.६ | २३४.६ | २००.९ | २१२.७ | २३७.७ | २८२.७ | (१३६.२) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | ४५१.० | ११०.९ | ८४.९ | १३७.१ | १०६.८ | १२५.३ | १४८.२ | (७१.४) |
| जुलै | | **सरासरी** | **१,०६३.८** | **२१८.५** | **३२७.२** | **१८६.२** | **२३९.६** | **३६२.३** | **३३०.९** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | १,४२८.१ | १४६.० | ३७४.५ | २६५.० | २४७.५ | ३५९.२ | ४०१.० | (१२१.२) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | १,२१८.० | २८२.१ | ३४५.३ | ३५२.९ | ३९३.९ | ६८०.८ | ४८३.२ | (१४६.०) |
| ऑगस्ट | | **सरासरी** | **७६६.३** | **१९७.४** | **२४७.५** | **१९३.३** | **२३१.७** | **३४७.८** | **२८६.०** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | ३८५.० | १३६.३ | ८६.१ | १७४.२ | १६३.६ | १९२.८ | १७३.६ | (६०.७) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | ७३७.७ | १५८.३ | २३९.० | ९०.१ | १७९.० | ४१९.४ | २६०.४ | (९१.०) |
| सप्टेंबर | | **सरासरी** | **३७५.५** | **१५१.५** | **१७१.७** | **१६६.०** | **१३०.९** | **१७५.३** | **१७९.७** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | ७६०.१ | २६८.८ | १५२.९ | ३८०.४ | २८९.७ | ३२१.६ | ३३२.५ | (१८५.०) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | ५१५.२ | २३४.९ | २१५.२ | १९१.८ | २००.७ | ३०१.८ | २५४.५ | (१४१.६) |
| ऑक्टोबर | | **सरासरी** | **१०८.६** | **५३.१** | **९६.५** | **७१.३** | **५७.५** | **५३.४** | **७१.१** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | १०२.१ | ७४.९ | ८९.२ | ९१.९ | ८७.६ | ३४.० | ८१.० | (११३.९) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | १९४.१ | ११३.५ | २०६.५ | १४२.७ | १०५.७ | ८४.६ | १४१.६ | (१९९.२) |
| जून ते ऑक्टोबर | | **सरासरी** | **२,९७६.७** | **७६०.२** | **१,०४१.५** | **७५०.८** | **८०७.३** | **१,१२५.९** | **१,०७५.३** | |
| | २०२१ | प्रत्यक्ष | ३,६२७.७ | ७५२.६ | ९३७.३ | १,११२.४ | १,००१.१ | १,१४५.३ | १,२७०.८ | (११८.२) |
| | २०२२ | प्रत्यक्ष | ३,११६.० | ८९९.७ | १,०९०.९ | ९१४.६ | ९८६.१ | १,६११.९ | १,२८७.९ | (११९.८) |

टीप : कंसातील आकडे प्रत्यक्ष पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी दर्शवितात.

# मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हे वगळून

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

### आलेख ७.१ : राज्यात पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी



आलेख ७.२ : राज्यात पडलेल्या पावसाची सरासरी पावसाशी टक्केवारी (दशकातील)




आलेख ७.३: पडलेल्या पावसानुसार तालुक्यांची संख्या (सरासरीशी टक्केवारी)




## वहिती खातेदार

७.५ पहिली कृषिगणना १९७०-७१ मध्ये तर दहावी कृषिगणना २०१५-१६ मध्ये झाली. अकरावी कृषिगणना (२०२१-२२) दि.२८ जुलै, २०२२ रोजी सुरु करण्यात आली आहे. सन १९७०-७१ मध्ये असलेल्या ०.५० कोटी वहिती खातेदारांच्या संख्येत वाढ होऊन ती २०१५-१६ मध्ये १.५३ कोटी झाली. सन १९७०-७१ मध्ये एकूण वहिती क्षेत्र २.१२ कोटी हेक्टर होते व त्यात घट होऊन ते २०१५-१६ मध्ये २.०५ कोटी हेक्टर झाले. सन १९७०-७१ मधील वहिती खात्याच्या सरासरी क्षेत्र ४.२८ हेक्टर मध्ये घट होऊन २०१५-१६ मध्ये ते १.३४ हेक्टर झाले.

आलेख ७.४ : राज्यातील वहिती खातेदारांची संख्या व क्षेत्र




७.५.१ अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या वहिती खातेदारांचे सन १९९५-९६ मधील सरासरी वहिती क्षेत्र अनुक्रमे १.४७ हेक्टर आणि २.१५ हेक्टर होते व ते २०१५-१६ मध्ये अनुक्रमे १.२४ हेक्टर व १.७६ हेक्टर झाले. महिला वहिती खातेदारांचे प्रमाण १९९५-९६ मध्ये १२.९ टक्के असून सरासरी वहिती क्षेत्र १.५८ हेक्टर होते ते २०१५-१६ मध्ये १५.५ टक्के असून सरासरी वहिती क्षेत्र १.२२ हेक्टर होते. कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, एकूण वहिती क्षेत्र व सरासरी वहिती क्षेत्र परिशिष्ट ७.१ मध्ये दिले आहे. राज्यातील वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र तक्ता ७.३ मध्ये दिले आहे तर देशातील निवडक राज्यांमधील वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र तक्ता ७.४ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता ७.३ राज्यातील वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र**

| आकार वर्ग (हेक्टर) | वहिती खातेदाराची संख्या ('०००) | | वहिती क्षेत्र ('००० हेक्टर) | |
|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| अत्यल्प/सीमांतिक (१.० पर्यंत) | ६,७०९ | ७,८१६ | ३,१८६ | ३,४४९ |
| अल्प/लहान (१.० ते २.०) | ४,०५२ | ४,३३९ | ५,७३९ | ५,७७१ |
| निम-मध्यम (२.० ते ४.०) | २,१५९ | २,३२७ | ५,७६५ | ६,०२५ |
| मध्यम (४.० ते १०.०) | ७११ | ७३४ | ३,९९३ | ४,०९९ |
| मोठे (१०.० व अधिक) | ६८ | ६९ | १,०८४ | १,१६२ |
| **एकूण** | **१३,६९९** | **१५,२८५** | **१९,७६७** | **२०,५०६** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.४ निवडक राज्यांमधील वहिती खातेदारांची संख्या व वहिती क्षेत्र**

| राज्य | वहिती खातेदाराची संख्या ('०००) | | वहिती क्षेत्र ('००० हेक्टर) | | सरासरी वहिती क्षेत्र ( हेक्टर) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| आंध्र प्रदेश | ७,६२१ | ८,५२४ | ८,०९६ | ८,००४ | १.०६ | ०.९४ |
| गुजरात | ४,८८६ | ५,३२० | ९,८९८ | ९,९७८ | २.०३ | १.८८ |
| कर्नाटक | ७,८३२ | ८,६७७ | १२,१६१ | ११,७२४ | १.५५ | १.३५ |
| मध्य प्रदेश | ८,८७२ | १०,००४ | १५,८३६ | १५,६७१ | १.७८ | १.५७ |
| **महाराष्ट्र** | **१३,६९९** | **१५,२८५** | **१९,७६७** | **२०,५०६** | **१.४४** | **१.३४** |
| पंजाब | १,०५३ | १,०९२ | ३,९६७ | ३,९५३ | ३.७७ | ३.६२ |
| राजस्थान | ६,८८८ | ७,६५४ | २१,१३६ | २०,८७४ | ३.०७ | २.७३ |
| तामीळनाडू | ८,११८ | ७,९३८ | ६,४८८ | ५,९७१ | ०.८० | ०.७५ |
| तेलंगणा | ५,५५४ | ५,९४८ | ६,१९७ | ५,९७३ | १.१२ | १.०० |
| उत्तर प्रदेश | २३,३२५ | २३,८२२ | १७,६२२ | १७,४५१ | ०.७६ | ०.७३ |
| **अखिल भारत** | **१,३८,३४८** | **१,४६,४५४** | **१,५९,५९२** | **१,५७,८१७** | **१.१५** | **१.०८** |

*आधार* : कृषि गणना, केंद्र शासन

## नैसर्गिक आपत्तीकरीता नुकसान भरपाई

७.६ माहे नोव्हेंबर २०२१ ते मे २०२२ दरम्यान राज्यात अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे सुमारे २.७१ लाख हेक्टर क्षेत्र बाधित असून सुमारे १.३३ लाख हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १३०.८८ कोटी रुपयांची भरपाई शासनाने मंजूर केली आहे. माहे जून ते ऑक्टोबर, २०२२ या कालावधीत अतिवृष्टी/पूर/सततचा पाऊस व शंखी गोगलगायीच्या प्रादुर्भावामुळे झालेल्या शेतीपिकांच्या व इतर नुकसानीसाठी बाधित क्षेत्राकरीता माहे ऑगस्ट, २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंत ₹ ७,१३३.१९ कोटी मदत शासनाने मंजूर केली.

## जमिनीचा वापर

७.७ सन २०२१-२२ च्या जमीन वापराच्या आकडेवारी नुसार राज्याच्या एकूण ३०७.५८ लाख हेक्टर भौगोलिक क्षेत्रापैकी एकूण पिकांखालील स्थूल क्षेत्र २४१.४९ लाख हेक्टर तर पिकांखालील निव्वळ पेरणी क्षेत्र १६५.९० लाख हेक्टर (सुमारे ५३.९ टक्के) होते. राज्यातील जमीनीच्या वापराची आकडेवारी परिशिष्ट ७.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.५: राज्यातील जमिनीचा वापर २०२१-२२**



## कृषि उत्पादन

७.८.१ **खरीप पिके:** राज्यात सन २०२२-२३ च्या खरीप हंगामात १५७.९७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली तर मागील वर्षी १६३.७९ लाख हेक्टर पेरणी क्षेत्र होते. मागील वर्षाच्या तुलनेत तेलबिया पिकाखालील क्षेत्रात वाढ अपेक्षित असून तृणधान्ये, कडधान्ये, कापूस आणि ऊस पिकाखालील क्षेत्रात घट अपेक्षित आहे. प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र आणि उत्पादन तक्ता ७.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.५ प्रमुख खरीप पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०२१-२२ | २०२२-२३ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| तांदूळ | १,४७३ | १,५५५ | ६ | ३,१३३ | ३,४८१ | ११ |
| ज्वारी | ३३९ | १४३ | (-)५८ | २६२ | १४० | (-)४७ |
| बाजरी | ६४५ | ४०८ | (-)३७ | ६०० | ४४७ | (-)२५ |
| नाचणी | ८१ | ६९ | (-)१६ | १०३ | ९६ | (-)७ |
| मका | ८११ | ८८१ | ९ | २,१८६ | २,७१९ | २४ |
| इतर तृणधान्ये | ४४ | ४१ | (-)७ | १७ | २१ | १९ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,३९३** | **३,०९५** | **(-)९** | **६,३०१** | **६,९०४** | **१०** |
| तूर | १,४१९ | १,१७६ | (-)१७ | १,६५० | ८४९ | (-)४९ |
| मूग | ४१५ | २७० | (-)३५ | २०५ | १७१ | (-)१७ |
| उडीद | ३८० | ३५८ | (-)६ | १८४ | २२६ | २३ |
| इतर कडधान्ये | ७९ | ८१ | ३ | ६८ | ७५ | १० |
| **एकूण कडधान्ये** | **२,२९२** | **१,८८४** | **(-)१८** | **२,१०६** | **१,३२०** | **(-)३७** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,६८६** | **४,९८०** | **(-)१२** | **८,४०७** | **८,२२४** | **(-)२** |
| सोयाबीन | ४,५२६ | ४,९१० | ८ | ५,४४७ | ६,५८५ | २१ |
| भूईमूग | २३२ | १६१ | (-)३१ | २६९ | १८९ | (-)३० |
| तीळ | १७ | ६ | (-)६६ | ३ | २ | (-)४६ |
| कारळ | ६ | ५ | (-)८ | १ | १ | ४९ |
| सुर्यफूल | ११ | १६ | ५१ | ५ | ७ | ४९ |
| इतर तेलबिया | ३ | ३ | ५ | १ | १ | २० |
| **एकूण तेलबिया** | **४,७९४** | **५,१०१** | **६** | **५,७२५** | **६,७८५** | **१९** |
| कापूस (रुई)@ | ४,४१० | ४,२२९ | (-)४ | ७,७९१ | ८,१९२ | ५ |
| ऊस ** | १,४८९ | १,४८८ | (-)० | १,३९,१५९ | १,४४,५१८ | ४ |
| **एकूण** | **१६,३७९** | **१५,७९७** | (-)४ | - | - | - |

@ १७० किलोची एक गासडी याप्रमाणे कापसाचे उत्पादन '००० गासड्यांमध्ये ** तोडणी क्षेत्र # परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : i) सन २०२१-२२ ची आकडेवारी अंतिम पुर्वानुमानावर व २०२२-२३ ची आकडेवारी व्दितीय पुर्वानुमानावर आधारीत आहे.

ii) आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.८.२ **रब्बी पिके:** सन २०२२-२३ या रब्बी हंगामात राज्यात ५७.७४ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी पूर्ण करण्यात आली तर मागील वर्षी ६०.१० लाख हेक्टर पेरणी क्षेत्र होते. मागील वर्षाच्या तुलनेत तेलबिया व कडधान्ये पिकांखालील क्षेत्रात वाढ तर तृणधान्ये पिकांखालील क्षेत्रात घट अपेक्षित आहे. प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.६ प्रमुख रब्बी पिकांचे क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३ (अस्थायी) | शेकडा बदल# | २०२१-२२ | २०२२-२३ (अस्थायी) | शेकडा बदल# |
| ज्वारी | १,९३५ | १,२८९ | (-)३३ | १,८७८ | १,४०६ | (-)२५ |
| गहू | १,१३२ | १,०७१ | (-)५ | २,१४४ | २,१८४ | २ |
| मका | ३६७ | ३६६ | ० | १२८५ | १,०१४ | (-)२१ |
| इतर तृणधान्ये | ११ | ९ | (-)१७ | ४ | ४ | (-)१३ |
| **एकूण तृणधान्ये** | **३,४४५** | **२,७३६** | **(-)२१** | **५,३१२** | **४,६०८** | (-)१३ |
| हरभरा | २,३७२ | २,८३० | १९ | २,७१५ | ३,६३९ | ३४ |
| इतर कडधान्ये | १२९ | १४३ | ११ | ५८ | ८६ | ४८ |
| **एकूण कडधान्ये** | **२,५०१** | **२,९७३** | **१९** | **२,७७३** | **३,७२५** | **३४** |
| **एकूण अन्नधान्ये** | **५,९४६** | **५,७०९** | (-)४ | **८,०८६** | **८,३३३** | **३** |
| तीळ | २ | १ | (-)३५ | १ | १ | (-)६६ |
| करडई | २८ | २९ | ७ | २१ | १८ | (-)१३ |
| सुर्यफूल | ४ | ७ | ७७ | ४ | ४ | (-)१ |
| जवस | ६ | ६ | (-)११ | ३ | २ | (-)१८ |
| सरसू व मोहरी | २३ | २१ | (-)९ | ९ | ८ | (-)१० |
| **एकूण तेलबिया** | **६४** | **६५** | **२** | **३८** | **३३** | (-)१३ |
| **एकूण** | **६,०१०** | **५,७७४** | (-)४ | - | - | - |

# परिगणना प्रत्यक्ष आकडेवारीवर आधारित

टीप : i) सन २०२१-२२ ची आकडेवारी अंतिम पुर्वानुमानावर व २०२२-२३ ची आकडेवारी द्वितीय पुर्वानुमानावर आधारीत आहे

ii) आकडेवारी संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.८.३ **उन्हाळी पिके:** सन २०२१-२२ च्या उन्हाळी हंगामामध्ये ४.१७ लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली होती. सन २०२२-२३ च्या उन्हाळी हंगामासाठी ४.२१ लाख हेक्टर क्षेत्र पेरणीचा लक्ष्यांक निर्धारित करण्यात आला आहे.

७.८.४ मागील सहा दशकांमध्ये राज्यात पीक उत्पादनात लक्षणीय वाढ झालेली आहे. राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता यांची समय मालिका परिशिष्ट ७.३ मध्ये दिली आहे. निवडक राज्यांतील निवडक पिकांची त्रैवार्षिक सरासरी उत्पादकता तक्ता ७.७ मध्ये दिली आहे.

**आलेख ७.६: पिकांखालील क्षेत्र**



**आलेख ७.७: राज्यातील प्रति हेक्टर उत्पादकता**




**आलेख ७.८: राज्यातील ऊस (तोडणी क्षेत्र) प्रति हेक्टर उत्पादकता**




**आलेख ७.९: राज्यातील कापूस प्रति हेक्टर उत्पादकता**




**तक्ता ७.७ निवडक राज्यांतील निवडक पिकांची त्रैवार्षिक सरासरी उत्पादकता**

| राज्य | सरासरी उत्पादकता (२०१८-१९ ते २०२०-२१) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | तृणधान्ये (किग्रॅ/हेक्टर) | कडधान्ये (किग्रॅ/हेक्टर) | तेलबिया (किग्रॅ/हेक्टर) | कापूस (किग्रॅ/हेक्टर) | ऊस (मे टन/हेक्टर) |
| आंध्र प्रदेश | ३,७६५ | ७९० | ८७९ | ५०२ | ७८ |
| गुजरात | २,४७९ | १,१६५ | १,८७४ | ४९८ | ७४ |
| कर्नाटक | २,२९१ | ६२७ | ९६१ | ४३२ | ९२ |
| हरीयाणा | ४,००३ | ९६५ | १,९४५ | ४९५ | ८२ |
| मध्य प्रदेश | २,७३४ | ९५६ | ९६१ | ४८७ | ५५ |
| **महाराष्ट्र** | **१,४५५** | **८३९** | **१,२२१** | **२९८** | **८४** |
| पंजाब | ४,६१४ | ९२७ | १,५०६ | ७६४ | ८२ |
| राजस्थान | २,०२५ | ६७९ | १,४५६ | ६१५ | ७९ |
| तामिळनाडू | ३,६२३ | ६५७ | २,४२७ | ३७७ | १०५ |
| तेलंगणा | ३,६१४ | ९७३ | १,८११ | ४४० | ७९ |
| उत्तर प्रदेश | ३,०८७ | १,०४१ | १,०१८ | उ ना | ८१ |
| **अखिल भारत** | **२,७८३** | **८२२** | **१,२४७** | **४२८** | **८१** |

*आधार*: अर्थ व सांख्यिकी संचालनालय, कृषि, सहकार आणि शेतकरी कल्याण विभाग, केंद्र शासन — उ ना उपलब्ध नाही

७.८.५ राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक (पाया: १९७९-८२ त्रैवार्षिक) परिशिष्ट ७.४ मध्ये दिले आहेत.

७.९ **फलोत्पादन:** सन २०२२-२३ मध्ये राज्यात २३.४६ लाख हेक्टर फलोत्पादन क्षेत्र असून ते २०२१-२२ मध्ये २३.९२ लाख हेक्टर होते. प्रथम पुर्वानुमानानुसार राज्यात २०२२-२३ मध्ये विविध फळपिकांखालील क्षेत्र ८.३२ लाख हेक्टर होते. त्यापैकी आंबा फळपिकाचे क्षेत्र सर्वाधिक (१.६४ लाख हेक्टर) असून त्या खालोखाल डाळिंब (१.५६ लाख हेक्टर), द्राक्षे (१.१९ लाख हेक्टर), संत्री (१.२० लाख हेक्टर), केळी (०.९१ लाख हेक्टर) आणि मोसंबी (०.६५लाख हेक्टर) या फळपिकांचे क्षेत्र होते. प्रथम पुर्वानुमानानुसार राज्यात २०२२-२३ मध्ये भाजीपाला पिकांखालील क्षेत्र ११.६२ लाख हेक्टर होते. त्यापैकी कांदा पिकाचे क्षेत्र सर्वाधिक (९.१८ लाख हेक्टर) असून त्या खालोखाल टोमॅटो (०.६० लाख हेक्टर) आणि हिरवी मिरची (०.३३ लाख हेक्टर) या भाजीपाला पिकांचे क्षेत्र होते. फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.८ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.८ फलोत्पादन पिकांखालील क्षेत्र व उत्पादन**

| पीक | क्षेत्र ('००० हेक्टर) | | | उत्पादन ('००० मे.टन) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३* | शेकडा बदल | २०२१-२२ | २०२२-२३* | शेकडा बदल |
| फळे | ८३०.६४ | ८३१.७८ | ०.१ | १२,७०६.९७ | १२,६०६.५४ | (-)०.८ |
| भाजीपाला | १,१९२.७१ | १,१६२.०३ | (-)२.६ | १७,४२१.०५ | १८,९२७.५५ | ८.७ |
| फळबाग पिके | २२४.८० | २२५.३० | ०.२ | ४७५.५२ | ४७७.८१ | ०.५ |
| मसाल्याची पिके | १३०.६२ | ११५.६४ | (-)११.५ | २,०६३.०७ | १,७४९.०० | (-)१५.२ |
| फुले@ | ११.९३ | १०.२६ | (-)१४.० | ११५.१० | १४७.०८ | २७.८ |
| सुगंधी आणि औषधी वनस्पती | १.२० | ०.८४ | (-)३०.० | २.४१ | १.८७ | (-)२२.४ |
| एकुण फलोत्पादन पिके | २,३९१.९० | २,३४५.८४ | (-)१.९ | ३२,७८४.१२ | ३३,९०९.८६ | ३.४ |

@ देठासह व देठविरहीत फुले समाविष्ट * अंदाजित

टीप : सन २०२१-२२ ची आकडेवारी अंतिम अंदाजावर व २०२२-२३ ची आकडेवारी प्रथम पुर्वानुमानावर आधारीत आहे.

*आधार* : फलोत्पादन क्षेत्र उत्पादन माहिती प्रणाली, केंद्र शासन

७.१० **सेंद्रीय शेती:** देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतून सेंद्रीय पीक उत्पादनांची मागणी वाढत आहे. राज्यात सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. सेंद्रीय शेती उत्पादनात अखिल भारतात मध्यप्रदेश नंतर महाराष्ट्र (२० टक्के हिस्सा) दुसऱ्या क्रमांकावर आहे. सेंद्रीय शेतीखालील क्षेत्र व उत्पादन तक्ता ७.९ मध्ये दिले आहे. सेंद्रीय उत्पादनांची निर्यात तक्ता ७.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.९ सेंद्रीय शेतीखालील क्षेत्र आणि उत्पादन**

| वर्ष | क्षेत्र ('००० हेक्टर) | | उत्पादन ('०००मे.टन) | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| २०१९-२० | २९३.१४ | ३६६.९८ | ९०५ | २,७४६ |
| २०२०-२१ | ३७१.८० | ४३३.९२ | ७७६ | ३,४९७ |
| २०२१-२२ | १,१३३.६७ | ९,११९.८७ | ६९१ | ३,४१० |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ७.१० सेंद्रीय उत्पादनांची निर्यात**

| वर्ष | राशि ('००० मे.टन) | | मूल्य (₹ कोटी) | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| २०१९-२० | ७३.१८ | ६३९.०० | ४७१.४४ | ४,६८५.९१ |
| २०२०-२१ | १२६.२७ | ८८८.१८ | ९१३.७४ | ७,०७८.५० |
| २०२१-२२ | ८५.५३ | ४६०.३२ | ६९६.७१ | ५,२४९.३२ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन.

## सुधारित बियाणे

७.११ दर्जेदार बियाण्यांचे उत्पादन व वितरण करणाऱ्या महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ व राष्ट्रीय बीज निगम या सार्वजनिक क्षेत्रातील संस्था आहेत. केंद्र शासनाने स्वपरागसिंचित (तांदूळ, गहू, तूर, मूग, उडीद, इत्यादी) पिकांच्या बाबतीत ३३ टक्के, परपरागसिंचित (मका, ज्वारी, बाजरी, सूर्यफूल, इत्यादी) पिकांसाठी ५० टक्के व संकरित पिकांसाठी १०० टक्के बियाणे बदलाचे लक्ष्य निर्धारित केले आहे. सुधारित बियाण्यांचे खरीप व रब्बी हंगामासाठी केलेले वितरण तक्ता ७.११ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.११ सुधारित बियाण्यांचे खरीप व रब्बी हंगामासाठी केलेले वितरण**

('००० क्विंटल)

| वितरक संस्था | हंगाम | २०२० | २०२१ | २०२२ | २०२१ च्या तुलनेत २०२२ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| सार्वजनिक | खरीप | ३१० | २२२ | ११५ | (-)४८.२ |
| | रब्बी | ३११ | २४७ | ३३६# | ३६.० |
| | **एकूण** | **६२१** | **४६९** | **४५१** | **(-)३.८** |
| खाजगी | खरीप | १,३९४ | १,५१७ | १,६७० | १०.१ |
| | रब्बी | ७९० | ८३२ | ७९४# | (-)४.६ |
| | **एकूण** | **२,१८४** | **२,३४९** | **२,४६४** | **४.९** |
| **एकूण** | खरीप | १,७०४ | १,७३९ | १,७८५ | २.७ |
| | रब्बी | १,१०१ | १,०७९ | १,१३०# | ४.७ |
| | **एकूण** | **२,८०५** | **२,८१८** | **२,९१५** | **३.४** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # बियाण्यांची अपेक्षित उपलब्धता

## खते व किटकनाशके

७.१२ रासायनिक खतांचा वापर तक्ता ७.१२ मध्ये दिला आहे व किटकनाशकांचा वापर तक्ता ७.१३ मध्ये दिला आहे. नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर तक्ता ७.१४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.१२ रासायनिक खतांचा वापर**

| वर्ष | रासायनिक खतांचा वापर (लाख मे.टन) | | | प्रति हेक्टर वापर (कि.ग्रॅ.) |
|---|---|---|---|---|
| | खरीप | रब्बी | एकूण | |
| २०२०-२१ | ४६.९४ | २६.७२ | ७३.६६ | १२९.३ |
| २०२१-२२ | ४३.५२ | २७.१५ | ७०.६७ | ११९.३ |
| २०२२-२३ | ३७.६७ | ३७.००# | ७४.६७# | १४९.५# |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

**तक्ता ७.१३ किटकनाशकांचा वापर**

(मे.टन)

| वर्ष | किटकनाशके | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रासायनिक | | | जैविक | | |
| | खरीप | रब्बी | एकूण | खरीप | रब्बी | एकूण |
| २०२०-२१ | ९,५२५ | ४,१०५ | १३,६३० | ६५४ | २८० | ९३४ |
| २०२१-२२ | ९,२०७ | ३,९६८ | १३,१७५ | ६५४ | २८० | ९३४ |
| २०२२-२३# | १०,८१९ | ४,६३७ | १५,४५६ | १,७४८ | ७४९ | २,४९७ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

**तक्ता ७.१४ नत्र, स्फुरद व पालाश रासायनिक खतांचा विभागवार वापर**

('०० मे. टन)

| विभाग | रासायनिक खते | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | | | | २०२२-२३# | | | |
| | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण | नत्र | स्फुरद | पालाश | एकूण |
| कोकण | ३२५ | ६० | ५५ | ४४० | ४१० | ९७ | ८५ | ५९२ |
| नाशिक | ३,९४८ | २,३९५ | १,६३० | ७,९७३ | ४,९६३ | ३,०८७ | २,३१२ | १०,३६३ |
| पुणे | ३,९३८ | २,१०९ | १,३८५ | ७,४३३ | ४,७४० | २,७९६ | २,०७८ | ९,६१४ |
| औरंगाबाद | ४,१०७ | २,९८४ | १,३८६ | ८,४७७ | ५,०९१ | ३,९३२ | १,८५० | १०,८७३ |
| अमरावती | १,७७८ | १,४६८ | ५६४ | ३,८०९ | २,४६२ | १,९६६ | ८३३ | ५,२६१ |
| नागपूर | १,८४४ | १,१०६ | २७४ | ३,२२४ | २,४९५ | १,४७६ | ४५२ | ४,४२३ |
| **महाराष्ट्र** | **१५,९४०** | **१०,१२२** | **५,२९४** | **३१,३५६** | **२०,१६१** | **१३,३५४** | **७,६१०** | **४१,१२६** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

## सिंचन

७.१३ राज्याच्या जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील लाभक्षेत्रातील सिंचित क्षेत्र २०२१-२२ मध्ये ४३.३८ लाख हेक्टर आहे. पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१५ मध्ये दिले आहे. लघु सिंचन प्रकल्पांची (स्थानिक क्षेत्र) संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र तक्ता ७.१६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१५ पाटबंधारे प्रकल्पांची संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | जलसंपदा विभागाचे प्रकल्प | | |
|---|---|---|---|
| | मोठे व मध्यम | लघु | एकूण |
| दि. ३० जून, २०२२ रोजी पूर्ण व प्रगती पथावरील प्रकल्पांची संख्या * | ४०६ | ३,२९१$@ | ३,६९७ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | |
| (i) ३० जून,२०२१ पर्यंत निर्मित सिंचन क्षमता | ४१.१८ | १४.०६ | ५५.२४ |
| (ii) २०२१-२२ मधील कालवा व नदीद्वारे सिंचित क्षेत्र* | २१.६२ | ७.९० | २९.५२ |
| (iii) २०२१-२२ मधील लाभ क्षेत्रातील विहिरींद्वारे सिंचित क्षेत्र* | ११.५७ | २.२९ | १३.८६ |
| **(iv) २०२१-२२ मधील एकूण सिंचन क्षेत्र (ii+iii)*** | **३३.१९** | **१०.१९** | **४३.३८** |

$ प्रकल्प संख्येमध्ये महाराष्ट्र सिंचन विकास महामंडळांच्या उपसा सिंचन योजना समाविष्ट * अस्थायी

@ ८३ लघु प्रकल्प मृद व जलसंधारण विभागाकडे वर्ग करण्यात आले.

*आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद

**तक्ता ७.१६ लघु सिंचन प्रकल्पांची (स्थानिक क्षेत्र) संख्या, निर्मित सिंचन क्षमता आणि सिंचित क्षेत्र**

| तपशील | कोल्हापूर बंधारे | उपसा जलसिंचन योजना | इतर महत्वाचे प्रकार | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लघु पाटबंधारे | पाझर तलाव | इतर$ | |
| दि. ३० जून, २०२२ रोजी प्रकल्पांची संख्या | | | | | | |
| पूर्ण | १३,४३४ | २,९०१ | २,९८२ | २४,२५२ | ६७,८५८ | १,११,४२७ |
| प्रगतीपथावरील | १,७४८ | १०६ | ५४१ | ९५० | ४,५४९ | ७,८९४ |
| **सिंचन क्षमता (लाख हेक्टर)** | | | | | | |
| (i) जून,२०२१ पर्यंत निर्मित | ३.६९ | ०.४३ | २.६९ | ६.९३ | ५.७१ | १९.४५ |
| (ii) जून,२०२२ पर्यंत निर्मित | ३.८१ | ०.४३ | २.८४ | ७.०१ | ५.८९ | १९.९८ |
| (iii) २०२१-२२ मध्ये वापरलेली | १.३३ | ०.१५ | ०.९९ | ३.५१ | २.९५ | ८.९३ |

$ वळण बंधारा, साठवण बंधारा, माजी माल गुजारी तलाव, गाव तलाव, सिमेंट नाला बंधारे, इत्यादी समाविष्ट

टीप : प्रत्यक्ष वापरात आलेली सिंचन क्षमता निर्मित सिंचन क्षमतेच्या ३५ टक्के गृहीत धरण्यात आली आहे.

*आधार* : अपर आयुक्त जलसंधारण यांचे कार्यालय, पुणे, महाराष्ट्र शासन

७.१३.१ **जलाशयांतील साठा:** मोठ्या, मध्यम व लघु पाटबंधारे (राज्यक्षेत्र) जलाशयांमध्ये मिळून एकत्रितपणे दि.१५ ऑक्टोबर, २०२१ रोजी एकूण उपयुक्त जलसाठा ३४,४३८ दशलक्ष घनमीटर होता व तो प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमतेच्या सुमारे ७९.० टक्के होता. उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र तक्ता ७.१७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.१७ उपयुक्त जलसाठा, सिंचन क्षमता व प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र**

| वर्ष | प्रकल्प आराखड्यानुसार जलसाठा क्षमता (दलघमी) | १५ ऑक्टोबर रोजी उपयुक्त जलसाठा (दलघमी) | उपयुक्त जलसाठ्याची टक्केवारी | निर्मित सिंचन क्षमता (३० जून अखेर) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्र (१ जुलै ते ३० जून) (लाख हेक्टर) | प्रत्यक्ष सिंचित क्षेत्राची निर्मित सिंचन क्षमतेशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| २०१७-१८ | ४३,७५२ | २७,६०७ | ६३.१ | ५०.३७ | ३९.४२ | ७८.३ |
| २०१८-१९ | ४३,५७२ | २३,००४ | ५२.८ | ५१.२३ | ३५.९७ | ७०.२ |
| २०१९-२० | ४३,८३७ | ३०,११० | ६८.७ | ५३.०४ | ४०.९७ | ७७.२ |
| २०२०-२१ | ४३,९३४ | ३४,२३६ | ७७.९ | ५४.१५ | ४१.५९ | ७६.८ |
| २०२१-२२* | ४३,५९१ | ३४,४३८ | ७९.० | ५५.२४ | ४३.३८ | ७८.५ |

दलघमी : दशलक्ष घनमीटर *अस्थायी

*आधार* : जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखापरिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद

७.१३.२ **पाणी वापर संस्था :** शेतकऱ्यांद्वारे सिंचन प्रणालीचे व्यवस्थापन करणे या उद्देशाने राज्यात जलसंपदा विभागाअंतर्गत ५३.१८ लाख हेक्टर लागवडीयोग्य लाभक्षेत्रासाठी एकूण ११,५४४ पाणी वापर संस्था दि.१५ ऑगस्ट, २०२२ अखेर स्थापन झाल्या आहेत.

त्या क्षेत्रापैकी ११.७४ लाख हेक्टर क्षेत्रासाठी २,८२६ पाणी वापर संस्थांची महाराष्ट्र सिंचन पद्धतीचे शेतकऱ्यांकडून व्यवस्थापन कायदा, २००५ अंतर्गत व १.८ लाख हेक्टर क्षेत्रासाठी ५६५ पाणी वापर संस्थांची महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६० अंतर्गत नोंदणी झाली आहे. सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टीची आकडेवारी परिशिष्ट ७.६ मध्ये दिली आहे.

## कृषि पंपांचे विद्युतीकरण

७.१४.१ राज्यात माहे मार्च २०२२ अखेर ४५.८६ लाख कृषि पंपांचे विद्युतीकरण झाले आहे व सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ९१,९१४ कृषि पंपांचे विद्युतीकरण झाले.

७.१४.२ **प्रधानमंत्री किसान उर्जा सुरक्षा व उत्थान महाअभियान:** केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री किसान उर्जा सुरक्षा व उत्थान महाअभियान (पीएम-कुसुम) ही योजना राबविण्यात येत आहे. ही योजना सन २०१९-२० ते सन २०२५-२६ या कालावधीत राबविण्यात असून राज्यासाठी दोन लाख स्वतंत्र सौर कृषि पंप मंजूर करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत, शेतकरी ३ एचपी, ५ एचपी आणि ७.५ एचपी क्षमतेचे ऑफ-ग्रीड स्वतंत्र सौर कृषि पंप स्थापित करू शकतात. या योजनेमध्ये खुल्या प्रवर्गासाठी केंद्र शासनाचे ३० टक्के व राज्य शासनाचे ६० टक्के आर्थिक सहाय्य आणि लाभार्थींचा १० टक्के आर्थिक हिस्सा आहे. अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी केंद्र शासनाचे ३० टक्के व राज्य शासनाचे ६५ टक्के आर्थिक सहाय्य आणि लाभार्थींचा पाच टक्के आर्थिक हिस्सा आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण ३६,३८१ सौर कृषि पंप बसवण्यात आले आहेत.

७.१४.३ **मुख्यमंत्री सौर कृषि पंप योजना:** कृषि पंपांसाठी दिवसा वीज पुरवठा व्हावा आणि प्रदूषण कमी करण्यासाठी डिझेल पंपांना पर्याय उपलब्ध व्हावा या उद्देशाने राज्य शासनाने सन २०१८-१९ मध्ये ही योजना सुरू केली आहे. शासनाने सलग तीन वर्षात एक लाख ऑफ ग्रिड सौर कृषि पंप वितरीत करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. विद्युतीकरण न झालेल्या दुर्गम किंवा आदिवासी भागातील शेतकरी किंवा ज्या भागाचे महावितरणने विद्युतीकरण केलेले नाही अशा भागातील शेतकऱ्यांकरीता ही योजना राबवली जात आहे. स्वत:ची शेतजमीन व पाण्याची कायमस्वरुपी सुविधा उपलब्ध असलेल्या परंतु विजेवर चालणारे कृषि पंप नसलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. खुल्या प्रवर्गातील शेतकऱ्यांना सौर कृषि पंपाच्या किंमतीच्या १० टक्के रक्कम तर अनुसुचित जाती / अनुसूचित जमातीतील शेतकऱ्यांना पाच टक्के रक्कम सहभाग म्हणून भरावी लागते. योजनेची अंमलबजावणी सुरु झाल्यापासून माहे जून, २०२२ अखेर एक लाख सौर कृषि पंप महावितरणने कार्यान्वित केले आहेत.

## कृषि वित्त पुरवठा

७.१५ शेतकऱ्यांना शासनाकडून विविध बँका तसेच सहकारी संस्थांमार्फत अल्प मुदतीची कर्जे, पतपुरवठा, इत्यादींच्या माध्यमातून वित्तीय सहाय्य केले जाते. राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) ही संस्था महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका आणि अनुसूचित वाणिज्यिक बँका यांच्यामार्फत अल्प व मध्यम मुदतीचे कर्ज वितरीत करते. राज्यासाठी सन २०२२-२३ करीता प्राधान्य क्षेत्रासाठी वार्षिक कर्ज आराखडा ₹ ५.२२ लाख कोटी आहे व यामध्ये कृषि व संलग्न कार्ये क्षेत्राचा हिस्सा २४.१ टक्के आहे. अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांनी दिलेली कर्जे तक्ता ७.१८ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१८ अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी दिलेली कर्जे**

(₹ कोटी)

| कर्जाचा प्रकार | अनुसूचित वाणिज्यिक बँका | | प्रादेशिक ग्रामीण बँका | | महाराष्ट्र राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१-२२ | २०२२-२३+ | २०२१-२२ | २०२२-२३+ | २०२१-२२ | २०२२-२३+ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| पीक कर्ज | २४,७८८ | १५,८३० | ३,१८९ | ४,००५ | १८,३०८ | १८,२४८ | ४६,२८५ | ३८,०८३ |
| कृषि मुदत कर्ज | ५६,००३ | ३३,१२५ | ३२० | २२८ | १,०४२ | ५५२ | ५७,३६५ | ३३,९०५ |
| **एकूण** | **८०,७९१** | **४८,९५५** | **३,५०९** | **४,२३३** | **१९,३५०** | **१८,८००** | **१,०३,६५०** | **७१,९८८** |

*आधार* : राज्यस्तरीय बँकर्स समिती, महाराष्ट्र राज्य + सप्टेंबर अखेर

७.१६.१ राज्यात निम्न स्तरावर कृषि वित्त पुरवठा करण्याशी थेट संबंधित असणाऱ्या प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्था शेतकरी सभासदांना अल्प मुदतीची पीक कर्जे उपलब्ध करून देतात. सन २०२०-२१ मध्ये एकूण ₹ १७,७५७ कोटी कर्जपुरवठा प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून ३१.७१ लाख सभासद शेतकऱ्यांना तर सन २०२१-२२ मध्ये ₹ १८,४१७ कोटी कर्जपुरवठा २९.७९ लाख सभासद शेतकऱ्यांना करण्यात आला. सन २०२२-२३ साठी पीककर्ज वाटपाचे उद्दिष्ट ₹ २१,५८० कोटी निश्चित करण्यात आले असून त्यापैकी प्राथमिक कृषि सहकारी पतपुरवठा संस्थांकडून खरीप हंगामात माहे सप्टेंबरअखेर २५.६१ लाख सभासद

शेतकऱ्यांना ₹ १६,६०९ कोटी कर्जपुरवठा आणि रब्बी हंगामात डिसेंबरअखेर १.६४ लाख सभासद शेतकऱ्यांना ₹ १,१५९ कोटी कर्जपुरवठा करण्यात आला.

७.१६.२ **किसान क्रेडिट कार्ड योजना:** राज्यात सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने २९.८९ लाख नवीन किसान क्रेडिट कार्ड वाटप केले. या नवीन कार्डधारकांना सन २०२१-२२ मध्ये ₹ १८,७५६ कोटी रकमेचे कर्ज मंजूर झाले. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे तक्ता ७.१९ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.१९ महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने दिलेली किसान क्रेडिट कार्ड संलग्नित कृषि कर्जे**

| वर्ष | लघु मुदतीची कर्जे | | दीर्घ मुदतीची कर्जे | |
|---|---|---|---|---|
| | शेतकऱ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) | शेतकऱ्यांची संख्या ('०००) | रक्कम (₹ कोटी) |
| २०२०-२१ | ३,१६५ | १७,३७२ | १८ | २७७ |
| २०२१-२२ | २,९६५ | १८,४४९ | २४ | ३०८ |
| २०२२-२३+ | २,५६८ | १६,३६५ | ५ | २५ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

## पीक विमा आणि आर्थिक सहाय्य

७.१७.१ **प्रधानमंत्री पीक विमा योजना:** अधिसूचित केलेल्या पिकांचे नैसर्गिक आपत्ती, किड व रोगामुळे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण व आर्थिक सहाय्य देण्यासाठी ही योजना सन २०१६ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेत पिकानुसार शेतकऱ्यांना संरक्षित रकमेच्या कमाल पाच टक्के रक्कम विम्याचा हप्ता म्हणून भरावी लागते. सन २०२१-२२ मध्ये ९६.३८ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. एकूण ५७.१० लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ २१,८६२.२८ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ५,१७९.६१ कोटी विमा हप्ता मंजूर करण्यात आला. सन २०२१-२२ मध्ये एकूण ६४.४५ लाख लाभार्थी शेतकऱ्यांसाठी ₹ ३,४८४.३२ कोटी रकमेचे नुकसान भरपाई दावे मंजूर करण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये खरीप हंगामात ९६.६१ लाख शेतकरी या योजनेत सहभागी झाले. एकूण ५७.६४ लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ २७,८३६.६९ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ४,४१४.६३ कोटी विमा हप्ता मंजूर करण्यात आला. एकूण ६३.४० लाख लाभार्थी शेतकऱ्यांसाठी ₹ २,२२८.३८ कोटी रकमेचे अंतरिम नुकसान भरपाई दावे मंजूर करण्यात आले.

७.१७.२ **हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना:** द्राक्षे, आंबा, डाळिंब, केळी, संत्री, मोसंबी, पेरु, चिकू, लिंबू, काजू, सिताफळ आणि स्ट्रॉबेरी या फळपीकांसाठी हवामानावर आधारीत फळपीक विमा योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०२१-२२ मध्ये या योजनेमध्ये एकूण २.८५ लाख शेतकरी सहभागी झाले. एकूण २.१० लाख हेक्टर क्षेत्राच्या ₹ २,६२४.९९ कोटी रकमेच्या विमा संरक्षणापोटी ₹ ७३६.६२ कोटी विमा हप्ता भरण्यात आला. सन २०२१-२२ मध्ये २.३१ लाख लाभार्थी शेतकऱ्यांचे ₹ ९३५.६२ कोटी (संचित) विमा दावे निकाली काढण्यात आले.

७.१७.३ **डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना:** या योजनेअंतर्गत ०.२० ते सहा हेक्टर पर्यंत वहिती क्षेत्र व ₹ १.५० लाख पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाच्या सुविधेसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरुपात नवीन विहीर (नवीन विहिरीसाठी किमान ०.४० हेक्टर वहिती क्षेत्र आवश्यक), जुन्या विहीरीची दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण, इनवेल बोअरींग, कृषिपंप, वीज मीटर जोडणी खर्च, सूक्ष्म सिंचन, इत्यादी बाबींकरीता अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये १४,१५१ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून ₹ २३०.४० कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये १४,१५१ लाभार्थ्यांसाठी डिसेंबर पर्यंत ₹ ४६.५० कोटी खर्च झाला आहे.

७.१७.४ **बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना:** या योजनेअंतर्गत ०.२० ते सहा हेक्टर पर्यंत वहिती क्षेत्र व ₹ १.५० लाख पर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाच्या सुविधेसाठी १०० टक्के अनुदानाच्या स्वरुपात नवीन विहीरी (नवीन विहिरीसाठी किमान ०.४० हेक्टर वहिती क्षेत्र आवश्यक), जुन्या विहीरीची दुरुस्ती, शेततळ्याचे प्लास्टीक अस्तरीकरण, इनवेल बोअरींग, कृषिपंप, वीज मीटर जोडणी खर्च, एचडीपीई/पीव्हीसी पाईप, सूक्ष्म सिंचन संच, परसबाग, इत्यादी बाबींकरीता अर्थसहाय्य देण्यात येते. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ६,४४२ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली व ₹ ८९.७२ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये ४,३५० लाभार्थ्यांसाठी डिसेंबर पर्यंत ₹ ३८.७६ कोटी खर्च झाला आहे.

७.१७.५ **महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९:** राज्याला सन २०१५-१६ ते सन २०१८-१९ या कालावधीत अवकाळी पाऊस व दुष्काळ सदृश परिस्थितीचा सामना करावा लागला. या नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांचे अल्प व मध्यम मुदतीचे पीक कर्ज थकीत झाल्यामुळे ते नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यापासून वंचित झाले. या दुष्टचक्रातून शेतकऱ्यांना मुक्तता मिळावी

या उद्देशाने, शेतकऱ्यांनी दि. १ एप्रिल, २०१५ ते दि. ३१ मार्च, २०१९ या कालावधीत एकापेक्षा जास्त संस्थांकडून घेतलेले व दि. ३० सप्टेंबर, २०१९ रोजी थकीत असलेले कर्ज माफ करण्यासाठी राज्य शासनाने ही योजना सन २०१९-२० मध्ये सुरू केली. जमीन धारणा क्षेत्राची मर्यादा विचारात न घेता मुद्दल व व्याज मिळून ₹ दोन लाखापर्यंतचे कर्ज या योजनेअंतर्गत माफ करण्यात आले आहे. ही योजना अनुसूचित वाणिज्यिक बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व प्राथमिक कृषि पत संस्थांकडून कर्ज घेतलेल्या फक्त वैयक्तिक शेतकऱ्यांना लागू आहे. योजना सुरु झाल्यापासून दि. ३१ डिसेंबर, २०२२ अखेर ३२.०३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ २०,४२५ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला.

७.१७.५.१ **महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ति योजना २०१९ अंतर्गत प्रोत्साहनपर लाभ योजना:** नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात माहे जुलै, २०२२ पासून ही योजना राबविण्यात येत आहे. सन २०१७-१८ ते २०१९-२० यापैकी कोणत्याही दोन आर्थिक वर्षात पीक कर्जाची उचल करुन विहीत मुदतीत कर्जाची पुर्णतः परतफेड केलेल्या शेतकऱ्यांना पीक कर्जाच्या मुद्दल रकमेवर जास्तीत जास्त ₹ ५०,००० पर्यंत रकमेचा लाभ देण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ८.१३ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ २,९८२ कोटी रकमेचा लाभ देण्यात आला.

७.१७.६ **डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजना:** अल्प मुदतीच्या पीक कर्जाची नियमित परतफेड करण्याकरिता राज्यातील शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत आहे. घेतलेल्या कर्जाच्या संपुर्ण रकमेचा प्रत्येक वर्षी दि.३० जूनपर्यंत भरणा केल्यास शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत ₹ ३.०० लाख पर्यंतच्या कर्जास माहे एप्रिल, २०२१ पासून तीन टक्के व्याज सवलत अनुदान देण्यात येते. सन २०२०-२१ मध्ये या योजनेअंतर्गत ४.२६ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ १६.०५ कोटी व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले तर सन २०२१-२२ मध्ये ९.०८ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ ११९.४८ कोटी व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ६.५२ लाख लाभार्थी शेतकऱ्यांना ₹ ८८.४४ कोटी व्याज सवलत अनुदान वितरीत करण्यात आले.

७.१७.७ **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी:** अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नास जोड देण्यासाठी केंद्र शासन प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सन २०१८-१९ पासून राबवित आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना (पती-पत्नी व त्यांची १८ वर्षांखालील वयाची अपत्ये) ₹ २,००० प्रमाणे तीन समान हप्त्यात दरवर्षी एकूण ₹ ६,००० अनुदान अनुज्ञेय असून ते लाभार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. या योजनेअंतर्गत दि. २ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत राज्यातील ११०.३१ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ₹ २१,९९१.८६ कोटी रक्कम जमा करण्यात आली.

७.१७.८ **प्रधानमंत्री किसान मानधन योजना:** अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वृद्धापकाळात संरक्षण आणि सामाजिक सुरक्षा पुरविण्याच्या उद्देशाने ही ऐच्छीक आणि सहभागावर आधारीत निवृत्तीवेतन योजना राज्यात सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत पात्र अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना दरमहा ₹ ३,००० निवृत्तीवेतन देण्यात येणार आहे. दि. १ ऑगस्ट, २०१९ रोजी १८ ते ४० वर्षे वयोगटातील शेतकरी या योजनेत सहभागी होऊ शकतात. शेतकऱ्यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत दरमहा ₹ ५५ ते ₹ २०० रक्कम निवृत्तीवेतन फंडामध्ये जमा करावयाची आहे. भारतीय आयुर्विमा महामंडळ व्यवस्थापित निवृत्तीवेतन फंडातून शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन दिले जाणार आहे. केंद्र शासन शेतकऱ्यांच्या सहभागाइतकीच रक्कम निवृत्तीवेतन फंडात जमा करते. दि. २ फेब्रुवारी, २०२३ रोजी राज्यातील ७९,२२२ लाभार्थी शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदविला आहे.

## कृषि पणन

७.१८ महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ अंतर्गत कृषि उत्पन्न बाजार समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कृषि मालाला योग्य भाव मिळावा आणि व्यापारी व मध्यस्थांकडून शेतमालाला कमी भाव देऊन शेतकऱ्यांचे शोषण केले जाऊ नये या हेतूने कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये शेतमाल विकण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. राज्यात ३०६ कृषि उत्पन्न बाजार समित्या व ६२१ उप-बाजार समित्या कार्यरत आहेत. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत १,५३५ थेट पणन परवाने दिले आहेत. याशिवाय ८१ खाजगी बाजारांना परवाने देण्यात आले आहेत. राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य तक्ता ७.२० मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२० राज्यातील सर्व कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये झालेली आवक व त्यांचे मूल्य**

| वर्ष | राशि (लाख मे.टन) | मूल्य (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२०-२१ | १८०.३० | ५३,०४९ |
| २०२१-२२ | १९७.५० | ५६,४२२ |
| २०२२-२३+ | ११०.३७ | ४०,९७३ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ + दि.१५ फेब्रुवारीपर्यंत

७.१९ **किमान आधारभूत किंमत योजना:** शेतमालाला हमी आणि शेतकऱ्यांना खात्रीशीर बाजार उपलब्ध करून देणे व त्यांना किंमतीतील चढउतारामुळे होणाऱ्या नुकसानापासून संरक्षण देऊन शेतीव्यवसाय आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य करणे यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून केंद्र शासन निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती पेरणी हंगामापूर्वी जाहीर करते. या योजनेअंतर्गत शेतमालाची खरेदी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, राष्ट्रीय कृषि सहकारी पणन महासंघ, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक महासंघ यांचेमार्फत केली जाते. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती तक्ता ७.२१ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.२१ केंद्र शासनाने जाहीर केलेल्या निवडक पिकांच्या किमान आधारभूत किंमती**

(₹ / क्विंटल)

| पीक | किमान आधारभूत किंमती | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३ |
| भात/धान (साधारण वाजवी प्रत) | १,८६८ | १,९४० | २,०४० |
| भात/धान (प्रत-अ) | १,८८८ | १,९६० | २,०६० |
| ज्वारी (संकरित) | २,६२० | २,७३८ | २,९७० |
| ज्वारी (मालदांडी) | २,६४० | २,७५८ | २,९९० |
| गहू | १,९७५ | २,०१५ | २,१२५ |
| मका | १,८५० | १,८७० | १,९६२ |
| बाजरी | २,१५० | २,२५० | २,३५० |
| हरभरा | ५,१०० | ५,२३० | ५,३३५ |
| तूर | ६,००० | ६,३०० | ६,६०० |
| मूग | ७,१९६ | ७,२७५ | ७,७५५ |
| उडीद | ६,००० | ६,३०० | ६,६०० |
| सूर्यफूल | ५,८८५ | ६,०१५ | ६,४०० |
| सोयाबीन | ३,८८० | ३,९५० | ४,३०० |
| भूईमुगाच्या शेंगा | ५,२७५ | ५,५५० | ५,८५० |
| कापूस (मध्यम धागा) | ५,५१५ | ५,७२६ | ६,०८० |
| कापूस (लांब धागा) | ५,८२५ | ६,०२५ | ६,३८० |
| करडई | ५,३२७ | ५,४४१ | ५,४५० |
| नाचणी | ३,२९५ | ३,३७७ | ३,५७८ |

*आधार* : पणन संचालनालय, महाराष्ट्र शासन

## माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान

७.२०.१ **इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषि बाजार (ई-नाम):** ई-नाम हे देशभरात लागू असलेले इलेक्ट्रॉनिक व्यापार पोर्टल सन २०१६ पासून सुरु करण्यात आले आहे. त्याद्वारे कृषि उत्पन्न बाजार समित्यांमधील प्रत्यक्ष बाजार संलग्न असून ऑनलाईन पद्धतीने खरेदी विक्रीची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे कृषि उत्पन्न बाजार समित्यांशी संबंधित सर्व माहिती व सेवा यासाठी एक खिडकी सुविधा उपलब्ध झाली असून त्यामध्ये शेतमालाची आवक व किंमती, खरेदी-विक्री देकार, व्यापार संधीस प्रतिसाद देण्याची तरतूद या बाबींचा समावेश आहे. ऑनलाईन बाजार सुविधेमुळे देवाणघेवाणीवरील खर्च तसेच माहितीतील असमानता कमी होत आहे. ई-नाम पोर्टलमध्ये राज्यातील ११८ कृषि उत्पन्न बाजार समित्या समाविष्ट आहेत. सर्व ११८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ऑनलाईन गेट एन्ट्री, ई-ऑक्शन सुरु करण्यात आले आहे व ७७ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये ई-पेमेंट सुरु करण्यात आले आहे. दि.१५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत ₹ ११,६४२ कोटी रकमेचे सुमारे ४९५ लाख मे.टन शेतमालाचे ई-ऑक्शन करण्यात आले व ₹ २९३ कोटी रकमेचे ई-पेमेंट झाले. कृषि मालाच्या गुणवत्ता तपासणी व प्रमाणीकरणासाठी ११८ कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये गुणवत्ता निर्धारण प्रयोगशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत.

७.२०.२ **राज्य ई-गव्हर्नन्स कार्यक्रम** : कृषि तंत्रज्ञानाचा ग्रामस्तरावर प्रसार करणे, कृषि विषयक अद्ययावत तंत्रज्ञान शेतकऱ्यांना हस्तांतरीत करणे तसेच कृषि योजनांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी या कार्यक्रमांतर्गत महाॲग्रीटेक, ई-ठिबक, ई-परवाना, क्रॉपसॅप, ई-सॉईल ३.००, महाकृषी मोबाईल ॲप्लीकेशन व वेब पोर्टल इ. प्रणाली विकसित करण्यात आल्या आहेत.

७.२०.३ **महाॲग्रीटेक प्रकल्प:** राज्यातील कृषि क्षेत्राच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी विविध तंत्रज्ञानाचा परस्परपूरक वापराच्या दृष्टीने राज्य शासनाने महाॲग्रीटेक हा वैशिष्ट्यपुर्ण प्रकल्प हाती घेतला आहे. पिक-निहाय क्षेत्राची अचूक गणना करणे, पीक आरोग्य सर्वेक्षण करणे ,काढणी-पश्चात उत्पादनाचे अनुमान काढणे, इत्यादीं करीता सॅटेलाईट इमेजिंग व ड्रोन तंत्रज्ञान यासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे आणि विविध संगणकीय प्रणालींद्वारे प्राप्त माहितीचे एकत्रिकरण याद्वारे शेतकऱ्यांना अचुक सल्ला व मार्गदर्शन यासाठी संगणकीय व मोबाईल ॲप्लीकेशन प्रणाली तयार करणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. महाॲग्रीटेक प्रकल्पाकरीता स्वतंत्र वेब पोर्टल व मोबाईल ॲप्लीकेशन तयार करण्यात आले आहे.

७.२०.४ **महाडीबीटी पोर्टल:** केंद्रिय व राज्याच्या कृषिविषयक सुमारे २९ योजनांचा अनुदान व लाभ पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट हस्तांतरीत करण्यासाठी महाडीबीटी पोर्टल वापरले जाते. शेतकऱ्यांच्या सोयीकरीता सर्व योजनांचा लाभ एकाच अर्जाद्वारे देण्याच्या दृष्टीने 'शेतकरी योजना' ही एकात्मिक संगणकीय प्रणाली विकसित केली आहे. माहे जानेवारी २०२३ पर्यंत या पोर्टलवर २९ लाखापेक्षा अधिक नोंदणीकृत शेतकरी असून शेतकऱ्यांना ₹ २,३४१ कोटी रक्कम वितरीत करण्यात आली.

७.२०.५ **एमकिसान पोर्टल:** एमकिसान पोर्टल या मोबाईल आधारित सेवेद्वारे शेतकरी आणि इतर सर्व भागधारकांना कृषि हवामान सल्ला, चक्रीवादळ, पीक आणि कीटकांचा प्रादुर्भाव, पीक विमा, बाजारभाव इत्यादींबाबत विविध स्तरांवरील तज्ञ आणि शासकीय यंत्रणांकडून पाठवले जाणारे सल्ले आणि माहिती मोफत प्राप्त करता येते. या पोर्टलवर ६६.४९ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. दि. १ एप्रिल ते ११ नोव्हेंबर, २०२२ पर्यंत शेतकऱ्यांना एकूण ५४७ सल्ले आणि सुमारे ३.४६ कोटी संदेश या पोर्टलद्वारे पाठविण्यात आले.

## सर्वांगीण सुधारणे साठी कृषि विकास योजना

७.२१ **राष्ट्रीय कृषि विकास योजना- कॅफेटेरीया:** राष्ट्रीय कृषि विकास योजना सन २००७-०८ पासून कृषि व संलग्न क्षेत्रांच्या समग्र विकासाच्या उद्देशाने सुरु करण्यात आली. सन २०१७-१८ पासून ही योजना रा.कृ.वि.यो.-रफ्तार या नावाने शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना बळकटी देणे, जोखीम कमी करणे आणि कृषि-व्यावसायिक उद्योजकतेस चालना देणे या माध्यमातून शेतीला लाभदायक आर्थिक उपक्रम बनविणे या उद्देशाने राबविण्यात आली. सन २०२२-२३ पासून ही योजना रा.कृ.वि.यो.-कॅफेटेरीया म्हणून राबविण्यात येत आहे. यामध्ये वार्षिक कृति आराखडा व सविस्तर प्रकल्प अहवाल या दोन प्रकारांचा अंतर्भाव केला आहे. वार्षिक कृति आराखडा प्रवाह या अंतर्गत (i) प्रति थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) (ii) कृषि यांत्रिकीकरण उपअभियान, (iii) अवर्षण प्रवण क्षेत्र विकास कार्यक्रम, (iv) मृद आरोग्य कार्ड व मृद आरोग्य व्यवस्थापन आणि (v) सेंद्रिय शेती (परंपरागत कृषि विकास योजना) यांचा समावेश आहे. सविस्तर प्रकल्प अहवाल प्रवाह या अंतर्गत उत्पादनात वाढ, पायाभूत सुविधा आणि राज्यासाठी मालमत्ता यासाठी ७० टक्के निधी तर २० टक्के निधी रा.कृ.वि.यो.-कॅफेटेरीया अंतर्गत राष्ट्रीय प्राधान्य असलेल्या विशेष उपयोजनांसाठी आणि १० टक्के निधी नाविन्यपूर्ण उपक्रम व कृषि-उद्योजकता विकास प्रकल्पांसाठी राखीव अशा पद्धतीने निधीची विभागणी केली आहे. या योजनेअंतर्गत सन २०२०-२१ व २०२१-२२ मधील ₹ ५३३.६० कोटी निधी माहे डिसेंबर, २०२२ अखेर खर्च झाला आहे.

७.२२ **राष्ट्रीय कृषि विकास योजना- प्रति थेंब अधिक पिक:** 'प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना - प्रति थेंब अधिक पिक' या सूक्ष्म सिंचन योजनेअंतर्गत पाण्याचा अधिक कार्यक्षमतेने वापर करुन पाण्याच्या प्रत्येक थेंबाद्वारे जास्तीत जास्त उत्पादन या उद्देशाने राज्यात सन २०१५-१६ पासून राबविण्यात येत आहे. सन २०२२-२३ पासून केंद्र शासनाने 'प्रति थेंब अधिक पिक' योजना 'राष्ट्रीय कृषि विकास योजना' अंतर्गत राबविण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना ५५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ४५ टक्के अनुदानेच निकष असून क्षेत्राची मर्यादा पाच हेक्टर आहे. सन २०२०-२१ पासून या योजनेअंतर्गत अनुदान महाडिबीटी पोर्टलद्वारे वितरीत करण्यात येत आहे. सन २०२१-२२ पर्यंत सुमारे ८.८६ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे. सन २०२१-२२ मध्ये २,१२,९६४ पात्र शेतकऱ्यांच्या खाती ₹ ५३२.८८ कोटी अनुदान जमा करण्यात आले आहे. सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ४,४८,३५१ शेतकऱ्यांनी अर्ज केले असून त्यापैकी ३,५०,६७४ शेतकरी लॉटरीद्वारे निवडण्यात आले आहेत व सूक्ष्म सिंचन संच कार्यान्वित केले अशा ८३,६११ शेतकऱ्यांना अनुदान वितरण प्रक्रीया सुरु आहे. तुषार व ठिबक सिंचन संच आणि अनुदान वितरण तक्ता ७.२२ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२२ तुषार व ठिबक सिंचन संच आणि अनुदान वितरण**

| वर्ष | तुषार सिंचन संच | | ठिबक सिंचन संच | | अनुदान (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | संचांची संख्या | क्षेत्र (हेक्टर) | |
| २०१९-२० | ७७,२७९ | ४६,५३८ | १,२१,९७९ | १,०५,१९० | ५०५.४४ |
| २०२०-२१ | ४७,८८९ | ३५,३२२ | ३९,६५५ | ३३,९६० | १६३.३७ |
| २०२१-२२ | १,०१,८९९ | ६६,२७७ | १,११,९८० | ८५,५३४ | ५३२.८८ |
| २०२२-२३ (लक्ष्य) | ९०,४८२ | ६५,९४३ | १,५२,८६६ | १,२२,७५४ | ६६६.६६# |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन # अपेक्षित

७.२३ **कृषि यांत्रिकीकरण उपअभियान:** घटणारे वहिती क्षेत्र, बैलांच्या संख्येत होणारी घट, मजुरांची अनुपलब्धता, मजुरीचे वाढते दर, खरीप हंगामाचा कमी कालावधी, पीक लागवडीमधील विविधता, इत्यादींमुळे निर्माण होणाऱ्या समस्यांवर उपाययोजना म्हणून राज्यात कृषि यांत्रिकीकरण हे उपअभियान सन २०१७-१८ पासून राबविण्यात येत आहे. शेतकऱ्यांना सुधारीत कृषि औजारे खरेदीसाठी अनुदान देणे आणि कृषि औजारे बँका स्थापन करणे हे या उपअभियानाचे घटक आहेत. कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत लाभार्थी संख्या व अनुदानाची माहिती तक्ता ७.२३ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता ७.२३ कृषि यांत्रिकीकरण उपअभियानाअंतर्गत लाभार्थी संख्या व अनुदान**

| वर्ष | कृषि औजारे | | कृषि औजारे बँका | | एकूण अनुदान (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | अनुदान (₹ कोटी) | संख्या | अनुदान (₹ कोटी) | |
| २०२०-२१ | ४,०२१ | २३.८८ | ७० | ३.८२ | २७.७१ |
| २०२१-२२ | १४,६४२ | ९१.४२ | २७२ | १२.७८ | १०४.२० |
| २०२२-२३+ | २५,५५५ | १४६.१० | २४९ | १२.३४ | १५८.४४ |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + जानेवारी पर्यंत

७.२४ **कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रम:** कोरडवाहू शेती प्रामुख्याने हवामानावर आधारित असल्याने जोखमीची आहे. शेतीवर आधारीत उत्पन्नाच्या संधी निर्माण करून शेती व्यवसायातील जोखीम कमी करणे आणि नैसर्गिक तसेच विविध उपायांद्वारे निर्माण केलेल्या संसाधनांच्या क्षमतेचा जास्तीत जास्त वापर करून कोरडवाहू शेती शाश्वत करणे हे कोरडवाहू क्षेत्र विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट

आहे. सन २०२१-२२ मध्ये ७,३४५ लाभार्थ्यांसाठी ₹ १०.५५ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये माहे डिसेंबरपर्यंत ४,०१३ लाभार्थ्यांसाठी ₹ ७.२३ कोटी खर्च झाला.

७.२५ **मृद आरोग्य व्यवस्थापन आणि मृद आरोग्य पत्रिका वितरण:** मृद आरोग्य अबाधित राखणे व जमिनीची उत्पादन क्षमता सुधारणे याकरीता एकात्मिक पोषक द्रव्ये व्यवस्थापनास प्रोत्साहन देण्यासाठी मृद आरोग्य व्यवस्थापन आणि मृद आरोग्य पत्रिका वितरण उपअभियान राबविण्यात येत आहे. मृद व पाण्याच्या नमुन्याची तपासणी करण्याची सुविधा देण्यासाठी राज्यात ३२ मृद चाचणी प्रयोगशाळांची स्थापना करण्यात आली आहे. या व्यतिरीक्त खाजगी मृद चाचणी प्रयोगशाळांमध्ये देखील ही सुविधा उपलब्ध आहे. अमरावती, औरंगाबाद, नाशिक, पुणे व कोल्हापूर या पाच ठिकाणी खत नमुना तपासणी प्रयोगशाळा कार्यरत आहेत. मृद आरोग्य स्थितीबाबत जागरुकता निर्माण करणे व मृद आरोग्य सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरीता शेतकऱ्यांना मृद आरोग्य पत्रिका वितरित करण्यात येत आहेत. या उपअभियानांतर्गत २०१५-१७ मध्ये १.३१ कोटी, २०१७-१९ मध्ये १.३१ कोटी व २०१९-२० मध्ये ०.०२ कोटी मृद आरोग्य पत्रिका शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आल्या. सन २०२०-२१ मध्ये एकूण ३,५१० गावांत प्रशिक्षण व प्रात्यक्षिके घेण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत १.८६ लाख मृद आरोग्य पत्रिका वितरीत केल्या आहेत.

७.२६ **परंपरागत कृषि विकास योजना:** परंपरागत कृषि विकास योजना या योजनेची उद्दिष्टे (i) जमिनीचा कस वाढविणे व रसायनांचा वापर न करता सेंद्रीय शेतीद्वारे सकस अन्नधान्याचे उत्पादन करणे (ii) शेती व्यवसाय व्यवस्थापनामध्ये समूह केंद्रीत दृष्टिकोनाचा अंगिकार करून शेतकऱ्यांचे सक्षमीकरण करणे (iii) गुणवत्तेची हमी आणि (iv) शेती उत्पादनाच्या थेट विक्रीसाठी नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब ही आहेत. या योजनेअंतर्गत २० हेक्टर जमीन असणाऱ्या समूहाला सलग तीन वर्षांकरीता लाभ दिला जातो. सन २०२०-२१ ते २०२२-२३ करिता एकूण १७,१०६ हेक्टर क्षेत्रासह ८,४२० लाभार्थी शेतकऱ्यांचे ३७० समूह तयार करण्यात आले. सन २०२०-२१ मध्ये ₹ १२.८९ कोटी, २०२१-२२ मध्ये ₹ ५.०९ कोटी व २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २.१७ कोटी खर्च झाला.

७.२७ **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना:** राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर रोपवाटिका योजना शेतकऱ्यांना रसायने विरहीत व निर्यात योग्य भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहीत करण्याच्या उद्देशाने सन २०२०-२१ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. किमान ०.४० हेक्टर जमीन व रोपवाटिका उभारणीसाठी पाण्याचा कायमस्वरुपी स्रोत असलेले शेतकरी सदर योजनेअंतर्गत पात्र आहेत. कृषि पदवीधारक महिला व त्यांचे गट तसेच भाजीपाला उत्पादक अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व त्यांचे गट यांना योजनेच्या लाभाकरीता प्राधान्य देण्यात येत आहे. सन २०२०-२१ व २०२१-२२ या वर्षातील प्रकल्पाकरीता एकूण ३८८ लाभार्थ्यांना ₹ ८.३२ कोटी सहाय्य माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत देण्यात आले.

७.२८ **विस्तार सुधारणांसाठी राज्य विस्तार कार्यक्रमांना सहाय्य:** कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन संस्था (आत्मा) व्दारे शेतकऱ्यांपर्यंत तंत्रज्ञान पोहोचवून विस्तार प्रणाली शेतकरी संचलित आणि उत्तरदायी करणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेचे मुख्य घटक प्रशिक्षण, कृषि प्रात्यक्षिके, शेतकरी शैक्षणिक सहली, शेतकरी गटांची निर्मिती व क्षमतावृध्दी, शेतीशाळा, शेतकरी गोष्टी, कृषि प्रदर्शने, शेतकरी मेळावा, शेतकरी मित्र, इत्यादी आहेत. सन २०२१-२२ मध्ये ₹ ५६.०३ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर, २०२२ पर्यंत ₹ ४०.३४ कोटी खर्च झाला.

७.२९ **राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान:** या अभियानाची मुख्य उद्दिष्टे क्षेत्र व उत्पादकतेचा विस्तार शाश्वत पद्धतीने करून तांदूळ, गहू, कडधान्ये, भरड तृणधान्ये आणि पोषक तृणधान्ये यांचे उत्पादन वाढविणे, वैयक्तिक शेत जमिनीची सुपीकता आणि उत्पादकता पुनर्स्थापित करणे आणि शेतकऱ्यांमधील आत्मविश्वास पुनर्स्थापित करण्याकरिता शेती अर्थव्यवस्था सुधारणे ही आहेत. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाखालील घटकनिहाय खर्च तक्ता ७.२४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२४ राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियानाखालील घटकनिहाय खर्च**

(₹ कोटी)

| घटक | झालेला खर्च | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| भात | ४.१६ | ६.६८ | १.३९ |
| गहू | १.५४ | १.८७ | ०.४० |
| कडधान्ये | ७६.६२ | १०४.९४ | ३०.९३ |
| टिआरएफए कडधान्ये | १०.४२ | ६.९१ | २.७४ |
| भरड तृणधान्ये (मका) | ३.३७ | ४.२७ | १.१९ |
| पोषक तृणधान्ये | २४.४५ | ४७.०८ | २९.९४ |
| नगदी पिके (ऊस व कापूस) | ४.३८ | ५.१८ | १.५८ |
| तेलबिया व तेलताड | ३१.२४ | २७.८४ | २५.८४ |
| **एकूण** | **१५६.१८** | **२०४.७७** | **९४.०१** |

टीप : टिआरएफए- टारगेटींग राईस फॅलो एरिया + डिसेंबरपर्यंत

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.३० **कृषि उन्नती योजना - बियाणे व लागवड साहित्य:** या योजनेअंतर्गत ग्रामबीजोत्पादन कार्यक्रम आणि बियाणे प्रक्रिया केंद्र व साठवणूक गोदाम या दोन घटकांचा समावेश आहे.

**अ. ग्रामबीजोत्पादन कार्यक्रम:** महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ यांचेमार्फत हा कार्यक्रम राज्यात सन २०१४-१५ पासून राबविण्यात येत आहे. सदर कार्यक्रमाअंतर्गत उत्पादन वाढीकरीता शेतकऱ्यांना प्रमाणित बियाणे किफायतशीर दरात उपलब्ध करून दिले जाते. या कार्यक्रमाअंतर्गत प्रमाणित बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रति शेतकरी एक एकर क्षेत्राकरीता तृणधान्ये पिकांसाठी ५० टक्के आणि कडधान्ये व तेलबिया पिकांसाठी ६० टक्के अर्थसहाय्य दिले जाते. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ₹ १८.४६ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये जानेवारी, २०२३ अखेर ₹ ७.९१ कोटी खर्च झाला

**ब. बियाणे प्रक्रिया केंद्र व साठवणूक गोदाम:** सन २०१९-२० पासून ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. सन २०१९-२० ते २०२२-२३ मध्ये या योजनेअंतर्गत ३४ प्रकल्प पूर्ण झाले आहेत व पाच प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

७.३१ **पिकावरील किड रोग-संनिरीक्षण व सल्ला प्रकल्प:** राष्ट्रीय कृषि संशोधन संस्था व राज्यातील कृषि विद्यापीठांच्या सहकार्यातून हा ऑनलाईन प्रकल्प राज्यात राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाचे (i) प्रमुख पिकांच्या कीड व रोगांचे सर्वेक्षण आणि कीड व रोगांचे व्यवस्थापनासाठी सल्ला देणे, (ii) शेतकऱ्यांमध्ये कीड व रोगांच्या व्यवस्थापनाबाबत जागरुकता निर्माण करणे (iii) आपत्कालीन परिस्थितीत शेतकऱ्यांना अनुदान तत्वावर जैविक/रासायनिक किटकनाशकांचा पुरवठा करणे हे उद्देश आहेत. तांदूळ, सोयाबीन, कापूस, तूर, हरभरा, मका, ज्वारी आणि ऊस या पिकांचा या प्रकल्पामध्ये समावेश केला आहे. सन २०२१-२२ मध्ये सोयाबीन पिकावरील पिवळा मोझॅक, कापूस पिकावरील गुलाबी बोंड अळी, तूर पिकावरील शेंगा पोखरणारी अळी, हरभरा पिकावरील घाटे अळी, मका व ऊस या पिकांवरील फॉल आर्मी वर्म आणि उसावरील हुमणी या किडींच्या प्रादुर्भावाच्या व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला आहे. या प्रकल्पाकरीता सन २०२१-२२ मध्ये ₹ १२.४६ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ₹ ६.०० कोटी खर्च झाला असून किड व रोगाचे व्यवस्थापन विषयक सल्ल्यांचे १७५.४५ लाख एसएमएस शेतकऱ्यांना पाठविण्यात आले.

७.३२ **राष्ट्रीय फलोत्पादन अभियान** : केंद्र शासनामार्फत २००५-०६ मध्ये राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाची सुरुवात करण्यात आली. फलोत्पादनाखालील क्षेत्र व उत्पादकता वाढविणे व काढणीपश्चात व्यवस्थापन करणे या मुख्य उद्देशाने सदर अभियान राबविण्यात येत आहे. सन २०१५-१६ पासून राज्यातील ३४ जिल्हयांत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाच्या सुरुवातीपासून माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ₹ २,१६२.३४ कोटी खर्च झाला. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ व २०२२-२३ मधील भौतिक व आर्थिक प्रगती तक्ता ७.२५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.२५ राष्ट्रीय फलोत्पादन अभियान -एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानअंतर्गत भौतिक व आर्थिक प्रगती**

| घटक | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|
| | भौतिक | आर्थिक (₹ लाख) | भौतिक | आर्थिक (₹ लाख) |
| १. गुणवत्तापूर्ण लागवड साहित्याची निर्मिती | १ | ३८.२६ | २ | २२.८७ |
| २. क्षेत्र विस्तार (हे) | ३७.२९ | २६.३२ | ४४०.३७ | १०८.३७ |
| ३. जुन्या फळबागांचे पुनरूज्जीवन (हे) | २४९.८३ | ४१.९६ | २२७.२९ | ४२.०२ |
| ४. सामुहिक शेततळे (संख्या) | ४०५ | ५२१.१० | १,०३० | १,३१८.३९ |
| ५. संरक्षित शेती (हे/संख्या) | १,०२२.४७ | २८०.७७ | १,६४०.३८ | १,०६०.५२ |
| ६. एकात्मिक कीड/अन्नद्रव्ये व्यवस्थापन (संख्या) | २७ | १२.७३ | ० | ०.०० |
| ७. मधुमक्षिका पालन (संख्या) | ४ | ०.४२ | १२ | ०.९४ |
| ८. फलोत्पादन यांत्रिकीकरण (संख्या) | १,६४० | १,१९८.०२ | ५,०८१ | ४,३२५.७८ |
| ९. मनुष्यबळ विकास (संख्या) | ५,७९८ | २३७.७३ | ४,४३७ | २०५.३२ |
| १०. काढणीत्तोर व्यवस्थापन | ७८७ | १,४६०.२८ | ४६० | ७३७.४८ |
| ११. पणन सुविधा उभारणी (संख्या) | २ | ०.३० | ० | ०.०० |
| १२. अभियान व्यवस्थापन | - | ५४१.१६ | - | ३८१.५३ |
| **एकूण** | | **४,३५९.०५** | | **८,२०३.२२** |

*आधार* : कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबर पर्यंत

७.३३ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत फळबाग लागवड योजना:** सन २०११-१२ पासून राज्याच्या ३४ जिल्ह्यांमध्ये सदर योजना राबविण्यात येत आहे. रोजगार हमी जॉब कार्ड धारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे आणि रोजगार निर्मिती हे या योजनेचे उद्देश आहेत. या योजनेअंतर्गत शेतकऱ्याच्या स्वतःच्या लागवडीयोग्य किंवा पडीत शेतजमिनीत दोन हेक्टर क्षेत्रात फळबाग लागवड करता येते. लाभार्थ्यांची निवड ग्रामसभेद्वारे केली जाते. मजूर म्हणून रोजगार हमी जॉब कार्ड धारक व्यक्तिची नेमणूक

करणे या योजनेअंतर्गत अनिवार्य आहे. जिवीत फळझाडांच्या टक्केवारीनुसार अनुदानाची रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जाते. सन २०२१-२२ मध्ये राज्यात ४३,७८९ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड करण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये माहे ऑक्टोबर अखेर २७,९१८ हेक्टर क्षेत्रावर लागवड करण्यात आली आहे.

७.३४ **भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना:** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नोंदणी नसलेल्या शेतकऱ्यांसाठी १०० टक्के अनुदान असलेली भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना सन २०१८-१९ च्या खरीप हंगामापासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेची उद्दिष्टे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे, युवा शेतकऱ्यांसाठी रोजगार निर्मिती, पीक पद्धतीत बदल, उत्पन्नाचा शाश्वत स्रोत निर्माण करणे आणि कृषिप्रक्रिया उद्योगांसाठी कच्च्या मालाची उपलब्धता वाढविणे ही आहेत. या योजनेअंतर्गत एकूण १६ बहुवार्षिक फळपिके रोपांच्या लागवडीचा समावेश आहे. योजनेच्या सुरूवातीपासून माहे मार्च, २०२२ पर्यंत एकूण २५,६९८ लाभार्थी शेतकऱ्यांनी २३,५२७ हेक्टर क्षेत्रावर फळपिकांची लागवड केली आणि ₹ १२४.८७ कोटी खर्च झाला.

७.३५ **आदिवासी कुटुंबांच्या परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवडीस प्रोत्साहन:** कुपोषणाची समस्या भेडसावत असलेल्या ठाणे, पुणे, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, पालघर आणि गोंदिया या १४ आदिवासी जिल्ह्यांमध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी कुटुंबांच्या संतुलित आहारामध्ये अ आणि क जीवनसत्वे आणि लोह यासारखी खनिजद्रव्ये समाविष्ट होण्याच्या दृष्टीने त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी परसबागेत फळझाडे व भाजीपाला लागवड करण्यास प्रोत्साहन देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ७,४१२ लाभार्थी कुटुंबासाठी ₹ १७.९९ लाख खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ४,१७२ लाभार्थी कुटुंबांसाठी ₹ १६.२७ लाख खर्च झाला.

७.३६ **फळे, भाजीपाला व फुलांची निर्यात:** द्राक्षे, आंबा, डाळिंब आणि केळी ही राज्यातून निर्यात केली जाणारी प्रमुख फळे आहेत. फळे, भाजीपाला व फुलांची निर्यात आणि निर्यातीचे मूल्य तक्ता ७.२६ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.२६ फळे, भाजीपाला व फुलांची निर्यात आणि निर्यातीचे मूल्य**

| फळे / फुले | निर्यात | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) | राशि (मे.टन) | मूल्य (₹ कोटी) |
| आंबा | महाराष्ट्र | १९,१८४ | २४१ | २०,८७४ | २८३ | १५,८३५ | २६९ |
| | भारत | २१,०३४ | २७२ | २७,८७३ | ३२७ | १९,४५९ | ३१४ |
| द्राक्षे | महाराष्ट्र | १,७९,१२६ | २,०३४ | १,६५,२४५ | १,८९० | ३१,४१६ | ३५७ |
| | भारत | २,४६,१०७ | २,२९८ | २,६३,०७६ | २,३०२ | ६७,४२८ | ५१४ |
| केळी | महाराष्ट्र | १,६३,६९६ | ५५६ | २,७३,३८१ | ९२३ | १,४०,४०२ | ५५१ |
| | भारत | २,३२,५१८ | ७४० | ३,७६,५७२ | १,१७९ | २,०४,६०७ | ७२४ |
| संत्री | महाराष्ट्र | १,४६,५६५ | ४२४ | १,०७,८२६ | ३८२ | १८,४८८ | ४० |
| | भारत | १,६२,५४० | ४५४ | १,१९,५४८ | ४०६ | २१,९५० | ५४ |
| डाळिंब | महाराष्ट्र | १७,७२४ | २२४ | १६,३८१ | २३६ | ७,६१३ | १२१ |
| | भारत | ६७,९७७ | ५१७ | ९९,०४३ | ६८९ | ३१,७७२ | २५० |
| कांदा | महाराष्ट्र | ७,९६,८९८ | १,५१५ | ५,७८,४७३ | १,४०० | ८,०५,५५५ | १,५९० |
| | भारत | १५,७५,९२३ | २,८२२ | १५,३६,९०५ | ३,४३१ | १५,१७,९८८ | २,७२० |
| इतर भाजीपाला (कांदा वगळता) | महाराष्ट्र | १,१२,३६३ | ६५५ | १,०९,२४२ | ६०७ | ६९,६५९ | ४३१ |
| | भारत | ६,८२,०८६ | २,१४३ | ७,७०,२३३ | २,१६१ | ५,७०,४४० | १,५६२ |
| गुलाबाची फुले | महाराष्ट्र | १८७.५ | ११.५ | २१०.६ | १२.३ | ४७.० | २.६ |
| | भारत | ८५३.९ | २७.४ | १,१९९.० | ३६.८ | ६२२.४ | १८.३ |
| गुलाबाची रोपे | महाराष्ट्र | १५.७ | ०.९ | २१.२ | १.३ | ९९.५ | १.२ |
| | भारत | १७.० | १.० | २२.८ | १.४ | १०३.७ | १.४ |
| मनुके | महाराष्ट्र | २२,६३१ | १९५ | १७,७४१ | १५९ | १८,८२८ | १७८ |
| | भारत | २४,४०६ | २१६ | १९,५२१ | १८१ | १९,९१२ | १९२ |
| आंब्याचा गर | महाराष्ट्र | १६,८९२ | १२७ | १५,०६५ | १२८ | ५,०७४ | ६८ |
| | भारत | ९८,३७० | ७१४ | १,२३,४७७ | ९२५ | ८५,१९१ | ९१६ |
| इतर प्रक्रिया केलेली फळे व भाजीपाला$ | महाराष्ट्र | ७९,४९० | ७९३ | १,०२,३९७ | १,०६५ | ८७,०४६ | १,००१ |
| | भारत | ३,०६,९९१ | ३,१७३ | ३,७४,२६० | ३,६२६ | २,५८,४९३ | ३,०३८ |

*आधार :* कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन $आंब्याचा गर वगळता + नोव्हेंबरपर्यंत

७.३६.१ **शितगृहे:** खाजगी क्षेत्रातील शितगृहांसाठी अनुदान देण्यात येते. राज्यात खाजगी क्षेत्रात माहे डिसेंबर, २०२२ अखेर १७२ खाजगी शितगृहे असून त्यांची फळ साठवण क्षमता ३.७६ लाख मे.टन आहे.

७.३७ **पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम:** नैसर्गिक संसाधनांचे संवर्धन करून शेतीची उत्पादकता वाढविणे हे पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. राज्यातील बहुतांश क्षेत्र हे पावसावर अवलंबून असल्याने कोरडवाहू शेतीची उत्पादकता वाढविणे, जमिनीची धूप थांबविणे, जमिनीतील ओलाव्याचे संवर्धन आणि जलसंधारण याकरीता विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोटांची कामे तक्ता ७.२७ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ७.२७ पूर्ण झालेली व प्रगतीपथावरील सूक्ष्म पाणलोटांची कामे**

| योजना | सूक्ष्म पाणलोट कामांची संख्या | | जून, २०२२ पर्यंत झालेला खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | निवडलेले | पूर्ण | |
| १. विदर्भ पाणलोट विकास अभियान | १,०३२ | १,०३२ | ३६५.३६ |
| २. मराठवाडा पाणलोट विकास अभियान | २८५ | २८५ | १३७.३४ |
| ३. नदी खोरे प्रकल्प | २७१ | २२६ | ५८०.८० |
| ४. पश्चिम घाट विकास कार्यक्रम | १६० | १६० | १३७.१९ |
| ५. राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम | १,०२८ | ९५६ | २९०.५९ |
| ६. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रम | ११,०२७ | ७,९३४ | ३,०८४.७० |
| ७. नाबार्ड सहाय्यित ग्रामीण पायाभूत सुविधा विकास कार्यक्रम | ३६४ | ३६४ | ८६.८७ |
| ८. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम | १४,९३५ | १४,९३५ | ३,११६.०० |
| ९. जलयुक्त शिवार अभियान | २२,५८६ | २२,५८१ | ९,७३१.३२ |
| १०. इतर योजना (डीपीएपी, हरियाली, जवाहर, आश्वासित, इत्यादी) | ५,६८० | ५,६८० | - |

*आधार*: कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

७.३८ **जलयुक्त शिवार अभियान २.०:** राज्यात माहे जानेवारी, २०२३ पासून जलयुक्त शिवार अभियान २.० राबविण्यात येत आहे. जलयुक्त शिवार अभियान प्रथम टप्पा तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम न राबविलेल्या व गाव निवडीच्या निकषानुसार पात्र ठरणाऱ्या गावांमध्ये मृद व जलसंधारणाची कामे करणे, जलयुक्त शिवार प्रथम टप्पा तसेच इतर पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम राबविलेल्या व गावांमध्ये पाण्याची गरज असेल व अडविण्यास अपधाव शिल्लक असेल तेथे पाणलोट विकासाची कामे करणे, जलसाक्षरता द्वारे गावातील पाण्याची उपलब्धता व कार्यक्षम वापर याकरीता प्रयत्न आणि उपलब्ध भूजलाच्या माध्यमातून पाणलोट क्षेत्राचा शाश्वत विकास या बाबींचा या अभियानामध्ये समावेश आहे.

७.३९ **मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजना:** राज्यातील शेतकऱ्यांना शाश्वत सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्री कृषि सिंचन योजना राज्यात राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृषि विकास योजना - प्रति थेंब अधिक पीक या योजनेअंतर्गत अनुज्ञेय अनुदानाव्यतिरिक्त या योजनेमधून अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना २५ टक्के आणि इतर शेतकऱ्यांना ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येत आहे. सन २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण १,७४,२२२ शेतकऱ्यांना ₹ २५०.९० कोटी अनुदान वितरीत करण्यात आले आहे.

७.४० **अटल भूजल योजना:** ही योजना राज्यातील १३ जिल्ह्यातील ४२ तालुक्यातील १,३३९ ग्रामपंचायतीमधील १,४४० गावांमध्ये केंद्र शासन व जागतिक बँक अर्थसहाय्याने पाच वर्षाच्या कालावधीत राबविण्यात येत आहे. या योजनेमधून या गावांमधील अल्प व अत्यल्प भूधारक आणि इतर शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी अनुक्रमे २५ टक्के व ३० टक्के पूरक अनुदान देण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबरपर्यंत महाडिबीटी पोर्टलवरुन ११,५०९ शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून १०,३५१ शेतकऱ्यांना ₹ १३.११ कोटी पूरक अनुदानाचे वाटप करण्यात आले आहे.

७.४१ **डॉ.पंजाबराव देशमुख जैविक शेती अभियान:** सेंद्रीय शेतीला उत्तेजन देण्याच्या उद्देशाने ही गट केंद्रीत (एकूण ५० एकर शेती असलेला २० ते ३० शेतकऱ्यांचा गट) योजना राज्यात सन २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गटाला

सलग तीन वर्षांसाठी लाभ दिला जातो. पहिल्या टप्प्यात विदर्भातील बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या आपद्ग्रस्त जिल्ह्यांचा या कार्यक्रमात समावेश करण्यात आला आहे. या अभियानाच्या सुरूवातीपासून माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण १३,१०६ हेक्टर क्षेत्रासह ७,८५५ शेतकऱ्यांचे ३५५ समूह तयार करण्यात आले व ₹ ८.३० कोटी खर्च झाला.

७.४२ **मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प:** राज्यात जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने मा. बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प सन २०२०-२१ पासून सुरू केला आहे. या प्रकल्पाचा मुख्य उद्देश अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी व कृषि व्यावसायिक यांचेकरीता सर्वसमावेशक कार्यक्षम मूल्यसाखळ्या विकसित करण्यास पाठबळ देणे हा आहे. एकूण प्रकल्प खर्च ₹ २,१०० कोटी आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत ३२ जिल्ह्यांतील ४२३ समुदाय आधारीत संस्थांचे प्रकल्प/उपप्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. या समुदाय आधारीत संस्थांमध्ये शेतकरी उत्पादक कंपनी, महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्थापित झालेले महिला बचत गटांचे प्रभाग संघ, महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत स्थापित झालेले लोकसंचलित साधन केंद्र यांचा समावेश आहे. एकूण १३ जिल्हयांतील ३४८ समुदाय आधारीत संस्थांसाठी मूल्यसाखळी विकास शाळा घेण्यात आल्या. 'स्मार्ट कॉटन' हा उपप्रकल्प राज्यातील १२ जिल्हयांमधील ४६५ गावांतील ५८,२८९ शेतकऱ्यांकरीता राबविण्यात येत आहे. या उपप्रकल्पातून स्वच्छ व एकजिनसी कापूस उत्पादन घेण्यात येत असून 'स्मार्ट कॉटन' या ब्रँड नावाने ऑनलाईन कापूस विक्री केली जाते. सन २०२०-२१ व २०२१-२२ मध्ये विविध उपप्रकल्प घटकांवर अनुक्रमे ₹ ७.१६ कोटी व ₹ १७.७६ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये जानेवारी अखेर ₹ ९७.०३ कोटी खर्च झाला.

७.४३ **नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (हवामान-प्रतिरोधक शेती प्रकल्प - पोक्रा):** जागतिक बँकेच्या सहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प राज्याच्या निवडक जिल्ह्यांमध्ये हवामान-प्रतिरोधक शेती आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांचा नफा वाढवण्यासाठी राबविण्यात येत आहे. हा प्रकल्प राज्यातील एकूण ५,२२० गावांमध्ये राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत शेतकऱ्यांना व शेतकऱ्यांच्या उत्पादक संस्था/शेतकरी गट/स्वयंसहाय्यित गट यांना आर्थिक सहाय्य, मृद व जलसंधारणाची कामे, शेतशाळा, क्षमता वर्धन, कृषि-हवामान सल्लागार सेवा इत्यादी बाबी समाविष्ट आहेत. सदर प्रकल्पाचा कालावधी सहा वर्षांसाठी असून सन २०२४ पर्यंत आहे. या प्रकल्पाद्वारे चार लाख शेतकऱ्यांना ₹ २,६२५.६८ कोटी अर्थसहाय्य देण्यात आले आहे व २,६८२ कृषि व्यवसाय प्रकल्पांना ₹ २७७.८६ कोटी अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले तर मृद व जलसंधारणाची कामे पूर्ण करण्यासाठी ₹ ३८.८९ कोटी खर्च झाला आहे.

७.४४ **दहा हजार शेतकरी उत्पादक संस्थांची निर्मिती व प्रोत्साहन:** ही योजना केंद्र शासन सन २०२०-२१ पासून राबवित आहे. या योजनेची i) शाश्वत उत्पन्न केंद्रीत शेतीच्या विकासासाठी सर्वांगीण सुविधा उपलब्ध करून देणे, ii) संसाधनांचा कार्यक्षम, किफायतशीर आणि शाश्वत वापर याद्वारे शेतीची उत्पादकता वाढविणे, iii) शेती व्यवसायाच्या व्यापक व्यवस्थापनासाठी नवीन शेतकरी उत्पादक संस्थांना पाच वर्ष सहाय्य करणे आणि iv) आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य व आत्मनिर्भर होण्यासाठी कृषि व्यवसाय कौशल्य विकसित करण्याकरिता क्षमतावर्धन ही उद्दीष्टे आहेत. सन २०२१-२२ मध्ये राज्यात एकूण १२७ शेतकरी उत्पादक संस्था स्थापन करण्यात आल्या.

७.४५ **प्रधानमंत्री सूक्ष्म खाद्य उद्योग उन्नयन योजना:** ही योजना सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या पाच वर्षाच्या कालावधीत 'एक जिल्हा एक उत्पादन' या संकल्पनेवर राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत राज्यासाठी २२,२३४ सूक्ष्म अन्न प्रक्रीया उद्योगांच्या सक्षमीकरणाचा लक्ष्यांक निर्धारीत केला आहे. वैयक्तिक सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योगांना प्रकल्प रकमेच्या ३५ टक्के रक्कम पत-संलग्न भांडवली अनुदान स्वरुपात प्रति घटक ₹ १० लाख रकमेच्या कमाल मर्यादेत दिले जाते. सामायिक पायाभूत सुविधा उपक्रमांतर्गत पात्र समुहांना ₹ ३०० लाख प्रति युनिट कमाल मर्यादेसह ३५ टक्के पत-संलग्न अनुदान प्रदान केले जाईल. बीज भांडवल घटकांतर्गत स्वयंसहाय्यित गटांना महाराष्ट्र राज्य ग्रामीण उपजीविका अभियान, राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान द्वारे प्रति युनिट ₹ चार लाखांपर्यंत बीजभांडवल अर्थसहाय्य दिले जाईल. या योजनेत एकूण ३,३९३ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असून माहे जानेवारी, २०२३ पर्यंत १,७०२ प्रकल्पांना ₹ ५७.२९ कोटी अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात आली आहे.

७.४६ **मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना:** राज्यात सन २०१७-१८ पासून पाच वर्षांसाठी मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना राबविण्यात येत आहे. कृषि मालाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत प्रकल्पांना प्रोत्साहन देणे, निर्यातीस प्रोत्साहन देणे, कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगांसाठी कुशल मनुष्यबळ निर्माण करणे आणि ग्रामीण भागात लघु व मध्यम कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या योजनेच्या सुरुवातीपासून सन २०२१-२२ पर्यंत एकूण २४३ प्रकल्पांना ₹ ७९.१४ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले.

७.४७ **ग्राम कृषि विकास समितीची स्थापना:** शेतीचा सर्वांगीण विकास, नैसर्गिक साधनसंपत्तीचा महत्तम वापर, विविध योजना व प्रकल्प यामधून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करणे यासाठी प्रत्येक गावामध्ये ग्राम कृषि विकास समितीची स्थापना करणे राज्याने अनिवार्य केले आहे. एकूण १८,५३८ ग्राम कृषि विकास समित्यांची स्थापना माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत करण्यात आली आहे.

७.४८ **'विकेल ते पिकेल' अभियान:** राज्यातील शेतकरी व ग्राहकांच्या मागण्या निर्धारीत करण्याकरीता व शेतकऱ्यांना बाजारभावातील अनिश्चिततेमुळे होणाऱ्या हानीपासून संरक्षण देण्यासाठी राज्य शासनाने माहे ऑक्टोबर,२०२० पासून हे अभियान सुरु केले. विविध योजनांच्या कृति संगमाच्या माध्यमातून हे अभियान राबविण्यात येत आहे. त्यात संत शिरोमणी सावता माळी रयत बाजार अभियान अंतर्गत ताजा शेतमाल, भाजीपाला, फळे यांची थेट विक्री करण्यासाठी १४,६४३ विक्री स्थळे कार्यरत आहेत तर विक्रेता/खरेदीदार निवडून त्यामार्फत शेतमालाची विक्री करण्यासाठी ३,९७० खरेदीदारांसोबत करार करण्यात आले आहेत. तसेच सुमारे ५६,७७२ हेक्टर क्षेत्रावरील नाविन्यपूर्ण तथा बाजारपेठेत मागणी असलेल्या खरिप पिकांना (लाल भात, काळा भात, जिरेनियम, ड्रॅगनफ्रुट, विदेशी भाजीपाला, हळद, बाजरी फोर्टीफाईड, मका बेबी कॉर्न/स्वीट कॉर्न, तुती, पानपिंपरी इ.) प्रोत्साहन देण्यात आले आहे.

७.४९ **जिल्हा कृषि महोत्सव:** शेतकऱ्यांना उत्पादनापासून ते प्रक्रियेपर्यंत कृषी क्षेत्रात विकसित नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, प्रगतीशील शेतकरी, उद्योजक आणि शास्त्रज्ञ यांच्या अनुभवाची देवाणघेवाण करणे आणि पुरवठा साखळी विकसित करून थेट विपणन संबंध विकसित करण्याची संधी निर्माण करणे या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली आहे. ही योजना ३४ जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत असून त्यासाठी प्रति जिल्हा **₹** २० लाख तरतूद आहे. कृषि प्रदर्शन, परिसंवाद/कार्यशाळा, धान्य महोत्सव-थेट विपणन, खरेदीदार विक्रेते संमेलन, शेतकऱ्यांचा सत्कार, इत्यादी या योजनेचे प्रमुख घटक आहेत. सन २०२२-२३ मध्ये २६ जिल्ह्यांमध्ये जिल्हा कृषि महोत्सवांचे आयोजन करण्यात आले आणि त्यासाठी दि.१५ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत **₹** ३.५८ कोटी खर्च झाला.

७.५० **हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण : मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र** -भारत हा हळदीचा सर्वात मोठा उत्पादक आणि ग्राहक आहे. देशातील हळदीखालील क्षेत्रापैकी सुमारे २५ टक्के क्षेत्र राज्यात आहे. हळदीच्या उत्पादन, प्रक्रिया, विपणन आणि निर्यात यामध्ये येणाऱ्या अडचणींवर मात करण्याकरीता शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्यात 'हळद संशोधन आणि प्रक्रिया धोरण २०२२-२०२७' माहे सप्टेंबर, २०२२ मध्ये जाहीर करण्यात आले. या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे 'मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्र' उभारण्यात येत आहे. या केंद्राच्या स्थापनेसाठी राज्य शासनाने ₹ १०० कोटी मंजूर केले आहेत.

७.५१ **आंतरराष्ट्रीय भरडधान्ये वर्ष २०२३:** भरडधान्ये (पौष्टिक तृणधान्ये) पिकांच्या कमी मागणीमुळे या पिकांच्या क्षेत्र व उत्पादनात सातत्याने घट होत आहे. सुमारे २० वर्षापूर्वी या पिकांखालील क्षेत्र ७२.३० लाख हेक्टर व उत्पादन ५३.१६ लाख मे टन होते तर सन २०२१-२२ मध्ये या पिकांखालील क्षेत्र २३.०७ लाख हेक्टर व उत्पादन २२.६९ लाख मे टन झाले. भरडधान्ये/पौष्टिक तृणधान्यांच्या उत्पादन वाढीसाठी 'महाराष्ट्र मिलेट मिशन' राबविण्यात येत आहे. तर भरडधान्यांच्या वापरात वाढ होण्यासाठी त्यांच्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात येत आहे. तसेच 'पौष्टिक तृणधान्य विशेष महिना (मिलेट ऑफ द मन्थ)', 'शेत तिथे पौष्टिक तृणधान्य' अशा नाविन्यपूर्ण संकल्पना देखील राबविण्यात येत आहेत.

# संलग्न कार्ये

७.५२ पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, मत्स्यव्यवसाय आणि वनोत्पादन हे शेती पूरक व्यवसाय आहेत. हे व्यवसाय कुटुंबाला पूरक उत्पन्न मिळवून देण्याबरोबरच ग्रामीण भागात विशेषत: भूमिहीन मजूर, लहान व सीमांतिक शेतकरी तसेच महिलांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतात. तसेच या व्यवसायाद्वारे कमी खर्चात पोषक अन्न उपलब्ध होते.

# पशुसंवर्धन

## पशुगणना

७.५३ पशुगणना २०१९ नुसार सुमारे ३.३१ कोटी पशुधनासह राज्य देशात सातव्या क्रमांकावर व ७.४३ कोटी कुक्कुटादी पक्षांसह पाचव्या क्रमांकावर आहे. पशुगणना २०१९ नुसार निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्षी तक्ता ७.२८ मध्ये व आकडेवारीची समय मालिका परिशिष्ट ७.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.२८ पशुगणना २०१९ नुसार निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्षी**

('०००)

| राज्य | पशुधन | | | | | एकूण कुक्कुटादी पक्षी# |
|---|---|---|---|---|---|---|
| | गाई व बैल | म्हशी व रेडे | शेळ्या व मेंढ्या | इतर@ | एकूण | |
| आंध्रप्रदेश | ४,६०१ | ६,२१९ | २३,१४९ | ९९ | ३४,०६८ | १,०७,८६३ |
| गुजरात | ९,६३४ | १०,५४३ | ६,६५५ | ६१ | २६,८९३ | २१,७७३ |
| कर्नाटक | ८,४६९ | २,९८५ | १७,२२० | ३३९ | २९,०१३ | ५९,४९४ |
| मध्यप्रदेश | १८,७५१ | १०,३०७ | ११,३८९ | १९० | ४०,६३७ | १६,६६० |
| **महाराष्ट्र** | **१३,९९३** | **५,६०४** | **१३,२८५** | **१९८** | **३३,०८०** | **७४,२९८** |
| राजस्थान | १३,९३८ | १३,६९३ | २८,७४४ | ४२६ | ५६,८०१ | १४,६२३ |
| तामिळनाडू | ९,५१९ | ५१९ | १४,३८९ | ७४ | २४,५०१ | १,२०,७८१ |
| तेलंगणा | ४,२३२ | ४,२२६ | २३,९९८ | १८५ | ३२,६४१ | ७९,९९९ |
| उत्तरप्रदेश | १९,०२० | ३३,०१७ | १५,४६५ | ५११ | ६८,०१३ | १२,५१६ |
| **अखिल भारत** | **१,९३,४६३** | **१,०९,८५२** | **२,२३,१४६** | **१०,३००** | **५,३६,७६१** | **८,५१,८१०** |

@ डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे समाविष्ट # पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट

*आधार*: पशुसंवर्धन व दुग्धविकास विभाग, भारत सरकार

**आलेख ७.१०: पशुगणना नुसार कुक्कुटादी पक्षी**




**आलेख ७.११: राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्षी**



## राज्य शासकीय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा

७.५४ ग्राम स्तरापर्यंत विस्तारलेल्या शासकीय पशुवैद्यकीय संस्थांच्या यंत्रणेद्वारे पशुधनाच्या आरोग्याची निगा राखण्यासाठी राज्याने सुविधा पुरविल्या आहेत. राज्य शासकीय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा तक्ता ७.२९ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता ७.२९ राज्य शासकीय पशुवैद्यकीय पायाभूत सुविधा**

(दि.३१ मार्च, २०२२ रोजी)

| पशुवैद्यकीय विभाग | सर्वचिकित्सालये# | लघु सर्वचिकित्सालये | पशुवैद्यकीय दवाखाने | | फिरते पशुवैद्यकीय दवाखाने | एकूण# | जिल्हा कृत्रिम रेतनकेंद्रे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | श्रेणी I | श्रेणी II | | | |
| मुंबई | ६ | २० | १३८ | ३५९ | १२ | ५३५ | ५ |
| नाशिक | ५ | २५ | ३६६ | ४९१ | ६ | ८९३ | ५ |
| पुणे | ६ | २६ | ४५८ | ५५९ | ७ | १,०५६ | ५ |
| औरंगाबाद | ४ | २० | १६१ | २८८ | २ | ४७५ | ४ |
| लातूर | ५ | २० | १६४ | २९१ | ३ | ४८३ | ४ |
| अमरावती | ६ | २८ | १९१ | ३९४ | १७ | ६३६ | ५ |
| नागपूर | ७ | ३० | २६३ | ४५९ | १८ | ७७७ | ६ |
| **राज्य** | **३९** | **१६९** | **१,७४१** | **२,८४१** | **६५** | **४,८५५** | **३४** |

\# पशुवैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न सहा सर्वचिकित्सालये मुंबई, परभणी, नागपूर, शिरवळ (सातारा), उदगीर (लातूर) आणि अकोला समाविष्ट

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.५५ विविध आजारांकरिता पशुवैद्यकीय सेवा पुरविण्यासोबत लसीकरण कार्यक्रमही पशुवैद्यकीय संस्थांमार्फत राज्यात राबविले जातात. पशुवैद्यकीय उपचार व लसीकरणाबाबतची माहिती तक्ता ७.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३० पशुवैद्यकीय उपचार आणि लसीकरण**

('०००)

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| सामान्य उपचार | १५,४७९ | १४,२५२ | ८,११० |
| खच्चीकरण | ७६१ | ६८९ | ३०४ |
| मोठी शस्त्रक्रिया | ४३ | ४७ | २५ |
| लघु शस्त्रक्रिया | ४२६ | ३७५ | १५१ |
| लसीकरण (कुक्कुटादी पक्ष्यांसह) | ४८,४९० | ३२,१२२ | ३५,२३९ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## कृत्रिम रेतन

७.५६ पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील गोठीत वीर्य प्रयोगशाळांमध्ये वीर्य नळ्या तयार केल्या जातात आणि राज्यातील ३४ जिल्हा कृत्रिम रेतन केंद्रांमार्फत पशुवैद्यकीय संस्थांना वितरीत केल्या जातात. कृत्रिम रेतन विषयक माहिती तक्ता ७.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३१ कृत्रिम रेतन विषयक माहिती**

('०००)

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| **१) गायी (कृत्रिम रेतन)** | **१,५०७** | **२,०२७** | **७३६** |
| विदेशी | १५८ | २०१ | ७१ |
| संकरीत | ९०० | १,३६० | ४३४ |
| देशी | ४४९ | ४६६ | २३१ |
| **जन्मलेल्या वासरांची संख्या** | **५५८** | **६९२** | **२७१** |
| संकरीत | ४१३ | ५२५ | १९३ |
| देशी | १४५ | १६८ | ७८ |
| **२) म्हशी (कृत्रिम रेतन)** | **५९४** | **८८५** | **२७०** |
| **जन्मलेल्या रेडकांची संख्या** | २२९ | ३०८ | १०१ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम

७.५७ उच्च अनुवांशिक गुणवत्तेचे वळू वीर्य वापरुन गाई आणि म्हशींच्या अनुवांशिक उन्नतीच्या उद्देशाने राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये (कोल्हापूर वगळता) राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम टप्पा-१, टप्पा-२ व टप्पा -३ अनुक्रमे सन २०१९-२०, सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये राबविण्यात आला. राष्ट्रीय कृत्रिम रेतन कार्यक्रम टप्पा-४ राज्यात माहे ऑगस्ट, २०२२ पासून राबविण्यात येत आहे. या कार्याक्रांतर्गत माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ३१.१५ लाख कृत्रिम रेतने करण्यात आली व ₹ ९.५० कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय गोकुळ अभियान

७.५८ राष्ट्रीय गोकुळ अभियान राज्यामध्ये सन २०१४-१५ पासून खालील उद्दिष्टांसह राबविण्यात येत आहे.

- गायी व म्हशींच्या देशी जातींचा विकास आणि संवर्धन
- रोगमुक्त उच्च अनुवांशिक गुणवत्ता असणाऱ्या गायी व म्हशींची संख्या वाढवून दुधाचे उत्पादन व गायी व म्हशींची उत्पादकता वाढविणे आणि रोग प्रसार नियंत्रण
- उच्च अनुवांशिक गुणवत्तेचे जनन पेशी द्रव्य वापरून कृत्रिम रेतन किंवा नैसर्गिक सेवेद्वारे सर्व प्रजननक्षम गायी व म्हशींना सुनियोजित प्रजनन धोरणाअंतर्गत समाविष्ट करणे
- शेतकऱ्यांच्या दारी दर्जेदार कृत्रिम रेतन सेवेची व्यवस्था उपलब्ध करुन देणे

७.५८.१ माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत केंद्रशासनाने ₹ ६८.९७ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. राष्ट्रीय गोकुळ अभियानाची प्रगती तक्ता ७.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३२ राष्ट्रीय गोकुळ अभियानाची प्रगती**

(₹ कोटी)

| घेतलेले उपक्रम | झालेला खर्च |
|---|---|
| दोन वळू माता प्रक्षेत्रांचे बळकटीकरण आणि प्रत्येक वळू माता प्रक्षेत्रावर ६०० उच्च वंशावळीच्या गवळाऊ गायी व पंढरपुरी म्हशींची खरेदी | ८.३० |
| भ्रूण प्रत्यारोपण आणि कृत्रिमरित्या गर्भधारणा प्रयोग शाळेची उभारणी / बळकटीकरण करणे | ११.०९ |
| अनुवांशिक गुणवत्तेच्या वळूचे लिंगविनिश्चित केलेल्या वीर्यमात्रांची खरेदी | ०.८१ |
| पशुसंजीवनी (जनावरांची ओळख पटविण्यासाठी टॅग व टॅग ॲप्लीकेटर खरेदी, टॅबलेट खरेदी व संगणकीकरण, पशुआरोग्य पत्रिकांची छपाई, इ.) | ३.८२ |
| इतर (वाळूंची खरेदी, ब्रीडर संघटनांची स्थापना, प्रशिक्षण, व्यवस्थापकीय खर्च, जैव विघटनशील हातमोज्यांची खरेदी करणे, कृत्रिम रेतन साहित्य खरेदी, इ.) | ७.४२ |

*आधार:* पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय पशुधन अभियान

७.५९ केंद्र शासनाने सन २०१४-१५ पासून सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता शेळी, मेंढी, कुक्कुट, डुक्कर, पशुधन विमा, खाद्य व चारा विकास, कौशल्य विकास, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि पशुसंवर्धन विस्तार कार्य या संबंधित विविध योजना एकत्रित करून राष्ट्रीय पशुधन अभियान सुरु केले. सन २०२१-२२ पासून राष्ट्रीय पशुधन अभियानाची सुधारीत करून पुनर्रचना करण्यात आली आहे. सुधारित अभियानाचा उद्देश रोजगार निर्मिती, उद्योजकता विकास, प्रति पशु उत्पादकता वाढवणे आणि असंघटित क्षेत्रामध्ये उत्पादित होण्याऱ्या उत्पादनांना विक्री करीता संघटित क्षेत्राशी जोडणे हा आहे. पुनर्रचित राष्ट्रीय पशुधन अभियानाची पशुधन व कुक्कुट प्रजाती विकास, पशु खाद्य व वैरण विकास आणि नाविन्य पूर्ण योजना व विस्तार अशी तीन उप-अभियाने आहेत. पुनर्रचित अभियानांतर्गत सन २०२२-२३, नोव्हेंबर पर्यंत ऑनलाईन पोर्टलवर २,३७५ प्रस्ताव प्राप्त आहेत.

## पशुधन विमा योजना

७.६० पशुधन विमा योजना राज्यात सन २००६-०७ पासून महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत राबविण्यात येत आहे. पशुंचा नैसर्गिक आपत्ती, अपघात अथवा रोगामुळे झालेल्या आकस्मिक मृत्यूमुळे होणाऱ्या नुकसानीपासून पशुधारकांना संरक्षण देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजने साठी केंद्रशासनाने सन २०२१-२२ करिता ₹ २.१२ कोटी निधी तर सन २०२२-२३ करिता ₹ ५.०३ कोटी निधी मंजूर केला आहे.

## राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम

७.६१ लाळ्या-खूरकुत आणि ब्रुसेलोसीस या रोगांवर सन २०२४-२५ पर्यंत प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी आणि सन २०२९-३० पर्यंत त्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी राष्ट्रीय पशु रोग नियंत्रण कार्यक्रम राज्यात सन २०१९-२० पासून राबविण्यात येत आहे.

७.६१.१ लसीकरणाच्या पहिल्या फेरीत दि.१ सप्टेंबर, २०२० ते दि.३० नोव्हेंबर, २०२० पर्यंत १.४७ कोटी पशूंना लाळ्या-खूरकुतची लस देण्यात आली. लसीकरणाच्या दुसऱ्या फेरीत दि.१५ सप्टेंबर, २०२१ ते दि.३१ जानेवारी, २०२२ पर्यंत १.६९ कोटी पशूंचे लसीकरण करण्यात आले. दि.८ डिसेंबर, २०२२ पासून लसीकरणाची तिसरी फेरी सुरु असून माहे डिसेंबर, २०२२ अखेर १९.२२ लाख पशूंचे लसीकरण करण्यात आले आहे .

७.६१.२ राज्यात दि. १ जुलै, २०२२ पासून ब्रुसेलोसीस प्रतिबंधात्मक लसीकरण सुरु झाले असून या अंतर्गत चार ते आठ महिन्यांच्या सर्व गायवर्गीय कालवडी व म्हैसवर्गीय पारड्यांना आजीवन प्रतिबंधात्मक एक लस मात्रा देण्यात येत आहे. माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर २.७३ लक्ष गायवर्गीय कालवडी व म्हैसवर्गीय पारड्यांचे लसीकरण करण्यात आले आहे.

## *लम्पी स्कीन डिसीस*

७.६२ राज्यात सन २०२०-२१ पासून *लम्पी स्कीन डिसीस* चा प्रादुर्भाव झाला आहे. राज्यात *लम्पी स्कीन डिसीस* चा प्रादुर्भाव मर्यादित राखण्यासाठी प्राण्यांमधील संक्रामक व सांसर्गिक रोगास प्रतिबंध व नियंत्रण कायदा, २००९ लागू करण्यात आला. संसर्गजन्य रोगांचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करून आर्थिक नुकसान कमी करण्यासाठी राज्य, विभाग आणि जिल्हास्तरीय कृतीदलांची स्थापना करण्यात आली आहे.

७.६२.१ सन २०२०-२१ मध्ये २५ जिल्ह्यातील २.६८ लाख गोवर्गीय पशूना *लम्पी स्कीन डिसीस* ची बाधा झाली. केंद्र शासनाने ₹ ३०.८५ लाख निधी वितरीत केला असून २०.१४ लाख गोवर्गीय पशुंचे लसीकरण करण्यात आले. सन २०२१-२२ मध्ये १० जिल्ह्यातील ३६,३०४ गोवर्गीय पशूंना *लम्पी स्कीन डिसीस* ची बाधा झाली व १२.७३ लाख गोवर्गीय पशुंचे लसीकरण करण्यात आले. सन २०२२-२३, डिसेंबर अखेर *लम्पी* चा प्रसार चार लाख गोवर्गीय पशूंसह ३५ जिल्ह्यात झाला आणि १३८.९ लाख गोवर्गीय पशुंचे लसीकरण करण्यात आले.

७.६२.२ राज्यात सन २०२०-२१ मध्ये उद्भवलेल्या *लम्पी* च्या पहिल्या प्रादुर्भावा पासून डिसेंबर,२०२२ अखेर २८,४३७ गोवर्गीय पशू दगावले. दगावलेल्या पशुधनासाठी १६,५३९ पशुपालकांस ₹ ४१.८८ कोटी नुकसान भरपाई अदा करण्यात आली.

## विदर्भ व मराठवाडा विभागातील दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प

७.६३ राज्य शासनाने राष्ट्रीय दुग्धविकास मंडळ व मदर डेअरी फ्रूट अँड व्हेजिटेबल प्रा. लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भ व मराठवाडा जिल्ह्यातील अकोला, अमरावती, बुलढाणा, चंद्रपूर, जालना, लातूर, नागपूर, नांदेड, उस्मानाबाद, वर्धा व यवतमाळ या ११ जिल्ह्यांमध्ये दूध उत्पादन वाढविण्यासाठी विशेष प्रकल्प सुरू केला आहे. या प्रकल्पाअंतर्गत वैरण विकास कार्यक्रम राबविणे, दर्जेदार पशुखाद्य पुरविणे, पशुखाद्य पूरक आहार (खनिज मिश्रण) पुरविणे तसेच शेतकऱ्याच्या दारात कृत्रिम रेतन सेवा, लसीकरण, गोचिड व गोमाश्यांचे निर्मूलन, वंध्यत्व व उपचार शिबिरे इत्यादी पशुवैद्यकीय सेवा समाविष्ट आहेत. सन २०२१-२२ मध्ये नोव्हेंबर पर्यंत, ११.३६ लाख कृत्रिम रेतन, ५.५८ लाख पशुंवर वंध्यत्व निवारण उपचार, ५१.४६ लाख पशुंवर विविध आजारांसाठी उपचार आणि ११८.४४ लाख लसीकरण करण्यात आले. या योजनेवर माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ₹ ४५.७२ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळाने २७,११७ ग्रामस्थांकडून १,८८५ दूध संकलन केंद्राद्वारे ६१९ लाख लिटर (२,४५,१३२ लिटर प्रतिदिन) दूध संकलन केले.

## मुख्यमंत्री पशु आरोग्य योजना

७.६४ राज्यातील ग्रामीण भागांमध्ये अतिदुर्गम, डोंगराळ व आदिवासी गावांमध्ये पशु वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन देण्याकरिता फिरते पशुवैद्यकीय दवाखाने स्थापित करणे हा मुख्यमंत्री पशु आरोग्य योजनेचा उद्देश आहे. या फिरत्या पशुवैद्यकीय दवाखान्यांद्वारे शेतकरी/पशुपालकांना त्यांच्या दारात पशु आरोग्य सेवा उपलब्ध झाली आहे. प्रतिबंधात्मक लसीकरण, कृत्रिम रेतन या सेवा तसेच पशुंचा आहार, आरोग्याबाबत मार्गदर्शन आणि विविध योजनांची माहितीदेखील या दवाखान्यांद्वारे पुरविण्यात येते. माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर एकूण ७३ फिरते पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत असून या सेवेसाठी कॉल सेंटर स्थापित केले आहे. माहे मे, २०२१ ते मार्च, २०२२ या कालावधीत ४५,२७६ शेतकऱ्यांनी/पशुपालकांनी विविध सेवांचा ऑनलाइन लाभ घेतला तर ५,०१० पशूंना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला. एप्रिल, २०२२ ते नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत ३७,८०१ शेतकऱ्यांनी/पशुपालकांनी विविध सेवांचा सेवांचा ऑनलाइन लाभ घेतला तर ६,१४८ पशूंना प्रत्यक्ष लाभ देण्यात आला.

## वैरण विकास

७.६५ राज्यामध्ये जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत चारा लागवड व चारा उत्पादनासाठी योजना राबविण्यात येत आहे. सन २०२१-२२ मध्ये ३०.६० हजार हेक्टर क्षेत्रासाठी ६५८.७६ लाख ठोंबे व १,२६६.८ मे.टन वैरण बियाणे वितरीत करण्यात आले व ₹ १३.१७ कोटी खर्च झाला असून २५.८४ लाख मे.टन चारा उत्पादन अपेक्षित होते.

## राजे यशवंतराव होळकर महामेष योजना

७.६६ भटक्या जमाती-क प्रवर्गातील लाभधारकांना मेंढीपालनासाठी प्रोत्साहन देण्याचा राजे यशवंतराव होळकर महामेष या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत मेंढी गट (२० मादी + एक नर) वाटप, सुधारीत प्रजातीचे नर मेंढ्यांचे वाटप, मेंढी पालनासाठी पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देणे व संतुलित खाद्य उपलब्ध करुन देणे या बाबींसाठी ७५ टक्के अनुदान आणि कुट्टी केलेल्या हिरव्या चाऱ्याचा मुरघास बनवण्याकरिता गासड्या बांधण्याचे यंत्र खरेदी करणे व पशुखाद्य कारखाने उभारणे यासाठी ५० टक्के अनुदान देण्यात येते. सन २०१९-२० ते २०२१-२२ या कालावधीत, एकूण १,३०३ लाभार्थ्यांना मेंढी गटांचे वाटप करण्यात आले तर १३९ लाभार्थ्यांना मेंढी पालनासाठी पायाभूत सुविधा पुरविल्या आणि २३६ लाभार्थ्यांना सुधारीत प्रजातीच्या नर मेंढ्यांचे वाटप करण्यात आले असून १,६०० मेंढ्यांना संतुलित खाद्य पुरविण्यात आले.

७.६७ पशुपालनाद्वारे ग्रामीण भागातील गरिबांचे जीवनमान उंचावणे, उद्योजकता निर्माण करणे आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मिती करणे याकरिता राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. निवडक राज्यस्तरीय योजनांची प्रगती तक्ता ७.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.३३ निवडक राज्यस्तरीय योजनांची प्रगती**

| योजना | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ लाख) |
| ६/४/२ दुधाळ जनावरांचे गट वाटप योजना | २,१२४ | ९६० | १,९२२ | ८९७ | ६,१३३ | २,८०७ |
| अंशत: ठाणबंद १० शेळ्या व एक बोकड गट वाटप | १,८४८ | ८२९ | १,६५६ | ७३० | ५,६०२ | २,७७४ |
| १,००० मांसल कुक्कुट पक्षी संगोपनाद्वारे कुक्कुट पालन जोडधंदा सुरु करणे | ६७४ | ८७९ | ४९२ | ५९१ | १,२१७ | १,५२९ |

*आधार* : पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## कुक्कुट विकास

७.६८ राज्यामध्ये औरंगाबाद, कोल्हापूर, नागपूर व पुणे येथे मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांची स्थापना खालील उद्देशाने करण्यात आली आहे.

- सुधारीत जातींची कुक्कुट पिल्ले, तलंगा व उबवणुकीची अंडी यांचे उत्पादन करणे आणि शेतकऱ्यांना शासन मान्य दराने विक्री करणे
- सुधारित जातींची एक दिवसीय कुक्कुट पिल्ले, अंडी, नर-मादी पक्ष्यांचे व तलंगांचे लाभार्थ्यांना विविध योजनेअंतर्गत वाटप करण्याची व्यवस्था करणे
- ग्रामीण भागात कुक्कुट पालन व्यवसाय करण्यासाठी सुधारित जातींच्या पक्ष्यांचा पुरवठा करणे
- शेतकरी, महिला स्वयंसहाय्य गट, सुशिक्षित बेरोजगार युवक, विद्यार्थी, इत्यादिंना कुक्कुटपालन व्यवसायासाठी प्रशिक्षण देणे
- शेतकऱ्यांना तांत्रिक सल्ला देणे व कुक्कुट पालन व्यवसाय करण्यास प्रोत्साहित करणे

मध्यवर्ती अंडी उबवणी केंद्रांमधून सन २०२०-२१ मध्ये ३.३९ लाख पक्ष्यांचा तर सन २०२१-२२ मध्ये ३.६० लाख पक्ष्यांचा पुरवठा करण्यात आला.

## स्वयं प्रकल्प

७.६९ राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांतील अनुसूचित क्षेत्रातील अंगणवाड्यामधील मुलांच्या आहारामध्ये अंड्यांचा समावेश करण्यासाठी पुरवठा करणे व स्वयंरोजगारनिर्मिती करणे यासाठी सन २०१७-१८ पासून हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या प्रकल्पाअंतर्गत लाभार्थ्यांना चार आठवडे वयाचे ४५ कुक्कुट पक्षी वाटप करण्याकरिता १०४ पक्षी संगोपन केंद्रे स्थापन करणे हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. उत्पन्नाचा कायमस्वरुपी व प्रभावी स्रोत उपलब्ध होण्याच्या उद्देशाने पुरविलेल्या ४५ पक्ष्यांचे गट घरगुती पध्दतीने अंडी उबवून १०० पक्ष्यांपर्यंत वाढविण्यास लाभार्थ्यांना प्रोत्साहीत केले जाते. या प्रकल्पाद्वारे उत्पादित झालेली अंडी अंगणवाडीतील मुलांना प्रथिन युक्त पोषणासाठी वाटप करण्यात येतात. या प्रकल्पाचा एकूण खर्च ₹ २२.५६ कोटी आहे. लाभार्थ्यांचे क्षमतावर्धन

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनन्नोती अभियानाअंतर्गत करण्यात येते. सन २०२१-२२ पर्यंत एकूण १०० पक्षी संगोपन केंद्रांची स्थापना झाली असून चार आठवडे वयाचे १५.४० लाख पक्षी ४०,९६३ लाभार्थ्यांना वितरित केले आहेत.

## बर्ड फ्लू आणि इतर आजारांवर नियंत्रण

७.७० राज्याने सन २०२१ मध्ये *एव्हियन इन्फ्लुएंझा* (बर्ड फ्लू) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वेळीच सुधारात्मक उपाययोजना केल्याने या रोगांचा प्रादुर्भाव मर्यादित राखणे शक्य झाले. पक्षी नष्ट केल्याने झालेल्या नुकसानीची भरपाईही देण्यात आली.

७.७०.१ प्रतिबंधात्मक उपाय म्हणून, एव्हीयन इन्फ्लुएंझा कृती योजना, २०२१ नुसार बाधित पोल्ट्री फार्मच्या एक किमी परिघात असलेल्या सर्व कुक्कुट पक्षी, अंडी, पोल्ट्री फीड आणि पोल्ट्री फार्ममधील विष्ठा शास्त्रोक्त पद्धतीने नष्ट करण्यात आली. सन २०२१-२२ मध्ये बाधित भागातील १०.६६ लाख कुक्कुट पक्षी, ६०.७६ लाख अंडी आणि ३२२ मेट्रिक टन पोल्ट्री फीड नष्ट करण्यात आले आणि पोल्ट्री व्यावसायिकांना ₹ १३.०१ कोटी नुकसान भरपाई देण्यात आली.

## प्रमुख पशुधन उत्पादने

७.७१ सन २०२०-२१ मध्ये महाराष्ट्र मांस उत्पादन करणारे पहिल्या क्रमांकाचे (१२.६ टक्के हिश्श्यासह) राज्य होते. दूध उत्पादनात राज्याचा सहावा क्रमांक असून राष्ट्रीय स्तरावरील प्रतिदिन दरडोई ४२७ ग्रॅम उपलब्धतेच्या तुलनेत राज्यात दुधाची उपलब्धता प्रतिदिन दरडोई ३०५ ग्रॅम आहे. अंडी उत्पादनात राज्याचा पाचवा क्रमांक असून राज्यात अंडी उपलब्धता प्रतिवर्ष दरडोई ५२ आहे, तर राष्ट्रीय स्तरावर हे प्रमाण प्रतिवर्ष दरडोई ९८ आहे. राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन तक्ता ७.३४ मध्ये तसेच निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे सन २०२०-२१ मधील उत्पादन तक्ता ७.३५ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.३४ राज्यातील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे उत्पादन**

| वर्ष | मांस ('००० मे.टन) | दूध ('००० मे.टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| २०१८-१९ | १,०२१<br>(१२.६) | ११,६५५<br>(६.२) | ५९६<br>(५.७) | १,४५७<br>(३.६) |
| २०१९-२० | १,१४०<br>(१३.३) | १२,०२४<br>(६.१) | ६३७<br>(५.६) | १,४१२<br>(३.८) |
| २०२०-२१ | १,१०९<br>(१२.६) | १३,७०३<br>(६.५) | ६४०<br>(५.३) | १,५५०<br>(४.२) |

टीप : कंसातील आकडे अखिल भारताशी टक्केवारी दर्शवितात

*आधार*: बेसिक ॲनिमल हस्बंडरी स्टॅटिस्टिक्स -२०२१, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, केंद्र शासन

**तक्ता ७.३५ निवडक राज्यांमधील पशुधन व कुक्कुटादी पक्ष्यांपासून मिळणारे सन २०२०-२१ मधील उत्पादन**

| राज्य | मांस ('००० मे.टन) | दूध ('००० मे.टन) | अंडी (कोटी) | लोकर ('००० कि.ग्रॅ) |
|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | ९५४ | १४,७१४ | २,४९६ | ० |
| गुजरात | ३३ | १५,८५३ | १९३ | २,००४ |
| कर्नाटक | ३६४ | १०,९३६ | ७६२ | १,०५२ |
| मध्यप्रदेश | ११६ | १७,९९९ | २६५ | ४३१ |
| **महाराष्ट्र** | **१,१०९** | **१३,७०३** | **६४०** | **१,५५०** |
| राजस्थान | २१३ | ३०,७२३ | २८० | १५,६७६ |
| तामिळनाडू | ६६९ | ९,७९० | २,०१२ | २ |
| तेलंगणा | ९२० | ५,७६५ | १,५८५ | ३,३६६ |
| उत्तरप्रदेश | १,०३८ | ३१,३५९ | ३६३ | ८८६ |
| **अखिल भारत** | **८,७९८** | **२,०९,९६०** | **१२,२०५** | **३६,९३१** |

*आधार* : बेसिक ॲनिमल हस्बंडरी स्टॅटिस्टिक्स -२०२१, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, केंद्र शासन

## दुग्धविकास

७.७२ दुग्ध व्यवसाय हा कृषि पूरक व्यवसाय असून त्यात ग्रामीण कुटुंबांच्या पोषण मुल्यांचा स्तर उंचावण्याबरोबरच अतिरिक्त उत्पन्न व रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची क्षमता आहे. दूध उत्पादन व दुधाची दरडोई उपलब्धता तक्ता ७.३६ मध्ये तर विभागनिहाय दूध उत्पादन तक्ता ७.३७ मध्ये दिले आहे.

**आलेख ७.१२: सहकारी व शासकीय दुग्धशाळांकडून सरासरी दैनिक दूध संकलन**




**तक्ता ७.३६ दूध उत्पादन व दुधाची दरडोई उपलब्धता**

| वर्ष | दूध उत्पादन (लाख मे.टन) | | दुधाची दरडोई उपलब्धता (ग्रॅम प्रतिदिन) | |
|---|---|---|---|---|
| | राज्य | अखिल भारत | राज्य | अखिल भारत |
| २०१८-१९ | ११६.५५ | १,८७७.४९ | २६४ | ३९० |
| २०१९-२० | १२०.२४ | १,९८४.४० | २६९ | ४०६ |
| २०२०-२१ | १३७.०३ | २,०९९.६० | ३०५ | ४२७ |

*आधार*: बेसिक ॲनिमल हस्बंडरी स्टॅटिस्टिक्स -२०२१, पशुसंवर्धन व दुग्ध विकास विभाग, केंद्र शासन

**तक्ता ७.३७ विभागनिहाय दूध उत्पादन**

(लाख मे. टन)

| विभाग | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|---|
| कोकण | ५.५२ | ५.७० | ४.६४ |
| नाशिक | ३३.३४ | ३४.४० | ३६.६८ |
| पुणे | ४९.५८ | ५१.१४ | ६२.४१ |
| औरंगाबाद | १७.०४ | १७.५८ | २०.८६ |
| अमरावती | ६.१० | ६.२९ | ६.५१ |
| नागपूर | ४.९७ | ५.१३ | ५.९३ |
| **राज्य** | **११६.५५** | **१२०.२४** | **१३७.०३** |

*आधार*: पशुसंवर्धन आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.७३ राज्यात मार्च, २०२२ अखेर १३५.७२ लाख लिटर प्रतिदिन क्षमतेचे १०३ दूध प्रक्रिया प्रकल्प व ३६.५७ लाख लिटर प्रतिदिन क्षमता असलेले १२२ दूध शीतकरण केंद्रे सहकारी क्षेत्रात कार्यरत होती. शासकीय व सहकारी दुग्धशाळांचे दैनिक सरासरी दूध संकलन सन २०२१-२२ मध्ये ०.३९ लाख लिटर व ४०.२५ लाख लिटर होते तर सन २०२२-२३, नोव्हेंबर अखेर ०.०६ लाख लिटर व ३७.९२ लाख लिटर होते. राज्यात सन २०२२-२३ मध्ये २१५ शीतगृहे असून त्यांची क्षमता ११,२७६ मे.टन आहे, त्यापैकी १०,८८१ मे.टन क्षमतेची १९६ शीतगृहे खाजगी क्षेत्रात आहे.

**आलेख ७.१३: दुधाची दरडोई उपलब्धता व उत्पादन २०२०-२१**



## मत्स्यव्यवसाय

७.७४ राज्यास ७२० किमी लांबीचा सागरी किनारा लाभला असून सागरी मासेमारीयोग्य क्षेत्र १.१२ लाख चौ. किमी आहे. सागरी किनाऱ्यावर मासळी उतरविण्यासाठी राज्याने १७३ केंद्रे विकसित केली आहेत. सन २०२१-२२ मध्ये सागरी मासेमारीसाठी १५,२२४ मच्छीमार नौका कार्यरत असून त्यापैकी १३,१७२ यांत्रिक नौका होत्या.

७.७४.१ राज्यात ३.४९ लाख हेक्टर क्षेत्र गोड्या पाण्यातील व ०.१७ लाख हेक्टर क्षेत्र निमखाऱ्या पाण्यातील मासेमारीसाठी योग्य आहे. गोड्या पाण्यातील मासेमारीची गरज भागवणारी ३२ मत्स्यबीज उत्पादन केंद्रे राज्यात असून त्यांची प्रतिवर्ष उत्पादन क्षमता १८०.२५ कोटी मत्स्यबीज होती. मत्स्य उत्पादन व निर्यात तक्ता ७.३८ मध्ये दिला आहे.

७.७५ राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत सन २०११-१२ पासून ₹ १७७ कोटी रकमेच्या २५ मासेमारी धक्क्यांच्या विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला असून यापैकी १५ धक्क्यांची कामे पूर्ण झाली व सात धक्क्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

**तक्ता ७.३८ मत्स्य उत्पादन व निर्यात**

| बाब | परिमाण | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| **मत्स्य उत्पादन** | लाख मे.टन | | | |
| सागरी | | ३.९९ | ४.३३ | ०.४५ |
| गोड्या पाण्यातील | | १.२५ | १.५७ | ०.३१ |
| **एकूण** | | **५.२४** | **५.८९** | **०.७६** |
| **स्थूलमूल्य** | ₹ कोटी | | | |
| सागरी | | ६,००६ | ६,६५५ | १,०८८ |
| गोड्या पाण्यातील | | १,६५९ | १,९१५ | उ ना |
| **एकूण** | | **७,६६५** | **८,५७०** | **१,०८८** |
| **मत्स्य निर्यात** | | | | |
| उत्पादन | लाख मे.टन | १.११ | १.८६ | उ ना |
| मूल्य | ₹ कोटी | ३,६८१ | ५,८७८ | उ ना |

उ ना उपलब्ध नाही + जूनपर्यंत

*आधार* : मत्स्यव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजना

७.७६ केंद्र शासनाने दि.२० मे, २०२० रोजी प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजना पाच वर्षांच्या कालावधीसाठी सुरू केली. मत्स्य उत्पादन आणि उत्पादकता यातील लक्षणीय तफावत दूर करणे, गुणवत्ता, तंत्रज्ञान, हंगाम पश्चात आवश्यक असणारी पायाभूत सुविधा व व्यवस्थापन, आधुनिकीकरण व मूल्य साखळीचे सक्षमीकरण, भक्कम मत्स्य व्यवसाय व्यवस्थापन आणि मच्छिमारांचे कल्याण या बाबी विचारात घेऊन या योजनेची आखणी केली आहे.

७.७६.१ या योजनेअंतर्गत सन २०२०-२१ करिता, राज्यस्तरीय मान्यता आणि संनियंत्रण समितीने ३७६ लाभार्थ्यांसाठी एकूण ₹ ६३.७५ कोटी रक्कम मंजूर केली होती, त्यापैकी केंद्राचा हिस्सा ₹ २०.०९ कोटी, राज्याचा हिस्सा ₹ १३.३९ कोटी आणि लाभार्थींचा हिस्सा ₹ ३०.२७ कोटी होता तर सन २०२१-२२ मध्ये समितीने ₹ २१६.५४ कोटी १,१४२ लाभार्थ्यांसाठी मंजूर केले होते. त्यापैकी केंद्राचा हिस्सा ₹ ७१.८५ कोटी, राज्याचा हिस्सा ₹ ४७.९० कोटी आणि लाभार्थींचा हिस्सा ₹ ९६.७९ कोटी होता.

७.७६.२ प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मंजूर प्रमुख उपक्रम तक्ता ७.३९ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता ७.३९ प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत मंजूर उपक्रम**

(२०२१-२२)

| उपक्रम | लाभार्थी संख्या | मंजूर रक्कम (₹ कोटी) |
|---|---|---|
| भूजलाशयीन पिंजरा मत्स्यसंवर्धन अंतर्गत पिंजऱ्यांची उभारणी | ८३ | ४१.५२ |
| लहान /मध्यम /मोठ्या आकाराचे पाणी पुन:वापर मत्स्यपालन प्रणालीची स्थापना | २३५ | ४१.१८ |
| शीतगृह / बर्फ कारखाना (किमान १०/२०/३०/५० टन क्षमता) स्थापना करणे | ३७ | ३७.०६ |
| मत्स्य खाद्य कारखाना (२/८/२० टन क्षमता) उभारणी | ४६ | २२.१० |
| नवीन मत्स्य संगोपन तलाव बांधकाम | १११ | ६.८८ |
| खुल्या समुद्रातील पिंजरा मत्स्यसंवर्धन (१००-१२० घन मीटर) | ९ | ४.५० |
| मत्स्य, कोळंबी, पंगॅशियस, तिलापीया इत्यादी संवर्धनाकरीता निविष्ठा अनुदान | १११ | ३.९३ |
| भूजलाशयीन क्षेत्रामध्ये बायोफ्लॉक उभारणी ₹ चार लक्ष प्रति हेक्टर निविष्ठा खर्चासह | २४ | ३.७६ |
| गोड्या पाण्यातील मत्स्यबीज उत्पादन केंद्राची स्थापना | १२ | ३.०० |
| इतर उपक्रम | ४७४ | ५२.६१ |

*आधार* : मत्सव्यवसाय आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

७.७७ प्रधान मंत्री मत्स्य संपदा योजनेअंतर्गत राज्यातील मत्स्योत्पादन वाढविण्यासाठी पिंजरा पद्धतीने मत्स्यसंवर्धन योजना राबविण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये राज्यातील भुजलाशयीन क्षेत्रातील ९७ जलाशयामध्ये ६,४५४ पिंजरे स्थापित करण्यास मंजुरी दिली असून योजनेच्या सुरुवाती पासून माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ५,६६४ पिंजरे स्थापित करण्यात आले व त्यापासून ११,३२८ मे.टन मासळीचे उत्पादन अपेक्षित आहे.

७.७८ मच्छिमारांच्या जाळ्यात अडकलेले व्हेल, शार्क, डॉल्फिन, समुद्री कासव, इत्यादी वन्यजीव(संरक्षण) कायदा, १९७२ नुसार समुद्रातील संरक्षित प्राणी यांना जाळे कापून परत समुद्रात सोडण्यासाठी मच्छिमारांना प्रोत्साहित केले जाते. यासाठी राज्यात मच्छिमारांसाठी भरपाई योजना राबविण्यात येत आहे. या प्राण्यांना यशस्वीरित्या समुद्रात परत सोडल्यानंतर आणि पुरावे सादर केल्यावर मच्छीमारांना आर्थिक स्वरूपात नुकसान भरपाई (प्रत्येक प्रकरणी कमाल ₹ २५,०००) देण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये एकूण १०१ संरक्षित प्राणी मुक्त केल्यामुळे मच्छीमारांना ₹ १३.७७ लाख नुकसान भरपाई देण्यात आली. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत, ३८ मच्छिमारांना ₹ ४.८० लाख नुकसान भरपाई देण्यात आली.

## रेशीम उत्पादन

७.७९ ग्रामीण भागामध्ये रेशीम उत्पादन ह्या कृषि आधारित उद्योगामध्ये मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची क्षमता आहे. तुती रेशीम विकास कार्यक्रम राज्यातील २४ जिल्ह्यांत राबविला जातो. तुती लागवडीखालील क्षेत्र व रेशीम उत्पादन तक्ता ७.४० मध्ये दिली आहे.

**तक्ता ७.४० तुती लागवडीखालील क्षेत्र व रेशीम उत्पादन**

| बाब | परिमाण | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| **लागवडीखालील क्षेत्र** | | | | |
| एकूण | हेक्टर | १५,८९७ | १४,९०५ | १३,८३५ |
| जुने | हेक्टर | ११,११७ | ११,०९४ | १०,३७८ |
| नवीन | हेक्टर | ४,७८० | ३,८११ | ३,४५७ |
| लाभार्थी (शेतकरी) | संख्या | १५,०७३ | १४,२९६ | १३,०३० |
| रोग विरहीत अंडीपुंजांचा पुरवठा | लाख | ४५.८२ | ५१.४० | ३८.४० |
| कोश उत्पादन | मे. टन | २,७५४.२३ | ३,३५६.५६ | २,६३०.४० |
| कच्चे रेशीम उत्पादन | मे. टन | ४२३.७१ | ५१६.३९ | ४०४.७० |
| निर्मित रोजगार (मनुष्य दिवस) | लाख | ४६.६० | ५६.८१ | ४४.५० |

*आधार* : रेशीम संचालनालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

७.७९.१ टसर रेशीम विकास कार्यक्रम भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया या चार जिल्ह्यांमध्ये राबविला जातो. टसर रेशीम किड्यांच्या संवर्धनासाठी आवश्यक ऐन व अर्जुन वृक्षांचे या चार जिल्ह्यांतील लागवडीखालील क्षेत्र १८,८६६ हेक्टर आहे. सन २०२१-२२ मध्ये कच्च्या टसर रेशमाचे उत्पादन ७.३३ मे.टन होते तर सन २०२२-२३, डिसेंबर अखेर ८.७४ मे.टन होते.

## वने

७.८० राज्याचे एकूण वनक्षेत्र मार्च, २०२२ अखेर ६१,९०७.०८ चौ. किमी असून ते राज्याच्या भौगोलिक क्षेत्राच्या २०.१ टक्के होते. राज्यातील एकूण वनक्षेत्रापैकी वनविभागाच्या अधिपत्याखाली ५५,८२७.९६ चौ. किमी, महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या अधिपत्याखाली ३,४६१.९१ चौ. किमी आणि महसूल विभागाच्या अधिपत्याखाली १,४३४.३१ चौ. किमी क्षेत्र आहे. या व्यतिरिक्त वन विभागाच्या अधिपत्त्याखाली आणण्यात आलेले खाजगी वनक्षेत्र १,१८२.९० चौ. किमी आहे.

७.८०.१ भारताचा वनस्थिती अहवाल, २०२१ नुसार राज्याचे वनाच्छादन ५०,७९८ चौ. किमी असून ते भारताचा वनस्थिती अहवाल, २०१९ मध्ये नमूद केलेल्या वनाच्छादनाच्या तुलनेत २० चौ. किमीने वाढलेले आहे. राष्ट्रीय वन धोरण, १९८८ नुसार निश्चित केलेले वनाच्छादनाचे प्रमाण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के निश्चित केले असून त्या तुलनेत राज्याचे वनाच्छादनाचे प्रमाण १६.५ टक्के आहे. राज्याच्या एकूण वनाच्छादनात अति घनदाट वने १७.२ टक्के, मध्यम घनदाट वने ४०.५ टक्के आणि खुली वने ४२.३ टक्के आहेत. वन परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण तक्ता ७.४१ मध्ये तर निवडक राज्यांतील वनाच्छादन तक्ता ७.४२ मध्ये दिले आहे.

## तक्ता ७.४१ वन परिमंडळनिहाय वनक्षेत्राचे वर्गीकरण

(दि.३१ मार्च, २०२२रोजी)

| वन परिमंडळ | वनक्षेत्र (चौ. किमी) | | | | एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | राखीव | संरक्षित | अवर्गीकृत | एकूण | |
| गडचिरोली | ११,२२९.८७ | १,४०३.०५ | २६४.३० | १२,८९७.२२ | २०.८ |
| नागपूर | ४,४५४.१७ | २,१५६.२६ | १,१४२.५८ | ७,७५३.०१ | १२.५ |
| धुळे | ६,१४८.११ | ५७.०६ | २२२.९१ | ६,४२८.०८ | १०.४ |
| ठाणे | ४,४४३.०५ | १,१६१.३७ | २४१.८८ | ५,८४६.३० | ९.४ |
| नाशिक | ४,९९४.०५ | २३८.४३ | ५४.१० | ५,२८६.५८ | ८.५ |
| अमरावती | ५,०५४.५२ | १४.०८ | १४.२३ | ५,०८२.८३ | ८.२ |
| चंद्रपूर | ३,८३५.६८ | ८७७.६६ | १२३.४७ | ४,८३६.८१ | ७.८ |
| कोल्हापूर | ३,३८१.७३ | ३६४.३७ | ७७७.०५ | ४,५२३.१५ | ७.३ |
| यवतमाळ | ३,३६८.७० | ६.३० | ९५.८६ | ३,४७०.८६ | ५.६ |
| औरंगाबाद | २,९१७.२८ | ७४.४७ | १७३.६७ | ३,१६५.४२ | ५.१ |
| पुणे | २,४६८.७८ | ०.०३ | १४८.०१ | २,६१६.८२ | ४.२ |
| **राज्य** | **५२,२९५.९४** | **६,३५३.०८** | **३,२५८.०६** | **६१,९०७.०८** | **१००.०** |

*आधार :* प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## तक्ता ७.४२ निवडक राज्यांतील वनाच्छादन

(चौ. किमी)

| राज्य | भौगालिक क्षेत्र | एकूण वनाच्छादन | भौगालिक क्षेत्राशी एकूण वनाच्छादनाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | १,६२,९६८ | २९,७८४ | १८.३ |
| गुजरात | १,९६,२४४ | १४,९२६ | ७.६ |
| कर्नाटक | १,९१,७९१ | ३८,७३० | २०.२ |
| केरळ | ३८,८५२ | २१,२५३ | ५४.७ |
| मध्य प्रदेश | ३,०८,२५२ | ७७,४९३ | २५.१ |
| **महाराष्ट्र** | **३,०७,७१३** | **५०,७९८** | **१६.५** |
| राजस्थान | ३,४२,२३९ | १६,६५५ | ४.९ |
| तेलंगणा | १,१२,०७७ | २१,२१४ | १८.९ |
| उत्तर प्रदेश | २,४०,९२८ | १४,८१८ | ६.२ |
| **अखिल-भारत** | **३२,८७,४६९** | **७,१३,७८९** | **२१.७** |

*आधार :* भारताचा वनस्थिती अहवाल, २०२१

## वृक्षाच्छादन

७.८१ अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील एक हेक्टर पेक्षा कमी क्षेत्रफळ असलेले वृक्ष खंड हे वृक्षावरण/ वृक्षाच्छादन होत. भारताचा वनस्थिती अहवाल, २०२१ नुसार १२,१०८ चौ.किमी वृक्षाच्छादनासह देशात राज्य प्रथम क्रमांकाचे राज्य आहे. वनाच्छादन, वृक्षाच्छादन आणि कार्बन ग्रहण तक्ता ७.४३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४३ वनाच्छादन, वृक्षाच्छादन आणि कार्बन ग्रहण**

(चौ.किमी )

| वर्ष | वनाच्छादन | अति घनदाट | मध्यम घनदाट | खुली वने | एकूण | झाडी/ झुडपे | वृक्षाच्छादन | कार्बन ग्रहण (मे. टन) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०१३ | अभिलिखित वनक्षेत्रांतर्गत | ८,३६९ | १५,९६२ | १३,१३२ | ३७,४६३ | | | |
| | अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील | ३५१ | ४,८०८ | ८,०१० | १३,१६९ | | | |
| | **एकूण** | **८,७२०** | **२०,७७०** | **२१,१४२** | **५०,६३२** | **४,१५७** | **९,१४२** | **उ ना** |
| २०१५ | अभिलिखित वनक्षेत्रांतर्गत | ८,३६१ | १५,९३९ | १३,१४३ | ३७,४४३ | | | |
| | अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील | ३५१ | ४,८०८ | ८,०२६ | १३,१८५ | | | |
| | **एकूण** | **८,७१२** | **२०,७४७** | **२१,१६९** | **५०,६८२** | **४,१५७** | **९,५५८** | **उ ना** |
| २०१७ | अभिलिखित वनक्षेत्रांतर्गत | ८,०२७ | १४,१६८ | ११,५९६ | ३३,७९१ | | | |
| | अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील | ७०९ | ६,४८४ | ९,६९८ | १६,८९१ | | | |
| | **एकूण** | **८,७३६** | **२०,६५२** | **२१,२९४** | **५०,६८२** | **४,१६०** | **९,८३१** | **४९३** |
| २०१९ | अभिलिखित वनक्षेत्रांतर्गत | ८,२०० | १४,४७७ | ११,९६२ | ३४,६३९ | | | |
| | अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील | ५२१ | ६,०९५ | ९,५२३ | १६,१३९ | | | |
| | **एकूण** | **८,७२१** | **२०,५७२** | **२१,४८५** | **५०,७७८** | **४,२५६** | **१०,८०६** | **४४१** |
| २०२१ | अभिलिखित वनक्षेत्रांतर्गत | ८,४७६ | १५,०६८ | १२,४९६ | ३६,०४० | | | |
| | अभिलिखित वनक्षेत्राच्या बाहेरील | २५८ | ५,५२१ | ८,९७९ | १४,७५८ | | | |
| | **एकूण** | **८,७३४** | **२०,५८९** | **२१,४७५** | **५०,७९८** | **४,२४७** | **१२,१०८** | **४५२** |

*आधार :* भारताचा वनस्थिती अहवाल, २०१३ ते २०२१ उना उपलब्ध नाही

## वन्यजीव, राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्ये

७.८२ वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी राज्यात सहा राष्ट्रीय उद्याने, ५० अभयारण्ये आणि २३ संवर्धित राखीव क्षेत्रे आहेत. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांच्यामार्फत दर चार वर्षांनी व्याघ्र गणना करण्यात येते. भारतातील वाघांची स्थिती, २०१८ च्या अहवालानुसार राज्यातील वाघांची अंदाजित संख्या ३१२ होती तर सन २०१४ मध्ये १९० होती. वन्यजीव प्रकल्पांचे क्षेत्र आणि खर्च तक्ता ७.४४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४४ वन्यजीव प्रकल्पांचे क्षेत्र आणि खर्च**

| प्रकल्प | क्षेत्र (चौ. किमी) | | खर्च (₹ कोटी) | | |
|---|---|---|---|---|---|
| | गाभा | बफर | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
| **व्याघ्र प्रकल्प** | | | | | |
| मेळघाट | १,५००.४९ | १,२६८.०४ | २३.६७ | १९.८४ | २१.३७ |
| ताडोबा-अंधारी | ६२५.८२ | १,१०१.७७ | १५.४० | १०.७८ | ३४.४१ |
| पेंच | २५७.२६ | ४८३.९६ | १४.८० | १०.८३ | ८.९० |
| सह्याद्री | ५११.८७ | ५६५.४५ | ८.१७ | १.०५ | २.९६ |
| नवेगाव-नागझिरा | ६५३.६७ | १,२४१.२७ | १२.९४ | ४.०२ | ११.७६ |
| बोर | १३८.१२ | ६७८.१४ | ५.७० | ३.७२ | ३.३६ |
| **राष्ट्रीय उद्याने/ अभयारण्ये यांचा विकास** | - | - | ८.५५ | ४.४७ | - |
| **हत्ती प्रकल्प, कोल्हापूर** | क्षेत्र निर्दिष्ट नाही | | ०.४३ | ०.२७ | - |

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## वनोत्पादने

७.८३ वनांमधून इमारती व जळाऊ लाकूड ही प्रमुख आणि बांबू, तेंदूपत्ता, डिंक, गवत, इत्यादी गौण वन उत्पादने मिळतात. वनोत्पादनांचे उत्पादन व मूल्य तक्ता ७.४५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४५ वनोत्पादनांचे उत्पादन व मूल्य**

(₹ कोटी)

| वनोत्पादन | उत्पादनाचे परिमाण | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३@ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य | उत्पादन | मूल्य |
| **(अ) मुख्य वनोत्पादने**** | | | | | | | |
| इमारती लाकूड | लाख घन मीटर | १.०० | ३०९.४७ | १.८३ | ५४५.४६ | १.५४ | ५३८.४० |
| जळाऊ लाकूड | लाख घन मीटर | १.५० | ३७.१० | २.०७ | ६५.९२ | २.०७ | ५५.३१ |
| **एकूण (अ)** | **लाख घन मीटर** | **२.५०** | **३४६.५७** | **३.९०** | **६११.३८** | **३.६१** | **५९३.७१** |
| **(ब) गौण वनोत्पादने** | | | | | | | |
| बांबू** | लाख मे. टन | १२.११ | १६.९६ | ९.४७ | २०.८७ | ९.५१ | १३.४६ |
| तेंदूपत्ता | लाख स्टँडर्ड बॅग्ज बॅग्ज | १.७६ | ३६.५० | २.४२* | ५४.९५* | २.२५ | ७२.५० |
| गवत | मे. टन | २५३.०० | ०.१० | १,०३१.००* | ०.१५* | उ ना | उ ना |
| डिंक | क्विंटल | ३,२८५.५० | ०.१५ | २,४६१.५०* | ०.१५* | उ ना | उ ना |
| इतर (लाख, हिरडा, शिकेकाई, इत्यादी) | - | उ ना | ५.८१ | उ ना | १.३७* | उ ना | उ ना |
| **एकूण (ब)** | | | **५९.५२** | | **७७.४९** | | **८५.९६** |
| **एकूण (अ+ब)** | | | **४०६.०९** | | **६८८.८७** | | **६७९.६७** |

उ ना उपलब्ध नाही    * अस्थायी    @ अंदाजित    ** वन विकास महामंडळाच्या आकडेवारीचा समावेश आहे    १ स्टँडर्ड बॅग (५० तेंदुपत्त्यांचे १००० बंडल)

*आधार* : प्रधान मुख्य वन संरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## वृक्ष लागवड

७.८४ वृक्ष लागवड कार्यक्रमाची अंमलबजावणी राज्यात मुख्यत: वनविभाग, महाराष्ट्र वनविकास महामंडळ व सामाजिक वनीकरण संचालनालयामार्फत करण्यात येते. वृक्ष लागवडीसाठी सन २०२१-२२ मध्ये ₹ ३४९.४२ कोटी खर्च करण्यात आले. वृक्ष लागवडीखालील क्षेत्र व खर्च तक्ता ७.४६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ७.४६ वृक्ष लागवडीखालील क्षेत्र व खर्च**

| वर्ष | वन विभाग | | महाराष्ट्र वनविकास महामंडळ | | सामाजिक वनीकरण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | खर्च (₹ कोटी) | क्षेत्र (हेक्टर) | लांबी @ (कि मी ) | खर्च (₹ कोटी) | पुरविलेली रोपे (कोटी) |
| २०१८-१९ | ५१,७२४ | २००.८८ | ४,६३३ | २२.७९ | १२,६२० | - | २१०.५६ | १५.८९ |
| २०१९-२० | १,०२,९८७ | ३८८.३५ | ८,९८७ | ८९.७२ | २१,०३२ | १७,८५८ | ५२१.९४ | ३५.१४ |
| २०२०-२१ | ७,२३४ | ४६.७० | २,३६१ | १७.५७ | ३,३०२ | १,२२४ | ५१.९२ | ३५.१४ |
| २०२१-२२ | १०,६९८ | ९८.७६ | ११,८३५ | १२.६५ | ७,४१३ | ७,२३८ | २३८ .०१ | उ ना |

@ रस्त्याच्या कडेने केलेली वृक्ष लागवड समाविष्ट    उ ना उपलब्ध नाही

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

## सामाजिक वनीकरण

७.८५ सामाजिक वनीकरणाच्या विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. यामध्ये सामुदायिक जमिनीवर तसेच रस्ते/रेल्वे/कालवे, इत्यादींच्या कडेला रोपे लावली जातात. तसेच विविध संस्था, ग्रामपंचायती आणि व्यक्तींना वृक्षारोपणासाठी रोपे पुरविली जातात. सामाजिक वानिकरणांतर्गत प्रमुख योजना तक्ता ७.४७ मध्ये दिले आहे.

**तक्ता ७.४७ सामाजिक वानिकरणांतर्गत प्रमुख योजना**

| योजना | परिमाण | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| सामुहिक जमिनीवर रोपांची लागवड | लाख रोपे | १८.४९ | ८०.२८ | ८२.१२ |
| अ) गट लागवड | हेक्टर | ९५१.०० | ६,२७९.१७ | ५,४१६.९६ |
| ब) रस्ते/लोहमार्ग/ कालवे यांच्या कडेने लागवड | किमी | १,३८५.०० | ४७८०.३३ | ६,०३४.७५ |
| ग्रामपंचायती, संस्था व वैयक्तिक वृक्ष लागवडीसाठी पुरविलेली रोपे | लाख रोपे | ५.७४ | २७.०५ | ३९.४० |
| महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना | | | | |
| अ) शेतबांध लागवड | लाख रोपे | ०.८६ | १.५० | १.०९ |
| ब) कृषी वन लागवड | लाख रोपे | ११.४९ | १०.०१ | २.६३ |
| कन्या वन समृद्धी योजना | लाख रोपे | ०.२० | १.२२ | ०.३८ |

*आधार* : प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरअखेर

## संत तुकाराम वनग्राम योजना

७.८६ अवैध वृक्षतोड, अतिक्रमण इत्यादींपासून जंगलाचे संरक्षण करण्यासाठी, तसेच जंगल आणि वन्यजीवांच्या महत्त्वाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी संत तुकाराम वनग्राम योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत १५,५०० गावांमध्ये १२,०८१ संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्या २७.०४ लाख हेक्टर वनक्षेत्राचे व्यवस्थापन करतात.

## कांदळवन संवर्धन

७.८७ भारताचा वनस्थिती अहवाल, २०२१ नुसार राज्यात ३२४ चौ. किमी क्षेत्रावर कांदळवनाचे आच्छादन असून ते भारताचा वनस्थिती अहवाल, २०१९ मध्ये नमूद केलेल्या आच्छादनाच्या तुलनेत चार चौ. किमीने वाढले आहे. कांदळवन संवर्धन करण्यासाठी, वन संरक्षण कायदा १९२७ च्या कलम २० अंतर्गत ११,५४८ हेक्टरपेक्षा जास्त कांदळवनाला राखीव वने म्हणून घोषित केले आहे.

७.८७.१ पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १४५ पेक्षा जास्त गावांचा समावेश असलेल्या राज्याच्या संपूर्ण किनारपट्टीवरील स्थानिक समुदायांच्या सहभागासह कांदळवन संवर्धन व उपजीविकेची साधने निर्मिती योजना सन २०१७ पासून राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत खेकडा पालन शेती, पिंजऱ्यातील मत्स्य शेती, कालव व शिंपल्यांची शेती, शोभेच्या माशांची पैदास, इको टुरिझम आणि कांदळवन लागवड या प्रकारचे उपजीविकेचे उपक्रम विकसित करण्याकरिता शासनाने सन २०२२-२३ मध्ये ₹ १५.८० कोटी निधी मंजूर केला आहे. हे उपक्रम गटाने किंवा वैयक्तिक लाभार्थी म्हणून करता येतात. गटाद्वारे केल्या जाणाऱ्या उपक्रमांना राज्य शासनामार्फत ९० टक्के तर वैयक्तिक लाभार्थी (एक एकर पेक्षा जास्त कांदळवन असणारे जमीन मालक) ७५ टक्के आर्थिक सहाय्य मिळण्यास पात्र आहेत. या उपक्रमांमधून लाभार्थ्यांना सन २०२१-२२ मध्ये २० हेक्टर कांदळवन लागवडी मधून लाभार्थ्यांना ₹ ५७.२८ लाख नफा झाला तर सन २०२२-२३ ऑक्टोबर पर्यंत एकूण ७७.४४ हेक्टर कांदळवन लागवडी मधून लाभार्थ्यांना ₹ ९५ लाख नफा झाला.

* * * * *

## परिशिष्ट ७.१

## कृषि गणनांनुसार राज्यातील एकूण वहिती खातेदार, एकूण वहितीचे क्षेत्र व सरासरी वहिती क्षेत्र

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती खातेदारांची संख्या ('००) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ६,८३४ | ९,९१४ | १६,६७२ | २२,४०९ | २७,४६२ | ३१,६५८ | ३६,४५७ | ४३,७२२ |
| २ | ०.५ - १.० | ५,५८५ | ९,३४५ | १६,०७५ | २०,२५२ | २५,५९५ | २९,५२५ | ३०,६३३ | ३४,४३६ |
| ३ | १.० - २.० | ८,७८३ | १५,४०९ | २७,२७६ | ३१,७५५ | ३६,०५६ | ४१,५०३ | ४०,५२३ | ४३,३९२ |
| ४ | २.० - ३.० | ६,२६६ | १०,२७५ | १३,९६९ | १४,७४५ | १५,७९१ | १७,०२० | १५,४६३ | १६,९६४ |
| ५ | ३.० - ४.० | ४,६०६ | ६,५८३ | ७,२८९ | ६,७७४ | ६,९४९ | ७,४९६ | ६,१२८ | ६,३०६ |
| ६ | ४.० - ५.० | ३,५७६ | ४,६०१ | ४,४६९ | ३,८७४ | ३,७८० | ४,०३७ | ३,१४२ | ३,३५३ |
| ७ | ५.० - १०.० | ८,७१५ | ९,३१६ | ७,२४१ | ५,५५८ | ४,८७३ | ५,२१४ | ३,९६४ | ३,९८४ |
| ८ | १०.० - २०.० | ४,१८० | २,८१९ | १,५३० | १,०२९ | ७७३ | ६२२ | ५९० | ५७६ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | ९६१ | ३६३ | १७६ | १३२ | ९७ | ८१ | ८९ | १२१ |
| | **एकूण** | **४९,५०६** | **६८,६२५** | **९४,६९७** | **१,०६,५२८** | **१,२१,३७६** | **१,३७,१५६** | **१,३६,९८९** | **१,५२,८५४** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती एकूण क्षेत्र ('०० हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (१०) | (११) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | १,६३४ | २,६३० | ४,११९ | ५,७४६ | ७,३२८ | ७,७४० | ९,१८० | १०,२७८ |
| २ | ०.५ - १.० | ४,१४२ | ७,१०३ | १२,०५७ | १५,१२० | १९,१५९ | २०,२७४ | २२,६८० | २४,२०९ |
| ३ | १.० - २.० | १२,८४२ | २३,३३७ | ३९,८३३ | ४६,०५९ | ५१,२७१ | ५२,४७६ | ५७,३९१ | ५७,७११ |
| ४ | २.० - ३.० | १५,३८६ | २५,३६३ | ३३,६८९ | ३५,४२० | ३७,४१४ | ३७,५४२ | ३६,६८१ | ३८,८४४ |
| ५ | ३.० - ४.० | १५,९२० | २२,८१५ | २५,१०८ | २३,३०३ | २३,६७६ | २३,७५६ | २०,९७४ | २१,४१२ |
| ६ | ४.० - ५.० | १५,९६१ | २०,५५६ | १९,८६४ | १७,२१० | १६,७१७ | १६,७१७ | १३,९०१ | १४,७७८ |
| ७ | ५.० - १०.० | ६१,२१३ | ६३,९३७ | ४८,७०० | ३७,१५० | ३२,०८४ | ३२,१३५ | २६,०२७ | २६,२१६ |
| ८ | १०.० - २०.० | ५६,३०२ | ३७,२१३ | १९,७४९ | १३,५१४ | ९,९६१ | ६,७७६ | ७,५२४ | ७,२५१ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २८,३९४ | १०,६६२ | ६,१२९ | ५,२७४ | ३,४१८ | २,६३४ | ३,३१४ | ४,३६५ |
| | **एकूण** | **२,११,७९४** | **२,१३,६१६** | **२,०९,२४८** | **१,९८,७९६** | **२,०१,०२८** | **२,००,०५०** | **१,९७,६७२** | **२,०५,०६४** |

| अ. क्र. | आकारवर्ग (हेक्टर) | वहिती सरासरी क्षेत्र (हेक्टर) | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | १९९५-९६ | २०००-०१ | २००५-०६ | २०१०-११ | २०१५-१६ |
| (१) | (२) | (१७) | (१८) | (१९) | (२०) | (२१) | (२२) | (२३) | (२४) |
| १ | ०.५ पेक्षा कमी | ०.२४ | ०.२७ | ०.२५ | ०.२६ | ०.२७ | ०.२४ | ०.२५ | ०.२४ |
| २ | ०.५ - १.० | ०.७४ | ०.७६ | ०.७५ | ०.७५ | ०.७५ | ०.६९ | ०.७४ | ०.७० |
| ३ | १.० - २.० | १.४६ | १.५१ | १.४६ | १.४५ | १.४२ | १.२६ | १.४२ | १.३३ |
| ४ | २.० - ३.० | २.४६ | २.४७ | २.४१ | २.४० | २.३७ | २.२१ | २.३७ | २.२९ |
| ५ | ३.० - ४.० | ३.४६ | ३.४७ | ३.४४ | ३.४४ | ३.४१ | ३.१७ | ३.४२ | ३.४० |
| ६ | ४.० - ५.० | ४.४६ | ४.४७ | ४.४४ | ४.४४ | ४.४२ | ४.१४ | ४.४२ | ४.४१ |
| ७ | ५.० - १०.० | ७.०२ | ६.८६ | ६.७३ | ६.६८ | ६.५८ | ६.१६ | ६.५७ | ६.५८ |
| ८ | १०.० - २०.० | १३.४७ | १३.२० | १२.९१ | १३.१३ | १२.८९ | १०.८९ | १२.७५ | १२.५९ |
| ९ | २०.० व त्यापेक्षा अधिक | २९.५५ | २९.३७ | ३४.८२ | ३९.९५ | ३५.२४ | ३२.५२ | ३७.२४ | ३६.०७ |
| | **एकूण** | **४.२८** | **३.११** | **२.२१** | **१.८७** | **१.६६** | **१.४६** | **१.४४** | **१.३४** |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ७.२

## राज्यातील जमिनीच्या वापराची आकडेवारी

(क्षेत्र '००० हेक्टर)

| वर्ष | भौगोलिक क्षेत्र | वनां-खालील क्षेत्र | मशागतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र | | मशागत न केलेले इतर क्षेत्र | | | पडीत जमिनी | | पिकांखालील क्षेत्र | | पिकां-खालील स्थूल क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | नापिक व मशागतीस अयोग्य जमीन | बिगर-शेती वापराखाली आणलेली जमीन | मशागती-योग्य पडीत जमीन | कायमची कुरणे व चराऊ कुरणे | किरकोळ झाडे, झुडपे यांच्या समूहा खालील क्षेत्र | चालू पड | इतर पड | निव्वळ पेरणी क्षेत्र | दुसोटा / तिसोटा क्षेत्र | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| १९८६-८७ | ३०,७५८ | ५,३५० | १,६७९ | १,१५२ | १,०४४ | १,३६७ | १९६ | ९०९ | १,०५७ | १८,००४ | २,३२० | २०,३२४ |
| १९९०-९१ | ३०,७५८ | ५,१२८ | १,६२२ | १,०९१ | ९६६ | १,१२५ | ३०१ | ८९८ | १,०६३ | १८,५६५ | ३,२९५ | २१,८५९ |
| १९९५-९६ | ३०,७५८ | ५,१४८ | १,५४४ | १,३४९ | ९६० | १,१६६ | २९२ | १,०७२ | १,२४८ | १७,९८० | ३,५२४ | २१,५०४ |
| २०००-०१ | ३०,७५८ | ५,१५० | १,५४४ | १,३६४ | ९५९ | १,१६८ | ३२७ | १,१२६ | १,२७६ | १७,८४४ | ३,७७५ | २१,६१९ |
| २००५-०६ | ३०,७५८ | ५,२१२ | १,७२० | १,४०७ | ९१४ | १,२५२ | २४९ | १,३२७ | १,२०४ | १७,४७३ | ५,०८३ | २२,५५६ |
| २०१०-११ | ३०,७५८ | ५,२१६ | १,७३१ | १,४४९ | ९१९ | १,२४२ | २५० | १,३६६ | १,१७९ | १७,४०६ | ५,७६९ | २३,१७५ |
| २०११-१२ | ३०,७५८ | ५,२१० | १,७२८ | १,४५० | ९१९ | १,२४३ | २५० | १,३७८ | १,१९१ | १७,३८५ | ५,७२० | २३,१०६ |
| २०१२-१३ | ३०,७५८ | ५,२०७ | १,७२१ | १,४५५ | ९१६ | १,२४४ | २५० | १,४१७ | १,२०० | १७,३४३ | ५,७७२ | २३,११५ |
| २०१३-१४ | ३०,७५८ | ५,२०५ | १,७२३ | १,४६० | ९१५ | १,२४२ | २४९ | १,४०१ | १,१९२ | १७,३६८ | ६,०१२ | २३,३८० |
| २०१४-१५ | ३०,७५८ | ५,२०१ | १,७२७ | १,४८२ | ९१९ | १,२४९ | २४९ | १,३९९ | १,१८८ | १७,३४४ | ५,९२९ | २३,२७३ |
| २०१५-१६ | ३०,७५८ | ५,१९४ | १,७३१ | १,५२१ | ८८७ | १,२४९ | २५१ | १,४७७ | १,२५५ | १७,१९१ | ५,६७१ | २२,८६३ |
| २०१६-१७ | ३०,७५८ | ५,१९४ | १,८२२ | १,६४२ | ९२४ | १,३५१ | २५३ | १,४०१ | १,२५७ | १६,९१० | ६,३१४ | २३,२२४ |
| २०१७-१८ | ३०,७५८ | ५,२१९ | १,८३४ | १,६५० | ९२३ | १,२८७ | २५६ | १,३६५ | १,२६२ | १६,९४२ | ६,३२६ | २३,२६८ |
| २०१८-१९ | ३०,७५८ | ५,१७४ | १,८४९ | १,६९२ | ९२४ | १,३२३ | २७२ | १,४४८ | १,२६० | १६,८१५ | ६,३९७ | २३,२१२ |
| २०१९-२० | ३०,७५८ | ५,२२२ | १,८८२ | १,७१२ | ९३५ | १,३५३ | २७३ | १,४४४ | १,२१५ | १६,७२२ | ६,८४८ | २३,५७० |
| २०२०-२१ | ३०,७५८ | ५,२०७ | १,९५१ | १,७२६ | ९३४ | १,३६५ | २७२ | १,४३८ | १,२१४ | १६,६५० | ७,२४८ | २३,८९८ |
| २०२१-२२ | ३०,७५८ | ५,२०९ | १,९७५ | १,७४४ | ९४३ | १,३६४ | २७४ | १,४५५ | १,२०३ | १६,५९० | ७,५५८ | २४,१४९ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - २०१०-११ ते २०२१-२२ चे आकडे अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.३

## राज्यातील मुख्य पिकांखालील क्षेत्र, उत्पादन आणि प्रति हेक्टर उत्पादकता

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | तांदूळ | | | गहू | | | ज्वारी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | १,३०० | १,३६९ | १,०५४ | ९०७ | ४०१ | ४४२ | ६,२८४ | ४,२२४ | ६७२ |
| २ | १९७०-७१ | १,३५२ | १,६६२ | १,२२९ | ८१२ | ४४० | ५४२ | ५,७०३ | १,५५७ | २७३ |
| ३ | १९८०-८१ | १,४५९ | २,३१५ | १,५८७ | १,०६३ | ८८६ | ८३४ | ६,४६९ | ४,४०९ | ६८१ |
| ४ | १९९०-९१ | १,५९७ | २,३४४ | १,४६७ | ८६७ | ९०९ | १,०४९ | ६,३०० | ५,९२९ | ९४१ |
| ५ | २०००-०१ | १,५१२ | १,९३० | १,२७७ | ७५४ | ९४८ | १,२५६ | ५,०९४ | ३,९८८ | ७८३ |
| ६ | २०१०-११ | १,५१६ | २,६९१ | १,७७५ | १,३०७ | २,३०१ | १,७६१ | ४,०६० | ३,४५२ | ८५० |
| ७ | २०१९-२० | १,५५३ | २,८९७ | १,८६६ | १,०५७ | १,७९३ | १,६९७ | २,३७१ | १,८६५ | ७८६ |
| ८ | २०२०-२१ | १,५६१ | ३,२९१ | २,१०९ | १,१२६ | २,०७१ | १,८३९ | २,३२० | २, १८६ | ९४२ |
| ९ | २०२१-२२ | १,५७५ | ३,४३५ | २,१८१ | १,१३२ | २,१४४ | १,८९४ | २,२८५ | २,१५० | ९४१ |

| अ. क्र. | वर्ष | बाजरी | | | इतर तृणधान्ये | | | सर्व तृणधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (१२) | (१३) | (१४) | (१५) | (१६) | (१७) | (१८) | (१९) | (२०) |
| १ | १९६०-६१ | १,६३५ | ४८९ | २९९ | ४८० | २७२ | ५६७ | १०,६०६ | ६,७५५ | ६३७ |
| २ | १९७०-७१ | २,०३९ | ८२४ | ४०४ | ४१४ | २५४ | ६१४ | १०,३२० | ४,७३७ | ४५९ |
| ३ | १९८०-८१ | १,५३४ | ६९७ | ४५४ | ४५१ | ३४० | ७५४ | १०,९७६ | ८,६४७ | ७८८ |
| ४ | १९९०-९१ | १,९४० | १,११५ | ५७५ | ४३२ | ४४३ | १,०२५ | ११,१३६ | १०,७४० | ९६४ |
| ५ | २०००-०१ | १,८०० | १,०८७ | ६०४ | ६६४ | ५४४ | ८१९ | ९,८२४ | ८,४९७ | ८६५ |
| ६ | २०१०-११ | १,०३५ | १,१२३ | १,०८६ | १,०६८ | २,७४९ | २,५७५ | ८,९८५ | १२,३१७ | १,३७१ |
| ७ | २०१९-२० | ६७३ | ५१२ | ७६१ | १,३२२ | २,१५० | १,६२६ | ६,९७६ | ९,२१८ | १,३२१ |
| ८ | २०२०-२१ | ६८७ | ९०६ | १,३१७ | १,३८५ | ३,७४७ | २,७०६ | ७,०७९ | १२,२०१ | १,७२४ |
| ९ | २०२१-२२ | ६६७ | ६१९ | ९२८ | १,३९३ | ३,७१४ | २,६६७ | ७,०५२ | १२,०६२ | १,७१० |

| अ. क्र. | वर्ष | तूर | | | हरभरा | | | मूग | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (२१) | (२२) | (२३) | (२४) | (२५) | (२६) | (२७) | (२८) | (२९) |
| १ | १९६०-६१ | ५३० | ४६८ | ८८३ | ४०२ | १३४ | ३३३ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ६२७ | २७१ | ४३२ | ३१० | ८७ | २८१ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | ६४४ | ३१९ | ४९५ | ४१० | १३७ | ३३५ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १,००४ | ४१९ | ४१७ | ६६८ | ३५५ | ५३२ | ० | ० | ० |
| ५ | २०००-०१ | १,०९६ | ६६० | ६०२ | ६७६ | ३५१ | ५१९ | ७१४ | २४४ | ३४१ |
| ६ | २०१०-११ | १,३०२ | ९७६ | ७५० | १,४३८ | १,३०० | ९०४ | ५५४ | ३७२ | ६७२ |
| ७ | २०१९-२० | १,३१९ | १,१९७ | ९०७ | २,०४३ | २,२४० | १,०९६ | ३८७ | १५१ | ३९० |
| ८ | २०२०-२१ | १,३४० | १,४५० | १,०८२ | २,२३१ | २,३९७ | १,०७४ | ४०१ | २०७ | ५१७ |
| ९ | २०२१-२२ | १,४१९ | १,६५० | १,१६३ | २,३७२ | २,७१५ | १,१४५ | ४४० | २११ | ४८१ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.३ (पुढे चालू)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**अन्नधान्ये**

| अ. क्र. | वर्ष | उडीद | | | इतर कडधान्ये | | | सर्व कडधान्ये | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३०) | (३१) | (३२) | (३३) | (३४) | (३५) | (३६) | (३७) | (३८) |
| १ | १९६०-६१ | ० | ० | ० | १,४१७ | ३८७ | २७३ | २,३४९ | ९८९ | ४२१ |
| २ | १९७०-७१ | ० | ० | ० | १,६२९ | ३१९ | १९६ | २,५६६ | ६७७ | २६४ |
| ३ | १९८०-८१ | ० | ० | ० | १,६६१ | ३६९ | २२२ | २,७१५ | ८२५ | ३०४ |
| ४ | १९९०-९१ | ० | ० | ० | १,५८५ | ६६७ | ४२१ | ३,२५७ | १,४४१ | ४४२ |
| ५ | २०००-०१ | ५७४ | २०५ | ३५७ | ४९७ | १७७ | ३५६ | ३,५५७ | १,६३७ | ४६० |
| ६ | २०१०-११ | ४८२ | ३२९ | ६८२ | २६२ | ११९ | ४५५ | ४,०३८ | ३,०९६ | ७६७ |
| ७ | २०१९-२० | ३४१ | १५१ | ४४४ | २२६ | ११० | ४८७ | ४,३१६ | ३,८४९ | ८९२ |
| ८ | २०२०-२१ | ३५६ | २२७ | ६३६ | २६६ | १६३ | ६१३ | ४,५९५ | ४,४४४ | ९६७ |
| ९ | २०२१-२२ | ३८० | १८४ | ४८४ | २१० | १२७ | ६०५ | ४,८२१ | ४,८८७ | १,०१४ |

| अ. क्र. | वर्ष | सर्व अन्नधान्ये | | | भूईमूग | | | सोयाबीन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (३९) | (४०) | (४१) | (४२) | (४३) | (४४) | (४५) | (४६) | (४७) |
| १ | १९६०-६१ | १२,९५५ | ७,७४४ | ५९८ | १,०८३ | ८०० | ७३९ | ० | ० | ० |
| २ | १९७०-७१ | १२,८८६ | ५,४१४ | ४२० | ९०४ | ५८६ | ६४९ | ० | ० | ० |
| ३ | १९८०-८१ | १३,६९१ | ९,४७२ | ६९२ | ६९५ | ४५१ | ६४८ | ० | ० | ० |
| ४ | १९९०-९१ | १४,३९३ | १२,१८१ | ८४६ | ८६४ | ९७९ | १,१३२ | २०१ | १९० | ९४७ |
| ५ | २०००-०१ | १३,३८२ | १०,१३३ | ७५७ | ४९० | ४७० | ९५८ | १,१४२ | १,२६६ | १,१०९ |
| ६ | २०१०-११ | १३,०२३ | १५,४१३ | १,१८३ | ३९५ | ४७० | १,२९० | २,७२९ | ४,३१६ | १,५८१ |
| ७ | २०१९-२० | ११,२९२ | १३,०६७ | १,१५७ | २९१ | ३०९ | १,०६३ | ४,१२४ | ४,८२६ | १,१७० |
| ८ | २०२०-२१ | ११,६७४ | १६,६४६ | १,४२६ | ३०९ | ४०७ | १,३१८ | ४,२९० | ६,२६४ | १,४६० |
| ९ | २०२१-२२ | ११,८७३ | १६,९४९ | १,४२७ | ३२० | ४०१ | १,२५५ | ४,५९५ | ५,५०० | १,१९७ |

| अ. क्र. | वर्ष | करडई | | | इतर तेलबिया | | | सर्व तेलबिया | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (४८) | (४९) | (५०) | (५१) | (५२) | (५३) | (५४) | (५५) | (५६) |
| १ | १९६०-६१ | ३३१ | ० | ० | ४५४ | ० | ० | १,८६८ | ० | ० |
| २ | १९७०-७१ | ४०६ | १०२ | २५२ | ४०८ | ६५ | १५९ | १,७१८ | ७५३ | ४३८ |
| ३ | १९८०-८१ | ४८० | १७४ | ३६३ | ६०५ | १०३ | १७० | १,७८० | ७२८ | ४२६ |
| ४ | १९९०-९१ | ६३४ | २५८ | ४०८ | १,१२७ | ४५५ | ४०४ | २,८२६ | १,८८२ | ६६६ |
| ५ | २०००-०१ | २९६ | १२२ | ४१२ | ६३१ | २४१ | ३८२ | २,५५९ | २,०९९ | ८२० |
| ६ | २०१०-११ | १७३ | ९४ | ५४४ | ३३१ | १७६ | ५३२ | ३,६२८ | ५,०५६ | १,३९४ |
| ७ | २०१९-२० | २२ | १५ | ६९१ | ९० | २८ | ३१२ | ४,५२६ | ५,१७८ | १,१४४ |
| ८ | २०२०-२१ | २१ | १२ | ५६९ | १०५ | ३६ | ३४३ | ४,७२५ | ६,७१९ | १,४२२ |
| ९ | २०२१-२२ | २८ | २१ | ७४९ | ९१ | ३२ | ३५१ | ५,०३३ | ५,९५४ | १,१८३ |

(पुढे चालू)

# परिशिष्ट ७.३ (समाप्त)

क्षेत्र '००० हेक्टर
उत्पादन '००० मे.टन
उत्पादकता प्रति हेक्टर किलो

**नगदी पिके**

| अ. क्र. | वर्ष | ऊस | | | कापूस (रुई) | | | तंबाखू | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तोडणी क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता (मे. टनांत) | क्षेत्र | उत्पादन (गासड्यात ) | उत्पादकता | क्षेत्र | उत्पादन | उत्पादकता |
| (१) | (२) | (५७) | (५८) | (५९) | (६०) | (६१) | (६२) | (६३) | (६४) | (६५) |
| १ | १९६०-६१ | १५५ | १०,४०४ | ६७ | २,५०० | १,६७३ | ११४ | २५ | १२ | ४८० |
| २ | १९७०-७१ | १६७ | १४,४३३ | ८७ | २,७५० | ४८४ | ३० | १२ | ५ | ४४८ |
| ३ | १९८०-८१ | २५८ | २३,७०६ | ९२ | २,५५० | १,२२४ | ८२ | १२ | ८ | ६४८ |
| ४ | १९९०-९१ | ४४२ | ३८,१५४ | ८६ | २,७२१ | १,८७५ | ११७ | ८ | ८ | १,०३९ |
| ५ | २०००-०१ | ५९५ | ४९,५६९ | ८३ | ३,०७७ | १,८०३ | १०० | ८ | ९ | १,१४८ |
| ६ | २०१०-११ | ९६५ | ८५,६९१ | ८९ | ३,९४२ | ७,४७३ | ३२२ | १ | १ | ९९४ |
| ७ | २०१९-२० | ८२२ | ६९,३१३ | ८४ | ४,४९१ | ६,६३९ | २५१ | ०.५ | ०.८ | १,८१५ |
| ८ | २०२०-२१ | १,१४३ | १,११,६४२ | ९८ | ४,५४५ | १०,११० | ३७८ | ०.६ | १.२ | २,०१५ |
| ९ | २०२१-२२ | १,४८९ | १,३९,१५९ | ९३ | ४,४१० | ७,७९१ | ३०० | ०.५ | ०.८ | १,५०५ |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

टीप - (१) कापसाचे उत्पादन १७० किलो/गासडी याप्रमाणे '००० गासड्यांमध्ये.

(२) ऊसाची उत्पादकता मेट्रीक टन / हेक्टर

# परिशिष्ट ७.४

## राज्यातील कृषि उत्पादनाचे पीकनिहाय निर्देशांक

(त्रैवर्षीय सरासरी - पाया: १९७९-८२ = १००)

| गट/पिके | भार | १९८२-८३ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| **१. अन्नधान्ये** | | | | | | | | | |
| **(अ) तृणधान्ये** | | | | | | | | | |
| (१) तांदुळ | ९.४९ | ८७.४ | १०६.१ | ८७.४ | १२२.१ | १४८.३ | १३१.२ | १४९.० | १५५.६ |
| (२) गहू | ५.९२ | ८०.६ | ९३.९ | ९७.९ | २३७.७ | १२९.० | १८५.३ | २१४.० | २२१.५ |
| (३) ज्वारी | २२.१६ | ९५.५ | १२१.१ | ८१.४ | ७०.५ | २४.४ | ३८.१ | ४४.६ | ४३.७ |
| (४) बाजरी | ३.०८ | ६४.२ | १५४.३ | १५०.५ | १५५.५ | ४६.० | ७०.९ | १२५.४ | ८५.६ |
| (५) बार्ली | ०.०२ | ३७.७ | १७.० | १३.२ | १८८.७ | उना | उना | उना | उना |
| (६) मका | ०.४६ | ३६.९ | १०५.२ | २५३.८ | २,१८०.५ | १,४७९.५ | १,६४२.५ | ३,००६.७ | ३,००४.२ |
| (७) नाचणी | ०.८५ | ९२.० | ९८.४ | ६०.८ | ५५.५ | ४४.२ | ४१.३ | ४४.४ | ४८.५ |
| (८) कोद्रा | ०.०५ | ७३.७ | ६६.६ | ४३.६ | २३.६ | उना | उना | उना | उना |
| (९) इतर तृणधान्ये | ०.१९ | ७६.७ | १५०.८ | १६२.५ | २६.१ | ५१.९ | १६०.२ | १००.७ | ५४.९ |
| **एकूण - तृणधान्ये** | **४२.२२** | **८८.५** | **११५.७** | **९१.९** | **१३४.२** | **८४.९** | **१००.१** | **१३०.२** | **१२९.२** |
| **(ब) कडधान्ये** | | | | | | | | | |
| (१) हरभरा | १.४७ | ७८.४ | २१५.८ | २१३.३ | ७९०.७ | ८४९.६ | १,३६२.३ | १,४५८.० | १६५१.२ |
| (२) तूर | ५.४५ | ९६.१ | १०५.२ | १६६.० | २४५.३ | २०९.७ | ३००.८ | ३६४.५ | ४१४.६ |
| (३) इतर कडधान्ये | ३.५२ | ११२.५ | १६०.० | १५०.० | १९६.५ | १०८.१ | ९८.८ | १४३.१ | १२५.२ |
| **एकूण - कडधान्ये** | **१०.४४** | **९९.२** | **१३९.२** | **१६७.३** | **३०५.६** | **२६५.६** | **३८२.२** | **४४४.०** | **४९१.१** |
| **एकूण - अन्नधान्ये** | **५२.६६** | **९०.६** | **१२०.४** | **१०६.८** | **१६८.२** | **१२०.७** | **१५६.०** | **१९२.४** | **२००.९** |
| **२. अन्नधान्येतर** | | | | | | | | | |
| **(अ) तेलबिया** | | | | | | | | | |
| (१) भूईमूग | ७.२३ | ७१.४ | १५८.९ | ७६.२ | ७४.३ | ३८.७ | ५०.२ | ६६.१ | ६५.१ |
| (२) तीळ | ०.५७ | ९४.२ | २२३.७ | ८८.९ | ५८.९ | १९.३ | १५.३ | १९.२ | १७.१ |
| (३) मोहरी, राई आणि जवस | ०.७८ | ७३.४ | ८६.५ | ३०.८ | ५.१ | ८.० | ८.७ | ११.१ | २०.० |
| (४) एरंडी | ०.०१ | २५.० | १६६.७ | ३५८.३ | ३३३.३ | ३०३.९ | २७०.७ | ३५९.० | ७३.० |
| (५) सूर्यफूल | ०.५७ | ७६.८ | ६०९.८ | ३५२.३ | २६७.३ | १४.५ | २४.४ | २४.५ | २२.७ |
| **एकूण - तेलबिया** | **९.१६** | **७३.३** | **१८४.८** | **९०.६** | **७९.८** | **३३.७** | **४३.१** | **५६.२** | **५५.७** |
| **(ब) तंतू पिके** | | | | | | | | | |
| (१) कापूस | ९.८९ | ११०.४ | १२८.६ | १२३.६ | ५१२.३ | ४५२.० | ४५५.२ | ६९३.१ | ५३४.१ |
| (२) अंबाडी | ०.०४ | ४४.५ | ३८.० | ३६.५ | २६.४ | उना | उना | उना | उना |
| **एकूण - तंतू पिके** | **९.९३** | **११०.१** | **१२८.२** | **१२३.२** | **५१०.४** | **४५०.२** | **४५३.३** | **६९०.४** | **५३२.०** |
| **(क) संकीर्ण** | | | | | | | | | |
| (१) ऊस | २५.९७ | ११४.३ | १५८.२ | १८६.९ | २९७.२ | ३३८.४ | २६१.३ | ४२१.० | ५२४.६ |
| (२) तंबाखू | ०.१४ | ६८.३ | ११७.३ | १३८.१ | ३२.७ | ११.९ | १२.३ | १७.७ | ११.८ |
| (३) बटाटा | ०.२२ | ८४.२ | १२०.९ | १२१.९ | उना | उना | उना | उना | ६८५.२ |
| (४) मिरची | १.९२ | १०७.१ | १०२.२ | ८२.० | उना | उना | उना | उना | ४७८.६ |
| **एकूण - संकीर्ण** | **२८.२५** | **११३.३** | **१५३.९** | **१७९.०** | **२७३.४** | **३११.२** | **२४०.३** | **३८७.०** | **५२०.२** |
| **एकूण - अन्नधान्येतर** | **४७.३४** | **१०४.९** | **१५४.५** | **१५०.२** | **२८५.६** | **२८६.७** | **२४६.८** | **३८६.६** | **४३२.८** |
| **सर्व पिके** | **१००.००** | **९७.४** | **१३६.५** | **१२७.४** | **२२३.८** | **१९९.३** | **१९९.०** | **२८४.३** | **३१०.७** |

*आधार*- कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन, मुंबई　　उना　उपलब्ध नाही.

टीप - २०१८-१९ ते २०२१-२२ चे निर्देशांक अस्थायी आहेत.

# परिशिष्ट ७.५
## राज्यातील सिंचनाखालील क्षेत्र

('००० हेक्टर)

| अ. क्र. | वर्ष | सिंचित क्षेत्र | | | | ओलिताखालील पिकांची सघनता | सिंचन विहिरींची संख्या (हजारात) | दर विहिरीमागे सिंचित निव्वळ क्षेत्र (हेक्टरमध्ये) | पिकांखालील एकूण क्षेत्र | स्थूल सिंचित क्षेत्राची पिकांखालील स्थूल क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | विहिरी | इतर साधने | निव्वळ क्षेत्र | एकूण क्षेत्र | | | | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | १९६०-६१ | ५९५ | ४७७ | १,०७२ | १,२२० | ११४ | ५४२ | १.१० | १८,८२३ | ६.५ |
| २ | १९७०-७१ | ७६८ | ५७९ | १,३४७ | १,५७० | ११७ | ६९४ | १.११ | १८,७३७ | ८.४ |
| ३ | १९८०-८१ | १,०५५ | ७८० | १,८३५ | २,४१५ | १३२ | ८२६ | १.२८ | १९,६४२ | १२.३ |
| ४ | १९९०-९१ | १,६७२ | ९९९ | २,६७१ | ३,३१९ | १२४ | १,०१७ | १.६४ | २१,८५९ | १५.२ |
| ५ | २०००-०१ | २,२६२ | ९८७ | ३,२४९ | ३,८५२ | ११९ | १,३१८ | १.७२ | २१,६१९ | १७.८ |
| ६ | २००१-०२ | २,१४६ | ९९० | ३,१३६ | ३,७२७ | ११९ | १,३२२ | १.५२ | २०,९९१ | १७.८ |
| ७ | २००२-०३ | २,१४५ | १,०७१ | ३,२१६ | ३,८०६ | ११८ | १,३३१ | १.६१ | २०,९१५ | १८.२ |
| ८ | २००३-०४ | १,९१४ | १,०३० | २,९४४ | ३,६३६ | १२३ | उ ना | उ ना | २२,१९० | १६.४ |
| ९ | २००४-०५ | १,९४२ | १,००१ | २,९९३ | ३,६६५ | १२५ | उ ना | उ ना | २२,३७६ | १६.४ |
| १० | २००५-०६ | २,०७७ | १,०७० | ३,१४७ | ३,८१० | ११८ | उ ना | उ ना | २२,५५६ | १६.९ |
| ११ | २००६-०७ | २,१०९ | १,१३७ | ३,२४६ | ३,९५८ | १२२ | उ ना | उ ना | २२,५५७ | १७.६ |
| १२ | २००७-०८ | २,१५१ | १,१६० | ३,३११ | ४,०३७ | १२२ | उ ना | उ ना | २२,६५५ | १७.८ |
| १३ | २००८-०९ | २,११५ | १,१४० | ३,२५५ | ३,९७० | १२२ | उ ना | उ ना | २२,४५४ | १७.७ |
| १४ | २००९-१० | २,१५९ | १,१६२ | ३,३२१ | ४,०५० | १२२ | उ ना | उ ना | २२,६१२ | १७.९ |
| १५ | २०१०-११ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,१७५ | उ ना |
| १६ | २०११-१२ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,१०६ | उ ना |
| १७ | २०१२-१३ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,११५ | उ ना |
| १८ | २०१३-१४ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,३८० | उ ना |
| १९ | २०१४-१५ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२७३ | उ ना |
| २० | २०१५-१६ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २२,८६३ | उ ना |
| २१ | २०१६-१७ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२२४ | उ ना |
| २२ | २०१७-१८ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२६८ | उ ना |
| २३ | २०१८-१९ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,२१२ | उ ना |
| २४ | २०१९-२० | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,५७० | उ ना |
| २५ | २०२०-२१ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २३,८९८ | उ ना |
| २६ | २०२१-२१ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २४,१४९ | उ ना |

*आधार* - कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र शासन      उ ना   उपलब्ध नाही.

टीप - (१) आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही.
(२) स्तंभ क्र. ७ मध्ये (स्तंभ क्र. ६ ÷ स्तंभ क्र. ५) x १०० हे सूत्र वापरून सघनता काढली आहे.
(३) २००३ -०४ ते २०२१-२२ चे आकडे अस्थायी आहेत.
(४) जलसंपदा विभागाच्या, महाराष्ट्र शासन, दि.२६ ऑगस्ट २०१६ रोजीच्या शा.नि. अन्वये माहिती संकलनाच्या पद्धती बाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

## परिशिष्ट ७.६

## सिंचन व बिगर सिंचन पाणीपट्टी

(₹ कोटी)

| वर्ष | पाणीपट्टी आकारणी | | | वसुली | | | वर्ष अखेर शिल्लक थकबाकी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण | सिंचन | बिगर सिंचन | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| २०००-०१ | ७४.४८ | ३६२.६० | ४३७.०८ | ४१.२३ | १५३.९९ | १९५.२२ | २२३.३९ | ५७१.३० | ७९४.६९ |
| २००१-०२ | ८४.७२ | ३६८.८३ | ४५३.५५ | ४३.५७ | २०८.१२ | २५१.६९ | २६४.५४ | ७३२.०१ | ९९६.५५ |
| २००२-०३ | ८३.१७ | ३६०.६८ | ४४३.८५ | ४२.०२ | ३३५.५० | ३७७.५२ | ३०३.७९ | ७५१.९९ | १,०५५.७८ |
| २००३-०४ | ९३.०३ | ३६०.२६ | ४५३.२९ | ४२.८९ | ३३५.२० | ३७८.०९ | ३७६.६३ | ३५३.०६ | ७२९.६९ |
| २००४-०५ | ७८.६९ | ४१८.४४ | ४९७.१३ | ४५.७८ | ४०२.५७ | ४४८.३५ | ४१५.५९ | ३७८.५९ | ७९४.१८ |
| २००५-०६ | ६८.२५ | ३५०.२८ | ४१८.५३ | ६४.०३ | ३४९.४५ | ४१३.४८ | ४१०.१८ | २८२.०९ | ६९२.२७ |
| २००६-०७ | ९०.७० | ४०८.७५ | ४९९.४५ | ७४.७२ | ४२०.२६ | ४९४.९८ | ४२७.०१ | २४५.८२ | ६७२.८२ |
| २००७-०८ | ११०.३५ | ५६३.८९ | ६७४.२४ | ७०.४७ | ५५६.५४ | ६२७.०१ | ४७३.७० | २७५.२० | ७४८.९० |
| २००८-०९ | ११२.९५ | ६९५.३७ | ८०८.३२ | ७१.०५ | ६०२.११ | ६७३.१६ | ५३१.१० | ४६६.३८ | १,००४.६१ |
| २००९-१० | ९५.०० | ७१५.११ | ८१०.११ | ६९.९४ | ७३२.६९ | ८०२.६३ | ५६१.७७ | ४६६.३८ | १,०२८.१५ |
| २०१०-११ | ९६.२४ | ६७०.४६ | ७६६.७० | ७९.०३ | ६६६.८७ | ७४५.९० | ७४५.९० | ४६८.६२ | १,०४७.९० |
| २०११-१२ | १०९.७३ | ५४१.०६ | ६५०.७९ | ७९.१३ | ५४१.१३ | ६२०.२६ | ६०८.८७ | ४६१.७४ | १,०७०.६१ |
| २०१२-१३ | ८२.९८ | ६७०.१२ | ७५३.१० | ६३.१० | ४४३.०५ | ५०६.१५ | ६१८.७८ | ६५६.५२ | १,२७५.३० |
| २०१३-१४ | ७०.३७ | ५३६.६७ | ६०७.०४ | ५७.५७ | ४५७.२० | ५१४.७७ | ६३१.४९ | ७२८.२४ | १,३५९.७३ |
| २०१४-१५ | ७८.१५ | ५९३.५९ | ६७१.७४ | ६१.९७ | ५७४.५३ | ६३६.५० | ६४८.२९ | ६९५.८० | १,३४४.०९ |
| २०१५-१६ | ८०.०४ | ६६०.१३ | ७४०.१६ | ४९.१६ | ५२३.४२ | ५७२.५९ | ६७९.०२ | ८३५.१३ | १,५१४.१५ |
| २०१६-१७ | ७३.०५ | ६९०.४७ | ७६३.५२ | ५९.४८ | ५१३.४३ | ५७२.८९ | ६९३.९९ | १,०१०.२९ | १,७०४.२८ |
| २०१७-१८ | ९३.७२ | ७३५.०६ | ८२८.७८ | ७४.३० | ६१३.८४ | ६८८.१४ | ७१४.०० | १,१३५.१९ | १,८४९.१९ |
| २०१८-१९ | १०५.७९ | १,०३०.९५ | १,१३६.७४ | ७८.२७ | ९६५.८७ | १,०४४.१४ | ७४९.०७ | १,१९८.५२ | १,९४७.५९ |
| २०१९-२० | ११४.०३ | १,१९५.६९ | १,३०९.७२ | ५९.९७ | ९०८.३४ | ९६८.३१ | ८०९.४० | १,५९३.७१ | २,४०३.११ |
| २०२०-२१ | १३०.५७ | १,००४.०३ | १,१३४..६० | ९३.७१ | ९०१.४४ | ९९५.१५ | ८४६.६२ | १,६९७.८९ | २,५४४.५१ |
| २०२१-२२* | १८०.८८ | १,४१७.२९ | १,५९८.१७ | १०१.७६ | १,०५८.३६ | १,१६०.१२ | ९२३.७६ | २,०५९.८४ | २,९८३.६० |

*आधार* — जलसंपदा विभागाच्या अधिपत्याखालील मुख्य लेखा परिक्षक, जल व सिंचन, औरंगाबाद * अस्थायी

## परिशिष्ट ७.७

## राज्यातील पशुधन आणि कुक्कुटादी पक्षी

('०००)

| पशुधन गणना वर्ष | गाई-बैल | म्हशी -रेडे | मेंढ्या व शेळ्या | इतर पशुधन + | एकूण पशुधन | दर शंभर हेक्टर चराई व कुरण क्षेत्रामागे शेळ्या, मेंढ्या (संख्या) | दर शंभर हेक्टर निव्वळ पिकांखालील क्षेत्रामागे पशुधन (संख्या) | दर लाख लोकसंख्ये मागे पशुधन | एकूण कुक्कुटादी पक्षी $ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १९६१ | १५,३२८ | ३,०८७ | ७,२७३ | ३६० | २६,०४८ | ५१२ | १४४ | ६६ | १०,५७८ |
| १९६६ | १४,७२९ | ३,०४२ | ७,३२६ | ३५२ | २५,४४९ | ५२२ | १४० | ५७ | ९,९०२ |
| १९७२ | १४,७०५ | ३,३०१ | ८,०३८ | ३१७ | २६,३६१ | ४९१ | १६४ | ५२ | १२,२१७ |
| १९७८ | १५,२१८ | ३,८९९ | १०,१९९ | ३२६ | २९,६४२ | ६५० | १६२ | ५१ | १८,७५१ |
| १९८२ | १६,१६२ | ३,९७२ | १०,३७६ | ४०९ | ३०,९१९ | ६७३ | १७५ | ४८ | १९,८४५ |
| १९८७ | १६,९८३ | ४,७५५ | १२,०६८ | ४४९ | ३४,२५५ | ९५० | १८९ | ४८ | २४,८३० |
| १९९२ | १७,४४१ | ५,४४७ | १३,०१६ | ४८९ | ३६,३९३ | ९४० | २०२ | ४६ | ३२,१८७ |
| १९९७ | १८,०७१ | ६,०७३ | १४,८०२ | ६९२ | ३९,६३८ | १,१०४ | २२३ | ५० | ३५,३९२ |
| २००३ | १६,७३८ | ६,०८४ | १३,६२४ | ६१२ | ३७,०५८ | १,०१६ | २१३ | ३६ | ३४,५९६ |
| २००७ | १६,१८४ | ६,०७३ | १३,३०१ | ३९७ | ३५,९५५ | १,०६४ | २०६ | ३७ | ६४,७५६@ |
| २०१२ | १५,४८४ | ५,५९५ | ११,०१६ | ३९४ | ३२,४८९ | ८८५ | १८७ | २९ | ७७,७९५@ |
| २०१९ | १३,९९३ | ५,६०४ | १३,२८५ | १९८ | ३३,०८० | ९७३ | १९९ | २६ | ७४,२९८@ |

*आधार* - पशुधन गणना

टीप - आकडे संक्षिप्तात दिल्यामुळे बेरजा जुळतीलच असे नाही.

+ इतर पशुधन यामध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, उंट व गाढवे यांचा समावेश.

$ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये टर्की, क्वेल व इतर कुक्कुटादी पक्षी.

@ एकूण कुक्कुटादी पक्ष्यांमध्ये पोल्ट्रीफार्म मधील पक्षी समाविष्ट आहे.

# ८
# उद्योग आणि सहकार



# ८. उद्योग आणि सहकार

## उद्योग

८.१ गुंतवणुकीस अनुकूल धोरणे, व्यवसायासाठी सुलभ वातावरण आणि कुशल मनुष्यबळासह उत्कृष्ट पायाभूत सुविधांची उपलब्धता यामुळे राज्यात वाहने व वाहनांचे घटक, इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन, रत्ने व आभूषणे, माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा, औषधे व रसायने, अभियांत्रिकी, वस्त्रोद्योग, इत्यादी विविध क्षेत्रातील उद्योगांना राज्याने आकर्षित केले आहे. राज्यात औद्योगिक पार्क, आयटी पार्क, लॉजिस्टिक पार्क, भव्य वस्त्रोद्योग केंद्रे, स्मार्ट औद्योगिक शहरे, प्लग-अँड-प्ले पायाभूत सुविधा, औद्योगिक समुहांना दळणवळण सुविधा, स्टार्टअपसाठी इनक्यूबेटर केंद्रे, इत्यादी विकसित करण्यात आले आहेत. राज्य शासनाने व्यवसायासाठी परवानग्यांची संख्या कमी करणे, गुंतवणुकदारांसाठी एकल खिडकी सुविधा केंद्र, इत्यादी सर्वसमावेशक उपाययोजना केल्या आहेत.

### औद्योगिक धोरण, २०१९

८.२ दि. १ एप्रिल, २०१९ पासून औद्योगिक धोरण, २०१९ राज्यात राबविण्यात येत आहे. व्यवसायाकरीता पोषक वातावरण निर्माण करून औद्योगिक गुंतवणूक आकर्षित करण्यात राज्याचे आघाडीचे स्थान अबाधित राखणे, प्रामुख्याने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहन देऊन रोजगार निर्मितीची उच्च पातळी कायम ठेवणे आणि सर्वसमावेशक, प्रादेशिकदृष्ट्या संतुलित आणि पर्यावरणदृष्ट्या शाश्वत वाढीस प्रोत्साहन देणे ही या धोरणाची उद्दिष्टे आहेत. काही प्राध्यान्य क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत:

- इलेक्ट्रीक वाहने (उत्पादन, पायाभूत सुविधा व देखभाल)
- उद्योग ४.० (कृत्रिम बुद्धिमत्ता, त्रिमितीय छपाई, इंटरनेट ऑफ थिंग्ज व रोबोटिक्स, नॅनो तंत्रज्ञान)
- एकात्मिक माहिती केंद्र संकुले
- वस्त्रोद्योग यंत्रसामग्री उत्पादन
- कृषि व अन्नप्रक्रिया घटक
- माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा
- इलेक्ट्रॉनिक प्रणाली संरचना व उत्पादन आणि सेमीकंडक्टर फॅब्रिकेशन

### महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण, २०१८

८.२.१ माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये जाहीर करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र इलेक्ट्रीक व्हेईकल प्रोत्साहन धोरण, २०१८' अंतर्गत पाच इलेक्ट्रीक वाहन उत्पादन घटक आणि एका बॅटरी उत्पादन घटकाकडून ₹ ८,४२० कोटी प्रस्तावित गुंतवणुकीचे व ९,५०० अपेक्षित रोजगार निर्मितीचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत.

८.२.२ राज्य शासनाने माहे जुलै, २०२१ मध्ये 'सुधारीत महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण, २०२१' जाहीर केले आहे. इलेक्ट्रीक वाहन उत्पादक कारखाने आणि अनुषंगिक संशोधन व विकास सुविधा उभारण्यासाठी प्रोत्साहने देऊन इलेक्ट्रीक वाहन उत्पादन आणि संशोधन व विकास परिसंस्था विकसित करण्यासाठी राज्यात गुंतवणूक आकर्षित करणे हे धोरणाचे उद्दिष्ट आहे. तसेच राज्यामध्ये ॲडव्हान्स केमिस्ट्री सेल बॅटरीच्या निर्मितीसाठी सन २०२३ पर्यंत किमान एक गिगाफॅक्टरी आकर्षित करण्याचेही उद्दिष्ट आहे.

८.२.३ या धोरणा अंतर्गत ६४,३३७ इलेक्ट्रीक वाहनांकरीता ₹ २९,०३३ लाख प्रोत्साहन निधी मंजूर केला असून त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यंत १६,८२४ इलेक्ट्रीक वाहनांकरीता ₹ ११,८२७ लाख निधी वितरीत केला आहे.

### राज्यातील औद्योगिक गुंतवणूक

८.३ उदारीकरणाचे धोरण अंगिकारल्यापासून (ऑगस्ट, १९९१) राज्यात माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंतच्या कालावधीत ₹ १७,४८,६४८ कोटी गुंतवणुकीसह २१,४४२ प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. निवडक राज्यांमधील आवेदन पत्र /इरादा पत्र / १०० टक्के निर्यातभिमुख प्रस्तावांसह मंजूर औद्योगिक प्रकल्पांची माहिती तक्ता ८.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१ निवडक राज्यांमधील मंजूर औद्योगिक प्रकल्प@**

| राज्य | २०२० | | २०२१ | | २०२२+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | उपक्रम (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) |
| आंध्र प्रदेश | ५९ | ९,७२७ | ४७ | ९,३७३ | ४९ | १५,५८१ |
| गुजरात | २२० | ४६,१४१ | २१४ | ९२,५६६ | १६८ | ९८,१५९ |
| कर्नाटक | १२० | १,६२,४९२ | ११४ | ६१,७२६ | ९७ | ६८,९३१ |
| **महाराष्ट्र** | **२९६** | **४४,१८८** | **२७३** | **२,७७,३३५** | **२११** | **३५,८७०** |
| तामिळनाडू | ७६ | ६,८०७ | ११५ | २९,६३६ | ६१ | ८,५७५ |
| उत्तरप्रदेश | ९१ | ११,३८४ | ११४ | १७,२७८ | ६५ | १०,१५६ |
| **अखिल भारत** | **१,४३२** | **४,१४,६२०** | **१,४८९** | **७,७१,४२८** | **१,०६५** | **४,०८,२०१** |

@आवेदन पत्र/इरादा पत्र/१०० टक्के निर्यातभिमुख प्रस्तावांसह +नोव्हेंबरपर्यंत

*आधार*: १) उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग, केंद्र शासन २) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मॅग्नेटिक महाराष्ट्र २.०

८.४ गुंतवणूक आकर्षित करणे आणि रोजगार निर्मितीच्या उद्देशाने राज्यात माहे जून, २०२० मध्ये मॅग्नेटिक महाराष्ट्र २.० कार्यक्रम आयोजित करण्यात आला. माहे जून, २०२० ते डिसेंबर, २०२२ पर्यंत, राज्याने ₹ २,७४,२०२ कोटी गुंतवणुकीसह सुमारे ४.२७ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या १२४ प्रकल्पांचे सामंजस्य करार केले. एकूण प्रस्तावित गुंतवणुकीमध्ये नवीकरणीय ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान आणि स्टील उत्पादन या क्षेत्रातील गुंतवणुकीचा हिस्सा सुमारे ७० टक्के आहे.

८.४.१ जागतिक आर्थिक परिषदेच्या दावोस, स्वित्झर्लंड येथे झालेल्या ५३ व्या वार्षिक बैठकीत, राज्याने उच्च तंत्र आणि पायाभूत सुविधा, उर्जा, माहिती तंत्रज्ञान/ फिनटेक/ डेटा सेंटर, स्टील उत्पादन आणि कृषि व अन्नप्रक्रिया घटक या क्षेत्रांमधील ₹ १.३७ लाख कोटी रुपयांची गुंतवणूक व एक लाखांहून अधिक रोजगार निर्मितीची क्षमता असलेल्या १९ प्रकल्पांचे सामंजस्य करार केले.

## विशाल प्रकल्प

८.५ सन २००५ पासून राज्यात विशाल प्रकल्प धोरण राबविण्यात येत आहे. राज्यात माहे सप्टेंबर, २०२२ पर्यंत ₹ ६,११,२७१ कोटी प्रस्तावित गुंतवणुकीसह ६.७२ लाख अपेक्षित रोजगार निर्मितीच्या ७३८ विशाल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. त्यापैकी ₹ १,३५,९७२ कोटी प्रत्यक्ष गुंतवणुकीसह सुमारे १.७६ लाख रोजगार निर्मिती क्षमतेच्या २५६ प्रकल्पांना पात्रता प्रमाणपत्रे देण्यात आली.

## सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम

८.६ वस्तुनिर्माण आणि सेवा पुरविणाऱ्या उपक्रमांचे त्यांच्या वार्षिक उलाढाल तसेच वस्तुनिर्माण उपक्रमाकरिता यंत्रसामग्रीतील गुंतवणूक व सेवा पुरविणाऱ्या उपक्रमाकरिता साधन सामग्रीचे मूल्य यावर आधारित सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम असे वर्गीकरण करण्यात आले आहे. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे बळकटीकरण करणे व त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहेत. सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना सुलभ व्यवसायाकरीता कायमस्वरूपी नोंदणी क्रमांक देण्यासाठी केंद्र शासनाने दि.१ जुलै, २०२० रोजी उद्यम नोंदणी पोर्टल सुरू केले. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत, राज्यातील एकूण २०.४३ लाख सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांनी उद्यम नोंदणी पोर्टलवर नोंदणी केली असून त्यातील रोजगार १०८.६७ लाख होता. विभागनिहाय उद्यम नोंदणी झालेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम तक्ता ८.२ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ८.२ विभागनिहाय उद्यम नोंदणी झालेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम**

(नोव्हेंबर, २०२२ पर्यंत)

| विभाग | सूक्ष्म उपक्रम | | लघु उपक्रम | | मध्यम उपक्रम | |
|---|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रोजगार (लाख) | संख्या | रोजगार (लाख) | संख्या | रोजगार (लाख) |
| कोकण (मुंबई वगळून) | ३,०५,९९१ | १४.९४ | १७,४८५ | ५.४५ | २,५३० | ५.२१ |
| मुंबई# | ३,९८,५७३ | १७.६८ | १०,००७ | २.७६ | ९३१ | १.३३ |
| नाशिक | २,३८,४१५ | ८.७७ | ५,४९१ | ०.९७ | ४५७ | ०.३९ |
| पुणे | ५,४४,९१९ | २३.३४ | १३,७१७ | ३.७४ | १,५०० | २.२८ |
| औरंगाबाद | २,३६,८४४ | ८.९४ | ४,०७३ | ०.६२ | ४०६ | ०.२६ |
| अमरावती | १,०४,१८३ | ३.९५ | २,१०१ | ०.२२ | १७३ | ०.०५ |
| नागपूर | १,५०,९५२ | ६.४९ | ४,२३२ | ०.८७ | ४५९ | ०.३७ |
| **सर्व** | **१९,७९,८७७** | **८४.१३** | **५७,१०६** | **१४.६३** | **६,४५६** | **९.९१** |

*आधार*: उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन # शहर व उपनगर यांसह

## थेट विदेशी गुंतवणूक

८.७ व्यवसायासाठी अनुकूल वातावरण, विविध धोरणे आणि कुशल मनुष्यबळाची उपलब्धता भारतातील थेट विदेशी गुंतवणुकीमध्ये राज्यास आघाडीवर ठेवण्यास सहाय्यभूत ठरले आहे. निवडक राज्यांमधील थेट विदेशी गुंतवणूक तक्ता ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.३ निवडक राज्यांमधील थेट विदेशी गुंतवणूक**

(₹ कोटी)

| राज्य | २०२१-२२ | २०२२-२३+ | संचित गुंतवणूक (एप्रिल, २००० - सप्टेंबर, २०२२) |
|---|---|---|---|
| गुजरात | २०,१६९ | २६,८६६ | ३,६९,९९० (९.७) |
| कर्नाटक | १,६३,७९५ | ४१,६७८ | ५,५१,०४४ (१४.४) |
| **महाराष्ट्र** | **१,१४,९६४** | **६२,४२५** | **१०,८८,५०२#** **(२८.५)** |
| तामिळनाडू | २२,३९६ | १२,२७२ | २,४२,३९६ (६.३) |
| तेलंगणा | ११,९६४ | ७,५७८ | उ ना |
| **अखिल भारत** | **४,३७,१८८** | **२,१०,१५६** | **३८,२२,३५९** |

टीप : कंसातील आकडे अखिल भारतातील एकूण थेट विदेशी गुंतवणुकीशी टक्केवारी दर्शवितात  उ ना – उपलब्ध नाही  + सप्टेंबरपर्यंत

# सप्टेंबर,२०१९ पर्यंत दादरा व नगर हवेली आणि दमण व दिवसह

*आधार* : उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभाग, केंद्र शासन

## महाराष्ट्रातून निर्यात

८.८ रत्ने व आभूषणे, पेट्रोकेमिकल्स, अभियांत्रिकी वस्तू, धातू व धातू उत्पादने, औषधी व औषधी द्रव्ये, कापड व तयार कपडे, शेतमालावर आधारीत उत्पादने आणि प्लास्टिक व प्लास्टिकच्या वस्तू ही राज्यातून निर्यात केलेली प्रमुख उत्पादने आहेत. औद्योगिक धोरण, २०१९ नुसार, निर्यातीस प्रोत्साहन देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र निर्यात प्रचालन परिषद स्थापन केली आहे. केंद्र शासनाने 'एक जिल्हा एक उत्पादन' ही योजना सुरु केली आणि प्रत्येक जिल्ह्याला उदयोन्मुख निर्यात केंद्र बनवण्यासाठी राज्य शासनाने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदांची स्थापन केली आहे. महाराष्ट्र आणि अखिल भारतातून झालेली निर्यात तक्ता ८.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.४ महाराष्ट्र आणि अखिल भारतातून झालेली निर्यात**

(₹ कोटी)

| वर्ष | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|
| २०२०-२१ | ४,३१,५३२ | २१,५९,०४३ |
| २०२१-२२ | ५,४५,०८४ | ३१,४७,०२१ |
| २०२२-२३+ | २,४७,१४१ | १५,३४,४४३ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन  + ऑगस्टपर्यंत

## माहिती तंत्रज्ञान संकुले

८.९ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सिडको व सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी पार्क ऑफ इंडिया यांनी राज्यात सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले विकसित केली आहेत. सुमारे ₹ १८,००० कोटी गुंतवणूक व सुमारे २.७ लाख रोजगारासह राज्यात एकूण ३७ सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान संकुले कार्यरत आहेत.

८.९.१ माहिती तंत्रज्ञान उद्योगासाठी जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी खाजगी क्षेत्रास सहभागी करून घेण्यात आले आहे. माहिती तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानाधारित सेवा या धोरणाच्या सुरुवातीपासून माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर एकूण ५७७ खाजगी माहिती तंत्रज्ञान संकुले पुणे (२०३), मुंबई शहर व मुंबई उपनगर (१८६), ठाणे (१७२), नागपूर (५), नाशिक (५), औरंगाबाद (४), वर्धा (१) आणि रायगड (१) या जिल्ह्यांमध्ये मंजूर आहेत.

## दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर

८.१० दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर हा दिल्ली आणि मुंबई दरम्यानचा नियोजित औद्योगिक विकास प्रकल्प आहे. या प्रकल्पाअंतर्गत औरंगाबाद जिल्हयातील शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्र आणि रायगड जिल्हयातील दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र यांचा समावेश आहे.

८.१०.१ दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर प्रकल्पाचा भाग असलेल्या ४,००० हेक्टर क्षेत्रात वसलेल्या औरंगाबाद औद्योगिक शहराचा (ऑरिक) सुनियोजित आणि हरित स्मार्ट औद्योगिक शहर म्हणून विकास केला जात आहे. केंद्र शासनाने शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रामध्ये मूलभूत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ₹ ७,९४७ कोटी मंजूर केले आहेत. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत शेंद्रा येथील सुमारे ८३९ हेक्टर क्षेत्र आणि बिडकीन येथील सुमारे १,००६ हेक्टर क्षेत्र विकसित करण्यात आले आहे. सुमारे ३०३ हेक्टर क्षेत्राचे एकूण १९१ भूखंड गुंतवणुकदारांना वाटप करण्यात आले आहेत. ऑरिकमध्ये एकूण गुंतवणूक सुमारे ₹ ६,००० कोटी झाली असून सुमारे १०,५०० रोजगार निर्मिती झाली आहे. ऑरिकमधून १५ वर्षांत तीन लाखांहून अधिक रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र अंतर्गत सुमारे २,४५० हेक्टर क्षेत्र विकसित करण्याचे प्रस्तावित आहे.

## औद्योगिक समूह विकास कार्यक्रम

८.११ सूक्ष्म व लघु उद्योग उपक्रमांच्या सर्वांगिण विकासाकरिता राज्यात औद्योगिक समूह विकास कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत तंत्रज्ञान तसेच कौशल्य व दर्जात सुधार, क्षमता वर्धन, पणन सुविधा, भांडवल उपलब्धता, पायाभूत सुविधा निर्मिती/ अद्ययावतीकरण, सामाईक सुविधा केंद्रांची उभारणी, इत्यादी बाबी हाताळण्यात येत आहेत. अनुदानाच्या स्वरूपात केंद्र शासन ७० ते ९० टक्के वित्तीय सहाय्य देते.

८.११.१ **सूक्ष्म, लघु उपक्रम - समूह विकास कार्यक्रम :** केंद्र शासनाने ३८ औद्योगिक समूह प्रकल्पांना मंजुरी दिली असून, एकूण ₹ १९१.१३ कोटी अनुदान वितरीत केले आहे. त्यापैकी माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत १८ समूह प्रकल्प कार्यान्वित झाले असून त्यातील सामाईक सुविधा केंद्रांमधील सोयी या समुहामधील घटकांना उपलब्ध आहेत.

८.११.२ **महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रम :** या कार्यक्रमा अंतर्गत राज्यातील २०९ समूह प्रकल्प विकसनाचे काम हाती घेण्यात आले असून त्यापैकी ९८ समूह प्रकल्पांना सामाईक सुविधा केंद्र उभारणीसाठी मंजुरी देण्यात आली आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ४८ सामाईक सुविधा केंद्र कार्यरत असून ₹ २१०.२१ कोटी खर्च झाला.

## व्यवसाय सुधारणा कृती आराखडा

८.१२ केंद्र शासनाच्या उद्योग संवर्धन आणि आंतरिक व्यापार विभागाने व्यवसाय सुलभतेसाठी प्रसिद्ध केलेल्या व्यवसाय सुधारणा कृती आराखड्या अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या सुधारणांची राज्य सातत्याने अंमलबजावणी करीत आहे. व्यवसाय सुधारणा कृती आराखडा, २०२२ अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या जवळपास सर्व सुधारणा राज्याने अंमलात आणल्या आहेत.

## महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष

८.१३ राज्य शासनाने राज्यातील गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यासाठी आणि व्यावसायिक भागीदारी सुलभ करण्यासाठी महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुविधा कक्ष (मैत्री) हे ऑनलाईन वन स्टॉप शॉप स्थापन केले आहे. अस्तित्वात असलेल्या आणि संभाव्य गुंतवणुकदारांना गुंतवणूक प्रक्रियेबद्दल सर्वसमावेशक माहिती मिळणेबाबत सेवा उपलब्ध करून देऊन गुंतवणुकीसंबंधी सर्व माहितीसाठी समाशोधन केंद्र म्हणून मैत्री कक्ष कार्य करते. थेट विदेशी गुंतवणुकीच्या सर्व प्रस्तावांसाठी आणि ₹ ५० कोटी किंवा त्याहून अधिक गुंतवणूक असलेल्या नवीन औद्योगिक घटकांसाठी मैत्री कक्षामार्फत राज्याने महा परवाना ही एकल परवानगी प्रणाली सुरू केली आहे. मैत्री कक्षामार्फत १५ विभागांकडून देण्यात येणाऱ्या एकूण ११९ सेवा एकाच ठिकाणी आणल्या आहेत. मैत्री कक्षामार्फत माहे जानेवारी, २०२३ पर्यंत एकूण प्राप्त २.७८ लाख अर्जांपैकी २.६९ लाख अर्जांचा निपटारा करण्यात आला. मैत्री कक्षाने माहे जानेवारी, २०२३ पर्यंत ३,९४५ तक्रारींपैकी ३,९०५ तक्रारींचे निराकरण केले.

## सामूहिक प्रोत्साहन योजना

८.१४ समतोल प्रादेशिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी आणि औद्योगिकदृष्ट्या कमी विकसित भागात उद्योगांचा प्रसार व्हावा याकरिता या भागातील नवीन किंवा विस्तारीत उद्योग घटकांसाठी राज्य शासन सामूहिक प्रोत्साहन योजना राबवित आहे. सन १९६४ मध्ये योजना सुरू झाल्यापासून या योजनेमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या आहेत. सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९ अंतर्गत पात्र असलेले खाजगी क्षेत्रातील, राज्य सार्वजनिक/ संयुक्त क्षेत्रातील आणि सहकारी क्षेत्रातील उद्योग घटक प्रोत्साहन देण्यासाठी विचारात घेतले आहेत. सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वितरण तक्ता ८.५ मध्ये दिले आहे.

**तक्ता ८.५ सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत वितरण**

(₹ कोटी)

| तपशील | वितरण | | |
|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| **औद्योगिक प्रोत्साहन अनुदान** | | | |
| विशाल प्रकल्प | १,०१४ | ३,६७४ | १,००१ |
| मोठे उद्योग | ६३८ | ८०८ | ११० |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ४७७ | ५३७ | ४३१ |
| **इतर प्रोत्साहने** | | | |
| मोठे उद्योग | २१ | ६७ | ५५ |
| सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम | ९४ | १५२ | १५३ |
| इलेक्ट्रीक वाहन | ६ | ६२ | ५० |
| **एकूण** | **२,२५०** | **५,३००** | **१,८००** |

*आधार:* उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन  +ऑक्टोबरपर्यंत

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

८.१५ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ही राज्य शासनाची प्रमुख औद्योगिक पायाभूत सुविधा विकास संस्था आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने औद्योगिक क्षेत्रे, विशेष आर्थिक क्षेत्रे, सिल्वर झोन विकसित केले आहेत तसेच माहिती तंत्रज्ञान, जैव-तंत्रज्ञान, वाईन (द्राक्ष प्रक्रिया) व रत्ने या करीता विशेष संकुले विकसित केली आहेत. दि.३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने २९० औद्योगिक क्षेत्रे निर्माण केली असून, त्यापैकी १४३ मोठी औद्योगिक क्षेत्रे, १०८ लहान औद्योगिक क्षेत्रे व ३९ ग्रोथ सेंटर्स आहेत.

८.१५.१ प्रगत सुविधा आणि किफायतशीर किंमत रचनेसह परिपूर्ण असे कारखाना सुरू करण्यासाठीचे तयार वातावरण प्लग अँड प्ले पायाभूत सुविधे अंतर्गत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपलब्ध करुन देत आहे. यासाठी मुंबई-ठाणे-रायगड (१५,००० एकर), पुणे-चाकण-तळेगाव-सातारा (८,००० एकर), नाशिक-मालेगाव-अहमदनगर (५,००० एकर), औरंगाबाद (ऑरिक, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर)-जालना (८,००० एकर) आणि नागपूर-अमरावती (४,००० एकर) येथे विस्तारलेल्या एकूण ४०,००० एकर जागेचे वाटप महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ करीत आहे. त्याच बरोबर उद्योगांची तातडीने स्थापना करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ भाडेतत्वावर औद्योगिक शेडसाठी जागा देखील पुरवित आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती तक्ता ८.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.६ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील औद्योगिक घटकांची माहिती**

(दि.३१ डिसेंबर, २०२२ रोजी)

| विभाग | घटक (संख्या) | गुंतवणूक (₹ कोटी) | रोजगार (लाख) | विकसित भूखंड (संख्या) |
|---|---|---|---|---|
| कोकण (मुंबई वगळून) | १४,२६६ | ८४,७०२ | ४.८४ | १३,८७८ |
| मुंबई# | १,०१२ | २०,६८५ | १.३९ | ९,१३१ |
| नाशिक | ८,९८८ | १३,५६९ | १.२१ | ९,८८७ |
| पुणे | १५,६८७ | १,६७,८०१ | ९.५५ | २८,६१२ |
| औरंगाबाद | १०,२१५ | ३१,५२५ | १.०१ | २०,१३९ |
| अमरावती | २,८३६ | ११,२२९ | ०.५९ | ८,९९८ |
| नागपूर | ४,०२० | ५०,०३४ | १.३० | ९,६०५ |
| **एकूण** | **५७,०२४** | **३,७९,५४५** | **१९.८९** | **१,००,२५०** |

*आधार:* महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र शासन  # शहर व उपनगर यांसह

## महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ

८.१६ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ लघु उद्योगांचा विकास करण्यासाठी उद्योजकांना सहाय्य करते आणि सल्ला, समुपदेशन, पणन, प्रशिक्षण, आयात-निर्यात, उद्योजकता विकास कार्यक्रम यासारख्या पूरक सेवा देते. महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची उलाढाल तक्ता ८.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.७ महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाची उलाढाल**

(₹ कोटी)

| बाब | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| पणन सहाय्य | २१.०३ | ४.२२ | २.४८ |
| इतर | ७.९० | ०.८६ | ०.६४ |
| **एकूण** | **२८.९३** | **५.०८** | **३.१२** |

*आधार*: महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ +डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ

८.१७ राज्यामध्ये खादी व ग्रामोद्योग उपक्रमांचे संघटन, विकास व विस्तारासाठी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामार्फत पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, कारागीर रोजगार हमी योजना, इत्यादी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येते. राज्यातील खादी व ग्रामोद्योग घटकांना सन २०२१-२२ मध्ये ₹ ६३.८७ कोटी तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ ३९.४८ कोटी अनुदान वितरीत करण्यात आले. खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती तक्ता ८.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.८ खादी व ग्रामोद्योग घटकांची प्रगती**

| वर्ष | सहाय्यित घटक (लाख) | उत्पादन मूल्य (₹ कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| २०२०-२१ | १.७७ | १,८२५ | ३.७ |
| २०२१-२२ | १.८२ | १,८२७ | ३.८ |
| २०२२-२३+ | १.८४ | १,९५० | ३.९ |

*आधार*: महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ + डिसेंबरपर्यंत

## महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था

८.१८ आर्थिक विकासाला गती देऊन रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी जैव-तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, इंटरनेट ऑफ थिंग्ज, स्वच्छ ऊर्जा इत्यादी उदयोन्मुख क्षेत्रांमध्ये नाविन्यपूर्ण उपाय योजण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहीत करणे तसेच पारंपरिक क्षेत्रांमध्ये सुधारणा करणे हे महाराष्ट्र राज्य नाविन्यपूर्ण स्टार्ट अप धोरण, २०१८ चे उद्दिष्ट आहे. व्यवसाय इनक्युबेटरचे जाळे तयार करणे, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजक विचारांची जोपासना करणे, संबंधित हितभागधारकांना एकत्रित करणे, नियामक वातावरण सुलभ करणे आणि धोरणात्मक गुंतवणूक करणे हा या धोरणाचा समग्र दृष्टीकोन आहे. धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था ही प्रमुख संस्था आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत देशातील एकूण ८५,६८८ स्टार्टअपपैकी १६,०१४ स्टार्टअप राज्यात आहेत. महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेचे काही उपक्रम पुढीलप्रमाणे आहेत:

१) माहे जून, २०१८ पासून दरवर्षी 'महाराष्ट्र स्टार्टअप सप्ताह' आयोजित केला जात असून दरवर्षी नाविन्यपूर्ण उपाय योजणाऱ्या २४ स्टार्टअपना प्रत्येकी ₹ १५ लाख रकमेचा कार्यादेश वितरीत केला जातो. सुरूवातीपासून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ५,५०० पेक्षा जास्त स्टार्टअपनी यात सहभाग घेतला असून त्यापैकी १२० स्टार्टअपना राज्यातील पथदर्शी प्रकल्पांसाठी कार्यादेश देण्यात आले.

२) स्टार्टअप आणि सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी महाराष्ट्र डिफेन्स अँड एरोस्पेस व्हेंचर फंड (₹ ३३० कोटी), महाराष्ट्र सोशल व्हेंचर फंड (₹ १२० कोटी) आणि अनुसुचित जाती/ अनुसुचित जमातीतील उद्योजकांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर फंड (₹ ८० कोटी) या उपक्रम निधीद्वारे ₹ ५०० कोटींहून अधिक निधी वितरीत केला आहे.

३) राज्यात उद्योग व शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने इनक्युबेटरचे जाळे प्रस्तापित करुन त्याद्वारे स्टार्टअपच्या विकासाकरिता पोषक वातावरण निर्मिती करुन यशस्वी उद्योजक घडविण्याकरिता महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने विविध क्षेत्रात पारंगत असलेल्या संस्थामध्ये इनक्युबेटरची स्थापना केली आहे. इनक्युबेटरच्या नियतकालिक कामगिरीच्या अधिन राहून प्रत्येक इनक्युबेटर पाच वर्षात ₹ पाच कोटी मिळण्यास पात्र आहेत. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने १८ इनक्युबेटरची स्थापना केली असून ₹ १० कोटी वितरित केले.

४) उद्योजकता व नाविण्यपूर्ण उपक्रमांबाबत जनजागृती करण्यासाठी राज्यात दि. १५ ऑगस्ट, २०२२ रोजी महाराष्ट्र स्टार्टअप यात्रेचे आयोजन करण्यात आले. यात्रेत एकूण २,६३० नवउद्योजकांनी भाग घेतला आणि निवड झालेल्या २० विजेत्यांना रोख बक्षिसे देण्यात आली तसेच त्यांना इन्क्युबेशनपूर्व सहाय्य करण्यासाठी पात्र ठरविण्यात आले.

५) महिलांच्या नेतृत्वाखालील स्टार्टअपना सहाय्य करण्यासाठी महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्थेने महिला उद्योजकता कक्षाची स्थापना केली आहे. या कक्षामार्फत माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत १२० महिला उद्योजकांना हार्ड आणि सॉफ्ट उद्योजकता कौशल्यांचे प्रशिक्षण देण्यात आले.

६) माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत, ४१ स्टार्टअपना देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पेटंट अर्जापोटी भरावयाच्या शुल्काची ₹ ४९.१५ लाखांची प्रतिपूर्ती करण्यात आली.

७) माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत, गुणवत्ता चाचणी खर्चाचा भाग म्हणून ३१ स्टार्टअपना ₹ २०.९७ लाखांची प्रतिपूर्ती करण्यात आली.

८.१८.१ निवडक राज्यातील स्टार्टअपची संख्या आणि त्यातील रोजगार तक्ता ८.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.९ निवडक राज्यांतील स्टार्टअपची संख्या व त्यातील रोजगार**

(संख्या)

| राज्य | दि.३१ डिसेंबर, २०२२ रोजी | |
|---|---|---|
| | स्टार्टअप | रोजगार |
| आंध्र प्रदेश | १,३४१ | १२,५५७ |
| गुजरात | ६,१८० | ६४,४२३ |
| कर्नाटक | १०,१३९ | १,१३,५४६ |
| **महाराष्ट्र** | **१६,०१४** | **१,६७,५७१** |
| तामिळनाडू | ५,००४ | ४८,८९८ |
| उत्तरप्रदेश | ७,९५७ | ७८,९५० |

*आधार :* महाराष्ट्र राज्य नाविन्यता संस्था

## खनिजे

८.१९ राज्यात उत्पादनक्षम खनिज साठा असणारे सुमारे ५८ हजार चौ. किमी क्षेत्र असून ते राज्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्राच्या १९ टक्के आहे. विदर्भातील भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, गोंदिया व यवतमाळ जिल्ह्यांमध्ये, पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यामध्ये, तसेच कोकणातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये कोळसा, चुनखडी, कच्चे मँगनिज, बॉक्साईट, कच्चे लोखंड, कायनाईट, फ्लोराईट (ग्रेडेड), क्रोमाईट, इत्यादी प्रमुख खनिजांचे साठे आहेत.

८.१९.१ राज्यात दि.३१ मार्च, २०२२ रोजी प्रमुख खनिजांच्या १७२ खाणी कार्यरत होत्या व त्यामध्ये ४७,५४१ रोजगार होता. सन २०२१-२२ मध्ये उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ११,६२० कोटी होते. सन २०२२-२३ मध्ये सप्टेंबरपर्यंत उत्खनन केलेल्या खनिजांचे एकूण मूल्य ₹ ४,४१६ कोटी होते. सर्व खनिजांमध्ये कोळशाचे उत्पादन सर्वाधिक व त्या खालोखाल चुनखडीचे उत्पादन होते. सन २०२१-२२ मध्ये सुमारे ५६५.२१ लाख मे.टन कोळशाचे उत्खनन झाले असून त्याचे मूल्य ₹ ९,८९६ कोटी (उत्खनन केलेल्या खनिजांच्या एकूण मुल्याच्या ८५ टक्के) होते. राज्यातील खनिजांचे उत्पादन परिशिष्ट ८.१ मध्ये दिले आहे.

## वस्त्रोद्योग

८.२० राज्यात कापूस व रेशीम यांचे विपुल प्रमाणात तर लोकरीचे चांगल्या प्रमाणात उत्पादन होते. त्या बरोबरच अपारंपरिक धाग्याचे चांगले स्रोत असलेल्या बांबू, केळी, घायपात, अंबाडी आणि काथ्या यांचे देखील मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. वस्त्रोद्योग धोरण, २०१८-२३ वस्त्रोद्योगाच्या पुनरुज्जीवनावर लक्ष केंद्रीत करीत असून या धोरणाचे उद्दिष्ट राज्यातील उत्पादन व प्रक्रिया यांमधील तफावत कमी करणे हे आहे. यामधून ₹ ३६,००० कोटी गुंतवणूकीसह १० लाख रोजगार निर्मिती होणे अपेक्षित आहे.

८.२०.१ **कापड गिरण्या :** राज्यात ४८.८२ लाख चाती आणि ४३,८६३ रोटर्स स्थापित क्षमता असलेल्या एकूण २२५ सूत गिरण्या व संयुक्त कापड गिरण्या आहेत.

८.२०.२ **तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजना :** वस्त्रोद्योगास जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनविण्याकरिता नवीन व सुयोग्य तंत्रज्ञान प्राप्त होण्याकरीता सहाय्य करण्यासाठी केंद्र शासनाने १९९९ मध्ये तंत्रज्ञान श्रेणीवाढ निधी योजना सुरू केली. राज्याच्या वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत ३,०२६ वस्त्रोद्योग प्रकल्प दीर्घ मुदतीच्या कर्जावरील व्याज अनुदानासाठी तंत्रज्ञान श्रेणीवर्धन निधी योजनेत अंतर्भूत केले आहेत. या प्रकल्पांपैकी सन २०२१-२२ मध्ये २७२ प्रकल्पांना ₹ ७९.७३ कोटी आणि सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ८० प्रकल्पांना ₹ ५२.५८ कोटी व्याज व भांडवली अनुदान देण्यात आले.

८.२०.३ **वस्त्रोद्योग संकुले :** अनेक लघु व मध्यम वस्त्रोद्योग उद्योगांना त्यांचा व्यवसाय वृद्धिंगत करण्यासाठी वस्त्रोद्योग संकुले हे माध्यम आहे. राज्यात एकूण १२ वस्त्रोद्योग संकुले असून ती हिंगणघाट (वर्धा), बसमत (हिंगोली), लातूर (लातूर), शिरपूर, धुळे व देगाव (धुळे), भिवंडी (ठाणे), बारामती (पुणे), इस्लामपूर (सांगली) आणि इचलकरंजी (कोल्हापूर) येथे आहेत. या वस्त्रोद्योग संकुलांमध्ये ४०,१७१ रोजगारासह ९२८ घटक कार्यरत आहेत.

## पर्यटन

८.२१ राज्यात वेगाने वाढणाऱ्या क्षेत्रांपैकी पर्यटन हे एक क्षेत्र असून मोठ्या प्रमाणात परकीय चलन निर्माण करण्यासह भरीव रोजगार संधी निर्माण करीत आहे. देशातील पर्यटनासाठी लोकप्रिय असलेल्या राज्यांपैकी महाराष्ट्र एक राज्य असून समुद्र किनारे, वन्यजीव अभयारण्ये, थंड हवेची ठिकाणे, नैसर्गिक गुंफा, धबधबे, किल्ले, वैविध्यपूर्ण सण, प्राचीन तीर्थक्षेत्र मंदीरे, संग्रहालये व ऐतिहासिक स्मारके अशा विविध पर्यटनाचा अनुभव देते. राज्याने नेहमीच इतर राज्यांमधील आणि देशांमधील पर्यटकांना आकर्षित केले आहे. 'भारत पर्यटन

सांख्यिकी, २०२२' अहवालानुसार सन २०२१ मध्ये, देशांतर्गत पर्यटक भेटींमध्ये राज्य पाचव्या क्रमांकावर आणि विदेशी पर्यटक भेटींमध्ये दुसऱ्या क्रमांकावर होते. पर्यटनासाठी सर्वाधिक लोकप्रिय राज्यांसाठी राज्यनिहाय पर्यटक भेटींची संख्या तक्ता ८.१० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१० राज्यनिहाय पर्यटक भेटींची संख्या**

(लाख)

| राज्य | देशांतर्गत | | | विदेशी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९ | २०२० | २०२१ | २०१९ | २०२० | २०२१ |
| आंध्रप्रदेश | २,३७०.५ | ७०८.३ | ९३२.८ | २.८ | ०.७ | ०.३ |
| गुजरात | ५८८.६ | १९४.६ | २४५.३ | ६.० | २.१ | ०.१ |
| कर्नाटक | २,२७९.३ | ७७४.५ | ८१३.३ | ६.१ | १.७ | ०.७ |
| केरळ | १८३.८ | ४९.९ | ७५.४ | ११.८ | ३.४ | ०.६ |
| **महाराष्ट्र** | **१,४९२.९** | **३९२.३** | **४३५.७** | **५५.३** | **१२.६** | **१.९** |
| राजस्थान | ५२२.२ | १५१.२ | २१९.८ | १६.१ | ४.५ | ०.३ |
| तामिळनाडू | ४,९४८.७ | १,४०६.५ | १,१५३.४ | ६८.७ | १२.३ | ०.६ |
| उत्तर प्रदेश | ५,३५८.६ | ८६१.२ | १,०९७.१ | ४७.५ | ८.९ | ०.४ |
| **अखिल भारत** | **२३,२१९.८** | **६,१०२.२** | **६,७७६.३** | **३१४.१** | **७१.७** | **१०.५** |

*आधार* : भारत पर्यटन सांख्यिकी,२०२२ अहवाल

८.२१.१ सन २०२५ पर्यंत राज्याला अग्रगण्य पर्यटनस्थळ बनविणे आणि या उद्योगात दहा लाख अतिरिक्त रोजगार निर्मितीसह ₹ ३०,००० कोटी गुंतवणूक आकर्षित करणे हे महाराष्ट्र पर्यटन धोरण, २०१६ चे ध्येय आहे. माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत राज्यात १,४७३ निवास व न्याहारी उद्योजक आणि १४१ महाभ्रमण उद्योजक होते. सन २०२०-२१ मध्ये ₹ २८४.५३ कोटी अपेक्षित गुंतवणुकीचे एकूण १० प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ₹ १६२.३५ कोटी अपेक्षित गुंतवणुकीच्या चार प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली.

८.२१.२ राज्याने कृषी-पर्यटन धोरण सप्टेंबर, २०२० मध्ये जाहीर केले आहे. कृषी-पर्यटनाद्वारे ग्रामीण विकास, शेती उत्पादनांना बाजारपेठ सुनिश्चित करणे, शेतीशी संबंधित व्यवसायांना प्रोत्साहन देणे, लोककला व परंपरा प्रदर्शित करणे, ग्रामीण महिला व तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे आणि शहरी लोकांना शेतीविषयक कामांची माहिती व अनुभव प्रदान करणे ही या धोरणाची उद्दिष्टे आहेत. वैयक्तिक शेतकरी, कृषी सहकारी संस्था, कृषी संशोधन केंद्रे, कृषी महाविद्यालये व विद्यापीठे आणि शेतकऱ्यांनी स्थापन केलेल्या कंपन्या/ भागीदारी संस्था कृषी-पर्यटन केंद्रे स्थापन करण्यास पात्र आहेत. हे उपक्रम कर्ज आणि इतर कर लाभासाठी पात्र आहेत. कृषी पर्यटनामध्ये नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण ७७७ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ४७२ अर्ज मंजूर केले.

८.२१.३ माहे ऑगस्ट, २०२० मध्ये जाहीर करण्यात आलेल्या बीच शॅक धोरणाच्या माध्यमातून कोकण किनारपट्टीवर पर्यावरणपुरक आणि तटीय नियमन क्षेत्राची पूर्तता करणारे तात्पुरते बीच शॅक, आरामखुर्च्या, छत्र्या आणि बिचवरील सार्वजनिक सुविधा केंद्रे सुरू करता येतात. या प्रकल्पासाठी पालघर मधील केळवे आणि बोर्डी, रायगड मधील दिवेआगर व वरसोली, रत्नागिरीतील आरे वारे व गुहागर आणि सिंधुदुर्गातील कुणकेश्वर व तारकर्ली या लोकप्रिय किनाऱ्यांची निवड करण्यात आली आहे.

८.२१.४ पर्यटन क्षेत्रातील आदरातिथ्य हा प्रमुख सेवा उद्योग आहे. राज्याने या क्षेत्राला 'उद्योगाचा दर्जा' दिला असून या क्षेत्रातील व्यवसाय सुलभतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने परवाना मंजुरीसाठी एक खिडकी योजना सुरू केली आहे. राज्य शासनाने या परवानग्या/ मान्यता/ परवान्यांची संख्या ७० वरून १० वर आणली आहे. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत आदरातिथ्य क्षेत्रात नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी एकूण ५०७ अर्ज प्राप्त झाले आहेत.

८.२१.५ हॉटेल आणि रिसॉर्ट सुविधांची संख्या अत्यंत कमी प्रमाणात असलेल्या अतिदुर्गम खेड्यांमध्ये, जेथे कायमस्वरूपी बांधकाम प्रतिबंधित आहे अशा राखीव ठिकाणी आणि समुद्र किनारे, ऐतिहासिक किल्ले, पर्वत रांगा, थंड हवेची ठिकाणे, नद्या, वनसंपदा, ऐतिहासिक वारसा स्थळे, गुंफा, धरणे यासारख्या काही विशिष्ट ठिकाणी पर्यटन विकसित करण्यासाठी राज्य शासनाने माहे मार्च, २०२१ मध्ये कॅरॅव्हॅन पर्यटन धोरण मंजूर केले आहे. या धोरणाचा हेतू कॅरॅव्हॅन आणि कॅम्परव्हॅनच्या मदतीने पर्यटकांना सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी एक सुनियोजित व्यवस्था निर्माण करुन सुरक्षित प्रवास, सहल आयोजकांना प्रोत्साहने आणि रोजगाराच्या संधींस चालना देणे हा आहे. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत एकूण १६ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी सहा अर्जांना मंजूरी देण्यात आली.

८.२१.६ राज्याने माहे ऑगस्ट, २०२१ मध्ये नवीन साहसी पर्यटन उपक्रम धोरण मंजूर केले असून यामध्ये ट्रेकिंग, पॅराग्लायडिंग, वॉटर रॅपलिंग, रिव्हर राफ्टिंग, बाइकिंग, रॉक क्लाइंबिंग, स्कूबा डायव्हिंग, इत्यादिसारखे २५ पेक्षा जास्त साहसी उपक्रम समाविष्ट आहेत. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत एकूण १,०५६ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी ३८३ अर्जांना मंजूरी देण्यात आली.

## वार्षिक उद्योग पाहणी

८.२२ वार्षिक उद्योग पाहणी ही औद्योगिक सांख्यिकीचा प्रमुख स्रोत आहे. या पाहणीद्वारे नोंदणीकृत वस्तुनिर्माण क्षेत्रातील निविष्ठी, स्थिर व खेळते भांडवल, रोजगार, उत्पादन, मूल्यवृद्धि, इत्यादींबाबतचे अंदाज उपलब्ध होतात. वार्षिक उद्योग पाहणीत कारखाना अधिनियम, १९४८ च्या विभाग-दोन एम (i) आणि दोन एम (ii) खाली नोंदणी झालेल्या सर्व कारखान्यांचा आणि विडी व सिगारेट कामगार (रोजगाराच्या अटी) अधिनियम, १९६६ खाली नोंदणी झालेल्या विडी व सिगारेट कारखान्यांचा समावेश आहे. वार्षिक उद्योग पाहणी २०१९-२० वर आधारित उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये तक्ता ८.११ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ८.११ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये**

(₹ कोटी)

| वैशिष्ट्ये | २०१८-१९ | | | २०१९-२० | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | अखिल भारताशी टक्केवारी | महाराष्ट्र | अखिल भारत | अखिल भारताशी टक्केवारी |
| उद्योग (संख्या) | २५,९७२ | २,४२,३९५ | १०.७ | २५,६१० | २,४६,५०४ | १०.४ |
| रोजगार (लाख) | २०.३५ | १६२.८० | १२.५ | २०.३८ | १६६.२४ | १२.३ |
| स्थिर भांडवल | ४,२३,८३१ | ३४,६६,०७० | १२.२ | ४,३३,२०४ | ३६,४१,३५२ | ११.६ |
| खेळते भांडवल | १,३५,७८८ | ८,०८,६६५ | १६.८ | १,३५,१६८ | ८,८३,३०१ | १५.३ |
| एकूण उत्पादन | १३,३०,५६० | ९२,८१,७९९ | १४.३ | १२,३९,७६९ | ८९,८३,३०१ | १३.८ |
| एकूण निविष्ठी | १०,९८,१७६ | ७७,४३,७८० | १४.२ | १०,२३,९०८ | ७४,९७,५५६ | १३.७ |
| स्थूल मूल्यवृद्धि | २,३२,३८३ | १५,३८,०१९ | १५.१ | २,१५,८६० | १४,८५,७४५ | १४.५ |
| निव्वळ मूल्यवृद्धि | १,९६,२१८ | १२,७६,४६६ | १५.४ | १,७७,९३६ | १२,१२,६४८ | १४.७ |
| नफा | ८०,२५२ | ५,५६,५२३ | १४.४ | ६०,६६२ | ४,६९,४७३ | १२.९ |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

८.२२.३ सन २०१९-२० मध्ये एकूण उत्पादन मुल्यामध्ये खाद्य उत्पादने व पेये (१५.४ टक्के), रसायने आणि रासायनिक उत्पादने (१३.० टक्के), मुलभूत धातू (११.४ टक्के), मोटार वाहने, ट्रेलर्स आणि निम ट्रेलर्स (१०.० टक्के), कोळसा व शुद्ध पेट्रोलियमची उत्पादने (८.९ टक्के) आणि यंत्रे व यंत्रसामग्री, यंत्रे आणि यंत्रसामग्रींची दुरूस्ती व उभारणी (८.४ टक्के) हे प्रमुख उद्योग आहेत. सन २०१९-२० मध्ये सर्व उद्योग गटांमध्ये या उद्योग गटांचे एकूण उत्पादन मुल्यामधील प्रमाण ६७.१ टक्के आहे, तर स्थिर भांडवलातील हे प्रमाण ६६.६ टक्के आहे. वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत निवडक निर्देशक तक्ता ८.१२ मध्ये दिले आहेत. राज्यातील उद्योगांची निवडक वैशिष्ट्ये (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत) परिशिष्ट ८.२ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ८.१२ वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत निवडक निर्देशक**

(₹ लाख)

| निर्देशक | २०१८-१९ | | २०१९-२० | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | अखिल भारत | महाराष्ट्र | अखिल भारत |
| **अ) प्रति कारखाना** | | | | |
| स्थिर भांडवलातील गुंतवणूक | १,६३२ | १,४३० | १,६५२ | १,४७७ |
| उत्पादित वस्तू व सेवा यांचे मूल्य | ५,१२३ | ३,८२९ | ४,८४१ | ३,६४४ |
| निव्वळ मूल्यवृद्धि | ७५५ | ५२७ | ६९५ | ४९२ |
| कामगार (संख्या) | ५७ | ५३ | ५७ | ५३ |
| **ब) प्रति कामगार** | | | | |
| निव्वळ मूल्यवृद्धि | १३.३ | १०.० | १२.२ | ९.३ |
| वार्षिक वेतन | २.१ | १.७ | २.२ | १.८ |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

## औद्योगिक उत्पादन निर्देशांक

८.२३ अखिल भारताचे औद्योगिक उत्पादन निर्देशांक उत्पादन स्तरातील बदलाचे मापन करतो आणि त्यामुळे किंमतीत होणाऱ्या बदलांच्या प्रभावापासून तो मुक्त आहे. यामध्ये अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रातील उत्पादन कार्यांचा मागोवा घेता येतो आणि म्हणूनच शासनाला धोरण निश्चितीसाठी तसेच विविध संस्थांना देखील हा निर्देशक अत्यंत उपयुक्त आहे. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन अखिल भारतीय स्तरावर मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक परिगणित करते. गटनिहाय व वापर-आधारीत प्रकारनिहाय अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांक तक्ता ८.१३ मध्ये दिले आहेत. भारतातील औद्योगिक निर्देशांकांची मालिका परिशिष्ट ८.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१३  गटनिहाय व वापर-आधारीत प्रकारनिहाय अखिल भारतीय औद्योगिक निर्देशांक**

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| बाब | भार | सरासरी औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक (एप्रिल ते डिसेंबर) | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२१-२२ | २०२२-२३ | टक्केवारी बदल |
| सर्वसाधारण निर्देशांक | १००.०० | १२८.८ | १३५.७ | ५.४ |
| **गटनिहाय** | | | | |
| खाणकाम | १४.३७ | १०७.४ | ११३.२ | ५.४ |
| वस्तुनिर्माण | ७७.६३ | १२८.६ | १३४.८ | ४.८ |
| वीज | ७.९९ | १६९.३ | १८६.० | ९.९ |
| **वापर-आधारीत प्रकार** | | | | |
| प्राथमिक वस्तू | ३४.०५ | १२५.९ | १३५.७ | ७.८ |
| भांडवली वस्तू | ८.२२ | ८४.९ | ९६.९ | १४.१ |
| पुनर्निमाण वस्तू | १७.२२ | १४१.४ | १४७.७ | ४.५ |
| पायाभूत/ बांधकाम वस्तू | १२.३४ | १४४.२ | १५५.२ | ७.६ |
| टिकाऊ उपभोग्य वस्तू | १२.८४ | १११.७ | ११५.५ | ३.४ |
| अल्पजीवी उपभोग्य वस्तू | १५.३३ | १४६.५ | १४४.७ | (-)१.२ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

**आलेख ८.१ : मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक (सर्वसाधारण)**




**आलेख ८.२ : गटनिहाय मासिक औद्योगिक उत्पादन निर्देशांक**



# सहकार

८.२४ सहकार चळवळ ही लोकांना संघटीत करणे, भांडवल उभारणी आणि आर्थिक व सामाजिक कार्ये एकत्रितरीत्या करण्यासाठीचे माध्यम असून त्यामुळे त्यांच्या उत्पन्नात वाढ होते तसेच रोजगारनिर्मिती होते. सुरुवातीला कृषी पतपुरवठ्यापुरती मर्यादित असणारी ही चळवळ, आता कृषी प्रक्रिया, पतपुरवठा व बँकिंग, पणन, दुग्ध व्यवसाय, साठवण, वस्त्रोद्योग, गृहनिर्माण इत्यादी क्षेत्रांमध्ये विस्तारली.

८.२५ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात सुमारे २.२३ लाख सहकारी संस्था होत्या. त्यापैकी सुमारे ५४ टक्के या सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.१४ मध्ये दिली आहे व राज्यातील सहकारी संस्थाचा तपशील परिशिष्ट ८.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ८.१४ सहकारी संस्थाची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२* | २०२१ च्या तुलनेत २०२२ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २,१२,९५१ | २,१७,४१० | २,२२,७३८ | २.५ |
| सभासद (लाख) | ५७५ | ५८१ | ५९० | १.६ |
| भरणा भाग भांडवल (₹ कोटी) | २६,५६४ | २६,५४१ | २४,८६२ | (-)६.३ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ३,९२९ | ३,६४८ | ३,५३१ | (-)३.२ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ४,२४,४०२ | ४,४९,९६६ | ४,६९,०१० | ४.२ |
| ठेवी (₹ कोटी) | २,२७,५०५ | २,३१,७६८ | २,३७,९९३ | २.७ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | १,६५,७४१ | १,६०,१२९ | १,५९,४५३ | (-)०.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ५६,६५७ | ५६,९९२ | ५७,९८५ | १.७ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ३७,०१८ | ३८,४४९ | ३८,५४९ | ०.३ |
| येणे कर्जे (₹ कोटी) | १,७०,३७८ | १,८७,६५१ | १,९३,३१९ | ३.० |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

**आलेख ८.३ : सहकारी संस्था व खेळते भांडवल**




## शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका

८.२६ महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित ही राज्यातील शिखर सहकारी बँक आहे, तर जिल्हा स्तरावर ३१ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका कार्यरत आहेत. शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती तक्ता ८.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१५ शिखर व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२* | २०२१ च्या तुलनेत २०२२ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| **महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित** | | | | |
| सभासद (संख्या) | २,००० | २,००० | २,००० | ०.० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ३३,४५४ | ३४,७०४ | ३६,३६७ | ४.८ |
| ठेवी (₹ कोटी) | २०,८४९ | २०,३०८ | २१,०६७ | ३.७ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | २५,४८५ | २१,२१९ | २०,५९२ | (-)३.० |
| येणे कर्ज (₹ कोटी) | २०,८१७ | २३,२९५ | २५,९६० | ११.४ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | १,५६९ | १,६७३ | १,७५६ | ५.० |
| **जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका (३१)** | | | | |
| सभासद (लाख) | २.०१ | २.०० | २.०० | ०.० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | १,१०,०८३ | १,३२,७८३ | १,३७,८९२ | ३.८ |
| ठेवी (₹ कोटी) | ९१,५४१ | ९८,८७७ | १,०३,०९० | ४.३ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | ३९,८६३ | ४१,९८८ | ४१,९५४ | (-)०.१ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ५७,५४९ | ६३,८१८ | ६१,३५८ | (-)३.९ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | १५,१११ | १८,६४९ | १४,८८४ | (-)२०.२ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित * अस्थायी

## प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्था

८.२७ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था प्रामुख्याने हंगामी कृषी कार्यांसाठी अल्प मुदतीचा कृषी पतपुरवठा करतात. दि.३१ मार्च, २०२२ रोजी २१,०९७ प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्था होत्या. यामध्ये २० कृषक सेवा संस्था व ८५६ आदिवासी सहकारी संस्थांचा समावेश असून त्यांची सभासद संख्या अनुक्रमे सुमारे ०.६६ लाख व ७.३९ लाख होती. प्राथमिक कृषी पतपुरवठा संस्थांची माहिती तक्ता ८.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१६ प्राथमिक कृषी पतपुरवठा सहकारी संस्थांची माहिती**

(दि. ३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२* | २०२१ च्या तुलनेत २०२२ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २०,७४४ | २०,८९७ | २१,०९७ | १.० |
| सभासद (लाख) | १५३ | १५३ | १५५ | १.३ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २३,८८६ | २४,१४५ | २६,१५९ | ८.३ |
| स्वनिधी (₹ कोटी) | ४,९८५ | ४,९४४ | ५,२६५ | ६.५ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ३,४८५ | ३,४२८ | ३,७२६ | ८.७ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ८.८० | ९.७० | १०.६० | ९.३ |
| कर्जदार सभासद (लाख) | ३०.८३ | ३०.७२ | ३०.५० | (-)०.७ |
| *पैकी,* १) अत्यल्प भूधारक (एक हेक्टर पर्यंत) | ८.९५ | ९.०१ | ८.५९ | (-)४.७ |
| २) अल्प भूधारक (एक ते दोन हेक्टर पर्यंत) | ७.८० | ७.८३ | ७.५७ | (-)३.३ |
| वितरीत कर्ज (₹ कोटी) | १३,८१६ | १२,९४१ | १३,०७२ | १.० |
| *पैकी,* अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांना वितरीत | ६,०६८ | ५,७३९ | ५,५४९ | (-)३.३ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | १४,५१२ | १८,०१९ | १९,७५३ | ९.६ |
| कर्ज वसुली (₹ कोटी) | ११,१७९ | ९,४१३ | ९,०७९ | (-)३.५ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | ५,८२४ | ६,०८९ | ५,९८६ | (-)१.७ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १०,०७० | ९,९४४ | १०,७२२ | ७.८ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १०,३८३ | १०,४४२ | ९,६४५ | (-)७.६ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## कृषी प्रक्रिया सहकारी संस्था

८.२८ कृषी प्रक्रिया केंद्र स्थापन करण्यासाठी सहकारी संस्थांना राज्य शासन अर्थसहाय्य पुरविते. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणीकृत असलेले सहकारी साखर कारखाने, कापूस पिंजणी व गासड्या बांधणी संस्था, सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग, दुग्ध, मत्स्य व्यवसाय, भात गिरण्या, तेल गिरण्या आणि इतर प्रक्रिया केंद्र या कृषी प्रक्रिया सहकारी संस्थांमध्ये समाविष्ट आहेत. दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात २५,८१६ कृषी प्रक्रिया संस्था कार्यरत असून त्यांची सभासद संख्या अंदाजे ६६ लाख आहे.

८.२९.१ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात १७५ नोंदणीकृत सहकारी साखर कारखाने होते. सहकारी साखर कारखान्यांची माहिती तक्ता ८.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१७ सहकारी साखर कारखान्यांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२* | २०२१ च्या तुलनेत २०२२ मधील शेकडा बदल |
|---|---|---|---|---|
| नोंदणीकृत सहकारी कारखाने (संख्या) | १७५ | १७५ | १७५ | ०.० |
| उत्पादन चालू असलेले कारखाने (संख्या) | ७९ | ९५ | १०१ | ६.३ |
| सभासद ('००) | २७,०९३ | २६,५८२ | २७,०५८ | १.८ |
| राज्य शासनाचे भाग भांडवल (₹ कोटी) | १,३०४.८८ | १,३१०.८५ | १,३१५.२१ | ०.३ |
| प्रतिदिन सरासरी गाळप क्षमता ( लाख मे. टन) | ५.६५ | ७.९५ | ८.०१ | ०.८ |
| गाळप झालेला ऊस (लाख मे. टन) | ५३२.९५ | ९६९.६० | १,३२२.३२ | ३६.४ |
| साखर उत्पादन (लाख मे. टन) | ५९.८२ | १०१.४६ | १३७.३५ | ३५.४ |
| सरासरी उतारा (टक्के) | ११.२२ | ११.१६ | ११.२५ | ०.८ |
| उसाची सरासरी किंमत (₹ प्रति मे. टन) | | | | |
| अ) रास्त व किफायतशीर दर | २,५६६ | २,५८८ | २,५१४ | (-)२.९ |
| ब) कारखान्यांनी प्रत्यक्षात अदा केलेली | २,१६० | २,३५९ | २,६१७ | १०.९ |
| मळी (लाख मे. टन) | १३.४७ | २२.५९ | २७.८२ | २३.२ |
| कारखान्यांची संख्या | | | | |
| अ) आसवनी प्रकल्प असलेल्या | ६८ | ६८ | ७८ | १४.७ |
| ब) सह वीज निर्मिती प्रकल्प असलेल्या | ६० | ६० | ६० | ०.० |
| सह वीज निर्मिती क्षमता (मेगावॅट) | १,२३७.९० | १,२३७.९० | १,२३७.९० | ०.० |
| नफ्यातील कारखाने (संख्या) | ३० | २६ | २८ | ७.७ |
| तोट्यातील कारखाने (संख्या) | ६५ | ६७ | ३७ | (-)४४.८ |

*आधार* : साखर आयुक्त यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.२९.२ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात १३,७४६ सहकारी दुग्ध संस्था व ८१ सहकारी दुग्ध संघ होते. सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती तक्ता ८.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१८ सहकारी दुग्ध संस्था व दुग्ध संघ यांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | सहकारी दुग्ध संस्था | | | सहकारी दुग्ध संघ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२* | शेकडा बदल | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | १३,२३५ | १३,७४६ | ३.९ | ७९ | ८१ | २.५ |
| सभासद (लाख) | १२.४७ | १२.९८ | ४.१ | १.३९ | १.४७ | ५.८ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १३.२८ | १४.०४ | ५.७ | ८२.३७ | ८३.२७ | १.१ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २८.१५ | २८.४२ | १.० | ९०.१८ | ९०.६३ | ०.५ |
| दूध खरेदी (₹ कोटी) | ३१६.६७ | ३२६.७९ | ३.२ | ९८४.२७ | ९८५.३४ | ०.१ |
| दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री (₹ कोटी) | ४७१.३६ | ४९२.५७ | ४.५ | १,२४५.३० | १,२४९.८६ | ०.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ७,९११ | ८,२०४ | ३.७ | ६२ | ६६ | ६.५ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,३२४ | ५,५४२ | ४.१ | १७ | १५ | (-)११.८ |

*आधार* : आयुक्त, दुग्ध व्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.२९.३ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात ७६ कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या सहकारी संस्था होत्या. कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.१९ मध्ये दिली आहे.

८.२९.४ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात २०८ सहकारी सूत गिरण्या होत्या व त्यापैकी ७१ सूत गिरण्या कार्यरत होत्या. सहकारी सूत गिरण्यांची माहिती तक्ता ८.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.१९ कापूस पिंजणी व गासड्या बांधणी करणाऱ्या सहकारी संस्थांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ७६ | ७६ | ०.० |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ७० | ७० | ०.० |
| सभासद ('००) | १००५ | ९७३ | (-)३.२ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ७.८३ | ७.८६ | ०.४ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २.०५ | २.०९ | २.० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ७३.८३ | ७६.८५ | ४.१ |
| पिंजणी केलेला कापूस (मे. टन) | २७.० | २३.२९ | (-)१३.७ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १८ | ११ | (-)३८.९ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५२ | ५९ | १३.५ |

* अस्थायी

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

**तक्ता ८.२० सहकारी सूत गिरण्यांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१* | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| गिरण्यांची संख्या | २१० | २०८ | (-)०.१ |
| *पैकी,* उत्पादन चालू असलेल्या | ७१ | ७१ | ०.० |
| सभासद ('००) | ४,९२३ | ४,८२३ | (-)२.० |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १,८८६.१३ | १,९३८.१३ | २.८ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १,६७६.५६ | १,६५३.३९ | (-)१.४ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ५,१४२.७८ | ६,०९९.४९ | १८.६ |
| चात्यांची संख्या (लाख) | १५.९५ | १५.७८ | (-)१.१ |
| उत्पादित सूताचे मूल्य | २,१२५.४५ | २,७६४.८० | ३०.१ |
| नफ्यातील गिरण्या (संख्या) | ८ | १२ | ५०.० |
| तोट्यातील गिरण्या (संख्या) | ३९ | ५९ | ५१.३ |

*आधार* : आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

८.२९.५ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात ६५० सहकारी हातमाग व १,६९४ सहकारी यंत्रमाग संस्था होत्या. सहकारी हातमाग व सहकारी यंत्रमाग संस्थांची माहिती तक्ता ८.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२१ सहकारी हातमाग व सहकारी यंत्रमाग संस्थांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | हातमाग | | | यंत्रमाग | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१* | २०२२* | शेकडा बदल | २०२१* | २०२२* | शेकडा बदल |
| संस्था (संख्या) | ६४४ | ६५० | ०.९ | १६८२ | १६९४ | ०.७ |
| सभासद ('००) | ५९६.६० | ६०२.०० | ०.९ | ८१४.६३ | ८२०.४९ | ०.७ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ८.०५ | ७.८२ | (-)२.९ | १७६.१४ | १७५.८३ | (-)०.२ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.६९ | १.६४ | (-)०.३ | ५६.७४ | ५२.९७ | (-)६.६ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ९.०४ | ९.३३ | ३.२ | १,०५८.१७ | १,०३८.३६ | (-)१.९ |
| मागांची संख्या ('०००) | ३.६८ | २.९० | (-)२१.२ | १४.१९ | १४.२६ | ०.५ |
| उत्पादन मूल्य (₹ कोटी) | ३०.२५ | ४४.३४ | ४६.६ | ६९.२४ | ७८.५१ | १३.४ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | २१६ | १२८ | (-)४०.७ | १३४ | ११५ | (-)१४.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ४२८ | ५१७ | २०.८ | १,४७५ | १,४७३ | (-)०.१ |

*आधार* : आयुक्त, वस्त्रोद्योग यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी

## मच्छिमारी सहकारी संस्था

८.३० दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात ३,२१८ प्राथमिक मच्छिमारी सहकारी संस्था, ३७ मच्छिमारी सहकारी संघ आणि एक सहकारी महासंघ कार्यरत होते. मच्छिमारी सहकारी संस्थांची माहिती तक्ता ८.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२२ मच्छिमारी सहकारी संस्थांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | ३,२०५ | ३,२१८ | ०.४ |
| सभासद (लाख) | ३.२५ | ३.२७ | ०.६ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ६९.८० | ६९.८५ | ०.१ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | ५५.६७ | ५५.६७ | ०.० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २५१.९० | २५२.०५ | ०.१ |
| मासे व मत्स्य उत्पादन विक्री (₹ कोटी) | ७०८.११ | ७१२.१९ | ०.६ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १,९८५ | २,०१० | १.३ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | १,२२० | १,२१८ | (-)१.० |

*आधार* : आयुक्त, मत्स्यव्यवसाय यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी

## सहकारी पणन संस्था

८.३१ सहकारी पणन संस्थांची संरचना त्रिस्तरीय आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्यादित ही शिखर संस्था असून जिल्हास्तरावर जिल्हा सहकारी पणन संस्था तर ग्रामस्तरावर प्राथमिक सहकारी पणन संस्था कार्यरत आहेत. सहकारी पणन संस्थांची माहिती तक्ता ८.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२३ सहकारी पणन संस्थांची माहीती**

(दि.३१ मार्च रोजी )

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | १,३७० | १,२९१ | (-)५.८ |
| सभासद (लाख) | १०.४१ | १०.५१ | १.० |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ९६.०० | ९७.०० | १.० |
| *पैकी,* राज्य शासनाचे | २४.१० | २४.७१ | २.५ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | १,८९७ | २,०२९ | ७.० |
| विक्री (₹ कोटी) | | | |
| (अ) शेतमाल | ३,६४९ | ३,४९७ | (-)४.२ |
| (ब) खते | ७४४ | ७३८ | (-)०.८ |
| (क) बियाणे | ११८ | १३७ | १६.१ |
| (ड) ग्राहकोपयोगी वस्तू | ४४३ | ४५५ | २.७ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | ६२५ | ६२६ | ०.२ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ६१३ | ६४४ | ५.१ |

*आधार* : सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन    * अस्थायी

## बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था

८.३२ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात २१,०३० बिगर कृषी पतपुरवठा संस्था असून त्यापैकी १३,९५५ नागरी सहकारी पतपुरवठा संस्था, ६,६२० पगारदार नोकरांच्या सहकारी पतपुरवठा संस्था व ४५५ नागरी सहकारी बँका होत्या. सुमारे २४ टक्के बिगर कृषी पतपुरवठा संस्था तोट्यात असून १५ टक्के नागरी सहकारी बँका अवसायनात आहेत. बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती तक्ता ८.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२४ बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| संस्था (संख्या) | २१,००६ | २१,०३० | ०.१ |
| सभासद (लाख) | २८०.८५ | २८३.९१ | १.१ |
| ठेवी (₹ कोटी) | १,०९,९८४ | १,१०,८९३ | ०.८ |
| स्वनिधी (₹ कोटी) | २७,५६२ | २९,०३३ | ५.३ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | १२,३१० | १३,४२२ | ९.० |
| *पैकी,* राज्य शासनाचे | १.० | ०.९ | (-)१०.० |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | २,०२,६६४ | २,०८,७८४ | ३.० |
| वितरीत कर्जे (₹ कोटी) | ८०,७२६ | ८०,७७८ | ०.१ |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ७५,७८८ | ७८,६८२ | ३.८ |
| कर्जे वसुली (₹ कोटी) | ५६,५०१ | ५४,३०८ | (-)३.९ |
| थकीत कर्जे (₹ कोटी) | ११,४४८ | १२,२७२ | ७.२ |
| नफ्यातील संस्था (संख्या) | १४,९९४ | १४,९४० | (-)०.४ |
| तोट्यातील संस्था (संख्या) | ५,००६ | ५,०२२ | ०.३ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन * अस्थायी

## सहकारी ग्राहक संस्था

८.३३ महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ ही शिखर संस्था असून ती जिल्हास्तरावर घाऊक ग्राहक भांडारांच्या कार्यावर नियंत्रण ठेवते. ही घाऊक ग्राहक भांडारे कार्यरत असणाऱ्या प्राथमिक ग्राहक भांडारांना माल वितरित करतात. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात १२९ घाऊक ग्राहक भांडारे व १,५६० प्राथमिक ग्राहक भांडारे कार्यरत होती. सहकारी ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती तक्ता ८.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२५ ग्राहक महासंघ, घाऊक व प्राथमिक सहकारी ग्राहक भांडारांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | सहकारी ग्राहक महासंघ | | घाऊक सहकारी ग्राहक भांडार | | प्राथमिक सहकारी ग्राहक भांडार | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२* | २०२१ | २०२२* | २०२१ | २०२२* |
| संख्या | १ | १ | १२९ | १२९ | १,६१० | १,५६० |
| सभासद ('००) | ६.८५ | ६.८५ | ३,४५८ | ३,५७९ | १२,९६५ | १३,४२८ |
| भाग भांडवल (₹ कोटी) | ०.५१ | ०.५१ | २१.५४ | २२.१५ | ८९.८७ | ९५.७५ |
| *पैकी,* राज्य शासनाचे | - | - | ३.५९ | ३.७१ | ४.३८ | ४.६४ |
| नफ्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | १ | १ | ७६ | ७१ | ९५४ | ९२८ |
| तोट्यातील ग्राहक भांडारे (संख्या) | - | - | ५३ | ५८ | ६३० | ६२५ |

*आधार* : i) सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन * अस्थायी
ii) महाराष्ट्र राज्य सहकारी ग्राहक महासंघ मर्या.

## इतर सहकारी संस्था

८.३४ दि.३१ मार्च, २०२२ रोजी राज्यात ३६ लाख सभासद असलेल्या १,२०,५४० सहकारी गृहनिर्माण संस्था होत्या. त्यापैकी ११,५०७ गृहनिर्माण संस्थांचे हस्तांतरण विकसक/जागामालक यांनी करून दिले असून १६,६१९ गृहनिर्माण संस्थांचे मानीव हस्तांतरण करण्यात आले आहे.

८.३५ दि.३१ मार्च, २०२२ रोजी १०,९१५ मजूर कंत्राट सहकारी संस्था असून सभासद संख्या सुमारे ५.५३ लाख होती. एकूण २५७ जंगल कामगार सहकारी संस्था असून सभासद संख्या ०.६४ लाख होती.

## महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित

८.३६ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित ही राज्यातील गृहनिर्माण पतपुरवठा करणारी मध्यवर्ती संस्था आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित यांची माहिती तक्ता ८.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२६ महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादितची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| सभासद (संख्या) | १०,२४९ | १०,२४० | (-)०.१ |
| खेळते भांडवल (₹ कोटी) | ९०.८५ | ९१.२९ | ०.५ |
| स्थूल वितरीत कर्ज (₹ कोटी) | ६४४.०० | ६४४.०० | ०.० |
| येणे कर्ज (₹ कोटी) | ४५.५५ | ४४.१४ | (-)३.१ |
| कर्ज वसुली (₹ कोटी) | ५.४३ | ४.३५ | (-)१९.९ |
| थकीत कर्ज (₹ कोटी) | १८.६४ | १७.०९ | (-)८.३ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य सहकारी गृहनिर्माण वित्तीय महामंडळ मर्यादित * अस्थायी

## परवानाधारक सावकार

८.३७ कृषी व बिगर कृषी पतपुरवठा संस्थांव्यतिरिक्त परवानाधारक सावकारांना, वैयक्तिक कर्जाचे वाटप उपलब्ध करून देण्यास राज्य शासनाने अनुमती दिली आहे. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालयामार्फत परवाने दिले जातात. परवानाधारक सावकारांची माहिती तक्ता ८.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ८.२७ परवानाधारक सावकारांची माहिती**

(दि.३१ मार्च रोजी)

| तपशील | २०२१ | २०२२* | शेकडा बदल |
|---|---|---|---|
| सावकार (संख्या) | १२,००१ | ११,६१८ | (-)३.२ |
| कर्जदार (संख्या) | ७,८८,७०६ | ७,१४,६३२ | (-)९.४ |
| वाटप केलेले कर्ज (₹ कोटी) | १,७५५.२५ | १,५२०.३५ | (-)१३.४ |

*आधार :* सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

* * * * *

# परिशिष्ट ८.१

## राज्यातील खनिजांचे उत्पादन

(उत्पादन: '००० टनात)
(मूल्य: ₹ लाख)

| अ. क्र. | खनिज पदार्थ | उत्पादन/ मूल्य | १९६१$ | १९७१$ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | मीठ | उत्पादन | ३८४ | ४७२ | ५४० | २२९ | १४८ | १८० | ७० | ९४ |
| २ | कोळसा | उत्पादन | ८५६ | २,०८५ | ५,७७० | १६,८४८ | २८,७५४ | ३६,९३२ | ४७,४३४ | ५६,५२१ |
| | | मूल्य | १८६ | ७४५ | ६,६८१ | ४७,२४४ | २,१०,१९२ | ५,०८,२४९ | ९,२२,५८० | ९,८९,६१८ |
| ३ | क्रोमाईट | उत्पादन | १ | ३ | २ | -- | ०.६० | -- | -- | -- |
| | | मूल्य | १ | ५ | ५ | -- | ८ | -- | -- | -- |
| ४ | कच्चे लोखंड | उत्पादन | ३६२ | ६१३ | १,४५६ | ६४५ | २२ | १,०१८ | १,२३८ | २,२६४ |
| | | मूल्य | ५१ | ६९ | ६५७ | ३८४ | ३१ | ७,१५४ | १७,१६७ | २०,५१२ |
| ५ | चुनखडी | उत्पादन | ५५ | ३६३ | ७१५ | ५,१३५ | ६,०६६ | १०,४३१ | १३,५८२ | १५,०८९ |
| | | मूल्य | २ | ३३ | १६३ | १,९६८ | ५,२६६ | १५,६४७ | ५५,५४९ | ४७,६५७ |
| ६ | कच्चे मँगनीज | उत्पादन | १७९ | २१८ | २३२ | २७६ | ३६३ | ५८९ | १,०४२ | १,१२८ |
| | | मूल्य | २०६ | १४८ | ५५३ | १,६१५ | ६,२८० | ५४,१०९ | १,५३,४६१ | ९७,२८९ |
| ७ | केओलिन (नैसर्गिक) | उत्पादन | २ | ३ | ५ | ३ | ०.२० | -- | -- | -- |
| | | मूल्य | ०.१३ | ०.१६ | १ | १ | ०.२९ | -- | -- | -- |
| ८ | बॉक्साईट | उत्पादन | २७ | ३०२ | ३६५ | ५४३ | १,०२७ | २,४९२ | ४५३ | ६४० |
| | | मूल्य | २ | २१ | १३७ | ४४३ | १,७०५ | ४,५८५ | ३,३६७ | ६,८८० |
| ९ | डोलोमाईट | उत्पादन | ६ | ५ | २७ | २८ | ६५ | ७९ | -- | -- |
| | | मूल्य | ०.३८ | १ | ८ | २७ | १४५ | ७१ | -- | -- |
| १० | सिलिका सँड | उत्पादन | ५ | २७ | ८९ | १९७ | १६८ | ३२७ | -- | -- |
| | | मूल्य | ०.३४ | ३ | ३ | ८७ | २२८ | ९८२ | -- | -- |
| ११ | फ्लोराईट (ग्रेडेड) | उत्पादन | -- | -- | -- | ३ | ३ | २८४ | १ | १ |
| | | मूल्य | -- | -- | -- | -- | २४ | १२,४५७ | ९४ | ५९ |
| १२ | लॅटेराईट | उत्पादन | -- | -- | -- | ८५ | ८३ | ४९ | -- | -- |
| | | मूल्य | -- | -- | -- | ७६ | १०७ | ५८ | -- | -- |
| १३ | कायनाईट | उत्पादन | -- | ५ | २२ | १५ | ०.२० | ३ | १ | ३ |
| | | मूल्य | -- | ११ | ५३ | ८५ | १ | २४ | ३६ | २७ |
| १४ | इतर$$ | उत्पादन | -- | ४ | ५४४ | ९१२ | ३०६ | ४,०३४ | ५०८ | १४२ |
| | | मूल्य | -- | ०.३६ | २७ | १९६ | ४९ | ५,२५८ | १,१२६ | ४९ |

*आधार* - (१) भूविज्ञान आणि खनिकर्म संचालनालय, महाराष्ट्र शासन, नागपूर

(२) सहाय्यक मीठ आयुक्त, भारत सरकार, मुंबई (फक्त मीठाकरिता).

$ आकडे कॅलेन्डर वर्षाकरिता आहेत.

$$ सॅन्ड स्टोविंग व सिलीमानाईट हे इतर खनिजांमध्ये अंतर्भूत आहेत.

## परिशिष्ट ८.२

## राज्यातील उद्योगांच्या निवडक बाबी
## (वार्षिक उद्योग पाहणीवर आधारीत)

(₹ कोटी)

| कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्ठी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१) कापूस पिंजणी, सफाई | २०१८-१९ | ५९५ | १,४७३ | ३,०१२ | ९९ | २०,८४९ | १७,१२४ | १९,७०१ | १,०२१ |
| इत्यादी (०१) | २०१९-२० | ५९६ | ९५९ | १,८०७ | ५७ | १०,३३३ | ७,७५२ | ९,५९० | ६२९ |
| (२) मीठ उत्पादन (०८) | २०१८-१९ | १३ | १ | अल्प | २ | ५ | अल्प | १ | ३ |
| | २०१९-२० | ११ | २ | ० | २ | ५ | ० | २ | ३ |
| (३) खाद्य उत्पादने व पेये (१०, ११) | २०१८-१९ | २,७९१ | ४७,५३० | ६,५७१ | ३,०८३ | १,८५,५६७ | १,२७,६३४ | १,५८,१३८ | २४,०४१ |
| | २०१९-२० | २,७२८ | ४७,१९१ | २४,५२६ | ३,२७६ | १,९१,३०५ | १,३५,४५४ | १,६७,६३८ | २०,२०५ |
| (४) तंबाखू उत्पादने (१२) | २०१८-१९ | ८० | १,१९४ | ८३३ | १७५ | ४,१६० | १,३३८ | १,५१४ | २,५२८ |
| | २०१९-२० | ७५ | १,१२४ | ८२६ | २७९ | ४,३३७ | १,३८२ | १,६२६ | २,६०३ |
| (५) वस्त्रे (१३) | २०१८-१९ | १,७४५ | १५,३३९ | (-) ७३२ | २,५६२ | ४०,३८० | २३,२४५ | ३२,५११ | ६,२७० |
| | २०१९-२० | १,७५९ | १८,८३१ | २,११८ | २,२४५ | ३४,६१५ | १९,४८० | २७,६६८ | ५,११७ |
| (६) वस्त्र प्रावरणे (१४) | २०१८-१९ | १,००६ | १,७३५ | २,४७३ | ४८८ | ७,७७३ | ३,३२६ | ५,९१० | १,७०१ |
| | २०१९-२० | ९३३ | २,२०७ | ८७१ | ५०५ | ७,५०६ | ३,०६९ | ५,७५१ | १,५४३ |
| (७) चामडे व त्यासंबंधित | २०१८-१९ | १०९ | २०२ | २८९ | ७० | १,०९५ | ५५५ | ८२२ | २४९ |
| उत्पादने (१५) | २०१९-२० | १०७ | २०७ | २९६ | ५८ | १,२६५ | ५२८ | ९८१ | २६० |
| (८) लाकूड व लाकडाची उत्पादने | २०१८-१९ | २२९ | ५०४ | ३३८ | ५५ | १,६०७ | १,०६२ | १,३४१ | २३५ |
| आणि बूच (फर्निचर वगळून) (१६) | २०१९-२० | १९९ | ८१३ | ५४२ | ५१ | २,२१० | १,४३९ | १,८५९ | २९६ |
| (९) कागद व कागदाची उत्पादने (१७) | २०१८-१९ | ८१२ | ८,५४८ | ३,९०२ | ४२६ | १८,०५० | ११,५१८ | १४,५४९ | २,८६५ |
| | २०१९-२० | ७७३ | ८,३३१ | १,१५८ | ५२८ | १६,८२२ | १०,४१७ | १३,५१७ | २,६४८ |
| (१०) छपाई व मुद्रित माध्यमांचे | २०१८-१९ | ७८९ | ११,१२३ | ६४५ | ४३९ | १०,७८५ | ४,६९१ | ७,३७० | ३,०३१ |
| पुनरुत्पादन (१८) | २०१९-२० | ७७६ | ३,४८१ | २,२४९ | ३७५ | १२,८४१ | ६,१५८ | ९,६७३ | २,७७५ |
| (११) कोळसा, शुद्ध पेट्रोलियम | २०१८-१९ | १०५ | १७,७२५ | ३,६४७ | ६५० | १,१९,९६८ | १,०४,३७६ | १,१२,३१९ | ६,४३७ |
| यांची उत्पादने (१९) | २०१९-२० | १४७ | २४,५०८ | ३,८७८ | ७१८ | १,१०,४२६ | ९५,२९३ | १,०५,९४७ | ३,०६६ |
| (१२) रसायने व रासायनिक उत्पादने, | २०१८-१९ | २,५३४ | ५३,२७३ | २९,२१५ | ३,६२६ | १,७९,७६१ | ९५,०३७ | १,३८,८७५ | ३६,१७७ |
| औषध, वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने (२०,२१) | २०१९-२० | २,६१५ | ५५,५९३ | ३१,७२४ | ३,६०४ | १,६१,७७० | ८२,४३६ | १,२०,१७४ | ३६,६८३ |
| (१३) रबर आणि प्लास्टिक उत्पादने (२२) | २०१८-१९ | १,६९४ | १८,८१० | १८,६६३ | १,६९१ | ५४,४९३ | ३२,९१८ | ४४,५०१ | ८,००१ |
| | २०१९-२० | १,६७३ | २१,३९३ | १,४०५ | १,७८७ | ५१,४५३ | २७,८०० | ३८,९९९ | १०,६२७ |
| (१४) इतर अधातू खनिज उत्पादने (२३) | २०१८-१९ | ८९६ | २५,८७० | २,०१८ | ६३८ | २७,४८४ | १०,२१५ | १९,५३० | ६,७८० |
| | २०१९-२० | ८३६ | १३,२०३ | २४,१८० | ५५५ | १७,४४८ | ७,८५३ | १२,६१२ | ३,८११ |
| (१५) मूलभूत धातू (२४) | २०१८-१९ | १,३११ | ५४,६५४ | ८,३१० | २,२६६ | १,५७,०३६ | ९३,४४२ | १,३८,५५८ | १४,८६९ |
| | २०१९-२० | १,२३८ | ७१,९९७ | ४,९५३ | २,३७९ | १,४०,९८४ | ८९,९३१ | १,२६,१४० | १०,७११ |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.२ (समाप्त)

| | कार्य (दोन अंकी राष्ट्रीय औद्योगिक वर्गीकरण २००८) | वर्ष | उद्योगांची संख्या | स्थिर भांडवल | खेळते भांडवल | कामगारांचे वेतन | एकूण उत्पादन | वापरलेला माल | एकूण निविष्ठी | निव्वळ मूल्यवृद्धि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| (१६) | धातूच्या वस्तूंची उत्पादने यंत्रे व यंत्रसामग्री वगळून (२५) | २०१८-१९ | ३,१९७ | १७,२६८ | ८,८४१ | २,२३५ | ५३,८१० | ३२,७२३ | ४२,२८३ | ९,६८९ |
| | | २०१९-२० | ३,११६ | १८,३९५ | ७०३ | २,२०५ | ५४,६६१ | ३०,७०१ | ४३,१३२ | ९,७४५ |
| (१७) | संगणक, विद्युत आणि ऑप्टीकल उत्पादने (२६) | २०१८-१९ | ४७२ | ४,८२९ | ३,३२७ | ६०२ | २८,८७४ | १८,१०० | २४,०३० | ४,१२९ |
| | | २०१९-२० | ४२४ | ४,६२२ | ४,५७३ | ६८० | २८,४३५ | १८,७२८ | २४,९३७ | २,७४२ |
| (१८) | विद्युत सामग्री (२७) | २०१८-१९ | १,२२९ | १३,१११ | ३,६७० | १,५०८ | ५०,३५१ | ३३,१८५ | ४१,१६९ | ७,६५७ |
| | | २०१९-२० | १,२१४ | १२,४९६ | ६,९४७ | १,४०२ | ४१,०७५ | २६,०६३ | ३२,५०१ | ७,१७१ |
| (१९) | यंत्रे व यंत्रसामग्री (इतरत्र वर्गीकृत नसलेले), यंत्र व यंत्रसामग्रीची दुरुस्ती आणि उभारणी (२८,३३) | २०१८-१९ | २,२९७ | २८,१०५ | २०,१०० | ३,५८१ | १,०९,३३३ | ६२,६२२ | ८३,२२२ | २३,१९२ |
| | | २०१९-२० | २,१८७ | ३३,९८३ | १६,९२६ | ३,७९२ | १,०३,७८५ | ५७,११३ | ८०,३३० | १८,९०६ |
| (२०) | मोटार वाहने, ट्रेलर्स व निम ट्रेलर्स (२९) | २०१८-१९ | १,३४० | ४१,०९३ | ११,३५० | ४,२७९ | १,३८,४७४ | ९८,४४७ | १,१५,८६९ | १६,६९७ |
| | | २०१९-२० | १,४४१ | ४८,६६४ | ७,४५६ | ४,७१३ | १,२३,६६९ | ८१,१०७ | १,०२,०८१ | १५,५०१ |
| (२१) | इतर परिवहन सामग्री (३०) | २०१८-१९ | ३०६ | ८,८८१ | २,४७५ | १,१७१ | ५०,६०३ | ३४,३८२ | ३९,४९२ | ९,९९० |
| | | २०१९-२० | २७१ | ९,७८३ | ८४३ | १,०५० | ४७,०४८ | ३१,२४६ | ३५,४९७ | १०,४१९ |
| (२२) | फर्निचर उत्पादने व इतर वस्तुनिर्माण (३१,३२) | २०१८-१९ | १,१८८ | ४,८७५ | ६,३६१ | १,०१६ | ३८,१९६ | २८,११६ | ३२,७२६ | ४,९४७ |
| | | २०१९-२० | १,२१८ | ५,४९४ | २८५ | १,३०२ | ४९,२१३ | ३६,१९७ | ४२,५५२ | ६,०१४ |
| (२३) | इतर (टाकाऊ वस्तुंचे संचयन, प्रक्रिया व विल्हेवाट संबंधी कार्य, वस्तुंचा पुनर्वापर, प्रकाशन कार्य, इतर उद्योग) (३८,५८, इतर) | २०१८-१९ | १,२३४ | ४७,६८८ | ४८० | १,००३ | ३१,९०६ | ८,७२० | २३,७४७ | ५,७०७ |
| | | २०१९-२० | १,२७३ | १९,९३१ | (-) ३,०९९ | ६८७ | २८,५६१ | ८,८५८ | २०,७०१ | ६,४६० |
| | **एकूण** | **२०१८-१९** | **२५,९७२** | **४,२३,८३१** | **१,३५,७८८** | **३१,६६६** | **१३,३०,५६०** | **८,४२,७७५** | **१०,९८,१७६** | **१,९६,२१८** |
| | | **२०१९-२०** | **२५,६१०** | **४,२३,२०४** | **१,३५,१६८** | **३२,२४८** | **१२,३९,७६९** | **७,७९,००५** | **१०,२३,९०८** | **१,७७,९३६** |

*आधार* - वार्षिक उद्योग पाहणी, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

## परिशिष्ट ८.३
## भारतातील औद्योगिक उत्पादनांचे निर्देशांक

(पायाभूत वर्ष २०११-१२=१००)

| अ.क्र. | बाब | भार | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३++ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **I** | **सर्वसाधारण निर्देशांक** | **१००.००** | **१२५.३** | **१३०.१** | **१२९.०** | **११८.१** | **१२८.८** | **१३५.७** |
| **II** | **खाणकाम** | **१४.३७** | **१०४.९** | **१०७.९** | **१०९.६** | **१०१.०** | **१०७.४** | **११३.२** |
| **III** | **वस्तुनिर्माण** | **७७.६३** | **१२६.६** | **१३१.५** | **१२९.६** | **११७.२** | **१२८.६** | **१३४.८** |
| | **उद्योग गट** | | | | | | | |
| १ | खाद्य उत्पादने | ५.३० | १०८.१ | १२१.३ | १२३.७ | १२०.४ | १२१.७ | १२५.७ |
| २ | पेय | १.०४ | १०५.४ | १०९.२ | १०६.४ | ७८.९ | ८३.८ | १०३.३ |
| ३ | तंबाखू उत्पादने | ०.८० | ९५.१ | ९४.२ | ९५.४ | ८१.८ | ८५.७ | ८७.९ |
| ४ | कापड उत्पादने | ३.२९ | ११७.१ | ११८.७ | ११५.७ | ९१.१ | ११७.७ | १०७.७ |
| ५ | वस्त्रप्रावरणे | १.३२ | १३७.५ | १५४.२ | १५४.६ | १०८.४ | १२८.४ | १२८.२ |
| ६ | चामडे व संबंधित उत्पादने | ०.५० | १२३.९ | १२५.० | १२२.७ | १००.६ | १००.४ | ९४.६ |
| ७ | लाकुड व लाकडाची उत्पादने आणि बूच (फर्निचर वगळता), काड्यापासून बनविलेल्या व मुलामा दिलेल्या वस्तु | ०.१९ | ९२.४ | १०५.१ | ११३.८ | ९१.५ | १०२.९ | १०६.४ |
| ८ | कागद आणि कागदाची उत्पादने | ०.८७ | १०८.९ | १०४.१ | ९०.८ | ६९.६ | ८१.७ | ८२.९ |
| ९ | छपाई व मुद्रित माध्यमांचे पुनरुत्पादन | ०.६८ | ९९.७ | ९७.६ | ९०.७ | ६५.३ | ७०.६ | ९१.० |
| १० | कोळसा आणि शुध्द पेट्रोलियम उत्पादने | ११.७७ | १२३.५ | १२६.७ | १२६.७ | १११.२ | ११८.२ | १२५.७ |
| ११ | रसायने व रासायनिक उत्पादने | ७.८७ | ११६.१ | ११९.० | ११८.५ | ११६.० | १२१.२ | १२९.९ |
| १२ | औषध,वैद्यकीय रसायने व जैविक उत्पादने | ४.९८ | २१२.१ | २१५.५ | २१५.२ | २१८.७ | २२७.६ | २१३.७ |
| १३ | रबर आणि प्लॅस्टिक उत्पादने | २.४२ | ११०.६ | १०८.० | १००.० | ९६.३ | १०३.६ | १०४.५ |
| १४ | इतर अधातू खनिज उत्पादने | ४.०९ | ११३.९ | १२३.६ | १२१.३ | १०५.७ | १२१.५ | १३२.१ |
| १५ | मूलभूत धातू | १२.८० | १३८.० | १४३.३ | १५९.१ | १४९.८ | १७३.३ | १८५.८ |
| १६ | धातूंच्या वस्तुंची उत्पादने (यंत्र व सामग्री वगळून) | २.६५ | १०७.९ | १०६.२ | ९०.६ | ७८.२ | ८४.७ | ८४.८ |
| १७ | संगणक, विद्युत आणि ऑप्टिकल उत्पादने | १.५७ | १४८.५ | १६८.७ | १५१.० | १३२.० | १३८.६ | १४०.१ |
| १८ | विद्युत सामग्री | ३.०० | १०७.४ | ११०.१ | १०५.२ | ९२.३ | १०७.२ | ९७.४ |
| १९ | यंत्रे व यंत्रसामग्री, इतरत्र वर्गीकृत नसलेले | ४.७७ | १२०.५ | १२३.४ | १०७.७ | ९२.५ | १००.० | ११०.३ |
| २० | मोटार वाहने, ट्रेलर्स आणि निमट्रेलर्स | ४.८६ | ११४.५ | १२२.७ | १००.२ | ८१.१ | ९१.५ | ११३.३ |
| २१ | इतर परिवहन सामग्री | १.७८ | १३३.९ | १४५.७ | १३६.६ | ११२.० | १११.८ | १२७.६ |
| २२ | फर्निचर | ०.१३ | १९६.६ | २१२.६ | १९७.३ | १४२.२ | १६४.८ | २१२.४ |
| २३ | इतर वस्तुनिर्माण | ०.९४ | १०६.२ | ९२.८ | ८१.२ | ६२.९ | ९०.० | ९०.९ |
| **IV** | **वीज** | **७.९९** | **१४९.२** | **१५६.९** | **१५८.४** | **१५७.६** | **१६९.३** | **१८६.०** |

*आधार* - राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन ++ एप्रिल २०२२ ते डिसेंबर २०२२ ची सरासरी

## परिशिष्ट ८.४

## राज्यातील सहकारी संस्थांचा तपशील

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **१. सहकारी संस्थांची संख्या** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | २९ | ३१ | ३४ | ३४ | ३४ | ३३ | ३३ | ३३ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २०,४२०$ | १८,५७७ | १९,५६५ | २०,५५१ | २१,४५१ | २०,७४४ | २०,८९७ | २१,०९७ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,९६४ | ५,४७४ | ११,२९१ | २२,०१४ | २३,४३४ | २०,८६३ | २१,००६ | २१,०३० |
| (४) पणन संस्था | ४१० | ४२३ | ९३१ | १,११५ | १,७१९ | १,३४५ | १,३७० | १,२९१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम @ | ६,८१० | १४,३२७ | २८,९५४ | ३९,०७० | ४८,८४८ | २६,६६१ | २६,४९१ | २५,८१६ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था @ | ११,९६४ | २१,९१५ | ४३,८४५ | ७५,२३२ | १,२८,७६० | १,४३,३०५ | १,४७,६१३ | १,५३,४७१ |
| **एकूण** | **४२,५९७** | **६०,७४७** | **१,०४,६२०** | **१,५८,०१६** | **२,२४,३०६** | **२,१२,९५१** | **२,१७,४१०** | **२,२२,७३८** |
| **२. सभासदांची संख्या ('०००)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था$$ | ७० | १,०१४ | १,४८५ | १,३७१ | २४७ | २१३ | २१२ | २१२ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३,७९४ | ५,४१६ | ७,९४२ | १०,१२५ | १५,००१ | १५,३१० | १५,३१४ | १५,४६२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २,४३८ | ३,७५९ | ९,३०२ | १८,४६७ | २१,६१८ | २८,१६६ | २८,०८५ | २८,३९१ |
| (४) पणन संस्था | २८२ | ४७१ | ७४५ | ८४० | १,३३७ | १,०२६ | १,०४१ | १,०५१ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ९५९ | २,१२४ | ३,९७४ | ६,३३९ | ८,०१० | ६,०४३ | ६,५०८ | ६,६३२ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १,०३८ | १,९९९ | ३,४५५ | ५,८८० | ६,८०९ | ६,७३० | ६,९८९ | ७,२८५ |
| **एकूण** | **८,५८१** | **१४,७८३** | **२६,९०३** | **४३,०२२** | **५३,०२२** | **५७,४८७** | **५८,१५०** | **५९,०३३** |
| **३. खेळते भांडवल (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ६१३ | १,८३१ | ८,८०६ | ३९,२६७ | ८९,७१९ | १,४३,६२४ | १,६७,५७८ | १,७४,३५० |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ३४३ | ५२७ | १,८५१ | ६,९८८ | १८,९८७ | २३,८८६ | २४,१४५ | २६,१५९ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १६८ | १,२०९ | ७,५०८ | ६६,८८७ | १,०४,८१४ | २,०४,००९ | २,०२,६६४ | २,०८,७८४ |
| (४) पणन संस्था | ३९ | १८८ | ३४० | १,५१८ | १,३०० | १,६६२ | १,८९७ | २,०२९ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | २१९ | १,०२९ | ४,५८८ | १३,२८८ | २८,७१७ | ४३,३६८ | ४५,६९३ | ४९,५८८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | १०७ | ४२६ | १,१९१ | ६,४९२ | ४,८९७ | ७,८५३ | ७,९८९ | ८,१०० |
| **एकूण** | **१,४८९** | **५,२१०** | **२४,२८४** | **१,३४,४४०** | **२,४८,४३४** | **४,२४,४०२** | **४,४९,९६६** | **४,६९,०१०** |
| **४. स्थूल कर्ज (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ७५१ | १,५२८ | ९,०८५ | २८,७०९ | ४०,४३६ | ६५,९९२ | ६३,८५१ | ६३,११० |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | १३३ | २५० | ८०० | ३,७३४ | ८,०६० | १३,८१६ | १२,९४१ | १३,०७२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | २०४ | १,१२९ | ५,१७८ | ३९,२६८ | ४९,९०७ | ८३,२१९ | ८०,७२६ | ८०,७७८ |
| (४) पणन संस्था | ३ | ३ | ८ | १८ | ११ | ४ | ५ | ५ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ३ | १२ | १७ | १०३ | २,०५२ | २,४९३ | २,३८५ | २,१७८ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ४ | १२ | ६० | २३५ | २१५ | २१६ | २२१ | २३१ |
| **एकूण** | **१,०९८** | **२,९३४** | **१५,१४८** | **७२,०६७** | **१,००,६८१** | **१,६५,७४१** | **१,६०,१२९** | **१,५९,४५३** |

(पुढे चालू)

## परिशिष्ट ८.४ (समाप्त)

| बाब | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| **५. येणे कर्जे (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ४७८ | १,१३७ | ५,८८९ | २३,१२० | ४२,३८५ | ७८,४१३ | ८७,१५८ | ८७,३६२ |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | २८४ | ३८४ | १,३१० | ५,३०८ | १२,०२४ | १४,५१२ | १८,०१९ | १९,७५३ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | १०५ | ७३१ | ४,५९४ | ३५,९०८ | ४७,८६३ | ७२,५४० | ७५,७८८ | ७८,६८२ |
| (४) पणन संस्था | २ | ४ | ९ | १८२ | ५,०३२ | २६ | ३० | ३३ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | ६ | ३० | ६९ | २३६ | ३,७२४ | ४,४०६ | ६,१५८ | ६,९७४ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ८ | २५ | १९१ | २,८९९ | ८३४ | ४८१ | ४९८ | ५१५ |
| **एकूण** | **८८३** | **२,३११** | **१२,०६२** | **६७,६५३** | **१,११,८६२** | **१,७०,३७८** | **१,८७,६५१** | **१,९३,३१९** |
| **६. उलाढाल-तयार मालाच्या विक्रीचे मूल्य (₹ कोटी)** | | | | | | | | |
| (१) शिखर व मध्यवर्ती कृषि व बिगर-कृषि पतसंस्था | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना | ला ना |
| (२) प्राथमिक कृषि पतसंस्था | ५१ | १४६ | २३९ | १,०१२ | ५९३ | ८३७ | ८४७ | ८७२ |
| (३) बिगर-कृषि पतसंस्था | ३ | १० | -- | ३८ | ७६ | ला ना | ला ना | ला ना |
| (४) पणन संस्था | २१४ | ९७९ | २,६०२ | ३,२०५ | १,३६८ | ४,४८१ | ४,९५४ | ४,८२७ |
| (५) शेतमाल प्रक्रिया उपक्रम | १९४ | १,०३१ | ३,४६७ | ७,४९६ | ४६,११२ | २०,५५३ | ३४,१६० | ३६,८०९ |
| (६) सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था | ६९ | १८७ | ३३० | १,५८८ | ४,०७६ | ६,६६२ | ७,६७९ | ७,८४० |
| **एकूण** | **५३१** | **२,३५३** | **६,६३८** | **१३,३३९** | **५२,२२५** | **३२,५३४** | **४७,६३९** | **५०,३४८** |

*आधार* - सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन    *अस्थायी    ला ना - लागू नाही

टीप - १९९०-९१ पर्यंतची आकडेवारी जून अखेरपर्यंतची आहे.

$ यात प्राथमिक कृषि पतसंस्था, प्राथमिक भू-विकास बँका आणि धान्य बँका यांचा १९७०-७१ पर्यंत समावेश आहे.

$$ नाममात्र सभासद वगळून

@ २०००-०१ या वर्षापासून उपसा सिंचन संस्थांचा समावेश उत्पादक ऐवजी सामाजिक सेवा व इतर सहकारी संस्था या प्रकारात करण्यात आला आहे.

# ९
# पायाभूत सुविधा



# ९. पायाभूत सुविधा

९.१ संतुलित, सर्वसमावेशक आणि शाश्वत आर्थिक वाढ साध्य करण्यासाठी चांगल्या पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. राहणीमान सुलभता व व्यवसाय सुलभता राखण्याकरिता पायाभूत सुविधा सहाय्यभूत ठरतात. पायाभूत सुविधांमध्ये भौतिक व सामाजिक सुविधांचा समावेश होतो. भौतिक पायाभूत सुविधांमध्ये प्रामुख्याने पॉवर ग्रीड, वाहतूक व दळणवळणाचे जाळे यांचा अंतर्भाव होतो.

## ऊर्जा

९.२ विकसित आणि जास्त लोकसंख्या असलेल्या राज्यांपैकी एक राज्य असल्याने औद्योगिकीकरण, नागरीकरण, डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर व वाहतूक क्षेत्रातील विद्युतीकरण यामुळे राज्यातील वीजेची मागणी वाढत आहे. वाढत्या वीज मागणीची पुर्तता करण्यात राज्य यशस्वी ठरले आहे. शाश्वत विकास ध्येय ७ 'सर्वांसाठी किफायतशीर, विश्वासार्ह, शाश्वत आणि आधुनिक ऊर्जा उपलब्ध करुन देणे' मध्ये अंतर्भूत असलेल्या स्वच्छ ऊर्जेला चालना देण्यासाठी राज्य प्रयत्नशील आहे.

## वीज

९.३ औद्योगिक, कृषी व सेवा क्षेत्राचे उत्पादन वाढविण्यासाठी विश्वासार्ह तसेच अखंडित वीजपुरवठा आवश्यक आहे. विजेचे वितरण व पारेषण यामध्ये अधिक कार्यक्षमता साध्य करण्यासाठी राज्यात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. शाश्वत विकासासाठी सौर, पवन, जैविक आणि जलविद्युत इत्यादी नवीकरणीय स्रोतांद्वारे वीज निर्मितीस चालना देण्यात येत आहे.

### स्थापित क्षमता

९.३.१ दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यातील वीज निर्मितीची एकूण स्थापित क्षमता ३७,३४८ मेगावॅट असून त्यात खाजगी क्षेत्राचा हिस्सा ५९.९ टक्के, सार्वजनिक क्षेत्राचा ३४.८ टक्के आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी प्रकल्पाचा (रत्नागिरी गॅस पॉवर प्रोजेक्ट मर्यादित) ५.३ टक्के हिस्सा होता. वीज निर्मितीच्या स्थापित क्षमतेमध्ये देशात राज्याचा सर्वाधिक (१०.९ टक्के) हिस्सा आहे. खाजगी क्षेत्रातील विजेच्या स्थापित क्षमतेत नवीकरणीय ऊर्जेचा ४६.० टक्के हिस्सा होता. स्रोतनिहाय स्थापित क्षमता तक्ता ९.१ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.१ : राज्यातील क्षेत्रनिहाय स्थापित क्षमता**




**तक्ता ९.१ स्रोतनिहाय स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | दि. ३१ मार्च रोजी | | | दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी | सन २०२२ मध्ये २०२१ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| | २०२० | २०२१ | २०२२ | | |
| **राज्याअंतर्गत** | **३६,६४४** | **३६,९०२** | **३७,३४८** | **३८,२४६** | **१.२** |
| औष्णिक | २१,१७६ | २१,१७६ | २०,९६६ | २०,९६६ | (-)१.० |
| नवीकरणीय | ९,५८८ | ९,८४६ | १०,५०२ | ११,४०० | ६.७ |
| जलजन्य | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ | ३,०६१ | ०.० |
| नैसर्गिक वायुजन्य | २,८१९ | २,८१९ | २,८१९ | २,८१९ | ०.० |
| **केंद्रीय क्षेत्राकडून वाटप** | **७,८३१** | **७,९४४** | **७,९४४** | **७,९४४** | **०.०** |

*आधार :* महानिर्मिती, महाऊर्जा, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

## वीज निर्मिती

९.३.२ राज्यात सन २०२१-२२ मध्ये १,३१,६८२ दशलक्ष युनिट वीज निर्मिती झाली. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत राज्यात १,०१,५११ दशलक्ष युनिट वीज निर्मिती झाली. राज्यात सन २०२१-२२ मध्ये झालेल्या वीज निर्मितीत खाजगी क्षेत्र, सार्वजनिक क्षेत्र आणि सार्वजनिक-खाजगी भागीदारी क्षेत्राचा हिस्सा अनुक्रमे ५६.२ टक्के, ४१.४ टक्के आणि २.४ टक्के होता. स्रोतनिहाय वीज निर्मिती तक्ता ९.२ मध्ये दिली आहे.

**आलेख ९.२ : राज्यातील क्षेत्रनिहाय वीज निर्मिती**




**तक्ता ९.२ स्रोतनिहाय वीज निर्मिती**

(दशलक्ष युनिट)

| स्रोत | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ | सन २०२१-२२ मध्ये २०२०-२१ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| **राज्यांतर्गत** | **१,२३,३१४** | **१,१५,०६०** | **१,३१,६८२** | **१,०१,५११** | **१४.४** |
| औष्णिक | ९५,४६० | ८७,६९० | १,०१,४४३ | ७९,६०९ | १५.७ |
| नवीकरणीय$ | १३,७५१ | १५,८१३ | १७,९७० | १५,५९३ | १३.६ |
| जलजन्य | ६,१०४ | ५,५९३ | ६,१४४ | ४,४६३ | ९.८ |
| नैसर्गिक वायुजन्य | ७,९९९ | ५,९६४ | ६,१२५ | १,८४६ | २.७ |
| **केंद्रीय क्षेत्राकडून प्राप्त** | **३४,९८८** | **३६,६११** | **३९,५८१** | **३२,८३२** | **८.१** |

टीप : १ युनिट = १ किलोवॅट तास $ बंदिस्त विजेसह + डिसेंबरपर्यंत

*आधार :* महानिर्मिती, महावितरण, केंद्रीय विद्युत प्राधिकरण, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

## वीज खरेदी

९.३.३ सन २०२१-२२ मध्ये महावितरणने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ५.२३ आणि बेस्टने खरेदी केलेल्या विजेचा सरासरी प्रती युनिट दर ₹ ६.५७ होता. महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेल्या विजेचा तपशील तक्ता ९.३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.३ महावितरण आणि बेस्ट यांनी खरेदी केलेली वीज**

| वर्ष | महावितरण | | बेस्ट | |
|---|---|---|---|---|
| | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) | खरेदी केलेली वीज (दशलक्ष युनिट) | एकूण किंमत (₹ कोटी) |
| २०२०-२१ | १,३२,४१४ | ६२,००५ | ३,९२७ | २,३१७ |
| २०२१-२२ | १,४४,२५३ | ७५,४५६ | ४,२६७ | २,८०४ |
| २०२२-२३+ | ९९,९४०# | ५३,६८० | ३,६३६ | २,९८३ |

# नोव्हेंबरपर्यंत + डिसेंबरपर्यंत

*आधार :* महावितरण, बेस्ट

## विजेचा वापर

९.३.४ राज्यात सन २०२१-२२ मध्ये विजेचा एकूण वापर १,३८,७७९ दशलक्ष युनिट होता. राज्यातील विजेचा सर्वाधिक वापर औद्योगिक क्षेत्रात (३८.५ टक्के) तर त्याखालोखाल कृषी क्षेत्रात (२६.१ टक्के) आणि घरगुती क्षेत्रात (२२.१ टक्के) होता. क्षेत्रनिहाय विजेचा वापर तक्ता ९.४ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.४ क्षेत्रनिहाय विजेचा वापर**

(दशलक्ष युनिट)

| क्षेत्र | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ | सन २०२१-२२ मध्ये २०२०-२१ च्या तुलनेत शेकडा बदल |
|---|---|---|---|---|---|
| औद्योगिक | ४६,५२४ | ४४,१०९ | ५३,३७३ | ४३,८९३ | २१.० |
| कृषी | २९,११५ | ३३,९२४ | ३६,२४२ | २५,८६८ | ६.८ |
| घरगुती | २९,२९१ | ३०,२२९ | ३०,६९९ | २५,५२५ | १.६ |
| वाणिज्यिक | १२,९९१ | ९,४१५ | ११,३४७ | १०,९१६ | २०.५ |
| सार्वजनिक सेवा@ | ६,४२८ | ६,०९० | ५,८९७ | ३,७५३ | (-)३.२ |
| रेल्वे | १८५ | १३५ | १७३ | १९३ | २८.१ |
| इतर | ९०४ | ७८९ | १,०४८ | १,५८५ | ३२.८ |
| **सर्व** | **१,२५,४३८** | **१,२४,६९१** | **१,३८,७७९** | **१,११,६५३** | **११.३** |

@ सार्वजनिक दिवाबत्ती व पाणी पुरवठा समाविष्ट + डिसेंबरपर्यंत

*आधार :* महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या.

९.३.५ विजेचा दरडोई अंतिम वापर तक्ता ९.५ मध्ये दिला आहे. राज्यातील वीज पुरवठा व वापर परिशिष्ट ९.१ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.५ विजेचा दरडोई अंतिम वापर**

(युनिट)

| क्षेत्र | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२* | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| **सर्व** | **१,०२१.३** | **७८३.७** | **१,००५.९** | **७६८.५** | **१,११०.२** | **८२४.६** |
| वाणिज्यिक | १०५.८ | ७७.६ | ७६.० | ६४.२ | ९०.८ | ७१.० |
| औद्योगिक | ३७८.८ | २५५.५ | ३५५.८ | २३६.३ | ४२७.० | २७३.० |
| कृषी | २३७.१ | १५६.९ | २७३.७ | १६३.३ | २८९.९ | १६३.८ |
| घरगुती | २३८.५ | २२६.७ | २४३.९ | २४४.१ | २४५.६ | २४८.४ |

*आधार :* केंद्रीय विद्युत प्राधिकरण, महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. * अस्थायी

## विजेची मागणी व पुरवठा

९.३.६ क्षमता वाढ, पारेषण व वितरण जाळ्यातील सुधारणा आणि ऊर्जा संवर्धनाच्या बाबतीत राज्याने केलेल्या विविध उपाययोजनांमुळे वीज पुरवठ्यात सुधारणा झाली आहे. सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा तक्ता ९.६ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.६ सरासरी कमाल मागणीच्या वेळी विजेचा पुरवठा**

(मेगावॅट)

| वर्ष | सरासरी कमाल मागणी | पुरवठा | अधिशेष |
|---|---|---|---|
| २०१९-२० | १९,१०३ | २१,७७१ | २,६६८ |
| २०२०-२१ | १९,२५० | २१,८८१ | २,६३१ |
| २०२१-२२ | २१,२२१ | २१,७५० | ५२९ |
| २०२२-२३+ | २२,३३९ | २२,४४१ | १०२ |

*आधार* : महावितरण + ऑक्टोबरपर्यंत

## पारेषण व वितरणाचे पायाभूत जाळे

९.३.७ पारेषण व वितरणाच्या पायाभूत जाळ्यामध्ये सुधारणा ही सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात अति उच्च दाब उपकेंद्रांचे आधुनिकीकरण, सदोष मीटर बदलणे, अत्याधिक भार असलेल्या उच्च व कमी दाबाच्या वाहिन्यांवरील भार अतिरिक्त रोहित्रे पुरवून कमी करणे, नवीन उपकेंद्रे उभारणे व कार्यान्वित करणे यासह वीजचोरी विरुद्ध मोहिम अशा उपाययोजनांचा समावेश आहे.

९.३.८ अति उच्च दाब वाहिन्यांचे सर्वेक्षण आणि अति उच्च दाब उपकेंद्रांचे स्कॅनिंग याकरिता महापारेषण ड्रोन वापरत आहेत. हे ड्रोन हाय रेझोल्यूशन, नॉर्मल व्हिजन व थर्मोव्हिजन कॅमेरा आणि जीपीएस यंत्रणेसह सुसज्ज आहेत. अति उच्च दाब वाहिनी, टॉवर ॲक्सेसरीज आणि हार्डवेअर जोडणी यांच्या प्रतिबंधात्मक देखभालीकरिता हे ड्रोन मोठ्या प्रमाणात वापरले जात आहेत. ड्रोन वापरामुळे अति उच्च दाबाच्या वाहिन्या व उपकेंद्रांचे सर्वेक्षण किमान वेळेत कमाल अचूकतेने करता येते. यामुळे अति उच्च दाब वाहिन्या आणि उपकेंद्रे कमीत कमी वेळात पूर्वपदावर आणण्यास मदत होते.

९.३.९ माहे मार्च, २०२२ अखेर महापारेषणची ४९,८१३ सर्किट किमीचे जाळे व ७०६ उपकेंद्रे यांसह पारेषण क्षमता सुमारे १,३३,५८३ मेगा व्होल्ट ॲम्पिअर (एमव्हीए) होती. माहे डिसेंबर, २०२२ अखेर ५०,३६७ सर्किट किमी जाळे व ७१२ उपकेंद्रे यांसह पारेषण क्षमता १,३४,६३३ एमव्हीए पर्यंत वाढविण्यात आली. महापारेषणची सन २०२०-२१ व सन २०२१-२२ ची पारेषण हानी अनुक्रमे २.९३ टक्के व ३.१९ टक्के होती तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंतची पारेषण हानी ३.२६ टक्के होती.

९.३.१० मुंबईची वाढती वीज मागणी विचारात घेऊन महापारेषण, अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या. व टाटा पॉवर कं. मर्या. यांच्याकडून पारेषण प्रणालीच्या सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. यासह मुंबईतील सध्याच्या उच्च तापमान कमी दबाव विद्युतवाहक असलेल्या प्रमुख अति उच्च दाब वाहिन्यांच्या पुन:उभारणीचे कामही हाती घेण्यात आले आहे.

**आलेख ९.३ : महावितरणची एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी आणि वितरण हानी**




९.३.११ महावितरणच्या वितरण जाळ्याअंतर्गत माहे मार्च, २०२२ अखेर ४,०८० उपकेंद्रे, ११,२५,४४१ सर्किट किमी वाहिन्या व ८,०८,९६३ वितरण रोहित्रे होती. तर माहे डिसेंबर, २०२२ अखेर ४,०९५ उपकेंद्रे, ११,३३,३०५ सर्किट किमी वाहिन्या व ८,२६,६०० वितरण रोहित्रे होती.

९.३.१२ महावितरणचे वितरण जाळे राज्यात सर्वत्र (मुंबई शहर वगळता) आहे. बेस्टचे वितरण जाळे मुंबई शहरात आहे. महावितरणसह टाटा पॉवर कं. मर्या. व अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांचे मुंबई उपनगरात वितरण जाळे आहे. सन २०२१-२२ मध्ये राज्यातील वीज वितरण यंत्रणेत महावितरणचा हिस्सा ८७.९ टक्के असून त्याखालोखाल अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. यांचा ५.७ टक्के, टाटा पॉवर कं. मर्या. यांचा ३.४ टक्के आणि बेस्टचा ३.० टक्के हिस्सा होता. वितरण हानी तक्ता ९.७ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.७ वितरण हानी**

(टक्के)

| वितरण कंपनी | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| महावितरण | १५.९१ | १५.२९ | १४.७४ | १४.०४ |
| बेस्ट | ४.६२ | ४.८२ | ४.६३ | ४.७३ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ७.३७ | ७.८१ | ६.५२ | ६.४४ |
| टाटा पॉवर कं. मर्या. | १.०२ | १.०२ | १.३१ | १.१८ |

*आधार :* महावितरण, बेस्ट, टाटा पॉवर कं. मर्या., अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. + डिसेंबरपर्यंत

९.३.१३ **औष्णिक ऊर्जेची क्षमता वाढ:** विविध औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रांमध्ये क्षमता वाढीसाठी महानिर्मितीने प्रकल्पांची स्थापना व कार्यान्वयन करण्याच्या कृती आराखड्यास मान्यता दिली आहे. भुसावळ येथील केंद्रात ६६० मेगावॅट क्षमता वाढीच्या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. कोराडी येथील १,३२० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पासाठी वैधानिक मंजुरीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

९.३.१४ **सुधारित वितरण क्षेत्र योजना (सुधारणा अधिष्ठित आणि निष्पत्ती आधारित योजना):** एकूण तांत्रिक व वाणिज्यिक हानी तसेच सरासरी वीज पुरवठा खर्च व सरासरी प्राप्त महसूल यामधील तफावत कमी करण्याच्या उद्देशाने सन २०२१ मध्ये केंद्र शासनाने सुधारित वितरण क्षेत्र योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत माहे मार्च, २०२६ पर्यंत वीज वितरणाच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा, प्रिपेड स्मार्ट मिटरींग व इतर अनुषंगिक कामे करण्यासाठी प्रकल्प खर्चाच्या ६० टक्के अनुदान वितरण कंपन्यांना देण्यात येणार आहे. राज्यामध्ये ही योजना महावितरण व बेस्ट उपक्रमामार्फत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत माहे मार्च, २०२५ पर्यंत २.२५ कोटी बिगर शेती ग्राहकांना, ४.०७ लाख बिगर शेती वितरण रोहित्रांना व २७,८२६ वाहिन्यांना महावितरणमार्फत स्मार्ट मीटर बसविण्याचे निश्चित केले आहे.

## नियामक उपाययोजना व वीज दर

९.४ वीज दर निश्चिती, वीज खरेदी आणि पारेषण व वितरण यंत्रणांच्या प्रापण प्रक्रियांचे नियमन आणि वीज क्षेत्रामधे स्पर्धा, कार्यक्षमता व काटकसरीस प्रोत्साहन देणे यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने माहे एप्रिल, २०२० ते माहे मार्च, २०२५ या कालावधीत प्रत्येक वर्षाकरिता वितरण कंपन्यांसाठी प्रवर्गनिहाय दर निश्चित करण्याकरिता ‘बहुवार्षिक दर नियमन, २०१९’ अधिसूचित केले आहे. सन २०२२-२३ मधील सरासरी वीज दर तक्ता ९.८ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.८ सन २०२२-२३ मधील सरासरी वीज दर**

(₹ प्रति युनिट)

| ग्राहक गट | महावितरण | बेस्ट | अदानी इलेक्ट्रीसिटी | टाटा पॉवर |
|---|---|---|---|---|
| **लघु दाब - घरगुती/निवासी** | | | | |
| दारिद्रय रेषेखालील | ३.८८ | @ | @ | @ |
| ० ते १०० युनिट | ५.८७ | ३.५९ | ४.९५ | २.२६ |
| १०१ ते ३०० युनिट | ९.८७ | ६.५६ | ७.३७ | ५.४४ |
| ३०१ ते ५०० युनिट | १२.८३ | ८.९७ | ८.८७ | ९.०० |
| ५०० युनिट पेक्षा अधिक | १३.६० | १०.३५ | ९.९९ | ९.८६ |
| **लघु दाब - व्यावसायिक/अनिवासी** | | | | |
| ० ते २० किलोवॅट भार | १०.१९ | ७.८० | ८.०५ | ६.५१ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक आणि ५० किलोवॅट पर्यंत भार | १४.०५ | ८.७९ | ९.२१ | ७.८८ |
| ५० किलोवॅट पेक्षा अधिक भार | १६.०३ | ८.८१ | ९.७२ | ८.०८ |
| **लघु दाब - उद्योग** | | | | |
| ० ते २० किलोवॅट भार | ७.०१ | ६.९० | ७.४२ | ६.२२ |
| २० किलोवॅट पेक्षा अधिक भार | ८.८३ | ८.११ | ८.७१ | ७.४३ |
| **लघु दाब - कृषी** | | | | |
| कृषी पंप (मीटर शिवाय) | ४.६१ | ला ना | ला ना | ला ना |
| कृषी पंप (मीटर सह) | ३.७३ | @ | @ | @ |
| इतर (मीटर सह) | ८.१७ | @ | @ | @ |
| **लघु दाब - पथदिवे (सार्वजनिक दिवाबत्ती)** | | | | |
| ग्रामपंचायत आणि अ, ब, क वर्ग नगरपालिका | ६.६१ | ला ना | ला ना | ला ना |
| महानगरपालिका क्षेत्रे | ८.१२ | # | # | # |
| **लघु दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ७.७० | ६.५८ | ७.१५ | ६.५३ |
| इतर | ८.३८ | ६.६९ | ७.५३ | ७.२९ |
| **उच्च दाब - व्यावसायिक** | १३.०९ | ७.८५ | ९.४५ | ८.३६ |
| **उच्च दाब - उद्योग** | ८.४८ | ७.०३ | ७.७२ | ६.९६ |
| **उच्च दाब - रेल्वे/मेट्रो/मोनोरेल** | ८.४३ | ७.५६ | ७.८८ | ७.६६ |
| **उच्च दाब - सार्वजनिक सेवा** | | | | |
| शासकीय शैक्षणिक संस्था व रुग्णालये | ९.३७ | ७.०० | ८.२२ | ८.०३ |
| इतर | १०.७० | ७.६० | ८.२२ | ७.७४ |
| **उच्च दाब - कृषी पंप** | ४.१४ | ला ना | ला ना | ला ना |
| **उच्च दाब - कृषी इतर** | ५.९० | ला ना | ला ना | ला ना |

@ ग्राहकांची संख्या निरंक वा अत्यंत कमी असल्याने सरासरी दर दर्शविले नाहीत ला ना लागू नाही

# लघु दाब पथदिवे, लघु दाब इतर सार्वजनिक सेवांमध्ये समाविष्ट

*आधार*: महाराष्ट्र वीज नियामक आयोग

## नवीकरणीय ऊर्जा

९.५ पवन, सौर, जैविक, बायोगॅस, सागरी लाटा, भू-औष्णिक, इत्यादी स्वच्छ व पर्यावरणस्नेही नवीकरणीय ऊर्जेचे स्रोत आहेत. ऊर्जा संवर्धन अधिनियम, २००१ मधील तरतुदींचे समन्वयन, नियमन व अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) या संस्थेस प्राधिकृत केले आहे. नवीकरणीय ऊर्जेचा प्रचार व प्रसार आणि ऊर्जा संवर्धन कार्यक्रमांची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा सक्रीय आहे.

## अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण, २०२०

९.५.१ राज्य शासनाने नवीन व नवीकरणीय ऊर्जा स्रोतांपासून पारेषण संलग्न व पारेषण विरहित प्रकल्पांद्वारे वीज निर्मितीचे धोरण अंगिकारले आहे. सदर धोरण दि. ३१ डिसेंबर, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीकरिता लागू आहे. या धोरणाअंतर्गत १२,९३० मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जेवर आधारित प्रकल्प, २,५०० मेगावॅट क्षमतेचे पवन ऊर्जेवर आधारित प्रकल्प, १,३५० मेगावॅट क्षमतेचे उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्प, ३८० मेगावॅट क्षमतेचे लघु जलविद्युत निर्मिती प्रकल्प, २०० मेगावॅट क्षमतेचे शहरी घनकचऱ्यावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प व २५ मेगावॅट क्षमतेचे प्रगत तंत्रज्ञानावर आधारित वीज निर्मिती प्रकल्प पारेषण संलग्न प्रकल्पाअंतर्गत स्थापित करण्याचे निश्चित केले आहे. पाच लाख सौर कृषी पंप, पाणी पुरवठ्यासाठी १०,००० सौर पंपांची स्थापना, २६० मेगावॅट क्षमतेचे इमारतीचे छत व जमिनीवरील पारेषण विरहित/ हायब्रीड सौर वीज संच, सुमारे ५०,००० घरांचे विद्युतीकरण, १०० गावांसाठी विकेंद्रीत सूक्ष्म पारेषण प्रकल्प, दोन लाख चौ.मी. क्षेत्रावर सौर उष्णजल संयंत्र व स्वयंपाकासाठी सौर उर्जेवर आधारित संयंत्र व सौर ऊर्जेवर आधारित ४,००० शीतगृहे पारेषण विरहित प्रकल्पाअंतर्गत स्थापित करण्याचे निश्चित केले आहे.

९.५.२ नवीकरणीय ऊर्जेच्या स्थापित क्षमतेनुसार राजस्थान, गुजरात, तामिळनाडू आणि कर्नाटक नंतर राज्य देशात पाचव्या क्रमांकावर आहे. नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता तक्ता ९.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.९ नवीकरणीय ऊर्जेची संभाव्य व स्थापित क्षमता**

(मेगावॅट)

| स्रोत | संभाव्य क्षमता | स्थापित क्षमता | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | दि. ३१ मार्च रोजी | | | दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी |
| | | २०२० | २०२१ | २०२२ | |
| पवन | ९८,२१० | ४,९९८ | ४,९९८ | ५,०११ | ५,०११ |
| चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती | ३,६८५ | २,३०१ | २,३०१ | २,३३९ | २,४०७ |
| सौर | ५७,३९० | १,६६२ | १,९१७ | २,५२२ | ३,३५२ |
| लघु जलविद्युत प्रकल्प# | ७३२ | ३७० | ३७० | ३७० | ३७० |
| कृषी अवशेष | ७८१ | २१५ | २१५ | २१५ | २१५ |
| औद्योगिक कचरा | ३५० | ३८ | ४२ | ४२ | ४२ |
| शहरी घनकचरा | २८७ | ३ | ३ | ३ | ३ |
| **एकूण** | **१,६१,४३५** | **९,५८७** | **९,८४६** | **१०,५०२** | **११,४००** |

*आधार* : महाऊर्जा

\# जलसंपदा विभागाने स्थापित केलेले २५ मेगावॅट पेक्षा कमी क्षमतेचे प्रकल्प

९.५.३ **नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन व नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्रे पद्धती:** बांधील यंत्रणेद्वारे (वितरण कंपन्या, ग्रीडला जोडलेले बंदिस्त वीज निर्मिती प्रकल्प व वितरण मुक्त प्रवेश असलेले ग्राहक) वापर केलेल्या एकूण विजेपैकी विनिर्दिष्ट मर्यादेत नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे हे नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन (आरपीओ) अंतर्गत महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने बंधनकारक केले आहे.

९.५.४ नवीकरणीय ऊर्जेस चालना देणे आणि उपलब्ध असलेले नवीकरणीय ऊर्जा स्रोत व बांधील यंत्रणांना साध्य करावयाचे नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधन यांच्यातील तफावत दूर करण्याकरिता नवीकरणीय ऊर्जा प्रमाणपत्र (आरईसी) हे बाजाराधारीत साधन आहे. 'आरपीओ', त्याचे अनुपालन व 'आरईसी' पद्धतीची अंमलबजावणी यासाठी महाऊर्जा ही राज्य यंत्रणा आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या 'आरपीओ-आरईसी नियमन-२०१९' नुसार बांधील यंत्रणांना त्यांच्या एकूण पारंपारिक वीज वापराच्या विनिर्दिष्ट किमान मर्यादेपर्यंत (सन २०२१-२२ करिता सौर ऊर्जेकरिता ६.० टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जेकरिता ११.५ टक्के आणि सन २०२२-२३ करिता सौर ऊर्जेकरिता ८.० टक्के व इतर नवीकरणीय ऊर्जेकरिता ११.५ टक्के) नवीकरणीय ऊर्जा खरेदी करणे बंधनकारक आहे. नवीकरणीय ऊर्जा बंधन (आरपीओ) अंतर्गत साध्य तक्ता ९.१० मध्ये दिले आहे.

**तक्ता ९.१० नवीकरणीय ऊर्जा खरेदी बंधनअंतर्गत साध्य**

(टक्के) (अस्थायी)

| वितरण कंपनी | सौर ऊर्जा | | इतर नवीकरणीय ऊर्जा | |
|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२०-२१ | २०२१-२२ |
| महावितरण | ४.५९ | ५.२८ | ८.७१ | ८.९६ |
| बेस्ट | १.१७ | ६.०१ | ०.०० | १४.६२ |
| अदानी इलेक्ट्रीसिटी मुंबई मर्या. | ०.९३ | ५.२५ | २.०६ | ३.२० |
| टाटा पॉवर कं मर्या. | ३.१० | ८.८३ | ९.८९ | ७.८९ |

*आधार* : महाऊर्जा

## कृषी क्षेत्रातील विद्युतीकरण योजना

९.६.१ **प्रधान मंत्री किसान ऊर्जा सुरक्षा तथा उत्थान महा-अभियान (पीएम कुसुम):** केंद्र शासनाने शेतकऱ्यांसाठी सौर पंप आणि ग्रीड कनेक्टेड सौर आणि इतर नवीकरणीय ऊर्जा संयंत्र स्थापित करण्यासाठी ही योजना देशात माहे जुलै,२०१९ मध्ये सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत दोन लाख पंप राज्यामध्ये स्थापित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. माहे डिसेंबर, २०२२ अखेर ३ एचपी क्षमतेचे २३,३९६ व ५ एचपी क्षमतेचे १०,१८८ तसेच ७.५ एचपी क्षमतेचे २,७९७ असे एकूण ३६,३८१ सौर पंप स्थापित करण्यात आले आहेत.

९.६.२ **कृषीपंपांचे विद्युतीकरण:** राज्यात दि. ३१ मार्च, २०२२ अखेर एकूण ४५.८६ लाख कृषीपंपांचे विद्युतीकरण झाले आहे. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ९१,९१४ कृषि पंपांचे विद्युतीकरण करण्यात आले आहे.

९.६.३ **मुख्यमंत्री सौर कृषीपंप योजना:** कृषीपंपांना दिवसा वीज पुरवठा व्हावा आणि प्रदूषण कमी करण्यासाठी डिझेल पंपांना पर्याय उपलब्ध व्हावा या उद्देशाने राज्य शासनाने सन २०१८-१९ मध्ये ही योजना सुरु केली आहे. शासनाने सलग तीन वर्षात एक लाख ऑफ ग्रीड सौर कृषीपंप वितरित करण्याचे लक्ष्य निर्धारित केले आहे. विद्युतीकरण न झालेल्या दुर्गम किंवा आदिवासी भागातील शेतकरी किंवा ज्या भागाचे महावितरणने विद्युतीकरण केलेले नाही अशा भागातील शेतकऱ्यांकरिता ही योजना राबविली जाते. स्वतःची शेतजमीन व पाण्याची कायमस्वरूपी सुविधा असलेल्या परंतु विजेवर चालणारे कृषीपंप नसलेल्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येतो. योजनेचे उद्दिष्ट माहे जून, २०२२ मध्ये साध्य करण्यात आले आहे.

९.६.४ **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना:** महावितरणच्या उपकेंद्रांवर किंवा जवळपास विकेंद्रीकरण पद्धतीद्वारे सौर प्रकल्प स्थापित करुन शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्याकरिता राज्यातील कृषी बहुल क्षेत्रातील कृषी फीडरचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्यात येत आहे. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर अखेर ५४८ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले असून १,५०९ मेगावॅट वीज खरेदीसाठी करार करण्यात आला.

९.६.५ **उच्च दाब वितरण प्रणाली योजना:** राज्यातील कृषीपंपांना वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात उच्चदाब वितरण प्रणाली योजना राज्य शासन राबवित आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक रोहित्रावर एक किंवा दोन कृषीपंप जोडण्या देण्यात येत असून परिणामी लघुदाब वितरण हानीमध्ये घट होते. या योजनेअंतर्गत दि. ३१ मार्च, २०१८ पर्यंत रक्कम भरुनही वीज जोडणी प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात येत आहेत. या योजनेस मार्च, २०२३ पर्यंत मुदत वाढ दिली आहे. राज्यात ९३ नवीन उपकेंद्रे, ५६ अतिरिक्त रोहित्रे व १४ कॅपॅसिटर बँक उभारणीचे काम प्रगतीपथावर असून माहे डिसेंबर, २०२२ अखेर ६९ नवीन उपकेंद्रे, ५४ अतिरिक्त रोहित्रे व ९ कॅपॅसिटर बँक कार्यान्वित करण्यात आली आहेत. या योजनेअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ अखेर एकूण १,३६,७८० कृषीपंपांना वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत.

९.६.६ **कृषीपंप वीज जोडणी धोरण, २०२०:** दि. १ एप्रिल, २०१८ नंतर शुल्क भरुन वीज जोडणी करिता प्रलंबित असणाऱ्या कृषीपंपांकरिता राज्य शासनाने 'कृषी पंप वीज जोडणी धोरण, २०२०' जाहिर केले आहे. कृषीपंपांना विकेंद्रित सौर प्रकल्पाच्या माध्यमातून दिवसा आठ तास वीजपुरवठा करणे, वितरण हानी कमी करणे आणि उपलब्ध वितरण प्रणालीचा पुरेपूर वापर होण्याच्या दृष्टिने धारित्र बसविणे हे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. या धोरणांतर्गत कृषी पंपांना उच्च दाब वितरण प्रणाली, सौर उर्जा व लघु दाब वितरण प्रणाली द्वारे वीज जोडणी देण्यात येणार आहे.

## घरगुती वापरासाठी विद्युतीकरण योजना

९.६.७ **अटल पुनरुज्जीवन व नागरी परिवर्तन अभियान (अमृत अभियान):** अमृत अभियानाअंतर्गत पाणीपुरवठा आणि सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांसाठी सौर ऊर्जा प्रकल्प राबविण्यात येत आहेत. या अभियानांतर्गत १२ महानगरपालिका/ नगरपरिषदांमध्ये एकूण १८.४ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्यास मान्यता प्राप्त असून माहे नोव्हेंबर, २०२२ अखेर १४.७ मेगावॅट क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्यात आले आहेत.

९.६.८ **रुफटॉप सौर कार्यक्रम:** केंद्र शासनाने सर्व क्षेत्रातील वीज ग्राहकांमार्फत रुफटॉप सौर यंत्रणा स्थापित करण्याकरिता हा कार्यक्रम सन २०१६ मध्ये सुरु केला आहे. रुफटॉप सौर कार्यक्रमाचा टप्पा-२ हा निवासी वीज ग्राहकांमार्फत रुफटॉप सौर यंत्रणा स्थापित करण्याकरिता सन २०१९ मध्ये सुरु करण्यात आला आहे. रुफटॉप सौर कार्यक्रम टप्पा-२ अंतर्गत, ३ किलोवॅट क्षमतेच्या रुफटॉप सौर यंत्रणा स्थापित करण्याकरिता ४० टक्के अनुदान देण्यात येते तसेच ३ ते १० किलोवॅट क्षमतेच्या रुफटॉप सौर यंत्रणा स्थापित करण्याकरिता २० टक्के अनुदान देण्यात येते. माहे डिसेंबर, २०२२ अखेर महावितरण कंपनीच्या क्षेत्रामध्ये रुफटॉप सौर यंत्रणांची स्थापित क्षमता १,३२९ मेगावॅट होती. माहे सप्टेंबर, २०२२ अखेर बेस्टच्या क्षेत्रामध्ये रुफटॉप सौर यंत्रणांची स्थापित क्षमता १३.६६ मेगावॅट होती.

९.६.९ **ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रम:** 'अपारंपारिक ऊर्जा निर्मिती धोरण, २०२०' नुसार ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमाची राज्यात अंमलबजावणी करण्यात येत आहे. पारंपारिक ऊर्जा स्त्रोतांद्वारे विद्युतीकरण करणे शक्य नसलेल्या अशा दुर्गम खेड्यातील घरे आणि महावितरणमार्फत पुढील पाच वर्षांपर्यंत विद्युतीकरण करणे शक्य नसलेल्या अशी गावे/ वाडी/ पाड्यांमध्ये ग्रामीण विद्युतीकरण कार्यक्रमांतर्गत शासनामार्फत विद्युतीकरण करण्यात येत आहे. महाऊर्जाने प्रति वर्ष १०,००० घरांचे सौर ऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. या योजनेअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ६,०६९ घरगुती सौर दिवे स्थापित करण्यात आले आहेत.

९.६.१० **डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजना:** दि. १४ एप्रिल, २०२१ ते दि. ६ डिसेंबर, २०२१ या कालावधीत अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील कुटुंबांना प्राधान्याने घरगुती वापरासाठी वीज जोडणी उपलब्ध करुन देण्यासाठी ही योजना राबविण्यात आली. या योजनेचा कालावधी दि. ६ डिसेंबर, २०२२ पर्यंत वाढविण्यात आला असून या योजनेअंतर्गत एकूण ३१,३७२ घरांना वीज जोडणी देण्यात आली आहे.

९.६.११ **महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१:** सन २०२५ पर्यंत इलेक्ट्रिक वाहनाच्या वापरास चालना देण्यासाठी राज्य शासनाने 'महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण, २०२१' जाहीर केले आहे. वाहनांच्या चार्जिंगकरीता पायाभूत सुविधा विकसित करण्याकरिता महावितरण कंपनीस राज्य नोडल एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे. नवी मुंबई (११), ठाणे (७), पुणे (५), नागपूर (१), कोल्हापूर (१) व सोलापूर (१) शहरात एकूण २६ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन सुरु करण्यात आली आहेत. तसेच ३६ इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशनची कामे प्रगतीपथावर आहेत.

९.६.१२ **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व नवीकरणीय ऊर्जेसंबंधीच्या इतर उपाययोजना:** औद्योगिक, कृषी, घरगुती आणि व्यावसायिक क्षेत्रासाठीची ऊर्जा बचतीची संभाव्य क्षमता सुमारे ३० टक्के आहे. नवीकरणीय ऊर्जेची स्वतंत्रपणे कार्यरत असलेली उपकरणे मोठ्या प्रमाणात अनुदानित तत्वावर वितरीत करण्यात आली आहेत. ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य तक्ता ९.११ मध्ये दिले आहेत.

**तक्ता ९.११ ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम व इतर उपाययोजना अंतर्गत साध्य**

| तपशील | दि. ३१ मार्च, २०२२ पर्यंत (संख्या) | संभाव्य ऊर्जा बचत (दशलक्ष युनिट) | संभाव्य कार्बन कपात (मे. टन) |
|---|---|---|---|
| **ऊर्जा अक्षय्यता कार्यक्रम** | | | |
| अ) ऊर्जा लेखा परीक्षण | १,८५१ | ७७.०९ | ला ना |
| ब) सहज ऊर्जा लेखा परीक्षण | ३,८३९ | ३.६० | ला ना |
| क) शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविणे | ११३ | १२.९६ | ९,६४०.८३ |
| ड) महानगरपालिका/नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन संयंत्रे बसविणे | ४० | २.४३ | १,८०८.०२ |
| **ब्युरो ऑफ एनर्जी इफीसीएन्सी अंतर्गत योजना** | | | |
| अ) आदर्श ऊर्जा कार्यक्षम ग्राम मोहीम | १३ | ०.६० | ४२२.७५ |
| ब) शासकीय शाळांमध्ये ऊर्जा कार्यक्षम उपक्रम राबविणे | १८१ | ०.७३ | ५३५.२४ |
| क) शासकीय/निमशासकीय कार्यालयांच्या इमारतींमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविणे | ५ | ०.१५ | ११६.४० |
| ड) नगरपालिकांमध्ये ऊर्जा संवर्धन पथदर्शी प्रकल्प राबविणे | ६ | ०.३५ | २६५.५६ |
| इ) ऊर्जा क्लब | २९७ | ला ना | ला ना |
| वारा मापन केंद्रे | ४१४ | ला ना | ला ना |
| शासकीय इमारतीतील सौर ऊर्जा प्रकल्प | ५२५ | ला ना | ला ना |
| जैविक कांडी कोळसा (ब्रिक्वेटींग) प्रकल्प | १९७ | ला ना | ला ना |
| प्रदर्शने | ३२६ | ला ना | ला ना |

*आधार* : महाऊर्जा ला ना लागू नाही

# ऊर्जेचे इतर प्रकार

## पेट्रोलियम व नैसर्गिक वायू

९.७.१ पाईपद्वारे नैसर्गिक वायू (पीएनजी) जोडणी व कॉम्प्रेस्ड नैसर्गिक वायू (सीएनजी) केंद्रे याकरिता महानगर गॅस मर्या., महाराष्ट्र नॅचरल गॅस मर्या. आणि गॅस ॲथॉरीटी ऑफ इंडिया मर्या. (गेल) या यंत्रणा राज्यात कार्यरत आहेत. पीएनजी जोडणी व सीएनजी स्टेशन यांची माहिती तक्ता ९.१२ मध्ये दिली आहेत.

**तक्ता ९.१२ पीएनजी जोडणी व सीएनजी स्टेशन यांची माहिती**

| तपशील | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| सीएनजी स्टेशन (संख्या) | ३७० | २,२०८ | ४५६ | ३,०९५ | ५७१ | ४,४३३ |
| सीएनजी विक्री (टीएमटी) | ७३८.२ | ३,२४७.३ | ५०३.८ | २,५८९.१ | ८११.७ | ३९६८.० |
| पीएनजी जोडणी ('०००) | १,७६१.३ | ६,१०१.७ | १,९७३.९ | ७,८६४.५ | २,३३२.६ | ९,३५०.७ |
| घरगुती | १,७५६.७ | ६,०६०.८ | १,९६९.० | ७,८२०.४ | २,३२७.४ | ९,३०२.६ |
| औद्योगिक | ०.३ | १०.३ | ०.४ | ११.८ | ०.५ | १३.२ |
| वाणिज्यिक | ४.३ | ३०.६ | ४.५ | ३२.३ | ४.७ | ३४.९ |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार     टीएमटी हजार मेट्रीक टन

## पेट्रोलियम उत्पादनांचा वापर

९.७.२ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांच्या वापराचा तपशील तक्ता ९.१३ मध्ये दिला आहे.

**तक्ता ९.१३ प्रमुख पेट्रोलियम उत्पादनांचा वापर**

('००० मे.टन)

| पेट्रोलियम उत्पादने | २०२०-२१ | | २०२१-२२* | |
|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| नाफ्था | २९१ | १४,१०० | २७९ | १४,२७७ |
| द्रवरुप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) | ३,०८९ | २७,५५८ | ३,३०७ | २८,३३० |
| मोटर स्पिरीट/गॅसोलिन (एमएस) | ३,०१४ | २७,९६९ | ३,३८८ | ३०,८४९ |
| उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ) | २४ | १,७९८ | १५ | १,४९४ |
| एव्हीएशन टर्बाईन इंधन (एटीएफ) | ५५१ | ३,६९८ | ६९९ | ५,००८ |
| हाय स्पीड डिझेल (एचएसडी) | ८,०३१ | ७२,७१३ | ८,३२२ | ७६,६८७ |
| कमी प्रतीचे डिझेल (एलडीओ) | १४० | ८५५ | २१३ | १,०२० |
| फर्नेस ऑईल (एफओ) | ६६७ | ५,२०८ | ६८८ | ५,८०८ |
| हॉट हेवी स्टॉक (एचएचएस)/ | १४ | ३७८ | ४८ | ४४७ |
| लो सल्फर हेवी स्टॉक (एलएसएचएस) | | | | |
| लुब्रीकंट/वंगण | ३३० | ४,०९७ | ३७८ | ४,५७० |
| डांबर | ६६३ | ७,५२४ | ५६१ | ७,८७४ |
| इतर | १,०३५ | २८,३९७ | १,१२१ | २७,८६९ |
| **एकूण** | **१७,८४९** | **१,९४,२९५** | **१९,०१९** | **२,०४,२३३** |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार     * अस्थायी

९.७.३ उच्च दर्जाचे केरोसिन (एसकेओ)/कमी प्रतीचे डीझेल ऑईल (एलडीओ) वितरक आणि एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे यांचा तपशील तक्ता ९.१४ मध्ये दिला आहे.

## तक्ता ९.१४ एसकेओ/एलडीओ वितरक आणि एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे

| तपशील | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| एसकेओ/एलडीओ वितरक (संख्या) | ७६६ | ६,५२१ | ७५२ | ६,४३९ | ७५२ | ६,४३६ |
| एसकेओ/एलडीओ किरकोळ विक्री केंद्रे (संख्या) | ६,४५८ | ६९,०९३ | ७,०४८ | ७७,०९४ | ७,६६७ | ८३,०२७ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी एसकेओ चे वाटप ('००० मे. टन) | १०७ | ३,१२१ | ४७ | २,३१५ | २८ | १,७८३ |
| सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी एसकेओ ची उचल ('००० मे. टन) | ५३ | २,७९३ | २२ | २,०३९ | १६ | १,६६० |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार

९.७.४ द्रवरूप पेट्रोलियम गॅस (एलपीजी) ग्राहक आणि वितरक यांचा तपशील तक्ता ९.१५ मध्ये दिला आहे.

## तक्ता ९.१५ एलपीजी ग्राहक आणि वितरक यांचा तपशील

| तपशील | २०१९-२० | | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | भारत |
| एलपीजी सक्रिय घरगुती ग्राहक (लाख) | २७६ | २,७८७ | २८८ | २,८९५ | २९९ | ३,०५३ |
| एलपीजी वितरक (संख्या) | २,१८४ | २४,६७० | २,२०६ | २५,०८३ | २,२१९ | २५,२६९ |
| स्वयं एलपीजी वितरण केंद्रे (संख्या) | ६४ | ६५७ | ६५ | ६५१ | ८३ | ७१६ |
| बॉटलिंग प्लांट्स (संख्या) | २० | १९६ | २० | २०० | २५ | २१७ |
| बॉटलिंग क्षमता (टीएमटीपीए) | २,३७० | २०,२९२ | २,३७० | २१,२४९ | २,३९० | २१,६७० |
| प्रधान मंत्री उज्ज्वला योजना लाभार्थी (लाख) | ४४ | ८०२ | ४४ | ८०० | ४७ | ८९९ |

*आधार* : पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालय, भारत सरकार    टीएमाटीपीए प्रति वार्षिक हजार मे. टन

९.७.५ **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना:** आर्थिक वर्ष २०१६-१७ पासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील पाच कोटी महिलांना एलपीजी जोडण्या देण्यासाठी ही योजना सुरु करण्यात आली. दि. १० ऑगस्ट, २०२१ रोजी केंद्र शासनाने प्रधान मंत्री उज्ज्वला योजना २.० घोषित केली आहे. या योजनेच्या आधीच्या टप्प्यात समाविष्ट होऊ न शकलेल्या कमी उत्पन्न असलेल्या कुटुंबांना ठेव मुक्त एलपीजी जोडणी देण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. उज्ज्वला २.० अंतर्गत ठेव मुक्त एलपीजी जोडणी सोबतच लाभार्थ्यांना पहिले सिलिंडर व गॅस शेगडी मोफत देण्यात येते. दि. ३० जानेवारी, २०२३ पर्यंत ४४.१४ लाख व ४.७६ लाख एलपीजी जोडण्या अनुक्रमे प्रधान मंत्री उज्ज्वला योजना व उज्ज्वला २.० या योजनेअंतर्गत देण्यात आल्या आहेत.

# वाहतूक व दळणवळण

९.८ शाश्वत आर्थिक विकासासाठी चांगली वाहतूक व दळणवळण व्यवस्था गरजेची आहे. वाहतूक व्यवस्थेमध्ये रस्ते वाहतूक, रेल्वे वाहतूक, जल वाहतूक आणि हवाई वाहतूक तर दळणवळण प्रणालीमध्ये इंटरनेट सेवा, भ्रमणध्वनी, दूरध्वनी आणि टपाल सेवा यांचा समावेश आहे.

## भूपृष्ठ वाहतूक

### रस्त्यांचे जाळे

९.९ रस्त्यांच्या जाळ्यामध्ये महामार्ग, जिल्हा रस्ते, ग्रामीण रस्ते व शहरांतर्गत रस्ते यांचा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील रस्त्यांची एकत्रित लांबी (इतर यंत्रणांच्या देखभालीखालील रस्त्यांची लांबी वगळता) रस्ते विकास आराखडा २००१-२०२१ मधील निर्धारीत लक्ष्य ३.३७ लाख किमी लांबीच्या तुलनेत माहे मार्च, २०२२ अखेर ३.२४ लाख किमी साध्य झाली आहे. राज्यातील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील) तक्ता ९.१६ मध्ये तर त्याची समयमालिका परिशिष्ट ९.२ मध्ये दिली आहे. जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण परिशिष्ट ९.३ मध्ये दिले आहे.

आलेख ९.४ : रस्ते विकास आराखड्यानुसार (२००१-२०२१) साध्य




**तक्ता ९.१६ राज्यातील रस्त्यांची प्रकारानुसार लांबी (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषदांच्या देखभालीखालील)**

(दि.३१ मार्च रोजी)

| वर्ष | रस्त्यांची लांबी (किमी) | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा रस्ते | इतर जिल्हा रस्ते | ग्रामीण रस्ते | |
| २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| २०१९-२० | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |
| २०२०-२१ | १८,०८९ | २,९०० | २९,३८८ | ६८,३५० | ४६,४०८ | १,५७,९८० | ३,२३,११५ |
| २०२१-२२* | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही *अस्थायी

*आधार* : सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

### केंद्रीय रस्ते निधी योजना

९.१० राष्ट्रीय महामार्ग, ग्रामीण रस्ते, राज्य रस्ते (आंतरराज्य जोडणारे व आर्थिक दृष्ट्या महत्वाचे) यांचा विकास व देखभाल दुरुस्ती करणे तसेच रेल्वे रुळ ओलांडण्यासाठी रेल्वे रुळावरील उड्डाण पूल व भुयारी मार्ग बांधणे आणि कर्मचारी नसलेल्या रेल्वे क्रॉसिंगच्या ठिकाणी आवश्यक ती सुरक्षा यंत्रणा उभारणे यासाठी केंद्र शासनाने सन २००१-०२ मध्ये केंद्रीय रस्ते निधी योजना सुरु केली आहे. केंद्रीय रस्ते निधी योजने अंतर्गत राज्यात माहे मार्च, २०२२ अखेर १,३३५ मंजूर कामांपैकी ९८८ कामे पुर्ण झाली आहेत.

### प्रधान मंत्री ग्राम सडक योजना

९.११ प्रधान मंत्री ग्राम सडक योजना राज्यात सन २००० पासून राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात ५०० व अधिक (आदिवासी भागात २५० व अधिक) लोकसंख्या असलेल्या तसेच रस्त्याने न जोडलेल्या वस्त्यांना बारमाही रस्त्यांनी जोडणे हा प्रधान मंत्री ग्राम सडक योजना-१ चा उद्देश होता. ग्रामीण व्यापारी केंद्राच्या वाढीस सहाय्यकारक अशा आर्थिक दृष्ट्या महत्वाच्या निवडक ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे या उद्देशाने सन २०१३ मध्ये केंद्र शासनाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजना-२ कार्यक्रम सुरू केला. ग्रामीण भागातील माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि बाजार समिती केंद्रे यांना जोडणाऱ्या रस्त्यांचा विकास करणे या उद्देशाने केंद्र शासनाने सन २०१९ मध्ये प्रधान मंत्री ग्राम सडक योजना-३ सुरू केली. प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी तक्ता ९.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१७ प्रधान मंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत बांधलेल्या व दर्जोन्नती केलेल्या रस्त्यांची लांबी**

(डिसेंबर, २०२२ पर्यंत)

| प्रधान मंत्री ग्राम सडक योजना | मंजूर रस्त्याची लांबी (किमी) | रस्ते पूर्ण (किमी) |
|---|---|---|
| टप्पा-१ | २४,२१७.१५ | २४,१४५.३० |
| टप्पा-२ | २,५८७.५२ | २,५८५.९१ |
| टप्पा-३ | २,९२४.७३ | ८९.९६ |

*आधार :* ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन

## मुख्यमंत्री ग्राम सडक योजना

९.१२ प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेत समाविष्ट नसलेल्या, रस्त्यांनी न जोडलेल्या वस्त्यांना जोडणे व अस्तित्वात असलेल्या ग्रामीण रस्त्यांची दर्जोन्नती करणे याकरिता सन २०१५-१६ पासून राज्यात मुख्यमंत्री ग्राम सडक योजना राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरुवातीपासून माहे डिसेंबर, २०२२ अखेर ३०,९२२ किमी लांबीच्या मंजूर रस्त्यांपैकी २१,४५८ किमी लांबीच्या रस्त्यांचे काम पूर्ण झाले असून ₹ १३,०५६.७० कोटी खर्च झाला.

## भारतमाला परियोजना

९.१३ केंद्र शासनाद्वारे २०१५ पासून भारतमाला परियोजना हा पायाभूत सुविधांविषयक महत्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येत आहे. आर्थिक कॉरिडॉर, आंतरराज्य जोडमार्ग, फीडर मार्ग, राष्ट्रीय जोडमार्ग, सीमा व आंतरराष्ट्रीय जोडरस्ते, सागरतट व बंदरे जोडरस्ते, हरितक्षेत्र महामार्ग यांच्या विकासातून अस्तित्वात असलेल्या पायाभूत सुविधांमधील त्रुटी दूर करून देशातील मालवाहतूक व प्रवासी वाहतूकीची कार्यक्षमता वाढविणे हे भारतमाला परियोजनेचे उद्दिष्ट आहे. राज्यामध्ये या कार्यक्रमा अंतर्गत ₹ २५,२२८ कोटी किंमतीच्या ३० प्रकल्पांचे काम सुरू असून राष्ट्रीय महामार्गावरील संत तुकाराम पालखी मार्ग आणि संत ज्ञानेश्वर पालखी मार्ग, वडोदरा- मुंबई जलदगती महामार्ग यांचा समावेश आहे तर जवाहरलाल नेहरू पोर्ट आणि मुंबई-पुणे जलदगती महामार्ग ७८ किमी बाह्यरस्त्यांनी जोडणे प्रस्तावित आहे.

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे प्रकल्प

९.१४ प्रामुख्याने खाजगी सहभागाद्वारे राज्यातील रस्ते व संलग्न पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या निवडक प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.१८ मध्ये दिली आहे. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत पूर्ण झालेल्या प्रकल्पांवरील एकूण खर्च ₹ ६४,००६ कोटी होता व रक्कम ₹ १८,८३५ कोटी टोल वसूल करण्यात आला.

**तक्ता ९.१८ महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या सुरु असलेल्या निवडक प्रकल्पांची सद्य:स्थिती**

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्पाची अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च+ (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष |
|---|---|---|---|
| वर्सोवा - वांद्रे सागरी सेतू प्रकल्प | ११,३३२.८२ | ९४३.१२ | २०२५-२६ |
| सीमा तपासणी नाक्यांचे आधुनिकीकरण | १,५००.०० | ५२.६६ | पूर्ण |
| मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गाचे आवर्धन | ६,६९५.३७ | ३,६०२.५३ | २०२३-२४ |
| हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग | ५५,३३५.३२ | ५०,९७६.०३ | २०२३-२४ |
| पुणे चक्राकार वळण रस्ता | २६,८३१.२४ | १९.६५ | २०२५-२६ |
| ठाणे -घोडबंदर उन्नत मार्ग | ३,०००.०० | २.०५ | - |
| भिवंडी-कल्याण- शिळफाटा उन्नत मार्ग (टप्पा १ व २) | २,६००.०० | ६.४२ | २०२५-२६ |
| ठाणे खाडी पूल- टप्पा तीन | ७७५.५८ | २१०.१० | २०२३-२४ |
| विरार-अलिबाग बहुउद्देशीय वाहतूक मार्ग | ३९,८४१.१३ | १५.९६ | २०२५-२६ |
| रेवस- रेडी किनारी रस्ता | ९,५७२.७५ | ७.३३ | २०२५-२६ |
| कोकण हरित महामार्ग | ७१,२९८.०० | ६.२१ | २०२७-२८ |
| जालना- नांदेड महामार्ग | ६,६१२.०० | २३.८४ | २०२५-२६ |
| वर्सोवा- विरार सागरी सेतू प्रकल्प | ३२,२१२.०० | ११.४६ | २०२९-३० |

*आधार :* महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ + जानेवारी, २०२३ पर्यंत

## हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग

९.१५ हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृध्दी महामार्ग हा (७०१ किमी लांब व १२० मी रुंद) मुंबई आणि नागपूरला जोडणारा आठ पदरी द्रुतगती महामार्ग असून प्रवाशांना हे अंतर आठ तासांत गाठणे शक्य होईल. हा महामार्ग १० जिल्हे, २६ तालुके व ३९२ गावांमधून जाणार आहे व त्यामुळे २४ जिल्हे जोडले जातील. राज्य व राष्ट्रीय महामार्ग एकत्र येणाऱ्या २४ ठिकाणी कृषी समृध्दी केंद्रांचा विकास करण्याचे प्रस्तावित आहे. हा महामार्ग औद्योगिक ठिकाणांना (बुटीबोरी, वर्धा, अमरावती, जालना, चिकलठाणा, शेंद्रा, वाळूज व सिन्नर) तसेच पर्यटन स्थळे व तीर्थक्षेत्रे (सेवाग्राम, कारंजा(लाड), लोणार, सिंदखेडराजा, वेरुळ व शिर्डी) यांना जोडेल. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत या महामार्गाचे सुमारे ९० टक्के काम पुर्ण झाले असून ₹ ५०,९७६.०३ कोटी खर्च झाला. नागपूर ते शिर्डी सुमारे ५२० किमी मार्ग पुर्ण झाला असून रहदारीसाठी डिसेंबर, २०२२ मध्ये खुला करण्यात आला.

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे प्रकल्प

९.१६ मुंबई महानगर प्रदेशात मुंबई शहर व मुंबई उपनगर संपूर्ण जिल्हे आणि ठाणे, रायगड व पालघर जिल्ह्यांचा काही भाग समाविष्ट आहे. या महानगर प्रदेशात नऊ महानगरपालिका, नऊ नगरपरिषदा, एक नगरपंचायत, ४४ गणना शहरे आणि सुमारे १,४२५ गावे अशा एकूण ६,३२८ चौ. किमी क्षेत्राचा समावेश आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने मुंबई महानगर प्रदेशात विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.१९ मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या वाहतूक प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(₹ कोटी)

| प्रकल्पाचे नाव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च+ | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्य:स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| **विस्तारित मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्प :** | | | | | |
| **टप्पा - एक, दोन व तीन :** रस्ते व उड्डाणपूल | २००७ | ६,२३५.१२ | ५,९७६.६२ | २०२३ | काम प्रगतीपथावर |
| **बाह्य रस्ते विकास योजना** | २०१४ | १,२५९.६५ | ६२२.२३ | २०२३ | काम प्रगतीपथावर |
| **सांताक्रूज-चेंबूर लिंक रोड कुर्ला ते वाकोला टप्पा एक** | २०१६ | ६४५.०० | ४६०.५२ | २०२३ | ८० टक्के काम पूर्ण |
| **भारत डायमंड बोर्स ते वाकोला जंक्शन टप्पा दोन** (सांताक्रूज चेंबूर लिंक रोड विस्तारांतर्गत) | २०१७ | १९६.०० | २६९.२३ | २०२३ | ८६ टक्के काम पूर्ण |
| **मुंबई ट्रान्स - हार्बर लिंक : शिवडी ते न्हावा सागरी सेतू** बांधकाम (२२ किमी) | २०१७ | १७,८४३.०० | १५,३३६.९१ | २०२३ | काम प्रगतीपथावर |
| **कलानगर वांद्रे(पू) उड्डाणपुल मार्ग बांधणे** | २०१७ | १०३.७३ | १०७.९३ | २०२३ | ९५ टक्के काम पूर्ण |
| **पुर्व द्रुतगती महामार्गावरील छेडानगर जंक्शन, घाटकोपर (पूर्व) येथे वाहतूक सुधार** | २०१८ | २२३.८५ | १३७.९२ | २०२३ | ७४ टक्के काम पूर्ण |
| **ठाणे शहरातील टिकुजीनी वाडी ते संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली सहापदरी भुयारी मार्ग** | २०२० | ११,२७०.८८ | - | २०२६ | डि.पी.आर काम प्रगतीपथावर |

*आधार*: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण डि.पी.आर-सविस्तर प्रकल्प अहवाल + ऑक्टोबर, २०२२ पर्यंत

## मुंबई किनारी रस्ता प्रकल्प (दक्षिण)

९.१७ बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून प्रिन्सेस स्ट्रीट उड्डाणपुल ते वांद्रे वरळी सी लिंकचे वरळी टोक असा तीन वळणमार्ग असलेला १०.५८ किमी लांबीचा आठ पदरी किनारी रस्ता प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पात अद्ययावत तंत्रज्ञानाने सुसज्ज प्रत्येकी ३.४५ किमी लांबीच्या दुहेरी बोगद्याचा समावेश आहे. समुद्रात भराव टाकून तयार केलेले सुमारे ७० हेक्टर क्षेत्र हरीत पट्टा आणि मनोरंजन सुविधांसाठी राखीव आहे. या प्रकल्पात बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टम (बीआरटीएस) डेपोसह बीआरटीएससाठी समर्पित मार्गिकेद्वारे सार्वजनिक वाहतुकीच्या सुविधांचा आणि सुमारे १,८०० मोटारींच्या एकत्रित क्षमतेसह चार भूमिगत पार्किंग क्षेत्रांचा समावेश आहे. प्रकल्पाचे काम माहे ऑक्टोबर, २०१८ पासून सुरू झाले असून माहे डिसेंबर, २०२३ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. प्रकल्पाची एकूण अंदाजित किंमत ₹ १२,७२१ कोटी आहे. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत सुमारे ७० टक्के काम पूर्ण झाले असून त्यावर ₹ ६,८६२.७५ कोटी खर्च झाला.

## मोटार वाहने

९.१८ राज्यात दि.१ जानेवारी, २०२३ रोजी मोटार वाहनांची एकूण संख्या ४.३३ कोटी होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ५.८ टक्क्यांनी जास्त आहे. राज्यातील एकूण नोंदणीकृत वाहनांपैकी ६.२ टक्के वाहने बृहन्मुंबईत नोंदणीकृत होती. माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात १,९२,९९७ बॅटरी इलेक्ट्रीक वाहनांची नोंदणी झाली आहे. राज्यातील रस्त्यांवरील (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभाली खालील) वाहनांची प्रति किमी सरासरी संख्या १३४ होती. राज्यातील मोटार वाहनांची संख्या तक्ता ९.२० मध्ये आणि त्याची समयमालिका परिशिष्ट ९.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२०  राज्यातील मोटार वाहनांची संख्या**

('०००)

| वाहन प्रकार | दि.१ जानेवारी रोजी | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | महाराष्ट्र | | | बृहन्मुंबई | | |
| | २०२२* | २०२३* | शेकडा बदल | २०२२* | २०२३* | शेकडा बदल |
| दुचाकी (मोटार सायकली, स्कूटर्स, मोपेड्स) | २९,९४६.०७ | ३१,५९० | ५.५ | २,५०२.६१ | २,६५३.२९ | ६.० |
| ऑटो रिक्षा | १,०७३.८७ | १,१०३.९७ | २.८ | २३२.४४ | २३४.५५ | ०.९ |
| हलकी मोटार वाहने (कार, जीप्स, स्टेशन वॅगन्स व टॅक्सी) | ६,१८२.१० | ६,६३२.३७ | ७.३ | १,३५८.८४ | १,४४२.३८ | ६.१ |
| बसेस (स्टेज कॅरेजेस, कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस, शालेय बसेस व सार्वजनिक सेवा वाहने) | १५७.४३ | १६२.३३ | ३.१ | १२.८४ | २०.७१ | ६१.३ |
| माल मोटारी [आर्टीक्युलेटेड/मल्टी एक्सल वाहने, ट्रक्स व लॉरीज, टँकर्स, डिलीव्हरी व्हॅन्स (तीन व चार चाकी), इत्यादी] | २,००८.९७ | २,१३१.६३ | ६.१ | ९९.४७ | ११६.२७ | १६.९ |
| ट्रॅक्टर | ९७९.७८ | १०७९.७७ | १०.२ | ०.२३ | ०.२५ | ८.७ |
| ट्रेलर | ४५३.३९ | ४७०.५१ | ३.८ | ०.१५ | ०.१७ | १३.३ |
| रूग्णवाहिका | २०.४१ | २१.३३ | ४.५ | १.९४ | २.०६ | ६.३ |
| इतर | ९४.५० | १०६.७३ | १२.९ | ४.४१ | ६.०८ | ३७.८ |
| **एकूण** | **४०,९१६.५२** | **४३,२९८.५४** | **५.८** | **४,२१२.९३** | **४,४७५.७६** | **६.२** |

*आधार :* परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन    टिप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही    * अस्थायी

९.१८.१ वाहन चालक अनुज्ञप्ती आणि वाहन नोंदणी प्रमाणपत्र स्मार्ट कार्डच्या स्वरुपात अनुक्रमे सारथी व वाहन प्रणालीद्वारे दिले जातात. माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात मोटार वाहने चालविण्याच्या वैध अनुज्ञप्तींची संख्या ३८७.४१ लाख होती व ती मागील वर्षाच्या तुलनेत तीन टक्क्यांनी जास्त आहे. राज्यात सन २०२२ अखेर २७.९१ लाख शिकाऊ अनुज्ञप्ती देण्यात आल्या.

**आलेख ९.५ : नोंदणीकृत बॅटरी इलेक्ट्रीक वाहने**




## सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सुविधा

### महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.१९ महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (मरामापम) हे तालुका आणि महत्वाच्या वाहतूक केंद्राच्या ठिकाणी असलेल्या बस आगाराच्या आणि बस स्थानकांच्या माध्यमातून राज्यातील तसेच लगतच्या इतर राज्यातील जनतेस प्रवासी सेवा पुरविते. मरामापम तर्फे बस सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी तक्ता ९.२१ मध्ये दिली आहे तर मरामापमची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२१  मरामापम तर्फे बस सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची आणि लोकसंख्येची टक्केवारी**

| बस सेवा | सुविधा पुरविण्यात आलेल्या गावांची टक्केवारी | | सुविधा पुरविण्यात आलेल्या लोकसंख्येची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२०-२१ | २०२१-२२@ |
| थेट | ७६.८ | ७६.९ | ९२.४ | ९१.१ |
| ३ किमी पर्यंत | १५.१ | १५.१ | ५.३ | ५.७ |
| ३ ते ५ किमी पर्यंत | ४.७ | ४.६ | १.४ | १.७ |
| ५ किमी पेक्षा अधिक | ३.७ | ३.४ | ०.९ | १.४ |

*आधार :* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ    @ अंदाजित

**तक्ता ९.२२ मरामापमची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | परिमाण | २०२०-२१# | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| ताब्यात असलेली एकूण वाहने | संख्या | १७,३५८ | १७,१९३ | १६,८४७ |
| मार्गस्थ बसगाड्यांची प्रतिदिन सरासरी संख्या | संख्या | ७,९६० | ६,६८८ | १२,९०४ |
| एकूण कर्मचारी (दि.३१ मार्च रोजी) | संख्या | ९५,२२९ | ७८,८३६ | ८८,३४३ |
| प्रतिदिन सरासरी सार्थ किमी | लाख | २३.६१ | १९.६५ | ४३.८१ |
| वाहतूक केलेल्या प्रवाशांची प्रतिदिन सरासरी संख्या | लाख | १५.०४ | १३.५६ | ३६.०३ |
| वाहन उत्पादकता | किमी | १३६.०१ | ११४.२९ | २६०.०३ |
| चालक-वाहक उत्पादकता | किमी | २१३.१४ | २११.७६ | २१८.६७ |
| प्रति वाहन कर्मचाऱ्यांचे प्रमाण (मार्गस्थ वाहनांच्या आधारे) | - | ११.९६ | ११.७६ | ६.८५ |
| सरासरी आसन क्षमता | संख्या | ४२.७९ | ४२.५४ | ४२.७५ |
| भारमान (सवलतींच्या रकमा वगळून) | टक्के | ४५.८ | ५०.५ | ४९.० |
| भारमान (सवलतींच्या रकमेसह) | टक्के | ५३.८ | ६१.७ | ६१.७ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ    # मरामापम ची वाहतूक सेवा कोविड -१९ लॉकडाऊन काळात निर्बंधित    + सप्टेंबरपर्यंत

९.१९.१ नियमित वाहतुकी शिवाय मरामापम यात्रा व नैमित्तिक करार तत्वावर विशेष वाहतूक सेवा पुरविते. मरामापम ची यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२३ मरामापम ची यात्रा व नैमित्तिक करारांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| विवरण | यात्रा | | नैमित्तिक करार | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | २०२१-२२ | | | २०२२-२३+ | | |
| | २०२१-२२ | २०२२-२३+ | सवलतीत | सवलती शिवाय | सर्व | सवलतीत | सवलती शिवाय | सर्व |
| सार्थ किमी (लाख) | २.५७ | ७.१७ | ०.३४ | १०.३५ | १०.६९ | २.१६ | ९.४२ | ११.५८ |
| उत्पन्न (₹ कोटी) | १.२२ | २.७२ | ०.११ | ७.४९ | ७.६० | ०.६५ | ५.७० | ६.३५ |
| प्रति किमी उत्पन्न (₹) | ४७.८० | ३७.९४ | ३२.३५ | ७२.३७ | ७१.०९ | ३०.०९ | ६०.५१ | ५४.८४ |

टीप : आकडे संक्षिप्तात दिल्याने बेरजा जुळतीलच असे नाही    + सप्टेंबरपर्यंत
*आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

९.१९.२ विद्यार्थी, वरिष्ठ नागरिक (६५ वर्षांवरील वयाचे), कर्करोग रुग्ण, स्वातंत्र्यसैनिक, इत्यादी प्रवाशांना मरामापम बस भाड्यात विविध सवलती देते व सवलतीच्या रकमेची प्रतिपूर्ती राज्य शासनाकडून केली जाते. सन २०२१-२२ मध्ये सवलतीची रक्कम ₹ ३८९.८६ कोटी होती. मरामापमने सन २०२०-२१ व सन २०२१-२२ मध्ये अनुक्रमे ₹ ६७.६५ कोटी व ₹ ७१.७५ कोटी टोल रक्कम अदा केली. अपघातांची संख्या व मरामापमने दिलेली भरपाई तक्ता ९.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२४ अपघातांची संख्या व मरामापमने दिलेली भरपाई**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|
| अपघात (संख्या) | १,४४४ | १,२८१ |
| मृत व्यक्ती (संख्या) | १६६ | १५९ |
| जखमी व्यक्ती (संख्या) | १,२९१ | १,१३० |
| दर लाख किमी मागे अपघात दर | ०.१७ | ०.१८ |
| अपघातस्थळी अदा केलेली रक्कम (₹ कोटी) | ०.१२ | ०.१५@ |
| अंतिम भरपाई (₹ कोटी) | ३३.६० | ४८.१६@ |

@ अलेखापरिक्षीत    *आधार* : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

## मरामापम तर्फे मालवाहतूक

९.२० मरामापमने माहे मे, २०२० पासून मालवाहतूक सेवेचा प्रारंभ केला. यासाठी प्रवासी वाहनांच्या अंतर्गत रचनेत बदल करून १,१३० वाहने मालवाहतुकीस उपलब्ध करुन दिली. माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर मरामापम ने सुमारे १५.६७ लाख टन मालवाहतूक केली आहे.

## शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक

९.२१ सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक व्यवस्था हे शहरातील प्रवासी वाहतुकीच्या प्रमुख साधनांपैकी एक साधन आहे. मरामापम मार्फत रत्नागिरी आणि सांगली - मिरज या शहरात तर बृहन्मुंबई मध्ये बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम (बेस्ट), पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित आणि उर्वरित १४ शहरात संबंधित महानगरपालिका/ नगरपरिषद प्रवासी वाहतूक सेवा पुरवितात. शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी तक्ता ९.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२५ शहरी सार्वजनिक प्रवासी रस्ते वाहतूक सेवा विषयक सांख्यिकी**

(दि.३१ मार्च, रोजी)

| वाहतूक सेवा पुरविणारी यंत्रणा | मार्गस्थ वाहनांची प्रतिदिन सरासरी संख्या | | प्रतिदिन सरासरी प्रवासी वाहतूक (लाख) | | प्रतिदिन सरासरी सार्थ वाहतूक (लाख किमी) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| मरामापम (शहर वाहतूक) | २९३ | ११३ | ०.१२ | ०.११ | ०.०८ | ०.०५ |
| बेस्ट | ३,१५९ | ३,१४२ | १४.७७ | २१.१९ | ५.५१ | ५.३५ |
| पुणे महानगर परिवहन महामंडळ मर्यादित | ७१४ | १,०४९ | २.७९ | ५.५७ | १.५३ | २.४५ |
| नवी मुंबई मनपा परिवहन | २८२ | २९६ | ०.९२ | १.३४ | ०.६६ | ०.६६ |
| नागपूर मनपा परिवहन | १५७ | २२८ | ०.४० | ०.६७ | ०.३१ | ०.४५ |
| ठाणे मनपा परिवहन | १५६ | २२७ | १.१८ | १.६८ | ०.२९ | ०.४२ |
| वसई-विरार मनपा परिवहन | ४१ | ६५ | ०.२० | ०.३३ | ०.७० | ०.११ |
| कोल्हापूर मनपा परिवहन | ३३ | ४५ | ०.१७ | ०.२३ | ०.६७ | ०.८४ |
| सोलापूर मनपा परिवहन | १२ | १२ | ०.०३ | ०.०२ | ०.०२ | ०.०२ |
| कल्याण-डोंबिवली मनपा परिवहन | ३३ | ४२ | ०.०७ | ०.११ | ०.०४ | ०.०४ |
| मिरा-भाईंदर मनपा परिवहन | २१ | ५२ | ०.१३ | ०.३८ | ०.०६ | ०.११ |
| अमरावती मनपा परिवहन | - | २५ | - | ०.२० | - | ०.०८ |
| अकोला मनपा परिवहन@ | - | - | - | - | - | - |
| खोपोली नगरपरिषद परिवहन | - | ३ | - | ०.०२ | - | ०.०१ |
| लातूर मनपा परिवहन | ५ | १३ | ०.०३ | ०.०१ | ०.०८ | ०.०२ |
| अहमदनगर मनपा परिवहन | १५ | १५ | ०.०७ | ०.०६ | ०.०३ | ०.०३ |
| नाशिक मनपा परिवहन# | - | १०४ | - | ०.३२ | - | ०.२२ |

मरामापम महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बेस्ट बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम

@ अकोला मनपा बससेवा तात्पुरती स्थगित # नाशिक महानगर पालिका परिवहन महामंडळाने दि.८ जुलै, २०२१ पासून बससेवा सुरु केली आहे.

*आधार :* महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, पुणे महानगर परिवहन महामंडळ व संबंधित महानगरपालिका / नगरपरिषद

## रस्ते सुरक्षा

९.२२ सन २०२२ मध्ये राज्यात प्रति दहा हजार वाहनांमागे झालेल्या अपघातांची संख्या आठ होती. जनजागृती करण्यासाठी राज्यामध्ये दरवर्षी रस्ते सुरक्षा या संकल्पनेवर आधारित पथनाट्ये आणि व्याख्याने आयोजित करण्यात येतात. रस्ते अपघात सांख्यिकी तक्ता ९.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२६ रस्ते अपघात सांख्यिकी**

(संख्या)

| वर्ष | अपघात | | मृत व्यक्ती | | जखमी व्यक्ती | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई | राज्य | बृहन्मुंबई |
| २०२० | २४,९७१ | १,८१२ | ११,५६९ | ३४९ | १९,९१४ | १,७४० |
| २०२१ | २९,४७७ | २,२१४ | १३,५२८ | ३८७ | २३,०७१ | १,९४४ |
| २०२२* | ३३,०६९ | १,७७३ | १४,८८३ | २७२ | २७,२१८ | १,६२० |

*आधार :* अतिरिक्त पोलिस महासंचालक (वाहतूक), यांचे कार्यालय गृहविभाग, महाराष्ट्र शासन, * अस्थायी

## रेल्वे

९.२३ रेल्वे ही प्रमुख सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. प्रवासी व मालवाहतूक हे रेल्वे वाहतुकीचे दोन प्रमुख भाग आहेत. दि. ३१ मार्च, २०२२ रोजी राज्यातील लोहमार्गाची कोकण रेल्वेसह एकूण लांबी ६,२४२.१४ किमी होती व ती भारतातील एकूण (६८,०४२.८१ किमी) लांबीच्या ९.२ टक्के आहे. राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्य:स्थिती तक्ता ९.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२७ राज्यात सुरु असलेल्या रेल्वे कामांची सद्य:स्थिती**

(दि.३१ जानेवारी,२०२३ रोजी)

| मार्गाचे नाव | मार्गाची लांबी (किमी) | प्रकल्पाची एकूण किंमत (₹ कोटी) | भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|
| पुणे-मिरज लोंढा (दुपदरीकरण) | २७९# | ४,८१९.१२ | ८० |
| वर्धा - नांदेड, यवतमाळ - पुसद मार्गिका (नवीन मार्गिका) | २७० | ३,४४५.४८ | ४७ |
| इटारसी - नागपूर तिसरी मार्गिका | २७९ | २,४४९.९१ | २४ |
| अहमदनगर - नारायणडोह - बीड - परळी - वैजनाथ (नवीन मार्ग) | २६१ | ४,८०५.१७ | ६८ |
| दौंड - मनमाड | २४८ | २,०८१.२७ | ३५ |
| मनमाड - जळगांव तिसरी मार्गिका | १६० | १,०३५.१६ | ४६ |
| वर्धा - बल्लारशहा तिसरी मार्गिका | १३२ | १,३८४.७२ | ५२ |
| वर्धा - नागपूर चौथी मार्गिका | ७६ | ६३७.९५ | ४८ |
| वर्धा - सेवाग्राम-नागपूर तिसरी मार्गिका | ७६ | ५४०.०२ | ७० |
| कल्याण - कसारा तिसरी मार्गिका | ६७ | ७९२.८९ | ४७ |
| बारामती - लोणंद फलटण मार्ग (नवीन मार्गिका) | ६४ | ७३६.४४ | ५०$ |
| बेलापूर - सीवूड- उरण (नवीन मार्गिका) | ५४ | २,९८०.४१ | ८१$$ |
| धुळे (बोरविहीर) धुळे- नरडाणा | ५१ | ४९२.७६ | २ |
| जळगांव - भुसावळ चौथी मार्गिका | २४ | २६१.३७ | ८५ |
| सोलापूर-तुळजापूर-उस्मानाबाद | ८४ | ९०४.९२ | २ |
| इंदोर-मनमाड मालेगाव मार्गिका | ३६८ | ८,८५७.९८ | डि.पी.आर.चे काम प्रगतीपथावर |
| पुणे-नाशिक | २६५ | ५,३४१.६८ | डि.पी.आर.तयार |

# दक्षिण पश्चिम रेल्वे मार्ग वगळून $ फलटण ते लोणंद मार्ग कार्यान्वित $$ बेलापूर ते खारकोपर मार्ग कार्यान्वित डि.पी.आर-सविस्तर प्रकल्प अहवाल

*आधार :* मध्य रेल्वे

## मुंबई उपनगर रेल्वे

९.२४ उपनगरीय रेल्वे हे मुंबई मधील सार्वजनिक वाहतूकीचे प्रमुख साधन आहे. मुंबईची उपनगरीय रेल्वे यंत्रणा पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे या दोन विभागीय रेल्वे द्वारे चालविली जाते. हार्बर व ट्रान्स हार्बर मार्ग हे मध्य रेल्वेचे भाग आहेत. सन २०२१-२२ मध्ये दररोज एकूण २२९ लोकल गाड्यांच्या ताफ्याने (सहा वातानुकुलित लोकलसह) ३,०७३ (६४ वातानुकुलित लोकलच्या फेऱ्या) फेऱ्यांद्वारे सरासरी ३४.५ लाख प्रवाशांची वाहतूक केली.

९.२५ मुंबई नागरी वाहतूक प्रकल्पातील रेल्वे मार्गाची कामे मुंबई रेल्वे विकास महामंडळ मर्यादित मार्फत करण्यात येते. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा एक मधील कामे पूर्ण झाली आहेत. मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२८ मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प टप्पा दोन, तीन व तीन अ मधील प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(दि.३१ जानेवारी, २०२३ रोजी)

| प्रकल्पाचे नाव | मार्गिकेची लांबी (मार्ग किमी) | अंदाजित किंमत (₹ कोटी) | खर्च (₹ कोटी) | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | भौतिक प्रगती (टक्के) |
|---|---|---|---|---|---|
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प - २** | | | | | |
| मुंबई सेंट्रल - बोरीवली (अतिरिक्त सहावी मार्गिका) | २९.५० | ९१८.५३ | ६२३.९३ | मार्च, २०२५ | ८३ |
| सीएसएमटी - कुर्ला (अतिरिक्त पाचवी व सहावी मार्गिका) | १५.३९ | १,३६७.०० | ४५९.०९ | मार्च, २०२५ | २५ |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प - ३** | | | | | |
| मध्य रेल्वे अंतर्गत पनवेल - कर्जत मार्गावरील नवीन उपनगरीय कॉरिडॉर | २८.०० | २,७८२.०० | १,०१५.७७ | डिसेंबर, २०२५ | १५ |
| मध्य रेल्वे अंतर्गत ऐरोली - कळवा (उन्नत) मार्गावरील नवीन उपनगरीय कॉरिडॉर | ४.०० | ४७६.०० | १९०.४१ | मार्च, २०२६ | ३५ |
| पश्चिम रेल्वे अंतर्गत विरार - डहाणू रोड रेल्वे मार्गाचे चौपदरीकरण | ६३.८० | ३,५७८.०० | ६०७.९९ | डिसेंबर, २०२५ | ११ |
| मध्य व पश्चिम रेल्वेवरील मध्य मार्गावर बेकायदा प्रवेश नियंत्रण | - | ५५१.०० | २८६.४१ | डिसेंबर, २०२४ | ५५ |
| **मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प ३ अ** | | | | | |
| कल्याण - बदलापूर (तिसरी व चौथी मार्गिका) | १४.०५ | १,५०९.८७ | ३४.४८ | मार्च, २०२६ | १ |
| बोरीवली - विरार (पाचवी व सहावी मार्गिका) | २६.०० | २,१८४.०२ | ५.७० | मार्च, २०२६ | ० |
| कल्याण - आसनगाव (चौथी मार्गिका) | ३२.२२ | १,७५९.१६ | १.३० | मार्च, २०२६ | ० |
| गोरेगाव - बोरीवली मधील हार्बर मार्गाचा विस्तार | ७.०८ | ८२५.५८ | ०.०० | मार्च, २०२६ | ० |

*आधार :* मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन सीएसएमटी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस

९.२६ दुर्घटना टाळण्यासाठी उपनगरीय रेल्वे आगमन तसेच सुरक्षा विषयक जागरुकता/ जनजागृती घोषणांव्यतिरिक्त पादचारी पुलाचे बांधकाम, भुयारी मार्ग, उपनगरीय रेल्वे ट्रॅकवरील बेकायदा प्रवेशावर नियंत्रण ठेवण्यासाठी भिंतींचे बांधकाम, बेकायदा प्रवेश ठिकाणे बंद करणे, विद्युत खांबांचे स्थलांतरण करणे, इत्यादी उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमींची संख्या तक्ता ९.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.२९ मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील अपघाती मृत्यू व जखमींची संख्या**

| अपघाताचे कारण | २०२० | | २०२१ | | २०२२+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी | मृत्यू | जखमी |
| रेल्वे रुळ ओलांडतांना | ७३० | १२९ | १,११४ | १७६ | ९३३ | १६७ |
| रेल्वे व फलाट दरम्यान पडून | १ | १ | २ | ३ | २ | ३ |
| रेल्वेमधून पडून | १७७ | ३६१ | २७७ | ४४२ | ५७९ | ८३३ |
| रेल्वेच्या खांबाचा धक्का लागून | २ | १२ | ६ | १७ | ८ | २४ |
| अन्य $ | २०६ | ३७५ | ३५३ | ४६८ | ५५६ | ६६२ |
| **एकूण** | **१,११६** | **८७८** | **१,७५२** | **१,१०६** | **२,०७८** | **१,६८९** |

$ विजेचा धक्का लागून, आत्महत्या, नैसर्गिक मृत्यू, न्यायवैद्यकीय विश्लेषणासाठी संदर्भित केलेली प्रकरणे, इत्यादी + ऑक्टोबरपर्यंत

*आधार* : मुंबई लोहमार्ग पोलिस आयुक्तालय, महाराष्ट्र शासन

## मेट्रो रेल्वे प्रकल्प

९.२७ महानगर क्षेत्रासाठी सुरक्षित, विश्वसनीय, कार्यक्षम, किफायतशीर, प्रवाशांकरिता सुलभ आणि पर्यावरणदृष्ट्या शाश्वत अशा शीघ्र सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी मुंबई, नवी मुंबई, पुणे आणि नागपूर या शहरात मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत.

९.२७.१ **मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प:** शीघ्र वाहतूक व्यवस्थेवर आधारीत मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प हा सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्वावर राबविण्यात येत आहे. मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची सद्य:स्थिती तक्ता ९.३० मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३० मुंबई महानगर प्रदेशात सुरु असलेल्या मेट्रो रेल्वे प्रकल्पांची सद्य:स्थिती**

(₹ कोटी)

| मेट्रो लाईन / प्रकल्पाचे नांव | प्रकल्प सुरु झाल्याचे वर्ष | प्रकल्पाची किंमत | खर्च + | काम पूर्ण होण्याचे अपेक्षित वर्ष | सद्य:स्थिती+ |
|---|---|---|---|---|---|
| २ ए - दहिसर - डी. एन. नगर (१८.६ किमी) | २०१६ | ६,४१०.०० | ४,८८६.६६ | डिसेंबर, २०२२ | जानेवारी, २०२३@ |
| २ बी -डी. एन. नगर-मंडाळे (२३.६ किमी) | २०१८ | १०,९८६.०० | २१९२.५५ | जून, २०२५ | २७ टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| ३ कुलाबा - वांद्रे - सीप्झ (३३.५ किमी) | २०१६ | ३७,२७६.०० | २२,८९८.००++ | २०२३-२४ | ७९ टक्के कामे पुर्ण++ |
| ४ वडाळा - घाटकोपर - ठाणे - कासारवडवली (३२ किमी) | २०१८ | १४,५४९.०० | १,५४७.७४ | जून, २०२५ | ४१ टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| ४ अ कासारवडवली - गायमुख (२.७ किमी) | २०१९ | ९४९.०० | १८७.७८ | जून, २०२५ | ४५ टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| ५ ठाणे -भिवंडी - कल्याण (२३.५ किमी) | २०१९ | ८,४१७.०० | ७०६.१० | डिसेंबर, २०२५ | टप्पा १ (ठाणे- भिवंडी) चे ७० टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| ६ स्वामी समर्थ नगर - विक्रोळी (१४.५ किमी ) | २०१८ | ६,७१६.०० | १,४३६.०१ | डिसेंबर, २०२४ | ६३ टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| ७ अंधेरी (पु.) - दहिसर (पु.) (१६.५ किमी) | २०१६ | ६,२०८.०० | ३,६३१.४१ | डिसेंबर, २०२२ | जानेवारी, २०२३@ |
| ९ दहिसर (पु) ते मिरा भाईंदर आणि अंधेरी - छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (१३.५ किमी) | २०१९ | ६,६०७.०० | ७२९.४५ | डिसेंबर,२०२५ | २५ टक्के स्थापत्य कामे पुर्ण |
| १० गायमुख –शिवाजी चौक (मिरा रोड) | - | ४,४७६.०० | - | ऑक्टोबर,२०२५ | काम प्रगतीपथावर |
| ११ वडाळा- सीएसएमटी | - | ८,७३९.०० | - | ऑक्टोबर,२०२६ | काम प्रगतीपथावर |
| १२ कल्याण तळोजा | - | ५,८६५.०० | - | ऑक्टोबर,२०२६ | काम प्रगतीपथावर |

*आधार* : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळ @काम पुर्ण +ऑक्टोबर,२०२२ पर्यंत ++ जानेवारी, २०२३ पर्यंत

९.२७.२ **नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्प:** महाराष्ट्र शासन सिडको मार्फत नवी मुंबई मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करीत आहे. पहिल्या टप्प्यात सीबीडी बेलापूर ते पेंधर हा ११ स्थानके असलेला ११.१० किमी लांबीचा उन्नत मार्ग सिडकोमार्फत विकसित करण्यात येत असून प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ३,०६३.६३ कोटी आहे. या प्रकल्पाअंतर्गत ऑक्टोबर, २०२२ अखेर ₹ २,५२० कोटी खर्च झाला.

९.२७.३ **नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प:** नागपूर मेट्रो रेल्वे प्रकल्प ४०.०२ किमी लांबीचा असून यामध्ये ३८ स्थानकांचा समावेश आहे. या प्रकल्पाचा संपूर्ण विस्तार दोन कॉरिडॉरमध्ये विभागलेला असून उत्तर-दक्षिण कॉरिडॉर (खापरी ते ऑटोमोटिव्ह चौक-ऑरेंज लाईन) यामध्ये २०.५४ किमी लांबीचा असून १८ स्थानकांचा समावेश आहे आणि पूर्व-पश्चिम कॉरिडॉर (लोकमान्य नगर ते प्रजापती नगर - अँक्वा लाईन यामध्ये) १९.४८ किमी लांबीचा असून २० स्थानकांचा समावेश आहे व माहे डिसेंबर, २०२२ अखेरीस दोन्ही मार्ग कार्यान्वित झाले आहेत. सन २०२२-२३ मध्ये प्रतिदिन सरासरी एक लाख लोकांनी प्रवास केला.

९.२७.४ **पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प:** पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाची लांबी ३३.२८ किमी असून यामध्ये दोन कॉरिडॉरचा समावेश आहे. कॉरिडॉर एक (पिंपरी चिंचवड-स्वारगेट-पर्पल लाईन) १७.५३ किमी लांबीचा (११.४५ किमी उन्नत मार्ग व ६.०८ किमी भुयारी मार्ग) असून उन्नत मार्गावर नऊ व भुयारी मार्गावर पाच स्थानके आहेत. कॉरिडॉर दोन (वनाज-रामवाडी-अँक्वा लाईन) हा १५.७५ किमी लांबीचा संपूर्णपणे उन्नत मार्ग असून त्यावर १६ स्थानके आहेत. या प्रकल्पाची अंदाजित किंमत ₹ ११,४२० कोटी आहे. कॉरिडॉर एक पिंपरी चिंचवड महानगरपालिका - फुगेवाडी (सात किमी) आणि कॉरिडॉर दोन वनाज-गरवारे महाविद्यालय (पाच किमी) या मार्गिका माहे मार्च, २०२२ मध्ये कार्यान्वित झाल्या आहेत व सन २०२२-२३ मध्ये प्रतिदिन सरासरी ६,६१९ प्रवाश्यांनी प्रवास केला.

## जलवाहतूक

९.२८ जलवाहतूक ही वाहतूकीच्या अन्य पर्यायांच्या तुलनेत किफायतशीर आणि पर्यावरणस्नेही आहे. बंदरे क्षेत्रास चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा विस्तारीत करुन त्याद्वारे औद्योगिक विकास साधण्याकरिता राज्य शासन महाराष्ट्र बंदर विकास धोरण-२०१६ राबवित आहे.

### मोठी बंदरे

९.२८.१ राज्यात मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ही दोन मोठी बंदरे आहेत. सन २०२१-२२ मध्ये मुंबई पोर्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट मधून अनुक्रमे ५९८.९० लाख मे. टन व ७५९.९६ लाख मे. टन मालाची वाहतूक झाली. मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३१ मोठ्या बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | मुंबई पोर्ट | | जवाहरलाल नेहरू पोर्ट | |
|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२०-२१ | २०२१-२२ |
| **एकूण माल वाहतूक क्षमता (लाख मे.टन)** | **८२८.५०** | **८२८.५०** | **१,२०८** | **१,२०८** |
| **माल वाहतूक (लाख मे.टन)** | **५३३.२४** | **५९८.९०** | **६४८.०९** | **७५९.९६** |
| पैकी अ) आयात | ३५९.३८ | ४०७.०२ | ३५२.४९ | ४०५.३३ |
| ब) निर्यात | १७३.८६ | १९१.८८ | २९५.६० | ३५४.६३ |
| प्रवासी वाहतूक ('०००) | निरंक# | ९८.३४ | ला.ना. | ला.ना. |
| बंदरात आलेल्या बोटी (संख्या) | ५,१४० | ५,९४१ | २,४९० | २,८३७ |

*आधार* : मुंबई पोर्ट ट्रस्ट व जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ला.ना. लागू नाही # कोविड लॉकडाऊन कालावधीत प्रवासी वाहतूक करण्यात आली नाही.

### लहान बंदरे

९.२८.२ राज्यात ४८ लहान बंदरे असून या बंदरांच्या परिसरात अनेक बंदिस्त व बहुउद्देशीय जेट्टी आहेत व त्या ठिकाणाहून देखील माल वाहतूक केली जाते. लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३२ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३२ लहान बंदरांची वाहतूक विषयक सांख्यिकी**

| बाब | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| **माल वाहतूक (लाख मे. टन)** | | **३९७.७८** | **५२४.७३** | **३७६.९९** |
| *पैकी* | अ) आयात | ३७२.८६ | ३७७.९५ | २८२.९३ |
| | ब) निर्यात | ६९.९२ | १४६.७८ | ९४.०६ |
| **प्रवासी वाहतूक (लाख)** | | **८२.१२** | **१३६.६७** | **९४.७५** |
| *पैकी* | अ) यांत्रिक बोटीतून | ८१.५१ | १३६.०४ | ९४.१४ |
| | ब) बिगर यांत्रिक बोटीतून | ०.६१ | ०.६३ | ०.६१ |

*आधार* : महाराष्ट्र सागरी मंडळ + ऑक्टोबरपर्यंत

### सागरमाला कार्यक्रम

९.२८.३ बंदरामुळे होणाऱ्या विकासास चालना देणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. किमान पायाभूत गुंतवणुकीद्वारे आयात-निर्यात तसेच अंतर्गत व्यापाराच्या वाहतूकी वरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत बंदराचे आधुनिकीकरण, नवीन बंदरे विकास, बंदर जोडणी, बंदर विकासाअंतर्गत औद्योगिकीकरण व सामाजिक विकास या प्रमुख बाबी आहेत.

केंद्र शासनाने राज्यातील बंदरांवर पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी ₹ १,१०२.०६ कोटी अंदाजित किंमतीच्या ३४ प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. त्यापैकी एकूण ₹ २००.८८ कोटी किंमतीचे आठ प्रकल्प पुर्ण झाले असून ₹ ३४७.२४ कोटी अंदाजित किंमतीचे १४ प्रकल्प प्रगतीपथावर आहेत.

९.२८.४ नवीन भाऊचा धक्का (मुंबई)-मांडवा बंदर (रायगड) येथे आणि रायगड जिल्ह्यातील आगरदांडा-दिघी येथे रो-रो सेवा सुरु करण्यात आली आहे. मीरा भाईंदर, कोलशेत, काल्हेर आणि डोंबिवली येथे जेट्टींची कामे सुरू झालेली आहेत. बेलापुर (नवी मुंबई)-एलिफंटा (रायगड) प्रवासी वाहतुक सेवा सुरु झाली आहे. कारंजा (रायगड)-रेवस (रायगड), भाईंदर(ठाणे)-वसई (पालघर), नारिंगी (पालघर)-खारवाडेश्री (पालघर), मार्वे (मुंबई उपनगर)-मनोरी (मुंबई उपनगर) भाऊचा धक्का (मुंबई)-काशीद (रायगड), गोराई (मुंबई उपनगर)-बोरीवली (मुंबई उपनगर), भाऊचा धक्का (मुंबई)-मोरा (रायगड) या जलमार्गांवर रो-रो सेवा सुरु करण्यासाठी रो रो जेट्टींची कामे प्रगतीपथावर आहेत. मालवण (सिंधुदुर्ग) येथे प्रवासी जेट्टीचे काम पुर्ण झाले आहे.

## मरीना

९.२८.५ अनधिकृत/अव्यवस्थितरित्या नांगरलेल्या बोटींमुळे जलक्षेत्रामध्ये झालेली दाटी कमी होण्यास मरीनामुळे मदत होईल. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात ३० बोटी नांगरण्याकरिता नवी मुंबईतील बेलापूर येथे पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येणार आहेत. गेट वे ऑफ इंडिया नजिकच्या समुद्रात नांगरुन ठेवलेल्या नौका व स्पीड बोटी मरीनामध्ये सुरक्षित ठेवता येतील.

## हवाई वाहतूक

९.२९ राज्यात १३ विमानतळे कार्यान्वित आहेत. निवडक विमानतळ निहाय वाहतूक विषयक सांख्यिकी तक्ता ९.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३३ निवडक विमानतळ निहाय वाहतूक विषयक सांख्यिकी**

(दि.३१ मार्च अखेर)

| विमानतळ | प्रवासी वाहतूक (लाख) | | माल वाहतूक (मे टन) | |
|---|---|---|---|---|
| | २०२१ | २०२२ | २०२१ | २०२२ |
| **अ) देशांतर्गत** | **१३३.९६** | **२४५.६५** | **१,८६,५३७** | **२,५१,२०७** |
| मुंबई | ९८.३६ | १८५.६५ | १,५२,३८२ | २,१४,०५४ |
| पुणे | २१.३३ | ३६.९५ | २६,४१९ | २८,६९७ |
| नागपूर | ९.४८ | १५.९४ | ६,७१४ | ७,३१९ |
| औरंगाबाद | १.४५ | २.५१ | ७७६ | ८४१ |
| जुहू (मुंबई) | ०.६ | ०.८६ | १४५ | २५७ |
| जळगाव | ०.०६ | ०.०८ | ० | ० |
| कोल्हापूर | ०.७१ | ०.९६ | ० | ० |
| नांदेड | ०.२८ | ०.२ | ० | ० |
| शिर्डी | ०.८६ | १.७७ | ० | ३८ |
| ओझर नाशिक (एचएएल) | ०.८३ | ०.५२ | १०१ | १ |
| गोंदिया | ०.०० | ०.०२ | ० | ० |
| सिंधुदुर्ग | ०.०० | ०.१९ | ० | ० |
| सोलापूर | ०.०० | ०.०० | ० | ० |
| **ब) आंतरराष्ट्रीय** | **१२.२३** | **३२.१२** | **४,४०,५९६** | **५,५७,३०५** |
| मुंबई | १२.१८ | ३१.८३ | ४,४०,५८४ | ५,५६,८९९ |
| पुणे | ०.०५ | ०.१८ | ० | ५ |
| नागपूर | नगण्य | ०.११ | १२ | ३६७ |
| औरंगाबाद | ०.०० | ०.०० | ० | ० |
| ओझर नाशिक (एचएएल) | ०.०० | ०.०० | ० | ३४ |
| **एकूण (अ + ब)** | **१४६.१९** | **२७७.७७** | **६,२७,१३३** | **८,०८,५१२** |

*आधार* : भारतीय विमानतळ प्राधिकरण　　एचएएल हिंदुस्थान ऐरोनॉटीक्स लिमिटेड

९.२९.१ छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हवाई वाहतुकीची कोंडी कमी करण्यासाठी नवी मुंबई येथे अतिरिक्त विमानतळाचे काम सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर चार टप्प्यात प्रस्तावित असून प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याची अंदाजित मूलभूत किंमत ₹ १४,१७९ कोटी आहे. वार्षिक सहा कोटी प्रवासी व १५ लाख मे.टन माल वाहतूक क्षमतेचे नियोजन असणारे हे विमानतळ सर्वात मोठ्या हरितक्षेत्र विमानतळांपैकी एक असेल.

# दळणवळण

## भारतनेट

९.३० सर्व ग्रामपंचायतीना नेटवर्क कनेक्टिव्हिटी (जोडणी) द्वारा इंटरनेट ब्रॉडबँन्ड सेवा/डिजीटल सेवा सुलभतेने, परवडणाऱ्या दरात उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने ऑक्टोबर, २०११ ला 'नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क' हा कार्यक्रम सुरु केला होता ज्याचे सन २०१५ ला भारतनेट असे नामकरण करण्यात आले.

९.३०.१ भारत ब्रॉडबँन्ड नेटवर्क लि. तर्फे भारतनेट टप्पा-१ राबविण्यात येत असून यात राज्यातील १५,३७९ ग्रामपंचायतींना ऑप्टीक फायबर केबल द्वारे जोडले गेले आहे. भारतनेटचा दूसरा टप्पा (महानेट-१) हा प्रोजेक्ट सध्या 'महाराष्ट्र इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी कॉर्पोरेशन लि.' (Maha IT) मार्फत राबविला जात असून यात राज्यातील २६ जिल्हे, १५३ तालुके आणि जवळपास १२,५१३ ग्रामपंचायतीपर्यंत अंदाजे ५६,०६० किमी लांबीच्या ऑप्टीकल फायबर नेटवर्कसह स्टेट लेड मॉडेल अंतर्गत राबविण्यात येत आहे. आतापर्यंत याचे ७१ टक्के काम पुर्ण झाले आहे.

९.३१ टपाल, दूरध्वनी, दृकश्राव्य व माहिती दूरसंचार हे दळणवळण व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. राज्यातील टपाल सेवेबाबतची सांख्यिकी तक्ता ९.३४ मध्ये दिली आहे.

९.३२ राज्यात माहे सप्टेंबर, २०२२ अखेर इंटरनेट ग्राहकांची संख्या १०.०६ कोटी होती.

९.३३ माहे सप्टेंबर, २०२२ अखेर राज्यात एकूण दूरध्वनी जोडण्यांची संख्या ४६.२० लाख होती. प्रति लाख लोकसंख्येमागे दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची संख्या अनुक्रमे ३,६६७ व ९९,६८९ होती. दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्यांची आकडेवारी तक्ता ९.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता ९.३४ राज्यातील टपाल सेवेबाबतची सांख्यिकी**

(संख्या)

| तपशील | क्षेत्र | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| टपाल कार्यालये | ग्रामीण | ११,५०४ | १२,१९२ |
| | नागरी | १,२४० | १,२४१ |
| | **एकूण** | **१२,७४४** | **१३,४३३** |
| टपाल पेट्या | ग्रामीण | ३१,९३६ | ३२,०४५ |
| | नागरी | ६,३५१ | ६,३३५ |
| | **एकूण** | **३८,२८७** | **३८,३८०** |
| डिलिव्हरी पोस्टमन (टपाल सेवकांसह) | ग्रामीण | २,८४२ | ६,६१९ |
| | नागरी | ४,७९७ | ४,८०४ |
| | **एकूण** | **७,६३९** | **११,४२३** |

*आधार* : जीपीओ, मुंबई

**तक्ता ९.३५ दूरध्वनी व भ्रमणध्वनी जोडण्या**

(लाख)

| सेवा पुरवठादार | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी | दूरध्वनी | भ्रमणध्वनी |
| एमटीएनएल | १५.८४ | ११.३५ | १४.६३ | ११.०४ | १३.३६ | १०.७८ |
| बीएसएनएल | ७.३७ | ६८.२४ | ७.३६ | ६६.२७ | ६.४२ | ६३.८७ |
| भारती | ५.६३ | २९१.८८$ | ७.०२ | २९४.९२$ | ८.२३ | २९९.३८$ |
| टाटा | ७.१४ | - | ६.९४ | - | ६.८६ | - |
| वोडाफोन आयडीया | १.४७ | ४३५.६२ | १.३३ | ४०२.५३ | २.०१ | ३७७.९२ |
| रिलायन्स/जिओ | ४.९६ | ५१८.५१ | ६.७९ | ४९१.११ | ८.७५ | ५०३.९१ |
| रिलायन्स कॉम | ०.७६ | ०.०२ | ०.६४ | ०.०१ | ०.५७ | ०.०१ |
| **एकूण** | **४३.१७** | **१,३२५.६२** | **४४.७१** | **१,२६५.८८** | **४६.२०** | **१,२५५.८७** |

$ भारती व टाटा टेली सर्व्हीसेस एकत्रित

\+ सप्टेंबरपर्यंत

*आधार :* भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरण

* * * * *

# परिशिष्ट ९.१

## राज्यातील विजेचा पुरवठा व वापर

| बाब | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| **अ. स्थापित क्षमता (मेगावॅट)** | | | | | | | |
| अ-१ राज्यातील स्थापित क्षमता- | | | | | | | |
| (१) औष्णिक | ४७७$ | १,०६५$ | २,७७१ | ६,४६२ | ८,०७५ | ९,६६५ | २०,९६६ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा | -- | -- | -- | -- | -- | ३,४०८ | १०,५०२ |
| (३) जलजन्य | २८२ | ८४४ | १,३१७ | १,५५२ | २,८७४ | ३,०६६ | ३,०६१ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | ६७२ | १,८२० | २,७१४ | २,८१९ |
| **एकूण (अ-१)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१२,७६९** | **१८,८५३** | **३७,३४८** |
| अ-२ स्थापित क्षमतेत महाराष्ट्राचा हिस्सा | | | | | | | |
| (१) राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | २,०४८@ | ४,६८६ | ७,२५४ |
| (२) अणुशक्ती महामंडळ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १३७ | ६९० | ६९० |
| **एकूण (अ-२)** | **उ ना** | **उ ना** | **उ ना** | **उ ना** | **२,१८५** | **५,३७६** | **७,९४४** |
| **एकूण (अ-१ + अ-२)** | **७५९** | **१,९०९** | **४,०८८** | **८,६८६** | **१४,९५४** | **२४,२२९** | **४५,२९२** |
| **ब. निर्मिती (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औष्णिक | १,९०३$ | ३,३९२ | ११,४१६ | २८,०८५ | ४९,३७७ | ५२,७९६ | १,०१,४४३ |
| (२) नवीकरणीय ऊर्जा # | -- | -- | -- | -- | -- | ५,११८ | १७,९७० |
| (३) जलजन्य | १,३६५ | ४,५३३ | ६,४४८ | ५,६१५ | ४,८८९ | ६,३७४ | ६,१४४ |
| (४) नैसर्गिक वायुजन्य | -- | -- | -- | २,७३० | ६,९४३ | १८,७२९ | ६,१२५ |
| **एकूण** | **३,२६८** | **७,९२५** | **१७,८६४** | **३६,४३०** | **६१,२०९#** | **८३,०१७** | **१,३१,६८२** |
| **क. वापर (दशलक्ष युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | १,८५३ | ५,३१२ | ८,१३० | १४,७०६ | १८,३६३ | ३४,४१६ | ५३,३७३ |
| (२) घरगुती | २६० | ७३२ | १,७७९ | ५,०६५ | ११,१७२ | १९,५४६ | ३०,६९९ |
| (३) कृषी | १५ | ३५६ | १,७२३ | ६,६०४ | ९,९४० | १६,२५७ | ३६,२४२ |
| (४) वाणिज्यिक | १९८ | ५४७ | ९४९ | २,०६८ | ४,१०५ | ११,५२७ | ११,३४७ |
| (५) रेल्वे | ३३९ | ४२१ | ७६६ | ९७० | १,५८१ | २,१८८ | १७३ |
| (६) सार्वजनिक पाणी पुरवठा | ३५ | १४६ | ३३० | उ ना | १,१९९ | १,९८३ | ५,८९७ (६ व ७ एकत्रित) |
| (७) सार्वजनिक दिवाबत्ती | २० | ७४ | १५९ | २९१ | ५५१ | ८४६ | |
| (८) इतर | -- | ६२ | १९८ | २६७ | ३७८ | ६३३ | १,०४८ |
| **एकूण** | **२,७२०** | **७,६५०** | **१४,०३४** | **२९,९७१** | **४७,२८९** | **८७,३९६** | **१,३८,७७९** |
| **ड. दरडोई विजेचा अंतिम वापर (युनिट)** | | | | | | | |
| (१) औद्योगिक | ४६.८ | १०५.४ | १२९.५ | १९५.४ | १९१.२ | ३०७.२ | ४२७.० |
| (२) वाणिज्यिक | ५.० | १०.९ | १५.१ | २७.५ | ४२.७ | १०२.९ | ९०.८ |

*आधार* - (१) केंद्रीय विद्युत प्राधिकरण
(२) महानिर्मिती
(३) महावितरण
(४) बेस्ट
(५) टाटा पॉवर कं. मर्या.
(६) अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या.

उ ना उपलब्ध नाही

टीप -
(१) उपलब्ध आकडेवारी केवळ सार्वजनिक विद्युत व्यवसायी यंत्रणेची आहे.
(२) @ यात राष्ट्रीय औष्णिक ऊर्जा महामंडळ व अणुशक्ती महामंडळाकडील वाटप न झालेला तसेच गोवा राज्याचा शिलकी ३२३ मेगावॅटचा अतिरिक्त हिस्सा समाविष्ट आहे.
(३) # यात बंदिस्त वीज व नवीकरणीय ऊर्जेची (महावितरणला विकलेली) आकडेवारी समाविष्ट आहे.
(४) $ यात तेलजन्य ऊर्जेची आकडेवारी औष्णिक ऊर्जेत समाविष्ट आहे.
(५) टाटा पॉवर कं मर्या. व अदानी इलेक्ट्रिसिटी मुंबई मर्या. वगळून इतर खाजगी कंपन्यांची स्थापित क्षमता व निर्मिती सीइएच्या वेबसाईट अहवालानुसार दिली आहे.
(६) १ युनिट = एक किलो वॅट तास

## परिशिष्ट ९.२
## राज्यातील रस्त्यांची प्रकारांनुसार लांबी
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ.क्र. | वर्ष | राष्ट्रीय महामार्ग | प्रमुख राज्य महामार्ग | राज्य महामार्ग | प्रमुख जिल्हा | इतर जिल्हा | ग्रामीण | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| १ | १९६५-६६ | २,३६४ | -- | १०,५२८ | १२,६२८ | ८,७४४ | १७,५२४ | ५१,७८८ |
| २ | १९७०-७१ | २,४४५ | -- | १४,२०३ | १७,६८४ | ११,०१२ | २०,०२० | ६५,३६४ |
| ३ | १९८०-८१ | २,९४५ | -- | १८,९४९ | २५,२३३ | २५,४०४ | ६८,६०० | १,४१,१३१ |
| ४ | १९९०-९१ | २,९५९ | -- | ३०,९७५ | ३८,९३६ | ३८,५७३ | ६१,५२२ | १,७२,९६५ |
| ५ | २०००-०१ | ३,६८८ | -- | ३३,२१२ | ४६,७५१ | ४३,६९६ | ८९,५९९ | २,१६,९४६ |
| ६ | २००५-०६ | ४,३६७ | -- | ३३,५७१ | ४८,९८७ | ४५,२२६ | ९९,२७९ | २,३१,४३० |
| ७ | २००६-०७ | ४,३६७ | -- | ३३,६७५ | ४९,१४७ | ४५,६७४ | १,००,८०१ | २,३३,६६४ |
| ८ | २००७-०८ | ४,३६७ | -- | ३३,८०० | ४९,३९३ | ४५,८८६ | १,०२,१४९ | २,३५,५९५ |
| ९ | २००८-०९ | ४,३६७ | -- | ३३,९३३ | ४९,६२१ | ४६,१४३ | १,०३,६०४ | २,३७,६६८ |
| १० | २००९-१० | ४,३७६ | -- | ३४,१०२ | ४९,९०१ | ४६,८१७ | १,०४,८४४ | २,४०,०४० |
| ११ | २०१०-११ | ४,३७६ | -- | ३४,१०३ | ४९,९३६ | ४६,८९७ | १,०६,४०० | २,४१,७१२ |
| १२ | २०११-१२ | ४,३७६ | -- | ३४,१५७ | ५०,२५६ | ४७,५२९ | १,०६,६०१ | २,४२,९१९ |
| १३ | २०१२-१३ | ४,३७६ | ६,६९४ | २७,५२८ | ५०,२५६ | ४७,५७३ | १,०६,७४५ | २,४३,१७२ |
| १४ | २०१३-१४ | ५,८५८ | ६,३३७ | ३३,९६३ | ५०,२३२ | ५२,७६१ | १,१४,५५७ | २,६३,७०८ |
| १५ | २०१४-१५ | ४,७६६ | ६,१६३ | ३३,८६० | ५०,५८५ | ५८,११५ | १,४५,८७९ | २,९९,३६८ |
| १६ | २०१५-१६ | ४,९०१ | ५,२४९ | ३३,६९५ | ५२,२७५ | ५६,५६४ | १,५३,४३५ | ३,०५,११९ |
| १७ | २०१६-१७ | ७,६८२ | ३,९७१ | ३०,७७६ | ५१,६२७ | ५६,३३६ | १,५३,९४६ | ३,०४,३३६ |
| १८ | २०१७-१८ | १०,१९५ | ३,२७२ | २९,१५१ | ५५,०३० | ५३,९२४ | १,५२,२७२ | ३,०३,८४३ |
| १९ | २०१८-१९ | १०,३०० | २,९६७ | २८,४६६ | ६०,५३१ | ४९,२०६ | १,५७,१२७ | ३,०८,५९७ |
| २० | २०१९-२० | १७,७२६ | २,९६७ | २९,०३० | ६३,८८६ | ४७,३९८ | १,४८,३३५ | ३,०९,३४२ |
| २१ | २०२०-२१ | १८,०८९ | २,९०० | २९,३८८ | ६८,३५० | ४६,४०८ | १,५७,९८० | ३,२३,११५ |
| २२ | २०२१-२२* | १८,३६६ | २,६२२ | २९,२६५ | ६८,५३५ | ४५,३७१ | १,५९,७१४ | ३,२३,८७३ |

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन        * अस्थायी

टीप - (१) १९८७ पर्यंतच्या रस्ते लांबीची विभागणी १९६१-८१ रस्ते विकास योजनेनुसार आणि १९८७-८८ पासून ही विभागणी १९८१-२००१ रस्ते विकास योजनेनुसार केली आहे .

(२) सन १९६५-६६ ते २०११-१२ करिता राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गाचा समावेश आहे.

(३) सन २०१२-१३ पासून रस्ते लांबीची विभागणी २००१-२१ रस्ते विकास योजनेनुसार आहे.

(४) आकडे संक्षिप्तात दिल्याने जुळतीलच असे नाही

## परिशिष्ट ९.३

## जिल्हानिहाय रस्त्यांच्या लांबीचे रुंदीनुसार वर्गीकरण
## (सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील)

(किमी)

| अ. | जिल्हा | साध्य लांबी २०२०-२१ | | | | | साध्य लांबी २०२१-२२* | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्र. | रूंदी (मीटर) | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण | ७.०० | ५.५ | ३.७५ | इतर | एकूण |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) |
| १ | बृहन्मुंबई | ४९ | ० | ० | ० | ४९ | ४९ | ० | ० | ० | ४९ |
| २ | ठाणे | ४९४ | २८४ | १,१३२ | २,४८९ | ४,३९९ | ५१४ | २८४ | १,१३२ | २,४८९ | ४,४१९ |
| ३ | पालघर | ५७३ | ५१६ | १,६५१ | ४,३२३ | ७,०६३ | ५७३ | ५१६ | १,६५१ | ४,३२३ | ७,०६३ |
| ४ | रायगड | ७७३ | १५७० | ३,४६६ | २,४७० | ८,२८० | १,३७० | ९६५ | ३,५०९ | २,४८२ | ८,३२५ |
| ५ | रत्नागिरी | ४८८ | ९०१ | ८,३५८ | २११ | ९,९५८ | ४८८ | ९०६ | ८,३५८ | २११ | ९,९६३ |
| ६ | सिंधुदुर्ग | २०० | ८२२ | ३,५८९ | ३,४३३ | ८,०३६ | २०० | ८४५ | ३,५८९ | ३,४३३ | ८,०६७ |
| | **कोकण विभाग** | **२,५७७** | **४,०९३** | **१८,१९६** | **१२,९२७** | **३७,७८४** | **३,१९४** | **३,५१५** | **१८,२३८** | **१२,९३८** | **३७,८८५** |
| ७ | अहमदनगर | १,५२२ | १,२८७ | १०,५४९ | ७,५८१ | २०,९३९ | १,३८१ | १,३४७ | ११,६०३ | ६,६५७ | २०,९८७ |
| ८ | नाशिक | १,४७३ | १,८१६ | १०,८१३ | ५,३६५ | १९,४६७ | १,६८८ | १,७४१ | ११,१७४ | ५,०४० | १९,६४३ |
| ९ | धुळे | ९५५ | ४७३ | ५,३८१ | १५७ | ६,९६६ | ९५० | ४६३ | ५,३९० | ७ | ६,८१० |
| १० | नंदुरबार | ३४४ | ४८० | ६,२१८ | ५७ | ७,०९९ | ३४४ | ४८० | ६,११८ | ४७ | ६,९८८ |
| ११ | जळगाव | १,०४७ | १,२३७ | ५,३०५ | ५,७१९ | १३,३०९ | १,२६५ | १,२८० | ५,२२६ | ५,५७५ | १३,३४७ |
| | **नाशिक विभाग** | **५,३४१** | **५,२९२** | **३८,२६६** | **१८,८८०** | **६७,७८०** | **५,६२८** | **५,३११** | **३९,५१०** | **१७,३२६** | **६७,७७५** |
| १२ | पुणे | १,६१४ | १,४४५ | १६,२२७ | ५९ | १९,३४५ | १,७५५ | १,३९५ | १५,८९५ | ३२० | १९,३६६ |
| १३ | सातारा | ७२५ | १,०५८ | ८,६०६ | ३,३१६ | १३,७०५ | ७२५ | ९९५ | ९,४५३ | २,५४९ | १३,७२३ |
| १४ | सांगली | १,५०१ | ९९८ | ४,२२५ | ६,१४५ | १२,८६९ | १,५३५ | ९९९ | ४,२२८ | ६,१३५ | १२,८९६ |
| १५ | कोल्हापुर | ७७८ | १,०५३ | ३,७९१ | ३,१०८ | ८,७३० | ८४४ | १,०६१ | ३,१४४ | ३,६४७ | ८,६९७ |
| १६ | सोलापूर | १,७९१ | ८३८ | ५,३८४ | ९,५६७ | १७,५७९ | १,७२२ | ८१७ | ५,३५८ | ९,५५५ | १७,४५२ |
| | **पुणे विभाग** | **६,४०८** | **५,३९२** | **३८,२३२** | **२२,१९५** | **७२,२२८** | **६,५८२** | **५,२६८** | **३८,०७९** | **२२,२०५** | **७२,१३४** |
| १७ | औरंगाबाद | ८८० | ८१३ | ६,७२१ | १,८८८ | १०,३०२ | ९१२ | ८१९ | ६,६५९ | १,८८८ | १०,२७८ |
| १८ | जालना | ८४४ | ३७५ | ४,९४९ | १,३२३ | ७,४९१ | ८८५ | ४४५ | ४,८५८ | १,३२३ | ७,५११ |
| १९ | परभणी | ४२४ | १८६ | ३,८७० | ९२९ | ५,४०९ | ६३८ | २३३ | ३,८४१ | ९६२ | ५,६७४ |
| २० | हिंगोली | २५८ | १७० | ३,४९६ | ६९ | ३,९९३ | २७७ | १६७ | ३,५०० | २३० | ४,१७४ |
| २१ | नांदेड | १,१२३ | ७१९ | ७,८४० | २,३३० | १२,०१२ | १,५४९ | १७५ | ८,८२९ | १,६८३ | १२,२३६ |
| २२ | बीड | १,१५३ | ४३५ | ८,२५२ | २,५९४ | १२,४३४ | १,१९७ | ४३७ | ८,२५९ | २,५८६ | १२,४७९ |
| २३ | उस्मानाबाद | ६१२ | ९०५ | ४,८८३ | १,१३१ | ७,५३१ | ६१२ | ९०७ | ४,८८१ | १,१३१ | ७,५३१ |
| २४ | लातूर | ६७९ | ८०१ | ५,४१४ | १,०२० | ७,९१४ | ६९७ | ६५५ | ५,१५८ | १,२५० | ७,७६० |
| | **औरंगाबाद विभाग** | **५,९७३** | **४,४०४** | **४५,४२५** | **११,२८४** | **६७,०८६** | **६,७६७** | **३,८३८** | **४५,९८५** | **११,०५३** | **६७,६४३** |
| २५ | बुलढाणा | १,००९ | ३२३ | २,८७५ | १,४७१ | ५,६७८ | १,०२८ | ५२५ | २,७५९ | १,३८६ | ५,६९८ |
| २६ | अकोला | ५०४ | ४२० | १,३७८ | १,१०१ | ३,४०३ | ६०७ | ३५३ | १,३८४ | १,०६१ | ३,४०५ |
| २७ | वाशिम | ४८१ | ३२६ | १,१६३ | १,१२२ | ३,०९२ | ४७८ | ३४३ | १,१८७ | १,१०० | ३,१०८ |
| २८ | अमरावती | ८४२ | ८२९ | १,७६९ | ४,६८२ | ८,१२२ | १,०४० | ७१२ | १,६९८ | ४,७२२ | ८,१७२ |
| २९ | यवतमाळ | ८२४ | ८६३ | ३,५३९ | ३,४९४ | ८,७२० | ८८९ | ९३३ | ३,३५२ | ३,५८४ | ८,७५८ |
| | **अमरावती विभाग** | **३,६६०** | **२,७६१** | **१०,७२४** | **११,८७०** | **२९,०१५** | **४,०४२** | **२,८६६** | **१०,३८०** | **११,८५३** | **२९,१४१** |
| ३० | वर्धा | ५५८ | ४१८ | १,८०३ | २,५३४ | ५,३१३ | ४३९ | ४०७ | १,७८० | २,४९७ | ५,१२३ |
| ३१ | नागपूर | १,०५७ | ६४२ | ६,३९५ | ६,४९५ | १४,५८९ | १,०७७ | ६४२ | ६,४८२ | ६,४९५ | १४,६९६ |
| ३२ | भंडारा | २३६ | २४६ | २,८९३ | २,७३४ | ६,१०९ | २३६ | २४६ | २,९१५ | २,८८८ | ६,२८४ |
| ३३ | गोंदिया | ३०८ | ३१३ | ३,५८७ | ३,२२४ | ७,४३२ | ३०८ | ३१३ | ३,६६६ | ३,०७५ | ७,३६२ |
| ३४ | चंद्रपुर | ७१२ | ४८२ | ५,९४२ | २,६१८ | ९,७५४ | १,०५९ | ६०७ | २,८५० | ५,२९० | ९,८०६ |
| ३५ | गडचिरोली | ५०२ | ४९८ | ४,४५५ | ५६९ | ६,०२५ | ५०२ | ५२० | ४,४३८ | ५६५ | ६,०२५ |
| | **नागपूर विभाग** | **३,३७३** | **२,५९८** | **२५,०७६** | **१८,१७५** | **४९,२२३** | **३,६२१** | **२,७३४** | **२२,१३०** | **२०,८११** | **४९,२९६** |
| | **महाराष्ट्र राज्य** | **२७,३३३** | **२४,५४१** | **१,७५,९११** | **९५,३३१** | **३,२३,११५** | **२९,८३४** | **२३,५३२** | **१,७४,३२२** | **९६,१८६** | **३,२३,८७३** |

टिप: आकडे संक्षिप्तात दिल्याने जुळतीलच असे नाही. * अस्थायी

*आधार* - सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन

# परिशिष्ट ९.४

## राज्यातील मोटार वाहनांची संख्या

(१ जानेवारी रोजी)

| अ.क्र. | वाहनांचा प्रकार | १९७१ | १९८१ | १९९१ | २००१ | २०११ | २०२१ | २०२२* | २०२३* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |
| १ | मोटार सायकली, स्कूटर व मोपेड | ८३,९३० | ३,४६,८२६ | १६,९६,१५७ | ४४,०९,९०६ | १,२०,६०,९९० | २,८३,४०,४०८ | २,९९,४६,०६५ | ३,१५,८९,८९८ |
| २ | मोटार गाड्या, जीप आणि स्टेशन वॅगन्स | १,२२,५०८ | २,२४,७५२ | ४,२३,५०५ | ९,०१,२७८ | २३,८२,७८९ | ५३,८८,४७५ | ५८,१८,०४२ | ६२,५३,३१३ |
| ३ | टॅक्सी कॅब्ज | १७,८०६ | ३१,३०२ | ४३,१६८ | ८६,४३८ | १,८२,६७६ | ३,७३,२३७ | ३,६४,०६१ | ३,७९,०५७ |
| ४ | स्वयंचलित रिक्शा | ३,०४९ | २९,४७४ | १,२६,०४९ | ४,०७,६६० | ६,४४,०३७ | १०,६०,६१६ | १०,७३,८६५ | ११,०३,९६७ |
| ५ | स्टेज कॅरेजेस | १०,२५० | १३,७८९ | १८,२०३ | २७,२८६ | ३४,०६१ | ४०,४८२ | ४१,९०८ | ४२,७०८ |
| ६ | कॉन्ट्रॅक्ट कॅरेजेस | -- | १,४९८ | ३,९८० | १३,९७५ | ३१,४५९ | ७२,२७३ | ६९,२४६ | ७१,९३२ |
| ७ | मालमोटारी - | | | | | | १९,०७,४०८ | | |
| | (१) डिझेल इंजिन | ३४,९८७ | ८७,०७९ | १,८०,८८३ | ३,४१,३४४ | ८,७८,२३९ | -- | १९,०७,४४५ | २०,२३,१४७ |
| | (२) पेट्रोल इंजिन | २१,७९१ | १८,००५ | १३,७७४ | ५७,३१७ | ७७,१८९ | -- | १५,८०६ | १६,५२८ |
| | (३) इतर (सीएनजी, एलपीजी, इ.) | -- | -- | -- | -- | -- | -- | ८५,१५६ | ९१,३२५ |
| | (४) विद्युत | -- | -- | -- | -- | -- | -- | ५६१ | ६२८ |
| ८ | रुग्णवाहिका | ४४१ | ९२५ | २,२३३ | ४,०२५ | ९,६०० | १७,३६२ | २०,४०५ | २१,३३४ |
| ९ | शाळेच्या बसेस | ४९१ | ५९४ | १,०२५ | १,७१४ | ६,११७ | ३२,६२८ | ३३,०२४ | ३४,२१९ |
| १० | खाजगी प्रवासी वाहने | ८१० | २,१७१ | ४,६२२ | ५,८१५ | ९,४२१ | १३,०३७ | १३,२५१ | १३,४७२ |
| ११ | जोड वाहने (ट्रेलर) | ७,०७५ | २३,१७३ | ६०,८५८ | १,६७,८५६ | २,८४,६९६ | ४,३२,४१२ | ४,५३,३८५ | ४,७०,५११ |
| १२ | ट्रॅक्टर्स | ७,८२१ | २४,०७९ | ६१,०८८ | १,७२,५७८ | ३,५८,५५६ | ८,६८,७५० | ९,७९,७७७ | १०,७९,७६८ |
| १३ | इतर | ८१० | १,३१९ | ५,०४० | ९,८७२ | २९,८२९ | ८९,१५९ | ९४,५०१ | १,०६,७३३ |
| | **एकूण** | **३,११,७६९** | **८,०४,९८६** | **२६,४०,५८५** | **६६,०७,०६४** | **१,६९,८९,६५९** | **३,८६,३६,२४७** | **४,०९,१६,४९८** | **४,३२,९८,५४०** |
| | दर लाख लोकसंख्येमागे मोटार वाहनांची संख्या | ६१८ | १,३०९ | ३,३५३ | ७,१८६ | १५,११९ | ३१,१६८ | ३२,७३२ | ३४,३७० |
| | सार्वजनिक बांधकाम व जिल्हा परिषद यांच्या देखभालीखालील असलेल्या दर किमी रस्तेलांबीमागे मोटार वाहनांची संख्या | ५ | ६ | १५ | ३१ | ७१ | १२५ | १२८ | १३४ |
| | दर लाख लोकसंख्येमागे रुग्णवाहिकांची संख्या | ०.९ | १.५ | २.८ | ४.४ | ८.५ | १४ | १६ | १७ |

*आधार* - परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन  * अस्थायी

# १०
# सामाजिक क्षेत्र



# १०. सामाजिक क्षेत्र

१०.१ सामाजिक क्षेत्रामध्ये शिक्षण, आरोग्य व पोषण, गृहनिर्माण, रोजगार, दारिद्र्य, सामाजिक न्याय, महिला व बालकल्याण, पाणीपुरवठा व स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धन या उपक्षेत्राचा समावेश होतो. या क्षेत्रातील उपक्रम मानवी भांडवल निर्मितीस आणि मानव विकासास हातभार लावतात. या क्षेत्रातील विविध योजना/कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमुळे लाभ आणि संधींचे समान वितरण करण्यास सहाय्यत होते व त्यामुळे शाश्वत विकास साध्य करण्यास मदत होते.

## शिक्षण

१०.२ सामाजिक परिवर्तन आणि आर्थिक विकासात शिक्षण महत्त्वाची भूमिका बजावते. शिक्षण लोकांना कौशल्ये व ज्ञानाने सक्षम करते आणि त्यांची उत्पादकता वाढविण्यास सहाय्यभूत ठरून सर्वांगीण विकासास चालना देते. शासन राबवत असलेल्या समग्र शिक्षा, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान इत्यादी योजना/कार्यक्रम शाश्वत विकास ध्येय-४ 'सर्वांसाठी सर्व समावेशक व समन्यायी दर्जेदार शिक्षणाची सुनिश्चिती करणे आणि आजीवन शिक्षणाच्या संधींना चालना देणे' साध्य करण्यास मदत करत आहेत.

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०

१०.३ केंद्र शासनाने दि. २९ जुलै, २०२० रोजी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मंजूर केले आहे. शाश्वत विकास ध्येय ४ मध्ये नमुद लक्ष साध्य करण्याकरीता देशातील शालेय तसेच उच्च शिक्षण प्रणालीमध्ये परीवर्तनशील सुधारणा घडवून आणण्याकरीता मार्ग सुकर करणे हा धोरणाचा प्रमुख उद्देश आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची ठळक वैशिष्टये

१. शालेय शिक्षण

- सन २०३० पर्यंत १०० टक्के पटसंख्येचे प्रमाण साध्य करण्याकरीता पूर्व प्राथमिक ते माध्यमिक स्तरापर्यंत शिक्षणचे सार्वत्रिकीकरण
- खुल्या शालेय शिक्षण व्यवस्थेद्वारे शाळाबाहय मुलांना मुख्य शिक्षण प्रवाहात आणणे
- प्रचलित १०+२ रचना बदलून तीन ते आठ वर्षे (पायाभूत टप्पा), आठ ते ११ वर्षे (प्रारंभिक), ११ ते १४ वर्षे (मध्यम) आणि १४ ते १८ वर्षे (माध्यमिक) वयोगटात अनुक्रमे ५+३+३+४ अशी रचना करणे
- तीन ते सहा वर्षे वयोगटातील शाळाबाहय बालकांना १२ वर्षाच्या शालेय अभ्यासक्रमांतर्गत समाविष्ट करुन घेणे
- इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षांमध्ये सहजता आणणे
- पतांकन आराखडा अंगिकारणे आणि सार्वजनिक तसेच खाजगी शाळांच्या नियमनासाठी स्वतंत्र प्राधीकरण स्थापने
- मूलभूत साक्षरतेवर व अंक ज्ञानावर विशेष भर देणे
- इयत्ता सहावी पासून इंटर्नशिप सह व्यवसाय शिक्षण देणे
- अध्यापनशास्त्रासाठी नवीन व सर्वसमावेशक 'राष्ट्रीय अभ्यासक्रम व रचना २०२१' तयार करणे

२. उच्च शिक्षण

- सन २०३५ पर्यंत उच्च शिक्षणामध्ये एकूण पटसंख्येचे प्रमाण ५० टक्कयांपर्यंत वाढवणे
- बहुविध प्रवेश तसेच प्रस्थान पर्याय उपलब्ध असलेले तीन अथवा चार वर्षाकरिता लवचिक अभ्यासक्रमयुक्त पदवीपूर्व स्तरावरील व्यापक शिक्षण
- गुणांक स्थानांतर सुविधा उपलब्ध करुन देण्याकरीता शैक्षणिक गुणांक बँकेची स्थापना
- देशात जागतिक दर्जाच्या बहुविध शाखांमध्ये शिक्षण घेण्याची सुविधा असलेल्या 'शैक्षणिक व संशोधन विद्यापिठांची स्थापना
- देशामध्ये संशोधन संस्कृतीचे संवर्धन व बळकटीकरण करण्याकरिता 'राष्ट्रीय संशोधन फाउंडेशन' ची निर्मिती
- देशातील वैद्यकीय व विधी शिक्षणाव्यतिरिक्त इतर सर्व शाखांमधील शिक्षणाकरीता 'भारतील उच्च शिक्षण आयोग' या एकछत्री संस्थेची स्थापना

३. इतर बदल

- शिक्षण, मूल्यांकन, नियोजन आणि प्रशासनामध्ये सुधारणा घडविण्यासाठी तंत्रज्ञान वापराच्या कल्पनांचे मुक्त आदानप्रदान करण्याकरिता व्यासपीठ उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने 'राष्ट्रीय शैक्षणिक तंत्रज्ञान मंच' या स्वायत्त मंडळाची स्थापना
- विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याकरिता 'परख' या राष्ट्रीय मूल्यांकन केंद्राची स्थापना
- परदेशी विद्यापीठांना देशात केंद्रे स्थापन करण्यासाठी प्रोत्साहित करणे
- नवीन धोरणा अंतर्गत वंचित प्रदेश व घटकांसाठी विशेष शैक्षणिक विभाग आणि जेंडर समावेशाकरिता निधीची स्थापना करण्यावर भर

## प्राथमिक शिक्षण

१०.४ प्राथमिक शिक्षणासाठी राज्यात विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येतात. प्राथमिक (इयत्ता पहिली ते पाचवी) आणि उच्च प्राथमिक (इयत्ता सहावी ते आठवी) शिक्षणाबाबतचे काही महत्त्वाचे निर्देशक तक्ता १०.१ मध्ये दिले आहेत तर शैक्षणिकस्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या परिशिष्ट १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१ प्राथमिक (इयत्ता पहिली ते पाचवी) व उच्च प्राथमिक (इयत्ता सहावी ते आठवी) शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|
| प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या (माहिती नोंदणी केलेल्या) | | १,०६,४९१ | १,०६,३३८ | १,०५,८४८ |
| ग्रामीण भागातील शाळांची टक्केवारी | | ७७.२ | ७७.१ | ७५.८ |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता | अ) प्राथमिक | ३.२ | ३.२ | ३.२ |
| | ब) उच्च प्राथमिक | १.७ | १.७ | १.७ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (६ ते ११ वर्षे वय) प्राथमिक शाळा/ तुकड्यांची संख्या | | १०.१ | १०.१ | १०.१ |
| दर हजार मुलांच्या लोकसंख्येमागे (११ ते १४ वर्षे वय) उच्च प्राथमिक शाळा/तुकड्यांची संख्या | | ९.३ | ९.३ | ९.३ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | २१.६ | २१.६ | १६.३ |
| शाळेतील पटसंख्या (लाख) | | १५६.९ | १५३.९ | १५४.२ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४७.० | ४७.१ | ४७.३ |
| एकूण पटसंख्या प्रमाण | अ) प्राथमिक | १०६.३ | १०४.८ | १०६.९ |
| | ब) उच्च प्राथमिक | ९९.० | ९९.६ | १००.४ |
| सरासरी विद्यार्थी-वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | २९ | २६ | २८ |
| शिक्षकांची संख्या (लाख) | | ५.३ | ५.१ | ५.० |
| विद्यार्थी -शिक्षक प्रमाण | | २९:१ | ३०:१ | ३१:१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | | |
| पिण्याचे पाणी | | ९९.३ | ९९.४ | ९९.५ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९२.९ | ९६.५ | ९६.३ |
| संरक्षक भिंत | | ८३.७ | ८४.६ | ८८.५ |
| संगणक | | ६३.३ | ६६.७ | ६३.२ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ९०.० | ९२.२ | ९३.१ |
| खेळाचे मैदान | | ८५.१ | ८६.८ | ८६.३ |
| ग्रंथालय | | ८३.९ | ८७.५ | ८९.३ |
| विद्युत जोडणी | | ९३.५ | ९५.३ | ९८.३ |
| गळतीचे प्रमाण | अ) प्राथमिक | ०.०४ | १.०० | ०.०० |
| | ब) उच्च प्राथमिक | १.१७ | १.५३ | १.५३ |
| मुली मुले असमानता निर्देशांक | अ) प्राथमिक | १.०१ | १.०३ | १.०५ |
| | ब) उच्च प्राथमिक | ०.९९ | ०.९९ | ०.९८ |

*आधार* : १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (UDISE+)

## बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९

१०.५ बालकांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम, २००९ राज्यात माहे एप्रिल, २०१० पासून लागू करण्यात आला आहे. या अधिनियमानुसार बालकांना जवळच्या शाळेत मोफत आणि सक्तीचे पूर्ण प्राथमिक शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. या अधिनियमा अंतर्गत स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांमध्ये (अल्पसंख्याक शाळा वगळून) एकूण प्रवेश क्षमतेच्या २५ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल व वंचित घटकातील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक ते इयत्ता आठवीपर्यंत मोफत प्रवेशासह मोफत शिक्षण दिले जाते. शिक्षणाचा अधिकार अधिनियम लागू झाल्यापासून माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ६.२८ लाख विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देण्यात आला. सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर पर्यंत सुमारे ७८,७९० विद्यार्थ्यांना या कायद्यांतर्गत प्रवेश मिळाला.

१०.५.१ या अधिनियमा अंतर्गत सहा ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक शाळाबाह्य बालकाला शैक्षणिक प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. सन २०२१-२२ मध्ये, एकूण २१,७३१ शाळाबाह्य बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले आणि त्यापैकी ९,६०८ बालकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये माहे नोव्हेंबर पर्यंत १७,८१८ शाळाबाह्य बालकांना मुख्य प्रवाहात आणण्यात आले असून, त्यापैकी १०,५२२ बालकांसाठी विशेष प्रशिक्षण प्रस्तावित आहे.

## माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण

१०.६ माध्यमिक (इयत्ता नववी ते १० वी) आणि उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी) शिक्षणाबाबतचे काही महत्त्वाचे निर्देशक तक्ता १०.२ मध्ये दिले आहेत तर शैक्षणिकस्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या परिशिष्ट १०.१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२ माध्यमिक (इयत्ता नववी ते १० वी) व उच्च माध्यमिक (इयत्ता ११ वी ते १२ वी) शिक्षणाबाबतचे काही महत्वाचे निर्देशक**

(दि. ३० सप्टेंबर रोजी)

| निर्देशक | | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|---|
| माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण देणाऱ्या शाळांची संख्या (माहिती नोंदणी केलेल्या) | | २८,०९३ | २८,५०५ | २८,६१२ |
| ग्रामीण भागातील शाळांचे प्रमाण | | ६१.९ | ६१.८ | ६०.० |
| दर १० चौ. किमी मागील शाळांची/तुकड्यांची घनता | (अ) माध्यमिक | १.८ | ०.८ | ०.८ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.४ | ०.४ | ०.४ |
| स्वअर्थसहाय्यित खाजगी शाळांची एकूण शाळांशी टक्केवारी | | ३४.७ | २६.७ | ३५.१ |
| शाळेतील पटसंख्या (लाख) | | ६४.८ | ६५.२ | ६६.४ |
| पटसंख्येतील मुलींची टक्केवारी | | ४६.५ | ४७.० | ३१.० |
| एकूण पटसंख्येचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ९१.४ | ९२.६ | ९३.७ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ८७.० | ६८.२ | ७१.५ |
| सरासरी विद्यार्थी-वर्गखोली प्रमाण (सर्व शाळा) | | ४४ | ४४ | ४३ |
| शिक्षकांची संख्या (लाखात) | | २.५१ | २.४८ | २.४९ |
| विद्यार्थी - शिक्षक प्रमाण | | २६:१ | २६:१ | २७:१ |
| सुविधा असलेल्या शाळांची टक्केवारी | | | | |
| पिण्याचे पाणी | | ९९.८ | ९९.९ | ९९.९ |
| मुलींकरिता कार्यरत शौचालय | | ९८.६ | ९८.७ | ९८.१ |
| संरक्षक भिंत | | ९३.७ | ९४.३ | ९४.६ |
| दिव्यांगांसाठी उतरता रस्ता | | ८६.८ | ८७.५ | ८९.४ |
| खेळाचे मैदान | | ९५.१ | ९५.३ | ९५.३ |
| ग्रंथालय | | ९३.० | ९४.४ | ९५.१ |
| विद्युत जोडणी | | ९८.८ | ९८.३ | ९९.१ |
| संगणक | | ८६.२ | ८८.४ | ८६.१ |
| संगणक व इंटरनेट | | ७०.४ | ७३.० | ७६.५ |
| गळतीचे प्रमाण | (अ) माध्यमिक | ६.४ | ४.६ | १०.७ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ४.४ | १.४ | उ ना |
| मुली मुले असमानता निर्देशांक | (अ) माध्यमिक | ०.९७ | ०.९७ | ०.९८ |
| | (ब) उच्च माध्यमिक | ०.९९ | १.० | ०.९८ |

टीप : उ ना - उपलब्ध नाही

*आधार* : १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद (UDISE+)

## स्वअर्थसहाय्यित शाळा

१०.७ महाराष्ट्र स्वअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व नियमन) अधिनियम, २०१२ राज्यात माहे जानेवारी, २०१३ पासून लागू आहे. स्वअर्थसहाय्यित शाळांची मंडळ आणि माध्यम निहाय संख्या तक्ता १०.३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३ स्वअर्थसहाय्यित शाळांची मंडळ व माध्यम निहाय संख्या**

| वर्ष | मंडळ | | | | | माध्यम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | राज्य मंडळ | सीबीएसई | राज्य मंडळ व सीबीएसई | आयसीएसई/आयजीसीएसई/ आयबी/ इतर | एकूण | मराठी | इंग्रजी | उर्दू/हिंदी/बंगाली |
| २०१९-२० | ४,८०१ | ८७९ | २० | ३७२ | ६,०७२ | ७८२ | ५,१८४ | १०६ |
| २०२०-२१ | ५,०३० | ९९५ | १८ | ३८१ | ६,४२४ | ८१९ | ५,४९२ | ११३ |
| २०२१-२२ | ५,०९२ | १,०७१ | २१ | ३९३ | ६,५७७ | ८२३ | ५,६३९ | ११५ |

सीबीएसई सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयसीएसई इंडियन सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयजीसीएसई इंटरनॅशनल जनरल सर्टिफिकेट ऑफ सेकंडरी एज्युकेशन
आयबी इंटरनॅशनल बॅचलरेट
*आधार* : १) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## समग्र शिक्षा

१०.८ विद्यार्थ्याला दर्जेदार शिक्षण देण्यासाठी सन २०१८-१९ पासून समग्र शिक्षा हा व्यापक कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. शाश्वत विकास ध्येय-४ मध्ये परिकल्पित केल्यानुसार शाला पूर्व ते उच्च माध्यमिक स्तरा पर्यंत सर्वसमावेशक आणि समन्यायी शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी या कार्यक्रमा अंतर्गत सर्व शिक्षा अभियान, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान आणि शिक्षक प्रशिक्षण या तीन योजना अंतर्भूत आहेत. हा कार्यक्रम शालेय शिक्षणाच्या तरतुदींमध्ये किमान मानके गाठण्याची सुनिश्चिती करतो. शालेय शिक्षणातील सामाजिक आणि लिंग भेद भरून काढणे हा देखील या अभियानाचा उद्देश आहे. सदर कार्यक्रम व्यवसायाभिमुख शिक्षण आणि विद्यार्थ्यांची अध्ययन फलनिष्पत्ती वाढविण्यास प्रोत्साहन देतो. सन २०२१-२२ मध्ये समग्र शिक्षा अंतर्गत ₹ ६७५.३७ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये माहे ऑक्टोबर पर्यंत ₹ ७३५.६५ कोटी खर्च झाला.

## दिव्यांग समावेशक शिक्षण कार्यक्रम

१०.९ विशेष गरजा असलेल्या मुलांना सर्वसाधारण व्यवस्थेत सर्वसाधारण मुलांसोबत दर्जेदार शिक्षण मिळून त्यांची भावनिक उन्नती होण्यासाठी तसेच त्यांना समाजात सामावून घेण्यासाठी राज्यात 'दिव्यांग समावेशक शिक्षण' कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विशेष गरजा असलेल्या मुलांची ओळख, वैद्यकीयदृष्ट्या मूल्यांकन, ब्रेललिपितील पुस्तके, चष्मा, श्रवण यंत्रे व उपकरणे, वाचन प्रशिक्षक इत्यादी शैक्षणिक आणि पुनर्वसन सहाय्य सेवा प्रदान करणे यांचा समावेश 'दिव्यांग समावेशक शिक्षण' कार्यक्रमामध्ये आहे. 'दिव्यांगांसाठी सर्वसमावेशक शिक्षण' कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.४ दिव्यांगासाठी सर्वसमावेशक शिक्षण कार्यक्रमाची प्रगती**

| शैक्षणिक स्तर | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी) | २.५१ | ४३.४१ | २.२० | ०.३२ | २.०२ | ०.०१ |
| माध्यमिक (९ वी ते १२ वी) | ०.५७ | ०.२४ | ०.५७ | ०.७५ | ०.५५ | ०.०१ |

*आधार* : महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद + आक्टोंबर पर्यंत

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

१०.१० मध्यान्ह भोजन योजनेचे नामकरण माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना असे करण्यात आले आहे. प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची नोंदणी व उपस्थिती वाढवणे आणि त्यांचे पोषण स्तरात सुधारणा करणे या उद्देशाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना तयार भोजन दिले जाते. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची प्रगती तक्ता १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५ प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेची प्रगती**

| इयत्ता | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (₹ लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (₹ लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (₹ लाख) | खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ५ वी | ६०.७० | ७७६ | ४६.१२ | ५५७ | ५५.२० | ७० |
| ६ वी ते ८ वी | ३९.२० | ६३५ | ३०.७६ | ३७१ | ३७.५० | ४७ |

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

## राष्ट्रीय अध्ययन फलनिष्पत्ती पाहणी २०२१

१०.११ राष्ट्रीय अध्ययन फलनिष्पत्ती पाहणी २०२१ ही शासकीय शाळा, शासन अनुदानित शाळा, खाजगी विना अनुदानित आणि केंद्रीय शाळांमधील इयत्ता तिसरी, पाचवी, आठवी आणि १० वी तील विद्यार्थ्यांच्या अध्ययन फलनिष्पत्तीची माहिती मिळविण्याकरिता व्यापक स्वरूपातील राष्ट्रीय स्तरावरील मूल्यांकन आहे. राष्ट्रीय अध्ययन फलनिष्पत्ती पाहणी २०२१ दि. १३ नोव्हेंबर २०२१ रोजी संपूर्ण देशात आयोजित करण्यात आली होती. सर्वेक्षणाचे साधन म्हणून भाषा, गणित, विज्ञान, पर्यावरण अभ्यास आणि सामाजिक शास्त्र विषयांच्या चाचणी पुस्तिकांचा वापर करण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद द्वारा सक्षमता आधारित चाचणी प्रश्न अध्ययन फलनिष्पती प्रतिबिंबित करतात ज्याचा अलीकडेच केंद्र शासनाने शिक्षण हक्क कायद्यात समावेश केला आहे. अध्ययन फलनिष्पत्तीची स्तर निहाय विद्यार्थ्यांची कामगिरी तक्ता १०.६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६ अध्ययन फलनिष्पत्तीची स्तर निहाय विद्यार्थ्यांची कामगिरी**

(टक्के)

| इयत्ता | विषय | कामगिरी स्तर | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मूलभूत पेक्षा कमी | मूलभूत | प्रवीण | उच्च |
| तिसरी | भाषा | २२ | ३३ | ३० | १४ |
| | गणित | १७ | ३४ | ३४ | १५ |
| | परिसर विज्ञान | १५ | ३३ | ३८ | १३ |
| पाचवी | भाषा | १७ | ३५ | ३६ | १२ |
| | गणित | ३० | ४३ | २२ | ५ |
| | परिसर विज्ञान | २९ | ३४ | ३० | ७ |
| आठवी | भाषा | १६ | ४३ | २७ | १४ |
| | गणित | २७ | ५१ | १७ | ५ |
| | विज्ञान | ३८ | ३६ | १९ | ७ |
| | सामाजिक शास्त्रे | ३५ | ४५ | १३ | ७ |
| १० वी | आधुनिक भारतीय भाषा | ४६ | ४१ | १३ | १ |
| | इंग्रजी | १९ | १५ | ४४ | २३ |
| | गणित | ३३ | ५१ | १४ | २ |
| | विज्ञान | ७७ | १७ | ५ | १ |
| | सामाजिक शास्त्रे | ५८ | २६ | १४ | २ |

टीप: आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकानी बेरजा १०० येतीलच असे नाही.

*आधार:* राष्ट्रीय अध्ययन फलनिष्पत्ती पाहणी -२०२१ महाराष्ट्र रिपोर्ट कार्ड

## शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजना

१०.१२ मुलांना शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी आणि पालकांवरील आर्थिक भार कमी करण्यासाठी राज्य शासन विविध योजना राबवत आहे. मुलांना शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७ मुलांना शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | अपेक्षित लाभार्थी (लाख) | अपेक्षित खर्च (₹ कोटी) |
| १ ली ते ४ थी इयत्तेतील गरीब मुलांना मोफत गणवेश व लेखन साहित्य पुरविणे | - | - | ०.० | ०.० | १.५५ | १.७० |
| शासकीय अनुदानित व विनाअनुदानित शाळांमध्ये शिकणाऱ्या १ ली ते १० वी च्या विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात सवलत | - | - | ०.० | ०.०० | १९३.९८ | २०.०० |
| आर्थिकदृष्ट्या दुर्बल गटातील ११ वी व १२ वीत शिकणाऱ्या मुलांना मोफत शिक्षण | - | - | १.३६ | ०.३८ | १.३६ | ०.५० |
| आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन | - | - | ०.०१ | ०.०२ | ०.०१ | ०.०५ |

@ कोविड-१९ महामारीच्या प्रादुर्भावामुळे सन २०२०-२१ मध्ये योजना राबविणे शक्य झाले नाही.

*आधार* : प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या योजना

१०.१३ मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी शासन उपस्थिती भत्ता योजना, अहिल्याबाई होळकर योजना (राज्य परिवहन सेवा बसेसमध्ये मोफत प्रवास), अकरावी आणि बारावीत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण, कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, इत्यादी योजना राबवत आहे. मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती तक्ता १०.८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८ मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देणाऱ्या निवडक योजनांची प्रगती**

| योजना | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (लाख) | खर्च (₹ कोटी) | अपेक्षित लाभार्थी (लाख) | अपेक्षित खर्च (₹ कोटी) |
| उपस्थिती भत्ता योजना | ०.००@ | ०.००@ | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| अहिल्याबाई होळकर योजना | ७.९१ | ४१.७२ | ७.१२ | ४६.१७ | २७.२४ | १५५.७६ |
| ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण | ०.०@ | ०.००@ | १२.९९ | १.३० | १२.९९ | २.०० |
| कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय | ०.०४ | १०.७२ | ०.०४ | ९.६९ | ०.०४ | १२.१० |

@ कोविड-१९ महामारीमुळे योजनांची अंमलबजावणी होऊ शकली नाही

*आधार:* १) प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

## सैनिकी शाळा

१०.१४ राज्यात माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ३८ अनुदानित सैनिकी शाळा असून त्यापैकी चार शाळा केवळ मुलींसाठी आहेत. सन २०२२-२३ मध्ये या शाळांमधील पटसंख्या ११,८८२ आहे.

## क्रीडा शिक्षण

१०.१५ खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि खेळाडुंचे कौशल्य वर्धन करून नैपुण्य विकसित करण्यासाठी राज्य शासनाने पुणे येथे शिवछत्रपती क्रीडापीठ स्थापित केले आहे. राज्यस्तरीय मान्यताप्राप्त खेळाडू किंवा अधिकृत राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणाऱ्या खेळाडूंना थेट प्रवेश दिला जातो. राज्यस्तरावर सहभागी होणाऱ्या निवडक खेळाडूंना कौशल्य चाचणीद्वारे प्रवेश दिला जातो. निवडलेल्या खेळाडूंना १४ खेळांचे आठ ते १० वर्षांचे प्रशिक्षण दिले जाते. क्रीडापीठाच्या अखत्यारीत नऊ क्रीडा प्रबोधिनी आहेत. माहे डिसेंबर २०२२ पर्यंत या प्रबोधिनीतील ३० विद्यार्थ्यांना राज्याच्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून ८१ खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये देशाचे प्रतिनिधित्व केले आहे. क्रीडापीठाच्या विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पदकांची संख्या तक्ता १०.९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९ क्रीडापीठाच्या विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेल्या पदकांची संख्या**

| वर्ष | एकूण प्रशिक्षणार्थी | पदक | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | आंतरराष्ट्रीय स्तर | | | | राष्ट्रीय स्तर | | | | राज्य स्तर | | | |
| | | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण | सुवर्ण | रजत | कांस्य | एकूण |
| २०१८-१९ | ५४५ | १ | ३ | ३ | ७ | ३८ | ३८ | ३२ | १०८ | १४८ | १०३ | ८२ | ३३३ |
| २०१९-२० | ५४५ | २ | १ | १ | ४ | २२ | २५ | ३३ | ८० | १५२ | ८३ | ६९ | ३०४ |
| २०२०-२१ | ४०८ | - | - | - | - | न | - | - | - | - | - | - | - |
| २०२१-२२ | ४८४ | ० | ० | १ | १ | ३ | ६ | ७ | १६ | ५२ | १९ | २५ | ९६ |
| २०२२-२३+ | ६०६ | १ | ० | १ | २ | १४ | १३ | ३९ | ६६ | ११९ | ३६ | ४३ | १९८ |

टीप: कोविड-१९ साथीच्या आजारामुळे २०२०-२१ मध्ये राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करणे शक्य झाले नाही. + डिसेंबर पर्यंत

*आधार:* क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण

१०.१६ अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल, २०२०-२१ नुसार राज्यात ४२ राज्य विद्यापीठे (२३ सार्वजनिक, १८ खाजगी व एक मुक्त), २१ अभिमत विद्यापीठे (१२ खाजगी, नऊ शासकीय), सात राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था आणि एक केंद्रीय विद्यापीठ आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालावर आधारित राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी तक्ता १०.१० मध्ये दिली आहे. सन २०२२-२३ च्या अभ्यासक्रमाकरिता संस्थांची संख्या, त्यांची प्रवेश क्षमता आणि प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या परिशिष्ट १०.२ ते परिशिष्ट १०.५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१० अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवालावर आधारित राज्यातील उच्च शिक्षणाची सांख्यिकी**

(३० सप्टेंबर रोजी)

| तपशील | २०१९-२० | २०२०-२१ |
|---|---|---|
| विद्यापीठे (संख्या) | ६५ | ७१ |
| महाविद्यालये (संख्या) | ४,४९४ | ४,५३२ |
| स्वायत्त संस्था (संख्या) | २,३९३ | २,१५३ |
| उच्च शिक्षणातील पटसंख्या | | |
| अ) सर्व संस्था (लाख) | ४२.६५ | ४५.४६ |
| ब) स्त्रियांची टक्केवारी | ४५.७५ | ४५.१९ |
| विद्यापीठातील व इतर संस्थांतील पटसंख्या | | |
| अ) सर्व संस्था (लाख) | ९.६६ | १०.८८ |
| ब) स्त्रियांची टक्केवारी | ३९.४१ | ४१.८३ |
| एकूण पटसंख्या प्रमाण (१८ ते २३ वर्ष) | | |
| अ) सर्व प्रवर्ग | ३२.३ | ३४.९ |
| ब) अनुसूचित जाती | ३०.७ | ३३.९ |
| क) अनुसूचित जमाती | १५.४ | १६.५ |
| स्त्री पुरुष असमानता निर्देशांक (१८ ते २३ वर्ष) | | |
| अ) सर्व प्रवर्ग | ०.९३ | ०.९२ |
| ब) अनुसूचित जाती | १.०२ | ०.९६ |
| क) अनुसूचित जमाती | ०.७८ | ०.७८ |
| सर्व संस्थातील शिक्षकांची संख्या (लाख) | १.६३ | १.६३ |
| सर्व संस्थातील विद्यार्थी-शिक्षक प्रमाण | २६ | २७ |

*आधार* : अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल २०२०-२१, केंद्र शासन

## स्व-वित्त सहाय्यित विद्यापीठे

१०.१७ केंद्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या आर्थिक सुधारणांमुळे उच्च शिक्षणाशी संबंधित धोरणात बदल करण्यात आले आणि पायाभूत सुविधांच्या विकासाकरिता खाजगी क्षेत्राचा सहभाग घेण्यास प्रवृत्त केले आहे. त्यानुसार, शासनाने राज्यात सर्वोत्कृष्ट दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करून उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात प्रवेश, उत्कृष्टता, समावेशकता आणि संशोधन वाढविण्यासाठी खाजगी सहभागास प्रोत्साहन दिले आहे. अखिल भारतीय उच्च शिक्षण पाहणी अहवाल, २०२०-२१ नुसार राज्यातील १८ कार्यरत स्व-वित्त सहाय्यित विद्यापीठांमधील एकूण पटसंख्या ५२,०३२ इतकी असून त्यापैकी २१,५४३ विद्यार्थिनी आहेत.

## राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान

१०.१८ अधिक संधी उपलब्धता, समानता आणि उच्चतम गुणवत्ता साध्य करण्यासाठी उच्च शिक्षण प्रणाली मध्ये अधिक कार्यक्षमता, पारदर्शकता आणि उत्तरदायित्व व प्रतिसाद या उद्देशाने राष्ट्रीय उच्चत्तर शिक्षा अभियान सन २०१३ पासून राबविण्यात येत आहे. माहे नोव्हेंबर २०२२ पर्यंत, एकूण ₹ ४०४.१० कोटी खर्च झाला. गुणवत्ता आणि उत्कृष्टता वाढविण्याच्या घटकांतर्गत, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला ₹ १०० कोटी आणि २५ स्वायत्त महाविद्यालयांना प्रत्येकी ₹ पाच कोटींचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. तंत्रज्ञानाच्या विकास आणि हस्तांतरणासाठी सहा राज्य विद्यापीठांमध्ये संशोधन आणि नाविन्यपूर्ण घटकांतर्गत सहा केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. अभियाना अंतर्गत मुंबई येथे डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठ व हैद्राबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ आणि सातारा येथे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील क्लस्टर विद्यापीठ ही समूह विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत. वाशिम व नंदूरबार जिल्हयांमध्ये आदर्श पदवी महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत.

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

१०.१९ आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ₹ आठ लाखांपर्यंत) विद्यार्थ्यांसाठी राज्यात राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रगती तक्ता १०.११ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.११ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेची प्रगती**

| माध्यम | वर्ष | लाभार्थ्यांची संख्या | खर्च (₹ कोटी)+ |
|---|---|---|---|
| उच्च शिक्षण (३४३ अभ्यासक्रम) | २०२०-२१ | १,६७,६४६ | १०३.२० |
| | २०२१-२२ | १,६४,६०३ | ११०.३७ |
| | २०२२-२३ | उ ना | उ ना |
| तंत्र शिक्षण (२८२ अभ्यासक्रम) | २०२०-२१ | २,१३,०३८ | ७५४.८९ |
| | २०२१-२२ | २,२६,५९७ | ८४१.२२ |
| | २०२२-२३ | ३०,००० | ६३.९९ |
| वैद्यकिय शिक्षण व संशोधन (८ अभ्यासक्रम) | २०२०-२१ | १५,८७३ | १४८.९० |
| | २०२१-२२ | ८,५९० | ४२.८९ |
| | २०२२-२३ | उ ना | उ ना |
| कृषि (३० अभ्यासक्रम) | २०२०-२१ | १०,३२९ | १३.३४ |
| | २०२१-२२ | १७,८९० | २९.७५ |
| | २०२२-२३ | १२,६१८ | १७.१५ |
| पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय (६ अभ्यासक्रम) | २०२०-२१ | ३४८ | ०.७५ |
| | २०२१-२२ | ३३७ | ०.८३ |
| | २०२२-२३ | उ ना | उ ना |

टीप :- उ ना - उपलब्ध नाही + जानेवारी पर्यंत

*आधार:* १) उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन २) उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन
३) वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय, महाराष्ट्र शासन ४) महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषद
५) महाराष्ट्र पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० च्या अंमलबजावणीसाठी राज्याने केलेली कार्यवाही

१०.२० राज्याकडून अंमलबजावणीसाठी खालील कार्यवाही करण्यात येत आहे.

- दि.२० ऑक्टोंबर २०२२ रोजी राष्ट्रीय शिक्षण मंत्रालय, केंद्र शासन यांनी निर्गमित केलेल्या 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा' प्रमाणे पायाभूत स्तरासाठीचा राज्य अभ्यासक्रम आराखडा विकसनाचे कामकाज सुरु
- पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांची शाळापूर्व तयारी करुन घेण्यासाठी 'पहिले पाऊल' अंतर्गत दोन मेळावे घेण्यात आले. (यामध्ये राज्यातील १३.३५ लाख विद्यार्थी व ०.६५ लाख शाळांनी सहभाग घेतला)
- निपूण भारत अभियानाचा इयत्ता पहिल्याच्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणणे आणि पालकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याच्या दृष्टीने सुमारे ०.६४ लाख शाळांना याचा फायदा झाला आहे
- निपूण भारत अभियाना अंतर्गत इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी पायाभूत संख्याज्ञान व अध्ययन निष्पत्ती विकसनसाठी "करुया मैत्री गणिताशी" या कार्यपुस्तिकांची मराठी, उर्दू, इंग्रजी, हिंदी, गुजराती, तामिळ, तेलगु, कन्नड या ८ माध्यमांमध्ये निर्मिती (याचा शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थेतील ४०.०० लाख विद्यार्थ्यांना व ०.६४ लाख शाळांना लाभ)
- विद्या प्रवेश उपक्रमांतर्गत शिक्षकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका व विद्यार्थ्यांसाठी कार्यपुस्तिका विकसित (याचा ७.१३ लाख विद्यार्थी व ०.६२ लाख शिक्षकांना लाभ)
- अभियांत्रिकी शिक्षणामध्ये मराठी भाषेचा वापर सुरु करण्याच्या अनुषंगाने पदविका अभ्यासक्रमाची मराठी भाषेतील २० पुस्तके संस्थांना उपलब्ध
- १६३ तंत्रशिक्षण महाविद्यालयांमध्ये मराठीतून पदविका अभ्यासक्रम
- पदवी अभ्यासक्रमातील ८८ पुस्तकांचे मराठीकरण करण्याचे काम सुरु

# सार्वजनिक आरोग्य

१०.२१ रोगास प्रतिबंध करणे, आयुष्यमान वाढवणे आणि लोकांचे आरोग्य व कार्यक्षमता वाढवणे अशा आरोग्याशी संबंधित सर्व संघटित उपक्रमांचे एकत्रीकरण सार्वजनिक आरोग्य प्रणाली मध्ये आहे. सार्वजनिक आरोग्य सेवांचा उद्देश जनतेला विश्वासार्ह, जबाबदार, पुरेशी, गुणात्मक, प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सेवा प्रदान करणे आहे. ग्रामीण आणि शहरी भागात उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, सामुदायिक आरोग्य केंद्रे आणि शासकीय रुग्णालये यांसह अनेक यंत्रणा उभारल्या आहेत. सुलभ आणि किफायतशीर आरोग्य सेवा पुरवण्यासाठी शासन विविध आरोग्यविषयक सेवा योजना व कार्यक्रमांची आखणी करुन अमलबजावणी करत आहे. शाश्वत विकास ध्येय-३ 'सर्व वयोगटातील लोकांसाठी उत्तम आरोग्याची सुनिश्चिती करणे आणि चांगल्या जीवनमानास चालना देणे' अंतर्गत निश्चित केलेली काही उद्दीष्टे राज्याने आधीच साध्य केली आहेत आणि आरोग्यविषयक निर्देशकांत सातत्य राखणे व ते सुधारणे यासाठी शासनाकडून सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. आरोग्य सेवांचे प्रभावी आणि एकात्मिक व्यवस्थापन शासनाला कोणत्याही महामारी किंवा साथीच्या रोगाचा सामना करताना उपयुक्त ठरत आहे.

# सार्वजनिक आरोग्य सुविधा

१०.२२ सर्वसमावेशक आरोग्यसेवा पुरविण्यासाठी राज्यात त्रिस्तरीय पायाभूत आरोग्य सुविधा आहेत. उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे व सामूहिक आरोग्य केंद्रे यांचा प्राथमिक स्तरामध्ये समावेश होतो. द्वितीय स्तरामध्ये उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालये यांचा समावेश होतो तर तृतीय स्तरामध्ये वैद्यकीय महाविद्यालयांशी संलग्न असलेली सुसज्ज रुग्णालये व सुपर स्पेशालिटी रुग्णालयांचा समावेश होतो. राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा तक्ता १०.१२ मध्ये, राज्यातील उपलब्ध वैद्यकीय सुविधा (सार्वजनिक, स्थानिक संस्था आणि विश्वस्त संस्था रुग्णालये) यांची तपशीलवार मालिका परिशिष्ट १०.६ आणि जिल्हानिहाय उपलब्ध वैद्यकीय सुविधांची माहिती परिशिष्ट १०.७ मध्ये दिली आहे.

**१०.१२ राज्य शासनाच्या आरोग्य सुविधा**

(दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी)

| संस्थेचा प्रकार | संख्या |
|---|---|
| उपकेंद्र | १०,७४० |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | १,९०६ |
| सामूहिक आरोग्य केंद्र | ३६३ |
| प्राथमिक आरोग्य पथक | १०८ |
| फिरती वैद्यकीय पथक | ५८ |
| उपजिल्हा रुग्णालय | ९५ |
| जिल्हा रुग्णालय | २२ |
| वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न रुग्णालय | २५ |
| वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न प्राथमिक आरोग्य केंद्र | ५ |
| सामान्य रुग्णालय | ८ |
| स्त्री रुग्णालय | २० |
| मनोरुग्णालय | ४ |
| कुष्ठरोग रुग्णालय | ३ |
| क्षयरोग रुग्णालय | ५ |
| अस्थिव्यंग रुग्णालय | १ |
| विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय | २ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.२३ उपकेंद्र स्तरावर आरोग्यसुविधा देण्याबरोबरच माता व बाल आरोग्यनिगा, कुटुंब कल्याण, पोषण, लसीकरण, अतिसार आणि संसर्गजन्य आजार नियंत्रण याबाबत समुपदेशन केले जाते. आदिवासी क्षेत्रामध्ये ३,००० लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र तर बिगर आदिवासी ग्रामीण क्षेत्रामध्ये ५,००० लोकसंख्येसाठी एक उपकेंद्र स्थापित करावे असा शासकीय निकष आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात बाह्यरुग्ण विभाग, सहा खाटांचा आंतररुग्ण विभाग, आपत्कालीन सेवा, शस्त्रक्रिया, प्रयोगशाळा व औषधे या सुविधा उपलब्ध असून कुटुंबनियोजन सेवा व उपकेंद्राने संदर्भित केलेल्या रुग्णांवर उपचार केले जातात. आदिवासी क्षेत्रातील २०,००० लोकसंख्येकरिता तर बिगर आदिवासी ग्रामीण क्षेत्रामध्ये ३०,००० लोकसंख्येकरिता एक प्राथमिक आरोग्य केंद्र स्थापित करावे असा शासकीय निकष आहे. त्याचप्रमाणे ८०,००० ते १.२० लाख लोकसंख्येचा समावेश असलेल्या चार ते पाच प्राथमिक आरोग्य केंद्रांसाठी संदर्भ सेवा केंद्र म्हणून एक सामूहिक आरोग्य केंद्र स्थापित केले जाते. सामूहिक आरोग्य केंद्रे, उप जिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमार्फत अहोरात्र आपत्कालीन आरोग्य सेवा उपलब्ध आहेत.

# प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान

१०.२४ प्राथमिक, द्वितिय आणि तृतीय स्तरावर सार्वजनिक आरोग्य सेवांच्या सुसज्जतेची गरज पूर्ण व्हावी यासाठी ऑक्टोबर, २०२१ मध्ये केंद्र शासनाने 'प्रधानमंत्री आयुष्मान भारत आरोग्य पायाभूत सुविधा अभियान' सुरू केले. सार्वत्रिक सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करण्यासाठी तळागाळातील सार्वजनिक आरोग्य संस्थांचे बळकटीकरण, माहिती तंत्रज्ञान सहाय्यित रोग देखरेख यंत्रणांचा विस्तार आणि उभारणी करणे तसेच कोविड-१९ व इतर संसर्गजन्य रोगांवरील संशोधन कार्याला पाठिंबा देणे ही या अभियानाची मुख्य उद्दिष्टे आहेत. अभियानअंतर्गत काही घटक खालीलप्रमाणे आहेत.

- सध्या अस्तित्वात असलेल्या उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रे यांचे आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रूपांतर करण्याकरिता सुविधा विकसित करण्यासाठी सहाय्य
- सर्व जिल्ह्यांमध्ये एकात्मिक सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांची स्थापना करणे
- राज्य शासकीय वैद्यकीय महाविद्यालये / जिल्हा रुग्णालयांमध्ये अत्यावश्सक सेवा इस्पितळ ब्लॉक्स तयार करणे

१०.२४.१ आरोग्यवर्धिनी केंद्रे विस्तारित श्रेणीच्या सर्वसमावेशक प्राथमिक आरोग्य सेवा सार्वत्रिक उपलब्धता पुरवतात. सन २०२२ पर्यंत सर्व उपकेंद्रे व प्राथमिक आरोग्य केंद्रांचे टप्प्याटप्प्याने आरोग्यवर्धिनी केंद्रांमध्ये रूपांतर करण्यासाठी राज्य कटिबद्ध आहे. सन २०२१-२२ मध्ये नाशिक, नांदेड, अमरावती आणि रत्नागिरी येथील जिल्हा रुग्णालयांमध्ये चार सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळांना मंजुरी देण्यात आली. तसेच सन २०२१-२२ मध्ये नाशिकमधील जिल्हा रुग्णालयांत १०० खाटांचे एक अत्यावश्सक सेवा इस्पितळ ब्लॉक आणि जालना जिल्हा रुग्णालय तसेच लातूर व चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांत प्रत्येकी ५० खाटांचे तीन अत्यावश्सक सेवा इस्पितळ ब्लॉक्स मंजूर झाले.

१०.२५ राज्यातील ॲलोपॅथी वैद्यकीय पदवी धारकांना (डॉक्टर) महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांचेकडे नोंदणी व दर पाच वर्षांनी परवाना नूतनीकरण करावे लागते. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण १,८०,४१४ (त्यापैकी ८६,२९० पदव्युत्तर) ॲलोपॅथीक डॉक्टरांनी नोंदणी केली होती तर मागील पाच वर्षात ८४,१५४ डॉक्टरांनी त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण केले आहे. आरोग्य सुविधांचा विस्तार करण्यासाठी आणि ग्रामीण तसेच निम-शहरी भागात डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी, राज्यात सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर अति विशेषोपचार सुविधांसह नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यात येत आहेत.

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

१०.२६ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान आणि राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांचा समावेश असलेल्या राष्ट्रीय आरोग्य अभियानाचा उद्देश आरोग्य यंत्रणांचे तसेच संस्था व मानवी संसाधन क्षमतेचे सक्षमीकरण करून सर्वसमावेशक आरोग्यसेवा उपलब्ध करुन देणे आहे. ग्रामीण व नागरी भागातील आरोग्य सुविधांचे बळकटीकरण करणे, संसर्गजन्य व असंसर्गजन्य रोगांचे नियंत्रण करणे आणि प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके व किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम राबविणे हे या अभियानाचे प्रमुख घटक आहेत. स्वच्छता व आरोग्यनिगा, पोषण आणि सुरक्षित पेयजल यासारख्या आरोग्याशी निगडीत सेवांच्या परिणामकारक एकत्रिकरणावर राष्ट्रीय आरोग्य अभियानात भर दिला आहे.

### राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान

१०.२६.१ ग्रामीण जनतेस विशेषत: महिला, मुले व वंचित घटकांना किफायतशीर, सुलभ व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करुन देऊन त्यांच्या आरोग्य विषयक भागविण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान माहे एप्रिल, २००५ मध्ये सुरु करण्यात आले.

१०.२६.१.१ राज्यातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील जनतेसाठी आरोग्यविषयक सुविधा पुरविण्याकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत २० फिरती वैद्यकीय पथके कार्यरत आहेत. स्वयंसेवी संस्था/रुग्ण कल्याण समिती या बाह्यस्थ संस्थांमार्फत या पथकांद्वारे आरोग्यसेवा पुरविण्यात येतात. प्रत्येक फिरत्या वैद्यकीय पथकात एक डॉक्टर, परिचारिका, रेडीओलॉजिस्ट, प्रयोगशाळा सहायक, फार्मासिस्ट, मदतनीस व चालक यांचा समावेश असतो.

१०.२६.१.२ टेलिमेडीसीन सुविधा २३ जिल्हा रुग्णालये, ३९ उपजिल्हा रुग्णालये/सामूहिक आरोग्य केंद्रे व सहा वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उपलब्ध आहे. या कार्यक्रमांतर्गत विशेषज्ञांसह एकूण १३,२०० वैद्यकीय अधिकारी (९,४८४ नियमित संवर्गावरील व ३,७१६ कंत्राटी) ग्रामीण जनतेला आरोग्य सेवा पुरवित आहेत. अभियानअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ६०,९१८ आशा स्वयंसेविकांची नियुक्ती केली आहे. सिकल सेल रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या २१ जिल्ह्यांमध्ये सिकल सेल रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

१०.२६.१.३ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ₹ २,१७६.२० कोटी तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २२०५.८१ कोटी खर्च झाला. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत भौतिक प्रगती तक्ता १०.१३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१३ राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत भौतिक प्रगती**

(संख्या)

| घटक | तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|---|
| आयुष | उपचार घेतलेले रुग्ण | | | |
| | बाह्यरुग्ण विभाग | २३,६०,५६९ | २८,८७,१८९ | २७,२६,८६१ |
| | आंतररुग्ण विभाग | १,११,८३२ | ९१,३८२ | ६०,०५५ |
| फिरते वैद्यकीय पथक | उपचार घेतलेले रुग्ण | १४,५७,७६६ | २०,८१,२७९ | ५,११,०२८ |
| | प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम | २,१४,०६३ | ३,६५,४७९ | १,१२,९५९ |
| | प्रयोगशाळा तपासणी | ७,७२,४५३ | ११,११,७९६ | १,९६,०१८ |
| | भेटी दिलेली गावे | १९,६५१ | ३०,९१२ | ८,९७२ |
| टेलिमेडीसीन | संदर्भित केलेले व तज्ञ सल्ला मिळालेले रुग्ण | १२,७८६ | १५,६६५ | १७,९७० |
| सिकल सेल आजार नियंत्रण कार्यक्रम | एकूण तपासण्या | ६,९७,९८६ | ९,५३,९९० | ६,८५,११६ |
| | बाधित रुग्ण | ३७७ | ९३३ | १,३८४ |
| | वाहक | ६,८१५ | १०,२३७ | १०,८६५ |
| उपशमन निगा (पॅलिॲटिव्ह केअर) | उपचार घेतलेले रुग्ण | ३,९४७ | ३६,८२० | २२,९४३ |
| संदर्भ सेवा वाहतूक सुविधा | गर्भवती महिला | | | |
| | रुग्णालयीन प्रसुती | ३,१५,९५५ | ५,०९,८४७ | ४,१३,२६९ |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ४,३९,७८० | ४,४५,०२६ | ३,४६,८१२ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | १,७१,५४३ | १,६०,०६१ | १,३०,२८० |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ४,६६,५६९ | ४,७७,७७० | ३,७१,६११ |
| | आजारी नवजात शिशु | | | |
| | निवासस्थान ते रुग्णालय | ६७,३७९ | ७६,६९५ | ६१,१७८ |
| | रुग्णालय ते रुग्णालय | ३०,०५९ | ३०,०१८ | २१,१७२ |
| | रुग्णालय ते निवासस्थान | ८०,१६५ | ९०,८०२ | ७१,३५२ |
| सार्वजनिक खाजगी भागिदारी | | | | |
| अ) आरोग्य सल्ला संपर्क केंद्र | एकूण कॉल्स | ५,२६,४६८ | ६,७३,४९८ | ६,८५,११६ |
| ब) अपस्मार कार्यक्रम | आयोजित शिबिरे | १ | ४ | ६ |
| | उपचार घेतलेले रुग्ण | ८८ | ५०६ | १,५५१ |
| | शिबिरे (ई. ई. जी. सुविधा असलेली ) | २५ | १२० | २१४ |
| | ऑक्युपेशन थेरपी/ फिजीओथेरपी /स्पिच थेरपी घेतलेले | २३ | २५४ | ४५७ |
| क) वैद्यकीय व दंत शिबिरे | आयोजित शिबिरे | ३१ | ६४ | ४१ |
| | उपचार केलेले रुग्ण | ३२,५८२ | ९६,६८६ | ६,४१४ |
| | केलेल्या शस्त्रक्रिया | २,१५९ | ६,१३२ | २,८५६ |
| ड) माहेरघर | लाभार्थी माता | १,४६१ | २,१९० | १,७७८ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन ई.ई.जी. इलेक्ट्रो इन्सेफेलो ग्राम + डिसेंबर पर्यंत

## राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान

१०.२६.२ नागरी भागातील जनतेच्या प्रामुख्याने ५०,००० पेक्षा जास्त लोकसंख्या असणारी शहरे/नगरे यातील झोपडपट्टया व इतर सीमांतीक घटकांच्या आरोग्य विषयक भागविण्यासाठी सन २०१३ पासून राज्यात राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील ९५ शहरांचा राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाअंतर्गत समावेश आहे.

१०.२६.२.१ राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानअंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण ६८६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १० फिरती वैद्यकीय पथके कार्यरत असून ८,६८० आशा स्वयंसेविकांची नेमणूक केली आहे. सुमारे १०,००० लोकसंख्या असलेल्या व प्राथमिक आरोग्य केंद्रे नसलेल्या झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी १० महानगरपालिका क्षेत्रात 'आपला दवाखाना' नावाने १०० चिकित्सालये मंजूर केली आहेत. या अभियानअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ₹ २६३.८३ कोटी खर्च झाले तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २३३.७३ कोटी खर्च झाले.

## प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम

१०.२६.३ बालकांच्या आरोग्याचा दर्जा उंचावून व लोकसंख्या स्थिर ठेवून त्याद्वारे माता मृत्यूप्रमाण, अर्भक मृत्यूदर व एकूण जननदर कमी करण्यासाठी प्रजनन, माता, नवजात शिशु, बालके आणि किशोरवयातील मुलामुलींचे आरोग्य कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत सन २०२१-२२ मध्ये ₹ ३२२.३४ कोटी तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ २८८.४८ कोटी खर्च झाला. निवडक आरोग्य निर्देशक तक्ता १०.१४ मध्ये व राज्याचे नमुना नोंदणी पाहणीवर आधारित जन्मदर, मृत्यूदर, अर्भक मृत्यूदर व एकूण जननदर यांची मालिका परिशिष्ट १०.८ मध्ये दिली आहे.

**आलेख १०.१ : निवडक आरोग्यविषयक निर्देशक**




**तक्ता १०.१४ निवडक आरोग्य निर्देशक**

| निर्देशक | २०१८ | २०१९ | २०२० |
|---|---|---|---|
| अर्भक मृत्यूदर | १९ | १७ | १६ |
| नवजात शिशु मृत्यूदर | १३ | १३ | ११ |
| पाच वर्षा खालील बालकांचा मृत्यूदर | २२ | २१ | १८ |
| एकूण जननदर | १.७ | १.६ | १.५ |
| | (२०१६-१८) | (२०१७-१९) | (२०१८-२०) |
| माता मृत्यूप्रमाण | ४६ | ३८ | ३३ |

*आधार* : नमुना नोंदणी पद्धती, भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## जननी सुरक्षा योजना

१०.२६.४ संस्थात्मक प्रसुतीस चालना देण्यासाठी आणि दारिद्र्य रेषेखालील, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या कुटुंबातील बालमृत्यू व माता मृत्यू कमी करण्याकरीता जननी सुरक्षा योजना राबविण्यात येत आहे. सर्व प्रसुती कुशल प्रसुती सेवकांमार्फत करुन त्याद्वारे माता मृत्यू कमी करणे हे या योजनेचे ध्येय आहे. संस्थेमध्ये प्रसुती झाल्यानंतर सात दिवसांच्या आत लाभार्थ्याला ग्रामीण भागात ₹ ७०० व नागरी भागात ₹ ६०० दिले जातात. कुशल प्रसुती सेवकांच्या मदतीने घरी प्रसुत होणाऱ्या ग्रामीण व नागरी भागातील लाभार्थ्यास ₹ ५०० दिले जातात. सिझेरियन शस्त्रक्रियेद्वारे प्रसुती झालेल्या लाभार्थ्यास झालेल्या खर्चाच्या प्रतिपूर्तीपोटी ₹ १,५०० पर्यंत रक्कम दिली जाते. जननी सुरक्षा योजनेची प्रगती तक्ता १०.१५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१५ जननी सुरक्षा योजनेची प्रगती**

| वर्ष | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२०-२१ | २.५१ | ४३.११ |
| २०२१-२२ | २.०८ | १९.८७ |
| २०२२-२३⁺ | ३.४८ | ३७.१४ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान

१०.२६.५ गर्भवती महिलांना प्रत्येक महिन्याच्या ठराविक दिवशी खात्रीशीर आणि गुणवत्तापूर्ण प्रसुतीपूर्व सेवा मिळावी या उद्देशाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची सुरुवात केली. रोगनिदान चाचण्या, सोनोग्राफी तपासणी, प्रसुतीतज्ञाकडून शारीरिक व उदर तपासणी, अति जोखमीच्या गरोदरपणाचे वेळेवर निदान आणि तत्पर संदर्भसेवा हे या अभियानाचे महत्वाचे घटक आहेत. दर महिन्याच्या नऊ तारखेला या सेवा आरोग्यसुविधा केंद्रात लाभार्थ्यांना मोफत दिल्या जातात. नऊ तारखेला रविवार किंवा सार्वजनिक सुट्टी असेल तर पुढील कामकाजाच्या दिवशी या सेवा पुरविल्या जातात. नियमित प्रसुतीपूर्व सेवांव्यतिरिक्त या सेवा दिल्या जातात. प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची प्रगती तक्ता १०.१६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१६ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियानाची प्रगती**

| वर्ष | प्रसुतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | दुसऱ्या व तिसऱ्या तिमाहीत पहिल्यांदा प्रसुतीपूर्व सेवा मिळालेल्या गर्भवती महिलांची संख्या (लाख) | अति जोखमीच्या गरोदरपणाचे निदान झालेल्या महिलांची संख्या (लाख) | खर्च (₹ लाख) |
|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | ०.७२ | ०.३१ | ०.०९ | ११.९७ |
| २०२१-२२ | ३.०१ | १.४७ | ०.३२ | २२.७४ |
| २०२२-२३+ | २.१० | ०.९८ | ०.३० | २.२२ |

*आधार*: राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## प्रधानमंत्री मातृ वंदना योजना

१०.२६.६ देशात, बहुसंख्य गर्भवती स्त्रिया त्यांच्या गरोदरपणाच्या शेवटच्या दिवसांपर्यंत काम करत असतात. शिवाय, त्या काम करण्यास शारीरिकदृष्ट्या सक्षम नसल्या तरीही बाळाच्या जन्मानंतर लवकरच त्यांच्या कामावर परत येतात. अशा प्रकारच्या कुपोषित गर्भवती महिलांच्या पोटी जन्मलेल्या बालकांच्या आणि स्तनदा मातांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. माता व बालकांचे आरोग्य सुधारण्यासाठी पोषण आहाराच्या महत्त्वास चालना देण्यासाठी राज्यात 'प्रधानमंत्री मातृ वंदना योजना १ जानेवारी, २०१७' पासून राबविण्यात येत आहे. योजनेअंतर्गत, शासकीय आरोग्यसुविधा केंद्रात नोंदणी झालेल्या गर्भवती महिलांना फक्त पहिल्या जिवंत मुलासाठी थेट लाभ हस्तांतरण स्वरूपात ₹ ५,००० रोख दिले जातात. प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची प्रगती तक्ता १०.१७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१७ प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेची प्रगती**

| वर्ष | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२०-२१ | ५.२२ | २६३.९१ |
| २०२१-२२ | ६.०१ | २४८.४३ |
| २०२२-२३+ | ४.१७ | १३६.९४ |

*आधार*: राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## नवसंजीवनी योजना

१०.२६.७ राज्यामध्ये १६ जिल्ह्यांतील ८,४१९ गावांच्या आदिवासी भागात नवसंजीवनी योजना राबविण्यात येत आहे. आदिवासी लोकांच्या आरोग्याची स्थिती सुधारून त्यांचे उत्पादक जीवन वाढवणे आणि आदिवासी भागातील माता मृत्यू आणि अर्भक मृत्यू कमी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या योजनेमध्ये आरोग्य सेवेची उपलब्धता, शुद्ध पाणीपुरवठा, पोषक आहाराकरिता पुरेसा अन्नधान्य पुरवठा आणि बालकांवर योग्य व वेळेवर उपचार याची सुनिश्चिती केली जाते. या योजने अंतर्गत फिरत्या वैद्यकीय पथकांच्या भेटी, दाई बैठका, मान्सूनपूर्व प्रतिबंधात्मक उपाय, तीव्र कमी वजनाची आणि मध्यम तीव्र कमी वजनाच्या बालकांसाठी आहाराची तरतूद आणि पालकांच्या बुडित मजुरीपोटी नुकसान भरपाई, इत्यादी विविध उपक्रम राबविण्यात येतात.

१०.२६.७.१ योजने अंतर्गत, प्रत्येकी एक वैद्यकीय अधिकारी सोबत एक पॅरामेडिकल स्टाफ आणि एक वाहन असलेली २८१ फिरती वैद्यकीय पथके तयार करण्यात आली आहेत. ही पथके प्रत्येक आदिवासी गाव व पाड्यास भेट देऊन कुपोषित व आजारी बालकांचे निदान करून त्यांच्या घरी आरोग्य सेवा उपलब्ध करुन देतात. आवश्यकतेनुसार बालकांना जवळच्या आरोग्य केंद्रात दाखल केले जाते. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत २५९ पथके कार्यरत असून ६६,५४६ गर्भवती महिला तसेच ६.५७ लाख बालके यांची तपासणी करण्यात आली व ₹ ११०.९८ लाख खर्च झाला.

१०.२६.७.२ गर्भवती महिला व नवजात बालकांची १०० टक्के नोंदणी तसेच अति जोखमीचे गरोदरपण, कुपोषित व आजारी अर्भकांचे निदान करण्यासाठी दाईंचा ज्ञानस्तर सुधारण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर नियमित दाई बैठका आयोजित करण्यात येतात. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत, ३,३७६ दाई बैठका आयोजित करण्यात आल्या असून त्यामध्ये १५,४४४ दाईंनी सहभाग घेतला.

## मातृत्व अनुदान योजना

१०.२६.७.३ मातृत्व अनुदान योजना ही नवसंजीवनी योजनेअंतर्गत राबविण्यात येत असून यामध्ये आदिवासी भागातील गर्भवती महिलांची प्रसुतीपूर्व नोंदणी, नियमित आरोग्य तपासणी व आवश्यक औषधे पुरविणे यासारख्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात. या योजनेअंतर्गत प्रसुतीपूर्व तपासणीकरीता वैद्यकीय केंद्रात जाण्यासाठी ₹ ४०० रोख देण्यात येतात व ₹ ४०० ची औषधे मोफत पुरविण्यात येतात. मातृत्व अनुदान योजनेची प्रगती तक्ता १०.१८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१८ मातृत्व अनुदान योजनेची प्रगती**

| वर्ष | लाभार्थी संख्या | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२०-२१ | ५५,३२१ | ३.१२ |
| २०२१-२२ | ६३,४८२ | ३.९० |
| २०२२-२३+ | १७,७६५ | १.०२ |

*आधार*: राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम

१०.२६.८ क्षयरोग, घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात, पोलिओ, हिमोफिलस इन्फ्लुएंझा टाईप बी, काविळ-बी, गोवर, इत्यादी आजारांमुळे गर्भवती महिला, अर्भके व विविध वयोगटातील बालके यांच्या होणाऱ्या मृत्यूचे, रोगग्रस्ततेचे व अपंगत्वाचे प्रमाण कमी करण्यासाठी लसीकरण सेवा पुरविण्याच्या उद्देशाने राज्यामध्ये सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या तक्ता १०.१९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१९ सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमअंतर्गत लाभार्थ्यांची संख्या**

(लाख)

| लस | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य | लक्ष्य | साध्य |
| बीसीजी | १९.३२ | १८.४५ | १९.३२ | १८.४५ | १९.२७ | १५.४८ |
| पोलिओ ० | १९.३२ | १६.४० | १९.३२ | १७.६७ | १९.२७ | १४.०१ |
| पोलिओ III | १९.३२ | १८.९९ | १९.३२ | १८.९९ | १९.२७ | १४.७३ |
| काविळ बी - ० | १९.३२ | ११.५० | १९.३२ | ११.५० | १९.२७ | १०.९८ |
| गोवर व रुबेला | १९.३२ | १८.७६ | १९.३२ | १८.७६ | १९.२७ | १५.३४ |
| घटसर्प, डांग्या खोकला, धनुर्वात (डीपीटी) - बुस्टर | १८.९४ | १७.७६ | १८.९४ | १८.०९ | १८.९४ | १४.१० |
| एफआयपीवी I | १९.३२ | १८.२५ | १९.३२ | १८.८३ | १९.२७ | १४.६४ |
| एफआयपीवी II | १९.३२ | १८.३५ | १९.३२ | १८.५३ | १९.२७ | १४.४९ |
| एफआयपीवी III@ | उ ना | उ ना | उ ना | उ ना | उ ना | ०.०२ |
| पीसीवी I | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १९.२७ | १२.२९ |
| पीसीवी II | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १९.२७ | ११.९३ |
| पीसीवी (बुस्टर) | उ ना | उ ना | उ ना | उ ना | १९.२७ | १०.४४ |
| पोलिओ (बुस्टर) | १८.९४ | १७.७४ | १८.९४ | १८.०८ | १८.९४ | १४.११ |
| डीपीटी (बुस्टर I) | १८.९४ | १७.७६ | १८.९४ | १८.०९ | १८.९४ | १४.१० |
| टिडी (१० वर्षे) | २६.०८ | १२.१४ | २६.०८ | १५.४१ | २१.९६ | १३.०७ |
| टिडी (१६ वर्षे) | २३.५९ | ११.८८ | २३.५९ | १४.४५ | २३.७५ | १२.५८ |
| टिडी (गर्भवती महिला) | २१.२६ | १९.१७ | २१.२६ | २०.९२ | २१.२० | १५.४६ |
| पेंटावॅलेन्ट ३ | १९.३२ | १९.०२ | १९.३२ | १९.०२ | १९.२७ | १४.६९ |
| रोटा व्हायरस ३ | १९.३२ | १८.५४ | १९.३२ | १८.५४ | १९.२७ | १४.६१ |
| मेंदुज्वर | २.९९ | २.६३ | २.९२ | २.७९ | ४.४५ | ३.३५ |
| डीपीटी (५ वर्षे) | १८.९४ | १३.६० | १८.९६ | १५.७४ | १८.९४ | १३.२२ |

उ ना - उपलब्ध नाही + डिसेंबरपर्यंत

फ़आयपीवी- फ्रॅक्शनल डोस ऑफ इनकॅटीवाटेड पोलिओ वॅक्सीन पीसीवी पेनुमकॉकॅल कॉन्जुगेट वॅक्सीन

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन @ फ़आयपीवी III चा अहवाल डिसेंबर २०२२ च्या दुसऱ्या आठवड्यापासून सुरू झाला.

## पल्स पोलिओ कार्यक्रम

१०.२६.९ पाच वर्षाखालील मुलांना पूर्वी कितीही वेळा पोलिओ डोस दिला असला तरी राष्ट्रीय लसीकरणाच्या दिवशी पोलिओ डोस देण्यात येतो. राज्याने पोलिओ विषाणूचा प्रसार नियंत्रणात ठेवण्यात शासन यशस्वी झाले आहे. पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२० पल्स पोलिओ कार्यक्रमाची प्रगती**

| वर्ष | लसीकरण केलेल्या मुलांची संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|
| २०२०-२१ | १५७.०२ | १२.१७ |
| २०२१-२२ | ११३.७० | १४.८४ |
| २०२२-२३+ | १११.३४ | ५.९२ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम

१०.२६.१० जन्माच्या वेळी उद्भवणारे दोष, मुलांचे आजार, न्युनता आणि अपंगत्व व विलंबाने होणारी वाढ या दोषांचे लवकर निदान करून त्यावर उपचार करणे हा राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचा उद्देश आहे. अंगणवाडीच्या माध्यमातून सहा वर्षापर्यंतच्या शालापूर्व बालकांची नियमितपणे वर्षातून दोनदा आरोग्य तपासणी करणे हा या कार्यक्रमाचा आवश्यक घटक आहे. शासकीय तसेच शासन अनुदानित शाळेत शिकणाऱ्या सहा ते १८ वर्षे वयोगटातील मुलांची नियमित आरोग्य तपासणी केली जाते. या तपासणीत आजाराचे निदान झालेल्या बालकांना संदर्भसेवा व शस्त्रक्रियेसह वैद्यकीय उपचार मोफत दिले जातात. राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२१ राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाची प्रगती**

(संख्या)

| वर्ष | शाळा/ अंगणवाडी | संख्या | विद्यार्थी (लाख) | | | केलेल्या शस्त्रक्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आरोग्य तपासणी केलेले | उपचार केलेले | संदर्भित केलेले | हृदया संबंधीत | इतर |
| २०२०-२१ | शाळा | १८,६८५ | २४.१२ | १.७५ | ०.५८ | ५४९ | २,९५५ |
| | अंगणवाडी - टप्पा १# | ० | ० | ० | ० | | |
| | - टप्पा २## | ६,५२५ | ३.३४ | ०.३१ | ०.०९ | | |
| २०२१-२२ | शाळा | ७७,३२८ | १०२.३५ | ७.७० | १.८६ | २,१०२ | ११,९६३ |
| | अंगणवाडी - टप्पा १# | ३८,८३९ | २०.२० | १.६७ | ०.४५ | | |
| | - टप्पा २## | ९३,१८८ | ५५.७० | ४.४० | १.१० | | |
| २०२२-२३+ | शाळा | ६८,०८२ | ९४.१३ | ७.९७ | ३.०८ | २,९६७ | १९,८९१ |
| | अंगणवाडी - टप्पा १# | १,०७,०५२ | ६७.०४ | ४.३९ | १.३१ | | |
| | - टप्पा २## | ५३,२४६ | ३२.६३ | २.६८ | १.०९ | | |

# एप्रिल ते सप्टेंबर ## ऑक्टोबर ते मार्च + डिसेंबरपर्यंत

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन

## राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम

१०.२६.११ किटकजन्य रोगांमुळे होणारे मृत्यू कमी करण्यासाठी व या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या तक्ता १०.२२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२२ किटकजन्य रोगनिहाय नोंदणी झालेले रुग्ण व मृत्यू संख्या**

(संख्या)

| किटकजन्य रोग | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू | रुग्ण | नोंदणी झालेले मृत्यू |
| हिवताप | १३,४४२ | १३ | १९,७७० | १५ | १३,०४६ | २३ |
| हत्तीरोग | ४५० | ० | ४५५ | ० | ४२२ | ० |
| डेंग्यू | २,७८२ | ११ | १२,७४१ | ४१ | ८,१७९ | २७ |
| मेंदुज्वर | २ | १ | ० | ० | २ | ० |
| चिकुनगुनिया | ७०० | ० | २,५०४ | ० | ९१९ | ० |
| एईएस/चंडीपुरा | ८ | ० | ० | ० | ० | ० |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन एईएस : ॲक्यूट एन्सेफॅलिटीस सिंड्रोम + डिसेंबरपर्यंत

## आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी

१०.२६.१२ आयुर्वेद, योग व निसर्गोपचार, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी (आयुष) या उपचार पद्धती निश्चित वैद्यकीय तत्वज्ञानावर आधारित असून रोगप्रतिबंध व आरोग्य संवर्धनाच्या स्थापित संकल्पनांसह निरामय जीवनाचे प्रातिनिधीक मार्ग दर्शवतात. योग उपचार पद्धतीस आता जागतिक स्तरावर आरोग्याचे प्रतीक मानले जात असून अनेक देशांनी त्यांच्या आरोग्यसेवेत याचा अंतर्भाव केला आहे. असंसर्गजन्य रोगांच्या औषधोपचार पद्धती समोरील वाढती आव्हाने, ढासळलेली जीवनशैली, जुनाट आजार, इत्यादींवर आयुष उपचार पद्धतीच्या संकल्पना व सेवा कशा उपयुक्त ठरतील याबाबत मोठ्या प्रमाणात उत्सुकता दिसून येत आहे. सध्याच्या वैद्यकीय सुविधांमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाकडून आयुष उपचार पद्धतीचा समावेश मुख्य आरोग्यसेवा यंत्रणेत करण्यात आला आहे. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानअंतर्गत आयुष उपचार पद्धतीच्या सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रात तसेच सामूहिक आरोग्य केंद्रात पुरविल्या जात असून प्रशिक्षित आयुष तज्ञ नियुक्त करण्यात आले आहेत. माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात ७६ आयुर्वेदिक महाविद्यालये व संलग्न रुग्णालये, ४८५ आयुर्वेदिक दवाखाने, सात युनानी महाविद्यालये व संलग्न रुग्णालये, २४ युनानी दवाखाने आणि ५६ होमिओपॅथी महाविद्यालये व संलग्न रुग्णालये आहेत. माहे डिसेंबर, २०२२ अखेर ९४,००२ आयुर्वेदिक डॉक्टरांनी (त्यापैकी ५,०४३ पदव्युत्तर) आणि ८,३९४ युनानी डॉक्टरांनी (त्यापैकी १५३ पदव्युत्तर) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन यांचेकडे नोंदणी केली तर ७९,७३४ होमिओपॅथी डॉक्टरांनी (त्यापैकी २,९२२ पदव्युत्तर) महाराष्ट्र कौन्सिल ऑफ होमिओपॅथीकडे नोंदणी केली आहे.

## महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवा

१०.२६.१३ महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेद्वारे रुग्णांना नजीकच्या रुग्णालयामध्ये पुढील उपचारार्थ दाखल करण्यासाठी प्राथमिक आरोग्यसेवेसह जीवरक्षक प्रणालीने सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात येतात. ही मोफत आपत्कालीन सेवा १०८ या दूरध्वनी क्रमांकावर निरंतर उपलब्ध आहे. एकूण ९३७ रुग्णवाहिका कार्यरत असून त्यापैकी २३३ रुग्णवाहिका अत्याधुनिक जीवरक्षक प्रणालीने सुसज्ज आणि ७०४ रुग्णवाहिका प्राथमिक जीवरक्षक प्रणालीने सुसज्ज आहेत. आपत्कालीन स्थितित सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या तक्ता १०.२३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२३ आपत्कालीन सेवा पुरविलेल्या रुग्णांची संख्या**

(संख्या)

| आपत्कालीन स्थिती | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| रुग्णवाहिके मध्ये झालेली प्रसुती | १,४४७ | १,१३९ | ९०२ |
| गरोदरपणा | १,०६,६४३ | १,२४,६३१ | १,३१,७८८ |
| वैद्यकीय | ५,५९,९१४ | ८,३१,८४६ | ७,०७,२१८ |
| अपघात (वाहनांमुळे) | ४०,२८३ | ४४,९१७ | २२,३३२ |
| प्राणघातक हल्ला | ५,९७७ | ६,१६२ | ५,५६० |
| भाजणे | १,१३० | १,३१२ | १,७६६ |
| हृदयविकार | ४७७ | ४,५९४ | २१,७६२ |
| पडून अपघात | ९,३९६ | ९,३२९ | ५,१६० |
| विषप्राशन/ विषबाधा | १५,१०७ | १६,२८० | १८,६४२ |
| मोठी दुर्घटना | १,४८० | ८५३ | १७२ |
| बहुविध आघात | १५२ | ११,१८६ | ७२,४२१ |
| इतर | ३,१७,४३३@ | १,४५,०२३ | १,२३,६०४ |
| **एकूण** | **१०,५९,४३९** | **११,९७,२७२** | **११,११,३२७** |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र @ कोविड-१९ बाधित रुग्ण समाविष्ट + डिसेंबर पर्यंत

## राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम

१०.२६.१४ राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रम सन १९६२ मध्ये सुरू करण्यात आला. केंद्र शासनाने सन १९९३ मध्ये, राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमाचे पुनरुज्जीवन करून सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम सुरू केला. या कार्यक्रमाअंतर्गत डायरेक्टली ऑब्झवर्ड ट्रिटमेंट शॉर्ट कोर्स (डॉट्स) हे धोरण स्वीकारण्यात आले. सन २०२५ पर्यंत भारतातील क्षयरोग नियंत्रण आणि निर्मूलनासाठी 'नॅशनल स्ट्रॅटेजिक प्लॅन फॉर ट्यूबरक्युलोसिस (एनएसपी) २०१७-२०२५' प्रसिद्ध करण्यात आला आहे. एनएसपी नुसार क्षयरोग निर्मूलन 'डिटेक्ट-ट्रीट-प्रिव्हेंट-बिल्ड'या चार धोरणात्मक स्तंभांमध्ये समायोजित केले आहे. केंद्र शासनाद्वारे सन २०१२ पासून सर्व आरोग्य सेवा प्रदात्यांकडील सर्व क्षयरुग्ण सूचित करणे अनिवार्य केले आहे. शासकीय आणि खाजगी आरोग्य सेवा प्रदात्यांसाठी क्षयरूग्ण सूचित करण्याकरिता 'निक्षय' ही वेब-आधारित क्षयरोग देखरेख प्रणाली विकसित केली आहे. क्षयरोग प्रतिबंध आणि निगा याकरिता क्षयरोग प्रकरणे सूचित करण्यासाठी आणि उपचारांचे सातत्यपूर्ण पालन आणि उपचार पूर्ण होण्याची निश्चिती करण्यासाठी खाजगी प्रदात्यांना प्रोत्साहन भत्ता दिला जातो.

१०.२६.१४.१ सन २०२१ मध्ये दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या ७५० होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८४ टक्के होते तर सन २०२२ मध्ये दर लाख लोकसंख्येमागे संशयित क्षयरोग रुग्णांची संख्या १,५५२ होती व रोग मुक्ततेचे प्रमाण ८५ टक्के होते. या कार्यक्रमावर सन २०२१-२२ मध्ये ₹ ८८.२३ कोटी तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ७५.८३ कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रम

१०.२६.१५ मोतीबिंदूच्या शस्त्रक्रिया करणे आणि शाळेत जाणाऱ्या मुलांची तपासणी करून दृष्टीदोष आढळणाऱ्या विद्यार्थ्यांना चष्मा पुरविणे या उद्देशाने राष्ट्रीय अंधत्व नियंत्रण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सन २०२१-२२ एकूण ५.५१ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या व ₹ ९.४९ कोटी खर्च झाले तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत एकूण ६.२८ लाख मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या व ₹ १.६९ कोटी खर्च झाला.

## राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रम

१०.२६.१६ कुष्ठरोगाचे निर्मूलन करणे (सर्व जिल्ह्यांमध्ये दर १०,००० लोकसंख्येमागे एक पेक्षाही कमी कुष्ठरोगी आढळणे), कुष्ठरोग बाधित रुग्णाचे अपंगत्व प्रतिबंध व वैद्यकीय पुनर्वसन तसेच कुष्ठरोगाबाबतची कलंक भावना कमी करणे ही राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मूलन कार्यक्रमाची उद्दिष्टे आहेत. सन २०२१-२२ मध्ये नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व कुष्ठरोगग्रस्त रुग्णांची संख्या अनुक्रमे १४,५२० व ११,६०७ होती आणि कुष्ठरोगाचे प्रमाण प्रति १० हजार लोकसंख्येमागे ०.८९ होते. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत नव्याने कुष्ठरोगाची लागण झालेल्या व कुष्ठरोगग्रस्त रुग्णांची संख्या अनुक्रमे १५,९४५ व १६,०९० होती.

## कुटुंब कल्याण कार्यक्रम

१०.२६.१७ लोकसंख्या स्थिर ठेवणे हे कुटुंब कल्याण कार्यक्रमाचे मुख्य उद्दिष्ट आहे. नसबंदी आणि दोन अपत्यांच्या जन्मात अंतर राखणे हे या कार्यक्रमाचे महत्वाचे पैलू आहेत. मुखावाटे घ्यावयाच्या गोळ्या, तांबी, प्रसुतीपश्चात तांबी, पारंपरिक संतति प्रतिबंधक साधने याबरोबरच काही नवीन गर्भनिरोधनाच्या पद्धतींचा म्हणजेच इंजेक्टेबल एमपीए, आठवडी सेंटक्रोमॅन गोळ्या, इत्यादी पद्धतींच्या प्रचार व प्रसारावर भर दिला जातो. कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.२४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२४ कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती**

('०००)

| वर्ष | नसबंदी | | | तांबी | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | | लक्ष्य | साध्य | |
| | | पुरुष | स्त्री | | | |
| २०२०-२१ | ५६५ | ५.२० | २०६.५० | ४९० | ३६२.०० | १९.४८ |
| २०२१-२२ | ५६५ | ५.०० | २७४.१९ | ४९० | ४२२.४६ | १५.०३ |
| २०२२-२३+ | ५६५ | ७.९० | २७१.४० | ४९० | ३१४.७० | १४.४७ |

*आधार* : राज्य कुटुंब कल्याण केंद्र, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना

१०.२७ राज्यामध्ये १ एप्रिल २०२० रोजी एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य ही सुधारित योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येत आहे. या योजनेद्वारे सूचीबध्द रूग्णालयांमार्फत निवडक आजारांच्या उपचारांसाठी रोख रक्कम विरहीत दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाते. ही एकात्मिक योजना विमा आणि हमी अशा मिश्र तत्त्वावर राबविण्यात येत आहे. युनायटेड इंडिया इन्शुरन्स कंपनी लिमिटेड लाभार्थ्यांना विमा संरक्षण घटका अंतर्गत आरोग्य विमा संरक्षण प्रदान करते आणि राज्य आरोग्य हमी सोसायटीकडून हमी तत्त्वावर संरक्षण प्रदान केले जाते.

१०.२७.१ महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना पूर्णत: राज्य शासनाच्या वित्तीय सहाय्याने राबविण्यात येणारी एक प्रमुख आरोग्य विमा योजना आहे. या योजने अंतर्गत पिवळे शिधापत्रिका धारक कुटुंबे (दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे, अंत्योदय व अन्नपूर्णा योजनेचे लाभार्थी), दारिद्र्य रेषेवरील केशरी शिधापत्रिका धारक कुटुंबे, शेतकरी आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांतील (औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, बीड, नांदेड, उस्मानाबाद, लातूर, अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा, यवतमाळ आणि वर्धा) शुभ्र शिधापत्रिका धारक शेतकरी कुटुंबे पात्र आहेत. शासकीय अनाथाश्रमातील मुले, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी, शासकीय महिला आश्रमातील सदस्य व शासकीय वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिक आणि महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांचे कुटुंब देखील या योजने अंतर्गत पात्र आहेत. या योजनेअंतर्गत लाभार्थी कुटुंबास रुग्णालयात दाखल झाल्यावर होणाऱ्या खर्चाची पुर्तता करण्यासाठी ₹ १.५० लाख पर्यंत व मुत्रपिंड प्रत्यारोपणासाठी ₹ २.५० लाख पर्यंत प्रतिवर्ष प्रतिकुटुंब आरोग्य विमा संरक्षण देण्यात येते. महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत ३४ निवडक विशेष सेवा अंतर्गत ९९६ प्रकारचे गंभीर व अधिक खर्चिक शस्त्रक्रिया/ उपचार व १२१ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा लाभ लाभार्थी घेऊ शकतात.

१०.२७.२ सामाजिक, आर्थिक व जातनिहाय जनगणना-२०११ नुसार निश्चित झालेली ८३.६३ लाख ई-कार्ड धारक कुटुंबे आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत सुचीबद्ध रुग्णालयांत लाभ मिळण्यास पात्र आहेत. डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण ८३.६८ लाख ई-कार्ड व्यक्तिक लाभार्थांना वितरीत करण्यात आले आहेत. देशांतर्गत नामिकासूचीतील कोणत्याही रुग्णालयात द्वितीय आणि तृतीय स्तरावरील उपचाराकरिता प्रति वर्ष प्रति कुटुंब ₹ पाच लाखांचे आरोग्य विमा संरक्षण दिले जाते. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेत समाविष्ट असलेले लाभार्थी १,२०९ वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया आणि १८३ शस्त्रक्रिया पश्चात सेवांचा (महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत समाविष्ट नसलेल्या अतिरिक्त २१३ वैद्यकीय उपचार व शस्त्रक्रिया आणि ६२ शस्त्रक्रिया पश्चात सेवांसह) लाभ मिळण्यास पात्र आहेत.

१०.२७.३ सन २०२१-२२ मध्ये एकात्मिक योजनेअंतर्गत, एकूण ८.४७ लाख शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले असून ₹ १,६६२.५५ कोटी खर्च झाला. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ६.२५ लाख शस्त्रक्रिया आणि उपचार करण्यात आले असून ₹ १,३८७.१९ कोटी खर्च झाला. एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आणि आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अंतर्गत केलेल्या प्रमुख शस्त्रक्रिया आणि उपचारांची संख्या तक्ता १०.२५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२५ एकात्मिक महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या मोठ्या शस्त्रक्रिया व दिलेल्या उपचारांची आकडेवारी**

| विशेष उपचार | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) | शस्त्रक्रिया/ उपचारांची संख्या | अदा दावे रक्कम (₹ कोटी) |
| कर्करोगावरील वैद्यकीय उपचार | १,६५,००९ | ८२.०१ | १,९८,२०२ | ११०.०० | १,५९,४१६ | ९३.८७ |
| मूत्रपिंड उपचार | ८१,३३६ | ८७.५६ | ८२,९०७ | १२०.०५ | ७०,८९५ | १०१.९१ |
| हृदयविकार | ६८,१५९ | २४१.७५ | ८९,७८२ | ३४१.०३ | ८५,०६५ | ३२९.२७ |
| फुफ्फुसांच्या आजारावरील उपचार | ६३,२५८ | ५७.०१ | ९०,५८१ | १६९.३४ | १२,४५५ | ३६.८९ |
| स्त्री रोग व प्रसुती | ४३,९८० | १९.०१ | ४९,७७२ | ७५.३२ | ५,४१० | १०.२२ |
| बहु आघात | ३६,८३४ | ६४.०५ | ४८,१५५ | ९६.४१ | ४४,८२७ | ८६.८८ |
| प्रजनन संस्थेविषयी उपचार | ३५,९३६ | ६२.७६ | ४६,५५३ | ९२.२२ | ४५,७६२ | ८८.८२ |
| कर्करोगावरील रेडिएशन थेरेपी | २३,१९२ | १०५.०७ | २७,०३६ | १४०.१६ | २०,६१८ | १०५.८५ |
| बालरोगावरील उपचार | २२,०१५ | ४८.३७ | ३८,८४२ | ८३.३७ | २६,३९२ | ५९.९१ |
| कर्करोगावरील शस्त्रक्रिया | १७,३६३ | ४३.१६ | २२,७९९ | ६२.७४ | १७,६७९ | ४९.३५ |
| **एकूण** | **५,५७,०८२** | **८१०.७५** | **६,९४,६२९** | **१,२९०.६४** | **४,८८,५१९** | **९६२.९७** |

आधार : राज्य आरोग्य हमी सोसायटी, महाराष्ट्र शासन    + डिसेंबर पर्यंत

## राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम

१०.२८ राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी राज्यात महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. जनजागृती मोहीम राबवून मार्गदर्शन करणे आणि विशिष्ट गटातील लोकांचे प्रबोधन व देखरेख यावर या कार्यक्रमाचा भर आहे. यामध्ये लैंगिक संसर्गजन्य रोग चिकित्सालयातील रुग्णांच्या व प्रसुतीपूर्व तपासणीसाठी आलेल्या गर्भवती महिलांच्या रक्ताच्या नमुन्याची तपासणी द्वारे संनिरिक्षण केले जाते. सन २०२१-२२ मध्ये ₹ १२९.८४ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत ₹ ९९.८३ कोटी खर्च झाला. एचआयव्ही/ एड्सग्रस्त रुग्णांची माहिती तक्ता १०.२६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२६ एचआयव्ही/एड्स रुग्णांची संख्या**

('०००)

| तपशील | २०२० | २०२१ | २०२२ |
|---|---|---|---|
| जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्ती | ५,१६६ | ४,८५७ | ६,९४८ |
| तीन चाचणी पद्धतीवरुन एचआयव्ही बाधित | १३.४ | १५ | १८ |
| एचआयव्ही बाधितांचे प्रमाण (टक्के)@ | ०.२६ | ०.३० | ०.२६ |
| एड्स रुग्ण | ८.२० | १०.६९ | १२.०३ |
| एड्सने मृत्यू | २.२० | २.३६ | २.००३ |

@ जोखीम गटातील तपासणी केलेल्या व्यक्तींशी

*आधार* : महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था

## राज्य रक्त संक्रमण परिषद

१०.२९ सुरक्षित रक्ताचा व रक्तघटकांचा पुरेसा पुरवठा वाजवी दरात करणे हे राज्य रक्त संक्रमण परिषदेचे मुख्य उद्दिष्ट आहे. सन २००० पासून सिकलसेल ग्रस्त बालके तसेच थॅलेसीमिया व हिमोफिलियाने पीडित रूग्णांना मोफत रक्तपुरवठा केला जातो. रक्त संकलनाबाबतची माहिती तक्ता १०.२७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२७ रक्त संकलनाबाबतची माहिती**

| वर्ष | रक्तपेढ्या (संख्या) | एकूण संकलन (लाख युनिट) | पैकी, स्वेच्छेने रक्तदान केलेले (लाख युनिट) | कार्ड वितरीत केलेल्या रुग्णांची संख्या | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सिकलसेल | थॅलेसीमिया | हिमोफिलिया |
| २०२० | ३४५ | १५.४६ | १५.३१ | ५९७ | ४६५ | ९९ |
| २०२१ | ३५४ | १६.७३ | १६.५८ | ४६१ | ७२५ | १२६ |
| २०२२ | ३६८ | १९.२८ | १९.०८ | ४२१ | ६३८ | १०३ |

*आधार* : राज्य रक्त संक्रमण परिषद, महाराष्ट्र शासन

## साथरोग नियंत्रण कार्यक्रम

१०.३० कॉलरा, गॅस्ट्रो, अतिसार, इत्यादी जलजन्य आजार यांचा उद्रेक व अधूनमधून होणारा उद्भव यांचे संनियंत्रण साथरोग नियंत्रण कार्यक्रमाअंतर्गत केले जाते. या आजारांमुळे होणारी लागण व मृत्यू कमी करण्याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या तक्ता १०.२८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२८ जलजन्य आजारांमुळे लागण झालेल्या व्यक्तींची व मृत्यूंची संख्या**

(संख्या)

| आजार | २०२० | | २०२१ | | २०२२ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू | लागण झालेले | मृत्यू |
| कॉलरा | ७१ | ० | २८१ | ० | ७४७ | २० |
| गॅस्ट्रो | २३,२३६ | ० | २३,९८६ | ० | २१,४२५ | ० |
| अतिसार | ४,४२,२९५ | ० | ४,०२,६०९ | ३ | ३,४२,२२५ | ५ |
| संसर्गजन्य काविळ | १,३०९ | ० | २,९३६ | ० | २,११३ | ० |
| विषमज्वर | २५,५४८ | ० | ३२,४२५ | ० | २९,७३० | ० |
| लेप्टोस्पायरोसिस | ५०२ | १६ | ३४७ | १० | ४५८ | १८ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## मानवी अवयव प्रत्यारोपण

१०.३१ मानवी उपचारांकरिता मानवी अवयव काढणे, जतन करणे, प्रत्यारोपण करणे तसेच मानवी अवयवांचे व्यापारीकरण रोखणे याबाबत नियमन करण्याकरिता केंद्र शासनाने मानवी अवयव प्रत्यारोपण अधिनियम, १९९४ लागू केला आहे. राज्यात डिसेंबर, २०२२ पर्यंत २३५ अवयव प्रत्यारोपण केंद्रांची नोंदणी करण्यात आली असून त्यापैकी एका प्रकारच्या अवयव प्रत्यारोपणासाठी १२१ केंद्रे व एकापेक्षा जास्त अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी ११४ केंद्रे आहेत. या व्यतिरिक्त नेत्रदान, नेत्रपेढी व बुब्बुळ प्रत्यारोपणासाठी एकूण २९७ केंद्रे आहेत. तसेच ६५ केंद्रांची प्रत्यारोपणाशिवाय अवयव काढण्याचे म्हणून नोंदणी झाली आहे. प्रत्यारोपणांची संख्या तक्ता १०.२९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.२९ प्रत्यारोपणांची संख्या**

(संख्या)

| प्रत्यारोपण | २०२० | २०२१ | २०२२ |
|---|---|---|---|
| जीवित | | | |
| अ) मूत्रपिंड | १५० | ५४१ | ६०८ |
| ब) यकृत | १२५ | २०९ | ३१८ |
| मृतवत | | | |
| अ) मूत्रपिंड | ३५ | २६ | ८६ |
| ब) यकृत | ३५ | २० | ६४ |
| क) हृदय | ७ | ८ | ६ |
| ड) फुफ्फुस | ० | ० | १ |
| ई) बुब्बुळ | ८४७ | १,३६९ | ३,२३८ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

## कोविड-१९ महामारी

१०.३२ कोविड-१९ साथीच्या काळात महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक प्रभावित राज्यांपैकी एक होते. बाधित रूग्णांवर उपचार करण्यासाठी तसेच रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना करण्यात आल्या. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार साथीच्या काळात त्रि-स्तरीय उपचार आणि निगा यंत्रणा स्थापन करण्यात आली. संपूर्ण देशात कोविड-१९ लसीकरण मोहिम राबविण्यात आली. कोविड-१९ प्रकरणांची संख्या, बरे झालेले रुग्ण आणि लसीकरण याची माहिती तक्ता क्र. १०.३० मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.३० कोविड-१९ प्रकरणांची संख्या, बरे झालेले रुग्ण आणि लसीकरण यांची माहिती**

(डिसेंबर, २०२२ पर्यंत)

| तपशील | संचयी सकारात्मक महामारी सुरू झाल्यापासून रुग्ण |
|---|---|
| एकूण रुग्ण | ८१,३६,६६३ |
| बरे झालेले रुग्ण | ७९,८८,०८२ |
| एकूण मृत्यू | १,४८,४१७ |
| एकूण लसीकरण (पहिला डोस) | ९,१६,५०,६९० |
| एकूण लसीकरण (दुसरा डोस) | ७,६५,६५,००९ |
| एकूण लसीकरण (सावधगिरीचा डोस) | ९४,९२,९०७ |

*आधार* : आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र शासन

# महिला व बाल विकास

१०.३३ सामाजिक व आर्थिकदृष्ट्या सक्षम महिला आणि उत्तम पालनपोषण प्राप्त बालके सामाजिक व आर्थिक विकासासाठी सहाय्यभूत ठरतात. महिला व बालकांची सुरक्षा आणि कल्याण यावर शासन लक्ष केंद्रीत करत आहे.

## महिला विकास

१०.३४ 'स्त्री पुरुष समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींचे सक्षमीकरण करणे' हे शाश्वत विकास ध्येय-५ आहे. महिलांचा शैक्षणिक, आरोग्य, सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे आणि महिलांची सुरक्षा याकरिता शासन विविध योजना राबवित आहे.

### मिशन शक्ती

१०.३५ महिलांची सुरक्षा, संरक्षण व सक्षमीकरण याकरिता केंद्र शासनाने 'मिशन शक्ती' एकात्मिक महिला सक्षमीकरण कार्यक्रम एकछत्री योजनेच्या स्वरूपात माहे जुलै २०२२ मध्ये सुरु केला आहे. महिलांची सुरक्षा व संरक्षण याकरिता संबल आणि महिला सक्षमीकरणाकरिता सामर्थ्य या मिशन शक्ती च्या दोन उपयोजना आहेत. संबल उपयोजनेमध्ये वन स्टॉप सेंटर, बेटी बचाओ बेटी पढाओ, इत्यादी योजनांचा समावेश आहे. सामर्थ्य उपयोजनेमध्ये उज्ज्वला गृहे, स्वाधारगृहे व नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृहे या योजनांचा समावेश आहे.

१०.३५.१ **सखी वन स्टॉप सेंटर:** हिंसाचाराने पीडित महिलांना एकाच छत्राखाली एकात्मिक आधार व सहाय्य देणे आणि कोणत्याही हिसांचाराविरूध्द लढा देण्यासाठी महिलांना वैद्यकीय, कायदेशीर, मनोवैज्ञानिक व समुपदेशन सहाय्यासह आपत्कालीन व सर्वसाधारण स्थितीत तातडीने मदत करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. राज्यात ३७ सखी वन स्टॉप सेंटर आहेत. सन २०२१-२२ मध्ये ४,१९४ महिलांना तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ४,०२७ महिलांना मदत पुरविण्यात आली.

१०.३५.२ **बेटी बचाओ बेटी पढाओ:** मुलींच्या जीविताची, सुरक्षिततेची व शिक्षणाची खात्री देणे आणि लिंग भेदावर आधारीत लिंग निवड प्रथेचे निर्मूलन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. राज्यात ही योजना बालकांमधील मुलामुलींचे दर कमी असलेल्या दहा जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत, जन-जागरण मोहिमेद्वारे मुलींचा जन्मदर वाढविणे, गर्भवती महिलांची नोंदणी, मुलींचा जन्म साजरा करणे, आरोग्य शिबिरे आयोजित करणे, मुलींच्या शिक्षणाविषयी मार्गदर्शन करणे, गुड्डा- गुड्डी फलक लावणे, मुले व मुली यांच्या जन्मांची संख्या असलेले फलक सार्वजनिक ठिकाणी लावणे व जिल्हास्तरीय विविध स्पर्धा राबविणे असे अनेक उपक्रम राबविण्यात येतात.

१०.३५.३ **उज्ज्वला गृह :** जन जागृती निर्माण कार्यक्रमामार्फत महिला व मुलांची लैंगिक शोषणासाठी केली जाणारी तस्करी रोखणे, पीडित महिलांना सुटकेसाठी व समाजामध्ये पुन्हा सामावून घेण्यासाठी मदत करणे आणि अन्न, वस्त्र, निवारा, समुपदेशनासह वैद्यकीय उपचार, कायदे विषयक मदत, व्यावसायिक प्रशिक्षण व मार्गदर्शन यासारख्या प्राथमिक गरजा पुरवून त्यांचे पुनर्वसन करणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. माहे डिसेंबर, २०२२ अखेर राज्यात सात उज्ज्वला गृहे कार्यरत आहेत. सन २०२१-२२ मध्ये या योजनेंतर्गत १३१ महिलांना सहाय्य करण्यात आले.

१०.३५.४ **स्वाधार गृह :** या योजनेअंतर्गत निराधार, बेघर, विधवा, परित्यक्ता, कौटुंबिक हिंसाचाराच्या बळी असलेल्या, नैसर्गिक आपत्तीमध्ये बेघर झालेल्या, तुरुंगातून सुटका झालेल्या परंतु कुटुंबांचा आधार नसलेल्या कैदी, कुंटणखान्यांतून सुटका केलेल्या, इत्यादी बिकट परिस्थितीतील महिलांचे संरक्षण, निवारा, संगोपन, शिक्षण आणि व्यावसायिक प्रशिक्षण देऊन पुनर्वसन करण्यात येते. राज्यात माहे डिसेंबर, २०२२ अखेर बारा स्वाधारगृहे कार्यरत आहेत. या योजनेंतर्गत सन २०२१-२२ मध्ये १,११० महिलांना सहाय्य करण्यात आले.

१०.३५.५ **नोकरी करणाऱ्या महिलांसाठी वसतिगृह :** नोकरी करणाऱ्या महिलांना त्यांच्या मुलांसाठी डे-केअर सेंटर सुविधेसह सुरक्षित आणि सोयीस्कर निवासस्थानाची उपलब्धता करून देणे हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत, महानगरांसाठी **₹** ५०,००० व इतर ठिकाणांसाठी **₹** ३५,००० पेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेल्या नोकरी करणाऱ्या अविवाहित, विधवा, घटस्फोटित, विभक्त, विवाहित परंतु ज्यांचे पती किंवा जवळचे कुटुंबीय त्याच भागात राहत नसणाऱ्या आणि नोकरीसाठी प्रशिक्षण सुरु असलेल्या महिलांकरिता वसतिगृह इमारत बांधण्यासाठी किंवा भाडेतत्वावर घेतलेल्या जागेत वसतिगृह चालविण्यासाठी अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांना आर्थिक सहाय्य दिले जाते. वसतिगृहातील महिलांना त्यांच्या निवासासाठी भाडे आकारले जाते. राज्यात अशी ६५ वसतिगृहे कार्यरत आहेत. सन २०२१-२२ मध्ये १,६०१ महिलांनी तर २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ३,१२८ महिलांनी या सुविधेचा लाभ घेतला.

१०.३६ राज्यात महिला केंद्रीत विविध योजना राबविण्यात येत आहेत. निवडक महिला केंद्रीत योजनांची प्रगती तक्ता १०.३१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३१ महिला केंद्रीत निवडक योजनांची प्रगती**

(₹ कोटी)

| योजना | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थ्यांची संख्या | खर्च | लाभार्थ्यांची संख्या | खर्च |
| शासकीय महिला वसतिगृहे/ महिला आधार गृहे/ संरक्षण गृहे/ राज्य गृहे | ८,९३३ | १४.८२ | ७,३१२ | ८.२२ |
| महिला समुपदेशन केंद्रे | २४,०८९ | ४.४९ | ६,६१२ | १.९५ |
| मनोधैर्य योजना | ० | ०.०० | ६२३ | १२.०० |
| कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण | १६,२२६ | २७.४६ | ५,३७६ | १७.३७ |

*आधार* : महिला व बालविकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

## निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग

१०.३७ महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक-तृतीयांश आरक्षण देण्याचे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. राज्य शासनाने हे आरक्षण ५० टक्क्यांपर्यंत वाढविले आहे. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठीच्या राखीव जागा तक्ता १०.३२ मध्ये दिल्या आहेत.

**तक्ता १०.३२ राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील महिलांसाठी राखीव जागांची माहिती**

(दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी)

| स्थानिक स्वराज्य संस्था (संख्या) | एकूण जागा | महिलांसाठी राखीव जागा |
|---|---|---|
| महानगरपालिका (२७) | २,७३६ | १,३७४ |
| नगरपरिषद (२४४) | ५,५१४ | २,८३४ |
| नगरपंचायत (१३९) | २,३६३ | १,२५१ |
| जिल्हा परिषद (३४) | २,००० | १,००८ |
| पंचायत समिती (३५१) | ४,००० | २,००० |
| ग्रामपंचायत (२७,८२९) | २,४०,२५० | १,३३,६०४ |
| **एकूण** | **२,५६,८६३** | **१,४२,०७१** |

*आधार* : राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र शासन

१०.३७.१ सतराव्या लोकसभेत (२०१९-२०२४) महाराष्ट्रातील ४८ विद्यमान खासदारांपैकी आठ महिला खासदार आहेत. राज्यसभेत १९ विद्यमान खासदारांपैकी चार महिला खासदार आहेत. चौदाव्या महाराष्ट्र विधानसभेत (२०१९-२०२४) दि. ३१ जानेवारी, २०२३ रोजी २८६ विद्यमान आमदारांपैकी २५ महिला आमदार आहेत. महाराष्ट्र विधान परिषदेत दि.३१ जानेवारी, २०२३ रोजी ५७ विद्यमान आमदारांपैकी चार महिला आमदार आहेत.

## महिला आर्थिक विकास महामंडळ

१०.३८ राज्य शासनाने महिला सक्षमीकरणाच्या विविध योजना स्वयंसहाय्य गटांमार्फत राबविण्यासाठी महिला आर्थिक विकास महामंडळास (माविम) नोडल संस्था म्हणून घोषित केले आहे. स्वयंसहाय्य गटांच्या माध्यमातून महिलांचे एकत्रीकरण, महिलांचे क्षमतावर्धन, महिलांमध्ये आत्मविश्वास वाढविणे, उद्योजकता विकास करणे, स्वयंसहाय्य गटांच्या फेडरेशन असलेल्या लोकसंचलित संसाधन केंद्रामार्फत रोजगारांच्या संधी निर्माण करणे, समान संधी आणि शासनामध्ये महिलांचा सहभाग याकरिता प्रोत्साहन देणे आणि स्वयंसहाय्य गटांसोबत तळागाळात काम करणाऱ्या संस्था निर्माण करणे ही माविमची प्रमुख उद्दिष्टे आहेत. स्वयंसहाय्य गट, वित्तिय संस्था, स्वयंसेवी संस्था आणि शासनाचे संबंधित विभाग यांमधील समन्वय संस्था म्हणून माविम कार्य करते. शासन स्वयंसहाय्य गटांना बाजारपेठ मिळवून देते, तसेच महिलांमधील नेतृत्व गुण व प्रशासकीय क्षमता वृध्दींगत करण्यासाठी प्रशिक्षण आयोजीत करते.सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत स्वयंसहाय्य गटांची एकूण संचित बचत ₹ ९३७.२७ कोटी होती तसेच स्वयंसहाय्य गटांना विविध वित्तीय संस्थांकडून एकूण ₹ ६,६४०.७१ कोटी कर्ज प्राप्त झाले आणि त्यांनी एकूण ₹ ५,६०७.६८ कोटी अंतर्गत कर्ज वितरीत केले. महिला स्वयंसहाय्य गटांची माहिती तक्ता १०.३३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३३ महिला स्वयंसहाय्य गटांची माहिती**

(दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी)

| तपशील | ग्रामीण | नागरी | एकूण |
|---|---|---|---|
| माविम अंतर्गत गावे व शहरे (संख्या) | १०,४९५ | २५९ | - |
| स्वंयसहाय्य गटांची संख्या | ९९,६९९ | ५९,७१२ | १,५९,४११ |
| सदस्य संख्या (लाख) | १२.९८ | ७.१६ | २०.१५ |
| वित्तीय संस्थेकडून प्राप्त कर्जे (आवर्ती) (₹ कोटी) | ४,९८५.९४ | १,६५४.७७ | ६,६४०.७१ |

*आधार* : महिला आर्थिक विकास महामंडळ , महाराष्ट्र शासन

१०.३८.१ **लोकसंचलित संसाधन केंद्र**: लोकसंचलित संसाधन केंद्र हा सोसायटी अधिनियम, १८६० अंतर्गत नोंदणीकृत असलेला गट असून सुमारे २५ किमीच्या परिघात येणाऱ्या सुमारे २० ते २५ गावांतील २५० ते ३०० स्वयंसहाय्य गटांचा समूह आहे. महिलांच्या उदरनिर्वाहासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण, बँक जोडणी, उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांसारख्या प्राथमिक सेवा स्वयंसहाय्य गटांना पुरविणे हे लोकसंचलित संसाधन केंद्रांचे कार्य आहे. राज्यात माहे डिसेंबर २०२२ अखेर २९५ लोकसंचलित संसाधन केंद्रे कार्यरत आहेत.

१०.३८.२ **तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस**: अति गरीब व कर्जबाजारी महिलांना कर्जमुक्त करण्यासाठी तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस ही योजना सन २०१८-१९ पासून तीन वर्षाच्या कालावधीकरीता स्वयंसहाय्य गटांमार्फत राबविण्यात येत आहे. एक लाख महिलांना ₹ १०,००० रक्कमेपर्यंत वैयक्तिक कर्ज, दहा हजार कर्जपिडीत महिलांना कर्ज परतफेड करण्यासाठी ₹ २०,००० पर्यंतचे वित्तीय सहाय्य व लोकसंचलित संसाधन केंद्रामार्फत राबविण्यात येणाऱ्या ३०० महिला सामाजिक उपक्रमांसाठी दोन लाखांपर्यंत खेळते भांडवल उपलब्ध करुन देणे ही या योजनेची उद्दिष्टे आहेत. या योजनेअंतर्गत डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण ₹ ५४.०८ कोटी रक्कमेची कर्जे वितरित करण्यात आली.

१०.३८.३ **नव तेजस्विनी**: नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला विकास प्रकल्प माहे जानेवारी, २०२१ मध्ये मंजूर करण्यात आला आहे. हा प्रकल्प इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रीकलचरल डेव्हलपमेंटच्या सहाय्याने गरीब व गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राज्यात सुरु करण्यात आला आहे. या प्रकल्पात मुख्यत्वे बाजाराभिमुख उद्योगांना प्रोत्साहन, सहाय्यक सेवा उपलब्ध करणे व संस्थात्मक विकास आणि प्रकल्प व्यवस्थापन यावर लक्ष केंद्रीत केले आहे. या प्रकल्पाद्वारे महिलांच्या नेतृत्वाखालील शेतकरी उत्पादक संस्था, सूक्ष्म उद्योजक, लोकसंचलित संसाधन केंद्रामार्फत राबविले जाणारे शेती उपक्रम,बिगरशेती उपक्रम आणि शेतीशी संलग्न उपक्रमांना सहाय्य करण्यात येते.

## महाराष्ट्र राज्य महिला आयोग

१०.३९ महाराष्ट्र राज्य महिला आयोग ही एक वैधानिक संस्था असून ती पीडित महिलांनी दाखल केलेल्या तक्रारींवर नियमितपणे सुनावण्या/ सार्वजनिक सुनावण्या घेते, मोफत कायदे विषयक सेवा व समुपदेशन पुरविते. स्व-संरक्षण कार्यक्रम, स्त्री-पुरूष समानतेविषयी जागरुकता, कायदेविषयक साक्षरता, सायबर गुन्हे, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५, कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ यांची अंमलबजावणी, ॲसिड हल्ल्याने पीडित महिलांचे पुनर्वसन, पाळणा घरासाठी मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे, इत्यादी महिलांशी निगडीत विविध मुद्यांवर कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रम व चर्चासत्रे या आयोगामार्फत आयोजित करण्यात येतात. या उपक्रमांवर सन २०२१-२२ मध्ये ₹ १६.६३ लाख तर सन २०२२-२३ मध्ये जानेवारीपर्यंत ₹ १६.२२ लाख खर्च झाला.

## महिलांवरील अत्याचार

१०.४० महिलांवर शारीरिक किंवा मानसिकरित्या केल्या जाणाऱ्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष क्रूर कृत्यांना 'महिलांवरील अत्याचार' असे संबोधले जाते. महिलांवरील अत्याचारांचे नोंदवलेले गुन्हे तक्ता १०.३४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३४ महिलांवरील अत्याचारांचे राज्यात नोंदविलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्हे शीर्ष | २०२० | २०२१ | २०२२+ |
|---|---|---|---|
| बलात्कार | ४,८४६ | ५,९५४ | ५,७७९ |
| अपहरण व पळवून नेणे | ५,२५४ | ७,५५९ | ७,१९३ |
| हुंडाबळी | १९७ | १७२ | १४४ |
| पती व नातेवाईकांकडून झालेली क्रूर कृत्ये | ६,७२९ | १०,०९५ | ९,२२५ |
| विनयभंग | १२,६६४ | १२,९४५ | ११,५०९ |
| लैंगिक अत्याचार | १,०१७ | १,२८७ | १,१४८ |
| अनैतिक व्यापार | ८५ | ९५ | ७४ |
| इतर | १,१६२ | १,४१९ | ९४६ |
| **एकूण** | **३१,९५४** | **३९,५२६** | **३६,०१८** |

\+ ऑक्टोबरपर्यंत

*आधार* : १.गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र शासन
२. विशेष पोलीस महानिरिक्षक, (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग) यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

# बाल विकास

१०.४१ मुले भविष्यातील मनुष्यबळ साधन संपत्ती असल्यामुळे बालकांचे कल्याण गरजेचे आहे. सामाजिक स्थितीमुळे बालकांमधील असमानता, भेदभाव व अन्याय दूर करण्यासाठी योग्य, सुधारणात्मक व ठोस उपाययोजना करणे तसेच प्रत्येक बालकास कुटुंबात किंवा कुटुंबासारख्या वातावरणात प्रेम व निगा, संरक्षण, सहकार्य व बालसंगोपनाचा अधिकार देणे ही राज्य बाल धोरण २०१४ ची मुख्य उद्दिष्टे आहेत. बाल विकासाच्या विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत.

## एकात्मिक बाल विकास सेवा

१०.४२ ग्रामीण, आदिवासी व झोपडपट्टी भागातील शाळापूर्व बालकांची योग्य वाढ व विकास साधण्यासाठी एकात्मिक पद्धतीने सेवा पुरविणे हे एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे उद्दिष्ट आहे. हा कार्यक्रम ५५३ बाल विकास प्रकल्पांमार्फत ९७,४७५ अंगणवाड्या व १३,०११ मिनी अंगणवाड्यांमध्ये राबविला जातो. या योजने अंतर्गत सहा वर्षाखालील बालके, गर्भवती स्त्रिया व स्तन्यदा माता यांचे आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण आणि शालेय पूर्व शिक्षण अशा मूलभूत सेवा पुरविल्या जातात.

१०.४२.१ **पोषण कार्यक्रम:** पूरक पोषण कार्यक्रम हा एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत बालके, गर्भवती महिला आणि स्तन्यदा माता यांच्या किमान पोषण गरजा भागविण्यासाठी व त्यांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी राबविला जातो. समाजातील वंचित घटकातील सहा वर्षांपेक्षा कमी वयाची बालके, गर्भवती महिला आणि स्तन्यदा माता यांना पौष्टिक आहार देणे व त्यांचे आरोग्य सुधारणे हे पूरक पोषण कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. दुर्गम व संवेदनशील भागातील कुपोषण नियंत्रित करून अर्भक मृत्यू कमी करणे हे सुध्दा या योजनेचे एक उद्दिष्ट आहे. सन २०२१-२२ मध्ये ७९.४५ लाख लाभार्थ्यांवर ₹ २,०३१.८० कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ७१.४७ लाख लाभार्थ्यांवर ₹ १,२७३.९५ कोटी खर्च झाला. राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी तक्ता १०.३५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.३५ राज्यातील ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांची पोषण श्रेणी निहाय टक्केवारी**

| वर्ष | क्षेत्र | वजन केलेली बालके (संख्या) | बालकांची टक्केवारी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | सर्वसाधारण वजनाची | मध्यम कमी वजनाची | तीव्र कमी वजनाची |
| २०२०-२१ | ग्रामीण | ४०,७१,४२८ | ९३.१ | ५.९ | १.० |
| | आदिवासी | ८,७७,४६७ | ८०.२ | १६.० | ३.८ |
| | नागरी | ११,३३,३०५ | ८६.५ | १२.२ | १.३ |
| | **एकूण** | **६०,८२,२००** | **९०.०** | **८.५** | **१.४** |
| २०२१-२२ | ग्रामीण | ४०,५६,६८३ | ९३.९ | ५.२ | ०.९ |
| | आदिवासी | ८,८०,५३८ | ८१.६ | १४.९ | ३.५ |
| | नागरी | १२,७९,०४६ | ९१.३ | ७.९ | ०.९ |
| | **एकूण** | **६२,१६,२६७** | **९१.६** | **७.१** | **१.२** |
| २०२२-२३+ | ग्रामीण | ३८,८८,१७१ | ९३.८ | ५.३ | ०.९ |
| | आदिवासी | ८,६९,२७६ | ८१.१ | १५.१ | ३.७ |
| | नागरी | १२,३५,९९९ | ९१.५ | ७.८ | ०.७ |
| | **एकूण** | **५९,९३,४४६** | **९१.५** | **७.२** | **१.३** |

*आधार*: एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

१०.४२.२ **ग्राम बाल विकास केंद्र**: कुपोषणास आळा घालण्यासाठी एकात्मिक बाल विकास सेवा कार्यक्रमा अंतर्गत गाव/अंगणवाडी स्तरावर ग्राम बाल विकास केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. अतितीव्र कुपोषित बालकांना महिनाभर अंगणवाडीत ठेवले जाते. अतितीव्र कुपोषित बालकांमधील कुपोषण निर्मूलनासाठी खास तयार केलेल्या उर्जायुक्त पौष्टीक आहारासह वैद्यकीय सल्ला दिला जातो. अंगणवाडीत तीन नियमित आहारा सोबत मुलांना दिवसातून तीन वेळा अतिरिक्त आहार दिला जातो तसेच सर्व वैद्यकीय सुविधा पुरविल्या जातात. या योजनेअंतर्गत, सन २०२१-२२ मध्ये १८,९१४ अतितीव्र कुपोषित बालकांना तर सन २०२२-२३ मध्ये सप्टेंबरपर्यंत ७,११० अतितीव्र कुपोषित बालकांना लाभ देण्यात आला.

१०.४२.३ **पोषण अभियान**: एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत पोषण अभियानाची सर्व जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी करण्यात येत आहे. (i) कुपोषणाचे प्रमाण सहा टक्क्यांनी कमी करणे, (ii) लहान बालके, किशोरवयीन मुली व महिलांमधील रक्तक्षयाचे प्रमाण नऊ टक्क्यांनी कमी करणे व (iii) कमी वजनाच्या बालकांचे प्रमाण सहा टक्क्यांनी कमी करणे ही या अभियानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. सामुदायिक गतीशिलता आणि लोकसहभागाला चालना देण्यासाठी, सन २०१८ पासून दरवर्षी सप्टेंबर महिना ‘राष्ट्रीय पोषण माह’ म्हणून राज्यात साजरा केला जातो. या अभियानावर सन २०२१-२२ मध्ये ₹ ११६.२४ कोटी खर्च झाला.

१०.४२.४ **पूर्व बाल्यावस्थेतील संगोपन व शिक्षण:** महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने बालकांच्या विकासाच्या अवस्थांवर व वर्तनांवर आधारित तीन ते सहा वर्षे वयोगटासाठी ‘बालशिक्षणक्रम’ अभ्यासक्रम विकसित केला असून या अभ्यासक्रमास ‘आकार’ असे नाव देण्यात आले आहे. ‘आकार’ बालशिक्षण कार्यक्रमांद्वारे ऑनलाईन पद्धतीने सर्व अंगणवाड्यांमधील विद्यार्थ्यांचे शालेयपूर्व उपक्रम पूर्ण करण्यात येतात. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत २७.०५ लाख मुलांना याचा लाभ मिळाला आहे.

१०.४२.५ **माझी कन्या भाग्यश्री:** मुलींच्या जन्मदरात वाढ करणे, गर्भलिंग चाचणी रोखणे, मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन व हमी देणे आणि मुलींच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे ही या योजनेची उद्दिष्टे असून ही योजना मुली असलेल्या समाजाच्या सर्व घटकांतील व वार्षिक उत्पन्न ₹ ७.५० लाख पर्यंत असणाऱ्या कुटुंबाना लागू करण्यात आली आहे. एका मुलीच्या जन्मानंतर मातेने/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास मुलीच्या नावे ₹ ५०,००० बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात येतात. दोन मुलींच्या जन्मानंतर मातेने/पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास प्रत्येक मुलीच्या नावे ₹ २५,००० बँकेत मुदत ठेव म्हणून गुंतविण्यात येतात. मुलीच्या वयाच्या सहाव्या व बाराव्या वर्षी केवळ मुद्दल रकमेवरील व्याज काढून घेता येते आणि मुलीच्या वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर पूर्ण रक्कम (मुद्दल व व्याज) देय होते. या योजनेअंतर्गत, सन २०२१-२२ मध्ये ५,१२९ लाभार्थ्यांवर ₹ १२.७५ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत २,६७३ लाभार्थ्यांवर ₹ ३.३६ कोटी खर्च झाला.

१०.४२.६ **बेबी केअर किट:** प्राथमिक आरोग्य केंद्र अथवा शासकीय रूग्णालयात प्रसुती होणाऱ्या मातांना नवजात बालकांसाठी ₹ २,००० पर्यंतच्या बेबी केअर किट बॅग उपलब्ध करून देण्यात येतात. ही योजना कुटुंबातील पहिल्या बालकासाठी लागू आहे. सन २०२१-२२ मध्ये ४.०१ लाख बेबी केअर किट बॅग तर सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ३.४० लाख बेबी केअर किट बॅग वितरीत केल्या.

१०.४२.७ **किशोरवयीन मुलींसाठी योजना:** केंद्र शासनाचा आकांक्षित जिल्हा कार्यक्रम राज्यातील चार जिल्ह्यांमध्ये (गडचिरोली, नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम) राबविण्यात येत आहे. या चार आकांक्षित जिल्ह्यांमध्ये सन २०२२-२३ पासून सुधारित किशोरवयीन मुलींसाठी योजना राबविण्यात येत आहे. योजनेतील पोषण घटकाअंतर्गत निवडक किशोरवयीन मुलींची (१४-१८ वर्षे) आरोग्य व पोषण स्थिती सुधारण्यासाठी पोषण सहाय्य देणे. तसेच पोषणेतर घटकाअंतर्गत लोह व फॉलिक ॲसिड गोळया पुरविणे, आरोग्य तपासणी, संदर्भ सेवा, पोषण व आरोग्य शिक्षण, कौशल्य विषयक प्रशिक्षण देणे इत्यादी सुधारित योजनेचा उद्देश आहे. प्रति लाभार्थी प्रति दिन ₹ ९.५० खर्च (केंद्र व राज्य शासन हिस्सा ५०:५० प्रमाणे) केला जातो. सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत एकूण १,२४,७७९ लाभार्थ्यांवर ₹ चार कोटी खर्च झाला.

१०.४२.८ **अंगणवाडी दत्तक धोरण** : लोकसहभागातून अंगणवाडीच्या बळकटीकरणासाठी शासन माहे ऑक्टोबर २०२२ पासून अंगणवाडी दत्तक धोरण राबवित आहे. i) कॉर्पोरेट कंपनी व त्यांच्या मार्फत राबविण्यात येणारा कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) कार्यक्रम, ii) अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्था, विविध ट्रस्ट, रोटरी क्लब, लायन्स क्लब, इ. iii) व्यक्ती/कुटुंब/समूह यांच्याद्वारे अंगणवाडी दत्तक घेता येते. अंगणवाडी दत्तक घेणाऱ्या संस्थेने पायाभूत सुविधा व शैक्षणिक सुविधा, वृद्धी संनियंत्रण यंत्रांचा पुरवठा, प्रशिक्षण व कौशल्य विकास कार्यक्रम, आरोग्य तपासणी इत्यादी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सहभागी होणे अपेक्षित आहे. विविध कॉर्पोरेट कंपन्या (सीएसआर कार्यक्रमांतर्गत) आणि अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांद्वारे माहे जानेवारी, २०२३ पर्यंत ३,७०६ अंगणवाड्या दत्तक घेण्यात आल्या आहेत.

## एकात्मिक बाल संरक्षण योजना

१०.४३ बिकट परिस्थितीतील तसेच इतर असुरक्षित बालकांसाठी शासन व नागरीक यांच्या भागीदारीतून सुरक्षित वातावरण निर्मिती करणे हा एकात्मिक बाल संरक्षण योजनेचा उद्देश आहे. खुली निवारा गृहे, विशेष दत्तक स्रोत संस्था, बाल कल्याण समित्या, बाल न्याय मंडळे, जिल्हा बाल संरक्षण संस्था, राज्य बाल संरक्षण संस्था, शासकीय/अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांची बालगृहे, निरीक्षण गृहे, अनुरक्षण गृहे, इत्यादी कार्यक्रम एकात्मिक बाल संरक्षण या योजनेत समाविष्ट करण्यात आले आहेत. विविध कार्यक्रमांची माहिती खालीलप्रमाणे:

- विधी संघर्षग्रस्त आणि न्यायिक चौकशीसाठी पोलिसांनी ताब्यात घेतलेली मुले बाल न्याय मंडळांच्या आदेशानुसार निरीक्षण गृहात दाखल केली जातात. निरीक्षण गृहास शासनाकडून प्रति निवासी दरमहा ₹ ३,००० सहायक अनुदान दिले जाते.
- संगोपन आणि संरक्षणाची गरज असलेल्या १८ वर्षे वयापर्यंतच्या अनाथ, सोडून दिलेल्या, हरवलेल्या, विशेष काळजीची गरज असलेल्या एच.आय.व्ही./एड्सबाधित, संकटग्रस्त आणि अत्याचारीत मुला/ मुलींना बालगृहांत प्रवेश दिला जातो. शासनाकडून प्रति निवासी दरमहा ₹ ३,००० सहायक अनुदान बालगृहांना देण्यात येते.
- वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतर बालगृहातील मुलांना बालगृह सोडावे लागते. तथापि, वयाच्या १८ व्या वर्षी प्रशिक्षण किंवा शिक्षण अपूर्ण राहिल्याने त्यांच्यापैकी काही मुलांचे पुर्णत: पुनर्वसन झालेले नसते. अशा मुलांचे अनुरक्षणगृहांत पुनर्वसन केले जाते. शासनाकडून अनुरक्षण गृहांना प्रति निवासी दरमहा ₹ २,००० सहायक अनुदान देण्यात येते.

एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च तक्ता १०.३६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.३६ एकात्मिक बाल संरक्षण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांवर झालेला घटकनिहाय खर्च**

(₹ लाख)

| घटक | संस्थांची संख्या | क्षमता | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | लाभार्थी संख्या | खर्च | लाभार्थी संख्या | खर्च |
| खुली निवारा गृहे | १३ | ३९१ | २८३ | २८०.१६ | २६७ | २३९.४८ |
| दत्तक संस्था | १८ | २०७ | १५० | २७८.४४ | १९० | २६३.७० |
| शासकीय | | | | | | |
| बालगृहे | २५ | २,४२५ | ३८७ | १,२३०.७० | ३९२ | १,१७७.१२ |
| निरीक्षण गृहे | १२ | १,२०० | ९१ | ५२७.४२ | ८७ | ५६५.१२ |
| अनुरक्षण गृहे | ६ | ६०० | १४२ | २५१.८६ | -- | ०.०० |
| अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्था | | | | | | |
| निरीक्षण गृहे | ४० | १,९८४ | ८१९ | १,८९७.७२ | ८१२ | १,३१०.३० |
| बाल गृहे | ३२३ | १२,८८७ | ४,२७४ | ०.०० | -- | ०.०० |
| **एकूण** | **४३७** | **१९,६९४** | **६,१४६** | **४,४६६.३०** | **१,७४८** | **३,५५५.७२** |

*आधार* : महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + जानेवारी पर्यंत

## कोविड-१९ महामारीमुळे दोन्ही पालक गमावलेल्या बालकांना अर्थसहाय्य

१०.४४ कोविड-१९ महामारीमुळे राज्यातील अनाथ झालेल्या ० ते १८ वर्ष वयोगटातील बालकांचे पुनर्वसन करणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाकरीता सहाय्य करणे हा या योजनेचा उद्देश आहे. पात्र बालकांच्या नावे एकरकमी ₹ पाच लाख मुदत ठेवीच्या स्वरुपात लाभ देण्यात येतो. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत राज्यात ८०० बालकांना अर्थसहाय्य करण्यात आले आहे.

## फिरते पथक प्रकल्प

१०.४५ रस्त्यावर राहणाऱ्या मुलांची काळजी घेण्याच्या दृष्टीने आणि त्यांना शिक्षण व समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य शासनाने फिरते पथक हा नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरु केला आहे. या प्रकल्पासाठी केंद्र शासनाने ₹ ५० लाख निधी मंजूर केला आहे. हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, नाशिक, पुणे आणि नागपूर या जिल्ह्यांत सहा महिन्यांसाठी राज्यात राबविण्यात येत आहे.

## बाल संगोपन योजना:

१०.४६ अनाथ, निराधार, गरजू व बेघर बालकांना कौटुंबिक जीवन प्रदान करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास कार्यालय आणि अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांमार्फत ही योजना राज्यात राबविण्यात येत आहे. प्रत्येक बालकाला कौटुंबिक वातावरणात संगोपन मिळण्याचा हक्क आणि गरज असल्याने, बाल संगोपन योजनेंअंतर्गत थोडया किंवा वाढीव कालावधीसाठी बालकाला कुटुंब उपलब्ध करुन देण्यात येते. बालकांच्या मूलभूत खर्चाची पूर्तता करण्यासाठी शासनाकडून अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांद्वारे बाल संगोपन करणाऱ्या पालकांना दरमहा प्रति बालक ₹ १,१०० अनुदान दिले जाते. या योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेला गृहभेटी देणे यासह इतर प्रशासकीय खर्चाची पूर्तता करण्यासाठी दरमहा प्रति बालक ₹ १२५ सहाय्यक अनुदान दिले जाते. कोविड-१९ महामारीमुळे एक पालक गमावलेल्या बालकांनाही या योजनेअंतर्गत समाविष्ट करण्यात येते. सन २०२१-२२ मध्ये ४३,०४२ बालकांचे तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ५४,७१७ बालकांचे या योजनेअंतर्गत संगोपन करण्यात आले.

## चाचा नेहरू बाल महोत्सव

१०.४७ शासकीय/अशासकीय सामाजिक स्वयंसेवी संस्थांमध्ये पुनर्वसनासाठी दाखल झालेल्या सर्व मुलांच्या सुप्त गुणांना प्राधान्याने वाव देऊन त्यांच्यात बंधुत्व व संघभावना निर्माण व्हावी यासाठी चाचा नेहरू बाल महोत्सव राज्यातल्या प्रत्येक जिल्ह्यात व प्रादेशिक विभागात दरवर्षी नोव्हेंबर महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात आयोजित करण्यात येतो. क्रीडा, खेळ, वक्तृत्व, इत्यादी स्पर्धा आयोजित केल्या जातात आणि विजेत्यांना बक्षीसे दिली जातात. दरवर्षी प्रत्येक जिल्हयासाठी ₹ पाच लाख तर प्रत्येक विभागासाठी ₹ ५.८२ लाख निधी मंजूर करण्यात येतो. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ५५.७४ लाख खर्च झाला.

## बालकांवरील अत्याचार

१०.४८ बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे किंवा ज्या गुन्ह्यात बालके पीडित असतात त्यांना 'बालकांवरील अत्याचाराचे गुन्हे' म्हणून संबोधले जाते. बालकांवरील अत्याचारांचे राज्यातील नोंदविलेले गुन्हे तक्ता १०.३७ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.३७ बालकांवरील अत्याचारांचे राज्यातील नोंदविलेले गुन्हे**

(संख्या)

| गुन्हे शीर्ष | २०२० | २०२१ | २०२२+ |
|---|---|---|---|
| खून | १४९ | १४६ | ६९ |
| अर्भक हत्या | १० | ५ | ९ |
| भ्रूण हत्या | १२ | ६ | ३ |
| बालकांवरील बलात्कार | २,७८५ | ३,४५८ | ३,२६६ |
| अपहरण व पळवून नेणे | ७,३९२ | ९,५५५ | ९,५९४ |
| परित्याग | ११९ | १३२ | ५१ |
| इतर | ३,९०४ | ३,९३० | ३,८४४ |
| **एकूण** | **१४,३७१** | **१७,२३२** | **१६,८३६** |

\+ ऑक्टोबरपर्यंत

*आधार* : विशेष पोलीस महानिरिक्षक, (महिला व बाल अपराध प्रतिबंध विभाग) यांचे कार्यालय, महाराष्ट्र शासन

# रोजगार व दारिद्र्य

१०.४९ समाजाच्या सर्वसमावेशक आणि संतुलित आर्थिक विकासासाठी रोजगार निर्मिती व दारिद्र्य निर्मूलन महत्त्वाचे पैलू आहेत. अन्न, वस्त्र व निवारा यासारख्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी पुरेश्या संसाधनांचा अभाव म्हणजे दारिद्र्य. शिक्षणाचा अभाव, बेरोजगारी, कुपोषण, इत्यादी समस्या दारिद्र्य मुळे उद्भवतात. रोजगारामुळे दारिद्र्य कमी होण्यास हातभार लागतो तसेच लोकांच्या राहणीमानावर सकारात्मक परिणाम होताना दिसतो. रोजगार निर्मिती आणि स्वयंरोजगाराला प्रोत्साहन देण्यासाठी शासन विविध योजना/ कार्यक्रम राबविते. तसेच युवकांना सक्षम करण्यासाठी शासन विविध कौशल्य विकास कार्यक्रम राबवित आहे.

## रोजगार

१०.५० रोजगाराच्या संधी निर्माण करणे हे शासकीय उपक्रमांचे प्रमुख उद्दिष्ट असते. 'सर्वांना पूर्ण व उत्पादक रोजगार आणि प्रतिष्ठापूर्वक काम यासाठी प्रोत्साहन देणे' हे शाश्वत विकास ध्येय-८ आहे. रोजगार विषयक स्थिती दर्शविणाऱ्या आकडेवारीचे मुख्य स्रोत जनगणना, आर्थिक गणना आणि नियतकालिक श्रमबल पाहणी आहेत

### जनगणनेनुसार रोजगाराची स्थिती

१०.५१ जनगणना २०११ नुसार, राज्यात ४.९४ कोटी कामगार होते, त्यापैकी ४.३८ कोटी मुख्य कामगार व ०.५७ कोटी सिमांतिक कामगार होते. स्त्रियांचे प्रमाण मुख्य कामगारांमध्ये ३१.५ टक्के तर सिमांतिक कामगारांमध्ये ५३.६ टक्के होते. उद्योग प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता १०.३८ मध्ये व व्यवसाय प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी तक्ता १०.३९ मध्ये दिली आहे. जनगणना २०११ नुसार कामगारांचे आर्थिक कार्यानुसार वर्गीकरण परिशिष्ट १०.९ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.३८ उद्योग प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| उद्योग प्रकार | जनगणना २०११ | | जनगणना २००१ | |
|---|---|---|---|---|
| | मुख्य | सीमांतिक | मुख्य | सीमांतिक |
| कृषी व संलग्न कार्ये | ५२.१ | ६२.८ | ५३.५ | ७७.२ |
| खाणकाम व दगडकाम | ०.३ | ०.२ | ०.४ | ०.२ |
| वस्तूनिर्माण | ११.८ | ७.६ | १३.१ | ८.६ |
| वीज, वायू आणि पाणी पुरवठा | ०.४ | ०.१ | ०.५ | ०.१ |
| बांधकाम | ४.६ | ५.३ | ४.१ | ३.७ |
| व्यापार, दुरूस्ती, वाहतूक व साठवण, दळणवळण | १३.७ | ६.१ | १४.८ | ५.२ |
| वित्तीय सेवा आणि स्थावर मालमत्ता | १.९ | ०.६ | ३.८ | १.५ |
| लोक प्रशासन आणि संरक्षण | ५.३ | १.८ | ९.८# | ३.५# |
| इतर | ९.९ | १५.५ | | |
| **एकूण कामगार** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

# विभक्त माहिती उपलब्ध नाही

**तक्ता १०.३९ व्यवसाय प्रकारानुसार राज्यातील कामगारांची टक्केवारी**

(टक्के)

| व्यवसाय प्रकार | जनगणना २०११ | | | जनगणना २००१ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| लोक प्रतिनिधी, वरिष्ठ अधिकारी आणि व्यवस्थापक | ९.० | ४.२ | ८.० | ४.३ | १.७ | ३.८ |
| व्यावसायिक | ६.० | ७.३ | ६.३ | ५.१ | ६.३ | ५.३ |
| तंत्रज्ञ आणि सहयोगी व्यावसायिक | ६.६ | १३.४ | ८.१ | ६.० | १२.१ | ७.१ |
| लिपिक | ६.४ | ६.८ | ६.५ | ५.९ | ६.५ | ६.० |
| सेवा कामगार आणि दुकाने व बाजारपेठेतील विक्रेते | १३.४ | ८.३ | १२.३ | २०.२ | १२.२ | १८.८ |
| कुशल शेतकी आणि मत्स्य व्यवसाय कामगार | १.५ | १.६ | १.५ | २.७ | ५.९ | ३.३ |
| कला क्षेत्र आणि संबंधित व्यवसायामधील कामगार | १७.५ | १०.७ | १६.० | २२.३ | १८.९ | २१.७ |
| संयंत्र, यंत्रचालक आणि यंत्रांची जुळवणी करणारे | १२.१ | २.७ | १०.० | १३.७ | ३.० | ११.८ |
| प्राथमिक व्यवसाय करणारे | १७.८ | १८.८ | १८.१ | १६.३ | २४.० | १७.७ |
| व्यावसायिक प्रकारानुसार वर्गीकृत नसलेले कामगार | ९.६ | २६.१ | १३.२ | ३.४ | ९.४ | ४.५ |

*आधार* : भारताचे महानिबंधक यांचे कार्यालय

## आर्थिक गणनेनुसार रोजगाराची स्थिती

१०.५२  सहाव्या आर्थिक गणनेत (२०१३) पीक उत्पादन व लागवड, लोक प्रशासन, संरक्षण, अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा, घरगुती कामगाराचे मालक म्हणून कुटुंबांचे कार्य, विदेशी संघटना व संस्थाचे कार्य तसेच अनधिकृत कार्ये वगळता सर्व आस्थापनांचा समावेश करण्यात आला होता. पाचव्या आणि सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार तक्ता १०.४० मध्ये दिली आहे. सातव्या आर्थिक गणनेचे (२०१९) क्षेत्रिय काम पूर्ण झाले असून माहिती वैधतीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे.

**तक्ता १०.४०  पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेनुसार राज्यातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार**

(लाख)

| तपशिल | पाचवी आर्थिक गणना-२००५@ | सहावी आर्थिक गणना-२०१३ |
|---|---|---|
| एकूण आस्थापना | ४१.५३ | ६१.३७ |
| शेतकी आस्थापना | ६.०४ | १५.९२ |
| बिगर शेतकी आस्थापना | ३५.४९ | ४५.४६ |
| एकूण आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | १०५.२७ | १४५.१२ |
| शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | १०.५१ | २६.३९ |
| बिगर शेतकी आस्थापनेतील कार्यरत कामगारांची संख्या | ९४.७६ | ११८.७३ |

@ पाचव्या व सहाव्या आर्थिक गणनेच्या अर्थपूर्ण तुलनेसाठी पाचव्या आर्थिक गणनेतील लोक प्रशासन, संरक्षण व अनिवार्य सामाजिक सुरक्षा सेवा ही कार्ये विचारात घेण्यात आलेली नाही

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## नियतकालिक श्रमबल पाहणी नुसार रोजगाराची स्थिती

१०.५३  राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालयामार्फत दर पाच वर्षांनी रोजगार आणि बेरोजगारी बाबत पाहणी घेतली जात होती. श्रमबलाबाबत वेळोवेळी लागणारी माहिती उपलब्ध व्हावी यासाठी पुरविण्यासाठी राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने माहे एप्रिल, २०१७ पासून नियतकालिक श्रमबल पाहणी सुरू केली. या पाहणीतून श्रम शक्ती सहभाग दर, कामगार लोकसंख्या प्रमाण, बेरोजगारी दर हे महत्वाचे निर्देशक तयार केले जातात. हे निर्देशक व्यक्तिंची सामान्य स्थिती (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) आणि चालू आठवड्याच्या स्थिती वरून अंदाजित केले जातात.

१०.५३.१  सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) राज्यासाठी श्रम शक्ती सहभाग दर तक्ता १०.४१ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४१  सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) श्रम शक्ती सहभाग दर**

(टक्के)

| वयोगट | ग्रामीण | | | नागरी | | | ग्रामीण + नागरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति |
| **२०१८-१९** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५७.९ | २०.६ | ४१.१ | ५७.५ | १९.७ | ३९.३ | ५७.८ | २०.२ | ४०.३ |
| १५-५९ वर्षे | ७९.८ | ४२.९ | ६२.१ | ७९.६ | २४.८ | ५३.० | ७९.७ | ३५.१ | ५८.२ |
| १५ वर्षे व वरील | ७४.६ | ३८.५ | ५७.१ | ७२.८ | २२.१ | ४८.० | ७३.८ | ३१.६ | ५३.३ |
| सर्व वयोगट | ५८.२ | ३०.७ | ४५.० | ५६.७ | १७.५ | ३७.६ | ५७.६ | २५.१ | ४१.९ |
| **२०१९-२०** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५६.८ | २४.८ | ४२.४ | ५४.६ | २२.८ | ३९.४ | ५५.९ | २३.९ | ४१.१ |
| १५-५९ वर्षे | ८०.८ | ५३.१ | ६७.५ | ८०.१ | २८.६ | ५४.८ | ८०.५ | ४२.४ | ६२.१ |
| १५ वर्षे व वरील | ७६.९ | ४८.४ | ६३.० | ७३.९ | २५.७ | ५०.१ | ७५.६ | ३८.७ | ५७.५ |
| सर्व वयोगट | ५९.१ | ३७.९ | ४८.९ | ५८.१ | २०.६ | ३९.७ | ५८.७ | ३०.६ | ४५.० |
| **२०२०-२१** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५६.५ | २४.० | ४१.७ | ५८.२ | २२.१ | ४०.८ | ५७.२ | २३.२ | ४१.३ |
| १५-५९ वर्षे | ८०.४ | ४९.३ | ६५.४ | ८०.९ | २७.७ | ५४.६ | ८०.६ | ४०.२ | ६०.९ |
| १५ वर्षे व वरील | ७६.८ | ४३.५ | ६०.५ | ७३.४ | २४.९ | ४९.३ | ७५.४ | ३६.० | ५६.० |
| सर्व वयोगट | ५९.९ | ३४.४ | ४७.५ | ५७.८ | २०.० | ३९.२ | ५९.१ | २८.७ | ४४.२ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.२ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) राज्यासाठी कामगार लोकसंख्या प्रमाण तक्ता १०.४२ मध्ये देण्यात आले आहे.

**तक्ता १०.४२ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) कामगार लोकसंख्या प्रमाण**

(टक्के)

| वयोगट | ग्रामीण | | | नागरी | | | ग्रामीण + नागरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति |
| **२०१८-१९** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५०.१ | १७.१ | ३५.२ | ४९.५ | १५.४ | ३३.२ | ४९.८ | १६.४ | ३४.३ |
| १५-५९ वर्षे | ७५.८ | ४१.४ | ५९.३ | ७५.२ | २२.२ | ४९.५ | ७५.६ | ३३.१ | ५५.१ |
| १५ वर्षे व वरील | ७१.२ | ३७.३ | ५४.७ | ६९.० | १९.९ | ४४.९ | ७०.३ | २९.९ | ५०.६ |
| सर्व वयोगट | ५५.५ | २९.७ | ४३.१ | ५३.७ | १५.६ | ३५.२ | ५४.८ | २३.७ | ३९.८ |
| **२०१९-२०** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५१.० | २३.३ | ३८.५ | ४८.२ | १९.२ | ३४.४ | ४९.८ | २१.५ | ३६.८ |
| १५-५९ वर्षे | ७७.९ | ५२.४ | ६५.७ | ७६.७ | २६.९ | ५२.२ | ७७.४ | ४१.३ | ५९.९ |
| १५ वर्षे व वरील | ७४.४ | ४७.८ | ६१.५ | ७०.९ | २४.३ | ४७.८ | ७२.९ | ३७.७ | ५५.७ |
| सर्व वयोगट | ५७.२ | ३७.४ | ४७.७ | ५५.८ | १९.४ | ३७.९ | ५६.६ | २९.८ | ४३.६ |
| **२०२०-२१** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ५१.२ | २२.७ | ३८.२ | ४८.८ | १८.२ | ३४.१ | ५०.३ | २०.८ | ३६.५ |
| १५-५९ वर्षे | ७७.७ | ४८.७ | ६३.८ | ७५.८ | २५.५ | ५०.९ | ७६.९ | ३९.० | ५८.५ |
| १५ वर्षे व वरील | ७४.५ | ४३.१ | ५९.१ | ६८.९ | २३.० | ४६.२ | ७२.३ | ३५.० | ५३.९ |
| सर्व वयोगट | ५८.२ | ३४.१ | ४६.५ | ५४.२ | १८.५ | ३६.७ | ५६.६ | २७.९ | ४२.६ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.३ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) राज्यासाठी बेरोजगारी दर तक्ता १०.४३ मध्ये देण्यात आले आहेत.

**तक्ता १०.४३ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) बेरोजगारी दर**

(टक्के)

| वयोगट | ग्रामीण | | | नागरी | | | ग्रामीण + नागरी | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति | पुरूष | स्त्री | व्यक्ति |
| **२०१८-१९** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | १३.६ | १७.० | १४.४ | १३.९ | २१.५ | १५.७ | १३.७ | १९.० | १४.९ |
| १५-५९ वर्षे | ५.१ | ३.६ | ४.६ | ५.४ | १०.५ | ६.६ | ५.२ | ५.७ | ५.४ |
| १५ वर्षे व वरील | ४.६ | ३.३ | ४.२ | ५.२ | १०.२ | ६.३ | ४.९ | ५.४ | ५.० |
| सर्व वयोगट | ४.६ | ३.३ | ४.२ | ५.२ | १०.६ | ६.४ | ४.९ | ५.५ | ५.० |
| **२०१९-२०** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | १०.२ | ६.० | ९.१ | ११.७ | १५.४ | १२.७ | १०.८ | १०.० | १०.६ |
| १५-५९ वर्षे | ३.६ | १.३ | २.७ | ४.३ | ५.९ | ४.७ | ३.९ | २.६ | ३.५ |
| १५ वर्षे व वरील | ३.२ | १.१ | २.४ | ४.० | ५.६ | ४.४ | ३.५ | २.४ | ३.२ |
| सर्व वयोगट | ३.२ | १.१ | २.५ | ४.० | ५.६ | ४.४ | ३.५ | २.४ | ३.२ |
| **२०२०-२१** | | | | | | | | | |
| १५-२९ वर्षे | ९.३ | ५.५ | ८.३ | १६.१ | १७.६ | १६.५ | १२.१ | १०.४ | ११.६ |
| १५-५९ वर्षे | ३.३ | १.० | २.५ | ६.४ | ७.७ | ६.७ | ४.६ | ३.० | ४.१ |
| १५ वर्षे व वरील | २.९ | ०.९ | २.२ | ६.१ | ७.४ | ६.५ | ४.१ | २.७ | ३.७ |
| सर्व वयोगट | २.९ | ०.९ | २.२ | ६.१ | ७.४ | ६.५ | ४.१ | २.७ | ३.७ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

आलेख १०.२ : १५ वर्षे व वरील वयोगटाकरिता शिक्षण स्तरानुसार वर्षे २०२०-२१ करिता सामान्य स्थितीनुसार बेरोजगारी दर




१०.५३.४ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) निवडक राज्यांकरिता बेरोजगारी दर तक्ता १०.४४ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४४ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) निवडक राज्यांकरिता बेरोजगारी दर**

(टक्के)

| राज्य | २०१८-१९ | | २०१९-२० | | २०२०-२१ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| आंध्र प्रदेश | ४.५ | ७.३ | ३.९ | ६.८ | ३.३ | ६.० |
| गुजरात | ३.२ | ३.२ | १.४ | ३.० | ०.८ | ४.६ |
| कर्नाटक | २.७ | ५.१ | २.७ | ६.९ | २.१ | ३.८ |
| केरळ | ८.४ | ९.७ | ९.७ | १०.४ | ८.९ | ११.६ |
| मध्य प्रदेश | २.३ | ७.३ | १.७ | ६.९ | १.१ | ४.७ |
| **महाराष्ट्र** | **४.२** | **६.३** | **२.४** | **४.४** | **२.२** | **६.५** |
| राजस्थान | ४.६ | ९.५ | ३.२ | ९.० | ३.५ | १०.२ |
| तेलंगणा | ६.६ | ११.० | ५.२ | १०.२ | ३.४ | ७.७ |
| उत्तर प्रदेश | ७.१ | १०.३ | ३.१ | ८.८ | ३.३ | ८.० |
| **अखिल भारत** | **५.०** | **७.६** | **३.९** | ६.९ | **३.३** | **६.७** |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.५ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) राज्यातील काम करणाऱ्या व्यक्तिंची टक्केवारी तक्ता १०.४५ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.४५ सामान्य स्थितीनुसार (मुख्य कार्य स्थिती + दुय्यम कार्य स्थिती) काम करणाऱ्या व्यक्तिंची टक्केवारी**

(टक्के)

| क्षेत्र | २०१८-१९ | | | २०१९-२० | | | २०२०-२१ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण+ नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण+ नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण+ नागरी |
| कृषी व संलग्न कार्ये | ७०.४ | ४.३ | ४५.७ | ७५.१ | ३.६ | ४९.१ | ७३.२ | ४.० | ४९.५ |
| उद्योग | ११.० | ३०.४ | १८.३ | १०.१ | २८.० | १६.६ | ११.३ | ३२.० | १८.४ |
| सेवा | १८.६ | ६५.३ | ३६.० | १४.८ | ६८.४ | ३४.३ | १५.५ | ६४.० | ३२.१ |
| **सर्व** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार :* राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.६ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार राज्यातील नागरी भागाकरिता वयोगटनिहाय श्रम शक्ती सहभाग दर तक्ता १०.४६ मध्ये दिले आहेत.

**तक्ता १०.४६ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार नागरी भागाकरिता वयोगटनिहाय श्रम शक्ती सहभाग दर**

(टक्के)

| कालावधी | पुरूष | | स्त्री | | व्यक्ति | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२० | ५७.३ | ७२.९ | २१.३ | २२.६ | ३९.८ | ४७.८ |
| जानेवारी-मार्च, २०२१ | ५८.५ | ७२.९ | २१.४ | २२.८ | ४०.६ | ४८.० |
| एप्रिल-जून, २०२१ | ५७.० | ७१.७ | २०.५ | २२.० | ३९.६ | ४७.१ |
| जुलै-सप्टेंबर, २०२१ | ५७.३ | ७३.० | २०.० | २३.० | ३९.९ | ४८.६ |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२१ | ५६.१ | ७३.५ | २१.१ | २३.९ | ३९.५ | ४९.४ |
| जानेवारी-मार्च, २०२२ | ५६.७ | ७३.५ | २२.२ | २४.६ | ४०.५ | ४९.८ |
| एप्रिल-जून, २०२२ | ५७.० | ७३.७ | २४.३ | २५.१ | ४१.५ | ४९.९ |
| जुलै-सप्टेंबर, २०२२ | ५८.६ | ७४.६ | २३.८ | २६.२ | ४१.९ | ५०.७ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.७ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार राज्यातील नागरी भागाकरिता वयोगटनिहाय कामगार लोकसंख्या प्रमाण तक्ता १०.४७ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.४७ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार नागरी भागाकरिता वयोगटनिहाय कामगार लोकसंख्या प्रमाण**

(टक्के)

| कालावधी | पुरूष | | स्त्री | | व्यक्ति | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२० | २३.२ | ५२.२ | ८.१ | २२.२ | १५.६ | ३६.९ |
| जानेवारी-मार्च, २०२१ | ४४.२ | ६४.७ | १५.७ | १९.१ | ३०.४ | ४२.० |
| एप्रिल-जून, २०२१ | ४२.६ | ६२.४ | १४.६ | १८.३ | २९.२ | ४०.६ |
| जुलै-सप्टेंबर, २०२१ | ४६.७ | ६६.५ | १६.४ | २०.८ | ३२.६ | ४४.२ |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२१ | ४६.१ | ६८.५ | १७.६ | २२.२ | ३२.७ | ४५.९ |
| जानेवारी-मार्च, २०२२ | ४७.४ | ६८.६ | १८.४ | २२.६ | ३३.८ | ४६.३ |
| एप्रिल-जून, २०२२ | ४९.२ | ६९.५ | १९.५ | २३.० | ३५.० | ४६.८ |
| जुलै-सप्टेंबर, २०२२ | ५०.७ | ७०.६ | १९.१ | २४.० | ३५.६ | ४७.६ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.८ राज्यातील नागरी भागासाठी चालू आठवड्याच्या स्थितीनुसार वयोगटानिहाय बेरोजगारीचा दर तक्ता १०.४८ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.४८ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार वयोगटानिहाय नागरी भागासाठी बेरोजगारी दर**

(टक्के)

| कालावधी | पुरूष | | स्त्री | | व्यक्ति | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील | १५ ते २९ वर्षे | १५ वर्षे व वरील |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२० | २५.२ | १२.० | ३५.९ | १८.६ | २८.० | १३.६ |
| जानेवारी-मार्च, २०२१ | २४.५ | ११.३ | २६.८ | १६.२ | २५.१ | १२.४ |
| एप्रिल-जून, २०२१ | २५.४ | १३.० | २८.७ | १६.५ | २६.२ | १३.८ |
| जुलै-सप्टेंबर, २०२१ | १८.७ | ८.९ | १७.७ | ९.५ | १८.४ | ९.१ |
| ऑक्टोबर-डिसेंबर, २०२१ | १७.८ | ७.१ | १६.३ | ७.३ | १७.४ | ७.२ |
| जानेवारी-मार्च, २०२२ | १६.४ | ६.७ | १७.३ | ८.२ | १६.७ | ७.० |
| एप्रिल-जून, २०२२ | १३.८ | ५.८ | १९.८ | ८.२ | १५.५ | ६.४ |
| जुलै-सप्टेंबर, २०२२ | १३.५ | ५.३ | १९.७ | ८.२ | १५.२ | ६.१ |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

१०.५३.९ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार राज्यातील नागरी भागातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील काम करणाऱ्या व्यक्तिंची टक्केवारी तक्ता १०.४९ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.४९ चालू आठवड्याच्या स्थितीनुसार राज्यातील नागरी भागातील १५ वर्षे व त्यावरील वयोगटातील काम करणाऱ्या व्यक्तिंची टक्केवारी**

(टक्के)

| क्षेत्र | २०२०-२१ | | | | २०२१-२२ | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एप्रिल-जून | जुलै-सप्टेंबर | ऑक्टोबर-डिसेंबर | जानेवारी-मार्च | एप्रिल-जून | जुलै-सप्टेंबर | ऑक्टोबर-डिसेंबर | जानेवारी-मार्च |
| कृषी व संलग्न कार्ये | ४.८ | ४.३ | ४.६ | ४.१ | ३.८ | ३.८ | ३.० | ३.३ |
| उद्योग | २५.१ | २८.५ | २९.४ | ३०.५ | ३२.० | ३१.८ | ३१.८ | ३१.० |
| सेवा | ७०.१ | ६७.२ | ६६.० | ६५.४ | ६४.२ | ६४.४ | ६५.२ | ६५.७ |
| **सर्व** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, केंद्र शासन

## कारखान्यातील रोजगार

१०.५४ माहे ऑक्टोबर, २०२२ अखेर कारखाने अधिनियम १९४८, अंतर्गत नोंदणीकृत ३६,३१२ कारखाने कार्यरत होते व त्यातील सरासरी दैनिक रोजगार सुमारे २९.७८ लाख होता. एकूण कार्यरत कारखान्यांपैकी ५० किंवा त्यापेक्षा कमी कामगार असणाऱ्या कारखान्यांचे प्रमाण ७१.४ टक्के होते. राज्यातील सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी तक्ता १०.५० मध्ये दिली आहे. राज्यातील विविध उद्योगातील सरासरी दैनिक रोजगार परिशिष्ट १०.१० मध्ये दिला आहे. राज्यातील कार्यरत कारखाने व त्यातील रोजगार परिशिष्ट १०.११ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५० सरासरी दैनिक रोजगाराची टक्केवारी**

| उद्योग प्रकार | वर्ष | | |
|---|---|---|---|
| | २०२० | २०२१ | २०२२+ |
| ग्राहक वस्तू | २४.२ | ३६.८ | २२.८ |
| पुनर्निमाण वस्तू | १८.९ | १८.६ | २०.२ |
| भांडवली वस्तू | १०.७ | ७.८ | ११.८ |
| इतर | ४६.२ | ३६.८ | ४५.२ |
| **एकूण** | **१००.०** | **१००.०** | **१००.०** |

*आधार* : औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, महाराष्ट्र शासन

## रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगार

१०.५५ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील रोजगाराच्या संरचनेबाबतची माहिती उपलब्ध करून रोजगाराच्या स्तरांतील बदलांबाबतचे संनिरिक्षण करणे आहे. या कार्यक्रमांतर्गत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील आस्थापनांची संख्या व त्यामधील रोजगार यांची त्रैमासिक आकडेवारी गोळा करण्यात येते. या कार्यक्रमा अंतर्गत बृहन्मुंबई क्षेत्रासाठी २५ किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश असून राज्याच्या इतर भागात १० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांचा समावेश असतो. दिनांक ३० जून, २०२२ रोजी राज्यातील एकूण रोजगार ८०.३६ लाख होता, त्यापैकी स्त्रियांचे प्रमाण २८.२ टक्के होते. एकूण रोजगारापैकी ७०.८ टक्के रोजगार खाजगी क्षेत्रातील होता. रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसा र रोजगार तक्ता १०.५१ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५१ रोजगार क्षेत्र माहिती कार्यक्रमानुसार रोजगार**

('०००)

| वर्ष | सार्वजनिक क्षेत्र | | | खाजगी क्षेत्र | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण | पुरुष | स्त्री | एकूण |
| २०२० | १,६६३ | ६२५ | २,२८८ | ३,७३४ | १,४३२ | ५,१६६ | ५,३९७ | २,०५७ | ७,४५४ |
| २०२१ | १,६९२ | ६२२ | २,३१४ | ३,९४३ | १,५६४ | ५,५०७ | ५,६३६ | २,१८६ | ७,८२२ |
| २०२२+ | १,७०७ | ६४० | २,३४७ | ४,०६६ | १,६२३ | ५,६८९ | ५,७७३ | २,२६३ | ८,०३६ |

*आधार* : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + जून पर्यंत

## कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे नोंदणीकृत कर्मचारी

१०.५६ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी २० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापनांना लागू होतो. कर्मचारी भविष्य निर्वाह निधीसाठी नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या तक्ता १०.५२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५२ कर्मचारी भविष्य निर्वाह निधी साठी नोंद झालेल्या कर्मचाऱ्यांची संख्या**

(लाख)

| वर्ष | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|
| २०१८-१९ | १५.७६ | ६१.१२ |
| २०१९-२० | १७.४४ | ७८.५८ |
| २०२०-२१ | १४.९५ | ७७.०८ |
| २०२१-२२ | २६.४५ | १२२.३५ |
| २०२२-२३+ | १९.९६ | ९४.३१ |

*आधार* : कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटना ,केंद्र शासन #नोव्हेंबर पर्यंत

## राज्य शासनाच्या सेवेमधील कर्मचारी

१०.५७ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांची (सार्वजनिक उपक्रम, स्थानिक संस्था वगळून) दरवर्षी एक जुलै या संदर्भ दिनांकानुसार गणना घेतली जाते. दि. १ जुलै, २०२२ रोजी राज्य शासनाच्या सेवेमध्ये (गट अ ते ड) एकूण ७.२३ लाख मंजूर पदे होती व त्यापैकी एकूण रिक्त पदे ३२.८ टक्के होती. राज्य शासनाच्या सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे तक्ता १०.५३ मध्ये दिली आहेत.

**तक्ता १०.५३ राज्य सेवेमधील कर्मचाऱ्यांची गटनिहाय पदे**

(दि. १ जुलै, २०२२ रोजी ) (लाख)

| गट | पदे | | |
|---|---|---|---|
| | मंजूर | भरलेली | रिक्त |
| अ | ०.४३ | ०.२८ | ०.१६ |
| ब | ०.७४ | ०.४४ | ०.३० |
| क | ४.८२ | ३.४८ | १.३४ |
| ड | १.२४ | ०.६५ | ०.५८ |
| **एकूण अ ते ड** | **७.२३** | **४.८५** | **२.३७** |
| इ# | - | **२.३६** | - |

\# रोजंदारीवरील, मानधनावर काम करणारे, अंशकालीन व वेतन श्रेणी लागू नसलेले कर्मचारी

टीप : १) आकडेवारी अस्थायी

२) आकडे संक्षिप्तात दिल्याने काही ठिकाणी बेरजा जुळणार नाहीत

*आधार* : अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन

## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे

१०.५८ कामाच्या शोधात असणाऱ्या व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगारासाठी समुपदेशन, मार्गदर्शन व मदत करण्यासाठी राज्यात कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रे स्थापन करण्यात आली आहेत. दिव्यांग व्यक्तींसाठी एका विशेष केंद्रासह राज्यात एकूण ५० केंद्रे कार्यरत असून, त्यापैकी ३६ जिल्हा स्तरावर, सहा विद्यापीठात आणि आठ आदिवासींकरिता आहेत.

१०.५८.१ या केंद्रांच्या चालू नोंदवहीत ऑक्टोबर, २०२२ अखेर नोंदणीकृत व्यक्तींची संख्या ५८.३१ लाख होती. सन २०२२ मध्ये ऑक्टोबरपर्यंत या केंद्रात नोंदणी झालेल्या व्यक्तींची संख्या ३.४८ लाख होती. सन २०२२ मध्ये ऑक्टोबरपर्यंत ६.११ लाख अधिसूचित रिक्त जागांपैकी १.५६ लाख जागांवर नेमणुका करण्यात आल्या. अधिसूचित रिक्त पदे, भरण्यात आलेली पदे आणि चालू नोंदवहीत असलेल्या व्यक्तींचा शैक्षणिक पात्रतेनुसार तपशील अनुक्रमे परिशिष्ट १०.१२ व परिशिष्ट १०.१३ मध्ये दिला आहे.

## रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम

१०.५९ राज्य शासनामार्फत रोजगार प्रोत्साहनाकरिता खालील कार्यक्रम राबविण्यात येतात.

- **रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम :** सुशिक्षित बेरोजगार व्यक्तींना प्रत्यक्ष कामाचे अथवा इतर प्रात्यक्षिक प्रशिक्षण देणे
- **शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण कार्यक्रम :** शिकाऊ उमेदवारांना प्रशिक्षण देऊन उद्योगांना प्रशिक्षित मनुष्यबळ पुरविणे
- **उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम :** सुशिक्षित बेरोजगार युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत व प्रशिक्षित करणे

रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च तक्ता १०.५४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.५४ रोजगार प्रोत्साहन कार्यक्रमांतर्गत लाभार्थ्यांची संख्या व झालेला खर्च**

| कार्यक्रम | लाभार्थी (संख्या) | | | खर्च (₹ लाख) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| रोजगार प्रोत्साहन | २१,३५७ | २४,०१५ | १३,०५० | ५३.४३ | १८६.६३ | २९.५३ |
| शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण | ३४,१०३ | २९,४६८ | २७,६७१ | १,६२३.२५ | १५०२.५८ | १,३१८.७८ |
| उद्योजकता विकास प्रशिक्षण | ० | १४,७६४ | २७,३८३ | १३.०५ | ७२५.६२ | १,०५०.७६ |

*आधार* : १) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

२) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र शासन

३) उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन

१०.६० कुशल कामगारांना रोजगाराच्या संधी व त्याद्वारे उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावे या उद्देशाने राज्य शासनामार्फत सन २००९-१० पासून सर्व जिल्ह्यांमध्ये रोजगार मेळावे आयोजित करण्यात येतात. आयोजित केलेले रोजगार मेळावे व पुरविण्यात आलेला रोजगार तक्ता १०.५५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५५ आयोजित केलेले रोजगार मेळावे व पुरविण्यात आलेला रोजगार**

(संख्या)

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| रोजगार मेळावे | १९४ | २०२ | २२४ |
| सहभागी उद्योजक | १,६९५ | १,३४६ | १,८७७ |
| रोजगार मेळाव्यात उपस्थित युवक | २,६३,८३३ | ९३,१५३ | ८४,३१७ |
| पुरविण्यात आलेला रोजगार | २८,८१२ | ९,५९५ | २३,०३७ |

*आधार* : कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र शासन + ऑक्टोबरपर्यंत

१०.६१ राज्य शासनाच्या कौशल्य विकास योजनांच्या नियोजन, समन्वय, अंमलबजावणी तसेच सनियंत्रण साठी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी नोडल संस्था आहे. या संस्थेद्वारे विविध विभागांच्या सर्व कौशल्य विकास योजना एकत्रित करुन अंमलबजावणी केली जाते.

- **प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना** - या केंद्र पुरस्कृत योजने च्या माध्यमातून द्वारे युवकांना अधिक चांगल्या उपजिवीकेचे साधन उपलब्ध होण्यासाठी उद्योग संबंधित प्रशिक्षण देण्यात येते

- **प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान** - 'कुशल महाराष्ट्र, रोजगारक्षम महाराष्ट्र' या ध्येयपूर्तीसाठी राज्यातील १५ ते ४५ वर्षे वयोगटातील व्यक्तींना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते.

सन २०२२-२३ मध्ये अंमलबजावणी केलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांची माहिती तक्ता १०.५६ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५६ सन २०२२-२३ मध्ये अंमलबजावणी केलेल्या कौशल्य विकास प्रशिक्षण योजनांची माहिती**

(डिसेंबर पर्यंत)

| योजना | नोंदणीकृत उमेदवार | प्रशिक्षित उमेदवार | रोजगारीत / स्वयंरोजगारीत उमेदवार | रोजगारीत / स्वयंरोजगारीत उमेदवारांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| **केंद्र पुरस्कृत योजना** | | | | |
| प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना २.० | | | | |
| i) उद्योगांशी संबंघित कौशल्य प्रशिक्षण | ६९,५११ | ५७,८८७ | १९,३५४ | २७.८ |
| ii) कृषी प्रकल्प - सामुदायिक कौशल्य प्रशिक्षण | ३,५६,३२६ | २,८१,५४१ | ला.ना. | ला.ना. |
| iii) कृषी प्रकल्प - वैयक्तिक कौशल्य प्रशिक्षण | ३,७२० | २,४४६ | ० | ० |
| प्रधान मंत्री कौशल्य विकास योजना ३.० | | | | |
| i) अल्प मुदत प्रशिक्षण | ७,०६९ | ४,४०८ | १८२ | २.६ |
| ii) रिक्गनायशन ऑफ प्रायर लर्निग | ७,१११ | ४,६४२ | ला.ना. | -- |
| iii) कोविड योद्ध्यांसाठी कस्टमाइस्ड क्रॅश कोर्स | १८,९५८ | १२,२०२ | -- | -- |
| दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान | ३,४५,८९९ | २,५२,२५० | २,०७,११९ | ५९.९ |
| **राज्य पुरस्कृत योजना** | | | | |
| प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान | १,९९,४२९ | १,५६,४२० | १,१२,१९२ | ५६.३ |
| मुख्यमंत्री महा-आरोग्य कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम | १९,६८७ | १६,५२२ | ४,४९६ | २२.८ |
| किमान कौशल्य विकास कार्यक्रम | ७६,८२५ | ४८,७८७ | २०,५२९ | २६.७ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, महाराष्ट्र शासन    ला.ना. - लागू नाही

## रोजगार निर्मिती योजना

१०.६२ **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम-२००५ अंतर्गत उपजीविका सुरक्षेत वाढ करण्यासाठी प्रत्येक आर्थिक वर्षात अकुशल काम करण्यास इच्छुक असणाऱ्या प्रौढ व्यक्तीच्या प्रत्येक कुटुंबास किमान १०० दिवसांच्या मजुरीच्या रोजगाराची हमी देण्यात येते. प्रत्येक कुटुंबाच्या १०० दिवसांच्या रोजगारावरील खर्च केंद्र शासनामार्फत करण्यात येतो तर १०० दिवसांवरील अतिरिक्त रोजगारचा खर्च राज्य शासनामार्फत केला जातो. राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रगती तक्ता १०.५७ मध्ये दिली आहे. कामाच्या वर्गीकरणानुसार पूर्ण कामांची संख्या व त्यावर झालेला खर्च परिशिष्ट १०.१४ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.५७ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची राज्यातील प्रगती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| रोजगार पुरविलेल्या कुटुंबांची संख्या (लाख) | १६.८४ | २०.३६ | १९.३५ |
| त्यापैकी कुटुंबांची संख्या (लाख) | | | |
| १०० किंवा कमी दिवस रोजगार पुरविलेल्या | १५.५० | १८.६६ | १८.३० |
| १०० पेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविलेल्या | १.३४ | १.७० | १.०५ |
| १०० पेक्षा जास्त दिवस रोजगार पुरविण्यासाठी आलेला खर्च (₹ कोटी) | २५१.३१ | २५७.०६ | १८३.५० |
| रोजगार निर्मिती (कोटी मनुष्य दिवस) | ६.७९ | ८.२५ | ६.७३ |
| प्रति कुटुंब सरासरी रोजगार (दिवस) | ४० | ४१ | ३५ |
| रोजगारातील हिश्शाची टक्केवारी | | | |
| अनुसूचित जाती | ८.७ | ८.२ | ८.१ |
| अनुसूचित जमाती | २८.६ | २४.८ | १९.६ |
| महिला | ४२.९ | ४३.६ | ४५.० |
| पूर्ण झालेल्या कामांची संख्या | २,६१,८३० | २,३०,५६० | २,८९,२४४ |
| एकूण खर्च (₹ कोटी) | १,९६९.२२ | २,४०९.५१ | २,५२२.५७ |
| एक दिवसाच्या रोजगार निर्मितीचा खर्च (₹) | २९० | २९२ | ३७५ |

*आधार*: नियोजन विभाग (रोजगार हमी योजना), महाराष्ट्र शासन + जानेवारी पर्यंत

१०.६२.१ **मिशन अमृत सरोवर** - स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्याचा एक भाग म्हणून केंद्र शासनाने मिशन अमृत सरोवर दिनांक २४ एप्रिल, २०२२ रोजी सुरू केले. या मिशनद्वारे देशातील प्रत्येक जिल्ह्यामधील किमान ७५ जलस्रोतांचा विकास व पुनरूज्जीवन करण्याचे उद्दीष्ट आहे. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इतर योजनांच्या एकत्रिकरणातून या मिशनचे काम चालू आहे. या मिशन अंतर्गत राज्यातील ३,१२३ जलस्त्रोत निर्धारित करण्यात आले आहेत व दि. २२ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत त्यापैकी ९२९ जलस्त्रोताचे काम पूर्ण झाले.

१०.६३ **राज्य निधी रोजगार हमी योजना** - राज्य निधीतून 'मागेल त्याला शेततळे' योजना आणि 'नागपूर विभागात धडक सिंचन विहीर' योजना राबविण्यात येत असून त्यामधून अप्रत्यक्षरित्या ग्रामीण भागात रोजगार निर्मिती होते.

## महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान

१०.६४ दीनदयाळ अंत्योदय योजना- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) राज्य शासनामार्फत राबविण्यात येते. शेती आणि बिगर शेती क्षेत्रातील गरीब जनतेच्या विद्यमान उपजीविकेला स्थैर्य देऊन प्रोत्साहित करणे या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण क्षेत्रात बहुतांश गरीब जनतेचा शेती हा उपजीविकेचा मुख्य स्त्रोत असल्याने, या अभियानांतर्गत शाश्वत शेती आणि पशुपालन, लाकूड व्यतिरिक्त इतर वनोत्पज व मत्स्यपालन या संलग्न कार्यांवर मुख्य भर दिलेला आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची प्रगती तक्ता १०.५८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.५८ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची (*उमेद*) प्रगती**

| तपशिल | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| स्थापन झालेले स्वयंसहाय्यता गट (संख्या) | ७२,९७५ | ७७,३२० | ५८,४२३ |
| स्वयंसहाय्यता गटांतील सदस्य (संख्या) | ७,६६,२३८ | ७,२४,१९१ | ५,२०७५२ |
| प्राप्त निधी (₹ कोटी) | ४७०.९२ | २३१.९५ | ४८३.४२ |
| खर्च (₹ कोटी) | ३७१.८० | २८२.४८ | ४४७.२१ |
| कर्ज देण्यात आलेले स्वयंसहाय्यता गट (संख्या) | १,३१,३९६ | १,९३,०८९ | १,६४,९६२ |
| पत पुरवठा (₹ कोटी) | १,९८७.७७ | ३,७०२.६५ | ३,७१०.०० |

*आधार* : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन. + डिसेंबर पर्यंत

## दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियान

१०.६५ दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाचे उद्दिष्ट नागरी भागातील गरीब कुटुंबांना स्वयंरोजगाराच्या व कुशल मजुरी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊन त्यांचे दारिद्र्य व असुरक्षितता कमी करणे आहे. हे अभियान माहे मे, २०१७ पासून राज्यातील २५९ नागरी स्थानिक संस्थांच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत आहे. राज्यातील दीनदयाळ अंत्योदय योजना अभियानाची प्रगती तक्ता १०.५९ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.५९ राज्यातील दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानाची प्रगती**

| तपशिल | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| **वितरीत निधी** | | | |
| केंद्र शासन (₹ कोटी) | ५९.९६ | १००.५६ | २४.८३ |
| राज्य शासन (₹ कोटी) | ३८.०० | ६६.१३ | १६.५६ |
| **स्थापन झालेले स्वयंसहाय्यता गट** (संख्या) | ९,७७३ | १२,२१६ | ६,८०१ |
| **फिरता निधी प्राप्त स्वयंसहाय्यता गट** (संख्या) | ६,०९७ | ११,४२५ | ६,०८९ |
| **कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगार** | | | |
| प्रशिक्षण घेतलेले लाभार्थी (संख्या) | ३,६८८ | २,५१६ | ६८३ |
| रोजगार/स्वयंरोजगार प्राप्त झालेले लाभार्थी (संख्या) | ३,१७२ | ६४१ | ३२५ |
| **स्वयंरोजगार कार्यक्रम** | | | |
| **वैयक्तिक उद्योग** लाभार्थी (संख्या) | ३,९६६ | ५,३४३ | ३,०५७ |
| **गट उद्योग** लाभार्थी (संख्या) | १,९५५ | २,७२० | ५०० |
| **बँक जोड कार्यक्रम** लाभार्थी (संख्या) | १,०७,८६० | १,४३,२१० | ८८,४०० |

*आधार* : नगर परिषद प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र शासन. + डिसेंबरपर्यंत

## पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.६६ पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम राज्यामध्ये सन २००८-०९ पासून राबविण्यात येत आहे. नागरी भागात होणारे स्थलांतर कमी करण्यासाठी पारंपरिक कारागीर व बेरोजगार युवकांसाठी स्वयंरोजगार उद्योगांची उभारणी करुन नवीन रोजगाराच्या संधी निर्माण करणे व कारागिरांच्या मजुरी मिळविण्याच्या क्षमतेत वाढ करुन रोजगाराच्या संधीत वाढ करणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. हा कार्यक्रम राज्यात खादी आणि ग्रामोद्योग आयोग, महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्रांमार्फत राबविला जातो. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रगती तक्ता १०.६० मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.६० पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमाची प्रगती**

| तपशिल | २०१९-२० | २०२०-२१ | २०२१-२२+ |
|---|---|---|---|
| प्रकल्प (संख्या) | ४,३०३ | ३,०७० | २,०५९ |
| वितरीत मार्जिन निधी (₹ कोटी) | १०८.६४ | ८७.२१ | ७५.५२ |
| रोजगार निर्मिती (संख्या) | ३४,४२४ | २४,५६० | १६,४७२ |

*आधार* : उद्योग संचालनालय, महाराष्ट्र शासन +डिसेंबर पर्यंत

## बीज भांडवल योजना

१०.६७ बेरोजगार व्यक्तिंना उद्योग, सेवा व व्यवसाय यासारखे स्वयंरोजगार सुरू करण्याकरिता वित्तिय संस्थांद्वारे पुरविण्यात येणाऱ्या कर्जासाठी बीज भांडवल पुरवुन प्रोत्साहित करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राज्यातील बेरोजगार व्यक्ती किंवा १८ ते ५० वर्षे वयोगटातील सातवी उत्तीर्ण व्यक्तींचा गट या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत. सन २०२१-२२ मध्ये २८६ प्रकल्पांना ₹ ४.०१ कोटी बीज भांडवल निधी वितरीत करण्यात आला.

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

१०.६८ सूक्ष्म व लघु उद्योगांद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी राज्य शासन सन २०१९ पासून मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रकल्प किंमतीच्या १५ ते ३५ टक्के अर्थ सहाय्य अनुदान म्हणून दिले जाते. सन २०२०-२१, २०२१-२२ आणि २०२२-२३ (माहे डिसेंबर पर्यंत) मध्ये या कार्यक्रमांतर्गत अनुक्रमे ७,१९९, ४,५१९ आणि ५,३२१ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली.

## औद्योगिक संबंध

१०.६९ सन २०२२ मध्ये कामबंद (संप व टाळेबंदी) झालेली प्रकरणे १७ होती ज्यामध्ये ६,३६३ कामगार बाधित झाले आणि १८.५१ लाख मनुष्य दिवस वाया गेले. सन २०२१ मध्ये २९ कामबंद (संप व टाळेबंदी) प्रकरणांमुळे ६,७९९ कामगार बाधित झाले आणि १८.२८ लाख मनुष्य दिवस वाया गेले. राज्यातील औद्योगिक विवादाबाबतचा तपशील परिशिष्ट १०.१५ मध्ये दिला आहे.

## कामगार कल्याण

१०.७० कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी कामाच्या ठिकाणा व्यतिरिक्त कल्याणकारी योजना राबवून त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक आणि मानसिक स्तरात उन्नती करण्यासाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना सन १९५३ मध्ये करण्यात आली. माहे मार्च, २०२२ पर्यंत मंडळाकडे ४९.८५ लाख कामगारांसह १.५६ लाख आस्थापना नोंदणीकृत आहेत.

१०.७१ इमारत व इतर बांधकाम कामगारांच्या रोजगार व सेवाशर्तींचे नियमन करण्याच्या उद्देशाने तसेच सुरक्षा, आरोग्य व कल्याणासाठीच्या उपाय योजना करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने 'इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार व सेवाशर्ती नियमन) कायदा, १९९६' पारित केला आहे. या कायद्या अंतर्गत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली. राज्यात माहे मार्च, २०२२ पर्यंत एकूण ३३.८३ लाख नोंदणीकृत बांधकाम कामगार होते. बांधकाम कामगारांकरिता विविध योजना मंडळाकडून राबविल्या जातात आणि माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत लाभार्थ्यांची संख्या ६६.३६ लाख होती.

१०.७२ ई-श्रम पोर्टल-केंद्र शासनाच्या श्रम व रोजगार मंत्रालयाने असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षा सेवा देण्याच्या उद्देशाने असंघटीत कामगारांचा राष्ट्रीय माहितीकोष तयार करण्यासाठी ई-श्रम पोर्टल विकसित केले आहे. राज्यातून माहे फेब्रुवारी, २०२३ पर्यंत १.३५ कोटी असंघटीत कामगारांची नोंदणी ई-श्रम पोर्टलवर झाली असून त्यापैकी ५०.९ टक्के स्त्रिया आहेत. राज्यातील नोंदणीकृत असंघटीत कामगारांपैकी ५७.४ टक्के कामगार १८-४० वर्षे वयोगटातील आहेत तर १८-४० वर्षे वयोगटातील २६.१ टक्के कामगार आहेत. ई-श्रम पोर्टलवर फेब्रुवारी, २०२३ पर्यंत नोंदणीकृत राज्यातील कामगारांची संख्या तक्ता १०.६१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६१ व्यवसाय क्षेत्रनिहाय ई-श्रम पोर्टलवर नोंदणीकृत कामगारांची संख्या**

(लाख)

| व्यवसाय क्षेत्र | संख्या |
|---|---|
| कृषी | ७४.३४ |
| बांधकाम | १०.५१ |
| घरेलू कामगार | ६.९० |
| चर्मोद्योग | ६.८२ |
| वस्त्रोद्योग | ६.७० |
| वाहने व वाहतूक | ५.३६ |
| भांडवली वस्तू व उत्पादन | २.६६ |
| प्रशासन | २.४६ |
| पर्यटन व आदरातिथ्य | १.७३ |
| इलेक्ट्रानिक | १.६८ |
| आरोग्यसेवा | १.६८ |
| सौंदर्य व निरोगीपणा | १.१८ |
| शिक्षण | १.०३ |
| किरकोळ व्यापार | ०.९३ |
| इतर | ९.८२ |

*आधार:* श्रम व रोजगार मंत्रालय, केंद्र शासन

१०.७३ घरेलू कामगारांना कोणत्याही कामगार कायद्या अंतर्गत संरक्षण नाही या वस्तुस्थितीचा विचार करून राज्य शासनाने घरेलू कामगारांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ अधिनियम, २००८ पारित केला आहे. राज्यात एकूण ४.८५ लाख नोंदणीकृत घरेलू कामगार आहेत. कोविड-१९ महामारीच्या काळात '*ब्रेक द चेन*' या अभियानांतर्गत सन २०२१-२२ मध्ये शासनाने राज्यातील नोंदणीकृत सक्रीय घरेलू कामगारांना प्रत्येकी ₹ १,५०० थेट लाभ हस्तांतरणाद्वारे आर्थिक सहाय्य मंजूर केले. माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत ६०,९२३ घरेलू कामगारांना लाभ देण्यात आला.

१०.७४ प्रधानमंत्री श्रमयोगी मान-धन योजना - असंघटीत कामगारांना वृद्धापकालीन संरक्षण व सामाजिक सुरक्षा देण्यासाठी सन २०१९ मध्ये ही योजना सुरू करण्यात आली. या योजने अंतर्गत १८ ते ४० वर्षे वयोगटातील दरमहा ₹ १५,००० किंवा त्यापेक्षा कमी मासिक उत्पन्न असलेले आणि अन्य कुठल्याही निवृत्ती वेतन योजनेत सहभागी नसलेले असंघटीत कामगार पात्र आहेत. अशा पात्र कामगारांना त्यांच्या वयानुसार दरमहा ₹ ५५ ते ₹ २०० वर्गणी भरून ६० वर्षे वय पूर्ण झाल्यानंतर दर महा ₹ ३००० निवृत्ती वेतन दिले जाईल. राज्यात या योजनेंतर्गत ६,०३,६८५ असंघटीत कामगारांची दि. ३१ डिसेंबर, २०२२ पर्यंत नोंदणी झालेली आहे.

## बाल कामगार प्रतिबंध

१०.७५ बाल कामगार (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ चा उद्देश १४ वर्षांपेक्षा कमी वयाच्या बालकांना कामगार म्हणून घेण्यास प्रतिबंध करणे आहे. बालकांच्या आरोग्यासाठी धोकादायक आणि मनावर विपरित परिणाम करणाऱ्या १६ व्यवसाय व ६५ प्रक्रियांमध्ये बालकांना कामावर ठेवण्यास ह्या अधिनियमान्वये प्रतिबंध करण्यात आला आहे. अधिनियमातील सन २०१६ मधिल सुधारणेनुसार ज्या व्यक्तीने वयाची १४ वर्षे पूर्ण केली असून परंतू १८ वर्षे पूर्ण केलेली नाहीत अशांना किशोरवयीन संबोधले असून धोकादायक व्यवसायांमध्ये किशोरवयीनांना रोजगारास प्रतिबंध केला आहे. घरगुती उपक्रम आणि प्रशिक्षण केंद्रे या अधिनियमाच्या परिकक्षेतून वगळण्यात आली आहेत. सन २०२१ मध्ये ११७ ठीकाणी धाडी घालून ४२ बाल कामगार व ७० किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली आणि ४८ प्रकरणांमध्ये कायदेशीर कारवाई करण्यात आली. सन २०२२ मध्ये १२५ ठिकाणी धाडी टाकण्यात आल्या व तेथून २४ बाल कामगार व १०० किशोरवयीन कामगारांची सुटका करण्यात आली आणि ४५ कायदेशीर कारवाई करण्यात आली.

## दारिद्र्य

१०.७६ 'सर्व स्वरूपातील सार्वत्रिक दारिद्र्य नाहिसे करणे' हे शाश्वत विकास ध्येय-१ आहे. दारिद्र्य निर्मूलन करण्यासाठी शासनामार्फत विविध योजना/कार्यक्रम राबविण्यात येतात. तत्कालीन योजना आयोगाकडून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय संख्यिकी कार्यालयाद्वारे दर पाच वर्षांनी बृहद् स्तरावर घेतल्या जाणाऱ्या 'कुटुंबाच्या उपभोग्य बाबीवरील खर्च' या विषयावरील पाहणीच्या आधारे दारिद्र्य रेषा व दारिद्र्याचे प्रमाण यांचे अंदाज तयार करण्यात येतात. सन २०११-१२ साठी तेंडुलकर समितीच्या शिफारशींनुसार तयार करण्यात आलेले दारिद्र्याचे अंदाज सर्वात अलिकडचे उपलब्ध असलेले अंदाज आहेत.

१०.७६.१ सन २०११-१२ साठी देशस्तरावर ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा खर्च ₹ ८१६ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,००० अशी दारिद्र्य रेषा निश्चित करण्यात आली. राज्यातील ग्रामीण भागासाठी दरडोई दरमहा ₹ ९६७ आणि नागरी भागासाठी दरडोई दरमहा ₹ १,१२६ अशी दारिद्र्य रेषा निश्चित करण्यात आली. राज्यात दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण ग्रामीण भागासाठी २४.२ टक्के तर नागरी भागासाठी ९.१ टक्के होते. निवडक राज्यातील सन २०११-१२ साठी राज्यनिहाय दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण तक्ता १०.६२ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६२ निवडक राज्यातील सन २०११-१२ साठी दारिद्र्यरेषा आणि दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण**

| राज्य | दारिद्र्य रेषा (दरडोई दरमहा ₹) | | दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण | | |
|---|---|---|---|---|---|
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | एकूण |
| आंध्र प्रदेश | ८६० | १,००९ | ११.० | ५.८ | ९.२ |
| बिहार | ७७८ | ९२३ | ३४.१ | ३१.२ | ३३.७ |
| गुजरात | ९३२ | १,१५२ | २१.५ | १०.१ | १६.७ |
| कर्नाटक | ९०२ | १,०८९ | २४.५ | १५.३ | २०.९ |
| केरळ | १,०१८ | ९८७ | ९.१ | ५.० | ७.१ |
| मध्य प्रदेश | ७७१ | ८९७ | ३५.७ | २१.० | ३१.७ |
| **महाराष्ट्र** | **९६७** | **१,१२६** | **२४.२** | **९.१** | **१७.४** |
| पंजाब | १,०५४ | १,१५५ | ७.७ | ९.२ | ८.३ |
| राजस्थान | ९०५ | १,००२ | १६.१ | १०.७ | १४.७ |
| तामीळनाडू | ८८० | ९३७ | १५.८ | ६.५ | ११.३ |
| उत्तर प्रदेश | ७६८ | ९४१ | ३०.४ | २६.१ | २९.४ |
| पश्चिम बंगाल | ७८३ | ९८१ | २२.५ | १४.७ | २०.० |
| **अखिल-भारत** | **८१६** | **१,०००** | **२५.७** | **१३.७** | **२१.९** |

*आधार*: तत्कालीन नियोजन आयोग, केंद्र शासन

## बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक

१०.७७ बहुआयामी दारिद्र्य मोजमाप पद्धतीमध्ये एकमेकांवर अवलंबून असणाऱ्या व दारिद्र्यास कारणीभूत असणाऱ्या विविध बाबींचा अंतर्भाव केला जातो ज्यांचा आर्थिक बाबींवरुन करण्यात येणारे दारिद्र्याचे मोजमाप पद्धतीमध्ये समावेश नाही. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक मध्ये आरोग्य, शिक्षण आणि राहणीमानाचा दर्जा हे तीन समान भार असलेले आयाम आहेत. बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या प्रत्येक निर्देशकानुसार बहुआयामी गरीब व वंचित लोकसंख्येची टक्केवारी तक्ता १०.६३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६३ बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या प्रत्येक निर्देशकांनुसार बहुआयामी गरीब व वंचित लोकसंख्येची टक्केवारी**

(टक्के)

| आयाम | निर्देशक | महाराष्ट्र | अखिल भारत |
|---|---|---|---|
| आरोग्य | पोषण | १२.४ | १९.९ |
| | बाल व किशोर मृत्यू | ०.८ | १.९ |
| | माता आरोग्य | ७.१ | १४.७ |
| शिक्षण | शालेय शिक्षणाची वर्षे | ४.३ | १०.७ |
| | शालेय उपस्थिती | ३.० | ५.२ |
| राहणीमानाचा दर्जा | स्वयंपाकाचे इंधन | १२.५ | २३.१ |
| | स्वच्छता | १२.५ | २१.३ |
| | पिण्याचे पाणी | ५.३ | ५.५ |
| | वीज | ३.१ | ८.३ |
| | गृहनिर्माण | १०.१ | २०.६ |
| | मालमत्ता | ६.७ | ८.९ |
| | बँक खाते | ३.८ | ५.४ |
| बहुआयामी गरीब लोकसंख्या | | १४.९ | २५.० |
| बहुआयामी दारिद्र्य निर्देशांक | | ०.०६५ | ०.११८ |

*आधार*: नीती आयोग, केंद्र शासन

# गृहनिर्माण

१०.७८ निवारा ही मानवाच्या मूलभूत गरजांपैकी एक गरज आहे. सन २०३० पर्यत सर्वांसाठी पर्याप्त, सुरक्षित आणि परवडणारी घरे आणि मूलभूत सेवा मिळण्याची आणि झोपडपट्ट्यांचा दर्जा वाढ करण्याची सुनिश्चिती करणे हे शाश्वत विकास ध्येय ११ अंतर्गत एक लक्ष्य आहे. लोकसंख्या वाढ आणि वाढत्या नागरीकरणामुळे शहरी भागात झोपडपट्ट्यांचा विस्तार होत आहे. झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन आणि शहरी भागात घरे उपलब्ध करुन देणे हे मोठे आव्हान आहे. परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. राज्यातील स्थावर संपदा क्षेत्राचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) ची स्थापना करण्यात आली आहे.

## नागरी गृहनिर्माण

१०.७९ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) आणि शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) या शहरी भागात किफायतशीर दरात घरे बांधणाऱ्या राज्य संस्था आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही शहरी भागातील झोपडपट्ट्यांचे पुनर्विकास करणारी राज्य संस्था आहे.

### प्रधानमंत्री आवास योजना (नागरी)

१०.७९.१ 'प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) - सर्वांसाठी घरे' या केंद्रशासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत सन २०२२ पर्यंत सर्व पात्र नागरी कुटुंबांना मूलभूत सुविधांसह पक्की घरे उपलब्ध करुन दिली जाणार आहेत. नागरी भागातील अत्यल्प उत्पन्न गट, अल्प उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व झोपडपट्टीवासियांच्या घरांची कमतरता दूर करणे या योजनेचा उद्देश आहे. महिला सक्षमीकरणाला प्रोत्साहन देण्यासाठी या योजनेत महिला सदस्याच्या नावावर किंवा संयुक्त नावाने महिलेचे नाव प्रथम असलेल्या घरांची मालकी देण्यावर भर देण्यात येतो. या योजनेअंतर्गत राज्याने ३९१ शहरांमध्ये १९.४० लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत गृहप्रकल्पांना गती देण्याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळाची स्थापना केली आहे. या योजनेअंतर्गत गृहप्रकल्पांना निवासी क्षेत्रासाठी २.५ चटई क्षेत्रफळ आणि हरित किंवा ना-विकास क्षेत्रासाठी एक चटई क्षेत्रफळ निर्धारित करण्यात आले आहे. या योजनेअंतर्गत घरकुलांचे बांधकाम म्हाडा व सिडको यांचेमार्फत तसेच वैयक्तिकरित्या करण्यात येते. या योजने अंतर्गत माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत १४.९१ लाख घरकुलांचा समावेश असलेल्या एकूण १,५३० प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून त्यापैकी ६.९० लाख घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे.

### महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

१०.७९.२ मुंबई तसेच राज्याच्या काही भागात किफायतशीर दरात घरे उपलब्ध करुन देण्याकरिता राज्य शासनाने सन १९७७ मध्ये म्हाडाची स्थापना केली. स्थापनेपासून नोव्हेंबर, २०२२ पर्यंत म्हाडाने एकूण ४,९३,७४३ निवासी सदनिका/घरकुले (पुनर्विकासासह) बांधल्या आहेत. म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका/घरकुले तक्ता १०.६४ मध्ये आणि विविध उत्पन्न गटांसाठी सुधारित उत्पन्न मर्यादा व चटई क्षेत्र तक्ता १०.६५ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.६४ म्हाडाकडून बांधण्यात आलेल्या सदनिका/घरकुले**

(संख्या)

| वर्ष | अत्यल्प उत्पन्न गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | सदनिका | एकूण | संक्रमण शिबिरे | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २०२०-२१ | १,११० | ० | ० | ० | ५३ | १,१६३ | २७८ | ३८९.३२ |
| २०२१-२२ | १,८३१ | ६२ | २५६ | ० | २,१२२ | ४,२७१ | ० | ७५२.६६ |
| २०२२-२३+ | ६,९३५ | ९८४ | ६५९ | १४ | ० | ८,५९२ | ५३ | १,८७३.८४ |

*आधार:* म्हाडा + नोव्हेंबरपर्यंत

**तक्ता १०.६५ विविध उत्पन्न गटांसाठी सुधारित उत्पन्न मर्यादा व चटई क्षेत्र**

| उत्पन्न गट | सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (₹ वार्षिक) मुंबई महानगर क्षेत्र (एमएमआर), पुणे महानगर क्षेत्र (पीएमआरडीए), नागपूर महानगर क्षेत्र (एनएमआरडीए), नागपूर सुधार प्रन्यास प्रदेश (एनआयटी) तसेच १० लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | सुधारित कमाल उत्पन्न मर्यादा (₹ वार्षिक) उर्वरित महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था अंतर्गत क्षेत्र | अनुज्ञेय क्षेत्रफळ (चटई क्षेत्रफळ) |
|---|---|---|---|
| अत्यल्प उत्पन्न गट (इडब्ल्यूएस) | ₹ ६.०० लाख पर्यंत | ₹ ४.५० लाख पर्यंत | ३० चौ.मीटर पर्यंत |
| अल्प उत्पन्न गट (एलआयजी) | ₹ ९.०० लाख पर्यंत | ₹ ७.५० लाख पर्यंत | ६० चौ. मीटर पर्यंत |
| मध्यम उत्पन्न गट (एमआयजी) | ₹ १२.०० लाख पर्यंत | ₹ १२.०० लाख पर्यंत | १६० चौ. मीटर पर्यंत |
| उच्च उत्पन्न गट (एचआयजी) | कमाल मर्यादा नाही | कमाल मर्यादा नाही | २०० चौ. मीटर पर्यंत |

*आधार* : गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन

१०.७९.३ सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत बांधण्यात आलेल्या सदनिका/घरकुले यांचा तपशील तक्ता १०.६६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.६६ म्हाडाच्या विविध मंडळांमार्फत बांधण्यात आलेल्या सदनिका/घरकुले**

(सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत) (संख्या)

| म्हाडा मंडळ | अत्यल्प उत्पन्न गट | अल्प उत्पन्न गट | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | सदनिका | एकूण | संक्रमण शिबिरे | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई | २,२९२ | ७३६ | २९० | १४ | ० | ३,३३२ | ५३ | २३६.३६ |
| कोकण | ३,४२१ | १७६ | ० | ० | ० | ३,५९७ | ० | ३७०.६६ |
| नाशिक | ४२ | ० | ० | ० | ० | ४२ | ० | १०.२५ |
| पुणे | ६३६ | ० | ३५२ | ० | ० | ९८८ | ० | ४४४.४२ |
| औरंगाबाद | ४३२ | ० | ० | ० | ० | ४३२ | ० | २८.५२ |
| अमरावती | ० | ० | ६ | ० | ० | ६ | ० | ३९४.६६ |
| नागपूर | ११२ | ७२ | ११ | ० | ० | १९५ | ० | ३८८.९७ |
| **एकूण** | **६,९३५** | **९८४** | **६५९** | **१४** | **०** | **८,५९२** | **५३** | **१८७३.८४** |

*आधार* : म्हाडा

## शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित

१०.७९.४ शहर व औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित (सिडको) हे राज्यात नियोजनबद्ध गृहनिर्माण विकास कार्यक्रम राबवित आहे. स्थापनेपासून (१९७०) डिसेंबर, २०२२ पर्यंत सिडकोने एकूण १,९८,५४२ सदनिका/घरकुले बांधली आहेत व ५१,७८६ सदनिका/घरकुले यांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. स्थापनेपासून डिसेंबर, २०२२ पर्यंत सिडकोने बांधण्यात आलेल्या सदनिका/घरकुले यांचा तपशील तक्ता क्र. १०.६७ मध्ये दिला आहे.

१०.७९.५ प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत सिडकोने अत्यल्प उत्पन्न गट आणि अल्प उत्पन्न गट यांचेकरिता सन २०२०-२१ पर्यत १५,४३२ सदनिका बांधलेल्या असून डिसेंबर २०२४ पर्यंत ८९,८६८ सदनिका बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे.

**तक्ता १०.६७ सिडकोने बांधलेल्या सदनिका/घरकुले**

(स्थापनेपासून डिसेंबर, २०२२ पर्यंत) (संख्या)

| शहर | अत्यल्प/अल्प उत्पन्न गट | अत्यल्प/अल्प उत्पन्न गट (पीएमएवाय अंतर्गत) | मध्यम उत्पन्न गट | उच्च उत्पन्न गट | एकूण | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|---|---|---|
| नवी मुंबई | ६४,६४१ | १५,४३२ | ३५,२४५ | २८,७३६ | १,४४,०५४ | ३,५७९ |
| नाशिक | २१,३४३ | ० | २,६१९ | ५८२ | २४,५४४ | ४२ |
| औरंगाबाद | १९,५०१ | ० | २,१२७ | ४३२ | २२,०६० | ५६ |
| नांदेड | ७,७५८ | ० | १२६ | ० | ७,८८४ | ९ |
| एकूण | १,१३,२४३ | १५,४३२ | ४०,११७ | २९,७५० | १,९८,५४२ | ३,६८६ |

*आधार* : सिडको

### झोपडपट्टी पुनर्वसन योजना

१०.७९.६ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांचेकडून या योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. या योजनेअंतर्गत झोपडपट्टीत राहणाऱ्या कुटुंबांना सदनिका पुरविण्यात येत आहेत. योजनेच्या सुरुवातीपासून (१९९५) डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण २,२३१ प्रकल्प पूर्ण झाले आहेत आणि झोपडपट्टीत राहणाऱ्या २,४५,२९५ कुटुंबांचे सदनिकांमध्ये पुनर्वसन करण्यात आले आहे.

## ग्रामीण गृहनिर्माण

१०.८० शासन ग्रामीण गृहनिर्माणासाठी प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण), राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२, रमाई आवास योजना, शबरी आदिवासी घरकुल योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/वैयक्तिक घरकुल योजना, पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना, इत्यादी विविध योजना शासन राबवित आहे.

### प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

१०.८०.१ या योजनेअंतर्गत ग्रामीण भागातील बेघर व भूमिहीन लाभार्थ्यांना २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागातील लाभार्थ्यांना ₹ १.३० लाख अनुदान देण्यात येते. योजनेच्या सुरुवातीपासून (२०१६) डिसेंबर, २०२२ पर्यंत एकूण १४,१६,३०९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून त्यापैकी ९,२७,५०४ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेची प्रगती तक्ता १०.६८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६८ प्रधानमंत्री आवास (ग्रामीण) योजनेची प्रगती**

| वर्ष | घरकुले (संख्या) | | खर्च |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | साध्य | (₹ कोटी) |
| २०२०-२१ | २,८५,८४१ | १,९३,९०८ | २,६०१.६५ |
| २०२१-२२ | ३,९१,९२१ | ६६,३६० | १,४६९.७९ |

*आधार* : ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन

### राजीव गांधी ग्रामीण निवारा सुधारित योजना-२

१०.८०.२ दारिद्रय रेषेवरील परंतु अल्प उत्पन्न गटातील लाभार्थ्यांना घर बांधण्याकरिता ही योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत प्रति घरकुल ₹ एक लाख किंमत निर्धारित करण्यात आली असून त्यापैकी जिल्ह्यातील अग्रणी बँकेकडून ₹ ९०,००० कर्ज पुरविले जाते व उर्वरित ₹ १०,००० लाभार्थ्याने खर्च करावयाचे आहेत. कर्जावरील व्याज राज्य शासनाकडून अनुदानाच्या स्वरुपात दिले जाते. या योजनेअंतर्गत नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ₹ ८८.९३ कोटी व्याजाची रक्कम म्हाडामार्फत अग्रणी बँकांना वितरित करण्यात आली आहे.

### रमाई आवास योजना

१०.८१ राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता रमाई आवास योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ग्रामीण भागातील सर्व साधारण क्षेत्रात लाभार्थ्याला ₹ १.३२ लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागात लाभार्थ्याला ₹ १.४२ लाख आणि नागरी भागात लाभार्थ्याला ३२३ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ २.५० लाख अनुदान देण्यात येते. रमाई आवास योजनेची प्रगती तक्ता १०.६९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.६९ रमाई आवास योजनेची प्रगती**

| वर्ष | घरकुले (संख्या) | | | | खर्च (₹ कोटी) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लक्ष्य | | मंजूर | | | |
| | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी | ग्रामीण | नागरी |
| २०१९-२० | ९३,३७० | १८,१८५ | ९०,०६६ | ९,००६ | ३०० | ६० |
| २०२०-२१ | ० | ० | ० | ६५७ | १,००० | २० |
| २०२१-२२ | १,१७,८७१ | २२,६७६ | ६३,५३३ | १४,४६१ | ५६२.५० | ७५ |
| २०२२-२३+ | ० | ० | ० | ० | २६२.५० | १०५.५० |

*आधार* : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## शबरी आदिवासी घरकुल योजना

१०.८२ राज्यातील अनुसूचित जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता शबरी आदिवासी घरकुल योजना राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्याला सर्व साधारण क्षेत्रात ₹ १.३२ लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागात ₹ १.४२ लाख आणि नागरी भागातील लाभार्थ्याला २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ २.५० लाख अनुदान देण्यात येते. शबरी अदिवासी घरकुल योजनेची प्रगती तक्ता १०.७० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७० शबरी आदिवासी घरकुल योजनेची प्रगती**

| वर्ष | घरकुले (संख्या) | | खर्च (₹ कोटी) |
|---|---|---|---|
| | लक्ष्य | मंजूर | |
| २०१९-२० | ३८,१५३ | ३७,६४५ | १३५.११ |
| २०२०-२१ | ० | ० | २९७.२३ |
| २०२१-२२ | १८,५४४ | १६,९१० | १५०.३९ |
| २०२२-२३+ | २४,०७५ | ९४३ | १४७.०० |

*आधार* : आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/वैयक्तिक घरकुल योजना

१०.८३ यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत/वैयक्तिक घरकुल योजना विमुक्त जाती आणि भटक्या जमातीतील बेघर किंवा कच्चे घर असलेल्या कुटुंबांकरिता राबविण्यात येते. या योजनेअंतर्गत २६९ चौ. फूट क्षेत्रफळाचे घरकुल बांधण्यासाठी ₹ १.२० लाखापेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असणाऱ्या ग्रामीण भागातील लाभार्थ्याला सर्व साधारण क्षेत्रात ₹ १.२० लाख तर नक्षलग्रस्त व डोंगरी भागात ₹ १.३० लाख अनुदान देण्यात येते. सन २०२२-२३ या वर्षासाठी डिसेंबरपर्यंत एकूण ३,१०९ घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून ₹ १०.५६ कोटी खर्च झाला.

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

१०.८४ प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) व राज्याच्या अन्य ग्रामीण घरकुल योजनेअंतर्गत पात्र परंतु जागेअभावी घरकुलाच्या लाभापासून वंचित असलेल्या दारिद्र्य रेषेखालील लाभार्थ्यांसाठी 'पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना' राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत ५०० चौ. फूट जागा खरेदीसाठी ₹ ५०,००० मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य देण्यात येते. योजनेच्या सुरुवातीपासून (२०१७) डिसेंबर, २०२२ पर्यंत २६,०१८ लाभार्थ्यांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

## महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण

१०.८५ स्थावर संपदा (विनियम आणि विकास) अधिनियम, २०१६ कायद्याअंतर्गत राज्य शासनाने स्थावर संपदा क्षेत्राचे नियमन करण्यासाठी महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) ची स्थापना केली असून त्यामध्ये पारदर्शकता, वित्तीय शिस्त, नागरिक केंद्रितता, उत्तरदायित्व आणि सलोखा व अर्ध-न्यायिक यंत्रणेद्वारे तक्रारींचे जलदगतीने निराकरण या बाबी अंतर्भूत आहेत. माहे जानेवारी, २०२३ पर्यंत महारेराकडे एकूण ३९,१०६ प्रकल्पांची नोंदणी करण्यात आली. महारेराकडे १९,२१५ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्यापैकी १३,००६ तक्रारींचा निपटारा करण्यात आला.

# पाणी पुरवठा व स्वच्छता

१०.८६ निरामय मानवी जीवनाकरिता पुरेसे व स्वच्छ पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि स्वच्छतेच्या मूलभूत सुविधांची उपलब्धता असणे आवश्यक आहे. 'सर्वांसाठी पाणी व स्वच्छता यांची उपलब्धता व शाश्वत व्यवस्थापन यांची सुनिश्चिती करणे' हे शाश्वत विकास ध्येय आहे. सुरक्षित पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी व सुयोग्य स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन विविध योजना/कार्यक्रम राबवित आहे.

## पाणी पुरवठा

१०.८७ ग्रामीण व नागरी भागातील सर्व कुटुंबाना नियमित आणि सर्व सोयीच्या ठिकाणी पुरेसा व स्वच्छ पाणी पुरविण्यासाठी शासन विविध योजना स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत राबवित आहे.

## जल जीवन अभियान

१०.८८ 'हर घर नल से जल' हे उद्दिष्ट समोर ठेवून केंद्र शासनाने राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रम माहे सप्टेंबर, २०२० पासून जल जीवन अभियानामध्ये रुपांतरीत केला आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबास वैयक्तिक नळ जोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर प्रतिदिन गुणवत्तापूर्ण पाण्याचा पुरवठा करणे हे जल जीवन अभियानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. या अभियाना अंतर्गत सन २०२४ पर्यत ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंब, शाळा, ग्रामपंचायत इमारत, आरोग्य केंद्रे, सामुदायिक इमारत इत्यादींना वैयक्तिक नळ जोडणी पुरविण्यात येणार आहे. जल जीवन अभियाना अंतर्गत प्रमुख घटक खालीलप्रमाणे:

- प्रत्येक कुटुंबास नळ जोडणी देण्यासाठी गावात अंतर्गत नळपाणी पुरवठा पायाभूत सुविधांचा विकास करणे
- दीर्घकालीन शाश्वत पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी पिण्याच्या पाण्याच्या विश्वासाहार्य स्रोतांचा विकास आणि/किंवा विद्यमान स्रोतांमध्ये वाढ करणे
- प्रत्येक ग्रामीण कुटुंबास पाणी पुरवठयासाठी आवश्यक असेल तिथे मोठ्या प्रमाणात पाणी वहन, प्रक्रीया संयंत्रे आणि वितरण जाळे प्रस्थापित करणे
- पाण्याच्या गुणवत्तेची समस्या असलेल्या ठिकाणी पाण्यातील दूषित घटक काढून टाकण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करणे
- किमान ५५ लीटर दरडोई प्रतिदिन मानकानुसार पाणी पुरवठयासाठी पुर्ण झालेल्या आणि प्रगतीपथावर असलेल्या योजनांतर्गत वैयक्तिक नळजोडण्यांची पुनर्जोडणी करणे

१०.८८.१ राज्यात जल जीवन अभियानावर सन २०२१-२२ मध्ये ₹ २,८५५.६६ कोटी खर्च झाला. जल जीवन अभियानाची भौतिक प्रगती तक्ता १०.७१ मध्ये दिली आहे.

### मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम

१०.८९ पाणी पुरवठ्यात सुधारणा करुन पुरेसे व शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देण्याकरिता ग्रामीण भागामध्ये 'मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम' राज्यात राबविण्यात आला. या कार्यक्रमाचा कालावधी सन २०१६-१७ ते २०१९-२० होता. या कार्यक्रमा अंतर्गत ₹ ६०२.०६ कोटी रकमेच्या ७४३ नवीन नळ पाणी पुरवठा योजनांना मंजुरी देण्यात आली होती. प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण करण्याकरिता या कार्यक्रमास सन २०२२-२३ पर्यंत मुदत वाढ देण्यात आली आहे. माहे ऑक्टोबर, २०२२ पर्यंत ५३६ पाणीपुरवठा योजना पूर्ण झाल्या आहेत. बंद असलेल्या ३० प्रादेशिक नळ पाणी पुरवठा योजना पुनरुज्जीवित करण्यासाठी ₹ १२४.७८ कोटी रकमेस मंजुरी मिळाली असून त्यापैकी १६ योजना पूर्ण झाल्या आहेत.

**तक्ता १०.७१ जल जीवन अभियानाची भौतिक प्रगती**

(२१ फेब्रुवारी, २०२३ रोजी)

| प्रकार | एकूण संख्या | नळ जोडणी संख्या |
|---|---|---|
| कुटुंब | १,४६,७३,२०८ | १,०७,३४,१४० |
| शाळा | ८५,३१७ | ७९,२७४ |
| अंगणवाडी | ९१,२६७ | ८६,२३८ |

*आधार* : जल जीवन अभियान, भारत सरकार

### पाणी टंचाई निवारण कार्यक्रम

१०.९० पाणी टंचाईग्रस्त गावे व वाड्यांमध्ये दरवर्षी ऑक्टोबर ते जून या कालावधीत पाणी टंचाई निवारण कार्यक्रम राबविण्यात येतो. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमा अंतर्गत विभागनिहाय वितरीत निधी तक्ता १०.७२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.७२ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमा अंतर्गत विभागनिहाय वितरीत निधी**

(₹ कोटी)

| विभाग | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|
| कोकण | १२.१६ | १४.२८ |
| नाशिक | ८.६८ | ३.३१ |
| पुणे | ९.४५ | ९.४८ |
| औरंगाबाद | २.०० | १६.२८ |
| अमरावती | १८.७३ | १३.५२ |
| नागपूर | १५.११ | १४.४२ |
| **एकूण@** | **७२.२७** | **७३.३८** |

@ महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास वितरित केलेल्या निधीसह + ऑक्टोबरपर्यंत

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन

१०.९०.१ टंचाईग्रस्त गावे व वाड्यांमधील टंचाईची परिस्थिती हाताळण्याकरीता राज्याने तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा योजना, कूपनलिका व इतर पाण्याच्या स्रोतांचे पुनरुज्जीवन, टँकरने पाणी पुरवठा, इत्यादी विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. पाणी टंचाई निवारण कार्यक्रमा अंतर्गत समाविष्ट असलेली गावे व वाड्या यांची संख्या तक्ता १०.७३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७३ पाणी टंचाई निवारण कार्यक्रमा अंतर्गत समाविष्ट असलेली गावे व वाड्या**

(संख्या)

| कामाचे स्वरूप | गावे | | वाड्या | |
|---|---|---|---|---|
| | २०२०-२१@ | २०२१-२२$ | २०२०-२१@ | २०२१-२२$ |
| नवीन विंधण विहिरी | १,२२८ | १,४२८ | ५९७ | ८२१ |
| तात्पुरत्या नळ पाणी पुरवठा - विशेष दुरुस्ती | १,२६६ | ५७५ | २९८ | ११० |
| विंधण विहिरींची विशेष दुरुस्ती | १,०७४ | १,४५८ | १८३ | १५१ |
| तात्पुरती पूरक नळ जोडणी | १८२ | ११६ | ४६ | ३१ |
| टँकर/बैलगाडीने पाण्याचा पुरवठा | ५५७ | ५६० | ८९५ | १,३०२ |
| खाजगी विहिरींचे अधिग्रहण | १,८९० | २,०३७ | २६६ | २६१ |
| विहिरी खोलीकरण/गाळ काढणे | ५४ | २८६ | ४ | १० |

*आधार* : पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, महाराष्ट्र शासन @ ऑक्टोबर, २०२० ते सप्टेंबर,२०२१ $ ऑक्टोबर, २०२१ ते जून, २०२२

## जलस्वराज्य-२ कार्यक्रम

१०.९१ जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य-२ कार्यक्रम राज्यात जानेवारी, २०१४ ते सप्टेंबर, २०२० या कालावधीत प्रत्येक विभागातील दोन जिल्ह्यांमध्ये राबविण्यात आला आणि या कार्यक्रमास सप्टेंबर, २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. या कार्यक्रमा अंतर्गत शहरालगतच्या भागात ६० नळपाणी पुरवठा योजना राबविण्यात आल्या. पाणी टंचाईग्रस्त भागात आणि पाण्याची गुणवत्ता खालावलेल्या क्षेत्रात निर्धोक व सुरक्षित पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी ८० सामुहिक साठवण टाक्या आणि ६६ जल शुद्धीकरण संयंत्रे स्थापित करण्यात आली. या कार्यक्रमा अंतर्गत जागतिक बँकेकडून ₹ ५५७ कोटी कर्जरूपी अर्थसहाय्य प्राप्त झाले असून राज्याचा हिस्सा ₹ १९१ कोटी होता.

## अटल भूजल योजना

१०.९२ शाश्वत भूजल व्यवस्थापन सुलभ करण्याच्या उद्देशाने जागतिक बँक अर्थसहाय्यित अटल भूजल योजना राज्यामध्ये सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत राज्यातील अतिशोषित, शोषित आणि अंशत: शोषित पाणलोट क्षेत्र / गट असलेल्या १३ जिल्ह्यांमधील ३८ तालुक्यातील १,४४३ गावांची निवड करण्यात आली आहे. या योजनेमध्ये सामूहिक सहभाग, मागणी व्यवस्थापन आणि सद्यस्थितीत कार्यान्वित असलेल्या केंद्र व राज्य स्तरावर सद्यस्थितीत सुरु असलेल्या योजनांचे अभिसरण व पर्यायाने भूजल पातळी सुधारण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. सन २०२१-२२ मध्ये ₹ ३०.८२ कोटी निधी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ ४१.२४ कोटी खर्च झाला.

## अटल पुनरुज्जीवन व नागरी परिवर्तन अभियान

१०.९३ राज्यात अटल पुनरुज्जीवन व नागरी परिवर्तन अभियानाची (अमृत) अंमलबजावणी सन २०१५-१६ पासून करण्यात येत आहे. शहरांतील पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उपलब्ध करून देणे हा या अभियानाचा उद्देश आहे. प्रत्येक कुटुंबास खात्रीशीर पाणीपुरवठयासाठी नळ जोडणी आणि सांडपाणी व्यवस्था यांची सुनिश्चिती करणे हे अभियानाचे एक उद्दिष्ट आहे. या अभियाना अंतर्गत राज्यातील ४४ शहरे समाविष्ट असून त्यात नागरी भागातील ७६ टक्के जनतेचा समावेश आहे. या अभियाना अंतर्गत केंद्र शासनाने राज्याला ₹ ७,७५९ कोटींचे अनुदान मंजूर केले आहे.

१०.९३.१ या अभियाना अंतर्गत राज्यातील ३४ शहरांमधील ₹ ४,३१३ कोटी रकमेचे ३८ पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर असून त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यत १३ शहरांमधील एकूण ₹ ९३१ कोटी रकमेचे १४ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

१०.९३.२ शासनाने एकूण ₹ ३,२६७ कोटी रक्कमेचे ३० मलनि:सारण प्रकल्प मंजूर केले आहेत. त्यापैकी माहे जानेवारी, २०२३ पर्यंत तीन शहरांमधील एकूण ₹ ३१६ कोटी रकमेचे चार प्रकल्प प्रकल्प पूर्ण झाले आहेत.

१०.९३.३ शासनाने एकूण ₹ १७९ कोटी रकमेचे १२८ हरितक्षेत्र (अमृतवन) प्रकल्प मंजूर केले आहेत. त्यापैकी जानेवारी, २०२३ पर्यंत एकूण ₹ १७६ कोटी रकमेचे १२६ प्रकल्प कार्यान्वित झाले असून उर्वरित प्रकल्पांची कामे प्रगतीपथावर आहेत.

१०.९४ अमृत २.० अभियान सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधीमध्ये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये राबविण्यात येणार आहे. सर्व शहरातील घरांना नळजोडणी देऊन पाणी पुरवठ्याच्या बाबतीत १०० टक्के स्वयंपूर्ण करणे, जलस्रोत पुनरुज्जीवन व शहरातील मोकळ्या जागेमध्ये उद्याने व हरितक्षेत्र विकसित करणे आणि ४४ अमृत शहरांमध्ये १०० टक्के मल प्रक्रिया व मलनिःस्सारण जोडणी देणे हि या योजनेची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या अभियाना अंतर्गत १९२ प्रकल्पांना केंद्र शासनाने मान्यता दिली आहे असून त्यापैकी ८४ प्रकल्पांना राज्य शासनाची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

## महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान

१०.९५ राज्यातील महानगरपालिका (ड वर्ग), नगरपरिषदा आणि नगरपंचायती या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये पायाभूत सुविधांचा विकास व विस्तार निर्मिती करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान सन २०१० पासून राबविण्यात येत आहे. योजनेच्या सुरवातीपासून माहे डिसेंबर, २०२२ पर्यंत या अभियाना अंतर्गत ₹ १५,७३२ कोटी रकमेचे २६५ प्रकल्प मंजूर आहेत.

# स्वच्छता

१०.९६ घन आणि द्रव कचऱ्याचे व्यवस्थापन, मानवी मलमूत्राची सुरक्षितरित्या विल्हेवाट, शौचालयाचा योग्य वापर, आणि उघड्यावर शौच टाळणे यामुळे पर्यावरण राखण्यास मदत होते आणि मानवी आरोग्याचे रक्षण होते. स्वच्छतेच्या सुविधा पुरविण्यासाठी राज्यात विविध योजना राबविल्या जात आहेत.

## स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)

१०.९७ राज्यात दि.२ ऑक्टोबर, २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागात स्वच्छता राखणे, उघडयावर शौच करण्याच्या सवयीस प्रतिबंध करणे, कुटुंबांसाठी वैयक्तिक शौचालये बांधणे व त्यांच्या वापरात सातत्य राखणे ही या अभियानाची उद्दिष्टे आहेत. या अभियानामध्ये प्रत्येक कुटुंबांसाठी शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे आणि देश खुली हागणदारी मुक्त (ओडीएफ) व कचरा मुक्त करणे आणि कार्यक्षम घनकचरा व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करणे यावर भर देण्यात आला. या अभियाना अंतर्गत मुख्यत्वे घनकचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन करण्यासाठी ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या निकषानुसार प्रत्यक्ष अनुदान देण्यात येते.

१०.९७.१ स्वच्छ भारत अभियानाच्या (ग्रामीण) पहिल्या टप्प्यात (दि. २ ऑक्टोबर, २०१४ ते दि. ३१ मार्च, २०२०) अंतर्गत राज्याने ३४ जिल्ह्यांमधील, ३५१ पंचायत समिती आणि २७,६६८ ग्रामपंचायतींमध्ये १०० टक्के स्वच्छतेचे लक्ष्य साध्य केले व दि. १८ एप्रिल, २०१८ रोजी राज्यातील ग्रामीण महाराष्ट्रास खुली हागणदारी मुक्त (ओडीएफ) म्हणून घोषित करण्यात आले.

१०.९७.२ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)-२ सन २०२०-२१ ते २०२४-२५ या कालावधीत राबविण्यात येत आहे. घन कचरा आणि सांडपाणी व्यवस्थापन यांसारख्या उपक्रमांद्वारे ग्रामीण भागातील स्वच्छतेचा स्तर सुधारणे व गावांना खुली हागणदारी मुक्त (ओडीएफ)+ बनविणे आणि गावांची खुली हागणदारी मुक्तता स्थिती सातत्याने राखणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे .

१०.९७.३ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)-२ अंतर्गत प्लॅस्टिक कचरा व्यवस्थापन अंतर्गत २१ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्यापैकी एका प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. गोबरधन प्रकल्प अंतर्गत राज्याने ३६ प्रकल्पांचे उद्दिष्ट ठेवले असून ३४ प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून त्यापैकी ५ प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

१०.९७.४ स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)-२ अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबरपर्यंत, ₹ ६१.५७ कोटी खर्च झाला.

## स्वच्छ भारत अभियान (नागरी)

१०.९८ राज्यातील सर्व शहरे ओडीएफ करणे, आरोग्यदायी स्वच्छतेच्या सवयीतील बदल सुनिश्चित करून घनकचऱ्याचे व मलनि:सारणाचे शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणे हे या अभियानाची उद्दिष्टे आहेत. स्वच्छ भारत अभियानाच्या धर्तीवर शासनाने स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला सुरूवात केली. दि. २ ऑक्टोबर, २०१७ रोजी नागरी महाराष्ट्र हे ओडीएफ म्हणून घोषित करण्यात आले आहे. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत राज्यातील ३९६ शहरांपैकी १०७ शहरे ओडीएफ, ८६ शहरे ओडीएफ + आहेत, १९९ शहरे ओडीएफ ++, आणि चार शहरे वॉटर + झाले आहेत. शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या मैल्यावर प्रक्रिया करण्याकरिता राज्यस्तरावर धोरण राबविणारे महाराष्ट्र हे अग्रणी राज्य आहे. शासनाने एकूण ३११ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मैला प्रक्रिया केंद्रे उभारण्यास मान्यता दिली आहे. त्यापैकी २१५ शहरात प्रकल्प पूर्ण झाले असून प्रत्यक्ष वापरास सुरूवात झाली आहे. तसेच राज्यामध्ये ७,१५,३१४ वैयक्तिक शौचालये, ५५,३२६ सीट्स सार्वजनिक शौचालये व १,०४,९५४ सीट्स सामुदायिक शौचालये बांधण्यात आली आहेत.

१०.९८.१ स्वच्छ भारत अभियानाच्या (नागरी) २.० धर्तीवर राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० राबविले जाणार आहे. या अभियानाचा कालावधी दि. २ ऑक्टोबर, २०२१ ते दि. १ ऑक्टोबर, २०२६ हा आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश "कचरा मुक्त शहरे" हा आहे. या अभियाना अंतर्गत ३५८ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रति दिन १,६५६ दशलक्ष लिटर्स क्षमतेचे मल:निसारण प्रक्रिया, १८२३ कि.मी. नाला जोडणे व वाळविणे, ४७९ मैल उपसागाडी आणि १०,०५६ कि.मी. मलजल वाहिनी ऑक्टोबर, २०२६ पर्यंत उभारण्यात येणार आहेत.

## स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)-२०२२

१०.९९ राष्ट्रीय स्तरावर आयोजित स्वच्छ सर्वेक्षण (नागरी)-२०२२ मध्ये देशातील ६२ कटक मंडळांसह एकूण ४,३५५ शहरांनी भाग घेतला व त्यापैकी ४०० सहभागी शहरे राज्यातील होती. राज्याला तृतीय सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे राज्य म्हणून घोषित करण्यात आले व राज्यातील २० शहरांना राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला. देशातील पहिल्या १०० अमृत शहरांमध्ये राज्यातील १७ शहरांचा समावेश होता. पहिल्या १०० बिगर अमृत शहरांमध्ये राज्यातील ४० शहरांचा समावेश होता. राज्यातील एकूण १४१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना स्टार रेटिंग प्रमाणपत्र मिळाली आहेत. नवी मुंबई महानगर पालिकेला पाच स्टार रेटिंगआहे. ७९ शहरांना तीन स्टार आणि ६१ शहरांना एक स्टार प्रमाणपत्र मिळाले आहे. राज्यातील नऊ शहरांना स्वच्छ सर्वेक्षण २०२२ लीग परितोषिक मिळाले आहेत.

## घनकचरा व्यवस्थापन (नागरी)

१०.१०० राज्यात दररोज सरासरी २४,०२३ मे. टन कचरा निर्माण होतो, त्यापैकी ९९.९ टक्के कचरा दारोदारी जाऊन गोळा केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ९९.६ टक्के कचरा हा ओल्या व सुक्या स्वरूपात विलगीकृत केला जातो. गोळा केल्या जाणाऱ्या कचऱ्यापैकी ८७.२ टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते.

१०.१००.१ विलगीकरण केलेल्या ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया करून कंपोस्ट खताची निर्मिती केली जात असून त्याच्या विक्री व विपणनासाठी राज्याने 'हरित महासिटी कंपोस्ट' ब्रँडची नोंदणी केली आहे. राज्यातील एकूण १४१ शहरांना कंपोस्ट खताच्या विक्रीसाठी 'हरित महासिटी कंपोस्ट' ब्रँड वापरण्यास परवानगी दिली आहे.

## महाराष्ट्र सुजल आणि निर्मल अभियान

१०.१०१ पाणी टंचाई व पाण्याच्या वाढत्या मागणीवर मात करुन पिण्याचा पाण्याचा पुरवठा व स्वच्छता विषयक सुविधा सर्व नागरिकांना उपलब्ध करुन देणे हा अभियानाचा उद्देश आहे. शासनाने अभियाना अंतर्गत तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय सुधारणा करण्याच्या उद्देशाने फायदेशीर सेवा शुल्क अंतर्गत पाणी पुरवठा व स्वच्छता करिता दर्जेदार सेवा सुरु केली आहे. अभियानाच्या सुरूवातीपासून (२००८-०९) ते ऑक्टोबर, २०२२ पर्यंत पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या २५८ कामांना प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आणि ₹ ९३७.५८ कोटी खर्च झाला. सन २०२१-२२ मध्ये ₹ ९.६० कोटी निधी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये ऑक्टोबर पर्यंत ₹ ३.३६ कोटी खर्च झाला.

# पर्यावरण संवर्धन

१०.१०२ पर्यावरण संवर्धन हा शाश्वत विकासाचा महत्त्वाचा पैलू आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण, जागतिक तापमान वाढ, जंगलतोड, इत्यादीं घटक पर्यावरणाच्या ऱ्हासास कारणीभूत आहेत. हवामान बदलामुळे होणाऱ्या परिणामांवर उपाययोजना करण्याकरीता राज्य शासनाने सर्व समावेशक कृति आराखड्यासह धोरणे निश्चित केली आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत शासन विविध पर्यावरण विषयक कायद्यांची राज्यात अंमलबजावणी करत आहे.

## हवा प्रदूषण

१०.१०३ हवेचे प्रदूषण ही आरोग्य आणि पर्यावरण विषयक गंभीर समस्या असून, त्यामुळे हृदय व फुफ्फुसाचे आजार तसेच फुफ्फुस व श्वसनासंबंधी संसर्ग यांसारखे आजार उद्भवतात. वाहनांमधून तसेच उद्योगांमधून होणारे वायू उत्सर्जन, बांधकामे, रस्त्यावरील रहदारीमुळे वारंवार वातावरणात तरंगणारे धूलिकण आणि उघड्यावर जाळला जाणारा कचरा हे हवेच्या प्रदूषणास मुख्यत्वे कारणीभूत आहेत. हवेचे प्रदूषण प्रतिबंधित, नियंत्रित व कमी करण्यासाठी राज्यात हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय हवा गुणवत्ता सनियंत्रण उपक्रमांतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे राज्यातील २७ शहरांमधील १०२ स्थानांवर निरंतर हवा गुणवत्ता मूल्यांकन पद्धतीद्वारे नियमितपणे हवा प्रदूषणाचे मूल्यांकन केले जाते. निवडक नियंत्रण केंद्रात सन २०२१-२२ मध्ये नोंदविलेली परिसर हवा गुणवत्ता तक्ता १०.७४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७४ निवडक सनियंत्रण केंद्रात सन २०२१-२२ मध्ये नोंदविलेली परिसर हवा गुणवत्ता**

| नियंत्रण केंद्र | हवा प्रदूषकांची घनता | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | सल्फर डायऑक्साईड ($SO_2$) | | नायट्रोजन ऑक्साईड्स ($NO_x$) | | श्वसन प्रवण दूषित कण (RSPM) | |
| | मर्यादा ५० $\mu g/m^3$ | | मर्यादा ४० $\mu g/m^3$ | | मर्यादा ६० $\mu g/m^3$ | |
| | किमान | कमाल | किमान | कमाल | किमान | कमाल |
| मुंबई - सायन | ४ | ३० | १५ | ४९ | ४५ | १८० |
| मुंबई - कुर्ला पूर्व | ४ | १८३ | १४ | १७० | २० | ३४९ |
| मुंबई - विलेपार्ले | ४ | ४७ | ९ | १९२ | २६ | ३४५ |
| नवी मुंबई - महापे | ४ | ७७ | ९ | १७६ | ३५ | ३०२ |
| पुणे - स्वारगेट | ६ | ३७ | १२ | १५१ | ३१ | ३३२ |
| पुणे - भोसरी | ६ | ७२ | १९ | १०२ | ७४ | २२३ |
| नाशिक - मनपा इमारत | ४ | ८ | १० | ४० | २७ | ७१ |
| नाशिक - एमआयडीसी सातपूर | ४ | ८ | १४ | ३६ | २५ | ६८ |
| औरंगाबाद - कडा कार्यालय | ५ | ३६ | २४ | ६७ | ५३ | १२९ |
| औरंगाबाद - एमआयडीसी वाळूज | ४ | ६५ | ९ | ३५ | २२ | २३६ |
| अमरावती - शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय | ६ | १६ | ९ | २० | २९ | ८२ |
| अमरावती - एमआयडीसी अमरावती | ४ | २३ | ९ | २२ | १८ | ९० |
| नागपूर - सिविल लाईन्स | ४ | ३० | ९ | ५५ | ४ | २२५ |
| नागपूर - हिंगणा रोड | ४ | २२ | ९ | ५४ | १५ | २५७ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

$\mu g/m^3$ मायक्रोग्राम प्रति घन मीटर

१०.१०४ डिझेल, पेट्रोल व नैसर्गिक वायू यांसारख्या जीवाश्म इंधनांच्या ज्वलनाने कार्बन डायऑक्साईड वायू मोठ्या प्रमाणात उत्सर्जित होतो. हवा प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाद्वारे अल्प प्रमाणात गंधक असलेले डिझेल, शिसेरहित पेट्रोल, एलपीजी/ सीएनजी यांचा पर्यायी इंधन म्हणून वापर, प्रदूषण नियंत्रण प्रमाणपत्र अनिवार्य करणे, १५ वर्षे जुन्या वाहनांवर बंदी घालणे व आठ वर्षे जुनी वाहने एलपीजी/सीएनजी मध्ये रुपांतरित करणे, विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देणे अशा काही महत्वाच्या उपाययोजना करण्यात येत आहेत. सन २०२१-२२ मध्ये एकूण नोंदणीकृत वाहनांपैकी ४.८२ टक्के वाहने एलपीजी/सीएनजी व २.३२ टक्के वाहने विजेवर चालणारी होती तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत नोंदणीकृत वाहनांपैकी ७.४० टक्के वाहने एलपीजी/सीएनजी व ६.१६ टक्के वाहने विजेवर चालणारी आहेत. राज्यातील एलपीजी/ सीएनजी व विजेवर चालणाऱ्या वर्षनिहाय नोंदणीकृत वाहनांची संख्या तक्ता १०.७५ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७५ राज्यातील एलपीजी/सीएनजी व विजेवर चालणारी वर्षनिहाय नोंदणीकृत वाहने**

(संख्या)

| वर्ष | एकूण | त्यापैकी | |
|---|---|---|---|
| | | एलपीजी सीएनजीवर चालणारी | विजेवर चालणारी |
| २०१८-१९ | २५,३८,८३३ | १,३५,९८८ | ४,९५८ |
| २०१९-२० | २३,८३,४७७ | १,०१,२११ | ५,०५० |
| २०२०-२१ | १७,२८,६८८ | ६४,८७१ | ७,५४४ |
| २०२१-२२ | १८,८६,५९७ | ९१,०२० | ४३,७२२ |
| २०२२-२३+ | १६,३५,२१६ | १,२०,९३१ | १,००,७५० |

+ डिसेंबर पर्यंत

*आधार* : परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन

## जल प्रदूषण

१०.१०५ घरगुती वापराचे सांडपाणी, उद्योगांचे सांडपाणी, ग्रामीण भागामध्ये खते आणि कीटकनाशकांच्या वापराने प्रदूषित झालेले पाणी इत्यादी जलप्रदूषणास मुख्यत्वे कारणीभूत आहेत. यामुळे मानवामध्ये विविध जलजन्य रोग उद्भवतात आणि जलस्रोत व भूजलाचे प्रदूषण होते. राज्यात जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रणासाठी तसेच जल गुणवत्ता राखण्यासाठी किंवा पूर्ववत करण्यासाठी जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. राष्ट्रीय जल गुणवत्ता संनियंत्रण कार्यक्रम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून राबविण्यात येत असून या कार्यक्रमा अंतर्गत नियमितपणे भूपृष्ठावरील (यामध्ये नद्यांवर १५५, समुद्र/खाड्यांवर ३४, नाल्यांवर १०, धरणावर एक) तसेच भूपृष्ठाखालील (यामध्ये २४ कूप नलिका, २४ विहिरी, एक हातपंप, एक नलिका विहीर) अशा एकूण २५० जल गुणवत्ता संनियंत्रण केंद्रात पाण्याचे नमुने तपासले जातात. भूपृष्ठावरील पाण्याच्या नमुन्याचे दरमहा गुणवत्तेशी निगडीत नऊ मुख्य बाबी व १९ सामान्य बाबींचे आणि भूजल नमुन्याचे धातू व किटकनाशकांचे अंश शोधण्यासाठी सहामाही गुणवत्ता संनियंत्रण केले जाते. सन २०२१-२२ या कालावधीतील राज्यातील ५६ नद्यांच्या १५६ केंद्रांवरील जल गुणवत्ता तक्ता १०.७६ मध्ये दिली आहे. जानेवारी ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीची राज्यातील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रांतील जल गुणवत्ता तक्ता १०.७७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७६ सन २०२१-२२ या कालावधीतील राज्यातील ५६ नद्यांच्या १५६ केंद्रांवरील जल गुणवत्ता**

| बाब | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सामु (pH मूल्य ) | | जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी | | विरघळलेला प्राणवायू | | फिकल कॉलिफॉर्म | |
| ६.० ते ९.०# | | ३ मि ग्रॅ/लि# पेक्षा कमी | | ४ मि ग्रॅ/लि# पेक्षा जास्त | | एमपीएन/१०० मि लि# | |
| विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने | विस्तार | स्थाने |
| अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | १ | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी | ० |
| अनुज्ञेय मर्यादेत | १५६ | अनुज्ञेय मर्यादेत | २७ | अनुज्ञेय मर्यादेत | १५५ | अनुज्ञेय मर्यादेत | १५५ |
| अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | १२९ | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | ० | अनुज्ञेय मर्यादेपेक्षा जास्त | १ |

मिग्रॅ/लि मिलिग्रॅम / लिटर # केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाचे जल गुणवत्तेचे निकष, वर्ग क एमपीएन मोस्ट प्रोब्याबल नंबर

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**तक्ता १०.७७ जानेवारी ते सप्टेंबर, २०२२ या कालावधीतील भूपृष्ठावरील निवडक नद्यांवरील संनियंत्रण केंद्रातील जल गुणवत्ता**

| संनियंत्रण केंद्र | pH मूल्य | विरघळलेला प्राणवायू (मि ग्रॅ/लि) | बी.ओ.डी. (मि ग्रॅ/लि) | सी.ओ.डी. (मि ग्रॅ/लि) | नायट्रेट (मि ग्रॅ/लि) | फिकल कॉलीफार्म (मि ग्रॅ/लि) |
|---|---|---|---|---|---|---|
| कृष्णा नदी वरील राजापूर बंधारा | ७.६४ | ६.४१ | २.०० | १८.३६ | २.०६ | ५.६० |
| गोदावरी नदी वरील जायकवाडी धरण - पैठण | ८.३८ | ६.८८ | ३.२० | १२.४४ | १.०८ | ४.०० |
| मुळा-मुठा नदी वरील मुंढवा पूल | ७.५४ | ४.७० | ८.३८ | ३१.९७ | २.९४ | २२.०० |
| कन्हान नदी वरील मेसर्स विदर्भ पेपर मिल्सच्या उतारावर | ८.२४ | ५.८९ | ४.०१ | १४.२७ | १.६९ | २३.९१ |
| पुर्णा नदी वरील धुपेश्वर येथे मलकापूर वॉटर वर्क्स च्या वरील बाजूस | ७.९० | ५.६५ | ४.३० | १७.०० | १.२३ | २४.५० |
| दारणा नदी वरील दारणा धरण - अस्वली | ७.६७ | ५.९२ | ३.२६ | १८.६७ | ०.४४ | ५.२२ |
| सावित्री नदी वरील मुठावली गाव | ७.५२ | ६.५२ | २.०३ | २९.५६ | १.६६ | ६.११ |
| मिठी नदी वरील बांद्रा, मुंबई नजीकच्या पुलाजवळ | ७.१८ | २.१० | ४५.२२ | ९७.७८ | ५.२६ | २,७४१.११ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ बी.ओ.डी. जैव-रासायनिक प्राणवायूची मागणी सी.ओ.डी. रासायनिक प्राणवायूची मागणी

## सांडपाणी प्रक्रिया

१०.१०६ सांडपाणी प्रक्रियेद्वारे सांडपाण्यातील दूषित पदार्थ काढून टाकून सभोवतालच्या वातावरणात अथवा पुनर्वापरासाठीच्या यंत्रणेमध्ये सोडण्यासाठी योग्य अशा पाण्याची निर्मिती करुन जल प्रदूषण प्रतिबंधित केले जाते. राज्यातील ४१ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १४३ सांडपाणी प्रक्रिया केंद्रे (एसटीपी) असून त्यांची स्थापित क्षमता ७,८०० दशलक्ष लिटर प्रतिदिन आहे. सन २०२१-२२ मध्ये एकूण निर्माण झालेल्या सांडपाण्यापैकी ५१.५ टक्के पाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील सन २०२१-२२ मधील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया याबाबतची माहिती तक्ता १०.७८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७८ राज्यातील नागरी स्थानिक संस्थांच्या क्षेत्रातील सन २०२१-२२ मधील सांडपाणी निर्मिती व प्रक्रिया**

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या स्थानिक संस्था | सांडपाणी | |
|---|---|---|---|
| | | निर्मिती (दशलक्ष लिटर प्रतिदिन) | प्रक्रिया (दशलक्ष लिटर प्रतिदिन) |
| महानगर पालिका | २७ | ६,५०७ | ४,०१० |
| नगर पालिका | | | |
| अ वर्ग | १८ | २९२ | ७० |
| ब वर्ग | ७० | ४२३ | ५१ |
| क वर्ग | १५० | १५९ | ४४ |
| नगर पंचायत | १३१ | ७७४ | २९ |
| कटक मंडळे | ७ | ४२ | १५ |
| **एकूण** | **४०३** | **८,१९७** | **४,२१९** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घन कचरा व्यवस्थापन

१०.१०७ घन कचऱ्यामध्ये घरगुती घन कचरा, बांधकाम व पाडलेल्या बांधकामाचा मलबा, औद्योगिक घन कचरा, ड्रेनेज मलबा आणि निवासी व वाणिज्यिक संकुलातील घन कचरा यांचा समावेश होतो. राज्यात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर महानगरपालिका अथवा नगरपालिका व कटकमंडळांनी पुरविलेल्या ५६ सामाईक सुविधा प्रक्रिया केंद्रांवर प्रक्रिया करण्यात येते. सन २०२१ मध्ये एकूण निर्मित घन कचऱ्यापैकी ८४.९ टक्के घन कचऱ्यावर दर दिवशी प्रक्रिया करण्यात आली. घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी ३६८ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ४३७ कंपोस्टिंग प्रकल्प, ९४ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १३३ गांडूळखत प्रकल्प, ३८ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५३ बायोगॅस प्रकल्प, १२ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १९ आर. डी. एफ. (रिफ्यूज्ड डिराइव्ड फ्यूएल) प्रकल्प आणि कचऱ्यापासून वीज निर्मिती - ४ मेगा वॅटचा १ प्रकल्प कार्यरत आहे. राज्यातील सन २०२१ मधील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया तक्ता १०.७९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.७९ राज्यातील सन २०२१ मधील घनकचरा निर्मिती व प्रक्रिया**

| स्थानिक संस्था | माहिती देणाऱ्या संस्था | घनकचरा | |
|---|---|---|---|
| | | निर्मिती (मे.टन प्रतिदिन) | प्रक्रिया ( मे.टन प्रतिदिन) |
| महानगर पालिका | २७ | १९,४८० | १६,५८६ |
| नगर पालिका | | | |
| अ वर्ग | १८ | १,०४० | ८८६ |
| ब वर्ग | ७० | १,२८० | १,०८३ |
| क वर्ग | १५० | १,०८८ | ९४० |
| नगर पंचायत | १३१ | ४९४ | ३५५ |
| कटक मंडळे | ७ | १४८ | १३१ |
| **एकूण** | **४०३** | **२३,५३०** | **१९,९८१** |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## ध्वनी प्रदूषण

१०.१०८ ध्वनी प्रदूषण हे प्रामुख्याने औद्योगिक उपक्रम, बांधकाम उपक्रम, रस्ते वाहतूक, रेल्वे आणि विमानांचे संचालन यामुळे होते आणि त्यातून बहिरेपणा, भयगंड इत्यादींसारख्या आरोग्याच्या समस्या उद्भवतात. ध्वनी प्रदूषणाचा प्रभाव जाणून घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रमुख शहरांमध्ये प्रतिवर्षी परिसर ध्वनी स्तर नियंत्रण कार्यक्रम आयोजित केला जातो. निवासी, व्यावसायिक आणि शांतता क्षेत्राचा समावेश असलेल्या विविध ठिकाणी आवाजाची पातळी मोजली जाते. ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० नुसार निवासी भागाकरिता ध्वनी स्तर मर्यादा प्रमाणक दिवसा ५५ डेसिबल व रात्री ४५ डेसिबल आहे. निवडक शहरांतील सन २०२१ व सन २०२२ मधील दिवाळी दरम्यान दिवसा व रात्रीचे ध्वनीस्तराचे प्रमाण तक्ता १०.८० मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.८० निवडक शहरांतील सन २०२१ व २०२२ मधील दिवाळी दरम्यान दिवस-रात्रीचे ध्वनी स्तराचे प्रमाण**

(डेसिबल)

| ठिकाण | २४ ऑक्टो. २०२२ | | ४ नोव्हेंबर, २०२१ | | २६ ऑक्टो. २०२२ | | ६ नोव्हेंबर, २०२१ | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री | दिवसा | रात्री |
| मुंबई (शिवाजी पार्क-दादर) | ८२.० | ७७.९ | ८१.० | ७६.७ | ७९.९ | ६८.४ | ६९.२ | ६४.६ |
| मुंबई (चेंबूर) | ८३.६ | ६४.१ | ७५.९ | ६०.१ | ८३.५ | ७२.१ | ७१.९ | ५७.९ |
| ठाणे (गोखले रोड) | ७०.० | ६९.२ | ७१.८ | ६४.६ | ७०.१ | ६९.२ | ६९.३ | ५०.६ |
| ठाणे (वागळे इस्टेट) | ७६.० | ६६.५ | ६८.६ | ५९.६ | ७२.४. | ६५.४ | ७१.० | ५१.९ |
| पुणे (स्वारगेट) | ८६.९ | ७४.१ | ८१.१ | ६९.० | ७९.७ | ६३.१ | ८२.७ | ६३.१ |
| पुणे (लक्ष्मी रोड) | ८७.७ | ७६.२ | ८०.९ | ७४.७ | ८१.७ | ६१.० | ७६.९ | ६०.४ |
| नाशिक (मुख्य बस स्थानक ) | ७९.६ | ७८.२ | ७१.० | ६९.९ | ७१.१ | ६७.३ | ७०.६ | ६५.७ |
| नाशिक (बीटको पॉईंट) | ७७.७ | ७०.२ | ७१.० | ६७.७ | ७०.३ | ६६.४ | ६७.८ | ६५.६ |
| औरंगाबाद (सिटी चौक) | ७३.६ | ६१.३ | ६१.९ | ६०.७ | ६८.५ | ५१.५ | ६४.६ | ५७.९ |
| नांदेड - वाघाळा (गणेश नगर) | ५८.२ | ५७.३ | ६२.४ | ५४.६ | ६९.२ | ५०.६ | ६४.९ | ५४.१ |
| नागपूर (सदर) | ७२.५ | ६८.१ | ७१.६ | ६५.० | ६५.८ | ६१.३ | ६६.६ | ५५.६ |
| चंद्रपूर (जटपूरा गेट) | ७६.२ | ७२.६ | ६१.६ | ५४.३ | ६७.० | ६३.३ | ७०.४ | ६०.४ |
| अमरावती (राजकमल चौक) | ७७.२ | ७६.५ | ७४.७ | ७१.७ | ७४.२ | ६४.४ | ७२.८ | ६९.० |
| अकोला (जिल्हाधिकारी कार्यालय) | ७०.४ | ५९.६ | ७३.० | ५९.६ | ७१.४ | ५६.४ | ६९.२ | ५९.१ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## कारखान्यांमुळे होणारे प्रदूषण

१०.१०९ सन २०२२-२३ मध्ये डिसेंबर पर्यंत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेत एकूण १,०७,१९७ कारखाने होते.

१०.१०९.१ सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९७४ च्या कलम ३३अ व हवा (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, १९८१ च्या कलम ३१अ अंतर्गत १,२३५ कारखान्यांना निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या कारखान्यांवर १,४५० प्रकरणे न्यायालयात दाखल केली असून त्यापैकी डिसेंबर,२०२२ अखेर दोषी, खारीज किंवा मागे घेतलेल्या व प्रलंबित प्रकरणांची संख्या अनुक्रमे ३५५, ३७३ व ७२२ आहे.

१०.१०९.२ लघु उद्योगांमध्ये निर्माण होणाऱ्या घातक घनकचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट यासाठी प्रदूषण नियंत्रण उपकरणे बसविण्याकरिता सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्र योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य दिले जाते. एकूण २६ औद्योगिक वसाहतींमध्ये ७,८८५ कारखान्यांसाठी सामाईक सांडपाणी प्रक्रिया संयंत्रे कार्यान्वित केली आहेत. सन २०२१-२२ मध्ये प्रति दिन सरासरी १,४९५ लाख लिटर सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यात आली. प्रदूषण निर्देशांकावर आधारित सन २०२२-२३ मधील डिसेंबर अखेर कारखान्यांचे वर्गीकरण तक्ता १०.८१ मध्ये दिले आहे.

**तक्ता १०.८१ प्रदूषण निर्देशांकावर आधारित सन २०२२-२३ मधील डिसेंबर अखेर कारखान्यांचे वर्गीकरण**

(संख्या)

| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे विभाग | कारखाने | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | लाल | | | नारंगी | | | हिरवा | | | धवल | एकूण |
| | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | मोठे | मध्यम | लहान | | |
| मुंबई | ३२५ | २६ | ७०४ | ६०७ | २२१ | १,१९७ | ३२ | ३७ | २,४७६ | १०१ | ५,७२६ |
| ठाणे | २२६ | ४९ | ९९२ | २४५ | ४५ | १,०४८ | ३५ | २४ | २,०५६ | २०० | ४,९२० |
| कल्याण | १५४ | ७१ | २,०६९ | १२३ | ६७ | १,३८१ | ३५ | ३६ | २,१०५ | ६६० | ६,७०१ |
| नवी मुंबई | २०६ | ५४ | १,०९७ | १७३ | १११ | १,२२८ | ७३ | ६९ | २,१२० | ६४६ | ५,७७७ |
| रायगड | २४६ | ५० | ४७९ | ११५ | ४६ | ६६७ | ४४ | ३० | ७२६ | ८१ | २,४८४ |
| पुणे | १,३३८ | १५६ | २,५४४ | १,५३४ | ३८४ | ४,८५२ | ४९६ | ३५७ | ८,१३८ | २,२६१ | २२,०६० |
| कोल्हापूर | २७८ | ७३ | १,२३४ | १०२ | ११५ | ४,६३९ | ४४ | २७ | ७,५८५ | ४,०६४ | १८,१६१ |
| नाशिक | ४४८ | ९६ | १,६२४ | १८६ | १४६ | ३,१४१ | १२५ | ८९ | ५,९५५ | २,८२६ | १४,६३६ |
| औरंगाबाद | ३२७ | ३९ | ५४१ | १४१ | ११० | २,४१७ | ६४ | ७३ | ५,७१४ | २८१ | ९,७०७ |
| अमरावती | ३१ | ५ | १३० | २७ | १८ | २,०६३ | २ | १५ | ४,८४४ | ६६७ | ७,८०२ |
| नागपूर | २६० | ३२ | १,०११ | १३३ | १०४ | २,७९४ | १९ | २९ | २,७५० | ३७१ | ७,५०३ |
| चंद्रपूर | १४१ | ४१ | १०३ | २० | ३३ | ४६८ | १० | ४ | ७२५ | १७५ | १,७२० |
| **एकूण** | **३,९८०** | **६९२** | **१२,५२८** | **३,४०६** | **१,४००** | **२५,८९५** | **९७९** | **७९०** | **४५,१९४** | **१२,३३३** | **१,०७,१९७** |

लाल प्रदूषण निर्देशांक ६० किंवा जास्त नारंगी प्रदूषण निर्देशांक ४१ ते ५९ च्या दरम्यान हिरवा प्रदूषण निर्देशांक २१ ते ४० च्या दरम्यान धवल प्रदूषण निर्देशांक २० किंवा कमी

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## घातक कचरा

१०.११० मानवी आरोग्यास किंवा पर्यावरणास हानीकारक असणारा कचरा म्हणजे घातक कचरा होय. घातक व इतर कचरा व्यवस्थापनाकरिता घातक व इतर कचरा (व्यवस्थापन व सीमापार वाहतूक) नियम, २०१६ लागू आहे. राज्यात सन २०२१-२२ मध्ये ६,६१० प्राधिकृत उद्योगांमधून एकूण ११.९९ लाख मे. टन घातक कचरा (४८ टक्के भूभरण व भस्मीकरण करण्यायोग्य आणि उर्वरित पुर्नवापर करण्यायोग्य) निर्माण झाला असून त्यापैकी एकूण ४.०९ लाख मे.टन औद्योगिक कचरा सामाईक घातक कचरा प्रक्रिया केंद्रात पाठविण्यात आला. राज्यातील सामाईक सुविधा केंद्रांची एकूण क्षमता ४.९२ लाख मेट्रिक टन प्रतिवर्ष भूभरणाकरीता तर ५०,४०० मेट्रिक टन प्रतिवर्ष भस्मीकरण करीता आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ३१५ घातक कचरा वाहतुकदारांना प्राधिकृत केले असून घातक कचरा वाहून नेणाऱ्या वाहनांचा मागोवा घेण्यासाठी वाहनांवर ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम स्थापित करणे अनिवार्य केले आहे. राज्यात महापे (ठाणे), तळोजा (ठाणे), रांजणगाव (पुणे) आणि बुटीबोरी (नागपूर) येथे घातक कचरा व्यवस्थापनासाठी सामाईक सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. सामाईक सुविधा केंद्रांमधील घातक कचरा संकलन बाबत माहिती तक्ता १०.८२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८२ सामाईक सुविधा केंद्रांमधील घातक कचरा संकलन**

(लाख मे.टन)

| वर्ष | संकलन | | | | | प्रक्रिया | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुंबई वेस्ट मॅनेजमेंट लिमिटेड, तळोजा (ठाणे) | ट्रान्स ठाणे वेस्ट मॅनेजमेंट असोसिएशन, महापे (ठाणे) | महाराष्ट्र एन्विरो पॉवर लिमिटेड, रांजणगाव (पुणे) | विदर्भ एन्विरो प्रोटेक्शन लिमिटेड, बुटीबोरी (नागपूर) | एकूण | जमिनीत खोलवर पुरणे | भस्मीकरण |
| २०१९-२० | २.११ | ०.२३ | १.०८ | ०.२० | ३.६२ | ३.०३ | ०.५३ |
| २०२०-२१ | २.१९ | ०.११ | ०.९० | ०.१९ | ३.३९ | २.९१ | ०.४२ |
| २०२१-२२ | २.६० | ०.१८ | १.१० | ०.२१ | ४.०९ | ३.५१ | ०.५८ |

*आधार* : महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## इलेक्ट्रॉनिक कचरा

१०.१११ मोडीत काढलेले विद्युत तसेच इलेक्ट्रॉनिक उपकरणे व त्यांचे सुटे भाग म्हणजे ई-कचरा होय. सन २०२१-२२ मध्ये महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणास अनुकुल तंत्रज्ञान असलेल्या १३६ उद्योगांना ई-कचऱ्याचे भाग सुटे करणे/पुनश्चक्रण करणे यासाठी मान्यता दिली असून त्यांची एकूण क्षमता प्रतिवर्ष १,१७,३९२ मे.टन आहे. राज्यात सन २०२१-२२ मध्ये १८,५५९ मे.टन तर सन २०२०-२१ मध्ये १४,५०६ मे.टन ई-कचऱ्याचे भाग सुटे/ पुनश्चक्रण करण्यात आले.

## जैव-वैद्यकीय कचरा

१०.११२ जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ नुसार आरोग्य सेवा आस्थापनांना जैव-वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ प्राधिकृत करते. सन २०२१ मध्ये राज्यात एकूण ६४,९८९ आरोग्य सेवा आस्थापना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यक्षेत्रात होत्या. सन २०२१ मध्ये प्रतिदिन सुमारे ८०.३१ मेट्रिक टन जैव-वैद्यकीय कचरा निर्माण झाला, त्यापैकी ८०.१ मेट्रिक टन जैव-वैद्यकीय कचऱ्यावर ३० सामाईक जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा केंद्रांमध्ये (२९ केंद्र भस्मीकरण व एक केंद्र जमिनीत खोलवर पुरणे या पद्धतीवर कार्यरत) प्रक्रिया केली गेली, आणि ०.२१ मेट्रिक टन जैव-वैद्यकीय कचऱ्यावर २५९ आरोग्य सेवा सुविधांद्वारे बंदिस्त जैव-वैद्यकीय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट पद्धतीने प्रक्रिया करण्यात आली.

## प्लास्टिक कचरा

१०.११३ प्लास्टिक उत्पादने ही आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. प्लास्टिक व थर्माकोल कचऱ्याचे संकलन, विलगीकरण व विल्हेवाट लावण्याच्या अयोग्य पद्धतींमुळे पर्यावरणविषयक अनेक समस्या निर्माण होत असल्याचे निदर्शनास आले आहे. जैव-विघटनशील नसणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यामध्ये होत असलेली वाढ पर्यावरणास व आरोग्यास हानिकारक आहे. काही प्रकारच्या प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादनांच्या उत्पादन व वापरावर बंदी घालण्याकरीता राज्य शासनाने महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल उत्पादने (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवण) अधिसूचना, २०१८ जारी केली असून त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा केल्या आहेत.

१०.११३.१ राज्यात ३७४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ५१० मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी केंद्रे असून तेथे सुक्या कचऱ्यातून प्लास्टिक,कागद, लोखंड, इलेक्ट्रॉनिक साहित्य इत्यादी वेगळे करून पुनर्प्रक्रियेकरीता पाठविले जाते. माहे ऑगस्ट, २०२२ अखेर राज्यात २३४ प्लास्टिक पुनर्प्रक्रिया उद्योग असून त्यांची एकूण क्षमता प्रति वर्ष ५.९७ लाख मे.टन आहे. सन २०२१-२२ मध्ये ४.९० लाख आस्थापनांची निरीक्षणे घेण्यात आली, ४३.३९ मे.टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले व प्रतिबंधित प्लास्टिक किंवा थर्मोकोल उत्पादने वापराबद्दल १५,७७२ आस्थापनांकडून ₹ १.७५ कोटी दंड वसूल करण्यात आला. राज्यात नागरी भागात निर्मित, संकलित आणि विल्हेवाट लावलेल्या प्लास्टिक कचऱ्याची माहिती तक्ता १०.८३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८३ राज्यात नागरी भागात निर्मित, संकलित आणि विल्हेवाट लावलेल्या प्लास्टिक कचऱ्याची माहिती**

(लाख टन)

| वर्ष | निर्मित | संकलित | विल्हेवाट | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | आरडीएफसाठी | सहप्रक्रियेसाठी | ग्रॅन्युल तयार करण्यासाठी | पायरोलिसीस साठी | रस्ते बांधणीसाठी | भूभरण सुविधेसाठी |
| २०१९-२० | ४.४४ | ३.४८ | १.०९ | ०.१६ | ०.१८ | ०.०६ | ०.०५ | ०.२४ |
| २०२०-२१ | ३.११ | २.५२ | १.२५ | ०.२५ | ०.२९ | ०.०५ | ०.१४ | ०.२३ |
| २०२१-२२ | ३.०६ | ३.०५ | १.६७ | ०.४७ | ०.४६ | ०.०५ | ०.१२ | ०.१९ |

*आधार*: महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ    आर. डी. एफ.- रिफ्यूज्ड डिराइव्ड फ्यूएल

## सागरतटीय विनियमन

१०.११४ केंद्र शासनाने पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ अंतर्गत सागरी किनारा क्षेत्रातील पर्यावरणाचे संरक्षण, संवर्धन आणि विकास कामांचे नियमन करण्यासाठी सागरतटीय विनियमन क्षेत्र अधिसूचना पारित केली आहे. या अधिसूचनेनुसार प्रत्येक राज्याने सागर तटीय व्यवस्थापन आराखडा तयार करून त्यास केंद्र शासनाची मंजुरी घेणे आवश्यक आहे. केंद्र शासनाने सागरतटीय विनियमन क्षेत्रच्या अधिसूचनांची योग्य तऱ्हेने अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र तटीय क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण नियुक्त केले आहे. महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत राज्यातील सागरतटीय विनियमन क्षेत्रातील बांधकामांना सागरतटीय विनियमन क्षेत्र अधिसूचना मधील तरतुदीनुसार परवानगी देण्यात येते. उच्चतम भरती रेषा निश्चित करण्यात आली आहे व राज्यातील सात तटीय जिल्ह्यांचे सागर तटीय व्यवस्थापन नकाशे तयार करण्यात आले असून मान्यतेकरीता केंद्र शासनाकडे पाठविण्यात आले आहेत. राज्य शासनाने सागर तटीय विनियमन अधिसूचने अंतर्गत दिलेल्या मान्यतांचा तपशिल तक्ता १०.८४ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८४ सागरतटीय विनियमन अधिसूचनेअंतर्गत देण्यात आलेल्या मान्यता**

| वर्ष | नविन इमारत बांधकाम प्रकल्प | इमारत पुनर्बांधकाम प्रकल्प | पायाभूत सुविधा जसे जेट्टी, धूपप्रतिबंधक बंधारे, पाईपलाईन, पूल, रस्ते, पाणी पुरवठा, इलेक्ट्रीक उपकेंद्र इत्यादि | सीआरझेड | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| २०२१ | ३६ | २२ | ४९ | ८ | ११५ |
| २०२२ | २७ | २१ | ५९ | ५ | ११२ |

*आधार*: पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन

## पर्यावरणविषयक मान्यता

१०.११५ केंद्र शासनाने पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ जारी केलेली असून त्यानुसार नवीन बांधकाम प्रकल्प किंवा विद्यमान प्रकल्पांचे किंवा क्रियाकलापांचे विस्तार किंवा आधुनिकीकरण करण्यासाठी पूर्व पर्यावरणीय अनुमती घेणे बंधनकारक आहे. पर्यावरणविषयक अनुमती प्रदान करणेसाठी राज्य पर्यावरण आघात मूल्यांकन प्राधिकरण गठीत करण्यात आले आहे. सन २०१६ पासून पर्यावरणविषयक मान्यता ऑनलाईन सेवेद्वारे प्रदान करण्यात येतात. माहे नोव्हेंबर, २०२२ पर्यंत ६,५३० अर्जांना शासनाने ऑनलाईन प्रक्रियेद्वारे पर्यावरणविषयक मान्यता प्रदान केल्या आहेत. राज्य शासनाने प्रदान केलेल्या पर्यावरण विषयक मान्यतांचा तपशिल तक्ता १०.८५ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८५ राज्य शासनाने प्रदान केलेल्या पर्यावरणविषयक मान्यता**

| वर्ष | इमारत बांधकाम प्रकल्प | उद्योग उभारणी प्रकल्प | खाणकाम प्रकल्प | एकूण |
|---|---|---|---|---|
| २०२१ | ३४४ | ८४ | ३०३ | ७३१ |
| २०२२ | १,३०३ | ९८ | ९४६ | २,३४७ |

*आधार*: पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन

## सरोवर संवर्धन योजना

१०.११६ राज्यातील सरोवर व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्ट्या संवर्धन करण्यासाठी राज्यात राष्ट्रीय जल परिसंस्था संवर्धन आराखडा (नॅशनल प्लॅन फॉर कॉन्झरवेशन ऑफ अ‍ॅक्वेटिक इकोसिस्टीम) राबविण्यात येत आहे. सदर योजने अंतर्गत शहरी व निमशहरी भागातील प्रदुषित व पर्यावरणीय दृष्ट्या खालावलेल्या तलावांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येते. या योजने अंतर्गत कोराडी तलाव, नागपूर व धर्मवीर संभाजी तलाव, सोलापूर या तलावांचा समावेश केला असून केंद्र शासनाने ₹ ५६.१७ कोटीच्या कामास मान्यता दिली असून मार्च २०२१ पर्यंत ₹ १७.५२ कोटी निधी वितरित करण्यात आला आहे.

१०.११६.१ राज्य सरोवर संवर्धन योजने अंतर्गत राज्य शासनामार्फत अवनत तलावांच्या पर्यावरण संवर्धनाकरीता योजना सुरू झाल्यापासून १०४ तलावांचे संवर्धनाचे प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. त्यापैकी ८१ तलाव संवर्धन प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे व सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात ₹ २९.९२ कोटी निधी वितरीत केला आहे.

## नदी संवर्धन योजना

१०.११७ राष्ट्रीय नदी कृती योजना या योजने अंतर्गत राज्यातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धीकरण करण्याकरीता शहरातून निघणारे सांडपाणी नदीत ज्या ठिकाणी सोडले जाते तेथून गोळा करणे, अडविणे, वळविणे व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा तयार करणे, इत्यादी कामे केली जात असून प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा प्रकल्प क्षेत्रातील किंवा जवळील शेती, उद्योग, बाग-बगीचे इत्यादींमध्ये पुनर्वापर व पुनर्चक्रण शक्य होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्यात येते. पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी केंद्र शासनाने ₹ ९९०.२६ कोटी मंजूर केला असून एकूण ₹ ५७.७४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. नागपूर महानगरपालिकेच्या नाग नदी प्रदूषण प्रतिबंधच्या ₹ २,४१२.६४ कोटीच्या प्रस्तावास मान्यता दिली आहे.

१०.११७.१ राज्यातील नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धीकरण करण्याकरीता राज्य शासनाने राज्य नदी संवर्धन योजना सुरू केली असून सदर योजने अंतर्गत उल्हास नदी, भोगावती नदी, गोदावरी नदी, मोसम नदी, चुडामणी नदी या नद्यांच्या संवर्धनाकरीता एकूण ₹ ४७.८७ कोटीच्या प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सन २०२१-२२ मध्ये ₹ १९.५० कोटी इतका निधी वितरित करण्यात आला.

## माझी वसुंधरा अभियान

१०.११८ राज्य शासनाने वेळोवेळी आणि नाविन्यपूर्ण पद्धतीने विविध हवामान बदल उपक्रमांमध्ये नागरिकांच्या सक्रिय सहभागास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने माझी वसुंधरा अभियान सुरू केले आहे. सन २०२०-२१ मध्ये माझी वसुंधरा अभियान ६८६ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये तर सन २०२१-२२ मध्ये ११,९६८ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राबविण्यात आले. सदर अभियान निसर्गाशी संबंधित पाच घटक (पंचमहाभूत) भूमी, जल, वायू, ऊर्जा, संवर्धन यांवर केंद्रित आहे. या उपक्रमाद्वारे पर्यावरणीय समस्या, नैसर्गिक संसाधनांचा काळजीपूर्वक वापर, हवामान बदलाचे धोके आणि शाश्वत विकास याबाबत नागरिकांना जागरूक करून पर्यावरणामध्ये सुधार घडवण्यासाठी प्रयत्न केले जातात. वृक्षारोपण करून हरित आच्छादन वाढवणे, वारसा वृक्षांचे (५० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाची झाडे) संरक्षण आणि संवर्धन, लोकसहभागातून नद्यांची स्वच्छता, ओल्या कचऱ्याचे विलगीकरण व प्रक्रिया, मातीचे बंधारे व पाझर तलाव बांधणे, पावसाचे पाणी साठवणे, प्लास्टिक वापराच्या धोक्यांबाबत जनजागृती, सायकल, ई-बाईक वापरण्यास प्रोत्साहन, इत्यादी उपक्रम शहरी आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे घेण्यात आले.

१०.११८.१ अभियानाची प्रमुख उपलब्धी :

- १५८ लाख वृक्ष लागवड
- १५,८३५ हरित क्षेत्राची निर्मिती आणि जपणूक
- इलेक्ट्रिक वाहन धोरणाची अंमलबजावणी परिणामी १.०० लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहने रस्त्यावर येणे
- ११,४२० लाख घनमीटर जलसंधारण क्षमता निर्माण होणे
- राज्यभरात ८,९२४ शोषखड्डे तयार होणे
- ४९.५६ लाख एलईडी दिवे आणि ३.३७ लाख सौर दिवे स्थापित करणे
- सुमारे ८ लाख जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन
- २.२१ कोटी ई-प्रतिज्ञा घेणे

# सामाजिक न्याय

१०.११९ समाजातील सर्व सदस्यांचा मुख्यत्वे दुर्बल घटकांच्या शैक्षणिक आणि आर्थिक हितसंवर्धनास चालना देण्यावर लक्ष केंद्रित करुन क्षमता विकास साध्य करणे म्हणजे सामाजिक न्याय होय. शासन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक, दिव्यांग, ज्येष्ठ नागरीक, इत्यादींच्या कल्याणासाठी विविध योजना/ कार्यक्रम राबवित आहे.

## अनुसूचित जाती घटक कार्यक्रम

१०.१२० सन २०२२-२३ मध्ये अनुसूचित जाती घटक कार्यक्रमा अंतर्गत एकूण २३० योजना (१५४ राज्यस्तरीय व ७६ जिल्हास्तरीय) राबविण्यात येत आहेत. अनुसूचित जाती घटक कार्यक्रमा अंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.८६ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.८६ अनुसूचित जाती घटक कार्यक्रमा अंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **६,९३९.३६** | **३,७४६.२९** | **७,९०६.३६** | **६,१०२.३०** | **९,५०१.३६** | **३,८९९.३३** |
| कृषि व संलग्न कार्ये | १५८.५८ | ५७.२८ | १८०.३५ | १०१.७२ | २८३.०० | ४६.१८ |
| ग्रामविकास | २०३.९० | ३१८.९६ | १९३.०० | ९८.४५ | ४०१.०० | ३०३.५६ |
| ऊर्जा | ७०.०० | ०.०० | ७०.०० | ०.०० | ८०.०० | ८०.०० |
| उद्योग व खनिजे | ४५.०० | २१.७० | ६८.२० | ४८.७० | २३९.०० | ४२.८५ |
| वाहतूक व दळणवळण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सामान्य आर्थिक सेवा | ५.०० | १.५० | २.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ६,३४५.३८ | ३,२१५.५० | ७,१९४.३१ | ५,६५७.५९ | ८,०३९.३६ | ३,३२५.२५ |
| सामान्य सेवा | ११.५० | ३३.५४ | २३.५० | ९.७१ | २४१.०० | ३.०६ |
| इतर कार्यक्रम | १००.०० | ९७.८१ | १७५.०० | १८६.१३ | २१८.०० | ९८.४३ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **२,७२८.६४** | **२,७१५.५५** | **२,७२८.६५** | **२,७२६.१९** | **२,७२८.६४** | **६८१.६८** |
| कृषि व संलग्न कार्ये | ३५१.१४ | ३४२.७१ | ३४५.८९ | ३०९.८० | ३१७.१३ | १४०.०५ |
| ग्रामविकास | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० |
| ऊर्जा | १५२.८१ | १६४.७२ | १५४.८१ | १५६.७७ | १७३.५६ | ६९.१७ |
| उद्योग व खनिजे | ८.५९ | ०.११ | ७.१८ | ६.५० | ६.५७ | १.०७ |
| वाहतूक व दळणवळण | ७१.७० | ६७.०३ | ७६.८३ | ७७.३१ | ७९.०९ | ११.९० |
| सामाजिक व सामूहिक सेवा | २,०६२.७३ | २,०६८.६५ | २,०६२.०६ | २,०९९.८७ | २,०६९.६४ | ४३१.२४ |
| नाविन्यपूर्ण योजना | ८१.६७ | ७२.३३ | ८१.८८ | ७५.९४ | ८२.६५ | २८.२५ |
| **एकूण (अ + ब)** | **९,६६८.००** | **६,४६१.८४** | **१०,६३५.०१** | **८,८२८.४९** | **१२,२३०.००** | **४,५८१.०१** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही +१५फेब्रुवारीपर्यंत

*आधार* : सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

१०.१२०.१ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासन राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबवित आहे. जास्तीत जास्त १०० लाभार्थ्यांना प्रति वर्ष या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये १४५ लाभार्थ्यांना ₹ ३.०० कोटी वितरीत करण्यात आले, तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर पर्यंत ७० लाभार्थ्यांना ₹ ०.९८ कोटी वितरीत करण्यात आले .

## अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना

१०.१२०.२ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासन राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना राबवित आहे. जास्तीत जास्त ५० लाभार्थ्यांना प्रति वर्ष या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये २१० लाभार्थ्यांना ₹ ५३.०० कोटी वितरीत करण्यात आले, तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर पर्यंत १७४ लाभार्थ्यांना ₹ ३१.५० कोटी वितरीत करण्यात आले.

## अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकरीता शासकीय वसतिगृहे

१०.१२०.३ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांची माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी यासाठी शासनामार्फत तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर शासकीय वसतिगृहे सुरु करण्यात आली आहेत. या वसतिगृहांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सुविधा मोफत पुरविण्यात येतात. शालेय गणवेश, शारीरिक शिक्षण गणवेश, रेनकोट, पादत्राणे इत्यादींचा खर्च विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकरीता शासकीय वसतिगृहे या योजनेची माहिती तक्ता १०.८७ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.८७ अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांकरीता शासकीय वसतिगृहे**

| तपशिल | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|
| शासकीय वसतिगृहे (संख्या) | ४४१ | ४४१ |
| प्रवेश क्षमता | ४१,८४३ | ४१,८४३ |
| खर्च (₹ कोटी) | १२९.६२ | १५४.०९ |

*आधार* : समाजकल्याण आयुक्तालय, पुणे + डिसेंबरपर्यंत

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना

१०.१२०.४ इयत्ता ११ वी पासून पुढील विविध अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या किंवा प्रवेश न घेतलेल्या अनुसूचित जाती व नवबौद्ध विद्यार्थ्यांसाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत, विद्यार्थ्यांना त्यांची शैक्षणिक शाखा व निवासस्थान विचारात घेऊन भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधांसाठी अर्थ सहाय्य त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केले जाते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची प्रगती तक्ता १०.८८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८८ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची प्रगती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभधारक विद्यार्थी (संख्या) | २२,५४४ | १७,६४५ | ९,७०७* |
| खर्च (₹ कोटी) | ७४.९६ | ८९.९९ | ४९.५१ |

*आधार* : समाजकल्याण आयुक्तालय, पुणे *अस्थायी + नोव्हेंबरपर्यंत

## ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्त्यांचा विकास

१०.१२०.५ ग्रामीण भागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी ही योजना राबविण्यात येत असून या योजने अंतर्गत पिण्याचे पाणी व वीज या मुलभूत तर जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, मलनिस्सारण, समाज मंदिर, इत्यादींचे बांधकाम या पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. राज्याच्या ग्रामीण भागात अनुसूचित व नवबौद्ध घटकांच्या एकूण ६७,६१८ सूचिबद्ध वस्त्या आहेत. सन २०२१-२२ मध्ये ₹ ७९३.७१ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ११.४३ कोटी खर्च झाला.

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना

१०.१२०.६ या योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील २४९ प्रभाग व नगरपालिका क्षेत्रातील १,३२९ प्रभागातील अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांच्या वस्त्यांमध्ये पिण्याचे पाणी, पथ दिवे तसेच डांबरी/सिमेंट कॉँक्रीटचे रस्ते, वाचनालय, व्यायामशाळा, बालवाडी, गटार, सार्वजनिक शौचालय यांचे बांधकाम व विहीर दुरुस्ती, इत्यादी कामे केली जातात. सन २०२१-२२ मध्ये ₹ १,०४७.७८ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ २२.६९ कोटी खर्च झाला.

## स्टँड अप इंडिया या योजनेत अनुसूचित जाती व नवबौध्द उद्योजकांकरीता मार्जिन मनी

१०.१२०.७ केंद्र शासनाने सन २०१५ पासून अनुसूचित जाती/अनुसूचित जमाती आणि महिला नवउद्योजकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी स्टँड अप इंडिया ही योजना सुरू केली आहे. नवउद्योजकांना एकूण प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के रक्कम स्वहिस्सा म्हणून भरणा करावयाची असून उर्वरित ७५ टक्के कर्जाच्या रकमेस भारतीय लघु उद्योग विकास बँक हमी देते. राज्य शासनाने अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाच्या उद्योजकांना मार्जिन मनी देण्याची योजना सन २०१९ पासुन सुरू केली आहे. प्रकल्प किंमतीच्या २५ टक्के रकमेपैकी स्वहिस्सा १० टक्के दिल्यानंतर उर्वरीत १५ टक्के मार्जिन मनी राज्य शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाते. सन २०२१-२२ मध्ये ६९ नवउद्योजकांना ₹ ५.६९ कोटी अनुदान वितरीत केले.

## संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित

१०.१२१ चर्मकार समाजाच्या कल्याणासाठी संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली असून राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ अंतर्गत विविध योजना राबविण्यासाठी या महामंडळास राज्याची वाहिनीकृत यंत्रणा म्हणून प्राधिकृत केले आहे. या महामंडळाचे अधिकृत भागभांडवल ₹ ७३.२१ कोटी असून, भरणा केलेले भागभांडवल ₹ ३०६.२१ कोटी (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के) आहे. हे महामंडळ चर्मोद्योगात कार्यरत असणाऱ्यांसाठी अर्थसहाय्य पुरविते, उत्पादनासाठी आवश्यक कच्च्या मालाचे प्रापण व पुरवठ्याची व्यवस्था करते, उत्पादन आणि पणन याबाबतच्या प्रशिक्षण सूविधा पुरविते. तसेच देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये तयार मालाची विक्री सुलभ होण्यासाठी सहाय्य करते. संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.८९ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.८९ संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | १४३ | ९८ | ८९ |
| अर्थ सहाय्य (₹ लाख) | १३.७० | ९.७० | ८.९० |

*आधार :* संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

## साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित

१०.१२२ राज्य शासनाने मातंग समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक विकासासाठी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली असून हे महामंडळ राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ १,००० कोटी असून, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के आहे. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.९० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९० लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ७६० | ६१८ | २५९ |
| अर्थ सहाय्य (₹ लाख) | २३८.११ | १४६.७५ | ८३.६० |

*आधार :* साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

## महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित

१०.१२३ अनुसूचित जाती आणि नवबौद्ध घटकांच्या आर्थिक विकासासाठी राज्य शासनाने महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अनुसूचित जाती व वित्त विकास महामंडळ आणि राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ यांचेकरिता राज्यातील वाहिनीकृत यंत्रणा म्हणून काम करते. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ६३२.६४ कोटी असून, त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा ५१ टक्के आणि केंद्र शासनाचा हिस्सा ४९ टक्के आहे. महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची प्रगती तक्ता १०.९१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९१ महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादितची प्रगती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | १,२७५ | ८२७ | १,१५९ |
| अर्थ सहाय्य (₹ लाख) | २,४४८.१४ | २,७१८.६१ | ४,२०६.९९ |

*आधार :* महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था

१०.१२४ डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था ही राज्य शासनाची स्वायत्त संस्था आहे. बार्टी ही संस्था अनुसूचित जातीतील बेरोजगार युवकांसाठी कौशल्य विकास कार्यक्रम, केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, बँक, रेल्वे, भारतीय आयुर्विमा महामंडळ, इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम तसेच पोलीस व मिलिटरी भरती पूर्व प्रशिक्षण, इत्यादी कार्यक्रम राबविते. सन २०२१-२२ मध्ये कौशल्य विकास कार्यक्रमाचा २,५७२ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून ५,४३० विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षण देण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत कौशल्य विकास कार्यक्रमाचा ३५७ विद्यार्थ्यांनी लाभ घेतला असून ८,९४५ विद्यार्थ्यांना विविध प्रशिक्षण देण्यात आले.

## आदिवासी घटक कार्यक्रम

१०.१२५ सन २०२२-२३ मध्ये आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत एकूण ३४० योजना (१९४ राज्यस्तरीय व १४६ जिल्हास्तरीय) राबविण्यात येत आहेत. आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च तक्ता १०.९२ मध्ये दिला आहे.

**तक्ता १०.९२ आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत क्षेत्रनिहाय प्रस्तावित निधी व झालेला खर्च**

(₹ कोटी)

| क्षेत्र | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च | प्रस्तावित निधी | खर्च+ |
| **अ) राज्यस्तरीय योजना** | **७,५३९.३१** | **५,५००.३६** | **८,४८६.२६** | **६,१००.१२** | **१०,४८०.७२** | **५,०९६.०८** |
| कृषि व संलग्न कार्ये | २०२.०७ | ४८.०९ | १३३.९४ | ६५.१७ | ११६.७१ | २२.३६ |
| ग्रामविकास | ७८२.४१ | ६९१.४९ | ३७९.९२ | २५६.८३ | ६०८.६६ | २९०.९५ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | २५.०० | ३.३० | ७५.०० | १५.३५ | १२५.०० | ४.८२ |
| ऊर्जा | १७०.०० | १६७.०० | ३७०.०० | ४०६.२९ | ३४९.४२ | २१०.०० |
| उद्योग व खनिजे | ६.०० | १.८० | ६.०० | १.३७ | १२.०० | २.१० |
| वाहतूक व दळणवळण | ४५६.३२ | ३७६.०६ | ४४०.०० | ४४१.४१ | ६२५.०० | १७२.३१ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | ५,८९७.५१ | ४,२१२.६२ | ७,०८१.४० | ४,९१३.७० | ८,६४३.९३ | ४,३९३.५४ |
| **ब) जिल्हास्तरीय योजना** | **१,९२५.९१** | **१,९०४.६४** | **१,८५८.७८** | **१,६३४.६२** | **२,०८२.१७** | **७३६.३७** |
| कृषि व संलग्न कार्ये | २३१.५० | २६३.७० | २२६.७२ | २४८.७५ | २५९.७६ | ५८.४८ |
| ग्रामविकास | १४५.२५ | ११५.९८ | ३५५.०६ | ३४५.२२ | २७८.०० | २१९.३३ |
| पाटबंधारे व पूर नियंत्रण | ०.०० | ०.०० | ०.०० | ०.०० | ९४.१७ | २३.५१ |
| ऊर्जा | ११४.८५ | १३३.६० | १२६.५३ | १११.३६ | १३२.०९ | ४१.५३ |
| उद्योग व खनिजे | १.३० | ०.०२ | १.१७ | १.०९ | ०.९८ | ०.०६ |
| वाहतूक व दळणवळण | २४०.३६ | २३६.१३ | २२५.५४ | १८.४९ | २३३.२१ | ३९.४१ |
| सामाजिक व सामूहिक सेवा | १,१९२.६५ | १,१५५.२१ | ९२३.७६ | ९०९.७१ | १,०८३.९६ | ३५४.०५ |
| **एकूण (अ + ब)** | **९,४६५.२२** | **७,४०५.०१** | **१०,३४५.०४** | **७,७३४.७४** | **१२,५६२.८९** | **५,८३२.४५** |

टीप : आकडेवारी संक्षिप्तात दिल्यामुळे काही ठिकाणी बेरजा जुळतीलच असे नाही + १५फेब्रुवारीपर्यंत

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

### आश्रमशाळा

१०.१२५.१ अनुसूचित जमातींमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने राज्याच्या डोंगराळ आणि दुर्गम भागात निवासी आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. आश्रमशाळांमध्ये प्रवेश घेतलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शालेय गणवेश, शैक्षणिक साहित्य व उपकरणे आणि इतर सुविधा मोफत पुरविल्या जातात. सन २०१७-१८ पासून शैक्षणिक साहित्य व उपकरणे आणि शालेय गणवेशासाठी लागणाऱ्या खर्चाची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केली जात आहे. आश्रमशाळांची माहिती तक्ता १०.९३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९३ आश्रमशाळांची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| **शासकीय आश्रमशाळा** | | | |
| आश्रमशाळा (संख्या) | ५०० | ४९७ | ४९७ |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | १,९१,७१३ | १,९०,६०८ | १,९७,८७२ |
| खर्च (₹ कोटी) | ८०६.५४ | ९९६.३० | ७५५.९३ |
| **अनुदानित आश्रमशाळा** | | | |
| आश्रमशाळा (संख्या) | ५५६ | ५५६ | ५५६ |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | २,४१,४६८ | २,४२,९१६ | २,४२,१६६ |
| खर्च (₹ कोटी) | १,०९७.९० | १,२४३.०० | ९९४.४५ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण

१०.१२५.२ आदिवासी विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने ही योजना सन २०१०-११ पासून सुरु केली आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक व निवासी सुविधा पुरविण्यासाठी या शाळांना शासनाकडून दरवर्षी प्रति विद्यार्थी कमाल ₹ ७०,००० रक्कम देण्यात येते. नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण या योजनेची माहिती तक्ता १०.९४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९४ नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण या योजनेची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ५३,६२६ | ५६,६०२ | ४४,३५९ |
| खर्च (₹ कोटी) | ८५.३२ | १४९.९९ | ९६.६८ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन +नोव्हेंबरपर्यंत

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना

१०.१२५.३ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी विविध शिष्यवृत्त्या देण्यात येतात. अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजनांचा तपशिल तक्ता १०.९५ मध्ये देण्यात आला आहे.

**तक्ता १०.९५ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजनांचा तपशिल**

| योजना | २०२०-२१ | | २०२१-२२ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| भारत सरकार पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती | १,४४,८३७ | १४२.५४ | १,३१,६७३ | २९१.५४ |
| शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क प्रदाने | १०,३२१ | ४.७९ | ९,४५० | ८५.१० |
| वैद्यकीय अभ्यासक्रम व तत्सम अभ्यासक्रमासाठी फी प्रतिपूर्ती | २,५६५ | ६.७५ | २,६५३ | ३३.३२ |

*आधार :* आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र शासन.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती योजना

१०.१२५.४ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे. प्रति वर्ष जास्तीत जास्त १० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजने अंतर्गत सन २०२१-२२ मध्ये चार लाभार्थ्यांकरिता ₹ २.०३ कोटी निधी खर्च आला तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत एका लाभार्थ्याकरिता ₹ १.१४ कोटी खर्च झाला.

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहे

१०.१२५.५ आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यासाठी तालुका, जिल्हा व विभाग स्तरावर शासकीय वसतिगृहांची सुविधा पुरविण्यात येते. या वसतिगृहांमध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांना निवास, भोजन, गणवेश, शैक्षणिक साहित्य व इतर सुविधा मोफत पुरविण्यात येतात. सन २०१७-१८ पासून अंथरूण/पांघरूण, गणवेश, पुस्तके, शैक्षणिक साहित्य, इत्यादींचा खर्च विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येत आहे. आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांची माहिती तक्ता १०.९६ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९६ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृहांची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| वसतिगृहे (संख्या) | ४८७ | ४८७ | ४८७ |
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | ४८,७३२ | ४७,२७१ | ४९,४४० |
| खर्च (₹ कोटी) | ५१.८९ | १६०.२९ | ७६.६९ |

*आधार :* आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन +डिसेंबरपर्यंत

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजना

१०.१२५.६ इयत्ता बारावी नंतरच्या उच्च शिक्षणा करिता प्रवेश घेतलेल्या परंतु शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता, इत्यादी साठी ₹ ६०,००० पर्यंत अर्थ सहाय्य या योजने अंतर्गत पुरविण्यात येते. पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेची माहिती तक्ता १०.९७ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९७ पंडीत दीनदयाळ उपाध्याय स्वयम योजनेची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी विद्यार्थी (संख्या) | १०,३४९ | १६,२०६ | ११,५३६ |
| खर्च (₹ कोटी) | ६.०० | ५२.५० | ३७.८४ |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## पेसा अंतर्गत ग्रामपंचायतींना थेट निधी

१०.१२५.७ पेसा कायदा, १९९६ अंतर्गत अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतींना विकासाची कामे करण्यासाठी आदिवासी घटक कार्यक्रमा अंतर्गत एकूण अर्थसंकल्पित निधीच्या पाच टक्के निधी वितरीत करण्यात येतो. या निधीतून मूलभूत पायाभूत सुविधा, पेसा कायदा व वनहक्क कायदा यांची अंमलबजावणी, आरोग्य, स्वच्छता, शिक्षण, वन्यजीव संवर्धन, जलसंधारण, वनीकरण, वन्यजीव पर्यटन व गौण वनोपज या संबंधित कामे घेण्याचे अधिकार ग्रामसभेस आहेत. पेसा कायद्या अंतर्गत अनुसुचित क्षेत्रातील २,८९८ ग्रामपंचायतींना थेट अर्थ सहाय्य दिले जाते. सन २०२१-२२ मध्ये ₹ २७१.५० कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ १४.०२ कोटी खर्च झाला.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजना

१०.१२५.८ ही योजना राज्यातील १६ आदिवासी जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत, अनुसूचित जमातीच्या गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना 'एक वेळचा पूर्ण आहार' पुरविण्यात येतो. तसेच अनुसुचित जमातीमधील सात महिने ते सहा वर्षे वयोगटातील बालकांना आठवड्यातून चार वेळा अंडी किंवा केळी पुरविण्यात येतात. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची माहिती तक्ता १०.९८ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.९८ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम अमृत आहार योजनेची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | ७,९७,४६५ | ८,६८,०८२ | १०,५९,२९७ |
| खर्च (₹ कोटी) | २११.६३ | २१२.६० | ६८.१४ |

*आधार*: आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

## ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा एकात्मिक कार्यक्रम

१०.१२५.९ या योजने अंतर्गत आदिवासी वस्त्यांमध्ये छोटी मात्र कायमस्वरुपी सामूहिक विकासाची कामे घेतली जातात. पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय करणे, फिल्टर प्लँट उभारणे, नळ पाणीपुरवठा योजना, कूपनलिका, हातपंप बसवणे, आदिवासी वस्तीचे विद्युतीकरण, अपारंपरिक उर्जाव्दारे पथदिप बसवणे तसेच मुख्य वस्तीपर्यंत जोडरस्ते, सिमेंट कॉंक्रिट/डांबरीकरणाचे अंतर्गत रस्ते, विहीर, बहुउद्देशीय सभागृह, वाचनालय, व्यायामशाळा, सार्वजनिक शौचालय, सभा मंडप, ग्रामपंचायत कार्यालय, नदीकाठी संरक्षक भिंत आणि स्मशानभुमी यांचे बांधकाम या सारख्या सामूहिक विकासाच्या सुविधा केल्या जातात. सन २०२२-२३ मध्ये ₹ २५०.०० कोटी आर्थिक तरतुद करण्यात आली आहे.

# इतर मागास बहुजन यांचे कल्याण

१०.१२६ इतर मागास बहुजन (इतर मागास वर्ग (इमाव), विशेष आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (विआमाप्र), विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र)) समाजातील दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. सन २०२१-२२ मध्ये ₹ ४,६४०.०३ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १,५६३.७५ कोटी खर्च झाला.

## इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत शिक्षणासाठी शिष्यवृत्ती

१०.१२६.१ देशा अंतर्गत शिक्षणासाठी इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्रदान केली जाते. इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या निवडक शिष्यवृत्ती योजनांची माहिती तक्ता १०.९९ मध्ये देण्यात आली आहे.

**तक्ता १०.९९ इतर मागास वर्गीय विद्यार्थ्यांना देशा अंतर्गत शिक्षणासाठी देण्यात येणाऱ्या निवडक शिष्यवृत्ती योजनांची माहिती**

| योजना | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|
| | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी (संख्या) | खर्च (₹ कोटी) |
| इमाव विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती | २,५८,५६१ | २३४.७१ | २,४६,८८९ | ०.१९ |
| शिक्षण व परिक्षा शुल्काचे प्रदाने | १२,८३६ | ३४९.०१ | - | - |
| इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिकत असलेल्या इतर मागास प्रवर्गासाठी केंद्र शासनाची मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना | ९७,४६० | ४.८१ | - | - |
| इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणा-या इतर मागास प्रवर्गातील मुलींना सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना | १,५६,६१३ | ११.६३ | ३२,६२६ | २.६७ |

*आधार* : इतर मागास बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन + डिसेंबरपर्यंत

## विजाभज, इमाव आणि विमाप्र विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती

१०.१२६.२ विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी राज्य शासनाने ही योजना सुरू केली आहे. जास्तीत जास्त प्रति वर्ष ५० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजने अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १.७५ कोटी खर्च झाला.

## वसंतराव नाईक तांडा/वस्ती सुधार योजना

१०.१२६.३ या योजनेचा मुख्य उद्देश विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग यांच्या तांडे/वस्त्यांना मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे होय. या योजने अंतर्गत तांडा वस्तीस पिण्याचे पाणी पुरवठा, विद्युतीकरण तसेच अंतर्गत रस्ते, गटारे, शौचालये, समाजमंदीर, वाचनालये यांचे बांधकाम, मुख्य रस्त्याला जोडणाऱ्या रस्त्यांची कामे, इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबर अखेर ₹ १८.८३ कोटी खर्च झाला.

## महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१२७ राज्यातील इतर मागासवर्गीयांच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, भरणा केलेले भाग भांडवल ₹ २१६.५४ कोटी (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के) आहे. हे महामंडळ राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. महामंडळामार्फत बीज भांडवल, थेट कर्ज योजना, वैयक्तिक व गट कर्ज व्याज परतावा, इत्यादी योजना राबविण्यात येतात. महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची माहिती तक्ता १०.१०० मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०० महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादितची माहिती**

| तपशील | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
|---|---|---|---|
| लाभार्थी (संख्या) | २०९ | ३३१ | ३०५ |
| खर्च (₹ लाख) | १९७.३६ | २७४.५८ | १७४.९८ |

*आधार* : महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ मर्यादित + ऑक्टोंबरपर्यंत

## छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था

१०.१२८ छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) राज्यातील मराठा ,कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी-मराठा या लक्षित गटातील समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाकरिता राज्य शासनामार्फत स्थापना करण्यात आलेली संस्था आहे. सारथी लक्षित गटातील इच्छुक विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोग, महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याच्या दृष्टीने परिक्षेच्या तयारीसाठी विद्यावेतन व प्रशिक्षण तसेच पोलिस भरतीकरीता निशुल्क ऑनलाइन प्रशिक्षण, इत्यादी कार्यक्रम राबविते. सन २०२१-२२ मध्ये शिष्यवृत्ती/अधिछात्रवृत्ती ११,२०१ विद्यार्थ्यांना देण्यात आली असून ९,८७९ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत शिष्यवृत्ती/अधिछात्रवृत्ती ७,४८९ विद्यार्थ्यांना देण्यात आले तसेच ११,२०८ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

# अल्पसंख्याक विकास

१०.१२९ अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी अल्पसंख्याक क्षेत्र विकास कार्यक्रम, अल्पसंख्याक बहुल क्षेत्रासाठी बहुक्षेत्रीय विकास योजना, अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थांसाठी सहाय्यक अनुदाने, इत्यादी विविध योजना राज्यात राबविण्यात येत आहेत. सन २०२१-२२ मध्ये ₹ ५७०.३८ कोटी खर्च झाला, तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ २१३.९६ कोटी खर्च झाला.

## अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती

१०.१२९.१ कोणत्याही शैक्षणिक अभ्यासक्रमात शिकणाऱ्या अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे वार्षिक शिक्षण शुल्क किंवा ₹ २५,००० (वैद्यकीय आणि अर्ध-वैद्यकीय अभ्यासक्रम / तांत्रिक आणि व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी) आणि ₹ ५,००० (कला, वाणिज्य आणि विज्ञान पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी) या पैकी कमी असेल ती रक्कम शिष्यवृत्ती म्हणून दिली जाते. सन २०२१-२२ मध्ये ₹ ८३.९२ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ६१.३० कोटी खर्च झाला.

## अल्पसंख्याक समाजातील मुलींसाठी वसतिगृहे

१०.१२९.२ शासनाने राज्यातील अल्पसंख्याक समाजातील मुलींच्या उच्च शिक्षणासाठी वसतिगृहे सुरु केली आहेत. अल्पसंख्याक समाजातील कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ₹ ८,००,००० पेक्षा कमी असल्यास त्या विद्यार्थिनींना शुल्क पूर्णपणे माफ असते व वसतिगृहातील अल्पसंख्याक विद्यार्थिनींना आहार भत्ता देण्यात येतो. सदर वसतिगृहांमध्ये १०० ते २०० मुलींच्या निवासाची सोय करण्यात येते. एकूण क्षमतेपैकी ७० टक्के जागा अल्पसंख्याक मुलींसाठी (मुस्लीम ३५, बौध्द २१, ख्रिश्चन सहा, जैन सहा, शिख व पारसींसाठी प्रत्येकी एक) व ३० टक्के जागा अन्य प्रवर्गातील मुलींसाठी राखीव असतात. सदर योजनेकरीता सन २०२१-२२ मध्ये ₹ १७.७३ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये डिसेंबरपर्यंत ₹ १.७८ कोटी निधी खर्च झाला.

## प्रधान मंत्री जन विकास कार्यक्रम

१०.१२९.३ केंद्र शासनामार्फत प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम योजना अल्पसंख्याक बहूल क्षेत्रात पायाभूत प्रकल्प विकसीत करण्याच्या उद्देशाने राबविली जात आहे. या योजनेत पिण्याचे पाणी, सौर ऊर्जा, शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास आणि महिला केंद्रित प्रकल्प, क्रीडा, स्वच्छता, सामान्य सेवा केंद्र यामधील पायाभूत सुविधा प्रकल्प घेतले जातात. प्रधानमंत्री जन विकास कार्यक्रम राज्यात २७ जिल्हे, २८ अल्पसंख्याक बहूल गट आणि ३४ अल्पसंख्याक बहूल शहरांमध्ये कार्यान्वित आहे. सन २०२१-२२ मध्ये ₹ १०.५५ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ६१.२९ कोटी खर्च झाला.

## अल्पसंख्याकांसाठी वस्ती/ क्षेत्र विकास योजना

१०.१२९.४ राज्यात अल्पसंख्याकासाठी वस्ती/क्षेत्र विकास योजना राबविण्यात येत आहेत. या योजनेमध्ये अल्पसंख्याक बहुल क्षेत्रामध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्युत पुरवठा, पथदिवे, रस्ते, अंगणवाडी, समाज मंदिर, इदगाह, गटारे, सार्वजनिक स्वच्छता गृहे, इत्यादींचे बांधकाम, कब्रस्तान व अंत्यविधीच्या जागेची दुरुस्ती यासारखी कामे करण्यात येतात. अल्पसंख्याकासाठी वस्ती/क्षेत्र विकास योजनांची माहिती तक्ता १०.१०१ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०१ अल्पसंख्याकांसाठी वस्ती/क्षेत्र विकास योजनांची माहिती**

| योजना | खर्च (₹ कोटी) | |
|---|---|---|
| | २०२०-२१ | २०२१-२२ |
| ग्रामीण क्षेत्र विकास | १५.९८ | १५.८५ |
| नागरी क्षेत्र विकास | २१.६९ | १४.८५ |

*आधार :* अल्पसंख्याक विकास विभाग, महाराष्ट्र शासन

## मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित

१०.१३० राज्यात अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ७०० कोटी असून भरणा केलेले भाग भांडवल ₹ ५४३.१९ कोटी आहे. हे महामंडळ राष्ट्रीय अल्पसंख्याक वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. सन २०२१-२२ मध्ये २,५३८ विद्यार्थ्यांना ₹ २२.५३ कोटी रकमेचे शैक्षणिक कर्ज देण्यात आले. सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत १,९२७ विद्यार्थ्यांना ₹ १७.३७ कोटी रकमेचे शैक्षणिक कर्ज देण्यात आले.

# दिव्यांगांचे कल्याण

१०.१३१ दिव्यांगांना सक्षम करण्यासाठी त्यांच्या क्षमता ओळखून त्यांचा विकास करणे, दिव्यांगांना समान संधी देणे, त्यांना मुख्य प्रवाहात आणणे यासाठी शासन विविध योजना राबवित आहे. सन २०२१-२२ मध्ये ₹ ६८१.१७ कोटी खर्च झाला तर सन २०२२-२३ मध्ये नोव्हेंबरपर्यंत ₹ ४८०.२४ कोटी खर्च झाला.

## महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादित

१०.१३२ दिव्यांग व्यक्तींच्या कल्याणासाठी महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्यादितची स्थापना करण्यात आली आहे. हे महामंडळ राष्ट्रीय दिव्यांग वित्त व विकास महामंडळाची राज्यासाठी वाहिनीकृत यंत्रणा म्हणून कार्य करते. या महामंडळाचे अधिकृत भाग भांडवल ₹ ५०० कोटी असून, भरणा केलेले भाग भांडवल ₹ ४७.५२ कोटी (राज्य शासनाचा हिस्सा १०० टक्के) आहे. सन २०२१-२२ मध्ये एका लाभार्थ्यांस ₹ ०.२० लाख रकमेचे थेट कर्ज देण्यात आले.

## अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित

१०.१३३ राज्यातील आर्थिकदृष्टया मागास सुशिक्षित बेरोजगार तरूणांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची स्थापना केली आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची माहिती तक्ता १०.१०२ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०२ अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादितची माहिती**

(₹ लाख)

| तपशील | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या/ गट संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या/गट संख्या | वितरीत रक्कम | लाभार्थी संख्या/गट संख्या | वितरीत रक्कम |
| वैयक्तिक कर्ज व्याज परतावा | ७,१७६ | ५,४००.२३ | १४,७२६ | १२,८५०.५२ | ९,३२१ | ९,०४९.६१ |
| गट कर्ज व्याज परतावा | २८ | ३३.६१ | ८७ | १७१.३२ | ७२ | १६५.२२ |
| गट प्रकल्प कर्ज | ७ | ७०.०० | ८ | ७०.०० | ० | ०.० |

*आधार :* अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित + नोव्हेंबरपर्यंत

# राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम

१०.१३४ राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम अंतर्गत राज्यात विविध योजना राबविण्यात येत आहे. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमा अंतर्गत निवडक योजनांची माहिती तक्ता १०.१०३ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०३ राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रमा अंतर्गत निवडक योजनांची माहिती**

| योजना | २०२०-२१ | | २०२१-२२ | | २०२२-२३+ | |
|---|---|---|---|---|---|---|
| | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) | लाभार्थी संख्या (लाख) | खर्च (₹ कोटी) |
| संजय गांधी निराधार अनुदान | १२.३१ | १,५०९.५१ | १२.३९ | १,५६४.९९ | १३.७७ | १,०२४.९८ |
| श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन | २१.७४ | २,८३६.५९ | २४.८० | २,९१२.७८ | २२.२९ | १,८००.६९ |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन | १२.०८ | ४१९.९६ | ११.८२ | २९७.६२ | ११.३७ | ०.० |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन | ०.७६ | ३५.२१ | ०.८० | ३०.४४ | ०.८९ | ०.० |
| इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन | ०.०९ | ४.२८ | ०.०९ | ३.५४ | ०.०१ | ०.० |
| राष्ट्रीय कुटुंब लाभ | ०.१४ | २७.४१ | ०.२० | ३९.९९ | ०.० | ०.० |

*आधार :* सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन + नोव्हेंबरपर्यंत

# मानव विकास व शाश्वत विकास ध्येये

१०.१३५ मानव विकास म्हणजे आरोग्यदायी व दीर्घायुष्य, शिक्षित होणे, दर्जेदार राहणीमान यासह राजकीय स्वातंत्र्य, इतर मानवी हक्कांची हमी व आत्मसन्मान यासाठी लोकांच्या निवडीची कक्षा विस्तारीत करण्याची प्रक्रिया होय. निरोगी व शिक्षित लोकांमुळे उत्पादकतेत वाढ होऊन समाजाच्या सर्वांगीण विकासास हातभार लावतो.

१०.१३६ संयुक्त राष्ट्र विकास परिषदेने प्रसिद्ध केलेल्या मानव विकास अहवाल, २०२१ नुसार ०.९६२ मानव विकास निर्देशांकासह (माविनि) स्वित्झर्लंड जगात प्रथम स्थानावर असून, ०.६३३ माविनिसह भारत १३२ व्या स्थानावर आहे. संयुक्त राष्ट्र विकास परिषदेच्या उपराष्ट्रीय मानव विकास निर्देशांक अहवाल (४.०) नुसार सन २०१९ करिता भारताचा माविनि ०.६४६ तर महाराष्ट्राचा माविनि ०.६९७ होता. देशातील सर्व राज्यांमध्ये सन २०१९ करिता केरळचा माविनि (०.७८२) हा सर्वाधिक होता, तर बिहारचा माविनि (०.५७४) सर्वात कमी होता.

१०.१३७ महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ नुसार राज्याचा माविनि ०.७५२ होता. मुंबई (मुंबई शहर आणि मुंबई उपनगर) माविनि ०.८४१ सह प्रथम क्रमांकावर व पुणे जिल्ह्याचा माविनि ०.८१४ होता. नंदुरबार जिल्ह्याचा माविनि ०.६०४ सह शेवटच्या क्रमांकावर होता. महाराष्ट्र मानव विकास अहवाल, २०१२ नुसार जिल्हानिहाय माविनि परिशिष्ट १०.१६ मध्ये देण्यात आला आहे.

## महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

१०.१३८ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम राज्यातील १२५ अतिमागास तालुक्यांमध्ये राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमा अंतर्गत शिक्षण, आरोग्य आणि उत्पन्नात सुधारणा करण्यावर भर देणाऱ्या विविध योजना राबविण्यात येत आहेत. तालुक्यांची सामाजिक व आर्थिक, तसेच भौगोलिक परिस्थिती आणि स्थानिक गरजा लक्षात घेऊन तालुका विनिर्दिष्टीत योजना आखल्या जातात. सन २०२२-२३ मध्ये जानेवारी अखेर ₹ १७३.६६ कोटी खर्च झाला. महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत भौतिक प्रगती तक्ता १०.१०४ मध्ये दिली आहे.

**तक्ता १०.१०४ महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रमा अंतर्गत भौतिक प्रगती**

| योजना | लाभार्थी प्रकार | लाभार्थी संख्या | | |
|---|---|---|---|---|
| | | २०२०-२१ | २०२१-२२ | २०२२-२३+ |
| **शिक्षण** | | | | |
| अ) माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांतील अभ्यासिका (२,८८९ अभ्यासिका) | विद्यार्थी | @ | @ | उ ना |
| ब) ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना मोफत बस सेवा (८७१ बस) | विद्यार्थीनी | ३६,९९१ | २२,८५२ | ८०,२५६ |
| क) बालभवन विज्ञान केंद्रे (१२४ केंद्रे) | भेट दिलेले विद्यार्थी | @ | १,७४३ | १,६०३ |
| ड) कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय योजनेची व्याप्ती इयत्ता १० वी पर्यंत विस्तारणे (३९ शाळा) | विद्यार्थीनी | १,५२५ | १,९०० | १,९०० |
| ई) इयत्ता आठवी ते बारावी मध्ये शिक्षण घेत असलेल्या व शाळेपासून पाच किमी अंतरापर्यंत राहाणाऱ्या गरजू मुलींना सायकलींचे वाटप | विद्यार्थीनी | २,९११ | ५५१ | ५४,१५६ |
| फ) अंगणवाडयांचे बांधकाम | | ६९३$ | ७२७$ | ७३२$ |
| **आरोग्य** | | | | |
| अ) गर्भवती महिला, स्तनदा माता व ० ते ६ महिने वयोगटातील बालकांकरिता आरोग्य शिबिरे | गर्भवती महिला, स्तनदा माता व बालके | ४,२०,७१३ | ६,१७,२७७ | ६,३५,२०२ |
| ब) अजा, अज, दारिद्रय रेषेखालील गर्भवती महिलांना बुडीत मजुरी देणे | गर्भवती महिला | १,१५,८०७ | ९४,६११ | ४९,२०२ |
| क) आरोग्य उपकेंद्रांचे बांधकाम | | ३९$ | ४३$ | ४४$ |
| **उत्पन्न निर्मिती** | | | | |
| अ) माती परिक्षण फिरती प्रयोगशाळा | मातीचे तपासलेले नमुने | १०,०४४ | १२,२३८ | ५,७०० |
| ब) जिल्हा/ तालुका स्पेसिफिक योजना | | | | |
| १) रोजगार निर्मितीकरिता "विशेष योजना" | लाभार्थी समूह | ७३६ | ३३५ | १९५ |
| २) गौण वनोपज संकलन साठी गोदाम | गोदाम संख्या | ० | १९$ | ४४$ |
| ३) तेजश्री फायनान्शियल सर्व्हिसेस माविम च्या माध्यमातून मायक्रो फायनान्सची योजना | i) अति गरीब महिला | २२,६७८ | २८,९९२ | उ ना |
| | ii) कर्जबाजारी बचत गट | १४२ | ११४ | उ ना |
| | iii) कर्जबाजारी स्त्रिया | ७५८ | ७५५ | उ ना |

$ योजनेच्या सुरुवाती पासून + जानेवारी पर्यंत

@ कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर सदर योजना राबविणे शक्य झाले नाही उ ना उपलब्ध नाही

*आधार* : आयुक्तालय, महाराष्ट्र मानव विकास कार्यक्रम

# शाश्वत विकास ध्येये

१०.१३९ संयुक्त राष्ट्र संघाच्या सर्व सदस्य देशांनी 'शाश्वत विकास अजेंडा २०३०' दि. २५ सप्टेंबर, २०१५ रोजी स्वीकारला आहे. सामाजिक, आर्थिक, पर्यावरण व शांतता ही शाश्वत विकासाची आयाम आहेत. या अजेंडा अंतर्गत १७ शाश्वत विकास ध्येये व १६९ लक्ष्ये निर्धारित केली आहेत. ही ध्येये सार्वत्रिक, सर्वसमावेशक आणि एकमेकांशी निगडीत आहेत. 'विकासापासून कोणीही वंचित राहू नये' ही शाश्वत विकास ध्येयाची मध्यवर्ती संकल्पना असून शाश्वत विकास ध्येये साध्य करण्याचा कालावधी दि. ०१ जानेवारी, २०१६ ते दि. ३१ डिसेंबर, २०३० आहे.

१०.१३९.१ शाश्वत विकास ध्येयांच्या संनियंत्रणासाठी राष्ट्रीय स्तरावर नीति आयोग तर राज्य स्तरावर नियोजन विभाग राज्य शासन या प्रमुख संस्था आहेत. राज्याच्या सर्वांगिण विकासासाठी दीर्घकालीन दृष्टीकोन देणारी शाश्वत विकास ध्येये विचारात घेऊन सन २०१७ मध्ये राज्य शासनाने 'महाराष्ट्र व्हिजन २०३०' तयार केले आहे. नियोजन विभागाच्या अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या अधिपत्याखाली 'शाश्वत विकास ध्येय - अंमलबजावणी व समन्वय केंद्र' ची सन २०२० मध्ये स्थापना करण्यात आली आहे. हे केंद्र नीति आयोग तसेच सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, केंद्र शासन आणि राज्य शासनाचे विविध विभाग यामधील कार्यान्वयनाचा दुवा म्हणुन काम करते.

१०.१३९.२ आंतरराष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास ध्येयाच्या प्रगतीचे संनियंत्रण करण्यासाठी अलीकडील जागतिक निर्देशक आराखड्यामध्ये २४८ निर्देशकांचा समावेश असून संयुक्त राष्ट्र संघाने त्यास स्विकृती दिली आहे. राष्ट्रीय स्तरावर शाश्वत विकास ध्येयांचे संनियंत्रण करण्यासाठी सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने राष्ट्रीय निर्देशक आराखडा तयार केला असून, अलीकडील आराखड्यात २८६ निर्देशकांचा समावेश आहे. राज्यस्तरावर शाश्वत विकास ध्येयांचे संनियंत्रण करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना नुसार राज्य शासनाने २३७ निर्देशकांचा समावेश असलेला राज्य निर्देशक आराखडा तयार केला आहे. तसेच जिल्हास्तरावर शाश्वत विकास ध्येयांचे संनियंत्रण करण्यासाठी १२० निर्देशकांचा समावेश असलेला जिल्हा निर्देशक आराखडा अंतिम करण्यात आला आहे, केंद्र शासनाच्या पंचायत राज मंत्रालयाने स्थानिक स्तरावर शाश्वत विकास ध्येयांचे संनियंत्रण करण्यासाठी ३८६ निर्देशकांचा समावेश असलेला स्थानिक निर्देशक आराखडा तयार केला आहे.

१०.१३९.३ केंद्र पुरस्कृत योजनांची नीति आयोगाने, तर राज्यस्तरीय योजनांची शाश्वत विकास ध्येये अंमलबाजावणी व समन्वय केंद्राने सांगड घातली आहे. राज्य शासनाने राज्यस्तरावर अंमलबाजावणी होणाऱ्या १,६५९ योजनांची शाश्वत विकास ध्येये व लक्ष्यांशी सांगड घातली आहे, योजनांची शाश्वत विकास ध्येये व लक्ष्यांशी खालील निकषानुसार सांगड घालण्यात आली आहे.

- योजनेचा उद्देश
- योजनेतील घटक
- योजनेतील अंतर्भूत पैलू
- योजनेचा प्रकार
- राष्ट्रीय निर्देशक आराखडा
- शाश्वत विकास ध्येयांवरील प्रभावहीनता

* * * * *

## परिशिष्ट १०.१

## विभागनिहाय व शैक्षणिक स्तरनिहाय संस्था, पटसंख्या व शिक्षकांची संख्या

| बाब | वर्ष | विभाग | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| प्राथमिक (१ ली ते ८ वी ) | | | | | | | | |
| शाळांची संख्या | २०१८-१९ | २०,५४१ | २२,१०० | १७,९८५ | २१,२५८ | ११,५६५ | १२,७८८ | १,०६,२३७ |
| | २०१९-२० | २०,५१५ | २२,१६२ | १८,०५४ | २१,३९३ | ११,५७४ | १२,७९३ | १,०६,४९१ |
| | २०२०-२१ | २०,४२५ | २२,१२२ | १८,०३६ | २१,४४१ | ११,५७४ | १२,७४० | १,०६,३३८ |
| | २०२१-२२ | २०,६३६ | २२,२१८ | १८,०६९ | २१,६३२ | ११,५९० | १२,७०३ | १,०६,८४८ |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१८-१९ | ३,७९५.५ | ३,२१३.८ | २,८०४.७ | २,९८६.४ | १,४९६.१ | १,४५१.६ | १५,७४८.१ |
| | २०१९-२० | ३,७८५.६ | ३,२२६.० | २,७९५.६ | २,८४४.२ | १,४७७.९ | १,४२३.८ | १५,६९३.५ |
| | २०२०-२१ | ३,६७१.५ | ३,१६०.५ | ३,७४९.९ | २,९५३.५ | १,४५४.६ | १,४०१.१ | १५,३९१.० |
| | २०२१-२२ | ३,६१९.८ | ३,१७८.४ | २,७६२.० | २,९८०.१ | १,४६८.२ | १,४१२.८ | १५,४२१.३ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१८-१९ | १,७९८.७ | १,४९१.५ | १,२९९.४ | १,३८९.३ | ७०७.४ | ६९७.८ | ७,३८४.१ |
| | २०१९-२० | १,७९६.४ | १,४९९.१ | १,३००.९ | १,३९०.६ | ७००.० | ६८३.९ | ७,३७१.१ |
| | २०२०-२१ | १,७४५.८ | १,४७७.० | १,२८४.७ | १,३७९.२ | ६९२.१ | ६७४.८ | ७,२५३.६ |
| | २०२१-२२ | १,७२५.९ | १,४९०.३ | १,२९६.२ | १,३९५.३ | ७००.७ | ६८१.२ | ७,२८९.६ |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१८-१९ | १११.८ | १०७.१ | ८३.४ | १०५.९ | ५४.२ | ५८.२ | ५२०.६ |
| | २०१९-२० | ११४.४ | ११०.९ | ८५.४ | १०७.५ | ५४.६ | ५९.५ | ५३२.५ |
| | २०२०-२१ | १०८.१ | १०६.२ | ८३.३ | १०५.६ | ५२.६ | ५६.३ | ५१२.१ |
| | २०२१-२२ | १०२.८ | १०३.० | ८१.१ | १०३.४ | ५०.७ | ५३.३ | ४९४.३ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१८-१९ | ३३.९ | ३०.० | ३३.६ | २८.२ | २७.६ | २४.९ | ३०.३ |
| | २०१९-२० | ३३.० | २९.० | ३२.७ | २७.७ | २७.० | २३.८ | २९.४ |
| | २०२०-२१ | ३४.० | २९.८ | ३३.० | २८.० | २७.६ | २४.९ | ३०.१ |
| | २०२१-२२ | ३५.२ | ३०.९ | ३४.१ | २८.८ | २९.० | २६.५ | ३१.२ |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक (९ वी ते १२ वी ) | | | | | | | | |
| शाळांची संख्या | २०१८-१९ | ५,२०९ | ५,२५५ | ३,९४८ | ४,७५६ | २,७५६ | २,९४८ | २४,८७२ |
| | २०१९-२० | ५,७६१ | ५,७९२ | ४,३८६ | ५,६५५ | ३,१३८ | ३,३६१ | २८,०९३ |
| | २०२०-२१ | ५,८१५ | ५,८६९ | ४,४३५ | ५,७८२ | ३,१८१ | ३,४२३ | २८,५०५ |
| | २०२१-२२ | ५,८३० | ५,९०३ | ४,४५४ | ५,७९४ | ३,१९६ | ३,४३५ | २८,६१२ |
| एकूण पटसंख्या (हजारात) | २०१८-१९ | १,५६३.९ | १,३६३.७ | १,०८९.६ | १,२२४.८ | ६६६.९ | ६९८.९ | ६,६०८.० |
| | २०१९-२० | १,५३५.६ | १,३४७.० | १,०७८.२ | १,१९५.४ | ६४८.९ | ६७५.४ | ६,४८१.० |
| | २०२०-२१ | १,५५७.७ | १,३५३.६ | १,०९८.६ | १,१९२.६ | ६४८.३ | ६७३.२ | ६,५२४.० |
| | २०२१-२२ | १,५८८.० | १,३७१.९ | १,११२.४ | १,२२३.५ | ६५६.१ | ६८८.० | ६,६३९.९ |
| मुलींची पटसंख्या (हजारात) | २०१८-१९ | ७३८.२ | ६२१.३ | ४८६.४ | ५४५.४ | ३११.५ | ३३९.८ | ३,०४२.६ |
| | २०१९-२० | ७३१.७ | ६२२.८ | ४८७.३ | ५३९.० | ३०४.९ | ३२९.९ | ३,०१५.८ |
| | २०२०-२१ | ७४२.० | ६२७.३ | ४९७.९ | ५४१.८ | ३०५.७ | ३२९.४ | ३,०४४.१ |
| | २०२१-२२ | ७५५.० | ६३५.० | ५०५.० | ५५४.७ | ३०८.५ | ३३५.६ | ३,०९२.९ |
| शिक्षकांची संख्या (हजारात) | २०१८-१९ | ५८.१ | ५२.७ | ४०.० | ४१.८ | २२.३ | २८.३ | २४३.७ |
| | २०१९-२० | ६१.१ | ५४.४ | ४१.४ | ४२.७ | २२.९ | २८.५ | २५१.२ |
| | २०२०-२१ | ५९.९ | ५४.२ | ४१.२ | ४२.६ | २२.६ | २७.८ | २४८.३ |
| | २०२१-२२ | ६०.५ | ५४.१ | ४१.३ | ४२.९ | २२.४ | २७.४ | २४८.७ |
| विद्यार्थी शिक्षक प्रमाण | २०१८-१९ | १२.७२ | ११.७८ | १२.१७ | १३.०४ | १३.६२ | १२.०२ | १२.४८ |
| | २०१९-२० | २५.१ | २४.७ | २६.० | २७.९ | २८.३ | २३.६ | २५.७ |
| | २०२०-२१ | २६.० | २५.० | २६.७ | २८.० | २८.७ | २४.२ | २६.३ |
| | २०२१-२२ | २६.३ | २५.४ | २६.९ | २८.५ | २९.२ | २५.१ | २६.७ |

*आधार :* महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई

## परिशिष्ट १०.२

## सन २०२२-२३ मधील आरोग्य विज्ञान संस्थांची संख्या, प्रवेश क्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (दि.३१/१२/२०२२ अखेर)

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **ॲलोपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ३० | ४,९०० | ० | १ | १०० | ० | १८ | २,६२० | ० | ४९ | ७,६२० | ० |
| पदव्युत्तर | २८ | २,५६५ | ० | १ | ७८ | ० | २० | ८०० | ० | ४९ | ३,४४३ | ० |
| **आयुर्वेदीक** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ५ | ४१० | ० | १६ | १,१७६ | ० | ६० | ४,१८० | ० | ८१ | ५,७६६ | ० |
| पदव्युत्तर | ४ | २४९ | ० | ११ | २०५ | ० | २१ | ८२४ | ० | ३६ | १,२७८ | ० |
| **होमिओपॅथी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | ५० | -- | -- | -- | -- | ५५ | ४,३६० | ० | ५६ | ४,४१० | ० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | -- | -- | -- | १६ | ३७७ | ० | १६ | ३७७ | ० |
| **युनानी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | -- | -- | -- | ३ | १८० | ० | ४ | २३० | ० | ७ | ४१० | ० |
| पदव्युत्तर | -- | -- | -- | १ | १७ | ० | -- | -- | -- | १ | १७ | ० |
| **दंतचिकित्सा** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ३२६ | ० | -- | -- | -- | २५ | २,४०० | ० | २९ | २,७२६ | ० |
| पदव्युत्तर | ५ | १०३ | ० | -- | -- | -- | २४ | ४८९ | ० | २९ | ५९२ | ० |
| **फिजीओथेरपी** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ९० | ० | ० | ० | ० | ७३ | ३,६९० | ० | ७७ | ३,७८० | ० |
| पदव्युत्तर | ५ | ५४ | ० | ० | ० | ० | १८ | २५३ | ० | २३ | ३०७ | ० |
| **ऑक्युपेशनल थेरपी@** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ४ | ९० | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | ४ | ९० | ० |
| पदव्युत्तर | ५ | ५६ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | ५ | ५६ | ० |
| **ऑडीओलॉजी व स्पीच लँग्वेज पॅथोलॉजी@** | | | | | | | | | | | | |
| पदवी | २ | ५३ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | २ | ५३ | ० |
| पदव्युत्तर | १ | १२ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १२ | ० |
| | १ | १२ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १२ | ० |
| **प्रोस्थेटीक्स व ऑरथोटीक्स@** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | १६ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | १६ | ० |
| पदव्युत्तर | १ | ४ | ० | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ४ | ० |
| **नर्सिंग** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ८ | ४२० | ० | -- | -- | -- | १३८ | ७,२७० | ० | १४६ | ७,६९० | ० |
| पदव्युत्तर@ | ४ | ७८ | ० | -- | -- | -- | ३० | ४८१ | ० | ३४ | ५५९ | ० |
| **बी.पी.एम.टी.@** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १८ | १,२९९ | ० | -- | -- | -- | २ | १४८ | ० | २० | १,४४७ | ० |

@ कोविड-१९ प्रादुर्भावामुळे प्रवेश प्रक्रिया अद्याप चालू असल्याने माहिती उपलब्ध नाही.

*आधार* : १) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक   २) राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

# परिशिष्ट १०.३

## सन २०२२-२३ मधील तंत्रशिक्षण संस्थांची संख्या, त्यांची प्रवेशक्षमता व प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या (दि.३१/०१/२०२३ अखेर)

| विद्याशाखा | शासकीय | | | शासन अनुदानित | | | विना अनुदानित | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी | संस्था | प्रवेश क्षमता | प्रवेशित विद्यार्थी |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |
| **अभियांत्रिकी** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४३ | १७,३२२ | १६,७९२ | १६ | ४,२३४ | ३,८४२ | ३०६ | ८०,३०५ | ५६,७४४ | ३६५ | १,०१,८६१ | ८४,४९९ |
| पदवी | ९ | ३,००० | २,६५५ | १४ | ४,१९४ | ३,६५९ | ३०३ | १,२१,५८४ | ९१,६७० | ३२६ | १,२८,७७८ | ९७,९८४ |
| पदव्युत्तर | ५ | ५१६ | ९७ | १२ | १,८३५ | ५७६ | १६९ | ९,०२१ | २,४९९ | १८६ | ११,३७२ | ३,१७२ |
| **वास्तुशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदवी | ० | ० | ० | ३ | १६७ | १६१ | ६८ | ४,३४६ | ३,००३ | ७१ | ४,५१३ | ३१६४ |
| पदव्युत्तर | ० | ० | ० | ० | ० | ० | २० | ५०४ | १६१ | २० | ५०४ | १६१ |
| **व्यवस्थापन शास्त्र** | | | | | | | | | | | | |
| एमएमएस /एमबीए | २ | २२१ | २२० | १६ | १,३५२ | १,०४९ | ३१० | ३९,७५४ | ३३,७७४ | ३२८ | ४१,३२७ | ३५,०४३ |
| पीजीडीएम | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० |
| **हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय व्यवस्था तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदविका | २ | १२० | ११६ | ० | ० | ० | ३ | १८० | ९२ | ५ | ३०० | २०८ |
| पदवी | ० | ० | ० | १ | ३६ | ३ | ९ | ७५६ | १९८ | १० | ७९२ | २०१ |
| पदव्युत्तर | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २४ | १ | १ | २४ | १ |
| **औषध निर्माणशास्त्र** | | | | | | | | | | | | |
| पदविका | ४ | २१० | २०९ | २१ | १,३०० | १,२८८ | ४६६ | २७,९६० | २६,७४३ | ४९१ | २९,४७० | २८,२४० |
| पदवी | ४ | २२० | २१६ | ८ | ४३० | ४२८ | ३८४ | ३१,१६० | २७,६१० | ३९६ | ३१,८१० | २८,२५४ |
| पदव्युत्तर | ४ | ९५ | ९४ | ३ | १५३ | १५२ | १३२ | ४,०६८ | ३,७१३ | १३९ | ४,३१६ | ३,९५९ |
| फार्मा. डी. | २ | ६० | ५३ | ० | ० | ० | १८ | ५४० | ३४६ | २० | ६०० | ३९९ |
| **मास्टर इन कॉम्प्युटर ॲप्लिकेशन** | २ | ९५ | ९४ | ११ | ६४१ | ६३२ | ९२ | ६३४ | ५३० | १०५ | १,३७० | १,२५६ |
| **नियोजन** | | | | | | | | | | | | |
| पदवी | १ | ६० | ११ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ६० | ११ |
| पदव्युत्तर | १ | ३१ | ३१ | -- | -- | -- | -- | -- | -- | १ | ३१ | ३१ |
| **पृष्ठभाग विलेपन तंत्रज्ञान** | | | | | | | | | | | | |
| पदविका | -- | -- | -- | १ | ४० | ४० | -- | -- | -- | १ | ४० | ४० |
